म. ग्रं. सं. ठाणे

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचे नांव

मत

संग्रहालय का

( कादंबरीकलाप. )

# लंदनरहस्य.

अथवा

मिस्तरीज् ऑफ् लंदनचें भाषांतर.

## भाग ४ था.

हें पुस्तक

पुणेंवैभव, शेतकरी व शिवाजी छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

( सर्व हक्क राखून ठेवले आहेत. )

किंमत १॥। रुपये.

# लंडन.

## मालिनी.

उडुगणपरिवारा घेवुनीया निशीथीं । तुहिनकिरण डौलें संचरे स्वर्गपंथीं, ॥
अमितसदनयुक्ता लंदनाख्या पुरीते । निजकररजतानें शुभ्रवी साग्रहीतें ॥ १ ॥
विविधजन करीती जेथ नानापसारे । धरुनि मनिं मनीषा ते स्वभावानुसारें ॥
अयुत जिथ मनोरे डोलती रम्य फार । अवगुण तिथ नांदे सर्वदा दुर्निवार ॥ २ ॥

## शिखरिणी.

प्रभातीं वाटलू पुलिं पळभरीं राहुनि उभा ।
निरीक्षी सूक्ष्मत्वें, सकळ नगरीची अतुल भा ॥
नभीं जेव्हां ठाके अरुण रवीचा सारथि खरा ।
दिशांना ये लाली तम हळु लपे शैलशिखरां ॥ ३ ॥
नगाग्रीं भानूची झळकति जई बालकिरणें ।
पळे शीत त्रासें निकट जणु देखोनि धरणें ॥
अशा वेळीं, पांथा, उठति जन जेथें झडकरी ।
बसोनी वाटलू पुलिं निरखि तूं लंदनपुरी ॥ ४ ॥

## वसंततिलका.

एकीकडे करुनिया पदरास जैशी । बाला स्वरूप निज दाखविते तडित्शी ॥
ही लंदनानगरभामिनि अंबरीतें । सारोनिया प्रगटवी द्रुत चारुते ते ॥ ५ ॥
होवोनियां चकित कामुक कौतुकानें । सौंदर्यसार करि पान निजेक्षणानें ॥
साश्चर्य पांथ निज मानासिं हर्ष लाधे । शोभा समग्र पुरिची निरखी प्रमोदें ॥ ६ ॥
देवालयें, सुपथ, आपण मोठमोठे । शिल्पालयें, प्रथितदुर्ग पुराणपीठें ॥
नौका समूह—कळवी पथिकां सकाळीं । आहे कसें मनुजजीवित भूमि गोलीं ॥ ७ ॥
चाले असंख्य अयनें असला पसारा । अद्यापि खंड न पडे क्षण एक सारा ॥
अद्यापि सूर्य उगवे अणि जाइ अस्ता । अद्यापि हा षड्रिपु पीडि पहा समस्ता ॥ ८ ॥
अद्यापि आणुनीहि लोचनीं ऊष्ण पाणी । काबाडकष्ट दुबळा करि दीनवाणी ॥
पोटा मिळे न म्हणुनी भटके पथांत । श्रीमज्जनां हटकि जे फिरती रथांत ॥ ९ ॥
अद्यापि पाहति न त्यांस कृपालवानें । त्यातें पिटाळविति सत्वर मत्ततेनें ॥
त्याच्या श्रमावरीच होऊनि तुष्ट पुष्ट । त्याची स्मृति धनिक ठेवि न नष्ट दुष्ट ॥ १० ॥

---

१ तारांचासमुदाय. २ मध्यरात्रीं. ३ चंद्र. ४ आपल्या किरणरूपी रुप्यानें. ५ शोभा. ६ वस्त्राळा—मेघाळा. ७ व्यापाराच्या पेठा. ८ षड्रिपू.

# प्रस्तावना.

"I have seen the greatest wonder which the world can show to the astonished spirit. I have seen it, and am still astonished,—and ever will there remain fixed indelibly on my memory the stone forest of houses, amid which flows the rushing stream of faces of living men with all their varied passions, and all their terrible impulses of love, of hunger, and of hatred,—I mean London."—HEINRICH HEINE.

बंद पडलेल्या मासिक पुस्तकाच्या सदरांत जाऊन बसलेल्या या **कादंबरी-कल्पाचा** हा आणखी एक भाग प्रसिद्ध होत आहे. नियमितपणानें हें मासिक पुस्तक आजपर्यंत प्रसिद्ध होत आलें असतें तर **लंदनरहस्याचा** हल्लीं जो भाग प्रसिद्ध होत आहे,त्यापेक्षांही एक दोन भाग पुढें गेले असते.परंतु लोकाश्रयाचें अवर्षण पडत गेल्या कारणानें, तसा प्रकार कांहींच न होतां, हें मासिक पुस्तक बंद ठेवावें लागलें; व शेवटीं वर्गणीदारांच्या भिस्तीवर अवलंबून न राहतां, हें पुस्तक एकदम प्रसिद्ध करण्याची वेळ आली. मासिक पुस्तक वेळेवर प्रसिद्ध न करणारास मोठा दोष देण्यांत येत असतो; परंतु ज्यांस वर्गणीदारांची सचोटी, त्यांचें प्रथमत: पुस्तक सुरूं करणें, व पैसे मागितले असतां उत्तर न देणें, किंवा फारच निकड लावली तर पुस्तक बंद करणें वगैरे प्रामाणिकपणाचे प्रकार माहीत असतील ते कधींही मासिक पुस्तकांच्या अनियमितपणाबद्दल दोष देणार नाहींत. परंतु आह्मीही यापुढें वर्गणीदारांच्या फुकट आश्रयावर अवलंबून न राहतां, त्यांनींच पाहिजे तर आमच्या पुस्तका-वर अवलंबून असावें अशी तजवीज केली आहे. ती हीच कीं, आजपर्यंत जे आह्मी पदरचें टपाल भरून वर्गणीदारांची फुकट भूक भागवीत होतों, तें या-पुढें तसें न करतां, वर्गणीदारांस भूक लागेल तेव्हां त्यांनींच आमच्याकडे अगाऊ पैसे घेऊन यावें असें करणार आहों. ह्मणजे, या **कादंबरीकल्पांतून** यापुढें कोणताही भाग प्रसिद्ध झाला तरी तो मासिकपुस्तकरूपानें न होतां, एकदम प्रसिद्ध होत जाईल. असो.

हें पुस्तक हातीं धरण्याचा मूळ उद्देश बहुतकरून आमच्या वाचकांच्या स्मरणांतून गेला नसेल. आतां ही गोष्ट खरी आहे कीं, समजण्यास सुलभ, मनोरंजन करण्यास सुरस, परंतु भाषांतरास बिकट, अशा **रेनाल्ड**च्या कादंबऱ्यांचें प्रतिबिंब, जिचें शब्दभांडार आकुंचित अशा महाराष्ट्र भाषेंत तितकें तंतोतंत उतरणार नाहीं; तरी आमची अशी खात्री आहे कीं, ज्याची अजब वर्णनशक्ति, ज्याचें अलौकिक संविधानकचातुर्य, व ज्याचें असाधारण कल्पनासामर्थ्य अशा त्या **रेनाल्ड**च्या कादंबऱ्यांचें पाहिजे तशा वाकड्यातिकड्या भाषेनें भाषांतर केलें तरी तें आपला प्रभाव दाखविल्याशिवाय रहावयाचें नाहीं. शिवाय, **मोरोपंत**, **वामन**, **अनंतफंदी** इत्यादि कविमुकुटमणींना ज्या भाषेवर आपली कीर्ति अजरामर करतां आली ती आमची महाराष्ट्र भाषा इतकी नादान असेल असें आह्मांस वाटत नाहीं. तेव्हां, ज्याप्रमाणें सुधारस रुप्याच्या पात्रांत घेतला तरी तो गोडच व मृत्तिकेच्या पात्रांत घेतला तरीही तो गोडच ; त्याप्रमाणें, **रेनाल्ड**च्या जात्याच सुरस कादंबऱ्या महाराष्ट्र भाषेंत कशाही उतरल्या तरी त्या सुरसच वठणार यांत बिलकुल शंका नाहीं. **रेनाल्ड**च्या कादंबऱ्या प्रिय होण्याला त्याची अजब वर्णनशक्ति ही मुख्य कारण आहेच. परंतु त्या विशेष प्रिय होण्यास कथेचें संविधानक जुळविण्याची जी त्याची अलौकिक कला तीही कांहीं कमी कारण नाहीं. जें चांगलें संविधानक आहे तें कोणत्याही भाषेंत उतरलें तरी तें चांगलेंच. नाटककादंबऱ्यांचें सौरस्य ज्या गुणांवर अवलंबून असतें, त्यांत त्यांचें संविधानक चांगलें असणें हा एक प्रधान गुण आहे. आपल्या मराठी भाषेंत संविधानक गुणानें विशेष प्रसिद्धीस आलेली एखादी कादंबरी किंवा एखादें नाटक दिसत नाहीं. संस्कृतांतदेखील **मृच्छकटिक** नाटकाशिवाय नाहीं ह्मटलें तरी चालेल. असो. सांगण्याची मुख्य गोष्ट ही कीं, **रेनाल्ड**च्याच कादंबऱ्या हातीं घेण्याचीं जीं कारणें आहेत, त्यांपैकीं त्यांच्या भाषांतरापासून महाराष्ट्र भाषेच्या वृद्धीस अंशत: तरी साह्य व्हावें हें एक कारण आहे. हें साह्य ह्मणजे, केवळ मराठी भाषेंत शब्दांचा भरणा करूनच करावयास पाहिजे असें नाहीं. जे मनोधर्म व जे मनोव्यापार आपल्यांत नाहींत ते भाषांतरद्वारा परकीय भाषांतून आपल्या भाषेंत आणल्यास ते कमी किंमतीचे होतील असा अर्थ नाहीं. दुसरी एक गोष्ट **रेनाल्ड**च्या पुस्तकापासून आपल्या भाषेला फायद्याची आहे. लोकांस लिहिण्यावाचण्याची गोडी लागूं लागल्याबरोबर आपल्या भाषेंत ज्या " स्वकपोलकल्पित " कादंबऱ्या झाल्या त्यांपासून

र्सों तहत् **नाट्यकथार्णव** नांवाच्या मासिक पुस्तकाचा उदय होईपर्यंत ज्या कादंबऱ्या झाल्या, त्यांची पद्धत पाहिली असतां कळून येईल कीं, " स्वकपोलकल्पित " पद्धतीपेक्षां, इंग्रजी ग्रंथाधारें **नाट्यकथार्णवानें** उचललेली नाटककादंबऱ्यांचीच पद्धति. विशेष इष्ट आहे. **रेनाल्डच्या** कादंबऱ्यांवर अश्लीलता व नीतिभंगादि दोषांचा जो आरोप आहे, त्याशिवाय त्यांवर आणखी असाही एक आक्षेप आहे कीं, त्याच्या कादंबऱ्यांत त्याच त्या गोष्टी पुन:पुन्हां आलेल्या असतात. परंतु या आक्षेपांत कांहीं अर्थ नाहीं. जादूचा खेळ करणारा जसा आपल्या हातांतील पत्याचें एकच पान मोठ्या शिताफीनें सर्वांच्या हातांत देत असतो, व त्याचें जसें सर्वांना आश्चर्य वाटतें, त्यांतलाच हा प्रकार आहे. त्याच्या कादंबरींत जरी तेच ते प्रकार पुन:पुन्हां येत असले तरी त्यांचे प्रसंग किती निराळे असतात हें वाचकांना समजत असतीलच. त्याच्या संबंधानें अचंबा वाटण्यासारखी गोष्ट हीच कीं, आपल्या महाभारताच्या दुपटी तिपटीनेंही जो त्यानें एवढा प्रचंड ग्रंथसंग्रह निर्माण केला, त्याला अवधि मिळाली असावी कशी? त्यानें माहिती मिळविली असेल केव्हां? ग्रंथ लिहिले असतील केव्हां? व छापविले असतील केव्हां हें कांहींच कळत नाहीं.* इतकें अमोघ ग्रंथकर्तृत्व आमच्या देशांत येण्याला अद्यापि बरेच दिवस पाहिजेत; व विशेष खेदाची गोष्ट ही आहे कीं, त्याचें चरित्रही कोठें मिळत नाहीं. परंतु इतक्यांतच आमचा व आमच्या वाचकांचा संबंध सुटला आहे असें

---

*रेनाल्डच्या विलक्षण बुद्धीमत्ताची अशी एक आख्यायिका सांगतात कीं, एके दिवशीं तो आपल्या एका मित्राबरोबर हवा खाण्याकरितां एके ठिकाणीं गेला. तेथील देखावा पाहून त्याच्या मित्रानें सहज म्हटलें कीं, या वनश्रीचें वर्णन एखाद्या पुस्तकांत येण्यास योग्य आहे. दुसरे दिवशीं पहातो तों तेंच पुस्तक छापून तयार होऊन त्याच्या हातींही आलें; व त्यावर नांव रेनाल्डचें! यावरून त्याच्या हातून ग्रंथ कसे होत असतील याची कल्पना करतां येईल. त्याच्या पुस्तकाच्या ४१६ पानांच्या एका पुस्तकाचें आतांशा एक भाषांतर होऊन त्याचीं एकंदर पृष्ठें अजमासें हजार झालीं आहेत. त्याचें प्रत्येक मोठें पुस्तक ४१६ पानांचें असतें. अशीं पुस्तकें अजमासें पन्नास साठ असतील. व बारीक पुस्तकें त्यानें किती केलीं आहेत तीं बरोबर समजत नाहींत. त्याच्या पुस्तकांचें भाषांतर साधारण मनुष्याच्या पुऱ्या आयुष्यांत होणार नाहीं म्हटलें तर फारशी हरकत नाहीं.

नाहीं. मिळाल्यास, या पुस्तकाच्या उत्तरार्धाच्या शेवटीं रेनाल्डचें चरित्र वाचकांस सादर करूं.

प्रकृत पुस्तक मुळाचें शब्दशः भाषांतर आहे असेंही नाहीं, व नाहीं असेंही नाहीं. जेथें भाषांतर करून कंटाळा वाटण्यासारखा, किंवा भाषांतर करूनही न समजण्यासारखा भाग आला तो तसाच सोडून दिला आहे. त्याप्रमाणेंच सैतान्यासारख्या बदमाष लोकांचीं चरित्रें साद्यंत न देतां कथाभागाला अवश्य तितकीं दिलीं आहेत. प्रसंगविशेषीं टिपा देऊन जास्ती स्पष्टीकरण केलें आहे हें समंजस वाचक ओळखतीलच. बऱ्याच प्रसंगीं कांहीं कांहीं शब्दांनीं भाषांतराच्या वेळीं फार नडविलें. उदाहरणार्थः—Love, Shame, Pride Vanity. हे शब्द इतके सोपे आहेत कीं, त्यांच्या संबंधानें तक्रार करणाराचेंच मूर्खपण दिसून येईल. ज्या शब्दांचा अर्थ दुसऱ्या यत्तेंतलें पोर सुद्धां सांगेल त्या शब्दांनीं अडविलें ह्मणण्यांत अर्थ आहे असें कोणीही ह्मणणार नाहीं. परंतु इंग्रजी भाषेंतले कांहीं शब्द इतके व्यापक आहेत कीं, त्यांना मराठी भाषेंत तशा अर्थाचा प्रतिशब्द मिळण्याला प्रसंगविशेषीं मारामार पडते. Love ह्मणजे प्रीति, Shame ह्मणजे लज्जा हे उघड उघड शब्दार्थ सर्वांना माहीत आहेत, पण या शब्दांचा रेनाल्डनें निरनिराळ्या ठिकाणीं जो उपयोग केला आहे तोच धरून त्या शब्दाचे वाचक जे शब्द मराठींत आहेत त्यांचा उपयोग करूं ह्मटलें तर चालत नाहीं. हा केवळ आमच्याच भाषेचा दोष आहे असें नाहीं; आमच्या मराठी भाषेंतही असे कांहीं शब्द आहेत कीं, त्यांचें इंग्रजींत शब्दशः भाषांतर मोठ्या पंडिताच्यानेंही होणार नाहीं.

रेनाल्डचें लंदन रहस्य वाचून वाचकांना समजून आलें असेलच कीं, त्याचा पहिला कटाक्ष कायदे कानू करणारावर, व दुसरा समाजांतील वरिष्ठ वर्गाच्या लोकांवर असे. एकवार मनुष्याचें पाऊल चुकून पडलें कीं, मग तें बुद्धिपुरस्सर पडो, किंवा चुकून पडो; तो कायद्याच्या कचाट्यांत व आप्तस्वकीयांच्या प्रेमबंधनाला मुकून समाजाच्या तिरस्कारास पूर्ण पात्र झाला. लोकांत दुराचरण, व्यसनाधीनता इत्यादि अनीतिप्रसारक गोष्टी वाढण्याला कारण या दोन गोष्टी अशी त्याची अगदीं दृढ समजूत झाली होती. व त्याबद्दल पदोपदीं त्याच्या पुस्तकांत उद्गार निघालेले दिसतात. अवांतर गोष्टींबद्दलही त्यानें उल्लेख ठिकठिकाणीं केले आहेत. पण प्रस्तुत प्रसंगीं त्यांचा विचार करण्याचें कारण दिसत नाहीं. स्वतंत्रतेचें केवळ माहेरघर—संपत्तीचें उत्पत्तिस्थान—विद्येचें आ-

दिपीठ—व्यापार, कलाकौशल्य इत्यादिकांचें मुख्य स्थान जें भाग्यशाली लंदन* नगर त्याचें वर्णन करितांना काय गोष्टी येतील आणि काय येणार नाहींत हें कोणी सांगावें? त्या गोष्टी कथेच्या अनुरोधानें येतील त्याच ब-या.तरी रेनाल्डच्या

---

* लंदन शहरासंबंधानें वर्णन करतांना एका ग्रंथकारानें म्हटलें आहे:—

"According to Herschel, the great astronomer, London is the centre of the terrestrial globe; we know it to be the centre of commerce, of wealth, of intellectual and moral life. As "all roads led to Rome," when she was mistress of the world, so now every thinker and worker every artist, every inventor, seems to turn to London, and find his best home or market here, where the multitudinous transactions of mankind are concentrated and carried on. In this vast metropolis there are to be seen individuals, families, tribes of pretty nearly every race on the habitable globe of nearly every tongue and dialect, of every colour and complexion, of every creed, religion, persuasion, and opinion—howsoever eccentric. We can say of London, more truly than Gibbon could claim for pagan Rome, that she is the centre of religious toleration, the common temple of the world. The freedom, of our city is bestowed on all the gods of mankind, and without preference for race or creed we adopt virtue and merit, whether in ourselves or strangers. Each of our millions of denizens is ful filling, or supposed to be fulfilling, some duty or errand, following some calling, or learning to follow it. The idlers, who, whether from predilection or obligation, take no share in the work of London, have their marked characteristics, the beggars [illegible] and the thieves also. If the thousands who rise in the morning [illegible] not how they are going to earn a breakfast, nor where they sh[illegible] their head at night, it may be said that a large proportion woul[illegible] certainly starve anywhere but in this amazing metropolis, where the [illegible] which fall from so many hundreds of thousands of tables are to be [illegible] up by those who are on the alert to watch for them, and to benefi[illegible] themselves by the habits, foibles, vices fortunes and misfortunes of their neighbours. The city sparrow, who lives upon the [illegible] refuse of the streets, fattens beneath his smoke-begrimed feathers [illegible] like manner does many a crossing-sweeper in London earn m[illegible] and thrive better than a labourer in the country."

पुस्तकासंबंधीं एकवार जें ह्मटलें होतें कीं, "ज्यांना मनोरंजन करून उपदेश घ्यावयाचा असेल, ज्यांना पुस्तकी ज्ञानानें व्यवहार समजून घ्यावयाचा असेल, ज्यांना स्त्रीपुरुषांचें निर्मल व शुद्ध प्रेम कसें असतें याची माहिती करून घ्यावयाची असेल, ज्यांना कामांध पुरुषांचीं व पर पुरुषांवर आषक्त राहणाऱ्या स्त्रियांचीं दुश्चरितें पहावयाचीं असतील, ज्यांना गृहसौख्याचें भांडार पहावयाचें असेल, ज्यांना उदार प्रकृतीचे पुरुष पहावयाचे असतील, ज्यांना एकनिष्ठ स्त्रिया पहावयाच्या असतील, सारांश ज्यांना ह्मणून या व्यवहारांतील सूक्ष्मासूक्ष्म गोष्टी समजून घ्यावयाच्या असतील त्यांनीं सुप्रसिद्ध कादंबरीकार जो **ज्यार्ज डब्ल्यु. एम. रेनाल्डस्** याचीं **लंदनरहस्या**दि पुस्तकें वाचावींत," याची शेवटीं पुनरुक्ति केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

या पुस्तकाच्या कार्यावर तीन गृहस्थांनीं फार उपकार केले आहेत. एकानें या भागांतल्या कविता करून दिल्या व दुसऱ्याच्या मदतीशिवाय, कदाचित् हा भाग इतक्यांत बाहेर पडतांच ना. तिसरे गृहस्थ रा. रा. **कृष्णराव बापूजी मांडे.** यांच्याच मेहनतीनें हें पुस्तक मुदत चुकून गेली तरी इतक्या लौकर बाहेर पडलें आहे. मुदत चुकली हा त्यांचा दोष नसून पुस्तककर्त्याचा आहे. या तिघांच्या निरनिराळ्या उपकारांबद्दल पुस्तककर्ता त्यांचा अत्यंत ऋणी आहे हें येथें सांगितल्यावांचून राहणें प्रशस्त वाटत नाहीं.

कसबा पेठ घर नं. १४१ पुणें. } **शंकर बापूजी मुजूमदार,**
तारीख १९ मे. १८९०. } **कादंबरी कलापाचा कर्ता.**

फिरून ती खिडकींतून मागें परतली व आपल्या अंथरुणावर जाऊन पडली, परंतु तिला झोंप मुळींच आली नाहीं. काय करावें हा विचार करीत ती पडली. जों जों ती विचार करूं लागे तों तों तिचें मन फाकूं लागलें. शेवटीं तिला झोंप लागली. परंतु तिच्या दुःखांनीं स्वप्नांतही तिची पाठ पुरविली.

दुसरे दिवशीं तिला उठण्याला उशीर झाला. ती स्वयंपाक घरांत गेली तेव्हां तिला कळलें कीं, **रिचर्ड** बाहेरगांवीं जाण्याच्या तयारींत असून, **विटिंगहम** सामानांची दिवाणखान्यांत बांधाबांध करीत आहे, व **हालफर्ड**ला गाडी पाहण्याला धाडलें आहे.

**मार्खमनें एलन**च्या हातांत एक पत्र देऊन तिला आपल्या आकस्मात् जाण्याचें कारण सांगितलें.

**एलन**नें खालील मजकुराचें पत्र वाचलें:—

"चि० चि०. वेळ साधून पत्रदर्शनीं निघून यावें. मला एक जबरदस्त जखम लागल्या कारणानें इच्यांतच माझा अंत होईल असें वाटतें. या वेळेला स्नेहाच्या विचारानें प्रापंचिक गोष्टींची व्यवस्था लावणें जरूर आहे. व असे स्नेही तुमच्यावांचून मला कोणी दिसत नाहींत. क. लो. क. हे विनंती.

**थामस आर्मस्ट्रांग.**"

**मार्खम** ह्मणाला, "ही जखम तशीच असली पाहिजे. नाहीं तर त्यानें मला खुलासेवार पत्र लिहिलें असतें. खरें काय आहे तें समजून घेण्याची मला फार चटपट लागली आहे. तुरुंगांतून सुटल्यावर लोकांत वागण्याबद्दल त्यानेंच मला धीर दिला. शिवाय त्यानें माझी एका—" पुढें तो थांबला. व कांहीं वेळ त्याचें लक्ष्य **इझाबेले**कडे लागलें. गाडी आली तेव्हां **रिचर्ड**नें **मनरो** व **एलन**चा निरोप घेतला. जातांना त्याच्या विश्वासू **विटिंगहम**नें त्याला सांगितलें कीं, "धनीसाहेब, तिकडे अनीचांच्या कुसंगत्वाला लागून भिन पाऊं नका. इकडचें सावधान ठेवा, बरें कां."

---

# भाग ७८.

## मेरिअन.

सर्व दिवसभर **एलन**ला एक प्रकारची अस्वस्थता वाटल्याकारणानें, तिला भीति वाटून ती त्या दिवशीं संध्याकाळीं लवकरच आपल्या खोलींत गेली,

थोड्या वेळानें मागून ती इमानी आणि कोमल अंतःकरणाची **मेरिअन**ही तिच्या खोलींत आली.

" **मेरिअन**, तुह्मी या वेळेला आलांत फार चांगलें केलेंत. मला आज कोणी तरी माझ्याशीं सुखाचे दोन शब्द बोलायला पाहिजेच होते. " **एलन** म्हणाली.

" मुली, आज तुझें तोंड फारच उतरलेलें दिसतें, तूं आज लवकर निजशील तर बरी. "

" होय, मी मनाला हुशारी आणण्याचा प्रयत्न करतें, पण ती येत नाहीं. " **मेरिअन**नें मग तिच्या अंगावरचीं वस्त्रें उतरून तिला पलंगावर बसविल्यावर विचारलें, " बाळे, तुला आतां कसें वाटतें ? "

" छे, मला कांहीं बरें वाटत नाहीं ! मला वाटतें— "

" आजची रात्र पार पडेलसें दिसत नाहीं. मग पुढें काय करायचें बाळे ? "

" **मेरिअन**, मला दुसरें कांहीं सुचत नाहीं. माझी अब्रू वांचवा व माझी गोष्ट उघडकीस येईल असें करूं नका ? "

" मुली, तुला मीं कालच नाहीं सांगितलें ? आपण कांहीं तरी युक्ति योजली असती पण आतां काय करावें ? "

" असें नकाहो ह्मणूं ? असें म्हणून नकाहो माझा धीर खचवूं ! मी अगदीं दीन झालें आहें ! मी आपली नाहीं इतकी काळजी करीत, माझ्या बापाकरितां मी इतकी भितें. त्याला हें कळलें तर त्याचें काळीज फुटेल. अगोदरच दुःखानें तो इतका होरपळून निघाला आहे कीं, हें वर्तमान त्याला कळलें कीं त्याची आशाच नको. मला ठाऊक आहे कीं तो माझें हें काळें तोंड कधीं पहाणार नाहीं. त्याची माझ्यावर फार प्रीति आहे. माझा त्याला अभिमान वाटत आहे. आणि जर हें त्याला कळलें कीं, त्याचे प्राणच जातील ! पण **मेरिअन**, तुम्ही माझ्यासाठीं कां रडतां ? "

" मुली, तुझ्यासाठीं मी काय पाहिजे तें करीन ! पण आतां माझा इलाज चालत नाहीं. "

" **मेरिअन**, असें म्हणूं नका हो ! माझी अब्रू राखण्याची वेळ निघून गेली असें नका म्हणूं ! माझ्याकडे व माझ्या बापाकडे पहा ! मला आतां अगदीं सुचत नाहीं. मी या वेळेला अगदीं निराश झालें आहें ! अहाहा ! जर पुरु-

धनी, आपल्या कामवासनेच्या बळी पडून आपण अनाथ स्त्रियांना किती दुःखांत टाकतों, हें कळून येतें तर कि— "

**मेरिअन**चे डोळे पाण्यानें भरून येऊन ती ह्मणते:—" बाळे, किती वा ईट वाटवून घेतेस ? या वेळेला कांहीं तरी उपाय केला पाहिजे खरा. तुला आतां कसें वाटतें ? "

" कसें वाटतें तें मला सांगतां येत नाहीं. मला मानसिक वेदना इतक्या कांहीं होत आहेत कीं, त्यापुढें शारीरिक वेदना कांहींच नाहींत. तरी पण मला असें वाटतें कीं, त्या क्षणोक्षणीं वाढत आहेत."

" वाढत असतील खऱ्याच. पण काय असेल तें असो, आज सकाळीं **मार्खम**चा **फ्रान्स**ला जाण्याचा बेत ऐकून माझ्या मनांत एकदम असें आलें कीं देवालाच तुझी करुणा आली. असें कां वाटावें, हें मला सांगतां येत नाहीं, कारण, मला त्या वेळेला तुझी वेळ आजच भरेल असें दिसून आलें नाहीं. "

**मेरिअन** मला जास्ती जास्तीच वेदना होत आहेत. कांहीं तरी उपाय करा. माझ्या बापाला नाहींना हें कळणार ! त्याच्या पांढऱ्या केंसाकडे पहा ! त्याची माझ्यावर किती प्रीति आहे याचा विचार करा. देवा ! या प्रसंगांतून सोडविण्याला कांहींच कां उपाय नाहीं ! **मार्खम**ला तरी आतां फिरून तोंड काय दाखवूं ! **मेरिअन,** तुम्ही नाहींना मला सोडणार ? "

" नाहीं वरं बाळे ! "

" मी मेलें तरी चिंता नाहीं, पण माझी आब्रू दवडूं नका. तुम्हाला कांहींच कां इलाज सुचत नाहीं ? मी तुमच्या पाया पडतें ! " **एलन** इतकी दीन होऊन बोलली कीं त्या कोमल अंतःकरणाच्या बाईच्या मनाला तें लागलें.

इतक्यांत कांहीं आठवण होऊन ती बोलली:—" एक खेडे गांवचा डाक्टर माझ्या ओळखीचा आहे. नुकतेंच त्याचें लग्न होऊन त्यानें आपला धंदा सुरू करूनही थोडेच दिवस झाले आहेत. तो गरीब आहे, आणि मी हल्लीं कोठें चाकरीस आहें हेंही त्याला माहीत नाहीं. "

" काय वाटेल तें करा. पण माझी आब्रू वाचवा ? देवा ! काय माझ्या कपाळीं आलें हें ? "

" होय. याशिवाय दुसरा इलाजच नाहीं. पण एक गोष्ट तुला केली

पाहिजे. ती ही कीं, तुझी आब्रू वाचण्याकरितां तें मूल जिवंत जन्मलें तर त्याची तुला आशा सोडली पाहिजे. "

"मी तुमच्या स्वाधीन आहे, माझ्या बापाकरितां मी एवढ्या विनवण्या करिते."

" ठीक आहे तर मग, हाच मार्ग चांगला आहे. कदाचित् तो ऐकणारही नाहीं. पण प्रयत्न करून त्याचीच मदत घेतली पाहिजे. माझा बेत काय आहे तो सांगायला आतां वेळ नाहीं. बरं मी आतां अर्धा पाऊण तास तुला सोडून गेलें तर कांहीं हरकत नाहींना ? "

" जर माझ्याचकरितां असेल तर कांहीं हरकत नाहीं. पण **मेरिअन** त्या डाक्तरला मी कळून येतां उपयोगीं नाहीं. "

" तर मग खोलींत सगळा अंधार केला पाहिजे. तुला तो चालेल ? "

**एलन**नें मानेनें होय ह्मणून सांगितलें.

" तर मग धीर धर आतां " असें ह्मणून ती खोलींतून बाहेर गेली.

नंतर तिनें आपल्या खोलींत जाऊन, पेटींतून काय होते नव्हते तेवढे पैसे घेतले. व तोंडावर काळा बुरखा घेऊन हलकेंच खालच्या जिन्यानें उतरल्यावर, जिकडे तिकडे सामसूम आहे असें पाहून ती मागच्या दारानें घराच्या बाहेर पडली.

* * * * * * * *

* * * * * * *

पाऊण तास झाल्यावर घराच्या मागच्या बाजूला बागेजवळ दोन मनुष्यें दृष्टीस पडलीं, त्यांपैकीं एक स्त्री असून, ती रुमालानें डोळे बांधलेल्या एका मनुष्याला घेऊन चालली होती.

" तुमचा हात कां कापतो ? " म्हणून **मेरिअन**नें विचारलें. वर एक स्त्री होती ह्मणून सांगितलें ती हीच.

" उगीच. पण मला एक शब्द विचारायचा आहे. आजच्या कामाबद्दल तुम्हीं मला चाळीस पाऊंड दिलेत, पण तें मूल जिवंत राहिलें तर त्याचा पुढें तुम्ही 'तरतूद कराल याला प्रमाण काय ? " डाक्तरनें विचारलें.

" आईच्या प्रेमाकडे लक्ष्य द्याल कीं नाहीं ? तिच्यानें कसें रहावेल ? आणखी मी तुम्हाला सांगून ठेवतें कीं तें मूल फार दिवस तुमच्याजवळ ठेवलें जाणार नाहीं. "

" असें असेल तर त्या कामाला मी हात घालीन. "

" तुम्ही, कोठें जायचें ? याची चौकशी करणार नाहीं म्हणून सांगितलें तें लक्ष्यांत असूंद्या. "

" माझ्या शब्दांवर भरवंसा ठेवा तुम्ही. " तो म्हणाला.

**मेरिअन**नें मागच्या दारानें त्याला आंत घेतलें, व हळूंच जिना चढून ते **एलन**च्या खोलींत गेले.

**एलन**ला प्रसववेदना होत होत्या, इतक्यांत हे दोघे तिची सुटका करण्या- करितां गेले. पुढें थोड्याच वेळानें ती पुत्र प्रसवली.

या बालकाचा मंजुल रुदनस्वर ऐकून तिला काय बरें वाटलें असेल ? परंतु याचा वियोग थोड्याच वेळानें तिला करावा लागेल व तो कदाचित् देहांत जीव आहे तोंपर्यंतसुद्धां असेल कशावरून ?

* * * * * * * *

अर्ध्या तासानंतर **मेरिअन** आणि डाक्तर फिरून बागेंत आले. वस्त्रांत व्यवस्थेनें झांकून तिनें **एलन**च्या मुलाला घेतलें होतें. डाक्तराच्या घराच्या कांहीं अंतरावर आल्यावर तिनें तें मूल त्याच्या स्वाधीन केलें व आपण घाईनें परत आली.

" अहाहा ! मेरिअन ! आजचे तुमचे उपकार मी कशानें फेडूं ! " **मेरिअन** तिच्या खोलींत आल्यावर **एलन** तिला म्हणाली.

" मुली गप्प रहा. तुला आतां थोडी विश्रांति पाहिजे. सकाळीं तूं आजारी आहेस असें मी सांगेन. सर्व व्यवस्था मी नीट केली आहे. डाक्तर आपल्या घरांतून निघाल्यापासून येथून जाईपर्यंत त्याच्या डोळ्यावरचें पांघरूण काढिलें नाहीं व त्याला माझेंही तोंड दृष्टीस पडलें नाहीं. कारण मी त्याच्याकडे गेलें तेव्हां त्याचें माझें बोलणें रस्त्यांत अंधारांतच झालें. शिवाय मी आपल्या तोंडावरून घट्ट बुरका घेतला होता. तेव्हां मी कोण आहे हें त्याला कधीं समजणार नाहीं. "

" पण तो येथें आला कसा ? "

" माझ्याजवळ चाळीस पाऊंड होते, ते—"

"तुम्हीं त्याला दिलेत. अहाहा ! किती तुमचा चांगुलपणा सांगूं ! मी त्याच्या चौपट तुम्हाला देईन बरं !"

" त्याबद्दल आपण मागून बोलूं. आतां तूं थोडी झोंप घे. आणि मी तुझ्याजवळ जागत बसतें. "

" **मेरियन** मला एक गोष्ट विचारायची आहे. त्या मुलाचें काय केलें ?" **एलन**नें डोळ्यांत पाणी आणून विचारलें.

" त्याची तुला कांहीं काळजी नको बरं ? आतां तूं थोडी झोंप घे मात्र !"

थोड्या वेळानें, त्या तरुण मातेला गाढ झोंप लागली. अशी निवांत झोंप तिला बरेच दिवसांत ठाऊक नव्हती.

दुसरें दिवशीं सकाळीं ती जागी झाली तेव्हां बरीच हुशार दिसूं लागली. तिनें पाहिलें तों तिची विश्वासु मैत्रीण जवळ असून तिनें थोडीशीं तिच्या उपहाराची तयारीही केली होती.

नंतर **एलन**नें लिहिण्याचें साहित्य मागितलें. व तें मिळाल्यावर बिछान्यावर बसून तिनें एक पत्र लिहिलें. " मेरिअन, " ती म्हणाली, " माझें एक काम करावयाचें राहिलें आहे. तुम्ही अगोदरच माझ्यावर इतका उपकार केला आहे कीं, आतां जें आणखी एक तुम्हाला मी काम सांगणार आहे त्यासंबंधानें गुप्त-पणा ठेवण्याविषयीं तुझाला कांहीं आतां सांगायला नको. आणखी तुम्हांला असें सांगावयाचें आहे कीं, आजची गोष्ट गुप्त राहो कीं न राहो, मी ज्याला हें पत्र लिहितें आहे त्याचें नांव माझ्या विचाराशिवाय फोडूं नका."

" तुला ठाऊक असूंदे कीं, तुला सुख होण्याकरितां मी पाहिजे तें करीन. माझ्याकडून तुझी कोणतीही गोष्ट फुटणार नाहीं."

" शाबास **मेरिअन**, माझ्या बापाला, व **मार्खम**ला जर त्याच्याशीं माझा पत्रव्यवहार आहे असें कळलें तर ते मला भाजून खातील." असें म्हणून तिनें **मेरिअन**ला त्या पत्रावरील पत्ता दाखविला."

" **ग्रीनवूड** ! **विटिंग्हम**नें मला सांगितलें होतें कीं, त्यानेंच तुझ्या बापाला आणि **मार्खम**ला सफाई बुडाविलें."

" आणखी **मेरिअन**, ज्यानें माझ्या बापाला भिकेस लावलें, ज्यानें **मार्ख-मला** लुटलें तोच **ग्रीनवूड** माझ्या मुलाचा जनक आहे !"

" मुली आतां मला समजलें; तुझ्या बापाला व **मार्खम**ला तुझी स्थिति कां कळवायची नव्हती ती. त्यांना हें सहन झालें नसतें. असो आतां दुपारीं हें पत्र मी त्याच्याकडे घेऊन जाईन आणि त्याच्याकडून उत्तर घेऊन येईन."

" अहाहा ! **मेरिअन**, हा तुमचा उपकार कसा फेडूं !"

# भाग ७९.

## हुंडीः—बाप.

**ग्रीनवुड**च्या खोलींत जिकडे तिकडे गडबड दिसत होती. पलंगावर कांहीं कामाच्या कागदाचे ढीग पडले होते. एका मेजावर पत्राचा ढीग पडला होता, दुसऱ्यावर वर्तमानपत्रांचा पसारा पडला होता. अशा तऱ्हेच्या खोलींत **ग्रीनवूड** एका सुखासनावर प्रत्याहिक वर्तमानपत्र वाचीत चैनीनें पडला असतां **लाफरनें सर रूपर्ट** यास आंत आणून सोडलें.

" मी त्या हुंडीकरितां फिरून आलों. तिची पहिली मुदत संपली तेव्हां आपण फिरून चार महिन्यांची वाढविली होती. ती उद्यां संपणार आहे. " **रूपर्ट** म्हणाला.

" हो, तें माझ्या लक्षांत आहे. पुढें तुम्ही काय करणार ? " **ग्रीनवुडनें** विचारलें.

" माझी पैसे देण्यासारखी कांहीं स्थिति नाहीं "

" तर मग थोडेसे पैसे द्या आणि फिरून मुदत वाढवा म्हणजे झालें. "

" छे, हल्लीं मी अगदीं कफल्लक झालों आहे. "

" पण मी तर असें ऐकलें आहे कीं, **चिस्टरनें** आणखी तुम्ही जुगारीच्या धंद्यांत बराच लाट मारलात ? "

" छे, म्हणण्यासारखा नाहीं. पण त्या हुंडीसंबंधानें काय करतां ? "

" मी आतां सांगितलेंच. प्रथम ती हुंडी पंधराशें पाऊंडाची केली होती. "

" पण मला कायते हजारच मिळाले. "

" ते कांहीं आतां मला आठवत नाहीं. पण तिची मुदत भरली हें खरें, तुमच्यानें रुपये देववले नाहींत तेव्हां फिरून मुदत वाढविली. "

" पण पंधराशाचे सोळाशे करायचे या बोलीवर. "

" पण मला आठवत नाहीं. तुम्ही आतां आणखी येऊन मला सांगतां कीं, माझ्याच्यानें देववत नाहीं म्हणून. पण हें असें चालायचें नाहीं. "

" पण, **ग्रीनवूड**, तुम्ही ज्या वेळेला माझ्यापासून हुंडी लिहून घेतलीत, त्या वेळेला तुम्हाला माहीत होतें कीं, तिची भरपाई लवकर व्हावयाची नाहीं ! "

" तें मला ठाऊक नाहीं. तुम्ही सहाशें पाऊंड आणा म्हणजे मग हजारांची पाहिजे तर मुदत वाढवूं. व त्याचें व्याजही घेणार नाहीं." **ग्रीनवूड** म्हणाला.

" पण ते सहाशें तरी कोणा लेकाजवळ आहेत ? "

" तुमच्या खाजगी गोष्टी कांहीं मला माहीत आहेत ! मी आपले पैसे असे राहूं देणार नाहीं. आणि शिवाय **लार्ड ट्रिमार्डिन**नें तुम्हांला हात उसनी दिलेली हुंडी तुम्ही भरपाई केली नाहीं हे त्यांना कळावें अशी तुमची इच्छा नसेल. "

" हात उसनी ! " **रूपर्ट** एकदम दचकून म्हणाला.

" तर मग काय एवढी रक्कम ते तुमचें देणें लागत होते ? "

" **ग्रीनवूड**, काय तुम्ही मांडलेंत हें ? एखाद्याला असें वाटेल कीं, तुम्ही यांतला खरा प्रकार अगदीं विसरले असावेत ? "

" कदाचित् त्यांतल्या बारीकसारीक गोष्टी माझ्या लक्षांत नसतील. पण हें अगदीं खचीत आहे कीं, **लार्ड ट्रिमार्डिन**च्या सहीची तुमच्या कडून आलेली सोळाशें पाऊंडांची हुंडी माझ्याजवळ आहे व तिची फेड मी तुमच्याकडून सवलतीनें करून घेत आहें. "

" **ग्रीनवूड,** त्या हुंडीवर **ट्रिमार्डिन**ची खरी सही नाहीं हें तुम्ही विसरलां नसाल ? "

हा प्रकार जसा आपल्याला माहीत नाहीं असें दाखवून **ग्रीनवुड** म्हणाला, " **ट्रिमार्डिनची** नाहीं ? "

" हो नाहीं. तुम्हीच नाहीं मला सांगितलें—"

**ग्रीनवूड** रागाचा आव दाखवून, " मी सांगितलें ? **सर रूपर्ट हारवरो,** काय तुमचा विचार आहे? तुम्ही काय गमजा चालविल्या आहेत या ? "

" अरेरे ? याच्या तावडींत मी कोणीकडून सांपडलों कोण जाणें ! " **रूपर्ट** दांत खाऊन मनांत म्हणाला, परंतु आपला राग दाबून तो **ग्रीनवुड**शीं बोलूं लागला, " **ग्रीनवूड,** मेहरबानी करून आणखी चार महिन्यांची मुदत वाढवा. मुदत संपण्याची वेळ आली म्हणजे तुमची भरपाई करून देऊं. "

याचा आतांचा रागाचा आवेश पाहून **ग्रीनवूड,** म्हणाला, "छे, **हारवरो,** माझा अगदीं निश्चय झाला. सहाशें पाऊंड आणा म्हणजे मुदत वाढवीन. नाहीं तर ती हुंडी मी आज आपल्या कारकुनाच्या स्वाधीन करीन व तो ती उद्यां तुमच्या सासऱ्याकडे भरपाई करून घेण्याकरितां घेऊन जाईल. "

" **ग्रीनवूड,** तुम्ही काय माझा नाश करायचा विचार मांडला आहे ? "

" यांत काय तुमचा नाश होणार आहे ? तुमचा सासरा ती हुंडी नाकबूल करणार नाहीं. "

" **ग्रीनवूड**, तुम्ही मला वेड लावतां आहां. "

" खरोखरच मला फार वाईट वाटतें. पण मुदत भरल्यावर पैसे मागितले ह्मणून जर एखाद्याला वेड लागूं लागलें तर उद्यां रस्त्यांतलें प्रत्येक घर मग वेड्याचें इस्पितळ बनून जाईल. "

" **ग्रीनवूड**, थट्टा पुरे करा बोवा आतां, मी काळ्या पाण्यावर जावें अशी कां तुमची इच्छा आहे ? "

"मुळींच नाहीं. या कामाचा योग्य निकाल लागावा एवढीच माझी इच्छा."

" पण याचा निकाल कसा लागावयाचा ? एका मिनिटांत सहाशें पाउंड मला कोठें मिळणार ? "

" एका मिनिटांत ? सबंध चार महिने तुह्मांला सवड होती. "

" पण मला असें वाटलें होतें कीं, मी तुमचे पैसे फेडीपर्यंत तुम्हीं त्या हुंडीची मुदत वाढवाल. मला जेव्हां पैसे उसने दिले, तेव्हां तुम्ही असेंच ह्मणाला होतां."

" मला स्मरत नाहीं. "

" व तुमच्या या वचनावरच मी---"

" मला स्मरत नाहीं. "

**रूपर्ट** निराश होऊन म्हणाला, " तर मग आतां पुढें काय करायचें ? तुम्ही मागतां त्याच्या अर्धे देण्याला सुद्धां माझ्याजवळ कांहीं नाहीं. "

"असें होतें तर तुम्ही माझ्याजवळून सात महिन्यांपूर्वीं कशाला पैसे घेतलेत?"

" मी कां घेतले ? तुम्ही स्वतः तशी गोष्ट करायला सांगितलीत म्हणून ? तुम्ही नाहीं म्हणालांत ? ' **लार्ड ट्रिमाड्रिन**च्या नांवाची पंधराशें पाउंडांची हुंडी आणून द्या म्हणजे तुह्मांला हजार पाउंड देईन व मी कांहीं त्याला ही तुमचीच सही कां ? असें विचारायाला जाणार नाहीं ' ह्मणून ? "

" मुळींच नाहीं. आमच्यासारख्या सभ्य लोकांत असलें कृत्य कधीं खपायचें नाहीं. "

" **ग्रीनवूड**, सर्व गोष्टींत तुम्ही कानावर हात ठेवतां पण ही दुष्ट कल्पना तुम्हीच कींहो माझ्या मनांत भरविली. "

**ग्रीनवूड** आपल्या खुर्चीवरून उठून, " बस बस, **हारबरो**, पुरे आतां. मी कोणाच्या मनांत असल्या दुष्ट कल्पना भरवीत नाहीं. मी सांगतों त्याप्रमाणें नि-

काल करायचा असला तर करा; नाहींतर कायद्याप्रमाणें तजवीज केली जाईल."

हें भाषण ऐकून **हारवरो**चा चेहरा रागानें व भयानें हिरवानिळा पडून गेला. तो ह्मणाला "तर मग तुम्ही मला **ओल्ड बेली**च्या तुरुंगांत पाठविणार!"

" आणि तुम्ही बरे त्या **रिचर्ड मार्खम**ला त्या ठिकाणीं पाठविलें ?" असें म्हणून **ग्रीनवुड**नें त्याच्याकडे आपली दृष्टि इतकी रोखून लावली कीं ती पाहून हा गांगरून गेला.

" त्याचा तुमच्याशीं काय संबंध ? आतां मला एक सांगा. माझा नाश करावयाचा तुमच्या मनांतून आहे ? का तुमच्या त्या हुंडीची फेड करण्याकरितां मला थोडीशी वेळ देतां ? "

" माझ्या अटी मी सांगितल्या. आजपर्यंत तुम्हाला पुष्कळ वेळ होता. फार तर उद्यां बारावाजेपर्यंत मी वाट पाहीन. "

" ठीक आहे. " असें म्हणून **सर रूपर्ट हारवरो** निघून गेला. यां वेळेला याची स्थिति काय झाली असेल इचें स्वरूप सांगितल्यापेक्षां तें कल्पनेनें सहज समजेल.

तो निघून गेल्यावर **ग्रीनवूड** आपल्याशीं म्हणतोः " या जुव्वेबाजाकडे मी आपले पैसे बिनव्याजी काय ह्मणून ठेवावे ? त्याच्या पासून घेतलेली हजाराची एक बनावट हुंडी व दुसरी सोळाशांची यांच्या योगानें त्याला पाहिजे तसा कचाट्यांत धरतां येईल. त्याची बायको **सिसिला** इचाही मला कंटाळा आला आहे. कारण तिचा उधळेपणा आतांशा फारच वाढत चालला आहे. करितां तो संबंध तर अगोदर तोडला पाहिजे."

इतक्यांतः " एक बाई तुमच्याकडे आली आहे " असें **लाफर**नें येऊन कळविलें. व **ग्रीनवुड**नें तिच्याबद्दल थोडी विचारपूस करून तिला येऊंदे म्हणून सांगितलें.

**मेरिअन**नें आंत येऊन **एलन**नें दिलेलें पत्र **ग्रीनवुड**च्या स्वाधीन केलें. त्या पत्रांतील मजकूर असा होताः—

" तुम्हांला मुलगा झाला आहे हें कळविण्याकरितां हें पत्र तुम्हांला मी लिहिलें नसतें, पण जी माझ्या संकटकाळीं उपयोगीं पडली व जिनें आपलें होतें नव्हतें तेवढें माझी लज्जा राखण्याच्या कामीं लावलें, तिच्याकरितां व ज्याला कधीं मातेचें सुख मिळणार नाहीं, त्या अनाथ अर्भकाकरितां मला हें पत्र धाडणें भाग पडलें. ज्याच्या हवालीं तें मूल केलें आहे, त्याला मुलाच्या रक्षणाकरितां कांहीं तरी पोंचाविलें पाहिजे. "

तर जर कधीं आपल्या मनांत माझ्याविषयीं प्रेमबुद्धि वागली असली तर एवढी काळजी दूर करावी, एवढेंच सांगणें आहे. "

**ग्रीनवूड** हें पत्र वाचून कांहीं वेळ विचारांत निमग्न झाला. नंतर **मेरिअन**कडून **एलन**च्या संबंधानें आणखी कांहीं विचारून तिच्या श्रमाबद्दलचा मोबदला त्यानें तिच्यापुढें ठेवला. परंतु तिनें फक्त **एलन**करितां आपले खर्च झालेले पैसे तेवढे घेऊन बाकीचे तेथें तसेच ठेवले.

**ग्रीनवूड** तिला, आंगठी, घड्याळ किंवा एखादा अलंकार माग ह्मणून आग्रह करूं लागला, परंतु तिनें कशाबद्दलही आपला लोभ दाखविला नाहीं.

**ग्रीनवुड**नें नंतर त्या डाक्तराचें नांव गांव तिच्याकडून विचारून घेऊन त्यास वर्षाचे चाळीस पाउंड पोंचविण्याचें ठरविलें. व **एलन**ला एक पत्र लिहून तें **मेरिअन**च्या स्वाधीन केलें. तें असें:–

" तुझ्या इच्छेप्रमाणें सर्व व्यवस्था लाविली आहे. त्या मुलासंबंधानें **मनरो** किंव **मार्खम** यांस कांहीं कळतां उपयोगी नाहीं; सर्व गोष्टी गुप्त राहिल्या तर मुलासंबंधानें काळजी करायला नको त्याच्या बऱ्याकडे मी दुरून लक्ष ठेवीन. प्रथमच मला कळविलें नाहींस ही तूं चूक केलीस. असो. जोंपर्यंत सर्व गुप्त आहे तोंपर्यंत माझी धनदौलत तुझी आहे असें समज. "

**मेरिअन**नें तें पत्र घेतल्यावर तिच्या मनांत **एलन** संबंधानें दोन शब्द बोलावे असें आलें होतें; परंतु तिचा धीर न झाल्याकारणानें कांहीं एक शब्द न बोलतां ती निघून गेली.

ती गेल्यावर **ग्रीनवुड**नें आपल्या विश्वासू नोकराला हाक मारून सांगितलें: " **लाफर,** दहा पाउंडाची ही नोट घेऊन आतांच्या आतां **लोअर हालावे** येथें जाऊन **बेंटवर्थ** नांवाच्या डाक्तराची गांठ घे. व त्याला ह्मण कीं, ' तुमच्या जवळ काल रात्रीं जें मूल आलें आहे त्याच्या बापाकडून वर्षाचे चाळीस पाउंड तुमच्याकडे येतील. जसें जसें तें मूल वाढत जाईल व त्याचा खर्च जास्त होईल, त्याप्रमाणें ही नेमणूकही वाढेल. पण या मुलाचा जनक कोण आहे तें समजून घेण्याविषयीं प्रयत्न कराल तर लागलीच तुमच्या ताब्यांतून तें मूल काढून दुसऱ्या ठिकाणीं ठेवण्यांत येईल ' त्याला हे दहा पाउंड दे. व त्याला सांग कीं प्रत्येक तीन महिन्यांनीं इतकी रक्कम घेऊन मी येईन. त्या मुलाला तूं स्वतः पाहून ये. तसेंच त्याच्या अंगावर ऐखादी विशेषशी खूणखाण असली तर ती लक्षांत ठेव. एकंदरींत फिरून तो मुलगा पाहिला तरी ओळखतां येईल असें कर. त्याचें नांव ह्मणावें **रिचर्ड**

ठेवा; पण हें पहा, मी सांगितलें यापेक्षां एक शब्द कमी किंवा जास्ती बोलशील तर खबरदार. जा. "

सहांचा ठोका पडला तशी **ग्रीनवुडची** स्वारी भोजनाचा डामडौल करण्याकरितां आपल्या पोषाखाच्या खोलींत गेली.

---

# भाग ८०.

## गोपनस्फोट.

त्याच दिवशीं संध्याकाळीं **सर रूपर्ट हारवरोच्या** घरीं **चीस्टर** भोजनाकरितां आले होते. ज्या दिवशीं **चीस्टर** घरीं जेवायाला येतील, त्या दिवशीं बहुतकरून **हारवरोची** पत्नि **सिसिला** बाहेर जेवणाचें निमंत्रण स्विकारीत असे. व त्यामुळें ही शामशबल जोडी एकटीच असे.

" खरेंच, या **ग्रीनवुडची** एकदा चांगली खोडकी जिरवली पाहिजे. " **रूपर्ट** ह्मणाला.

" तो गुलाम फार डौली आहे. "

" अरे डौली कसचा ? लुच्चा आहे . "

" नाहीं नाहीं, मूर्ख आहे. "

" मूर्ख नाहीं महा पाजी आहे. "

" होय भांचोद ! "

" पण या शिव्या देऊन त्याचे पैसे फिटतील काय ? सहाशें पाउंड कोठून आणावयाचे सांग अगोदर. "

" मला एक रस्ता ठाऊक आहे तो हाच कीं, कोठेंतरी जाऊन दरवडा घालावा. " **चीस्टर** म्हणाला.

" **चीस्टर**, जेव्हां तेव्हां तुझी आपली थट्टाचना ? "

" मी सहज थट्टा केली. पण तुला कसें वाटतें, **ग्रीनवूड** इतकी निकड लावील ? "

" तो ती हुंडी उद्यां **लार्ड ट्रिमाड्रिनकडे** पाठविणार आहे. सर्व गोष्टी तो नाकबूल जातो. जें जें त्याला त्याला विचारावें त्याबद्दल त्याचें ' मला आठवत नाहीं. ' हें उत्तर येतें. "

" एकूण तुला त्यानें अगदीं जेरीस आणलें आहे ना ? "

" आणलें आहे खरें बोवा. "

" आणि तुझ्या मनांतून तर त्याची खोड मोडायची आहे ? "

" अलबत् आहे. पण माझ्या हातून त्याचें कांहींएक वांकडें व्हावयाचें नाहीं हें तुला माहीत आहेच. "

" असेंच केवळ ह्मणतां येत नाहीं. " **चीस्टर** ह्मणाला.

" तुझ्या बोलण्याचा मतलब मला समजत नाहीं. तुझ्या मनांत कांहीं तरी आलें आहे असें दिसतें. "

" मी एक विचार मनांत आणला आहे. समजा आपण त्याच्यावर एखादा आरोप आणला. तो असा कीं, तो त्याला उघडकीस आणतां येऊं नये. व नाहींही ह्मणतां येऊं नये. उदाहरणार्थ, एखाद्या स्त्रीशीं त्याचा संबंध आहे असें त्याच्यावर नांव घातलें—"

" अहाहा ! असें होईल तर काय–मग तो आरोप प्रत्यक्ष माझ्या बायकोच्या संबंधानें असला तरी चिंता नाहीं, त्यांतून अलीकडे अलीकडे तर त्याची सलगी **सिसिलेशीं** फारच वाढली आहे. " **रूपर्ट** म्हणाला.

" वाढली आहे खरीच. पण तुझ्या कसें नाहीं पूर्वीं कधीं हें लक्ष्यांत आलें ? " **चीस्टरनें** विचारलें.

" या वेळपर्यंत हें माझ्या कधीं लक्ष्यांत आलें नाहीं बोवा. " **रूपर्ट** म्हणाला.

" माझ्या कधींच तें लक्ष्यांत येऊन चुकलें आहे. " **चीस्टर** जोरानें म्हणाला.

" आतां तें सगळें माझ्या मनांत येतें. मी पुष्कळ वेळां असें पाहिलें आहे कीं, त्यानें दोन दोन तास येथें घालवावे. कित्येक वेळां तर असें देखील झालें आहे कीं, तो घरांत आल्यावर मी बाहेर जावें व बाहेर फिरून मी परत आलों तरी **सिसिला** आणि तो दिवाणखान्यांत आहेतच. "

" बायकांत आपली वेळ रिकामा दवडणारा मनुष्य **ग्रीनवूड** नाहीं, हें पक्कें समजून ठेव ! "

" **चीस्टर**, तुझें म्हणणें असें तर नाहीं कीं—"

" तुह्मी जें अनुमान कराल त्या बाहेर माझें म्हणणें कांहीं नाहीं. "

" माझें अनुमान काय असावें असें तुला वाटतें ? "

" तें कांहीं कां असेना. पण तुम्ही आपल्या बायकोच्या संबंधानें फारशी पंचाईत करीत असाल असें मला वाटत नाहीं. "

" तिच्या संबंधानें मला काय वाटतें तें तुला ठाऊक आहेच. " **रूपर्ट** म्हणाला.

" आणि तिच्याजवळ आलीकडे पुष्कळ पैसे झाले आहेत हें तूं पुष्कळ वेळां पाहिलें आहेसच.पण त्यांपैकीं तुला तिनें कांहीं मदत केली नाहीं, खरेंना?"

" हो कधीं नाहीं. आणि नेहमीं माझ्या मनांत हेच विचार घोळत असतात कीं, इच्याजवळ हे पैसे आले कोठून ? "

" **लार्ड ट्रिमाड्रिन** किंवा त्याची बायको हे कदाचित् तिला पैसे पुरवीत असतील. "

" मला तर असेंच वाटतें. " **रूपर्ट** म्हणाला.

" हो, असें असेल तर मग चिंता नाहीं. " असें म्हणून **चीस्टर** या गोष्टींत पंचाईत करण्याचें आपल्याला कारण नाहीं असें दाखवून दारू चाखूं लागला पण त्याच्या या कृतीवरून त्याच्या मनांतील भाव सहज उघड दिसत होता.

" **चीस्टर** ! मला असें वाटतें कीं, तुझ्या मनांत कांहीं तरी आलें असावें, किंवा जितकें तुला सांगावेंसें वाटतें त्यापेक्षां त्याची जास्ती कांहीं तरी माहिती असून, त्यांत **सिसिले**चा संबंध असावा. मी तुला सांगितलेंच आहे कीं, तिच्या संबंधानें मी काडीची देखील पर्वा करीत नाहीं. मग मन मोकळें करून बोलेनास बरें ? "

" पण तुला रागबीग आला तर ? " **चीस्टर** म्हणाला.

" काय वेडेपणा हा ? बोल ! "

" जर तुला मी असें सांगितलें कीं,—**सिसिले**चा—"

" बोल ! बोल ! एकदांचा ! "

" **ग्रीनवुड**शीं संबंध आहे—"

" पण याला काय प्रत्यंतर ? याला काय प्रत्यंतर ? "

" मी—मी स्वतः—त्यांना एकमेकांच्या गळ्यांत मिठी मारतांना पाहिलें आहे."

हें ऐकल्याबरोबर **रूपर्ट**चें तोंड खरकन् उतरून त्याच्या ओंठाला कांपरें सुटलें; व खरी गोष्ट काढून घेण्याबद्दल नुकताच जो इतका उतावळा झाला होता त्याच्या अंगांवर,या गोष्टीची नुसती कल्पना करतांना कांटा उभा राहिला.

" **ग्रीनवूड** आपल्या निवडणुकीची हकीकत सांगायाला येथें आला होता तो दिवस तुला आठवत असेलच. त्या वेळेला आपण फांसे व पत्ते कसे खेळावे तें शिकत होतों; व नंतर बाहेर गेलों. "

" तें मला आठवतें. तूं मग पेटी विसरला होतास ती आणण्याकरितां फिरून येथें आलास. "

" हो, त्याच वेळेस, **ग्रीनवूड** दिवाणखान्यांतून माझ्या मागें ही गोष्ट गुप्त ठेवण्यास सांगण्याकरितां आला व त्यानें मला शंभर पाउंडांची नोट दिली होती-"

"खरेंच तूं त्याच वेळेला शंभर पाउंडांची नोट काढून मला दाखविली व ती **ग्रीनवूडनें** मला उसनी दिली म्हणून सांगितलेंस खरेंच. पण यापूर्वी तूं हें मला कसें सांगितलें नाहींस ? "

" वः आपल्या स्नेह्याला ही गोष्ट सांगण्यासारखी आहे नाहीं कां ? शिवाय मला असें वाटलें कीं, या माहितीचा एखादे दिवशीं तरी उपयोग होईल. " **चीस्टर** म्हणाला.

" उपयोग झाला खराच ! **सिसिला ग्रीनवूडची** रांड बनली अं ?— ते दागिने परत कसे आले व ही सगळी चैन कशी चालते तें आतां सर्व जुळतें ! अगे रांडे ! "

" **हारबरो**, तुला हें कबूल केलें पाहिजे कीं, तुझ्या बायकोकडे तुझें कांहीं फारसें लक्ष्य नव्हतें. "

" म्हणजे काय झालें ? बायकांला ही सबब लागूं नाहीं. पुरुषांनीं वाटेल तें करावें. म्हणून बायकांनीं—नवऱ्याच्या बायकांनीं ! "

" पुरे ! पुरे ! तुमच्या अकलेचे तारे पुरे करा आतां. हा सर्व तुमचाच अपराध आहे समजलांत ? नवरा जर आपल्या धर्माप्रमाणें वागेल तर वाईट मार्गानें जाणारी बायको पन्नासांत एक मिळायची नाहीं. तें असो. मला जें ठाऊक होतें तें मी सांगितलें. आतां काय करायचें असेल तें कर. "

" जास्ती पुरावा असल्यावांचून काय करावें ? **सिसिले,** काय लबाडी ही ? काय कसब हें ? अं: ! "

" तिच्या पेट्या, कपाटे कां पहात नाहींस ? ती आतां येथें नाहीं. कदाचित् एखादें पत्रबित्र सांपडेल. "

" शाबास ! शाबास ! चांगला विचार ! " असें म्हणून **रूपर्ट** हातांत मेणबत्ती घेऊन खोलींतून बाहेर गेला.

इकडे **चीस्टर** चैनींत दारू पीत बसला. जसें कांहीं आपल्या मित्राला हें भयंकर गुप्त वर्तमान सांगितलें हें आपण सत्कृत्य केलें.

कांहीं वेळानें **रूपर्ट** परत आला तेव्हां तो पांढरा फटफटीत पडून त्याच्या तोंडावर प्रेतकळा आली होती; आणि त्याचे डोळे तारवटलेले दिसत होते.

"कसें काय ?" **चीस्टरनें** विचारलें.

"पत्र वगैरेचा कांहीं पुरावा सांपडत नाहीं. परंतु सध्याच्या वेळेला त्याही पेक्षां उपयोगीं पडणारा असा—**सिसिलेचे** दागिने, देणगी ह्मणून तिला आले-ल्या कांहीं जिनसा—या बहुतकरून **ग्रीनवूडकडून** आल्या असाव्यात व नोटा व रोख मिळून नव्वद पाउंडांचा ऐवज सांपडला."

"ठीक झालें. आतां **ग्रीनवुडचा** निकाल करून टाका कसा."

"आतां मी त्याचे सहाशे पाऊंड देऊन टाकीन, व बाकीच्या पैशाक-रितां तीन चार महिन्यांची मुदत वाढवीन; आणि मग त्याचा **सिसिलेशीं** संबंध आहे याबद्दल पक्का पुरावा काढण्याच्या खटपटीस लागेन. काय सांगू **चिस्टर**, त्या रांडेची आठवण झाली ह्मणजे तळपायांची आग मस्तका-स चढते. तिची ह्मणजे आतां मला मोठीशी पर्वा आहे असा मुळींच अर्थ नाहीं; तथापि कसेंही झालें तरी ती माझी बायको आहे. आणि तिच्याशीं—"

"मुर्खच आहेस तूं. अरे, मी तुला ही गोष्ट सांगितली, हें तुझें नशी-बच उघडलें असें समज. नाहीं तर तिच्या या जिनसा उपयोगांत आणण्या-चें तुझ्या मनांत तरी आलें असतें काय ?"

या वेळेला **रूपर्टची** स्थिति जरी हास्यास्पद व फक्त आपल्या कामावर नजर देण्यापुरती झाली होती, तरी त्याच्या मनांत एकच गोष्ट घोळत होती. व तिच्याच नादांत तो बोलूं लागला, "त्या **ग्रीनवुडचा** मी सूड उगवीन तेव्हांच राहीन. माझ्या बायकोला फितविणाराचा पुरा सूड घेतल्याशिवाय मी कधीं सोडावयाचा नाहीं. **चीस्टर**, तिची माझ्याजवळ जरी आतां कवडी-ची किम्मत नाहीं, तरी तिच्यामुळें माझी मानखंडना—माझा विश्वासघात—व माझा दुर्लौकिक झाला आहे ! अरेरे ! देवा शपथ सांगतों मी याचा सूड घेईन." असें ह्मणून त्यानें आपल्या हाताची मूठ वळून जोरानें मेजावर आपटली.

"तोंपर्यंत या हिऱ्याचे पैसे तर करून आणा. आतां सात वाजले. साव-काराच्या इकडे जाण्याला पुष्कळ वेळ आहे." **चीस्टर** ह्मणाला.

"चल, मी तयार आहे." **रूपर्टचा** राग अद्याप तसाच कायम होता.

या दोघा मित्रांनीं नंतर दारूचे गलास रिकामे केले. व मग ते बाहेर पडले. रूपर्टनें बायकोची लुटलेली संपत्ति आपल्याबरोबर घेतली होती. त्यांनीं नंतर सावकाराच्या घराचा रस्ता धरला.

विलास, दुराचरण, दुर्व्यसन, उधळेपणा, विपत्ति, नाश आणि दारिद्र्य, ज्यांनीं समाजांतील निरनिराळे वर्ग ओळखले जातात त्यांचें सावकाराचें दुकान हें किती मजेचें प्रतिबिंब आहे बरें ? सावकाराचें दुकान म्हणजे बाजाराची एक पेंठच आहे असें म्हणण्यास चिंता नाहीं. त्या ठिकाणीं बडे लोकांचें जवाहीर, कारागिरांचीं वस्त्रप्रावरणें, गणिकादिकांचे अलंकार आणि गरीबदुबळ्या लोकांचीं भांडींकुंडीं यावयाचींच. या दुकानांतून दोन मार्ग निघाले आहेत. ते परस्पर भिन्न दिशेला जातात. एक जुगारीच्या अड्ड्याकडे जातो, व दुसरा दारूच्या गुत्त्याकडे जातो. विपत्तीला कारणभूत अशा ह्या दोन स्थळांपासून हे मार्ग तसेच पुढें जातात, आणि शेवटीं ज्या एका टोंकाला मिळतात, त्याचें नांव **नाश** होय.

दोन मजुरदार रस्त्याच्या कोंपऱ्यावर उभे असतात, त्यांपैकीं एकजण आपल्या आंगांतील आंगरखा घेऊन सावकाराच्या येथें जातो; व तो गहाण ठेऊन त्यावर आलेल्या पैशानें हे दोघे दारूच्या गुत्यांत जाऊन पैसे संपे तोंपर्यंत चैन करतात. एखाद्या, दिवसभर काबाडकष्ट करणाराची बायको आपल्या नवऱ्याच्या पश्चात् घरांतलें काय असेल नसेल तेवढें उचलते, सावकाराच्या येथें गहाण ठेवते, व त्यावर आलेल्या पैशावर खुशाल दारू पिते. एखादा खिसेकातरू कोणाच्या खिशांतलें घड्याळ लांबवितो व सावकाराच्या दुकानीं जाऊन त्याची व्यवस्था करतो. अशा प्रकारें शेकडों मजूरलोक आपल्या आंगावरचे कपडे प्रत्येक सोमवारीं गहाण ठेवतात, व रविवारीं घालण्याकरितां शनिवारीं फिरून सोडवून आणतात.

म्हणून सावकारांचीं दुकानें असणेंच वाईट नव्हें काय ? हो कांहीं अंशीं असेंच खरें. ज्यांना आकस्मिक अडचण येऊन पडते, किंवा ज्यांना कांहीं काळ काम नसतें, त्यांना या दुकानापासून मदत होते खरी, परंतु सर्व वर्गाच्या लोकांना हा जो तात्कालिक फायदा दिसतो त्यापेक्षांही वाईट असा या दुकानांचा उपयोग करून घ्यायला सांपडत नाहीं काय? होय सांपडतो. कारण, व्यसनी लोकांना आपल्या जिनसा विकून टाकण्यापेक्षां गहाण ठेवून आपली तलफ भागविण्याला हीं सुलभ साधनें आहेत. जो मनुष्य आपले जिन्नस

गहाण ठेवतो त्याला आशा असतेच कीं, हे जिन्नस मी सोडवून आणीन, पण अशी वेळ कधींच येत नाहीं. कारण, सावकाराच्या जबर व्याजाखालींच बहुतेक तो बुडून जातो.

सरकारच्या आंगीं जर कांहीं प्रजावात्सल्य असेल किंवा प्रजेच्या कल्याणाकडे जर कांहीं त्यांचें लक्ष असेल तर आपल्या देखरेखीखालीं गहाणमालावर पैसा उसना देण्याची चाल सुरू करावी, व **फ्रान्स**मध्यें ज्या प्रकारच्या मंडळ्या स्थापन झाल्या आहेत, तशा प्रकारच्या इकडे स्थापन कराव्या. थोडें व्याज घेऊन व्यवस्थित रीतीनें असा प्रकार चालू केला तर लोकांना मोठें सुखकारक होणार आहे.

असो. **रूपर्ट हारवरो** सावकाराच्या घरांत शिरले, व **चीस्टर** रस्त्यांत वाट पहात उभे राहिले. इकडे **रूपर्ट**नें तें जवाहीर गहाण ठेवून आपल्याला लागेल तेवढी रकम घेतली.

दुसरे दिवशीं त्यानें **ग्रीनवुड**चे सहाशें पाऊंड देऊन टाकून आणखी मुदत वाढविली. यांत **ग्रीनवूड**, मेहेरबान होऊन पुढील चार महिन्यांचें व्याज न आकारण्याबद्दल मात्र उदार झाले.

# भाग ८१.

## गूढ बोध.

**एलन**ची प्रसूति झाल्यापासून दहा दिवसांनीं **रिचर्ड मार्खम** घरीं आला. त्यावेळेला रात्र झाली होती, परंतु **मार्खम**नें केव्हां येणार हें अगोदर लिहून पाठविलें असल्या कारणानें, **मनरो** व **विटिंगहम** त्याची वाट पहात बसले होते.

**रिचर्ड**चा चेहरा खिन्न दिसत होता, त्यानें आपल्या टोपीभोंवतीं अशौचदर्शक काळें फडकें गुंडाळलें होतें.

**मार्खम**नें आल्याबरोबर **आर्मस्ट्रांग**च्या मृत्यूची सर्व हकीगत त्यांना सांगितली. व त्यानें आपल्या नांवाचा लिहून ठेवलेला लाखोटा **मनरो**पुढें टाकला. **मनरो**नें त्यांतील एक कागद घेऊन मोठ्यानें वाचला, तो असा:—

" रिचर्ड, मरणसमयीं मला दिलेलें वचन लक्षांत ठेव. जेव्हां तुजवर विपत्ति येईल किंवा तुझ्या विशेष औदार्यामुळें तुझी उदरनिर्वाहाचीं सर्व साधनें नाहींतशीं होतील,

व तुझे श्रमही तुझ्या उपयोगी पडणार नाहींत अशी वेळ तुजवर येईल, त्या वेळेस हें सोबतचें पत्र उघड. परंतु अशा प्रकारचा कोणताही प्रसंग येऊन, तुझ्याजवळ जी आतां थोडीबहुत संपत्ति आहे तिचा व्यय झाला नाहीं, किंवा तुझ्या बुद्धीच्या व श्र-माच्या योगानें तूं कोणत्याही विपत्तींत पडला नाहींस तर, १८४३ च्या जुलईच्या १० व्या तारखेला, ह्मणजे ज्या दिवशीं सकाळीं तुझा भाऊ तुला येऊन भेटणार आहे म्हणून तूं मला सांगितलेंस त्या दिवसापर्यंत हें पत्र उघडूं नकोस. या माझ्या सांगण्याप्रमाणें तूं एकनिष्ठेनें वागावेंस अशी माझी तुला आज्ञा आहे."

**" थामस आर्मस्ट्रांग. "**

" यावरून मला असें वाटतें **रिचर्ड.** कीं, तुझें कधीं तरी दैव उघडणार आहे. " **मनरो** ह्मणाला.

" हें सुदैव योग्य आहे, यांत कांहीं तथ्य नाहीं. " **बिटिंगहम** म्हणाला.

" ह्याविषयीं विचार करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. त्या पत्रांतील मतलब कांहीं असो, मी त्यांतलि एकेक अक्षराप्रमाणें चालणार. बरें पण **एलन**ची प्रकृति कशी काय आहे ? " **मार्खम**नें विचारलें.

" आज दहा दिवस ती निजून आहे. " **मनरो**नें सांगितलें.

" निजून आहे ? कांहीं औषधपाणी तरी केलें होतें ? "

" मी डाक्तराला बोलावून आणणार होतों. परंतु ती माझें ऐकेनाच. ती म्हणे कीं, या घरांत येण्यापूर्वीं जो मोठा त्रास झाला त्यापासून हें दुखणें आहे. परंतु **मेरिअन**नें तिची इतकी काळजी घेतली कीं, गीही मग मागें घेतलें. " **मनरो** म्हणाला.

" छे, ही तुम्ही चूक केली. तिला औषध द्यावयाचें होतें. असो. आतां उद्यां मी त्याची तजवीज करीन. "

असें म्हणून **रिचर्ड** त्याचा निरोप घेऊन निजण्याकरितां गेला. परंतु निजण्यापूर्वीं **कौन्ट आल्टरोनी**ला त्यानें एक पत्र लिहिलें:—

" वि० वि० जर हा प्रसंग आला नसता तर, फिरून आपल्या नजरेपुढें कधींही मी आलों नसतों. परंतु कर्तव्याला स्मरून मला हें करणें भाग पडत आहे. आपले जुने व परम मित्र थामस आर्मस्ट्रांग यांस बलोन येथें देवाज्ञा झाली. हें कळविण्यास मला फार वाईट वाटत आहे; त्याच्या अंतकाळाच्या वेळेस जवळ असण्याच्या दुर्दैवाचा प्रसं-ग माझ्यावरच आला होता. "

**" मार्खम. "**

# भाग ८२.

## डाक्तर.

**मार्खन** आल्यानंतर दुसरे दिवशीं **एलन** सकाळीं निजून उठली तों तिला **मेरिअन**कडून **मार्खम** परत आल्याचें पहिलें वर्तमान कळलें.

हें वर्तमान ऐकून तिच्या मनावर प्रथमतः आनंदाचे तरंग आले. कारण, आपली प्रसूति **मार्खम**च्या पश्चात् होऊन तिचा जिकडच्या तिकडे निकाल झाला. परंतु लागलीच तिला अशीही भीति उत्पन्न झाली कीं, ही आपली गुप्त गोष्ट **मार्खम**ला कळेल कीं काय कोण जाणें. व ही भीति तिनें **मेरिअन**-ला कळवली. परंतु तिनें **एलन**ची खात्री केली कीं, 'या बाबतींत तुला भिण्याचें कारण, नाहीं. कारण त्या डाक्तराला कोणत्या घरांत आणलें हें मुळींच समजलें नाहीं. शिवाय मुलाचीही पुढची तरतूद **ग्रीनवुड**कडून केली आहे. तेव्हां हें वर्तमान **मार्खम**ला कळण्याचा संभव नाहीं.' अशाप्रकारें **एलन**चें शांतवन करून ती इला उपहाराचें आणण्याकरितां खालीं गेली.

इकडे **एलन** एकटीच राहिल्यावर, आपलें डोकें उशीवर टेंकून मोकळ्या मनानें रडूं लागली. तिच्या रडण्याचे हुंदके चालले असतां मधून मधून " माझें बाळ ! माझें बाळ ! " असे शब्द त्यांतून निघत असत.

आपलें मातृत्व उघड उघड जर तिला प्रगट करतां आलें असतें व आपल्या मुलासंबंधानें बापाजवळ व मित्राजवळ बोलतां आलें असतें तर तिला किती-किती सुख झालें असतें !

थोड्या वेळानें **मेरिअन** परत आली. तशी इनें आपले डोळे पुसून शांतवृत्ति धरली. व बिछान्यावर उठून तक्याला टेंकून बसली.

" **मार्खम** आतांच उठून बाहेर गेले आहेत. त्यांनीं **बिटिंगहम**ला सांगून ठेविलें आहे कीं, मी बाहेरून आलों ह्मणजे तुला भेटेन." **मेरिअन** ह्मणाली.

"त्यांची माझी पहिली गांठ एकदां केव्हां होऊन जाते असें मला झालें आहे."

" तूं बाळंत झाल्यावर एक दिवस तुझा बाप तुला भेटायला येत होता, त्या वेळेसही तूं असेंच म्हणालीस. परंतु त्या वेळेला कांहीं झालें नाहीं."

" खरें, परंतु मला त्या वेळेला असें वाटलें कीं, माझें तोंड उतरलें. व माझ्यावर प्रेतकळा आली. असा प्रकार एका क्षणांत दहा वेळां झाला कीं काय असें मला वाटलें. "

**मेरिअन**नें मग अनेक प्रकारांनीं तिचें समाधान करून तिला थोडेंसें खाऊं घातलें व आपण आपल्या कामधंद्याला निघून गेली.

**एलन** मग दुःखकारक विचारांत गढून गेली. बापाबरोबर तिनें विपत्तींत घालविलेले दिवस, चार पांच ठिकाणीं केलेल्या चमत्कारिक चाकऱ्या, भलताच मार्ग दाखवून देणारी ती थेरडी, आणि **ग्रीनवुड**चा संबंध व स्वतःचें बालक वगैरे संबंधानें एका मागून एक असे विचार तिच्या मनांत घोळत होते, तों दारावर कोणी थाप मारल्याचें तिनें ऐकलें. त्याबरोबर हलक्या आवाजानें तिनें " आंत या " ह्मणून सांगितलें.

**मार्खम** दार उघडून आंत आला, परंतु उंबरा ओलांडण्यापूर्वीं त्यानें आपल्याबरोबर असलेल्या एका मनुष्यास, " थोडा वेळ उभें राहण्याची मेहेरबानी करा " असें सांगितलें,व आपण बिछान्याजवळ जाऊन तिचा हात आपल्या हातांत धरून ह्मणाला. " **एलन**, तूं फारच आजारी होतीसना? "

**एलन** खालीं पाहून म्हणते, " होय **रिचर्ड**, मी फारच आजारी होतें,पण आतां पुष्कळ बरी आहें, व एक दोन दिवसांत तर चांगलीच बरी होईन."

" **एलन**, तुला वैद्याचें औषधपाणी कांहीं मिळालें नाहीं, याबद्दल मी तुझ्या बापाला दोष दिला. "

" छे, छे ! **रिचर्ड**, वैद्याला बोलावून आणतों, म्हणून ते माझ्या फार पाठीस लागले होते, परंतु मी कांहीं तितकी आजारी नव्हतें. शिवाय **मेरिअन**नें माझी फारच काळजी घेतली. "

" असेल. पण बाया बापड्यांच्या औषधांवर माझा मुळींच भरंवसा नाहीं. मनुष्याचा जीव कांहीं वाऱ्यावर नाहीं आला. "

" मी खचीत सांगतें **रिचर्ड, मेरियन**नें माझी फारच काळजी घेतली. व आतां मी पुष्कळ बरी होत चाललें आहे. "

" **एलन**, तुझा मनोदय मी जाणतों आहे. तुला वाटतें—"

" काय ? **रिचर्ड** ! " आंगावर काटा उभारून, जसा कांहीं तो काळजाला भिडला आहे, अशा स्थितींत तिच्या तोंडून हे उद्गार निघाले.

" वैद्याला आणण्याच्या कामांत तूं बापाच्या आड आलीस त्यांत तुझे हेतू स्तुत्य होते. माझ्यावर खर्चाचा बोजा घालण्याला तूं भ्यालीस होय ? तुला वाटलें हल्लींची माझी स्थिति तशी नाहीं. हें तुझें उदार मन मी समजतों. पण ही तुझी चूकी आहे. **एलन**, मी तुम्हांला जें माझ्या येथें

बोलावलें तें तुम्हीं आपलीं सर्व सुखें गुंडाळून ठेवून राहण्याला नाहीं बोलावलें. एखादा तिऱ्हाईत जर माझ्या घरांत आजारी पडला असतां, तर त्याचीसुद्धां मी चौकशी केली असती. ईश्वरानें अजून तेवढ्यापुरतें माझ्याजवळ ठेवलें आहे."

" रिचर्ड, तुम्ही फार उदार आहां बरं. पण मी खरच सांगतें, माझी प्रकृति आता चागली आहे, व उद्यां मी चांगली बरी होईन. "

" छे, तूं म्हणतेस, पण तसें नाहीं. असो, तूं आतां लवकरच बरी होशील. मी सकाळीं तुझ्याकरितां वैद्याकडे गेलों होतों, व तो बाहेरच उभा आहे. " असें म्हणून दारापर्यंत जाऊन त्यानें वैद्याला आंत आणला व आपण बाहेर निघून गेला.

हा मनुष्य दिसण्यांत पंचवीस वर्षांचा दिसत होता. याचें तोंड फिक्कट दिसत होतें, तरी तो दिसण्यांत चांगला होता. त्याची मुद्रा चिंताग्रस्त दिसत होती. त्याचा पोषाख काळा होता. त्याची रीतभात लोकांस आवडण्यासारखी होती. त्याचा स्वर उदासवाणा होता. आणि त्याचे शब्द हळू, मोजके व सावकाश येत असत.

पलंगाजवळ जाऊन त्यानें तिचा हात धरला व तिची नाडी पाहून तिला विचारिलें, " मुली, तूं किती दिवस आजारी आहेस ? "

" मी कांहीं आतां आजारी नाहीं. मी बरी होत चाललें आहें. मी आतां उठूं लागेन व मोकळी हवा लागली म्हणजे मला बरें वाटेल." घाईनें व तुटक तुटक असे शब्द ती बोलली. व या वैद्यालाही यामुळें थोडा चमत्कार वाटला.

थोडा वेळ थांबून तो म्हणाला: " छे, इतक्यांतच तुला उठतां येत नाहीं. अजून तुझ्या आंगांत ताप आहे. किती दिवस तूं आंथरुणावर पडून आहेस ? "

" थोडे दिवस पण मी फिरून सांगतें कीं, मी आतां चांगली आहे. "

" किती दिवस पण ? "

" असेन दहा बारा दिवस. यावरून तुम्ही पहा कीं, मी बरेच दिवस आंथरुणावर होतें. "

" तुला वाटतें कसें ? " असें विचारून तो तिच्या बाजूला बसला. जणूं काय आपल्या प्रश्नांचीं उत्तरें घेण्याचा त्याचा निश्चयच झाला होता.

" थोड्या दिवसांपूर्वीं मला चैन नव्हतें, पण आतां मी चांगली बरी झालें आहें. "

" मुली, तें पाहण्याचें काम माझें आहे. तुझ्या आंगांत तापाची कसर आहे व तुझी नाडी जलद चालत आहे. तूं कांहीं औषध घेत होतीस ?"

" नाहीं. फक्त आमच्या घरांतल्या बाईनें एक थंडाईचें औषध दिलें होतें. पण जर मी आतां लौकर बरी होणार आहें तर इतकी विचारपूस कां?"

" मुली रागाऊं नकोस. तुला माझ्या प्रश्नांची उत्तरें दिलीं पाहिजेत. जर तुला दुसऱ्या कोणाचें औषध घ्यायचें असेल तर **मार्खम**ला तसें कळवून मी आपला चालता होतों."

" नाहीं महाराज, जसे तुह्मी तसाच दुसरा." असें ती बोलली; पण आपण काय बोललों हें तिचें तिलाच न समजतां ती हा माझ्याकडे इतका साशंक मुद्रेनें कां पहातो, म्हणून काळजी करीत राहिली.

" तुझ्या आजारीपणांत तूं कधीं बेशुद्ध झाली होतीस काय ?"

" नाहीं नाहीं. तुम्हाला वाटत आहे इतकी आजारी मी नव्हतें. मला फक्त विश्रांति पाहिजे आहे."

" आणखी औषधही पाहिजे आहे" वैद्य म्हणाला. " मुली, तुला मी विचारतों तें मोकळेपणानें सांग, तुला आजार कशापासून झाला ?"

" महाराज, मला कांहीं माहीत नाहीं. पण मला वाटतें कीं, माझ्या मनाला फारच त्रास झाला होता, त्याचा परिणाम शरिरावर घडला असावा."

" आणखी तूं म्हणतेस कीं, सरासरी पंधरा दिवस निजून आहे म्हणून?"

" छे, छे, इतकी कोठली ? बरोबर दहा दिवस !"

" दहा दिवस !" हे शब्द ऐकल्याबरोबर त्याला कशाचीशी आठवण होऊन त्यानें एकदम चपापून विचारलें, व आपल्या खुर्चीवरून उठून सर्व खोलीभर तो पाहूं लागला. " दहा दिवसांपूर्वीं काय ? बरं किती. वाजतां तूं आजारी पडलीस ?"

" किती वाजतां !" आपली गुप्त गोष्ट उघडकीस येते या भीतीनें तिच्या आंगाचा थरकांप होऊन तिनें तेच शब्द पुन्हां उच्चारले.

" हं सांग, किती वाजतां तें ?" त्याची पहिली सावकाश बोलण्याची ढब बदलून तो घाईनें विचारूं लागला: " मध्यरात्रीच्या कांहीं वेळापूर्वीं; काय ?"

" काय तुम्ही म्हणतां ! असले प्रश्न तुम्ही मला कां करितां ?"

तो तिच्या तोंडाकडे न्याहाळून ह्मणाला: " त्या दिवशीं रात्रीं, एक

मनुष्य, डोळे बांधून आणलेला, एका चाकर मनुष्याबरोबर, खोलींत आला कीं नाहीं ? "

" ईश्वरा, माझी या वेळेला अब्रू रक्षण कर ! " **एलन** म्हणाली.

" आणखी त्या वेळेला एक स्त्री बाळंत होऊन तिला मुलगा झाला कीं नाहीं?"

" महाराज, हें तुम्हाला कसें कळलें ! तुम्हाला कोणी सांगितलें ? "

" मीच तो मनुष्य येथें आलों होतों तो ! " वैद्य म्हणाला.

" महाराज, माझ्यावर दया करा ? " असें म्हणून **एलन**नें दोन्ही हातांनी आपलें तोंड झांकलें, व हुंदके देऊन ती रडूं लागली.

" हीच ती पेटी, जी माझ्या पायाला लागली–हा पलंग येथेंच होता--तसेंच हें मेज--याच खुर्चीवर मी बसलों होतों. अतां सर्व माझ्या ध्यानांत आलें. " असें म्हणून तो कांहींवेळ न बोलतां खोलींत फिरूं लागला.

इतक्यांत **एलन** एकदम अंथरुणावर उठून बसून म्हणाली:–" महाराज, माझ्या मुलाची तुम्ही काळजी घेतांना ? "

" जरी तो आईवांचून आहे, तरी तो चांगला वाढत चालला आहे. "

" महाराज, याबद्दल आपले माझ्यावर अनंत उपकार आहेत. आईवेगळें मूल झालें म्हणजे तिला कसें वाटतें हें तुम्हाला कसें समजणार ! "

" तर मग तुला फारच दुःख होत आहे ! अरेरे ! गरीब बिचारी ! "

" आज कित्येक दिवस मला जें दुःख होत आहे तें एका ईश्वरालाच ठाऊक ! पण महाराज, मला सांगा ही गोष्ट तुम्ही उघडकीस आणणार काय?"

असें म्हणून **एलन** याच्या उत्तराची वाट पहात राहिली. **वेंटवर्थ** कांहीं वेळ विचार करून ह्मणाला: " **एलन**, तुझ्या कामांत माझ्यापेक्षां तुला जास्ती समजतें. पण ही गोष्ट तुझ्या आप्तवर्गाला कळलेली बरी नाहीं काय ! "

" अशी जर गोष्ट असेल तर माझ्या हातानें मी आपला जीव घेईन. जर तुझी ही गोष्ट मी फोडीन असें तुम्ही म्हणत असाल–किंवा **मार्खम**ला किंवा माझ्या बापाला सांगण्याकरितां एक पाऊल खोलींतून पुढें टाकाल, तर मी क्षणभर देखील मागेंपुढें पहाणार नाहीं, बेधडक या खिडकींतून उडी टाकीन."

" मुली, शांत हो. तुझी गुप्त गोष्ट अगदीं बाहेर फुटणार नाहीं, समजलीस?"

" महाराज, माझ्यावर आपले फार फार उपकार झाले आहेत. कांहीं कारणांमुळें, ही गोष्ट बाहेर फुटतांच कामा नये. तीं कारणें केवळ माझ्या अब्रूसंबंधानें आहेत असें नाहीं, पण तीं मला उघडकीस आणतां येत नाहींत. "

" तीं कारणें समजून घेण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं. तुझें मूल माझ्याजवळ आहे व त्याची मी आपल्याप्रमाणें काळजी घेईन. "

" ईश्वर तुमचें कल्याण करील. " असें ह्मणून एललनें कृतज्ञतापूर्वक त्याचे हात दाबले.

" थोड्याच वेळांत माझ्या घरीं येण्यासारखी तूं होशील. मग तुझा मुलगा कसा वाढत चालला आहे, कसा खेळतो आहे हें तुला पहायास सांपडेल. माझ्या बायकोला एक दोन दिवसांत मी तुझ्याकडे पाठवून देतों, तिची व तुझी ओळख झाली ह्मणजे, तुझ्या येण्याजाण्या संबंधानें कोणाला संशय येणार नाहीं. आतां मी मार्खमला जाऊन कळवितों कीं, तूं थोड्याच दिवसांत हिंडण्याफिरण्याला लागशील. "

एलननें आणखी एकवार त्याचे मनापासून आभार मानलें व जातां जातां औषध पाठवून देईन तें घेण्याविषयीं निक्षून सांगून त्यानें तिचा निरोप घेतला.

एलन आतां लवकर लवकर बरी होत चालली. व तिच्या मनांतल्या अनेक काळज्या दूर झाल्या कारणानें स्वभावतांच तिचा आजार कमी होत चालला. कारण मुलाला जाऊन पहाण्याची तिला उत्कट इच्छा झाली होती.

## भाग ८३.

### फिरून, पत्रें फोडण्याची खोली.

वरील गोष्ट घडून आल्यावर थोड्या दिवसांनीं टपाल कचेरीच्या **पत्रें फोडण्याच्या खोलींत** खालील पत्रें उघडण्यांत आलीं. पहिलें पत्र **मांटोनी** येथून इंग्रजी दरबारांतल्या त्या संस्थानाच्या वकिलाला आलें होतें, त्यांतील मतलब असा: —

" मि॰ वि॰ आपलें पहिलें पत्र **इलिसा सिडने** संबंधाच्या एकंदर हकीकतीचें आलें तें पावल आपण **इलिझा** तुरुंगांत होती वगैरे कळविलेली हकीकत **महाराजड्यूक** साहेबांस कळविली, परंतु त्यापासून त्यांच्या मनावर कांहीं परिणाम झाला नाहीं. करितां आपणास एक कामगिरी आपणास सांगण्याचें येत आहे कीं, सिडनेची दत्तक दाईट चा-

टीची होती कीं काय, याचा आपण खुलासा काढून तो तावडतोब इकडे कळवावा सोबतच्या नकलेवरून समजेल कीं, महाराजांना तिचा किती नाद लागला आहे व तो किती अनर्थावह आहे.

"राजपुत्र आलबर्टो यांना दरूं केलेली नेमणूक न स्विकारण्याचा ते आपला हट्ट सोडीत नाहींत, याबद्दल कारभाऱ्यांना फार वाईट वाटत आहे. आणखी एकवार त्यांचें मन वळविण्याच्या कामांत आपली पराकाष्टा करून पहावी असें आपणांस सांगणें आहे. त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं तर दुसरा राजपुत्र गादीवर आणण्याच्या खटपटीस सुरुवात होईल. लोभाची वृद्धि असावी हे विनंति.

**बारन रूपर्टो.**"

आज्ञापत्राची नकलः—

"**मांटोवोचे महाराज ड्यूक यांचे हुकूमावरून.**

तमाम लोकांस कळविण्यांत येतें ऐसीजे,—

**एलिझा सिडने** यांस आजपासून **महाराणी** असा किताब देण्यांत आला आहे. याप्रमाणेंच सरकारी खजिन्यांतून सालीना पांच हजार रुपयांची नेमणूक त्यांस करून देण्याचा आजपासून हुकूम सुटला आहे. तरी निरनिराळे अधिकारी व मानकरी यांनीं हा हुकूम अमलांत आणावा कळावें."

यानंतर दुसरें पत्र या खोलींत फोडलें गेलें तें:—

"तुमचें पत्र आलें तें पावलें. माझीं मागचीं पत्रें तुह्मी **अर्ल वरिंगटन**ला दाखविलीं, व **महाराज ड्यूक** यांनीं लग्नाची मागणी घातली तिचा मी स्विकार करावा असें त्यांचें सांगणें आहे वगैरे मजकूर लिहिला तो सर्व समजला. मागच्या पत्रांत मी तुह्माला कळविलें होतेंच कीं, **इंग्लंडां**त माझ्यावर जो दुर्दैवाचा प्रसंग आला होता त्याची खबर महाराजास तिकडून कोणी एकानें कळविली. परंतु मी आपली सर्व हकीकत त्यानां अगोदर सांगितली असल्यामुळें, दैवयोगानें ती खबर ऐकून त्यांच्या वृत्तींत माझ्या संबंधानें कांहीं एक बदल झाला नाहीं. इतकेंच नव्हे, तर पाणीग्रहण करण्याविषयीं त्यांनीं माझी विनंति केली, सिंव्हासनावर आपल्या बाजूला बसण्याच्या योग्यतेला मला आणण्याचें वचन दिलें व सर्व लोकांदेखत, तुला मी आपली वधु करीन असें मला सांगितलें. अशा स्थितींत माझ्यानें नाहीं ह्मणवेल काय! व मी तरी काय ह्मणून नाहीं ह्मणावें? माझें मन त्यांच्यावर बसलें आहे काय म्हणून तुह्मी मला विचारतां, पण ज्यानें एवढें आपलें मन माझ्यावर आहे असें दाखविलें त्याला मन दिल्यावांचून माझ्यानें कसें राहवेल! मानवी स्वभावांतही दोष आहेतच! माझ्यासारख्या, लोकांशीं संबंध सोडून राहिलेल्या स्त्रीवरही धनदौलत, मोठेपणा, पदवी हीं आपला पगडा बसविण्याला सोडीत नाहींत. शिवाय सत्कृत्यें करण्याच्याच उद्देशानें पैसा व मोठेपणा असणें किती सुखाचें आहे! असो.

"सर्व ठरल्यासारखें आहे. लग्न आजपासून दोन महिन्यांनीं होणार आहे. याची पहिली पायरी ह्मणून महाराजांनीं मला मोठेपणा व नेमणूक करून दिली आहे. आतां सर्व लोकांच्या दृष्टीनें मी **महाराणी** आहे, परंतु **मोहनाबाई** तुम्हाला मी आपली पहिली साधी **इलिझा सिडने**च आहे. आणि हाच संबंध सदैव राहील.

"तो दुष्ट मांटेग ग्रीनवूड पार्लमेंटचा सभासद झाला हें ऐकून मला फार नवल वाटलें. मला पैशाची व अधिकाराची अनुकूलता दिसू लागल्यापासून, त्या दुष्टाच्या कचाट्यांत लोकांनीं न सांपडण्याबद्दल काय इलाज करावा या विचारांत मी होतें. परंतु शेवटीं मला एक विचार सुचला. व त्याप्रमाणें नुकताच एक विश्वासु मनुष्य मी तिकडे पाठविला आहे. तेथें आल्यावर तुम्हाला माझा वृत्त कळवायला मी त्याला सांगितलें आहे. त्याच्याबरोबर कृतज्ञतापूर्वक मित्रत्वाची अल्पशी खूण तुम्हाला देण्याकरितां पाठविली आहे. तिचा तुह्मी माझ्याकरितां स्वीकार कराल अशी माझी आशा आहे. फार जास्त हकीकतीचें पत्र मागाहून येईलच. तुमच्या प्रीतीची

एलिझा सिडने."

तिसरें पत्र कौन्ट आल्टरोनींच्या नांवचें कांहीं सांकेतिक शब्दांनीं लिहिलेलें होतें, त्यांतील मतलब असा:—

"इकडील गोष्टी बऱ्याच परिणामाला जाऊन पोंचल्या आहेत. अ हा बऱ्याच फारच नादीं लागला आहे व एक दोन महिन्यांत तो तिच्याशीं लग्न लावण्याच्या विचारांत आहे. अ हा अगदींच स्वतंत्र असल्या कारणानें, हा योग मागें टाकण्यास साधन दिसत नाहीं. प्रजेला कांहीं एक प्रकारचे हक्क न देतां, त्याची स्वतंत्रता कायम राहूं दिली याबद्दल प्रधान मंडळीला आपली चुक झाली असें आतां वाटूं लागलें आहे.

"अ ह्मणजे मांटोनोचा ड्यूक व ब ह्मणजे एलिझा सिडने असावी." तो अधिकारी मध्येंच ह्मणाला. कारकुनानें पुढील मजकूर वाचला:—

"त्यांना आतां काय करावें हें सुचत नाहीं. हा लग्नसंबंध घडून आला म्हणजे पुढें संतति होणारच. कारण ब ही अगदीं तरुण आहे. तर मग मला असें वाटतें कीं, अशा वेळेस आपण अकस्मात या संस्थानच्या किनाऱ्यावर येऊन उतराल तर हा योग घडून येणार नाहीं. आपली इच्छा लढाई उभी राहून देशांत अस्वस्थता उत्पन्न करावी अशी नाहीं हें मला ठाऊक आहे व हें आपल्यासारख्या उदार पुरुषाला भूषणावहच आहे. परंतु खटपट केल्यावांचून स्वस्थ राहाणें हें मनुष्यस्वभावास अनुसरून नाहीं. हा आपला नम्र सेवक सेवेला तयार आहे. शब्द लिहिण्याचाच अवकाश काय तें कळवावें. उत्तराची वाट पाहत आहे. क्ष."

"या पत्राच्या नकला घेऊन परकी कामाच्या अधिकाऱ्याकडे जाऊंद्या, त्यांतील मजकूर फार महत्वाचा आहे." अधिकारी ह्मणाला.

कारकुनानें होय ह्मणून सांगून तो हुकूम अमलांत आणला.

---

## भाग ८४.

### टामलीन्सनच्या खटल्याची दुसरी तारीख—कौन्ट आल्टरोनी.

टामलीन्सनचें नांव नादार लोकांच्या वर्गांत जाहीर झाल्यापासून वेचा-

वीस दिवसांनीं नादारीच्या कोर्टांत या गृहस्थाच्या खटल्याची दुसरी तारीख निघाली.

एका चौकोनी पीठावर मेज ठेवून त्याच्या पाठीमागें मुख्य कमिशनर खुर्चीवर बसला होता. त्या मेजाला लागूनच शिरस्तेदार, व या खटल्याकरितां आलेले दोन तीन वकील बसले होते. कमिशनरच्या उजव्या बाजूला सरकारी पंच, पुढें कांहीं पुस्तकांचा व कागदांचा ढीग ठेवून बसला होता. सरासरी दोनशें लोकांची गर्दी कचेरींत जमली होती. त्यांच्या दुर्मुखलेल्या तोंडावरून नादार मनुष्याचे हे सावकार असें सहज ओळखतां येत होतें. साक्षिदाराच्या पिंजऱ्यापासून कांहीं अंतरावर आपले हात गुंडाळून व गंभीर मुद्रा करून कौन्ट आल्फ्रेडो उभे होते.

अकरा वाजून थोड्या वेळानें दाराजवळ कांहीं गोंगाट ऐकूं आला. आणि त्या जमलेल्या गर्दींतून " ग्रीनवूड आले. " " ग्रीनवूड आले. " ह्मणून एकच शब्द निघूं लागला.

ग्रीनवूड हंसत मुद्रा करून झोंकानें एकेक पाऊल टाकीत कोडतांत शिरले. जणूं कांहीं त्यांना काळजी हा शब्दच ठाऊकच नाहीं. त्यांचा पोषाक मोठा भपक्याचा असून नेहमीप्रमाणें ते आपल्या डाव्या हातानें कोटावर लोंबणाऱ्या सोनेरी घड्याळाच्या साखळीशीं खेळत होते.

जमलेल्या गर्दींत यांच्या ओळखीचे लोक पुष्कळ असल्यामुळें प्रत्येकाशीं एकेक शब्द बोलत ही स्वारी थाटानें चालली होती. ज्याला बायकामुलें नसतील त्याला " तुमचीं मुलें माणसें कशीं काय आहेत? " किंवा जो अगदीं मरणाच्या दारांत बसला असेल त्याला, " तुह्मी अलीकडे फार लठ्ठ झालांत बुवा, " किंवा ज्याला आपल्या व्यापारांत कांहीं मिळत नसेल त्याला, " कां तुमची चैन आहेना! " असें विचारीत विचारीत, ग्रीनवूड गर्दींतून आपला रस्ता काढीत होते. शेवटीं सरकारी पंच ज्या ठिकाणीं बसले होते त्या ठिकाणीं जाऊन हे त्यांच्या शेजारीं बसले.

" नादार मनुष्य हजर आहे; " ह्मणून शिरस्तेदारानें मोठ्यानें विचारतांच "हजर" ह्मणून जबाब देऊन, टामलीन्सन पिंजऱ्याजवळ जाऊन उभा राहिला.

हा पांढरा फटफटीत पडून काळजी आणि चिंता यांची कळा त्याच्या तोंडावर व्यक्त दिसत होती. कमिशनरापुढें येऊन उभा राहिल्यावर त्यानें एकवार भीतियुक्त अशा ओशरल्या नजरेनें चोहोंकडे पाहिलें—जणूं कांहीं **मिचेल मार्टीनचें** तोंड एकदम या गर्दीत दृष्टीस पडेल कीं काय ही त्याला भीति पडली. परंतु अशी भीति बाळगण्याचें कारण नव्हतें.

हा येऊन उभा राहिल्यावर त्याच्या जबानीस सुरुवात होऊन त्यानें आपल्या जबानींत सांगितलें कीं, "मीं आपली सर्व हकीकत पंचांना कळविली आहे."

**ग्रीनवूडनें** सांगितलें कीं, "ती हकीकत अगदीं विश्वसनीय असून ती ऐकून येथें जे सावकार आले आहेत त्या प्रत्येकाचें समाधान होईल. तथापि दुर्दैवाची गोष्ट ही आहे कीं, त्याची जी मालमत्ता आहे तिच्यावर रुपयाला एक कवडी देखील उभी राहणार नाहीं."

पुढें एका वकिलानें **टामलीन्सनची** उलट तपासणी केली. तींत त्यानें इतकेंच सांगितलें कीं, "माझा गुमास्ता मला बुडविण्याचा धंदा पुष्कळ दिवस व्यवस्थेनें चालवीत होता, परंतु माझा त्यावर पूर्ण विश्वास असल्यामुळें, पेढीच्या कामांत मी कधीं चौकशी केली नाहीं. व माझा असा तर्क धावतो कीं, त्यानें मला हजारों रुपयांस बुडविलें असावें."

परंतु ज्या मनुष्यानें याची इमानेंइतबारें नौकरी केली होती व ज्यानें कधीं याच्या पैचीही अपरातफर केली नाहीं त्याच्या माथीं सर्व दोष मारावयास **टामलीन्सनच्या** अंतःकरणास काय वाटलें असेल याची कोणास कल्पना ही झाली नाहीं! असो, कमिशनरानें **टामलीन्सनला** नादार करून शेवटीं खटल्याचा निकाल केला.

या प्रसंगांतून सुटल्यावर **टामलीन्सनला** एक प्रकारें आनंद वाटला. हे दोन तास त्याला केवळ दोन वर्षांप्रमाणें वाटले. इकडे आपली क्षुब्ध झालेली वृत्ति लोकांच्या नजरेंतून झांकण्याकरितां व आपल्या स्थितीसंबंधानें विचार करण्याकरितां हा घरीं येत आहे, तों **ग्रीनवूड** नादारीच्या दाखल्यावर स... घेण्याच्या कामाला लागला. याच्यासारख्या मिठठक मनुष्याच्या हातून

हें काम सहज होण्यासारखें होतें. शेवटीं बहुतेक सावकारांनीं सह्या करून याला सर्व अडचणींपासून मुक्त केलें.

संध्याकाळीं **ग्रीनवूड** दाखला घेऊन **टामलीन्सन**कडे आल्यावर त्यास ह्मणाला:—"थोड्या दिवसांत तुह्मी नवे व्यापारी बनाल. आजपासून एकवीस दिवसांत हा दाखला वरिष्ठ अंमलदाराकडून पसंत होऊन आल्यावर वार होईल. मग तुह्माला मी एक हजार पौंड दलालाचा धंदा करण्यास व्याजी देईन. तुह्मी पहा कीं, तुमचें काम मी किती चोख रीतीनें केलें तें!"

"परंतु ज्यानें माझ्याकरितां उदारपणानें एवढा दुर्लौकिक करून घेतला त्याचा पत्ता लागेपर्यंत मला कधीं स्वस्थ वाटावयाचें नाहीं. त्या बिचाऱ्याचें काय झालें असेल कोणाला ठाऊक!" **टामलीन्सन** ह्मणाला.

"त्याच्यासंबंधानें तुह्मी कांहीं मनांत आणूं नका. आज नाहीं उद्यां कधीं तरी तो येईल, मग त्याच्या उपकाराची चांगली फेड करा ह्मणजे झालें."

"अहाहा! खरोखर त्या दिवशीं मला फार सुख होईल."

"पांच नाहीं तर दहा रुपये दिले कीं, त्या ह्मातार्‍याची नुकसान भरून येईल. आहे काय त्यांत?"

"**ग्रीनवूड**, जरा तुह्मी थट्टा आवराल तर बरें होईल."

"तुह्माला थट्टा वाटत असेल तर कमी द्या. बरें **टामलीन्सन** येतो आतां मला काम आहे. तुमचा दाखला वार होऊन आला ह्मणजे माझ्याकडे या." असें ह्मणून **ग्रीनवूड** निघून गेला.

तो निघून गेल्यावर **टामलीन्सन** ह्मणाला, "अरे मांगा नीचा" मग कांहीं वेळ थांबून आणखी तो ह्मणाला, "तरी पण आतां त्यानें आपल्याच करामतीनें दुर्लौकिक व निर्भत्सना यांपासून माझें रक्षण केलें."

असो. इकडे **कौन्ट आल्टरानी** आपल्या घरीं परत येण्याकरितां निघाले ते सरासरी संध्याकाळच्या पांच वाजण्याच्या सुमारास घरीं येऊन पोंचले. त्यांची बायको व मुलगी हीं त्यांची अगदीं वाट पाहून राहिलीं होतीं. त्यांनीं दिवाणखान्यांत पाय ठेवल्याबरोबर त्या दोघींनीं यांच्याकडे साशंक दृष्टीनें पाहिलें, तों यांची उद्विग्न मुद्रा पाहून त्यांच्या अंतःकरणानें तेथल्या तेथेंच कचर खाल्ली.

"प्रिये — बाळे," त्यांच्या जवळ जाऊन दोघींचे हात आपल्या हातांत घेऊन हे ह्मणाले," माझें भाकीत खरें झालें. त्या पेढींतून आपल्याला एक पै देखील मिळणार नाहीं. ग्रीनवूडनें सर्व लोक आपल्या बाजूला मिळविण्याची मोठी शिताफी केली. आतां सावकार लोकांना कांहीं आधार नाहीं. तेथें एकंदर जो अन्याय चालला होता, त्यांत मध्यें न पडण्याविषयीं मला मन आवरण्याला मोठें कठीण पडलें. माझ्या मोठेपणामुळें, व माझ्या दरजामुळें, मला त्या दुष्टांची लबाडी उघडकीस आणतां आली नाहीं. असो, माझ्या लाडक्यांनो, आतां तयार असा बरें, आपला सर्वस्वीं घात झाला!

"अगबाई" ह्मणून एकदम दोघींच्याही तोंडून उद्गार निघाले

"बाबा, आपल्याला पुष्कळ स्नेही आहेत." इझाबेला ह्मणाली.

"पण मी एकाकडेही जाणार नाहीं." कोन्ट गर्वानें ह्मणाले, "छे—वेळेवर नजर देऊन संकटाला आपण पाठ दिलीच पाहिजे, सध्यां आपल्याला चोहोंकडून गृह अनिष्ट आहेत. त्यांतूनही आणखी जर कां गांटोनोचें तें होऊं घातलेलें लग्न जळून आलें तर मात्र—"

"नसत्या दुःखाचें भय बाळगून आहे तें दुःख वाढवूं नये. महाराज असा भलताच अविचार करतील हें अगदीं संभवत नाहीं." कोन्टेस ह्मणाली.

"तिला तो महाराणी असा दिलेला किताब, त्याप्रमाणेंच ती तिला करून दिलेली नेमणूक यांवरून तुमची कल्पना होत नाहीं काय! एखादे वेळेला असें मनांत येतें कीं, माझी मित्र मंडळी वरचेवर मला सांगत आहेत त्याप्रमाणें एकवार ऐकावें, आणि एकदम जाऊन—"

"आं! बाबा," इझाबेला डोळ्यांत पाणी आणून विचारलें, "मला व माझ्या आईला स्वतांच्या प्राणापेक्षांही जो जीव प्यारा आहे तो धोक्यांत घालून तुमची जन्मभूमि लढाईनें तुह्मी भीतिग्रस्त करून टाकणार काय! बाबा, आपणावर आलेलें संकट असें आपण निग्रहानेंच काढूं या. जर कोणी आपला खरा असेल तर तो कांहीं आपल्याला नेहमीं दुःखांत ठेवणार नाहीं."

" अहाहा ! बाळे, तूं मला माझें कर्तव्य कर्म शिकवीत आहेसना ! " असें ह्मणून त्यानें आपल्या प्रियकर कन्येला प्रेमानें मिठी मारली.

" थोड्या वेळापुरतां हा प्रसंग आपल्यावर आहे. आपला पुढचा मार्ग खुला आहे. सभ्यांचा वाडा वगैरे सर्व आतां सोडून दिलें पाहिजे. दुःखांत सुख एवढेंच कीं, आपल्याला कोणाचें देणें नाहीं. " कौंन्टेस ह्मणाली.

" हेंच तर माझ्या अंतःकरणाला फार लागतें. आपल्या दुर्दैवाची सीमा तुह्माला अद्याप पुरी कळली नाहीं. आपल्या देशचा एक शूर सरदार ज्याची, आपल्या संस्थानच्या कल्याणाकरितां माझ्या सर्व वेतांत मला मदत होती व ज्याला माझ्याचकरितां हद्दपार केला आहे, तो कांहीं देण्यासंबंधानें, थोड्या दिवसामागें येथें तुरुंगांत पडला व त्यानें तुरुंगांत तसेंच पडून राहणें मला प्रशस्त वाटेना ह्मणून मी त्याच्याकरितां जामीन झालों; आणि सावकाराची तर आतां मला पैशाची निकड लागली आहे. "

" त्याबद्दल किती देणें आहे. " कौन्टेसनें विचारलें.

" आठराशें पाऊंड. "

" बाबा त्याबद्दल तुह्मांला काळजी नको. माझे दागदागीने, व लत्ते कपडे विकून तितके पैसे उत्पन्न होतील. " इझाबेला ह्मणाली.

" बाळे, आपल्या जवळ सर्व आहे तें विकून सुद्धां तेवढी रकम उभी राहणार नाहीं. पण काय व्हावयाचें असेल तें होवो. आपलें पहिलें काम हें कीं, हा थाटमाटाचा वाडा सोडून देऊन एखाद्या गरीबशा घरांत आपण जाऊन राहूं. त्यापासून आपल्याला कांहीं फार त्रास होणार नाहीं. आपण एके ठिकाणीं तरी राहूं, व आपली एकमेकाविषयीं प्रीति हेंच आपलें सुख. "

" प्रियकरा, तुरुंगांत जाण्याचा प्रसंग आला तरी देखील आपण वेगळे होणार नाहीं. "

" ज्या ठिकाणीं माझे आईबाप आहेत, तेथेंच मला सुख आहे. " मौक्तिकबिंदुप्रमाणें आपले आश्रुबिंदु ढाळून इझाबेला ह्मणाली: या दुःखप्रसंगीं आपल्या प्रियकर माणसांच्या तोंडून आलेले समाधान कारक हे शब्द त्या सरदाराच्या कानाला किती गोड लागले असतील बरें!

"प्रिये, लाडके इझाबेले, या दुष्ट ग्रीनब्रूडवर विश्वास ठेवल्यामुळें आपला नाश झाला. आतां पैसा मिळवून या अडचणींतून सुटण्याला फक्त एक मार्ग आहे, तो तुह्माला माहीतच आहे. पण केवळ स्वार्थाकरितां माझे हक्क व माझा देशाभिमान सोडून देण्याला तुह्मां दोघींपैकीं एकही मला अनुमोदन देणार नाहीं, हें मला ठाऊक आहे. छे, माझ्या लाडक्यांनो, असें कधीं होणार नाहीं. माझ्या शत्रूंनीं माझ्यापुढें पैशाचा ढीग ठेवला तरी मी तो लाथेनें झुगारून देईन. तर जोंपर्यंत दैवाची मेहरनजर आपणाकडे वळली नाहीं तोंपर्यंत त्याची वक्रदृष्टि आपण अशीच निश्चयानें सहन करूं या चला." इतक्यांत चाकरानें येऊन जेवणाची तयारी आहे असें सांगितलें.

नंतर कौन्टनें आनंदवृत्ति अंगिकारून या दोघींना भोजनगृहांत नेलें; व स्वत:ला क्षुधा नव्हती तरी यांना दु:ख होऊं नये ह्मणून आपणही थोडासा अन्नस्पर्श केला.

भोजन झाल्यावर कौन्टनें आपल्या प्रिय कन्येला, तिच्या पुस्तकांतील त्यांना फारच प्रिय असलेला, एका कवीचा स्वकामिनीप्रेमोद्गार वाचण्याची आज्ञा केली. त्याबरोबर इझाबेलेनें पुस्तक घेऊन आपल्या कोमल आणि सुस्वर कंठानें पुढील कविता ह्मणण्यास सुरवात केली:—

### एका कवीचा स्वकामिनीप्रेमोद्गार.

(शिखरिणी)

गृहा सोडोनीया जरि बहुत दूरीं भटकलों ।
तुझ्या मूर्तीला मी न कधिं सहसा चित्तीं चुकलों ; ॥
मला संसाराब्धी भयकर तरायास्तव तरी[1] ।
प्रिये ! तूंही आशाजननि, सुमती भासशी तरी ॥ १ ॥
तुझीं बालें सारीं तव अतुल लावण्य धरितीं ।
तुझ्या नेत्रांची तीं स्वनयनिं चकाकी मिरवितीं ॥
तुझी मूर्ती वाटे खचित तरणी[2] दुर्दिनीं[3] मला ।
स्त्रिया बालें यांणीं भवसुखाधि सारा अटविला ॥ २ ॥
जलें होतीं ताजीं जशीं विपिनीं तीं म्लान सुमनें ।
तशीं आशापाशें प्रमुदित उदासी जनमनें ।
दुजा लोकीं आप्तस्मरण करिती जे मृत नर ।

[1] नाव. [2] सूर्य. [3] संकटकाळीं. [4] मित्र.

स्मृतीऽशा त्या बोले प्रतिबिंब च पेगंबर बरें ॥ ३ ॥
सुखें स्वर्गी मातें त्यजुनि जरि गेलीस सुमुखि ! ।
प्रिये ! त्वत्प्रीतीचा जप अचल चाले मम मुखीं ॥
तिथें मत्प्रीतीचा जप करि सदा कुंदरदाने ! ।
स्वकर्णीं मत्प्रेमें सहज वच हें येइ वदनीं ॥ ४ ॥'

इझाबेलेनें या कविता संपविल्या नाहींत तोंच एका चाकरानें येऊन सांगि-तलें कीं, " जान्सन नांवाचा एक मनुष्य आला आहे; व तो ह्मणतो कीं, मला जरूरीचें कांहीं काम आहे."

हा जान्सन नांवाचा मनुष्य या चाकराच्या पाठोपाठच आंत घुसला होता. आंत आल्याबरोबर त्यानें कौन्टला विचारलें. "कौन्ट आल्टरोनी ते तुह्मीच काय?"

" हो, मीच. काय तुमचें माझ्याशीं काम आहे?"

" राल्फनीं मला धाडलें आहे."

" मीं मागितलेली मुदत त्यांनीं दिली हें सांगायला तुह्मांला धाडलें होय?"

हें विचारल्याबरोबर तो या दोघी स्त्रियांकडे पाहून जरा घुटमळूं लागला. शेवटीं कौन्टच्या कानांत त्यानें हळूच सांगितलें: " या आठशें पौंडां-करितां तुह्मांला मी जप्त करायला आलों आहें."

"हं, वारंट घेऊन आलांत होय? तुरुंगांत नेण्याचा तर तुमचा उद्देश नाहीं?"

" तसाच अगदीं नाहीं. न्यूगेटांतल्या एका खोलींत राहायचें; तेथें अगदीं घराप्रमाणें व्यवस्था राहील. मात्र कोठें बाहेर जायचें नाहीं."

" मी समजलों," आपल्या बायकोकडे व मुलीकडे वळून कौन्ट ह्मणाले, " लाडक्यांनों, तो दुर्दैवाचा प्रसंग येऊन ठेपला बरें. हा बेलीफ मला घेऊन जाण्याकरितां आला आहे. मला याच्याबरोबर गेलें पाहिजे. तुह्मी मनाला वाईट वाटवून घेऊं नका, असें माझें तुह्मांला सांगणें आहे. हा प्रसंग यायचाच होता. तो आज आला काय, उद्यां काय, अथवा महिन्यानें आला काय, सारखाच."

" ते तुह्मांला कोठें नेणार? आह्मांला नाहीं का तुमच्या बरोबर येतां यायचें?" कौन्टेसनें डोळ्यांत पाणी आणून विचारलें.

"बाई, उद्यां त्यांची तुह्मांला गांठ घेतां येईल. मग पाहिजे तर सकाळीं दहा

---

५ प्रतिध्वनि. ६ महमद. ७ उत्तम. ८ माझ्या प्रेमातिशयानें.

वाजल्यापासून तें रात्रीच्या नऊ वाजेपर्यंत तुह्मांला तेथें बसतां येईल. पण हा माझा मनुष्य आलाच."

असें ह्मणून तो बेलीफ, हे शेवटचे शब्द बोलण्यापूर्वी आलेल्या मनुष्यास क्षणभर थांबा, ह्मणून सांगण्याकरितां गेला; व इकडे **कौन्ट** या दोघींचें समाधान करूं लागले.

"बाबा, उद्यां दहा नाहीं वाजले तों मी तुमच्याकडे येईन. तोंपर्यंतची ही मधली वेळ किती दुःखाची जाईल बरं!"

"बरं महाराज, **मांटोनी**च्या वकीलाला जाऊन भेटण्याला मला परवानगी आहे काय?" **कौन्टेस**नें विचारलें.

"नाहीं. कोणत्याही संकटाला निश्चयानें पाठ द्यायची, असें आतांच नाहीं आपण कबूल केलें? तुमच्या मोठ्या नांवाला व तुमच्या कुलाला तुह्मी योग्य आहांत असें दाखवा." इतकें **कौन्ट** बोलत आहेत तों बेलीफ परत आला.

"मी तुमच्या बरोबर येण्याला तयार आहें." **कौन्ट** ह्मणाले.

"ठीक आहे. आह्मीं गाडी आणली आहे. परंतु कोणत्या रस्त्यानें तुह्मांला जायचें हें आह्मांला ठाऊक नाहीं. मी असें ऐकतों कीं, तुमची स्वतःची गाडी आहे ह्मणून."

"एकाद्यानें, तुरुंगांत जातांनाही आपल्या गाडींत बसून जाणें ह्मणजे निव्वळ गाढवपणा आहे. ज्या रस्त्यानें तुह्मी आलांत त्या रस्त्यानेंच परत चला. मी तुमच्याच गाडींतून येतों." **कौन्ट** ह्मणाले.

असें ह्मणून त्यांनीं, आपल्या बायकोला व मुलीला प्रेमपूर्वक आलिंगन देऊन आपलें आनंदगृह सोडून कारागृहांत जाण्याकरितां मोठ्या संकटानें, त्यांची मिठी सोडवली.

# भाग ८५.

## अडचणींत पडलेलें जिवाचें माणूस.

**कौन्ट आल्टरोनी**ला धरून नेल्यावर दहा दिवसांनीं, सरासरीं दिवसाच्या अकरा वाजतां एक तरुण स्त्री एका रस्त्यानें चालली होती.

तिचा पोषाख साधा असून, ती इकडे तिकडे न पाहतां, जरा घाईनें चालत होती. यावरून तिला कोठें तरी लवकर जाण्याची निकड आहे असें

दिसत होतें. व या हमरस्त्यावरून चालत असतांना तिची कांहीं प्रकारची संकोच वृत्ति झाली होती, तरी त्या रस्त्यानें जाणाऱ्या लोकांना पुन्हां पुन्हां या परीप्रमाणें दिसणाऱ्या तरुणीकडे पाहिल्यावांचून राहवत नसे.

त्याच रस्त्यानें समोरून एक देखणा व उंच पुरुष येत होता. त्यानें आपला पोषाख साधा केला असून, त्याच्या तोंडावर औदासिन्याची छाया दिसत होती. तो तिच्या अंगावरून तसाच पुढें जात होता; परंतु तिचा चेहेरा पझरता त्याच्या दृष्टीस पडल्यावरून तो आश्चर्यचकित होऊन ह्मणाला, " कोण प्रिये, इझाबेले? खरोखर तूंच कां ती आहेस ? प्रिये, आपली गांठ पडल्यापासून आजपर्यंत एक युग गेलें कीं काय असें मला वाटतें."

" प्रिया, त्या दिवसापासून पुष्कळ—पुष्कळ दुर्दैवाच्या गोष्टी घडून आल्या. माझे बाबा—"

" तुझे बाबा ! काय झालें त्यांना ? " तिच्या या केविलवाण्या शब्दानें चकित होऊन रिचर्डनें विचारलें.

"ते हल्लीं दिवाणी तुरुंगांत आहेत." डोळ्यांत पाणी आणून तिनें सांगितलें.

" दिवाणी तुरुंगांत ! आणखी तूं त्यांच्याकडे चाललीस होय ? प्रिये, हें कसें झालें तें सर्व मला सांग. मी थोडासा तुझ्याबरोबर येतों." असें ह्मणून त्यानें आपला हात तिला दिला. व तिनेंही आपण ज्याच्यावर प्रीति करतों त्याच्या बरोबर चालण्यास प्रत्यवाय मानला नाहीं. शिवाय, या वेळेला कोणी तरी तिचें समाधान करायला पाहिजेच होतें.

" तुह्मांला माहीतच आहे कीं, माझ्या बाबानें ग्रीनवूडला बरीच मोठी रक्कम दिली होती. " इझाबेला ह्मणाली.

" त्या मांगाचें नांवसुद्धां घेऊं नकोस प्रिये. "

" माझ्या बाबानें टामलीन्सनला जामीन कसें पतकरलें, वगैरे हकीकत मी तुह्माला सांगत बसत नाहीं. कारण मला ती माहीतच नाहीं. पण बाबांनीं त्याला जामीन पतकरून ग्रीनवूडला मोकळें केलें खरें. "

" आणखी टामलीन्सनचें दिवाळें वाजून तुझा बाप सर्वस्वीं बुडाला ?"

" हो बुडाले खरे. हल्लीं ते, आपल्या एका मित्राला कांहीं रकमेकरितां जामीन झाल्याबद्दल तुरुंगांत आहेत. "

" किती दिवस झाले या गोष्टीला प्रिये ? "

" आज दहा दिवस झाले. " ती दुःखानें ह्मणाली.

" आणखी तुझी आई कुठें आहे ? "

" तिला आज बरें वाटत नाहीं, ती घरींच बसून आहे; ह्मणून मी बाबाला भेटायला जात आहें. आतां रिचमंड येथील बंगला सोडून, दुसऱ्या ठिकाणीं आई व मी राहत आहों. "

" या गोष्टीला दहा दिवस झाले ह्मणतेस ? आणि तूं हें मला कळविलें नाहींस ना ? " रिचर्ड खोंचून बोलला.

" रिचर्ड, तुह्मांला ठाऊकच आहे कीं, कांहीं कारणामुळें मला तसें करतां आलें नाहीं. नाहीं तर—"

" नाहीं तर काय ? बोल—बोल इझाबेले. "

" नाहीं तर, या वेळेला तुह्मी बाबांना चांगली सल्ला दिली असती अशी माझी खात्री आहे. ते मोठे मानी आहेत. ते कधींही आपल्या स्नेहाजवळ शब्द टाकायचे नाहींत. आणखी त्यांना तर अशा स्थितींत ठेवतां उपयोग नाहीं. ही त्यांची मानहानि झाल्यामुळें त्यांचें काय होईल कोणाला ठाऊक !"

" अरे मांगा ग्रीनवुडा, याचें फळ तूं कधीं भोगशील! "

" प्रिया, आपण जाऊं या आतां. " ते तुरुंगाच्या जवळ जवळ आल्याबरोबर इझाबेला ह्मणाली.

" प्रिये, आतां तूं जाणार ना ? हीच आपली भेट जर निराळ्या स्थितींत आज झाली असती तर मला किती सुख झालें असतें ! ज्या प्रसंगामुळें तुझी माझी येथें गांठ पडली त्याची मी किती धन्यता मानली असती ! काय सांगूं तुला प्रिये, नेहमीं तुझा विचार माझ्या मनांत घोळत असतो. नेहमीं तुझी मूर्ति माझ्या हृदयांत असते. "

" आणखी मला तुमची कधींच आठवण होत नाहीं, असें का तुह्मांला वाटतें ? पण हा विषय बोलण्याची ही वेळ नाहीं. आपल्याला चांगले सुखाचे दिवस खचीत येतील ह्मणून आपण धांवून राहूं. "

असें ह्मणून त्याचा निरोप घेऊन ती निघाली.

मार्खम कांहीं वेळ त्याच जाग्यावर घुटमळत होता. नंतर त्यानें तुरुंगांत जाऊन कौन्टला गुंतवून ठेवण्याच्या संबंधानें चौकशी केली, तेव्हां आठराशें पाउंडांकरितां त्यांना गुंतवून ठेविलें आहे असें त्याला कळलें.

नंतर तो तें स्थल सोडून शहराकडे निघाला. वाटेनें चालतां चालतां तो आपल्या मनाशीं बोलत होता ; " आठराशें पाउंड मिळाले कीं, कौन्ट मो-

फळे होऊन, ते आपल्या कुटुंबांत जाऊन पडतील, आणि त्या योगानें माझ्या प्रियेला सुख होईल काय ? माझी मालमत्ता चार हजार पाउंडांच्या किमतीची आहे. मी तिच्यावर दोन हजार पाऊंड काढीन तर माझें उत्पन्न निम्यानें कमी होईल. मग फक्त काय ते शंभरच पाऊंड वर्षाचे शिल्लक राहतील. ठीक आहे कांहीं चिंता नाहीं. मला चांगल्या प्रकारचें शिक्षण मिळालें आहे, त्याचा मी कांहीं तरी उपयोग करीन."

परंतु त्याला लागलींच आठवलें कीं, "याच मालमत्तेवर पूर्वी **सैतान्**याला देण्याकरितां पैसे काढले होते, व त्यांपैकीं अर्धी रक्कम **अंधारवाड्यांत टालबाट**च्या खर्चीं पडली. त्याप्रमाणेंच **मनरो** व **एलन**ला मदत केली ती, **आर्मस्ट्रांग**ला भेटण्याकरितां झालेला खर्च, शिवाय आणखी कांहीं झाला असेल तो. कागदपत्र करण्याला खर्च लागेल तो निराळाच. जर आतां दोन हजार रुपये आणखी काढीन तर फक्त पंधराशें पाऊंड शिल्लक राहतील. मग वार्षिक उत्पन्न काय तें पाऊणशें पाउंडांचेंच राहणार" असे विचार जरी त्याला सुचले, तरी मनांत आलेली गोष्ट मागें घेण्याचें तिळमात्रही त्या उदारात्म्याच्या मनांत आलें नाहीं. तो तडक आपल्या **डायसन** नांवाच्या वकिलाकडे जाण्याला निघाला.

तेथें जाऊन **मार्खम**नें त्याला सर्व हकीकत कळविल्यानंतर, चार दिवसांशिवाय हें काम व्हावयाचें नाहीं असें त्यानें सांगितलें. **मार्खम**नें त्याच्या जवळून निश्चित वेळ ठरवून घेऊन घराचा रस्ता धरला.

**रिचर्ड** घरीं आला तेव्हां अलीकडे बरेच दिवस ठाऊक नसलेलें एक प्रकारचें समाधान त्याला वाटलें. ज्यांना तो पूज्य मानीत होता व जींवर तो प्रीति करीत होता त्यांच्याकरितां आपलें मोठें नुकसान करण्याचा त्यानें निश्चय केला. व या नुकसानीमुळें कसाही प्रसंग आला तरी तो सहन करण्याला तो तयार झाला होता. हा मनुष्यस्वभावच आहे ; एकाद्या गोष्टीचें चिंतन करणें प्रथमदर्शनीं कितीही भयंकर व दहशत घालणारें असलें, तरी तें आपल्या कोणतेंही दुःख अथवा त्रास करून घेतल्याशिवाय अंगवळणीं पाडतां येतें. मृत्यूची शिक्षा झालेला अपराधी तुरुंगांत आहे, व फाशीचे खांब उभे करण्याकरितां चाललेले घणाचे घाव त्याच्या कानावर पडत आहेत, तरी, लोकांची ज्याप्रमाणें समजूत असते त्याप्रमाणें त्याला इतक्या तीक्ष्ण मानसिक वेदना होत नाहींत. आज नाहीं उद्यां, कधीं तरी आपणांस मरावयाचें आहे हें

सर्वांना पक्कें ठाऊक आहे, तथापि ही कल्पना आपल्या मनाचें स्वास्थ्य बिघडवीत नाहीं. ज्या अपराध्याला मृत्यूची शिक्षा झाली आहे, त्याची आपल्यापेक्षां वाईट स्थिति इतकीच आहे कीं, त्याच्या मरण्याची निश्चित घटका पळें त्याला कळलेलीं असतात; परंतु ज्या लोकांना अशा मनुष्याबद्दल वाईट वाटतें, त्यांपैकीं पुष्कळांना आपलें आयुष्य संपण्यापूर्वीं लांबणीचीं, झिजत पाडणारीं, कष्टतर अशीं जीं दुखणीं सहन करावीं लागतात, त्यांपेक्षां अशा मनुष्याचें मरण जें तात्कालिक व क्षणिक दुःख देणारें असतें तें हजार वाटेनें इष्ट आहे. तात्पर्य—ऐहिक दुःखांपैकीं, कोणतेंही दुःख निश्चयानें, व कांहीं अंशीं आनंदानें सहन करण्याजोगें आपल्याला स्वतःचें मन बनवितां येतें. आणखी—असें कोणतेंही दुःख, कोणतीही अवस्था, किंवा कोणतीही वेदना नाहीं कीं, तिच्याबरोबर आशेचा तंतु चिकटलेला नसतो. असो.

नेमलेल्या दिवशीं **रिचर्डनें डायसनकडे** जाऊन कागदपत्रावर सह्या वगैरे केल्या व आपल्या पदरांत दोन हजार पाउंड पाडून घेतले.

हें काम करण्याचा **मार्खमचा** इतका दृढ निश्चय झाला होता कीं, **डायसननें** कितीही प्रकारानें एवढी मोठी रक्कम खर्ची न घालण्याविषयीं त्याला सांगितलें तरी त्यानें ऐकलें नाहीं. उलट त्याच्याच मदतीनें हें काम करण्याचा विचार करून **डायसनला** त्यानें आपल्या गाडींत घेतलें. तो ह्मणाला, "हें काम इतक्या रीतीनें बिनबोभाट झालें पाहिजे कीं, **कौन्टची** सुटका कोणी करविली हें **कौन्टला** किंवा दुसऱ्या कोणाचाही कळतां उपयोगी नाहीं."

**डायसननें** बरें आहे ह्मणून सांगितलें, व तो **मार्खमला** गाडींत सोडून एकटाच तुरुंगांत गेला.

थोड्याच वेळानें **डायसन** परत येऊन आतांच **कौन्टची** सुटका होईल ह्मणून त्यानें **मार्खमला** सांगितलें. व तो गाडींत बसल्यावर गाडी चालू झाली.

इकडे **कौन्टेस** व **इझाबेला कौन्टला** भेटण्याकरितां त्यांच्या खोलींत आल्या होत्या. या वेळेला **कौन्ट** आपल्या समोर असलेल्या मेजावरील पुस्तकांची व कागदपत्रांची व्यवस्था लावण्यांत निमग्न झाले होते. इतक्यांत या दोघींना पाहून त्यांनीं आनंदवृत्ति स्वीकारून अंतःकरणपूर्वक यांची भेट घेतली. चालीप्रमाणें विचारपूस झाल्यावर कांहीं पत्र आलें आहे काय, ह्मणून **कौन्टनें** त्यांस विचारलें.

" कांहीं नाहीं. पण आपली सुटका होण्याचा कांहीं विचार केला काय? " ह्मणून **कौंन्टेसनें** विचारलें.

" मी कांहीं विचार केला नाहीं, वेळेवर हवाला टाकून स्वस्थ आहें. **आर्मस्ट्रांग** जिवंत असते तर या प्रसंगाला मी त्यांजवळ शब्द टाकला असता. दुसऱ्या कोणाजवळही मी शब्द टाकायला जाणार नाहीं."

यांचें भाषण चाललें आहे तोंच तुरुंगावरचा एक अधिकारी येऊन त्यानें **कौन्टला**, तुह्मी मोकळे झालांत, ह्मणून सांगितलें.

" मी मोकळा झालों ! छे, असें कधीं होणार नाहीं. "

" एका गृहस्थानें आपल्या वकीलाला पाठवून तुमचें जितकें देणें होतें तितकें पैन् पै चुकतें केलें आहे. " त्या मनुष्यानें सांगितलें.

" तुह्मी माझी थट्टा तर करीत नाहीं ना ? कदाचित् तुह्मी चुकलां असाल. माझ्या ओळखींच्या गृहस्थांपैकीं, असें उदारपणाचें, इतक्या नाजूक रीतीनें कृत्य करणारा आमच्या देशचा एक वकील आहे. पण तो आज दहा दिवस बाहेरगांवीं गेला आहे. कदाचित् माझ्यावर आलेला प्रसंग त्याला माहीतही नसेल. मग माझें कर्ज कोणीं दिलें असेल तें असो."

" महाराज, तें आह्माला कांहीं ठाऊक नाहीं ? व चौकशी करण्याचें आमचें कामही नाहीं. आह्माला ठाऊक आहे तें एवढेंच कीं, तुमचें कर्ज फिटलें. आतां तुह्माला वाटेल तेव्हां येथून जा. "

**इझाबेलेच्या** तोंडांतून नांव बाहेर पडणार होतें, पण तिनें तें मागें घेतलें. आपल्या बापाची सुटका करणारा असा मित्र **रिचर्ड मार्खम**शिवाय कोणी नाहीं अशी जरी तिच्या अंतःकरणाची खात्री होती तरी तें नांव काढण्याला तिचें धैर्य होईना.

शाबास **रिचर्ड**! तुझ्या सत्कृत्याचें फळ मिळण्याला अगोदरच आरंभ झाला आहे. आजपर्यंत त्या सुंदरीच्या मनांत तुजविषयीं नुसत्या प्रीतीचाच विकार होता, परंतु आतां त्या ठिकाणीं तुजविषयीं भक्ति आणि पूज्यभाव उत्पन्न झालीं आहेत. असो.

हें आनंदकारक वर्तमान खरें आहे अशी जेव्हां त्यांची खात्री झाली तेव्हां त्या त्रिवर्गांना किती आनंद झाला असेल याचें वर्णन आह्मी करीत नाहीं. हें उदारपणाचें कृत्य कोणीं केलें असावें ह्मणून **कौन्ट** जीं अनुमानें करीत होते, त्यांपासून त्यांना कांहीं समाधान व फायदा झाला नाहीं—फक्त एक **इझाबेला** मात्र खरें जाणून होती.

---

# भाग ८६.

## थेरडी.

**मार्खम**चे दिवस फिरले असूनही तो स्वस्थ बसणारा मनुष्य नव्हता. त्याला पुस्तकें वगैरे रचण्याचा थोडासा नाद होताच, त्याचा कांहीं तरी उपयोग करण्याचा त्यानें निश्चय केला. त्याच्या कुटुंबांतील खर्च भागविण्याला त्याची मिळकत अगदींच अपुरी होती. व घरांतला खर्च कमी कसा करावा हेंही त्याला सुचेना. **मनरो** व **एलन**ला बाहेर लावून फिरून त्यांनीं दारोदार फिरणें हें तर तो प्राण गेला तरी कबूल करणार नाहीं. **विटिंगहम**लाही कांहीं केल्यानें तो सोडणार नाहीं. **मेरिअन** काय ती एक मोलकरीण घरांत होती; परंतु तिच्या वांचून अडावयाचें. राहतांपैकीं **हालफर्ड**ची मात्र एक अडचण होती, व ती त्यानें दूर करण्याचा विचार केला. परंतु या संबंधानें एखादा निकाल लावण्यापूर्वी त्यानें अगोदर **विटिंगहम**चा विचार घेण्याकरितां त्याला बोलावून आणलें.

**मार्खम**नें आपली सर्व स्थिति त्याला सांगितल्यावर या वृद्ध मुनीनें मान हालवून भापणास सुरवात केली: " धनीसाहेब, अन्यावर तुह्मीं केलेल्या परोपकारित्वामुळें व तुमच्या या महोदार्यामुळें हा संपूर्ण हाहा:कार परिभ्रमण करूं लागला आहे. अशा प्रकरणानें तुह्मीं निवेष्टित होणें मला असह्यमान होत आहे. तुमच्या सर्व संपत्तीची आतां वाताहत झाली आहे. "

" **विटिंगहम**, जें झालें तें झालें. तुला माझ्यावर टीका करायला येथें बोलावलें नाहीं. " **रिचर्ड** ह्मणाला.

" धनीसाहेब, माझ्यावर असे रागायमान होऊं नका. आपल्याला मी जन्मादारभ्य पाहिलें आहे. मी आपले आभार तुमच्यावर ठेवणार नाहीं.मी कोठें दुसरी चाकरी पाहीन समजलांत?" **विटिंगहम** डोळ्यांत पाणी आणून बोलला.

" छे–छे, **विटिंगहम**, माझ्याकरितां तुला मी कधीं जाऊं देणार नाहीं. जोंपर्यंत मला मिळत आहे तोंपर्यंत माझ्या घासांतून अर्धा घास तुला देत जाईन. आपल्या संसारांत होतां होईल तितकी काटकसर करण्याचा प्रसंग आतां आला आहे एवढेंच तुला कळविण्याचा माझा उद्देश होता, या पलीकडे कांहीं नाहीं. "

" महाराज, आतां मला संपूर्ण कल्पभूत झालें. व या संभाषणावरून मला एक विस्मरण होत आहे कीं, आपल्या शेजारच्या एका सद्गृहस्थाल

हालफर्डनारख्या तारुण्याची अश्यक्यता आहे. तेथें त्याची चांगली शुश्रूषणा होईल असें मला अवगत होत आहे."

"ठीक आहे, तर त्याला दुसरी सोय पाहूं दे. पण त्याला सांग कीं, तुझी सोय लागेपर्यंत तूं येथेंच रहा."

आणखी काय काय व्यवस्था करावयाची याबद्दल त्या दोघांनीं बसून विचार केला. दैवयोगानें विटिंगहमनें सांगितलेली जागाही हालफर्डला मिळाली, व एक दोन दिवसांनीं तो आपल्या नव्या चाकरीवर गेला.

मनरो व एलन यांच्या नजरेस आपली ही स्थिति न येण्याबद्दल रिचर्डनें जरी दक्षता ठेविली होती तरी एलनच्या चाणाक्षपणानें तिच्या लक्ष्यांत त्याची खरी स्थिति तेव्हांच आली. व त्याबरोबर आपल्या शिक्षणाचा कोणत्या रीतीनें योग्य उपयोग होईल याचा तो विचार करूं लागली. आपला मार्खम-वर एक प्रकारचा भार आहे असा तिला आलेला संशय तिनें आपल्या बापाला कळविला. मार्खमच्या ही तिनें लागलीच लक्ष्यांत आणून सोडलें कीं, आपण त्याच्या संसाराला यथाशक्ति हातभार लावण्याच्या काळजींत आहोंत. आपली स्थिति खालावली आहे या गोष्टिबद्दल ती अजाण नाहीं, हें दाखविण्याची तिची नाजूक तऱ्हा पाहून तोही अगदीं चकित होऊन गेला. प्रपंचांतला खर्च भागविण्यापुरती माझ्याजवळ ऐपत आहे, अशी त्यानें तिची पुष्कळ खात्री केली; व एलननेंही वरकरणीं पुष्कळ संतोष दाखविला; तरी आपल्या रिकाम्या वेळेकरितां कोठें तरी काम पतकरल्याशिवाय रहावयाचें नाहीं, असा तिनें आपल्या मनाचा निश्चय केला.

परंतु ही काम तरी कोठें पाहणार? शिवणकाम करणाऱ्या बायकांच्या श्रमांबद्दल त्यांना किती भिकार मजुरी मिळते ती इला ठाऊक होती. आणि पहिला धंदा फिरून स्वीकारण्याचें मनांत आणतांनाच तिच्या अंगावर कांटा उभा राही. स्वस्थ न बसण्याचा तर तिचा कृतनिश्चय होता. कारण, आपलें व आपल्या बापाचें हल्लींच्या स्थितींत त्या बिचाऱ्या मार्खमवर केवळ ओझें आहे हें तिला अगदीं पाहवेना. उपहाराच्या वेळीं एखादा पदार्थ घेण्याविषयीं मार्खम आपल्या बापाला आग्रह करून स्वतःविषयीं मात्र टाळाटाळी करतो हें पाहून तिला पराकाष्ठेचें दुःख होई. अलीकडे रिचर्डला पहाटे उठून दिवस बराच वर येईपर्यंत वाचीत बसतांना ती पहात असे. शिवाय, तिला मेरिअनकडून असेंही कळलें कीं, बागेंत उत्पन्न होऊन शिल्लक राहि-

ळेला माल हल्लीं विकला जात आहे. एकंदरींत तिला असें आढळून आलें कीं, हल्लीं घरांत अगदीं काटाकाट चालत असून, फक्त आपल्या व आपल्या बापाच्या संबंधानें मात्र सढळपणा आहे.हा सर्व प्रकार पाहून तिला फारच दुःख झालें, व तिनें निश्चय केला कीं, होतां होईल तों या प्रपंचास हातभार लावावयाचा. मग या कामाकरितां पहिल्या चितार्‍याकडे, किंवा मूर्तिकाराकडे, किंवा तसबीर घेणाराकडे जाणें भाग पडलें तरी चिंता नाहीं.

घटकेंत तिच्या मनांत असेंही येई कीं, **ग्रीनवूड**कडे कांहीं मदत मागावी. परंतु आपल्या मुलाच्या संबंधानें तो पुष्कळ उपयोगी पडला हें तिच्या मनांत आलें ह्मणजे तिचा तो बेत फिरे. आणि जरी त्याची मदत तिनें स्वीकारली असती तरी बापाजवळ व **मार्खम**जवळ या कृत्याची वतावणी तिला करतां आली नसती. कारण, **ग्रीनवूड**च्या संबंधानें अशी एक गुप्त गोष्ट होती कीं, ती प्रकट केली असतां, तिचें मरणप्राय दुःख जरी नाहीसें होत होतें, तरी ती तिला उघडकीस आणतां येत नव्हती.

एकंदर इतक्या गोष्टींचा विचार केल्यावर, तिच्या मनांत त्या, अनेक धंदे करणार्‍या, विननांवाच्या व एका गलिच्छ वस्तींत राहणार्‍या थेरडीकडे जाण्याचें आलें यांत काय विचाराबाहेरचें आहे? त्याप्रमाणेंच, त्या थेरडीपुढें जाऊन उभें राहण्याविषयींचा जो तिचा तिरस्कार तो हळू हळू कमी होऊन कोठें तरी काम मिळविण्याची जी तिची उत्कट इच्छा ती पुरी होण्याला, तिच्याकडे जाणें हाच मार्ग आहे असें तिला वाटायाला लागलें यांत तरी काय नवल आहे?

शेवटीं तिच्याकडे जायचेंच या विचारानें, एके दिवशीं सकाळीं ती साधा पोषाख करून, व गाडींत बसून शहरांत येण्याकरितां निघाली, तों सरासरी दोन प्रहरच्या सुमारास **गोल्डनलेन**मध्यें येऊन पोंचली.

त्या अरुंद आणि गलिच्छ रस्त्यांतून जात असतांना तिचे मनोधर्म कशा प्रकारचे असतील बरें ? सुमारें तीन वर्षांपूर्वीं जेव्हां ती प्रथम या अपवित्र मार्गानें गेली त्या वेळेस ती शुद्ध आणि निष्कलंक अशी होती. त्या दिवसापासून किती गोष्टी तिनें पाहिल्या, किती गोष्टींचा तिला अनुभव आला, व किती दुःखें तिला सहन करावीं लागलीं ? भ्रष्ट होऊन आणि अविवाहित असतांना तिला मातृत्व आलें होतें, तिचें कुमारित्व अक्षय्य नाहींसें झालें होतें, व तिच्या अविचाराचें फल जीवमान असून कोणत्याही वेळीं तिची अब्रू उघडपणें मलीन करण्याकरितां पुढें आणण्यासारख्या स्थितींत होतें. जरी तिनें आतां सन्मार्ग

स्वीकारला होता, तरी तो सद्गुणाच्या दृष्टीनें नव्हे, तर आपल्या हातून आणखी एकादें अकर्म घडून येईल या भीतीनें होता. ज्याप्रमाणें माध्यान्हीच्या सूर्याच्या प्रखरतेपुढें वर्फ वितळून जातो त्याप्रमाणें, चित्रकार, कारागीर, व मूर्तिकार यांच्या पापदृष्टीपुढें, तिच्या अंत:करणाची स्वाभाविक पवित्रता वितळून गेली होती. त्यांच्या येथें चाकरी करण्याचा तिला मनापासून तिरस्कार असे हें जरी खरें आहे, तरी या तिच्या विकाराचा आणि स्त्रियांचा जो शुद्ध विनय याचा आतां तिच्या मनानें फारच थोडा संबंध असे. तरी तिचा स्वभाव एक प्रकारानें मानी असे; त्या कारणानें ज्याला स्वत:चीच पंचाईत, अशा मनुष्यावर आपल्या जीविताचा भार ठेवण्याचा ती अंत:करणपूर्वक कंटाळा करी. तात्पर्य **एलन** थेरडीच्या घरीं निघाली तेव्हां अशा प्रकारची तिची स्थिति होती. असो.

ती थेरडी खुर्चीवर बसून, चुलीवर शिजत पडलेल्या भांड्यांतून निघणाऱ्या वाफेकडे पहात बसली होती. या भांड्यांत तिचें भोजन तयार होत होतें; व त्यांत शिजत असलेल्या पदार्थांचा सर्व खोलीभर कोंदट वास पसरला होता; तरी तिच्या घ्राणेंद्रियाला तो सुगंधाप्रमाणें वाटे.पदार्थ शिजतांना, आपल्या जेवणाची वेळ केव्हां भरते ह्मणून वरचेवर ती घड्याळ्याकडे पहात असे.

मेजावर रुमाल वगैरे पसरून ती जेवणाची तयारी करीत आहे इतक्यांत कोणीसें दार ठोठावलें. तें ऐकून आलेल्या मनुष्यास आंत न बोलावतां, आपणच उठून त्याच्याशीं बोलण्याकरितां गेली; व थोडेंसें दार उघडून कोण आहे तें पाहूं लागली. तिला अशी भीति पडली कीं, माझ्या पात्रांत कोणी वांटेकरी होतें कीं काय कोण जाणें; परंतु जेव्हां तिनें **एलन**ला ओळखली, तेव्हां त्या सुरकुतलेल्या चेहेऱ्याची कळी उमलून तिनें तिला आंत घेतली; व खालीं बसवून तिला ह्मणाली: "कां मुली, फिरून तूं माझ्याकडे आलीसना? मी पुष्कळ दिवस तुझी वाट पहात होतें."

"माझी वाट! काय ह्मणून ती?" **एलन**नें आश्चर्यानें विचारलें.

"कारण, माझ्याशिवाय तुझें फार दिवस चालायचें नाहीं हें मला ठाऊक होतें ह्मणून."

"मला तुमचें बोलणें समजलें नाहीं."

"कांहीं चिंता नाहीं. तुला माझी फिरून गरज लागली ह्मणायची! नाहीं तर तूं येथें कशाला आली असतीस?"

" हो मला तुमची फिरून गरज लागली खरी. मला कोठें तरी चाकरी पाहिजे. माझ्या उपयोगी पडेल अशी तुह्माला ठाऊक असली तर सांगा."

" तुला कशा प्रकारची चाकरी पाहिजे?" त्या थेरडीनें डोळे मिचकावीत विचारलें.

हा प्रश्न विचारण्याबरोबर **एलन** विचार करीत स्तब्ध राहिली. कारण, या प्रश्नाच्या योगानें तिच्या अडचणी तिच्या मनांत येऊन, कोणताही मार्ग पसंत करण्याला आपल्याला तोंड नाहीं अशी तिची खात्री झाली.

ही थेरडीही, तिला लक्ष्यपूर्वक न्याहाळूं लागली. या वेळेला इच्या त्या विचकलेल्या तोंडाची पहिली कळा बदलून, त्यावर आनंदाची छाया पसरूं लागली. व एकंदर तिचे सर्व अवयव निरखून पाहिल्यावर या थेरडीच्या मनांत तिच्याविषयीं आनंद, मत्सर व उल्हासमिश्रित तरंग उत्पन्न होऊं लागले.

" तुला कशा प्रकारची चाकरी पाहिजे?" ह्मणून आणखी एकवार या थेरडीनें **एलन**ला विचारलें.

**एलन**चें मन जरी दुःखकारक विचारांत गुंगून गेलें होतें तरी तिनें हंसतमुद्रा करून सांगितलें, "तुमच्या प्रश्नाचें कसें उत्तर द्यावें हें मला समजत नाहीं. खरोखरी मला जरी कशाची गरज नाहीं, तरी आह्माला रिकामे पोसण्याला असमर्थ अशा एका गृहस्थावर माझें व माझ्या बापाचें पोट अवलंबून आहे, हें मला प्रशस्त वाटत नाहीं. व माझा बाप अशक्त झाल्यामुळें, त्याच्याच्यानेंही कांहीं होणार नाहीं. तेव्हां मलाच कोठें तरी सोय पाहिली पाहिजे."

" तुझ्या स्वरूपाच्या तरुण मुलीला चांगल्या रीतीनें वागवायला स्नेही कांहीं थोडे नाहीं सांपडायचे." हे शब्द ती चुलीवर शिजणाऱ्या पदार्थाशीं कांहीं खटपट करीत असतांना बोलली खरी; परंतु आपल्या या शब्दाचा परिणाम काय झाला तो पाहण्याकरितां **एलन**च्या तोंडाकडे तिनें सर्पाप्रमाणें दृष्टि लावली होती.

**एलन** फिरून हंसून ह्मणाली: " मी कांहीं इतकी कुरूप नाहीं, हें मला ठाऊक आहे. पण चांगलेपणांत दिवस घालवावेत अशी माझी इच्छा आहे. शिवणकाम करून कांहींचामिळत नाहीं, व पहिली ती हलकटपणाची चाकरी मला नको. मला करण्यासारखी दुसरी एखादी चाकरी तुह्माला ठाऊक असेल तर सांगा."

थोडासा विचार करून ती थेरडी ह्मणाली:"तुझ्याजवळ कांहीं पैसे आहेत?"
" आहेत तीस रुपये व वर कांहीं आणे." असें ह्मणून एलननें आपली पिशवी काढली.

" मला एक तुझ्या उपयोगाची जागा माहीत आहे. पण त्याबद्दल तुझ्या पिशवींतले तीस रुपये माझ्यापुढें ठेवले पाहिजेत."

" तें काय काम आहे?"

" एका देवऋष्याजवळ रहायाचें आहे."

" ह्मणजे काय ? मी नाहीं समजलें." एलन ह्मणाली.

" फ्रान्सांत राहणारा एक देवऋषि येथें आला आहे. तो मोहनी विद्येवर व्याख्यानें देत असतो. त्यानें येथें येऊन मोठी चळवळ माजविली आहे, आणि सर्व लोक त्याच्या अगदीं भजनीं लागले आहेत. आपल्या विद्येचे प्रयोग चालवायला त्याला कांहीं माणसांची जरूर आहे असें त्यानें मला सांगितलें आहे. तूं त्याच्या उपयोगी पडशील असें मला वाटतें. मी आजपर्यंत तुझ्या कशी उपयोगी पडलें हें तुला ठाऊक आहेच. तेव्हां आतां मागितलेले पैसे देण्याला कांकूं करूं नकोस, ह्मणजे मग मी त्या गृहस्थाचा पत्ता तुला देतें."

" मला तेथें जाऊन काय करावें लागणार तें सांगा अगोदर."

"तुला एका खुर्चीवर बसावें लागेल.मग तो देवऋषि तुझ्या डोळ्यांसमोर,पुढें मागें,असे कांहीं हातवारे करील.मग तुला झोंप लागेल, किंवा ती लागली आहे असें दाखवावें लागेल. मग तो तुला कांहीं प्रश्न विचारील, व तूं त्यांचीं उत्तरें देशील. हेंच काय तें तुला काम पडेल."

" पण ही सगळी लबाडी आहे ना ?" एलन ह्मणाली.

" तुला पाहिजे तर पतकर नाहीं तर नको पतकरूं. जर तूं इतकी बारीक चौकशी करतेस, तर एखादी मुलांना संभाळण्याची किंवा दुसरी चांगलीशी नोकरी कां नाहीं पहात?

" याचें कारण ज्याच्या येथें मी अशी नोकरी मागायला जाईन तो, मी पूर्वी कोणाच्या येथें होतें ह्मणून विचारणार. ह्मणजे माझा पहिला धंदा उघडकीस येणार ?"

" त्याची मला पंचाईत नको. तुला पतकरायची कीं नाहीं सांग ? माझी जेवणाची वेळ झाली."

" बरं, पण मला तेथें काय मिळेल ?" एलननें विचारलें.

" एका आठवड्याला तीस शिलींग. आठवड्यांतून तीन वेळां दोन दोन तास जावें लागेल, व कदाचित् प्रत्येक दिवशीं आपलें काम शिकण्याकरितां ह्मणून एक तास जावें लागेल. "

एलननें, " बरें तर, ती चाकरी मी पतकरतें " असें ह्मणून तिच्यापुढें तीस रुपये ठेवले.

हे रुपये पाहिल्याबरोबर या थेरडीचे डोळे दिपून जाऊन, तिनें त्या रुपयांवर एकदम झडप मारली. तिला वाटलें कीं, न जाणों, एलनचा विचार फिरेल. ह्मणून तिनें ते रुपये अगोदर मोठ्या काळजीनें कागदांत गुंडाळून घड्याळाच्या घरांत ठेऊन दिले, व मग मेजाचा खण उघडून, एलन पूर्वी इच्याकडे आली असतांना त्या वेळेला जशी त्यांत कांहीं उचकापाचक करीत होती, तशी या वेळेलाही करायाला लागली.

" तुला कळून आलेंच असेल कीं, माझा पुष्कळ लोकांशीं संबंध आहे. या शहरांतील चांगले चांगले तरुण गृहस्थ मला जाणतात, व प्रसंगीं माझा उपयोग करूनही घेतात; आणि त्यांचें मी काम चांगलें करतें ह्मणून तेही माझी कोठें तरी शिफारस करतात. अशा रीतीनें पोटाला भाकरी मिळविण्याला कांहीं ना कांहीं काम असतेंच. मी कांहीं आळशी नाहीं समजलीस? दिवसा रात्रीं माझ्या गिऱ्हाइकांचीं मला बोलावणीं येतात. पुरुषांना बायका मिळवून देणें, बायकांना पुरुष आणून देतें; परंतु आतां माझा धंदा पहिल्याप्रमाणें चालत नाहीं. माझ्या धंद्यांतसुद्धां चढाओढ आहेच. चांभार, शिंपी, खाटीक, यांची सुद्धां या चाढओढीसंबंधानें तक्रार असते; पण माझ्याइतकी कांहीं त्यांना तक्रार करायाला जागा नाहीं. मी इकडून तिकडून कसा तरी पैसा उकळतें झालें. आणि या गोष्टीचा मी विचार करूं लागलें ह्मणजे असें वाटतें कीं, कोण्या वेळेला काय होईल याचा काय नेम ? ह्मणून तुला सांगतें कीं, तूं तरुण, चांगली देखणी आहेस. इतर बायकांप्रमाणें तुझ्यावरही असे प्रसंग यायचेच. आणखी याबरोबरच तुला असें सांगून ठेवतें कीं, कांहीं नादानें तुझें पाऊल चुकून त्याचा परिणाम भोगण्याचा तुझ्यावर प्रसंग आला तर—" थेरडीनें बाकीचे शब्द एलनच्या कानांत सांगितले. त्याबरोबर चपापून जाऊन तिरस्कार व भयदर्शक असे कांहीं उद्गार तिच्या तोंडून बाहेर पडले.

त्या खणांत उचकणें चाललें असतांनाच, ह्मातारी मोठ्या धिमेपणानें ह्मणाली: " तूं कांहीं भिऊं नकोस. तुला राग यावा या उद्देशानें मी बोललें

नाहीं. मी इतकेंच सांगतें कीं, तुझ्यापेक्षां थोर कुळांतल्या तरुण मुलींना देखील माझी गरज पडली होती. मी जर नसतें तर अशा अविचारी मुलींचें काय झालें असतें कोणाला ठाऊक ?"

"बरें मला जाऊं द्या. येथें क्षणभर देखील थांबायला मला वेळ नाहीं." **एलन** आपल्या मनांतील तिरस्कार आवरून ह्मणाली.

ह्मातारीनें तिला घराचा पत्ता देऊन, पुन्हां जेव्हां जरूर लागेल तेव्हां येण्यास सांगितलें; व **एलन**च्या हातांत तो पत्ता पडतांच तिनें त्या ठिकाणाहून आपलें पाऊल काढलें.

ती गेल्याबरोबर ही थेरडी आपल्या भोजनपात्राची सिद्धता करूं लागली; व एकीकडे तोंडानें, "माझी चुकलेली मेंढी फिरून माझ्याकडे परत आली, आतां मला पुष्कळ पैसे मिळवतां येतील." असें एकसारखी बडबडत होती.

---

# भाग ८७.

## मोहनीविद्या जाणणारा देवऋषि.

**एलन**ला घर सोडून बराच वेळ झाल्याकारणानें, तिनें देवऋष्याच्या घरीं जाण्याचा आपला विचार दुसऱ्या दिवसावर टाकला.

सुमारें तीन तासांनीं घरीं परत आल्यावर तिला कळलें कीं, आपण इतका वेळ बाहेर होतों, याबद्दल आपला बाप काळजी करीत होता. तिनें लागलींच त्याला सांगितलें कीं, आपल्या अन्नदात्यावरचें ओझें होतां होईल तितकें हलकें करून, निदान आपल्या दोघांच्या वस्त्रप्रावरणापुरतें तरी साधन मिळविण्याकरितां माझ्या बुद्धीचा कांहीं तरी योग्य उपयोग करण्याच्या मी योजनेंत आहें. बापाला तिचा हा विचार फार पसंत पडला. **एलन**नें त्याला आणखी असें कळविलें कीं, पूर्वीं ज्या ज्या ठिकाणीं मीं काम केलें त्यांपैकीं,एकाच्या येथें मला आठवड्यांतून कांहीं वेळ गाणें शिकविण्याचें काम लागलें आहे. आमच्या वाचकांना स्मरत असेलच कीं, ज्या ज्या वेळेला ती वास्तविक चितान्याच्या येथें, किंवा कारागिराच्या येथें, किंवा मूर्तिकाराच्या येथें चाकरीस असे, त्या त्या वेळेला, मी चांगल्याच्या घरीं शिवणकाम पतकरलें आहे असें ती आपल्या बापाला भासवीत असे; त्याचप्रमाणें याही वेळेला तिनें जें सांगितलें त्यावर एकदम विश्वास ठेवून, हें वर्तमान **मार्खम**ला न कळविण्याचें त्यानें

पतकरलें; एवढेंच नव्हे, तर तिच्या आड तो न येईल असें करण्याचेंही काम अंगावर घेतलें. **एलन**ला मोठें संकट काय तें हेंच होतें कीं, या नव्या धंद्या-संबंधानें आपल्याला वरचेवर घरांतून बाहेर जावें लागणार, त्याला सबब काय सांगावी? पण ही तिची काळजी बापानें दूर केली. व तिनें आपल्या बापाशीं ही लबाडी मनांत कांहीं किंतु न बाळगतां चालविली. अरेरे! या तरुणीच्या मनाच्या सद्गुणाचा आणि पवित्रपणाचा कसा विध्वंस होऊन गेला! असो.

मोहनीविद्या जाणणाऱ्या गृहस्थाचें वय अदमासें पन्नास वर्षांचें होतें. याची चाल रीत सभ्यपणाची असे. हा देवऋषि तीक्ष्ण बुद्धीचा होता. याला इंग्रजी चांगलें येत असून याच्या जन्मभाषेशिवाय याला पुष्कळ भाषांची ओळख होती.

**एलन** याच्या येथें आली तेव्हां दोन प्रहरचा समय होता. इच्या स्वरूपाचा देखणेपणा पाहून हा अगदीं चकित होऊन गेला. पण इच्याबद्दल याच्याकडे जी शिफारस आली तिचा उगम कोठून आहे हें लक्ष्यांत आल्यामुळें, याला इची फारशी किंमत वाटली नाहीं. ही सद्गुणाच्या पूर्णतेची अगदीं मूस असली, किंवा स्त्रियांच्या भ्रष्टपणाची हुबेहुब मूर्ति असली तरी त्याची याला फारच थोडी चौकशी असे. फक्त आपल्या धंद्यापुरता याला इच्याशीं संबंध ठेवावयाचा होता, त्याप्रमाणें यानें इच्याशीं बोलणें लावलें, व इनेंही तें ऐकून घेऊन चाकरीस राहाण्याचें पतकरलें.

याप्रमाणें इनें कोणाला आपल्या तोंडाचा ठसा देऊन, कोणाला शरिराचा सारखेपणा देऊन, कोणाला शरिराचा अर्धा भाग देऊन, कोणाला आपलें सर्व शरीर व पावित्र्य देऊन शेवटीं एकाला आपली अवशेष राहिलेली निद्राही देऊन टाकली. असो.

या देवऋष्याच्या देखरेखीखालीं, आपल्या धंद्याचें शिक्षण घेण्यांत व त्याचा अभ्यास करण्यांतच इचे बरेच दिवस गेले. जात्याच ही कुशाग्रबुद्धीची असल्या कारणानें, हें काम तिला अगदीं सुलभ वाटलें. शेवटीं कांहीं दिवसांनीं या कामांत इचा प्रवेश झाल्याबरोबर आपल्या मोहनी* विद्येचा प्रभाव, कांहीं

---

* या विद्येला इंग्रजींत "मेस्मेरिझम्" ( Mesmerism ) म्हणतात. ज्या मनुष्याला ही विद्या प्राप्त झाली असेल, त्याला इचा प्रयोग दुसऱ्यावर करून आपला पाहिजे तो उपयोग करून घेतां येतो असें म्हणतात. हा प्रयोग दुसऱ्यावर करण्याची तऱ्हा

( पुढें चालू. )

(६०)

मित्र मंडळीला खाजगी रीतीनें दाखविण्याचा देवऋष्यानें निश्चय करून दिवस ठरवून टाकला.

नेमलेल्या दिवशीं, आठ वाजतां देवऋषीबोवांच्या दिवाणखाना निवडक अशा मंडळींनीं भरून गेला. ही सर्व मंडळी या विद्येवर पूर्ण भरंवसा ठेवणारी होती. कांहीं विशेषच आस्थेवाईक होते. वर्तमानपत्राच्या बातमीदारांना तर येण्याची सक्त मनाई होती. फक्त मोहनीशास्त्राविषयीं आपलें अनुकूल मत दाखविणाऱ्या पत्रांचे दोघे तिघे बातमीदार आले होते.

याप्रमाणें प्रेक्षकसमुदाय जमल्यावर **एलन**ला एका प्रशस्त खुर्चीवर बसण्यास सांगितलें. नंतर तिला मूर्च्छा येण्याकरितां, देवऋष्यानें तिच्यावर हातवारे करण्यास सुरुवात केली. सरासरीं पांच मिनिटांत **एलन**चे डोळे मिटून तिला मूर्च्छा आल्यासारखी दिसली. देवऋषिबोवांनीं मग या शास्त्राच्या सत्यपणाविषयीं कांहीं वेळ व्याख्यान दिलें, व श्रोतेही यांच्या मुखांतून पडणारे शब्दबिंदु मोठ्या उत्सुकतेनें प्राशन करीत होते.

व्याख्यान झाल्यावर या गृहस्थानें आपल्या अद्‌भुत विद्येचे यथाविधि प्रयोग करून दाखविण्याचा विचार केला. या वेळेला प्रेक्षकांची उत्सुकता अगदीं अनावर होऊन, वर्तमानपत्रांचे बातमीदार तर आपल्या पेन्सली सरसावून तयार होऊन बसले.

प्रथमतः त्यानें तिला, या आठवड्यांत माझ्यावर काय प्रसंग येणार ह्मणून विचारलें. त्यावर तिनें, तुमची मावशी मरण पावेल, ती हल्लीं आजारी आहे व तिच्या जवळ दोन डाक्तर आहेत असें तिनें सांगितलें. नंतर त्यानें जमलेल्या मंडळीपैकीं एका गृहस्थाला हाक मारून त्याच्या घराच्या खाणाखुणा तिला विचारण्यास त्याला सांगितलें. त्या खाणाखुणा तिनें सर्व बरोबर सांगितल्यावर

---

( मा० पृ० व० पुढें चालू. )

अशी आहे कीं, कोणा तरी मनुष्याला उताणें निजवून किंवा टेकून बसवून त्याला स्पर्श न होईल अशा रीतीनें, ही विद्या जाणणारा मनुष्य आपल्या दोन्ही हातांचे त्याच्या अंगावर त्याला भूल यावी म्हणून हातवारे करतो. भूल आल्यावर त्या मनुष्यास कायसें भूत, भविष्य, वर्तमान सांगतां येतात; कधीं न पाहिलेल्या स्थळांचें हुबेहुब वर्णन देतां येतें; डोळे झांकून पाहिजे तें वाचतां येतें; व दूरदूरच्या ठिकाणीं काय चाललें आहे तें सांगतां येतें. तात्पर्य, प्रत्यक्ष पाहून ज्या ज्या गोष्टी समजून घेतां येतात, त्या सर्व गोष्टींचें ज्ञान या विद्येनें तत्काल करून घेतां येतें असें म्हणतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय - ठाणे.



श्रीराम जयराम जय जय राम .

दुसऱ्यानें तिच्याकडून डोक्याकडे धरलेल्या पुस्तकांतून एक कविता चालविली. ती कविता अशी:—

**वसंततिलका.**

झाला प्रभात रविसूत[1] नभांत ठेला । तेणें अपूर्व वरि पूर्व दिशा प्रभेला ॥
भीती तदां धरुनिया निज मानसांत । तो अंधकार लपला गिरिगव्हरांत ॥ १ ॥
वृक्षांवरी मधुर गीत विहंग गाती । अज्ञानही असुनि ईश्वर आळवीती ॥
पानें फुलें दिसाती उज्वल सर्व रानीं । सूर्यास आदारीती कीं स्मित आननांनीं ॥२॥
क्षुद्बोध जो शमवि सात्विक शुद्ध अन्नें । जो नित्य शांतवि तृषा विमलोदकानें[2] ॥
उद्यानीं जो करि विहार सदा मुदानें[3] । तो कां सकाळिं न उठे मग शांततेनें ॥३॥
झाला प्रबुद्ध[4] नर आदिम सुप्रभातीं । पाही प्रिया शयनिं निद्रित फारशी ती ॥
आरक्त गाल कचही[5] कुरळे विकीर्ण । देखोनि तद्हृदय हो शतधा विदीर्ण ॥ ४ ॥
बाजूस होउनि तिला निरखी स्वनेत्रीं । उन्निद्र[6] निद्रित असो परि चारुगात्री ॥
वाटे कवीस जणु लोचन भाजनानें । त्रीची, पितो दवित, रूपसुधा-सुखानें ॥५॥
प्रेमें तिच्या मृदुकरा कवळोनि हातीं । आनंद फार धरि मानव आत्म चित्तीं ॥
गंभीर गोड वचनां वदुनी विलासी । जागी करी हळुच तत्क्षणिं कामिनीसी ॥६॥

याप्रमाणें एका पाठीमागून एक आश्चर्यकारक प्रयोग पाहून प्रेक्षकांनीं त्याची फार वाहवा केली. इतक्यांत एका चाकरानें येऊन देवऋष्याच्या नांवचें एक पत्र त्याच्या स्वाधीन केलें. तें पत्र घेऊन तो फाडणार तोंच एक कल्पना सुचून तो ह्मणाला:—" सभ्य गृहस्थ हो, हें पत्र आल्यानें या विद्येसंबंधाचा खरेपणा सिद्ध करण्याचा आणखी एक प्रसंग आला आहे. करितां हें पत्र इच्याकडून वाचवितों." असें ह्मणून त्यानें तें पत्र एलनच्या तोंडापासून कांहीं अंतरावर धरलें, व त्यांतील मजकूर तिला वाचण्यास सांगितला.

" तुमची मावशी आज चार दिवस आजारी आहे व तिच्या व्यवस्थेला दोन हुशार डाक्तर ठेवले आहेत, तर तुम्ही सवड पाहून तिला भेटून जाण्याचें करावें " असा त्या पत्रांतला मजकूर तिनें वाचला.

" अरे रे ! इच्याच मरणाचें भविष्य आतां इनें सांगितलें तें. " असें ह्मणून यानें तें पत्र उघडलें व शेजारच्या गृहस्थास दाखविलें. त्यानें तें लक्षपूर्वक वाचून जमलेल्या मंडळीस " हें शब्दशः हिनें सांगितल्याप्रमाणें आहे " असें सांगितलें.

---

१ अरुण. २ निर्मळ. ३ आनंदानें. ४ जागा. ५ केश. ६ जागी.

ही वार्ता ऐकून, या जमलेल्या प्रेक्षकांच्या आनंदभरावर ढग आल्यासारखें झालें, ह्मणून त्यांनीं थोडक्यांत या विद्येचे अद्भुत प्रयोग दाखविल्याबद्दल बोवाचे आभार मानून पाहिलेल्या चमत्कारांबद्दल आश्चर्य करीत त्याचा निरोप घेतला. सर्व मंडळी गेल्यावर हा गृहस्थ **एलन**कडे आला व तिला आपल्या हातानें उठवून मोठ्या आनंदानें तिला ह्मणाला, " बाई आतां ऊठ. तूं आपलें काम फारच चांगलें बजावलेंस. आतां माझें दैव उघडलें यांत संशय नाहीं. या कुत्र्यांपुढें कांहीं टाकलें तरी ते खातात अशी माझी खात्री झाली."

**एलन** एकाच स्थितींत सुमारें तासभर असल्या कारणानें तिच्या सर्व अवयवांना बांध आले होते. ह्मणून तिनें खुर्चीवरून उठून हातपाय मोकळे केल्यावर तिला समाधान वाटलें. एक मद्याचा पेला घेतल्यावर ती मग पाहिल्यासारखी हुशार झाली. तेव्हां तो तिला फिरून ह्मणाला: "तूं आपलें काम फारच चांगलें केलेंस पाहिल्याच वेळेस इतकें काम तुझ्याकडून होईल असें मला वाटलें नव्हतें. तुझी स्मरणशक्ति चांगली आहे, व या कामांत हीच अवश्य आहे. थोड्या दिवसांनीं मी आपल्या मित्रमंडळीला असें कळवीन कीं, माझी मावशी वारल्याचें पत्र मला आलें आहे. पुढच्या खेपेला आपण, भिंतीपलीकडच्या खोलींत काय चाललें आहे तें सांगण्याचा प्रयोग करून दाखवूं ; व मी त्या खोलींत काय करीन हें अगोदरच ठरवून ठेवीन, ह्मणजे तें काम अवघड जाणार नाहीं."

"पण महाराज, समजा कीं, ज्याच्या घराचें वर्णन तुम्हीं मला सांगितलें नाहीं, अशा एखाद्या मनुष्यानें जर मला कांहीं विचारलें तर मीं काय करावें?" **एलन**नें विचारलें.

" त्या वेळेला कांहीं उत्तर देऊं नये." तो ह्मणाला.

" या योगानें संशय उत्पन्न नाहीं व्हावयाचा का?"

" छे; मुळींच नाहीं. 'प्रश्न करणारा व उत्तर देणारा यांमध्यें आकर्षणशक्तीचे गुणधर्म नाहींत' असें सांगितलें ह्मणजे झालें. अशा प्रसंगांतून पार पडण्याला हीच युक्ति आहे; व ही, एखाद्या परक्या मनुष्यानें पुस्तक वाचायास सांगितलें असतांही उपयोगी पडणार आहे. असो. आतां उशीर झाला. तूं घरीं जाण्याविषयीं उत्सुक झाली असशील. आजचें काम पाहून मला फार आनंद झाला. एवढ्याकरितां माझ्या उदार मनाची खूण ह्मणून ही पांच पाउंडांची नोट घे. तें, कविता व पत्र वाचण्याचें काम तर खरोखरच

फार छान झालें. कोणती विचारी मावशी आजारी असेल ती असो; सध्यां तर तिचें अस्तित्व माझ्या कल्पनासृष्टींत आहे. असो. तूं जा आतां. ''

**एलन** ती नोट घेऊन आपल्या घरीं गेली; व याप्रमाणें, तिच्या या धंद्याचा पूर्वभाग संपला.

---

# भाग ८८.

## नृत्यांगना.

देवऋषिबोवाच्या विद्येचे अद्भुत चमत्कार पाहिल्यापासून लोकांत फार चळवळ उडून राहिली. ज्यांना खाजगी रीतीनें हे चमत्कार पाहण्यास मिळाले होते, त्यांनीं त्यांची चोहोंकडे प्रसिद्धि केली; आणि एखाद्या गोष्टीबद्दल " पराचा कावळा '' होण्याची चालच असल्यामुळें थोड्याच दिवसांत या चमत्काराच्या गोष्टी ह्मणजे लोकांच्या बोलण्यांतील विषय होऊन गेल्या. वर्तमानपत्रांच्या बातमीदारांनींही या प्रयोगाची साद्यंत हकीकत, वर्तमानपत्रांत देण्याकरितां इतक्या सुंदर रीतीनें सजविली कीं, थोड्या वेळांत या देवऋषि बोवाची कीर्ति सर्व आसमंतांत पसरली.

शेवटीं त्यांचें सर्वप्रसिद्ध असें एक व्याख्यान झाल्यावर त्यांची चहा सर्वतो मुखीं झाली. **एलन**ची स्मरणशक्ति चांगली असल्यामुळें तिचा भाग वर्णन करण्यासारखा झाला. देवऋषिबोवांनीं आपल्या स्नेहीमंडळींच्या घराच्या सांगितलेल्या खाणाखुणा, लखोट्यावरून वाचावयाचा पत्रांतील मजकूर, त्याप्रमाणेंच डोक्याकडून वाचावयाच्या पुस्तकांतील कांहीं भाग या सर्व गोष्टी तिनें चांगल्या लक्ष्यांत ठेवल्या होत्या. अशा तऱ्हेची लफंगिरी कधीं दारविण्यांत आली नव्हती ह्मटलें तरी चालेल.मोठे मी मी ह्मणणारे चाणाक्ष देखील या ढोंगी बोवाच्या कृतीनें फसले; व याची मात्र यथास्थित तुंबडी भरली. परंतु शेवट हा सगळ्या गोष्टींला आहे. मग या नियमाला ढोंग्याच्या लबाडीचाच तेवढा अपवाद कसा असेल? असो.

एके दिवशीं या मोहनीविद्येचे प्रयोग चालले असतांना व **एलन** आपल्या समाधिस्थितींत असतांना, देवऋषिबोवाच्या एका स्नेह्यानें आपल्या दिवाणखान्याच्या खाणाखुणा तिला विचारण्यास आरंभ केला. **एलन**नेंही विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याची बरीच मजल मारली. परंतु शेवटीं तदगीळ गृहस्थानें

पुढील प्रश्न घातला:—" ज्या खोलीचें तूं वर्णन सांगत आहेस त्या खोलींत, पेंढा भरून ठेवलेलें घुबड कोठें आहे बरें ? " वास्तविक या प्रश्नांत हंसू येण्यासारखें कांहीं नव्हतें; परंतु **एलन** जो भाग करून दाखवीत होती, त्याच्या पोरगळपणाशीं व या वेळेला तिच्या मनांत ज्या चमत्कारिक कल्पनांची मालिका लागली होती त्यांशीं जेव्हां या प्रश्नांची सांगड जुळली, तेव्हां हा प्रश्न खरोखरींच इतका हास्यास्पद वाटूं लागला कीं, तिचें गांभीर्य एकदम नाहींसें होऊन तिला हासण्याचा अनिवार झटका आला—तिचे डोळे उघडले—तिची समाधि एका क्षणांत नाहींशी झाली—तिची निश्चल स्थिति लोपून गेली—व मोहनीशास्त्रानें सांगितलेले सर्व नियम तिनें झुगारून देऊन ती चांगली सावध झाली.

असा प्रकार झाल्याबरोबर, प्रेक्षक मंडळींत एकच कल्होळ माजला. कोणी दांत विचकतो आहे, कोणी खो खो हंसतो आहे, कोणी सूर काढतो आहे; असा चमत्कार पाहून देवऋषिबोवा अगदीं चकित होऊन गेले. परंतु तो प्रसंगावधानी मनुष्य असल्यामुळें, " हा मोहनशास्त्राचा एक विलक्षण प्रकार आहे, तो **एलन**कडून घडून आला. हा प्रकार जरी कधींच दृष्टोत्पत्तीस आला नव्हता, तरी तो केव्हां तरी बाहेर पडेल हें मी जाणून होतों." असें त्यानें वेळ मारून नेण्याकरितां सांगितलें. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. प्रेक्षकांचा जो हास्यरस खवळला, त्यांत, त्यांच्या मनावर पूर्वी या शास्त्राबद्दल झालेला अनुकूळ संस्कार वाहून जाऊन त्याचें सर्व सौंदर्य नाहींसें झालें; व शेवटीं ज्यावर इतके दिवस देवऋषिबोवाचें चांगलें पिकलें होतें तो भ्रमाचा भोपळा एकदम फुटला. त्यांचे अगदीं मित्र ह्मणविणारे ते सुद्धां एकमेकांकडे साशंक दृष्टीनें पाहूं लागले. देवऋषिबोवाचें तोंड अगदीं उतरून गेलें; जिकडे तिकडे गोंधळ माजला; प्रेक्षक लोक आपल्या जागा सोडून वोळका घालून जमूं लागले; व या झालेल्या प्रकाराबद्दल उघडपणें चर्चा सुरू झाली.

**एलननें** हा गोंधळ झालेला पाहून आपणास निघून जाण्यास ही संधि बरी आहे असें समजून तेथून हळूंच पळ काढला.

फिरून तिला धंदा नाहींसा झाला, तेव्हां आणखी एकवार त्या थेरडकिडे जाण्याचा तिनें विचार केला.

पुढें थोड्या दिवसांनीं ही त्या ह्मातारीकडे आली. या वेळेला सगसरीं तीन वाजले होते. ती खलड थेरडी, **एलन**कडून मिळविलेल्या पैशावर आ-

णलेलें कांहीं कापड शिवीत बसली होती. तिची मुद्रा या वेळेला प्रसन्न असून, ही प्रसन्नता त्या विरूप चेहऱ्याला झेपेल इतक्याच बेताची होती. ती इतकी खल्लड झाली होती तरी तिला फिरून डामडौल करावासा वाटूं लागला होता! आढ्यता ही जीविताच्या अस्तित्वाबरोबरच फक्त संपत असते ह्मणायची.

" कां मुली, फिरून तूं माझ्याकडे कां आलीस? पण तुझी चाकरी तर कायम आहेना? " तिनें विचारलें.

. " ती माझी चाकरी निघाली, आणि फिरून मी तिच्या शोधांत आहें. " एलननें सांगितलें.

" जोंपर्यंत तुझ्या स्वरूपाचा, तुझ्या गुणाचा, तुझ्या विद्येचा तूं उपयोग करणार नाहींस, तोंपर्यंत तूं अशीच शोध करीत फिरशील. " ह्मातारी ह्मणाली.

" मी कसा उपयोग करावा, हें सांगाल कीं नाहीं? "

" आग, तुला काय कमी आहे ? नुसता तूं शब्द टाकशील तर, तुला रहायाला सुंदर घर, बसायला गाडी, सेवेला चाकरमाणसें, पाहिजे तितका पैसा, उंचीं उंचीं वस्त्रें, अलंकार हे तुला मिळण्याजोगे आहेत."

" पण मला इतक्याची जरूरच नाहीं. माझ्या पोटापुरतें मला मिळालें ह्मणजे मला संतोष आहे. " एलन किंचित् हंसून ह्मणाली.

"हें तुझें सौंदर्य चांगल्या कामीं लागावें असें तुला कसें वाटत नाहीं? या तुझ्या मृदु आणि तुळतुळीत केसांना मोत्यांनीं किती शोभा येईल बरें ? त्याप्रमाणें तुझ्या या गोंडस हातांना सुवर्णवेष्टणांनीं तरी किती शोभा येईल ? हे तुझे कोंवळे कान कर्णभूषणांनीं किती सुंदर दिसतील ? रेशमी वस्त्रांनीं हें तुझें सर्व शरीर किती सुशोभित दिसेल? या तुझ्या शुभ्र कांतीपुढें कोणत्या सुंदर वस्तूचें तेज फिक्कें पडणार नाहीं ? अरेरे ! एलन, तूं आपल्या हातानें आपल्या स्वरूपाची माती करून घेत आहेस बर—माती करून घेत आहेस. "

" बाई, मला बाप आहे हें तुह्मी विसरलां वाटतें? त्याची माझ्यावर अतिशय ममता आहे व माझीही त्याच्यावर तशीच आहे. त्याच्या मुलीचें वाकडें पाऊल पडलें असें जर त्याच्या कानावर गेलें तर तत्क्षणीं त्याचे प्राण जातील. " एलन ह्मणाली.

" इतके सहजासहजीं बाप कांहीं मरत नाहींत. इतराप्रमाणेंच त्यांच्याही

अगत्यणीं प्रत्येक गोष्ट पडत जाते. शिवाय, त्याला जें तुझ्यामुळें वैभवसुख प्राप्त होईल त्याचा विचार कर. "

" त्याविषयीं आतां एक शब्द नको. मी तुमच्या बोलण्याचा सर्व झोंक समजतें. जो सद्गुण माझ्या अंगीं नाहीं त्याबद्दल नसता नखरा व नसतें ढोंग दाखविणारी बायको मी नाहीं. माझ्या हिताहिताचा विचार मला पाहिला पाहिजे. तुमचें सांगणें माझ्या सुखाच्या विचाराला कांहीं पटत नाहीं. तुम्हांला दुसरी कोठें जागा आढळते कां नाहीं एवढें सांगा म्हणजे झालें. " **एलन** धिटाईनें म्हणाली.

" नाटकाच्या धंद्यांत पाहिजे तर तुला मी गुंतवीन ; पण तो धंदा तुला अवडणार नाहीं. "

" नाटकांत ! तें काय काम करायचें ? "

" नाचायचें, दुसरें काय ? "

" आणि मला कोणीं ओळखलें तर ? " **एलननें** विचारलें.

" छे, त्याचा मुळींच संभव नाहीं. परीसारखा पोषाख करून, तोंडाला रंग लावल्यावर दिव्याच्या प्रकाशांत तूं अगदीं निराळी दिसशील. अहाहा ! मला असें वाटतें कीं, हजारो लोकांच्या आनंदाचा मध्यबिंदु व स्त्रियांचा उन्माद शांत करणारा प्रत्येक विकार, त्याप्रमाणेंच लोभ व मत्सर उत्पन्न करणारी वस्तु, अशी जी तूं, त्या तुला या वेळेला मी रंगभूमीवरच पहात आहे.

हें भाषण ऐकून **एलन** विचारांत अगदीं गढून गेली. ह्मातारीचें सांगणें तिला बरेंसें वाटलें. तिला आपल्या सौंदर्याचा डौल होताच, त्यामुळें तिच्यापुढें हें जें चित्र उठवून दिलें, याचा ती आनंदानें विचार करूं लागली ; व यांत आपल्याला यश मिळेल, आपली वाहवा होईल, आपल्यावर पुष्पवृष्टि होईल, असें तिला वाटूं लागून, हळूं हळूं तिची हास्यमुद्रा दिसूं लागली.

" मी तुमचें म्हणणें कबूल करतें. पण– "

" मग कांकूं करतेस ? "

" माझें म्हणणें असें कीं, ओळख घालून दिलेली बरी. "

" एका नाटकमंडळींत एका स्त्रीची जरूर आहे एवढें मला माहीत आहे. तूं जाऊन शोध कर म्हणजे झालें. "

" पण मला रंगभूमीवर नाचण्याची कला ठाऊक नाहीं. "

" ती तुला लौकर येईल. तुझें सौंदर्यच तुझ्या पुष्कळ उपयोगी पडेल. "

" बर तर, तुमच्या या उपदेशाबद्दल तुह्माला काय देऊं ? " असें ह्मणून **एलन**नें पिशवी बाहेर काढली.

जेव्हां एकादा बेलीफ घरांत जप्ती आणतो, तेव्हां तो अगोदर, आपला खर्च निघण्यापुरती तरी मालमत्ता घरांत आहे कीं नाहीं, ह्मणून सर्व घरभर नजर फेकून खातरी करून घेत असतो ; किंवा जेव्हां एखादा ऋणको आपल्या सावकाराच्या येथें आणखी कांहीं मुदत मागण्याकरितां जातो, तेव्हां सावकार त्याच्या मुद्रेवरून, त्याच्यावर विश्वास ठेवावा कीं नाहीं ह्मणून त्याच्याकडे कांहीं वेळ न्याहाळीत बसतो ; त्याप्रमाणेंच या वेळेला ह्मातारीनेंही **एलन**च्या पिशवींतल्या मगदुराप्रमाणें मागणें करावें ह्मणून तिच्या पिशवीकडे एकवार बारीक नजर केली. परंतु **एलन**ला मात्र ती आपल्या कामांत अगदीं गढून गेली आहे अशी दिसत होती.

शेवटीं ती ह्मणाली: " सध्यां मला तूं दोन गिनी दे व पुढें तुझें काम चांगलें झालें, ह्मणजे महिन्याच्या आंत आणखी तीन पाठवून दे, ह्मणजे झालें."

**एलन**नें, सांगितल्याप्रमाणें पैसे देऊन, आतां या थेरडीचें पुन्हां तोंड पाहण्याची जरूर लागणार नाहीं या आशेनें तिचें घर सोडलें.

दुसरे दिवशीं **एलन** ज्या ठिकाणीं इची जरूर होती, अशा एका नाटकगृहांत आली.

नाटककाराच्या समोर ती येऊन उभी राहिल्याबरोबर त्यानें मोठ्या शिष्टपणानें तिची विचारपूस केली, व तिच्या बोलण्याचालण्याची ढब पाहून तो फार खूष होऊन गेला. तो ह्मणाला:—" नृत्यें दोन प्रकारचीं आहेत. रंगभूमीवरचें एक, व समारंभाच्या वेळचें एक. हे दोन्ही प्रकार तुला कांहीं दिवस शिकले पाहिजेत व हें शिकणें तुझ्या हुशारीवर व श्रमावर अवलंबून आहे. कांहीं स्त्रिया एका महिन्यांत तयार होतात, कांहींना एकेक वर्ष लागतें; व कांहीं तर कधींच तयार होत नाहींत. कांहीं कांहीं नृत्यांगना बाळपणापासूनच या धंद्यांत वाढलेल्या असतात. मग तुलाही हें काम लवकर कशावरून नाहीं येणार? "

" माझ्याकडून मी जिवापाड श्रम करीन. " **एलन** ह्मणाली.

" बर. घरीं तुझी स्थिति कशी काय आहे ? हा प्रश्न विचारण्याचा माझा उद्देश इतकाच आहे कीं, येथें जोंपर्यंत तूं काम शिकणार, तोंपर्यंत घरीं तुझी खाण्यापिण्याची स्वस्थता आहे कीं नाहीं हें समजावें."

" सध्यां माझ्या पोटाची स्वस्थता आहे. " **एलन**नें सांगितलें.

" मग ठीक आहे. मला तुझ्या घरांतल्या गोष्टी समजून घेण्याची बिलकूल इच्छा नाहीं. हा धंदा पतकरण्याचें कारण काय हें तुझें तुला माहीत. आमच्या कामाकरितां तुझ्यासारख्या स्त्रिया जमविण्याचा माझा धंदाच आहे. मी कांहीं तुझी स्तुति करीत नाहीं, पण तुला मी सांगतों कीं, तूं जर चांगली तयार झालीस तर माझ्या तूं चांगली उपयोगी पडशील."

या मुलाखतीपासून दोघांनाही परस्पर समाधान झालें. आपल्या धंद्याला एक देखणी, बांधेसूत व चांगली स्त्री मिळाली ह्मणून त्याला आनंद झाला; व हा धंदा पतकरून दुसऱ्याच्या मोहोबतीशिवाय आपल्याला आतां स्वतंत्र राहतां येईल या आशेवर **एलन**ला आनंद झाला.

**एलन**चें लक्ष्य या कामांत इतकें कांहीं गढलें होतें—तिचे श्रम इतके कांहीं अविश्रांत होते—तिची धारणाशक्ति इतकी कांहीं तीव्र होती—व तिचा सर्व विघ्नें टाळून जाण्याचा निश्चय इतका कांहीं दृढ होता कीं, दोन महिन्यांच्या अवधींत ती उत्तम नाचणारीण झाली. तो नाटककारही इची हुशारी पाहून चकित होऊन गेला; व ही पुढें आपल्या कसबांत चांगलें नांव मिळवील असें त्यानें ह्मणून सोडलें.

नाटकांतील बहुतेक मंडळीनीं आपल्या सोयीप्रमाणें आपलीं निरनिराळीं नांवें ठेविलीं होतीं.

त्यामुळें नाटकवाल्याच्या सांगण्यावरून तिनेंही आपलें नांव **सेलिना** असें ठेविलें. तरी आपण तिचें पहिलेंच नांव चालवूं.

या मंडळींत शिरल्यावर तिला आपण एखाद्या नव्या जगांत आलों कीं काय असें वाटलें. या मंडळींत जिकडे तिकडे अहंपणा वाढला होता. एखाद्याला जर या नाटकवाल्यांचें बोलणें ऐकण्याचा प्रसंग आला तर त्याला असें वाटावें कीं, लोकांवर मेहेरबानी करण्याकरितांच कोण्या बादशहाचे लेंक वेष पालटून नाटकांत राहिले आहेत कीं काय कोण जाणें. हे लोक आपल्याला मोठ्या कुलांतले समजत असत. जर एखाद्यानें आश्चर्य करून विचारलें कीं, एवढे हे श्रीमंत लोक असून नाटकांत कसे शिरले? तर त्यांचें एक ठरीव उत्तर असे. " आह्मी ना? फक्त चैनीकरितां नाटकांत शिरलों आहोंत, व त्याकरितां आमचीं मोठमोठीं भांडणें झालीं आहेत. घोड्याची गाडी ठेवूं ह्मटलें तरी आमच्या अंगांत धमक आहे; पण नाटकांत जन्म घालवायचा असा आमचा कृतनिश्चय आहे."

त्या नाटकमंडळीच्या अंगीं कितीही दुर्गुण असले तरी ती मंडळी एलनला सुस्वभावाची, एकमेकांला उपयोगी पडण्याविषयीं तत्पर, व उदार आणि परस्परांचा अपराध पोटांत घालणारी अशी वाटली. रिकामपणीं ती मंडळी गप्पाष्टकें सांगून करमणूक करीत असे. त्या मंडळींत कांहींजण हुशार असत, व एखाद्या नव्या नाटकावर किंवा ग्रंथावर मार्मिकपणानें आपलें मत देण्याची त्यांच्या अंगीं शक्ति असे. असो.

रंगभूमीवर **एलन**चा प्रथम प्रवेश ज्या दिवशीं व्हावयाचा होता तो दिवस येऊन ठेपला. त्या दिवशीं नाटकगृह अगदीं भरून गेलें होतें; व **एलन**चें नृत्य होण्यापूर्वीचे भाग चांगले होऊन गेले असल्यामुळें, प्रेक्षकसमुदाय सुप्रसन्न झाला होता. **एलन**ही हर्षभरीत असून निर्धास्त होती. बाहेर प्रवेश करण्यापूर्वी तिनें एकवार आरशांत पाहिलें, तों तिच्या अधरोष्ठावर स्मित हास्य खेळत असून, तिच्या नेत्रांचें तेज सांडत होतें.

ती बाहेर आल्याबरोबर तिला पाहूनच प्रेक्षकांचीं मनें गार होऊन गेलीं; व तिच्या नाचण्याचें कौशल्य पाहिल्यावर त्यांच्या आनंदाला पारावार नाहींसा झाला. शेवटीं तिचें काम संपल्यावर तिला प्रेक्षक जनांनीं पडद्याबाहेर बोलावून आणली. ती पुढें येऊन उभी राहिल्यावर चोंहोंकडून तिच्यावर पुष्पवृष्टि झाली—स्त्रीसमुदायाकडून रुमाल उडूं लागले—व प्रत्येकाच्या तोंडून " शाबास—शाबास " असा शब्द निघूं लागला. याप्रमाणें तिची आशा सफळ होऊन या धंद्यांत तिनें पूर्ण जय मिळविला.

---

# भाग ८९.

## चमत्कारिक पत्र.

येथून **एलनच्या** उद्योगास सुरुवात झाली. तिच्या बापाचा तिच्यावर इतका कांहीं विश्वास असे कीं, तिनें कांहीं सांगितलें तरी त्याचें तेव्हांच समाधान होत असे; त्यामुळें तिला जें फार वेळ घर सोडून बाहेर रहावें लागत असे त्याबद्दल कारण सांगण्याचें अगदीं सोपें पडत असे. **मार्खम**चा सर्व वेळ अभ्यासांत जात असल्यामुळें, तो जेवण्याची वेळ खेरीज करून आपल्या खोलींतून बाहेरच पडत नसे; त्यामुळें **एलन**च्या संबंधानें चौकशी करण्याचा त्यास प्रसंग येत नसे.

**एलन**ला मोठा पगार मिळत असे. परंतु त्याबद्दल आपल्या बापाला किंवा अन्नदात्याला कांहीं संशय येऊं नये ह्मणून त्याची व्यवस्था करण्याकरितां तिला थोडी लबाडी करावी लागे. प्रत्येक आठवड्याला थोडेसे पैसे ती घरीं नेई, व बाकीचे पैसे ती, नाटकाच्या मालकानें दाखवून दिलेल्या मनुष्याच्या स्वाधीन करी.

नाटक पाहणाऱ्यांपैकीं कांहीं तरुण सरदारांनीं व गृहस्थांनीं ती कोठें राहते हें समजून घेण्याकरितां पुष्कळ प्रयत्न केले. परंतु तिचें राहण्याचें ठिकाण तिच्या नाटकाच्या मालकाखेरीज कोणासच ठाऊक नव्हतें. व त्यानेंही तें गुप्त ठेवलें होतें.

तथापि, **एलन**ला कोणाकडून प्रीतिपत्रें, कोणाकडून स्नेहसंपादनाची इच्छा वगैरे प्रकारचा बराच त्रास पोंचत असे. नाटकवाल्याच्या ओळखीचे गृहस्थ, ज्यांना खेळ चालला असतांना, पडद्यांत फिरण्याची परवानगी असे, त्यांचें सर्व मन आकर्षण करण्याला **एलन** ह्मणजे एक लोहचुंबक असे. त्यांना दुरून जितकी ती सुंदर दिसे तितकीच जवळूनही दिसे; व जरी त्यांच्या पाचकळ भाषणाला ती आनंदानें कान देई, तरी प्रत्यक्ष रीतीनें ती त्यांना मुळींच उत्तेजन देत नसे. सर्वांशीं ती मोकळ्या मनानें वागे, ह्मणून तेवढ्यावरून तिच्याशीं मर्यादा सोडून वागण्याची एकाचीही छाती होत नसे. मोठमोठाल्या देणग्या तिच्याकडे अतिशय सभ्यपणानें याव्यात; परंतु तिनें त्या तोंडी विचारलेल्या असतील, तेव्हां निक्षून नको ह्मणून सांगाव्यात; व जेव्हां लेखी विचारलेल्या असतील, तेव्हां त्यांचें उत्तर पाठवूं नये.

**एलन** होती कोठें व आली कोठून हें कोणालाच ठाऊक नव्हतें. हें तिच्या संबंधाचें गूढ तिची मोहकता वाढविण्यास विशेष कारण झालें. फक्त नाटकाच्याच वेळेला कायती ती दृष्टीस पडे. शिवाय, आचरणाची शुद्ध असून, तिनें मोठमोठ्या लोकांच्या मागण्या परतविल्या, ही वार्ताही लोकांत पसरली होती. या तिच्या स्वाभाविक गुणांशीं, लोकांस मोह पाडणाऱ्या सौंदर्य, हावभावादि बाह्य गुणांचें सम्मेलन झाल्याबरोबर तिची लोकप्रियता फारच वाढली.

जरी तिचा सर्व वेळ गुंतला गेला असे, तरी मधून मधून डाक्टराच्या घरीं जाऊन ती आपल्या मुलाचा समाचार घेई. तो मुलगा आतां चांगला वाढत चालला होता, व तिलाही त्याविषयीं वत्सलता भासूं लागली होती. असो.

एके दिवशीं, **एलन**चा रंगभूमीवर प्रवेश होण्यापूर्वी, तिला मालकानें येऊन

सांगितलें कीं, "एक गृहस्थ तुझ्याशीं एकांतांत बोलण्याची इच्छा करीत आहे."

हें ऐकल्याबरोबर ज्या खोलींत तो गृहस्थ होता तिकडे ती गेली. तों **ग्रीनवूड** तिच्या दृष्टीस पडला.

"तर मग माझा तर्क चुकला नाहीं." आपलें नेहमींचें हसरें तोंड करून तो ह्मणाला. "काल रात्रीं तुला मीं प्रथम रंगभूमीवर पाहिलें, त्याच वेळेला मला वाटलें कीं, तूंच ती असावीस. पण **एलन**, हें कसें काय झालें?"

"माझा अन्नदाता **रिचर्ड मार्खम**" या नांवावर एक प्रकारचा जोर देऊन ती बोलली: "हा कांहीं आतां श्रीमंत नाहीं; व तो कां श्रीमंत नाहीं हें तुह्मांला माहीतच आहे. माझा बाप सर्वस्वीं बुडाला, व तो कसा बुडाला हेंही तुह्मांला माहीत आहेच; आणि मी कशीही असलें तरी मला दुसऱ्याच्या जिवावर स्वस्थ बसून खाण्याचें आवडेना, ह्मणून हें असें झालें."

"पण तूं मला कां कळविलें नाहींस? ह्मणजे मीं तुझी सर्व काळजी दूर केली असती."

"छे, मी तर तुमच्यावर प्राण गेला तरी अवलंबून रहावयाची नाहीं. माझ्या—नव्हे आपल्या—पोराकरितां मी तुमच्यावर शब्द टाकला, व तो तुह्मीं ऐकला हेच माझ्यावर पुष्कळ उपकार झाले आहेत. माझ्यावर तुमचें खरें अंतःकरण आहे असें ज्या योगानें मला समजलें असतें, असा एकच मार्ग होता; परंतु तो तुह्मांला पसंत पडला नाहीं. मी तुमच्यापुढें गुडघे टेकून, डोळ्यांत पाणी आणून, तुमच्या विनवण्या करून एक भिक्षा मागितली, पण तुह्मीं ती घातली नाहीं:—तुमच्या मुलाला चार लोकांत तुमचा असें म्हणतां येईल अशी गोष्ट करण्याविषयीं मी तुमच्या पायधरण्या केल्या—जिच्या बापाला तुह्मी सर्वस्वीं बुडवलें व जी स्वतः तुमच्या कामवासनेला कांहीं विलक्षण प्रसंगानें बळी पडली, तिची अब्रू राखण्याबद्दल तुमची मीं प्रार्थना केली; परंतु तुह्मीं कांहीं ऐकलें नाहीं. असो; मर्जी तुमची! यापेक्षां तुमच्याकडून मला काय मिळणार आहे? तुमच्याप्रमाणें मलाही थोडा बहुत अभिमान आहे. मी तरी काय ह्मणून स्वस्थ बसून राहूं? ह्मणून मीं हा धंदा पतकरला, व त्यांत माझ्या श्रमांची सार्थकताही झाली."

हें तिचें भाषण ऐकून **ग्रीनवूड** अगदीं खजील होऊन विचारतो:"**एलन**, हल्लीं तूं या धंद्यांत आहेस हें तुझ्या बापाला आणि **रिचर्ड**ला ठाऊक आहे का?"

" छे. छे;" कांहीं वेळ विचार करून, "तरी, मी भलेपणानें राहून पोटाला मिळविनें याबद्दल मला लाज वाटायाला नको."

" आणखी एक विचारणें आहे **एलन**, मुलाची व्यवस्था ठीक आहेना ?"

" हो, त्याची व्यवस्था चांगली आहे." वरील प्रश्नाचें हें उत्तर देतांना तिच्या अंतःकरणांत, ज्यानें तिच्या मुलाविषयीं चौकशी केली त्या **ग्रीनवूड**-संबंधानें प्रेमांकुर उत्पन्न झाले.

**ग्रीनवूड**नें तिची ही वृत्ति तेव्हांच ओळखली, व त्याबरोबर तिचा हात धरून त्यानें तिला आपल्या जवळ घेतली. या वेळच्या तिच्या रेशमी पोषाखानें ती इतकी सुंदर व मनोहर दिसत होती कीं, तिला पाहून **ग्रीनवूड**चा कामाग्नि प्रदीप्त झाला; व तिनें आपल्या जवळ रहावें अशी इच्छा त्याच्या मनांत उत्पन्न झाली.

तिचा हात त्याच्या हातांत तसाच होता. त्यानें तो हळूच दाबला. ती खालीं पाहत विचारांत अगदीं निमग्न असल्यामुळें हा प्रकार तिच्या कांहींच लक्ष्यांत आला नाहीं. परंतु **ग्रीनवूड**नें, तिचें चुंबन घेतल्याबरोबर ती चपापली, व आपला हात त्याच्या हातांतून काढून घेऊन त्याच्याकडे आश्चर्य व क्रोधयुक्त दृष्टीनें पाहूं लागली.

" माझ्या मुलाच्या आईला मी आपल्या प्रेमाची खूण दिली, यांत तुला आश्चर्य कसलें वाटलें **एलन**?" तिला **ग्रीनवूड**नें लाडीगोडीनें विचारलें.

" परंतु त्या आईचा लोकांत दुर्लौकिक व अपमान व्हावा ह्मणून तुह्मीं तिला सोडून दिली आहे !" **एलन** ह्मणाली.

" जें झालें त्याबद्दल आतां बोलून काय उपयोग आहे ?"

" मी सांगितल्याप्रमाणें तुह्मांला आतां, नाहीं ना करतां यायचें ?" हें विचारून, तो काय सांगतो तें ऐकण्याकरितां **एलन** त्याच्याकडे पाहूं लागली.

" **एलन**, हा प्रश्न तूं काय ह्मणून करतेस ? माझी तुझ्यावर प्रीति आहे ह्मणून मी सांगतों त्यावर तुझा विश्वास नाहीं काय ? तुला सुख होण्याकरितां पाहिजे तें करण्यास मी तयार आहें, याबद्दल तुला कांहींच कां वाटत नाहीं ? तूं अशी निष्ठुरतेनें कां बरें माझ्याकडे पाहतेस ? मी बोलतों त्याकडे लक्ष्य दे. येथून कांहीं कोसांवर एक रम्य स्थळ आहे—मृत्युलोकचा स्वर्गच केवळ—त्यांत एक बंगला आहे. भोंवतालीं मजेदार जागा आहे—जेथून सर्व रमणीय देखावा नजरेस पडतो, असें एक स्थळ विकायला आलें आहे. तुझ्या तोंडून शब्द

निघण्याचाच अवकाश, कीं, तें तुझें झालेंच समज. मग मी आपल्या हजार धंद्यांतून मोकळा झालों कीं, तुझ्या सेवेशिवाय दुसरा मला विषय नाहीं."

"माझा व तुमचाच जर त्या रम्य स्थळाशीं संबंध व्हावयाचा असेल तर त्या ठिकाणीं जाण्याला रस्ता, एक धर्मानें माझें पाणिग्रहण केलें, तरच आहे."

"**एलन**, या मूर्ख लोकांच्या तांत्रिक गोष्टींकडे लक्ष्य देऊन आपल्या सुखाची कां माती करतेस?"

"विषयांध झालेले लोक असेंच बोलत असतात बरं! तुमच्या भाषणानें मी तर आतां फसायची नाहींच; पण तुह्मी मात्र विनाकारण या मोहांत पडूं नका. केवळ माझ्या मुलाकरितांच मी तुमची बायको ह्मणून घेईन; परंतु तुमची राखलेली—-रांड-? छे—छे—छे—!"

असें ह्मणून ती तेथून तडक निघाली; आणि थोड्या वेळानें तिचा रंग-भूमीवर प्रवेश झाला. तों तेथें तिनें बहार—बहार करून दिली. असो.

तिची **ग्रीनवूड**बरोबर गांठ पडल्यापासून सुमारें पांच सहा दिवसांनीं **एलन**ला टपालांतून एक पत्र आलें. तें पत्र नाटकगृहाच्या पत्यावर असून, तिच्या दुसऱ्या नांवावर आलें होतें. त्यांतील मजकूर याप्रमाणें होता:—

"तुमचा ज्याला नाद लागला आहे, व आपल्या वेताआड कितीही अडचणी आल्या तरी त्यांतून पार जाण्यास जो समर्थ आहे अशा एका गृहस्थाचा तुह्माला उचलून कोठें तरी दूर ठिकाणीं नेऊन ठेवण्याचा निश्चय झाला आहे. तुह्मी कोठें रहातां हें त्याला माहीत असून तुम्ही नाटकगृहांतून घरीं जातांना तुमच्या घरापासून कांहीं अंतरावर तुम्ही गाडींतून उतरतां हेंही त्याला ठाऊक आहे. तुम्हीं गाडींतून उतरल्यावर तुम्हाला धरण्याचा त्याचा विचार आहे. जर तुमचा कोणा मनुष्यावर संशय असेल तर हें पत्र वाचून सावध रहा. हा मजकूर जर तुमच्याकडून बाहेर पडला तर यापुढें तुम्हावर किंवा दुसऱ्यावर येणारीं संकटें टाळणाऱ्या मनुष्याच्या मदतीला आंचवाल हें लक्ष्यांत ठेवा."

हें पत्र मोकळें, पण चमत्कारिक रीतीनें लिहिलें असून कोणा तरी अनोळखी मनुष्याकडून आलें होतें. पत्र वाचून **एलन**ला किती चमत्कार वाटला असेल याची कल्पना वाचक करतीलच. तथापि पत्रांत लिहिलेला मनुष्य **ग्रीनवूड** असावा अशी तेव्हांच तिच्या मनाची खात्री झाली. कारण, तिच्या मालकाशिवाय **ग्रीनवूड**लाच फक्त तिचें घर माहीत होतें. मालकाविषयीं तिच्या मनांत संशय येईना. कारण, तो भला मनुष्य आहे हें तिला ठाऊक होतें.

कदाचित् दुसरा एखादा नादी मनुष्य तिचा पाठलाग करून असेल तर कोण जाणे, असेंही तिच्या मनांत आलें. तरी पण **ग्रीनवूड**विषयींच आपल्याला सावध राहण्यास सांगितलें असावें असें तिच्या मनांत फार येई.

पण गुप्तपणानें तिला जपणारा, हा पत्र पाठविणारा उदार मनुष्य कोण असावा याविषयीं ती विचार करूं लागली; परंतु तिची कांहीं कल्पना चालली नाहीं. शेवटीं पुढें कसें वागावें, हाच अगोदर ती विचार करूं लागली.

तिनें असा विचार केला कीं, आपली गाडी अगदीं घरापर्यंत न्यावी. मग पुढें याबद्दल बापानें विचारलें तर कांहीं सबब सांगतां येईल. **मनरो** व **रिचर्ड** यांचा तिच्या शब्दावर पूर्ण विश्वास होता. नाटकाच्या ठिकाणीं तिला फार वेळ लागे ह्मणून त्यांना तिनें अगोदरच सांगून ठेवलें होतें कीं, मला गाणें शिकविण्याकरितां दोन चार ठिकाणीं जावें लागतें. व तिचें आठव-ड्यांतून तीनच दिवस बाहेर काम लागत असल्यामुळें हा खोटेपणा सहज खपला जात असे. वरील पत्र तिला येऊन पोंचलें त्या दिवशींच तिनें त्यांना सांगितलें कीं, टप्याच्या गाडींतून उतरल्यावर त्या जागेपासून घरापर्यंत एकटें येणें मला प्रशस्त वाटत नाहीं, व आतां मला पैसा चांगला मिळत असल्या कारणानें स्वतःची गाडी करून येण्याचें मला सामर्थ्य आहे; तरी मी आजपा-सून गाडींतून येणार. तिच्या बापाला व **रिचर्ड**लाही हा विचार पसंत पडला.

वाचक अशी शंका घेतील कीं, तिनें खरा प्रकार कां सांगितला नाहीं? व तिनें जो धंदा चालविला होता व ज्यांत तिनें एवढें नांव मिळविलें होतें तें तिनें कां कळविलें नाहीं? तर याचें कारण असें आहे कीं, आपल्या बापाला व **मार्खम**ला हा धंदा केलेला आवडणार नाहीं हें तिला पक्कें ठाऊक होतें. दुसरें कारण असें कीं, एकवार त्यांना जें कारण सांगितलें तेंच शेवटपर्यंत रा-खलें पाहिजे. आणखी शेवटचें कारण असें कीं, तिलाच तो धंदा मनापासून आवडला होता. प्रेक्षकसमुदायाच्या टाळ्यांचा वर्षाव—मालकाचें प्रोत्साहन —रंगाच्या पडद्यांत घुटमळून तिच्या बुद्धीची—तिच्या कामाची—व तिच्या सौं-दर्याची तारीफ करणाऱ्या श्रीमंतांच्या पोरांकडून तिची हांजी हांजी—यांची जी तिला गोडी लागली होती ती लवकर सुटणारी नव्हती.

# भाग १०.

## मार्खमचे उद्योग.

**कौन्ट आल्टरोनीं**ची तुरुंगांतून सुटका होण्याकरितां **मार्खमनें** आपल्या बहुतेक मालमत्तेची वाट लावल्यापासून तो पुस्तकें रचण्याच्या नादीं लागला होता. त्याला ग्रंथकाराची पदवी मिळविण्याची इच्छा उत्पन्न झाली होती व त्याप्रमाणें त्यानें एक दुःखपर्यवसायी नाटक लिहिलेंही होतें.

बहुतेक अर्वाचीन ग्रंथकारांची अशी स्थिति असते कीं, त्यांना ग्रंथकर्तृत्वाचा पुरता श्रीगणेशायनमःही येत नाहीं; परंतु एखादें काव्य किंवा नाटक रचण्याचा त्यांचा प्रयत्न चाललेला असतो, व यद्यपि जुन्या भाषांचें रहस्य त्यांना कांहीं समजलें नसलें तरी काव्य रचण्याच्या अवघड कामाला ते लागत असतात. आणखी एक त्यांच्याकडून प्रमाद होत असतो. तो हा कीं, काव्यांत मोठमोठाले शब्दालंकार असले ह्मणजे तें काव्य उत्तम अशी त्यांची समजूत झालेली असते. ज्याप्रमाणें, मेंढ्यांच्या सुंदर कळपापासून लोकर मिळवण्याची संपली ह्मणजे तिच्या ऐवजीं डुकरांच्या केंसांवर अवलंबून रहावें लागतें, त्याप्रमाणें चांगल्या चांगल्या ग्रंथकारांनीं प्रत्यक्ष प्रमाण आणि सृष्टिसौंदर्य यांपासून कल्पनारूप लोकरीचे धागे आपले बुद्धिपट विणण्याकडे खर्च केले ह्मणजे त्यांच्या मागून होणाऱ्या ग्रंथकारांस, गांवठी नाटकवाल्याप्रमाणें नुसत्या शब्दपांडित्यावरच अवलंबून रहावें लागतें. सध्यांच्या ग्रंथकारांपैकीं पुष्कळांची अशी स्थिति आहे कीं, ते पूर्वींच्या ग्रंथकारांशीं, एखाद्या मनःकल्पित, व अलौकिक गोष्टींत स्पर्धा बाळगावयाची ती सोडून लोंकरीसाठीं डुकरावर कातर धरल्याप्रमाणें वर्तन करतात. यामुळें, त्यांच्या कृतींत शास्त्राचीं विलक्षण तत्वें, कुळकविधानें, अघटित कल्पना, गद्यपद्याचा दांभिकपणा आणि अपक्कपणाची विपुलता यांशिवाय कांहीं सांपडत नाहीं.

**मार्खमही** या दोषांपासून मुक्त नव्हता. त्यानें जें एक दुःखपर्यवसायी नाटक लिहिलें होतें, त्या नाटकरूपी समुद्रांत कांहीं रत्नें होतीं, व कांहीं शुद्ध गारगोट्या होत्या.

ऊस गोड झाला ह्मणून कोणी मुळासुद्धां खात नाहीं; किंवा अति सुंदर पक्वान्नें असलीं तरी त्यांच्याशीं आपल्या अन्नपाण्याबरोबर अक्षय्य व्यवहार करतां येत नाहीं. व तसा जर केला तर तो अहितपरिणामी होतो. **मार्खमनें**

आपल्या पुस्तकांत अलंकारावर अलंकार रचले होते. भाषणांत रूपकाची गर्दी उडवून दिली होती. व दृष्टांताकरितां, हाताशीं अगदीं साधीं व उत्तम साधनें असतां फार लांबचा प्रवास केला होता. असें होतें तरी त्याच्या पुस्तकांत त्याच्या विलक्षण बुद्धिमत्वाचे पुष्कळ दाखले होते. असो.

**मार्खम**नें आपलें नाटक एका चांगल्या नाटककाराकडे पाठविलें. परंतु त्याजवर आपलें खरें नांव घातलें नव्हतें. कारण, त्यानें विचार केला कीं, या नव्या उद्योगांत जर आपल्याला यश मिळालें नाहीं, तर आपली अपकीर्ति **मनरो**, **एलन** व आपली आवडती **इझाबेला** यांच्या कानावर जाऊं नये. ह्मणून त्या पुस्तकासोबत पाठविलेल्या पत्रांत आपला खरा पत्ताही न सांगतां, आपला जो वकील **डायसन** याच्या पत्त्यावर **एडवर्ड प्रेस्टन** असा लिहिला होता.

सरासरी आठ दिवसांनीं **मार्खम**ला नाटकाच्या मालकाकडून पत्र आलें. त्यांत त्यानें असें लिहिलें होतें कीं, " आपलें नाटक वाचून मला फार आनंद झाला. तें नाटक, प्रयोगाच्या उपयोगी पडावें ह्मणून आपण ज्या ज्या योजना केल्या आहेत त्यांच्या चातुर्याबद्दल आपली तारीफ करावी तितकी थोडीच. तरी त्यांत कांहीं भाग कमीजास्ती करण्यासारखे आहेत. आपल्यासारख्या होतकरू ग्रंथकाराला जगासमोर आणण्यांत मला भूषणच आहे." अशा तऱ्हेचें थोडक्यांत पण स्पष्ट पत्र लिहून त्यांत त्यानें **मार्खमला** आपल्या घरीं येण्याची वेळ कळविली होती.

दुसरे दिवशीं **मार्खम** सकाळीं अकरा वाजतां त्या नाटककाराच्या घरीं येऊन धडकला.

हा गृहस्थ आपल्या खोलींत मोठ्या भपक्याचा पोषाख करून बसला होता. हा मध्यम वयाचा असून, प्रतिष्ठित व बोलण्याचालण्यांत घळबळीत होता. शिवाय त्याचें अवलोकनही पुष्कळ होतें.

**मार्खम** आल्यावर त्याला बसावयास खुर्ची वगैरे देऊन तो ह्मणाला, " मीं तुमचें नाटक लक्षपूर्वक वाचून पाहिलें. आलीकडे दुःखपर्यवसायी नाटकावरची लोकांची भक्ति जरी अजीबात उडाली आहे तरी तुमचें नाटक रंगभूमीवर आणावयास मी अगदीं खुषी आहें. पण प्रथमतः आपला ठराव झाला पाहिजे. आपल्या पुस्तकाची आपण काय किंमत सांगतां ? "

" खरें पुसाल तर मला त्या विषयाची कांहीं माहिती नाहीं. तेव्हां तें काम मी तुमच्यावरच सोंपवावें हें बरें. " **मार्खम** ह्मणाला.

" पण तुमची आशा कोठपर्यंत आहे हें तर तुह्माला समजलें असावें ! "

" हा माझा प्रथमच प्रयत्न आहे. तेव्हां असल्या श्रमाची साधारण किंमत सुद्धां मला करतां येत नाहीं. "

तो नाटककार हे शब्द ऐकून मार्खमकडे आश्चर्यानें पाहून ह्मणाला: " हा जर तुमचा प्रथमच प्रयत्न असेल तर तो चांगलाच सिद्धीस गेला यांत शंका नाहीं. बरं तें असो. तुमची किंमत बोला. "

" आपल्या या बोलण्यावरून मला असें वाटतें कीं, जर मी तुमच्यावरच तें काम सोंपविलें तर माझी चूक होणार नाहीं."

आपल्याला मार्खमनें हा मोठेपणा दिलेला पाहून नाटककाराला आनंद वाटून तो ह्मणतो: " ठीक आहे तर मग, जर तुह्मी इतका मोकळेपणा दाखवितां तर मीही तुमच्याशीं तसाच वागेन. तुह्माला हें एक सांगितलें पाहिजे कीं, ज्या ज्या नाटकगृहांत तुमच्या नाटकाचा प्रयोग होईल, तो जर लोकांना आवडला तर त्या प्रयोगाच्या उत्पन्नावर तुमचा कांहीं हक्क असला पाहिजे. शिवाय, तुमच्या पुस्तकाच्या प्रसिद्धीबद्दलही तुह्माला थोडासा फायदा दिला पाहिजे. पहिल्या खेळाबद्दल आपल्याला पन्नास पाऊंड, व पुढच्या प्रत्येक खेळाबद्दल पांच पाऊंड दिल्यावर आपलें कांहीं ह्मणणें नाहीं ना ? "

" हें तर आपलें औदार्य आहे असें मी समजेन. " मार्खमला अतिशय आनंद होऊन तो ह्मणाला.

" देण्याघेण्यासंबंधानें एक निकाल लागला." असें ह्मणून त्या नाटककारानें आपल्या पेटींतून पिशवी काढून तिच्यांतून पन्नास पाऊंड मार्खमपुढें मोजले.

" सरासरी आणखी दोड महिन्यानें वेळ साधल्यास नाटकाची तालीम पाहून जा. ह्मणजे ज्या मंडळीकडे पात्रांची योजना केली जाईल, त्यांना आपले भाग चांगले समजतात कीं नाहीं हें कळेल. "

" त्याबद्दल माझी कांहीं हरकत नाहीं. पण माझा त्या कामांत अनुभव नेताचाच आहे हें आपणाला ठाऊक असेलच. " मार्खम ह्मणाला.

" बरं तर, त्याबद्दल माझा कांहीं आग्रह नाहीं. त्याची सगळी व्यवस्था मीच लावीन. जर मला तुमची जरूरच लागली तर मी तुह्माला कळवीन. माझ्याकडून कांहीं सूचना वगैरे आली नाहीं तर वर्तमानपत्रांतल्या जाहिरातीवरून केव्हां खेळ होणार तो तुह्माला समजेलच. "

आपल्याला आदरानें वागविलें ह्मणून मार्खमनें त्याचा कृतज्ञतापूर्वक निरोप

घेतला. या वेळेस त्याचें अंतःकरण हर्षभरित झालें असून, पुढच्यासंबंधानें त्याच्या मनांतील काळजी सध्यां दूर झाली होती.

वाटेनें तो नजीकच्या एका पथिकाश्रमांत थोडासा उपहार करण्याकरितां गेला. तेथें गेल्यावर उपहार करीत असतां, त्याची नजर एका वर्तमानपत्राव गेली, व त्यांत एक जाहिरात होती तिच्याकडे त्याचें लक्ष्य लागलें.

एका गृहस्थाला, आपल्या अकरा व नऊ वर्षांच्या अशा दोन मुलांना, गणित, इतिहास **ल्याटिन**, वगैरे शिकविण्याकरितां एक शिक्षक पाहिजे होता.; व त्याकरितां त्यानें जाहिरात देऊन ज्या कोणास येणें असेल त्यानें समक्ष येऊन भेटावें असें कळविलें होतें.

आपल्या नाटकाचा प्रयोग रंगभूमीवर होऊन जाईपर्यंत, पुढें ग्रंथलेखनाचें काम चालवावें असें **मार्खन**ला वाटेना. कारण आपली कुशलता लोकांस कितपत आवडते याबद्दल त्याची कांहींच खात्री नव्हती—बरं तोंपर्यंत स्वस्थ बसावें तर तें त्याला मुळींच आवडत नसे. तेव्हां एखाद्या प्रतिष्ठित घराण्यांतली शिक्षकाची नोकरी त्याला बरीशी दिसली. व त्याप्रमाणें त्यानें, लागलींच **ग्रेगरी**च्या घरीं जाण्याचा निश्चय केला.

या ग्रहस्थाचें वय अदमासें पन्नास वर्षांचें असून, याचा चेहरा गंभीर पण उदासवाणा दिसे. याची चालचलणूक ध्यानांत ठेवण्यासारखी असे, व याच्या शब्दांत अशी कांहीं गोडी असे कीं, याच्याशीं बोलतांना उत्तेजन यावें.

**मार्खन** याच्या घरीं आल्यावर त्यानें आपली हकीकत याला थोडक्यांत अशी सांगितली कीं, " माझ्याजवळ पूर्वी बरीच संपत्ति होती ; परंतु माझ्या पालकानें व्यापारांत ती बहुतेक घालविल्यामुळें आतां पोट भरण्याच्या कामीं माझ्या विद्येचा मला उपयोग करण्याचा प्रसंग आला आहे. "

**ग्रेगरी** हा नुकताच आपल्या कुटुंबासहवर्तमान, पुष्कळ लांबून येऊन **लंडन** शहरांत राहिला होता. जेथें पूर्वी हा राहत असे तेथें त्याचें घर, वतनवाडी वगैरे असे; परंतु याची बायको नुकतीच परलोकवासी झाल्यामुळें, त्या टिकाणीं राहणें त्याला गोड वाटेना. ह्मणून आपली जन्मभूमि सोडून **लंडन**मध्यें तो सुखवस्तु येऊन राहिला होता. याचें मंडळींत जाणें येणें अगदीं नसे, व **मार्खन**संबंधाचीही माहिती याला कांहीं नसे. ह्मणून त्याच्यावर खटला झाला व तो तुरुंगांत होता वगैरे गोष्टींविषयीं तो अगदीं अजाण होता. याची एकंदर रीतभात पाहून, **मार्खन**च्या मनांत पुष्कळ वेळां आलें कीं, आ-

घडली सर्व हकीकत यास सांगावी; पण त्यानें आपलें मन आवरून धरलें. कारण त्याला असें वाटलें कीं—एक तर कांहींजणांचा चरितार्थ आपल्यावर अवलंबून आहे—दुसरें, आपणच आपल्या तोंडानें आपल्या अब्रूची शहानिशा करूं नये—व तिसरें आपल्यावर जे दोषारोप लागू केले होते, त्यांसंबंधानें आपलें निरपराधित्व, व आपल्या अंतःकरणांत सदैव जागृत असलेले प्रामाणिकपणाचे विचार, हींच आपला या वेळेच्या मुग्धपणाचा दोष कमी करण्याला पुरींशीं कारणें आहेत.

**ग्रेगरी** हा स्वतः चांगला विद्वान् होता. **मार्खम**ला पाहण्याबरोबर त्याच्या लागलीच लक्ष्यांत आलें कीं, आपल्या मुलांना शिकविण्याला **मार्खम** हा योग्य मनुष्य आहे. **रिचर्ड**नेंही, "माझ्या संबंधानें तुह्मांस कांहीं चौकशी करणें असेल तर माझ्या मुनिमास विचारा," ह्मणून सांगितलें. परंतु **ग्रेगरी**नें "तुह्माला पाहूनच माझी खात्री झाली आहे" म्हणून सांगून, त्याला आपल्या मुलांचा शिक्षक नेमून टाकला.

दुसऱ्या दिवशींच **रिचर्ड** आपल्या नव्या उद्योगाला लागला. सकाळच्या दहा वाजल्यापासून तीन वाजेपर्यंत शिकविण्याची वेळ ठरली होती. ही चाकरी त्याला सुखाची वाटली, व त्याला पगारही चांगला ठरविला होता. त्याचे दोन शिष्येही हुशार व सुस्वरूप मुलगे असून, शिक्षकावर त्यांची भक्ति लौकरच बसली.

**रिचर्ड**ला शिकविण्याचा पूर्वी कधीं सराव नसल्यामुळें, विद्यार्थ्यांच्या मनांत अवघड विषय भरवून देण्याकरितां तो पुष्कळ श्रम घेत असे, व त्यांच्या कोंवळ्या बुद्धीला झेपेल अशा तऱ्हेनें शिकविण्याची पद्धति त्यानें अशी स्वीकारली होती कीं, एक महिन्यांत आपल्या मुलांचें अभ्यासांत पुढें पाऊल पडलेलें पाहून **ग्रेगरी**स फारच आनंद झाला. त्यानें लागलीच आपल्या मुलीलाही त्याच्या शिक्षणाचा फायदा करून देण्याचा निश्चय करून **मेरी—ॲन** इलाही **मार्खम**च्या दोन विद्यार्थ्यांच्या जोडीला आणून बसविली.

**मेरी—ॲन**चें वय या वेळेला सोळा वर्षांचें होतें. शरिरानें नाजूक व स्वभावानें गोड असल्यामुळें ज्यांना ती ठाऊक होती, त्यांना मोह पाडणारी ही एक वस्तुच होती ह्मटलें तरी चालेल. तिचे मृदु व लांबसडक केंस, काळे भोर डोळे, आरक्त ओंठ, यांच्या योगानें, एकाद्या कारागिरानें बनवलेली ही पुतळीच आहे कीं काय, असा इच्या ठिकाणीं भास होत असे. आणि तिच्या आनंद व उल्हास वृत्तीच्या झोंकाबरोबर इकडे तिकडे हेलकावे घेणारें तिचें

फुलाप्रमाणें सूक्ष्म शरीर हें मनुष्यकोटींत न राहणाऱ्या कोणा तरी देवतेचें आहे असें भासे.

तिचें वय जरी सोळा वर्षांचें असे तरी ती आपल्या भावांबरोबर किंवा आपल्या समवयस्क मैत्रिणींबरोबर धिंगाणा घालतांना, ती एखाद्या दहा वर्षांच्या अल्लड पोरीप्रमाणें दिसे. तिला शिकवायचें ह्मणचे मोठें कठीण काम असे. अगदीं शांतपणानें अभ्यास चाललेला असला ह्मणजे त्या अचपळ मुलीनें, एकदम आपल्या खुर्चीवरून उठावें, व आपल्या वाजाच्या पेटीजवळ जाऊन कांहीं तरी वाजवीत सुटावें. मग तें वाजविणेंही अर्धेंच सोडून एखादी गोष्ट सांगण्यास आरंभ करावा, किंवा एखादी थट्टा करून सर्व मंडळींत हशा पिकवावा. अशा वेळेला शिक्षकाचा कितीही गंभीरपणा असला तरी तो नाहींसा होत असे व तिचा बाप जरी त्या प्रसंगाला तेथें असला तरी त्याच्याही मनांत तिच्यावर रागवावें असें येत नसे.

अशा त्या चपळ पण निष्कपट आणि लडिवाळ मुलीसंबंधानें रिचर्डच्या अंतःकरणांत प्रेमांकुर उत्पन्न झाल्यावांचून राहिले नाहींत. जसा एखादा मनुष्य आपल्या मुलीवर किंवा बहिणीवर प्रीति करतो त्याप्रमाणें तिच्यावर त्याचें मन बसलें. व तिचीही त्याच्यावर पूर्ण भक्ति बसली.

ग्रेगरीजवळ बेतापुरती संपत्ति असल्यामुळें तो जरी कांहीं धंदा करीत नसे, तथापि त्याची वेळ, कोठें वाचनालयांत ह्मणा, कोठें सभेंत ह्मणा, अशी बाहेर पुष्कळ जात असे. त्यामुळें रिचर्ड व मेरी यांचा नित्य एके ठिकाणीं सहवास होई, व त्यापासून त्या मुलीच्याही मनाला फार समाधान होत असे.

असें होतां होतां, तिचें त्याच्यावर अतिशय मन बसलें; परंतु तें त्याच्या समजण्यांत आलें नाहीं, व त्याचेंही उलट तिच्यावर गेलें नाहीं.

एके दिवशीं सकाळीं मुलांचा अभ्यास संपण्यापूर्वीच ग्रेगरी, मार्खमकडे आला, आणि त्यास ह्मणाला:" कांहीं दिवस मुलांना सुट्टी असावी, असें माझ्या मनांत आहे. मानसिक उन्नतीला जसें शिक्षण अवश्य आहे त्याप्रमाणें शरीरसंरक्षणाकरितां योग्य विश्रांतीही अवश्यक आहे. तर आपली मर्जी असल्यास महिनाभर त्यांचे अभ्यास बंद ठेवावेत असें माझें ह्मणणें आहे. तरी तेवढ्या वेळांत आपण जितके वेळा येथें याल तितका मला आनंद आहे; तथापि कांहीं असलें तरी प्रत्येक रविवारीं आपल्या पंक्तीचा लाभ नेहमीप्रमाणें आह्मांला झालाच पाहिजे."

" काय ! सबंध महिनाभर मार्खम आतां रोजचे आमच्या येथें येणार नाहींत ? " मेरीनें विचारलें.

"होय जशी तुला विश्रांति पाहिजे तशी त्यांना नको का?" तिचा बाप ह्मणाला.

" ठीक आहे. पण निदान माझ्याकरितां तरी रोज येथें येण्याचे ते श्रम घेतील; आणि माझा मला रोजचा धडा शिकवितील. आणि जर ते येणार नाहींत तर मी पुनः त्यांच्यापाजवळ कधीं शिकायची नाहीं." हट्ट केल्यासारखें करून ती ह्मणाली.

हे शब्द ऐकून तिच्या बापानें आश्चर्ययुक्त दृष्टीनें तिच्याकडे पाहिलें—कदाचित् त्याला तिचे मनोविकार समजले असतील—ते गुप्त नव्हतेच—कारण तिला काय भावना होत होत्या यांविषयीं तीच स्वतः जर अजाण होती तर मग ती गुप्त तें काय ठेवणार ?

जे विकार तिच्या मनांत उत्पन्न झाले होते ते जर तिला समजते तर तिनें ते लागलेच प्रगट करून दाखविले असते. कारण तिला कपट, ढोंग, इत्यादि दुर्गुणांचा वाराही लागला नसून, केवळ सहा वर्षांच्या एखाद्या अर्भकाप्रमाणें तिच्या ठिकाणीं साधेपणा आणि मोकळेपणा भरला होता.

शेवटीं तिचा बाप निक्षून ह्मणाला, " छेः, मार्खमला विश्रांति मिळालीच पाहिजे. या कामांत कोणी हरकत आणूं नये."

" बर आहे तर, मार्खमनें खुशाल विश्रांति घ्यावी. मला ह्मणून त्यांच्या जवळ पुन्हां शिकायचें नाहीं. " हे शब्द बोलतांना तिचे डोळे पाण्यानें भरून आले होते, व कंठ दाटून आला होता. तिचें बोलणें संपल्यावर ती मोठ्या फणकाऱ्यानें दुसऱ्या खोलींत निघून गेली.

मार्खमला हा चमत्कार पाहून फार आश्चर्य वाटलें; तथापि, खरें कारण त्याच्या लक्षांत आलें नाहीं. जातांना रविवारीं भोजनास येण्याचें कबूल करून त्यानें निरोप घेतला. तोंपर्यंत पांच दिवसांचा अवकाश होता.

वरील प्रकार झाल्यानंतर तिसरे दिवशीं, मार्खम कांहीं कामाकरितां घरांतून बाहेर निघणार, तोंच विटिंगहमनें येऊन, "एक स्त्री आपल्या दृष्टांताची इच्छा करीत आहे" ह्मणून सांगितलें.

प्रथमतः मार्खमच्या मनांत इझाबेला आली असावी अशी कल्पना आली. पण ती एकटी हिंडणारी बायको नसून, लज्जाविनयादिकांची जागृत देवताच आहे हें त्याला पक्कें ठाऊक होतें; ह्मणून ती कोण असावी असा त्यानें प्रश्न केला.

" एक सुस्वरूपमान स्त्री आहे, व ती अंतरात्म्यांतून अवधान पावल्यासारखी आली आहे. तिचे केस सुंदर आहेत. नेत्र आकर्णवर्ण आहेत–व शरीर-कांति स्पटिकत्वासारखी आहे. " तो ह्मणाला.

" ही कोण असावी हें **मार्खम**च्या ध्यानांत येऊन तो बोलला: छे:, **विंटिंगहम**, तीच आली असावी. "

" महाराज, असत्यत्याचें भाषण करणारा मनुष्य मी दिसत आहे ? " आपल्याजवळ नेहमी असणारा पांढरा रुमाल एका खाकेंतला दुसऱ्या खाकेंत घालून तो ह्मणाला.

**मार्खम** दिवाणखान्यांत गेला, तों त्याचा संशय खरा झाला. त्यानें तेथें पाय ठेवला नाहीं तोंच **मेरी–ॲन** कोचावर बसलेली त्यानें पाहिली.

त्याला पाहून तिनें आपला हात पुढें केला व हास्यवदन करून–या वेळेला हस्तीदंताप्रमाणें तिची शुभ्र व सरळ दंतपंक्ति पाहून **रिचर्ड**चा राग शांत झाला–ती ह्मणाली: " **मार्खम**, तुमचें दर्शन घेतल्याशिवाय दिवस जाऊं द्यावयाचा नाहीं असा मी निश्चय केला आहे ; आणि तुह्मी तर आला नाहीं, ह्मणून मला येथें येणें भाग पडलें. "

" पण **मेरी**, ज्या योगानें लोक तुला नांवें ठेवितील असें अविचाराचें वर्तन तुझ्या हातून घडलें असें तुला नाहीं वाटत? " **मार्खम**नें विचारलें.

" कां बरें? " तिनें आश्चर्यानें विचारलें.

" कारण, बायका–मग त्या विवाहिता असोत किंवा अविवाहिता असोत–आमच्यासारख्या सड्या पुरुषाकडे एकट्या कधीं जात नाहींत. त्या संबंधानें समाजाचे निर्बंध आहेत आणि तूं तर ते–"

" **मार्खम**, तुम्ही कांहीं या वेळेला मला शिकवीत नाहींत. ' समाजाचे या संबंधानें, त्या संबंधानें, ' हें, तें, मला कांहीं ठाऊक नाहीं. मला जें काय ठाउक आहे तें एवढेंच कीं, तुम्ही गेल्यापासून मी काल सारी रात्र रडत बसलें होतें. सकाळपर्यंत मी मोठ्या दु:खांत वेळ काढला. इतक्यांत मला तुमच्या घराची आठवण झाली व मी येथें आलें. "

" तूं माझ्या येथें आलीस हें तुझ्या बापाला कळलें तर तो तुझी गय करणार नाहीं, व माझेंही तोंड फिरून पाहणार नाहीं. " **मार्खम** ह्मणाला.

" तर मग आपण त्यांना सांगूंच नये ह्मणजे झालें. " ती निष्कपटपणानें बोलली. " पण तुह्मी असें कां दिसतां ? मला वाटलें होतें कीं, " ती रडें

तोंड करून ह्मणाली: " तुह्माला पाहून मला जसा आनंद झाला, तसा मला पाहून तुह्मांलाही होईल. "

" **मेरी,** तुला पाहून मलाही आनंद झाला आहे, व मला नेहमीं होतो. " तिला समाधान वाटावें ह्मणून तो बोलला. " पण मी तुला असें सांगतों कीं, असें करणें फार अनुचित आहे. जर तुझ्या बापाला हें कळलें तर त्याचा काय परिणाम होईल याचें मला भय वाटतें. "

"मी फिरून सांगतें कीं, बाबाला हें कळणार नाहीं. पण तुह्मी असें रागावूं नका. **मार्खम,** सांगा तर मला तुह्माला राग नाहीं ना आला ? मला पाहून तुह्माला आनंद झाला ना? "

" या पोरीचा अमर्यादपणा तिला आतां कसा बरं समजावून सांगावा ? जर तिच्याशीं पुष्कळ वेळ वादविवाद करीत बसेन तर तिच्या अजाण मनाला या जगांतील वाईट गोष्टींची माहिती करून दिल्यासारखी होऊन, ज्या कल्पना अद्याप तिला परक्या व विलक्षण अशा आहेत त्यांची तिला ओळख करून दिल्यासारखी होईल. एकूण वाईट गोष्टींविषयीं अज्ञान, हें ज्या अर्थी मनुष्याच्या विनाशकालाला अप्रत्यक्ष रीतीनें कारण होत आहे त्या अर्थी तें या जगांत त्याला भूषणवत् नव्हे तर मग ? " **रिचर्ड** आपल्या मनाशीं बोलला.

" **मार्खम,** तुह्मी कां बोलत नाहीं ? तुह्मी कसला विचार करतां ? तुह्मी नाहीं ना माझ्याशीं बोलत? ठीक आहे. " असें ह्मणून ती कोचावरून उठली.

**मार्खमनें** कांहींच उत्तर दिलें नाहीं. तिचें मन दुखविणें त्याला महत्संकटाचें वाटलें. परंतु त्यानें असा विचार केला कीं, तिला प्रचारांतील वाईट-साईट गोष्टी सांगून, नीतिदृष्ट्या तिला अपायकारक असे, तिच्या कोमल मनावर आघात करण्यापेक्षां तिला रागानें व अभिमानानें घरीं परत जाऊं दिलेली बरी. ह्मणजे फिरून तिच्या हातून असलें अश्लाघ्य वर्तन तरी घडणार नाहीं. **पण मेरी–ॲन** ही राग बाळगण्याला असमर्थ होती. तिला एकदम दुःखाचा उमाळा येऊन ती ह्मणाली:

" **मार्खम,** तुम्ही किती तरी निर्दय आहांत! तुह्मांला या दिवाणखान्यांत येतांना पाहून मला जितका आनंद झाला तितकाच तुह्माला, मला या ठिकाणीं पाहून झाला असेल अशी माझी कल्पना होती. पण ती व्यर्थ कीं हो झाली! आज नऊ वर्षें झालीं, माझी आई वारल्यापासून मला मनापासून असें तुमच्याशिवाय कोणी आवडलें नाहीं. प्रत्यक्ष माझ्या बापावर देखील

माझी इतकी प्रीति नाहीं. फार काय सांगू ? जर या वेळेला तुम्ही मला पदरांत घ्यायला तयार असाल तर त्याचा राग सहन करण्याला सुद्धां मी तयार आहें. आजपर्यंत या जगांत एका ईश्वराशिवाय मला कोणी मित्र नव्हतें. माझीं सर्व दुःखें मी त्याला सांगत असे. परंतु मला आतां असें वाटतें कीं, माझा सर्वभार तुमच्यावर टाकावा. माझी आई मेल्यापासून, देवा, माझें रक्षण कर, व मला सद्बुद्धि दे, अशी त्याची हात जोडून प्रार्थना केल्याशिवाय मी कधीं अंथरूणाला शिवलें नाहीं. पण आतां माझें सर्व जीवित तुमच्या स्वाधीन करावें; व ज्या गोष्टी मी दुसऱ्यापासून शिकावयाच्या त्या तुमच्यापासून शिकाव्या असें मला वाटतें. ह्मणून रिचर्ड, माझें तुह्माला असें सांगणें आहे कीं, तुमचें पहिल्यापेक्षां माझ्यावर आतां विशेष लक्ष्य असूं द्या. तुह्माला सर्व काळ आनंदित ठेवण्याला व ज्या गोष्टीनें तुह्माला दुःख होईल ती सोडून देण्याला मी तयार आहें. फार तर काय ? तुमच्या जिवाकरितां मी आपला जीव देण्याला देखील तयार आहें. "

इतक्या गंभीरपणानें व आवेशानें तिनें आजपर्यंत कधीं भाषण केलें नव्हतें. सगळ्या जन्मांत आपल्या तोंडून इतके उद्गार निघाल्याबद्दल तिचें तिलाच आश्चर्य वाटायला लागलें. जणूं काय हे उद्गारतरंग तिच्या हृदयरूपी झऱ्यापासून निघून त्याचा उमाळा आंवरण्याला ती असमर्थ आहे.

हे शब्द ऐकून मार्खम अगदीं विस्मयचकित होऊन गेला; व आपल्याकडून तिच्या सुखाची आशा सफळ होणें असंभवनीय आहे हा विचार जेव्हां त्याच्या मनांत आला तेव्हां ती गोष्ट त्याच्या अंतःकरणाला फारच लागली, व तो आपल्या मनाशीं ह्मणालाः " अरेरे ! गरीब विचारी ! तिच्या मनाची स्थिति तिलाच कळून येत नाहीं ! "

प्रीति ही षड्रिपूंपैकीं एक आहे. इचा नाश करण्याला आजपर्यंत जे जे उपाय सांगितले आहेत, त्यांचा परिणाम विषवत्च झाला आहे. इतकेंच नव्हे, तर इच्या पायीं अतिशय कडक व आकस्मिक अशीं शासनें घडत असूनही मनुष्याच्या अंतःकरणांत विचार उत्पन्न होत नाहीं.

सेवक जितका जितका अधिक आज्ञाधारक, तितका तितका त्याच्यावर कामाचा भार अधिक. जों जों मनुष्य आपल्या मनावर भलताच जोर करूं लागतो, तों तों त्याच्या हातून अधिकच प्रमाद घडत जातात. मानी स्वभावावर जुलूम करण्याचा प्रयत्न कोणीं करूं नये. कारण, उदार मनानें केलेली प्रीति सहजा-

सहजीं आकलन करण्यासारखी नसते. मनुष्य एक चूक सुधरावयास जातो तों त्याच्या हातून दुसरीच घडून येते. मग अनर्था पाठीमागून अनर्थ उत्पन्न होतात, व दुःखाला कांहीं पारावार नाहींसा होऊन जातो. या अनर्थांचें मग कोण वर्णन करूं शकणार आहे ? आपल्या प्रीतीची हेळसांडीनें माती झालेली पाहून कोंवळ्या मनाची स्त्री आपला घात करून मरेल; किंवा तिच्या मनांत असलेल्या प्रीतीचा जोर जरी कायम असला तरी अश्रुपात करीत अथवा काळजींत झुरून ती राहील, परंतु मर्यादा ह्मणून सोडणार नाहीं. असो.

त्या कोंवळ्या मनाच्या मुलीला काय उत्तर द्यावें हें **मार्खम**ला मुळींच समजेना, तिचें मन त्याला दुखवितां येईना, त्याचें अंतःकरण दुसरीकडे गुंतलें असल्यामुळें हिच्यावर त्याला प्रीति करतां येईना ; व तिला अज्ञात असलेल्या, ज्या कार्यकारणभावापासून समाजधर्म उत्पन्न झाले त्यांचें ज्ञान तिला करून देण्याविषयींही त्याचा धीर होईना. अशा तऱ्हेच्या घोटाळ्यांत तो पडला.

शेवटीं आपले डोळे पुसून तीच म्हणालीः " **मार्खम,** मी तुमच्या येथें आलें ह्मणून तुह्मांला राग नाहींना आला? ज्या अर्थी असें येणें चांगलें नाहीं ह्मणून तुह्मी ह्मणतां, तर फिरून मी येणार नाहीं. मग तर झालें ना ?"

" **मेरी,** मी तुझ्यावर रागावत नाहीं. पण तुला एवढेंच सांगतों कीं, तूं ज्या हेतूनें माझ्याकडे पाहतेस तो हेतु सोडून दे."

" हो हो, मला वाटतें, अविवाहित स्त्रीला अविवाहित पुरुष आवडूं नये, याबद्दलही समाजाचे कांहीं निर्बंध आहेत ?"

" **मेरी,** मनाला कशाचाच निर्बंध नाहीं. माझें सांगणें एवढेंच कीं, बापापेक्षांही जो तूं मान मला देतेस–"

" मी देतें." ती मध्येंच ह्मणाली.

" तर ही तुझी चूक आहे."

" हो चूक खरीच. आणि मनाला कशाचाच निर्बंध नाहीं हें तुह्मींच आतां सांगितलें होतें नाहीं का ?"

" तें खरें. पण **मेरी,** हे मनोविकार जिंकण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. माझ्यावर तुझें मन आहे असें तूं ह्मणतेस. समज कीं, आपली गांठ आतां फिरून कधीं पडणार नाहीं; मग मला विसरण्याचा तूं प्रयत्न करशील कां नाहीं ?"

" छे, कधीं नाहीं. मी नेहमीं तुमच्याबद्दल विचार करीत असतें."

" पण मेरी, आज नाहीं, उद्यां; उद्यां नाहीं, वर्षानें, दहा वर्षांनीं, अशी वेळ आलीच पाहिजे कीं, पुढें आपली गांठ पडणार नाहीं. माझें लग्न होईल, तुझेंही लग्न होईल."

" तुमचा लग्न करण्याचा विचार आहे तर मग मार्खम ?"

" हो, एका तरुण स्त्रीला मीं वचन देऊन ठेवलें आहे, पण कांहीं कारणामुळें—"

" तुह्मी एका स्त्रीला वचन देऊन ठेवलें आहे ? ती स्वरूपानें चांगली आहे का ?"

" हो, फारच चांगली."

हे शब्द ऐकून ती स्तब्ध बसून विचार करूं लागली. तिच्या तोंडाचा रंग अकस्मात पालटला. जणूं कांहीं तिच्या अंतःकरणांत कांहीं तरी उजेड पडून तो बाहेर आला आहे. ती आपल्या जागेवरून उठून अशा गंभीरपणानें बोलूं लागली कीं, या वेळेला माझ्याशीं बोलणारी स्त्री रिचर्डला वाटूं लागलें. पूर्वीची ती अचपळ, अल्लड व खेळकर मुलगी नसून, दुसरीच कोणी तरी आहे. असें ती ह्मणाली: " मार्खम, मी तुमच्या घरीं येऊन तुह्माला त्रास दिला याबद्दल तुमची मी क्षमा मागतें. माझ्या डोळ्यावरची धुंदी एकदम उतरून माझा अमर्यादपणा मला आतां कळून आला ; व लोकांतल्या चालीरितीसंबंधानें तुह्मी मघा जें ह्मणत होता, त्याचा अर्थ काय हें आतां मला कळूं लागलें. पण येथें येण्यांत माझ्या मनाचा निर्मळपणा किती होता तो एका देवाला किंवा तुह्मालाही ठाऊक असेल. शेवटीं, तुह्मांला प्रेमदृष्टीनें पाहण्यांत माझ्याकडून जर अपराध झाला असेल तर तो विसरा, एवढेंच माझें हात जोडून तुह्मांला सांगणें आहे. या पलीकडे कांहीं नाहीं." असें ह्मणून तिनें त्याचा निरोप घेतला.

ठरल्याप्रमाणें पुढच्या रविवारीं मार्खम ग्रेगरीच्या येथें भोजनास आला. मेरीही तेथें होतीच. परंतु तिच्या वृत्तींत नवल वाटण्यासारखें अंतर पडलें होतें. तिची आनंदवृत्ति, मोकळेपणा, व उल्हास हीं सर्व लोपून गेलीं असून, मनुष्यावर रोगाची छाया पडली ह्मणजे तारुण्याची टवटवी ज्याप्रमाणें नाहींशी होते, त्याप्रमाणें तिच्यावर नव्या विकाररूपी रोगाची छाया पडल्या कारणानें, तिची आनंदवृत्ति व स्वभावाचा मोहकपणा हे जे तिचे विशेष गुण ते नाहींसे झाले होते.

अरेरे ! प्रीति ही आपल्या दुःखाला मात्र पुष्कळ कारण आहे. परंतु

सुखाचा अंश देखील तिच्यापासून प्राप्त होत नाहीं. जे आनंदी आहेत त्यांना ती दुःखी आणि चिंताग्रस्त करून ठेवते; परंतु दुःखितांचें हास्यवदन करण्याचा प्रसंग विशेषतः आणीत नाहीं.

मेरीनें रिचर्डशीं मौन स्वीकारण्याचा प्रयत्न केला होता; तथापि, तो आपल्याकडे पहात नाहीं असें जेव्हां तिला वाटे, तेव्हां ती त्याच्याकडे इतक्या अंतःकरणपूर्वक दृष्टीनें पहात असे कीं, जशी कांहीं आपल्या आराध्य देवतेची मूर्ति ती मनांत आणीत आहे.

तिच्या वृत्तीचा फरक बापाच्याही लक्ष्यांत आला पण त्याचें कारण काय असावें याचें मात्र अनुमान त्यास झालें नाहीं.थोड्या दिवसांपूर्वी त्याला संशय आला होता कीं, न जाणो इचें मन कदाचित् कोणावर गुंतलें असेल, व त्यामुळें इच्या वृत्तींत हें अंतर पडलें असेल; तरी आपल्या मुलीचें कोंवळें मन पाशबद्ध झालें असेल असें त्याचें मन सांगेना. याचें कारण इतकेंच कीं, तिच्या मनावर सध्यांच भलते संस्कार होऊं नयेत अशी त्याची इच्छा होती.

मार्खमच्या संबंधानें जरी त्याची पूज्यबुद्धि होती, तरी धनदौलत बाळगणाऱ्या इतरांप्रमाणें याचीही अशी इच्छा होती कीं, आपल्या मुलीला जो वर मिळणार असेल तो या जगांतील थोड्याशा वैभवाचा तरी मालक होण्यासारखा असावा. या विचारानें, त्यानें आपल्या मुलीच्या मनाविषयीं आलेल्या संशयाचा फारसा विचार केला नाहीं. तो मनांत ह्मणे कीं, स्थलांतर करून किंवा करमणूक करून तिची वृत्ति ताळ्यावर येईल. परंतु असें करण्याचा आतां मात्र त्यानें निश्चयच केला. कारण, ठरल्याप्रमाणें रिचर्ड याच्या येथें रविवारीं भोजनास आला त्या वेळेस आपल्या मुलीचें मन त्याच्यावर गेल्याचें हजार प्रकारें याला दिसून आलें; व त्यानें आपल्या बारीक दृष्टीनें इतकेंही जाणलें कीं, रिचर्डचें मन आपल्या मुलीकडे नाहीं.

त्या दिवशीं रात्रीं त्याला झोंप आली नाहीं. पुढें काय करावें या गोष्टीविषयीं विचार करीत तो पडला. एकवार त्याला वाटे कीं, आपल्या मुलीच्या मनाची स्थिति मार्खमच्या जाऊन कळवावी, ( मार्खमच्या ही गोष्ट टाळक आहे हें त्याला माहित नव्हतें ) व ह्या दोघांना, आपला लवकरच शरिरसंबंध घडणार आहे असें समजूं द्यावें. फिरून त्याच्या मनांत असें येई कीं, कांहीं वेळ वाट पहावी, व तिची प्रीति तशीच कायम आहे कीं नाहीं, व ती परस्पर आहे कीं नाहीं, हें [illegible] शिक्षण बंद करण्याचा

मात्र त्यानें निश्चय करून, मेरीच्या मनावर जो भलताच संस्कार झाला होता त्याचें बीज नाहींसें करण्याचें काम हळू हळू वेळेवर सोंपविलें.

पुढें थोड्या दिवसांनीं–ह्मणजे रिचर्ड त्याच्या घरीं आला त्याच दिवशीं–त्यानें आपला बेत अमलांत आणला. तो ह्मणाला:–

" मार्खम साहेब, मला आपल्याला सांगायला फार दुःख वाटतें कीं, यापुढें माझ्या मुलांकरितां आपल्याला तसदी न देण्याची वेळ आली आहे."

" अशी वेळ येण्याला माझ्या हातून कांहीं झालें नसावें एवढीच माझी इच्छा आहे."

" छे, छे, छे, तसा प्रकार मुळींच नाहीं. माझ्या मुलीला कांहीं दिवस विश्रांति आणि एकांतवास पाहिजे आहे, एवढ्याचकरितां तूर्त मी कोणाला भेटणार नाहीं."

आपल्या येण्यापासून ज्या कुटुंबांतील एका मनुष्याच्या जिवाला अस्वस्थता उत्पन्न होते, तें घर अनायासेंच वर्ज होत आहे हें पाहून रिचर्डच्या मनाला समाधान झालें. कारण त्याच्याही मनांतून या घराशीं आपला संबंध नसावा असें वाटूं लागलें होतें. तें आपोआपच घडून आलें.

"जर कधीं तुह्माला कोणत्याही रीतीनें माझी जरूर लागली तर तुह्मी खुशाल मला कळवा. हें माझें सांगणें वरोपचारी नाहीं, तर खऱ्या मित्रत्वाच्या नात्यानें आहे असें समजा." ग्रेगरी ह्मणाला.

या मेहरबानीबद्दल मार्खमनें त्याचे आभार मानून त्याचा निरोप घेतला. व जातांना त्यानें आपल्या दोघां शिष्यांनाही पुसलें. आपला शिक्षक आतां आपल्याला भेटणार नाहीं ह्मणून त्यांनाही फार वाईट वाटलें. मेरीला अगोदरच कोणाला भेटण्याकरितां ह्मणून कांहीं दिवस मुद्दाम दुसरे ठिकाणीं लावून दिली होती.

---

## भाग ११.

### दुःखपर्यवसायी नाटकाचा प्रयोग.

वरील नाटकचा प्रयोग ज्या दिवशीं व्हावयाचा तो दिवस येऊन ठेपला.

मार्खमनें मधल्या वेळांत आपल्या नाटकाची तालीम वगैरे कांहीं पाहिली नव्हती, व पूर्वीच्या निश्चयाप्रमाणें आपल्या या नवीन उद्योगाची गोष्ट

कोणास कळविली नव्हती. **प्रेस्टन** या नांवानेंच तो नाटकाच्या मालकाला माहीत असे. वर्तमानपत्रांत जाहिरात दिली होती, तीहि अशी होती कीं, " हें दुःखपर्यवसायी नाटक एका तरुण व होतकरू ग्रंथकारानें केलें असून, आपल्या नाटकासंबंधानें लोकमत काय आहे तें बाहेर पडेपर्यंत आपलें नांव गुप्त राखण्याचा त्यानें निश्चय केला आहे."

दरवाजे उघडण्याची वेळ होण्यापूर्वींच **रिचर्ड** नाटकाला येण्याकरितां निघाला. नाटकगृहांत गेल्यावर त्यानें मालकाची भेट घेतली, व त्याचें बोलणें झाल्यावर तो नाटकगृहांतील एका मध्यस्थानीं जाऊन बसला.

दरवाजे उघडून थोडा वेळ झाला नाहीं तोंच गर्दी होत चालली होती. तों साडेसहाच्या सुमारास तळमजल्यापासून शेवटच्या मजल्यापर्यंत अगदीं चेंदा होऊन गेला. राखून ठेवलेली जागा उंची पोषाख केलेल्या स्त्रियांनीं व चैनी पुरुषांनीं भरली होती. एकंदरींत पडदा वर होण्याच्या सुमारास इतकी गर्दी झाली होती कीं, पाऊल ठेवायला देखील रीघ नव्हती.

या वेळेला **मारखम** इतका उतावीळ झाला होता कीं, तो गाण्याचा अत्यंत नादी असे;तरी नाटक सुरू होण्यापूर्वी चाललेलें वाद्यवादन त्यास कंटाळवाणें झालें. शेवटीं तें थांबून प्रथमांकास सुरुवात झाली.

कांहीं वेळ प्रेक्षकांत इतकी निश्चल शांतता व्यापून राहिली होती कीं, प्रेक्षकांची अनुकूलता किंवा प्रतिकूलता ज्या योगानें समजून येईल असें कांहींच चिन्ह दिसेना; परंतु नाटकांतील नायक पात्राचें मनावर ठसा उठविणारें एक आत्मगत भाषण झाल्यावर सर्व प्रेक्षकसमुदायाकडून वाहवा वाहवा, असा एकच शब्द निघाला; व टाळ्यांच्या वर्षावानीं तर सर्व नाटकग्रह दणाणून गेलें. नंतर प्रथम अंक संपला. तेव्हां त्या भागासंबंधानें प्रेक्षकाचें अनुकूल मत दिसूं लागलें.

**मारखम**च्या आयुष्यांतील ही वेळ अतिशय सुखाची होती ; व या वेळेला त्याचा आनंद गगनांत मावेनासा झाला होता. पुढें दुसऱ्या अंकास सुरुवात झाली, व त्याचाही शेवट चांगला झाला.

वरचेवर वाहवा मिळत गेल्या कारणानें, पात्रांनींही आपापलीं कामें मेहेनतीनें केलीं; व नाटकाचा स्वाभाविक चांगलेपणा, पात्रांची करामत, आणि निरनिराळ्या देखाव्यांचें सौंदर्य यांच्या योगानें त्या दिवशीं त्या नाटकगृहांत अशी कांहीं बहार उडून गेली कीं, यापूर्वी त्या किंवा दुसऱ्या कोणत्याच नाटकगृहांत अशी मजा दृष्टीस पडली नव्हती.

नंतर तिसऱ्या अंकास सुरुवात झाली. याच अंकात सेलीनेचा प्रवेश व्हावयाचा होता. तो झाल्याबरोबर लोकांनीं टाळ्यांचा गजर करून तिचें स्वागत केलें. व तिनेंही पुढें येऊन प्रेक्षकजनांच्या या मेहेरबानीचा आदरपूर्वक स्वीकार केला.

तिची प्रसंशा मार्खमनें पूर्वी ऐकिली असल्यामुळें तो तिच्याकडे लक्ष्यपूर्वक पाहूं लागला. परंतु तो, जों जों तिच्याकडे पाही, तों तों त्याच्या मनांत आश्चर्य, संशय आणि अनिश्चितता उत्पन्न होई. त्याला वाटे कीं, जर मीं कधीं एलनला पाहिली असेन तर ती—किंवा तिची सजीव प्रतिमाच—मी या रंगभूमीवर माझ्यापुढें—माझ्याच नाटकांत—नाचतांना पहात आहें.

त्याची मति गुंग होऊन गेली. त्यानें पुढें वांकून बारीक नजर करून पाहिलें—शेजारीं बसलेल्या गृहस्थाची दुर्बीण घेऊन तिच्यांतून पाहिलें—परंतु तो जों जों तिच्याकडे पाही तों तों त्याची खात्री होई कीं, सेलीना ही स्त्री दुसरी कोणी नसून आपली एलन मनरो आहे.

शेवटीं ती बोलूं लागली. तिचा बोलण्याची ढब—तिचे शब्द—व तिचे हावभाव पाहून तो आश्चर्यचकित होऊन गोंधळून गेला. त्यानें शेजारच्या गृहस्थाला या स्त्रीचें खरें नांव सेलीनाच आहे कीं, दुसरें कांहीं आहे ह्मणून विचारलें; परंतु त्या गृहस्थानें, " मला ठाऊक नाहीं, पण लोक ह्मणतात कीं, ही दोन तीन महिन्यांतच इतकी तयार झाली " असें सांगितलें.

या गृहस्थाचें लक्ष्य नाटकाकडे अगदीं वेधून गेलें असें पाहून मार्खमनें त्याला पुढें कांहीं विचारलें नाहीं.

या दोन तीन महिन्यांत तिची वर्तणूक कशा प्रकारची होती ही त्यागलीच त्याच्या ध्यानांत आली. बाहेरून उशीरा येणें—कामावर पुष्कळ वेळ राहणें व दुसऱ्या आणखी कांहीं गोष्टी—ज्या या वेळेपर्यंत त्याच्या ध्यानांत आल्या नव्हत्या. त्याचें लक्ष्य प्रयोगाकडे लागेना, ह्मणून त्यानें प्रथमतः आपल्या मनाची खात्री करून घेण्याचा निश्चय केला. तिसऱ्या अंकाचा पहिला प्रवेश संपलेला पाहून तो आपली जागा सोडून रंगाच्या पडद्याकडे जाण्यास निघाला. परंतु मध्येंच त्याच्या मनांत आलें कीं, जर कदाचित् ती स्त्री एलन असली व मी तिच्यापुढें एकदम जाऊन उभा राहिलों, तर ती गोंधळून जाऊन, तिच्याकडे सोंपविलेलें काम तिच्या हातून चांगलें होणार नाहीं. असा विचार करून

तो कोणाच्या दृष्टीस न पडेल अशा रीतीनें, पण ज्या ठिकाणाहून त्याला स्वच्छ दिसेल अशा अंधाराच्या जागेंत जाऊन उभा राहिला.

थोडा वेळ झाला नाहीं तोंच, त्याची संशयनिवृत्ति झाली. कारण, ज्या ठिकाणीं हा उभा राहिला होता त्या ठिकाणावरून **एलन** आपल्या मैत्रिणी-बरोबर बोलत चालली होती.

"ग्रंथकर्ता तुझ्या दृष्टीस पडला काय?" **एलन**च्या मैत्रिणीनें तीस विचारलें.

" नाहीं अजून. परंतु नाटक संपल्यावर आपल्या मालकानें त्याला दाखविण्याचें कबूल केलें आहे. " **एलन** ह्मणाली.

" त्यानें हें नाटक फारच चांगलें रचलें आहे नाहीं ? "

" यांत काय संशय ? त्याच्या अंगीं इतके गुण असून त्यानें इतकें कांहीं लाजायला नको होतें. खरच, त्याच्या संबंधानें मोठाच बाई आचंबा वाटतो. तो एक दिवस देखील तालीम पहायाला आला नाहीं. तो बहुतकरून नाटक लिहिण्याच्या कामांत नवखाच असावा. आपला सूचक सांगत होता कीं, त्याच्या मूळ प्रतीवर, इतर माहितगार ग्रंथकारांच्या वहिवाटीप्रमाणें पात्रांच्या सोयीकरितां सूचना वगैरे कांहीं केलेल्या नव्हत्या. " **एलन** ह्मणाली.

" खरोखर, त्याला पाहण्याची मला फारच इच्छा झाली आहे." असें बोलत बोलतच त्या पुढें गेल्या. यापुढें **रिचर्ड**च्या ऐकण्यांत कांहीं आलें नाहीं. तथापि ही **एलन**च आहे अशी त्याची पूर्ण खात्री झाली.

आपण या धंद्यांत शिरलों हें **मार्खम**ला व आपल्या बापाला कळलें तर ते काय अनर्थ करतील याबद्दल **एलन**ला भीति वाटत होती, व ह्मणून तिनें ही गोष्ट त्यांच्यापासून मुळींच छपवून ठेविली होती ; परंतु ही गोष्ट कळल्यानें **मार्खम**ला इतकें कांहीं आश्चर्य वाटलें नाहीं. उलट, स्वतःच्या उदरपोषणा-करितां उपाय शोधण्याकडेस जिनें तिचें मन वळविलें अशा स्वातंत्र्येच्छेचें त्यानें अभिनंदन केलें. तथापि, तिनें आपणाजवळ खरी गोष्ट सांगितली नाहीं, व इतर धंद्यांपेक्षां नाटकाचाच धंदा स्वीकारला याबद्दल त्याला थोडें वाईटही वाटलें. अरेरे ! तिला कोणकोणत्या मार्गांतून जावें लागलें याची त्याला वार्तासुद्धां नव्हतीना ? असो.

**सेलीना** तीच **एलन** आहे अशाबद्दल आपल्या मनाची पूर्ण खातरी करून घेऊन तो प्रेक्षकसमुदायांत परत आला. परंतु तो आपल्या पूर्वीच्या जागेवर न बसतां, रंगभूमीला लागूनच ग्रंथकर्त्याकरितां जी ठेवलेली जागा

असते, त्या जागेवर जाऊन बसला. इकडे नाटकाला एक.गारखा रंग येत चालला होता. त्याला विलक्षण शोभा येण्याला नुसतें **एलन**चें कामच पुरें होतें. तिचा रम्य चेहेरा—तिचा निटस बांधा—तिच्या चलनवलनाचा मनोहरपणा—तिचा सुस्वर कंठ—व तिनें जो भाग घेतला होता, तो समजून घेण्याची तिची मार्मिकता, इत्यादि गोष्टी प्रेक्षकांचें चित्ताकर्षण करण्याला अनावर झाल्या होत्या. व **एलन** जरी नसती तरी नाटकाची स्वाभाविक रचनाच प्रेक्षकांच्या मनावर ठसा उमटण्यास पुरे होती; परंतु **एलन**च्या योगानें दुधांत साखर पडल्यासारखें होऊन, नाटकाच्या आर्वाचीन काळांत कधींही न घडलेली अशी बहार त्या दिवशीं उडाली.

इच्या बुद्धीचा प्रभाव पाहून प्रेक्षकांचा आनंद त्यांच्यांत मावेनासा झाला. तिचा सुंदरपणा व तिची विलक्षण बुद्धि यांचा संगम झाल्यामुळें, तो तिच्या सर्वतोमुखीं उत्कर्षाला एक मार्गच झाला; व ज्या वेळेला पांचवा अंक संपून पडदा पडला, त्या वेळेला प्रेक्षकांनीं टाळ्यांचा गजर करून, हातरुमाल उडवून व तोंडानें ‘ शाबास शाबास ’ असा शब्द करून आपला आनंद दर्शविला. हा आनंद पुष्कळ वेळ चालला होता, व याला राहून राहून अधिकाधिक उकळ्या येत असत.

पडदा पडल्याबरोबर **मार्खम** घाईघाईनें पडद्यांत गेला, व एकीकडे तिची गांठ घेऊन, तिचा हात धरून तिला हळूच ह्मणाला: “ घाबरूं नकोस, मला सर्व कळलें आहे. मी तुला शाबासकी देण्याकरितां आलों आहें. तुझ्यावर रागावण्याकरितां नव्हे. ”

**मार्खम**ला एकदम पाहण्याबरोबर तिच्या उरांत जी धडकी भरली होती ती त्याचें भाषण ऐकून कांहींशी कमी झाल्यावर ती ह्मणाली: “ मला शाबासकी देण्याकरितां **रिचर्ड** तुम्ही आलांत ? असें कां बरें? ”

“ होय **एलन**, एवढ्याच करितां मी आलों. कारण, एका मोठ्या आडचणींतून माझें नाटक तूं पार पाडलेंस. ”

“ तुमचें नाटक?” **एलन**ला जास्ती जास्तीच आश्चर्य वाटून तिनें विचारलें.

“ होय. **एलन**, हें नाटक मीं रचलें आहे. पण ते पहा तुला बाहेर बोलावीत आहेत. ” *

* ज्या नाटकपात्रानें आपल्या करामतीनें प्रेक्षकांचीं मनें तोषित केलीं असतील, त्यास नाटक संपल्यावर किंवा त्याचा भाग संपल्यावर रंगभूमीवर पुन्हां बोलावून आणून शा-

नाटक संपतांना चाललेले प्रेक्षकांचे आनंददर्शक प्रकार या वेळेला थोडेसे थांबून आतां **सेलिनेला** रंगभूमीवर आणण्याविषयीं ओरड चालली होती.

इतक्यांत हजारो लोकांच्या तोंडांतून "**सेलीना** व **ग्रंथकार** या दोघांना बरोबर येऊं द्या, बरोबर येऊं द्या, असा एकच शब्द निघूं लागला. "त्या बरो- बर, नाटकाचा मालक ज्या ठिकाणीं **रिचर्ड** व **एलन**चें भाषण चाललें होतें त्या ठिकाणीं येऊन बोलूं लागला: "**सेलीना**, तुला बाहेर बोलावीत आहेत, त्याप्रमाणें **प्रेस्टन**साहेब आपल्यालाही बोलावीत आहेत."

आपल्याप्रमाणें **मार्खम**नेंही आपलें नांव बदललें हें पाहून किंचित् हास्य करून **एलन**नें त्याच्याकडे पाहिलें.

आपल्याला बाहेर न नेण्याविषयीं **मार्खम**नें मालकाची पुष्कळ विनवणी केली; परंतु "**सेलिना** व **ग्रंथकार**" या नांवांचा प्रेक्षकांनीं नुसता घोष लावला होता; व तिसऱ्या मजल्यावरचे लोक तर खवळून गेले होते. उघडच आहे. नाटकगृहांत लोकांच्या मनाला जितकें स्वातंत्र्य असतें तितकें जनस- मूहांत इतर कोणत्याही ठिकाणीं नसतें. असो.

असा प्रकार चालल्याबरोबर, **मार्खम**नें **एलन**चा हात धरून, पडदा उघ- डल्याबरोबर तिला रंगभूमिवर आणली.

या उभयतांचा प्रवेश—एक उत्तम ग्रंथकार व दुसरी नाट्यकुशल स्त्री—प्रेक्ष- कांच्या आनंदाला पुन्हां पूर येण्यास कारण झाला. दिव्याच्या चकचकाटानें **रिचर्ड**चे डोळे दिपून जाऊन त्याला कांहीं वेळ दिसेनासें झालें. हजारों मनु- ष्यांचीं तोंडें त्याला दिसलीं, पण एकाचेंही तोंड त्याच्या दृष्टीस ओळखतां ये- ईना. फार तर काय ? पण पुष्कळ दिवस हरवलेला प्रत्यक्ष त्याचा भाऊ व प्राणाहूनही प्रिय अशी त्याची **इझाबेला** हीं दोघें किंवा त्यांच्यापैकीं कोणी जरी त्या प्रेक्षकसमुदायांत त्याच्या अगदीं समोर बसलें असतें तरी त्याला तें ओळखतां आलें नसतें. परंतु इतर लोक जसे त्या दिवशीं मोठ्या उत्सुकतेनें या नाटकगृहांत जमले होते, त्याप्रमाणें **इझाबेला** हीदेखील आपल्या आईबापां- बरोबर आली होती. त्यांनीं आजच्या नाटकाचा कर्ता **रिचर्ड मार्खम** आहे

---

बासकी यादयाची, व त्या पात्रानेंही या मेहेरबानीचा मोठ्या आदरानें स्वीकार कराव- याचा, ही इंग्रजी नाटकांतील चाल आहे. आपल्या इकडे संगीत नाटकांत "once more" म्हणण्याचा जो सपाटा चालत असतो, तो एक प्रकारें वरच्याचेंच अनुकरण आहे असें म्हणण्यास चिंता नाहीं.

असे जेव्हां ओळखलें असेल, तेव्हां तिला व तिच्या आईबापांला किती आश्चर्य वाटलें असेल याची वाचकांना चांगली कल्पना करतां येईल.

ज्यानें आपला देश परकीय शत्रूच्या गुलामगिरींतून नुकताच सोडविला आहे, अशा एखाद्या मोठ्या विजयी पुरुषाचा लोक जसा जयजयकार करतात त्याप्रमाणें **मार्खम**चा, प्रेक्षक जयजयकार करूं लागले. कांहीं वेळानें नाटकाचा मालक पुढें येऊन प्रेक्षकांस उद्देशून बोलूं लागला: "सद्देश भगिनी व सभ्य गृहस्थहो, जें नाटक तुह्मी आज मेहेरबानी करून आवडून घेतलें त्या आजच्या दुःखपर्यवसायी नाटकाचे कर्ते **एडवर्ड प्रेस्टन** हे आहेत, हें सांगण्याला मला फार आनंद वाटत आहे. ग्रंथकर्त्याच्या संकोचवृत्तीमुळें कदाचित् त्यानें आपलें नांव प्रसिद्ध होऊं दिलें नसतें ; ती संकोचवृत्ति कोणती हें सांगण्याचें जरी येथें कारण नाहीं, तरी त्यांचें नांव आपल्याला कळविणें हें माझें कर्तव्यकर्म आहे असें मी समजतों; व त्याप्रमाणें मी आपलें काम बजावलें. आतां मी आपला निरोप घेतों." असें ह्मणून लवून मुजरा करून तो निघून गेला.

त्याबरोबर फिरून टाळ्यांचा गजर झाला, व हजारों लोकांच्या तोंडून " शाबास, **एडवर्ड प्रेस्टन** शाबास," असा शब्द निघाला.

या वेळेला **मार्खम** देहभानावर आला; व ज्या वेळेला रंगभूमीला लागून असलेल्या जागेंत **इझाबेला** बसलेली एकदम त्याच्या दृष्टीस पडली त्या वेळेस तर त्याचा आनंद गगनांत मावेनासा झाला.

हा क्षण त्याच्या आयुष्यांतील मोठ्या सुखाचा होता. कारण, ती तेथें होती, व ह्याचा उत्कर्ष झालेला तिनें पाहिला होता.

फिरून " शाबास, **एडवर्ड प्रेस्टन** शाबास,"या आवाजानें सर्व नाटकगृह दणाणून गेलें.

नंतर जिकडे तिकडे शांत होऊन, सर्वजण **रिचर्ड**चें भाषण ऐकण्याविषयीं उत्सुक झाले.

आपल्याला, व आपल्या बरोबर असणाऱ्या सुंदर स्त्रीला प्रेक्षकजनांनीं एवढा मान दिला याबद्दल **मार्खम** आपली कृतज्ञता दाखविण्याकरितां भाषण करणार, तोंच त्या शांत झालेल्या नाटकगृहांतून एक चमत्कारिक आवाज निघाला.

" नाहीं नाहीं, त्याचें नांव **प्रेस्टन** नाहीं." असा शब्द निघाल्याबरोबर " गप रहा, बोलूं नका." असा चोहोंकडून एकच ओरडा झाला.

" त्याचें नांव—" फिरून तोच मनुष्य ह्मणाला.

" अरे त्याला हाकून द्या, त्याला बाहेर घालवा. " एक ह्मणाला.

" त्याचें नांव—" तोच मनुष्य बोलूं लागला.

" तोंड आटप—" दुसरा ह्मणाला.

" चूप रहा." तिसरा ह्मणाला.

" नाहीं नाहीं. त्याला हाकून द्या, हाकून द्या," चौथा ह्मणाला.

" त्याचें नांव **रिचर्ड मार्खम**—खोट्या नोटा करणारा. "

त्या दिवशींच्या आनंदाचा बिघाड करणारा असा हा शब्द माडीवरील एका कोपऱ्यांतून निघाल्याबरोबर, सर्व लोकांचा कोपाग्नि प्रदीप्त झाला; व " हें सब झूट आहे, हें कुभांड आहे, " असें सर्व ह्मणूं लागले.

" नाहीं नाहीं, मी ह्मणतों हेंच खरें आहे. त्याचें नांव **रिचर्ड मार्खम** आहे, व तो दोन वर्षे तुरुंगांत होता. " याप्रमाणें घोगरा व कर्णकटु असा आवाज निघाला.

त्याबरोबर एक काळीज भेदून जाणारी अशी किंकाळी ऐकूं आली. ती किंकाळी कोणा तरी स्त्रीची होती. नाटकगृहाच्या ज्या दिशेकडून ही आरोळी ऐकूं आली त्या दिशेकडे सर्वांचें लक्ष्य लागून गेलें; तों एक तरुण स्त्री, जिची कांति कोमेजून गेली आहे, अशी तिच्याबरोबर असलेल्या एका वृद्ध गृहस्थाच्या अंगावर मूर्छित होतांना दृष्टीस पडली.

तोंच दुसऱ्या भागांत दुसरी एक तरुण स्त्री, जिचा वर्ण फटफटीत झाला आहे, जिच्या सर्वांगाला कंप सुटला आहे व जी मानसिक दुःखाच्या तीव्र तापानें ग्रासली आहे, अशी आपल्या बापाच्या अंगावर बेशुद्ध पडली.

याप्रमाणें, त्या वज्रप्राय कठोर शब्दाचा, त्या आश्चर्यचकित झालेल्या **मेरि–ॲन**च्या व त्या एकनिष्ठ **इझाबेले**च्या कोमल अंतःकरणावर परिणाम झाला.

या वेळेला जिकडे तिकडे गोंधळ माजला. आपापली जागा सोडून लोक उठूं लागले. व इतका वेळ जें नाटकगृह होतें तें आतां बलबलपुरी आहे असें वाटूं लागलें.

जसा एखादा अपराधी न्यायासनासमोर उभा राहतो त्याप्रमाणें **मार्खम** लज्जेनें भांबावून जाऊन कांहीं वेळ प्रेक्षकसमुदायासमोर स्तब्ध उभा राहिला. व **एलन**ही आपलें देहभान विसरून धीर येण्याकारितां त्याला धरून राहिली.

सरते शेवटीं त्या दुर्दैवी मार्खमनें एलनला एकदम हातानें धरून, लोकांच्या दृष्टीवेगळी केली, व त्याबरोबर पडदा पडला.

मग तर लोकांनीं फारच उच्छाद मांडला. कोणी ह्मणत कीं, ज्यानें एवढा घोंटाळा केला त्याला धरून एकदम पोलिसाच्या स्वाधीन करावा; परंतु माडीवरच्या लोकांनीं सांगितलें कीं, तो मनुष्य नाहींसा झाला. कोणी ह्मणाले कीं, त्यानें सांगितलेला प्रकार खरा आहे कीं नाहीं याची चौकशी करावी. तळ मजल्यावरील लोकांचें असें ह्मणणें पडलें कीं, या गोष्टी जरी खऱ्या असल्या तरी, तो उत्तम नाटककर्ता आहे; या गोष्टीचा याशीं कांहीं संबंध नाहीं. राखून ठेवलेल्या जागेंतील गृहस्थ ह्मणूं लागले कीं, घोर अपराध करून शिक्षा भोगलेल्या मनुष्याला आम्ही आश्रय देऊन कधींही चार चौघांत वागूं देणार नाहीं. अशा प्रकारचे कोणाचे कांहीं, कोणाचे कांहीं तर्कवाद चालून एकच गोंधळ चालला होता.

कांहींजणांनीं तर असला डांबीस मनुष्य थोर लोकांच्या बायका मुलीं-पुढें आणल्याबद्दल नाटकाच्या मालकाची फारच निर्भत्सना केली. पण चमत्कार असा कीं, असल्या नीतिभक्तांच्या तोंडून, ज्यांनीं आपला दुराचार किंचित्मात्रही झांकला नाहीं; व ज्यांनीं, आम्ही ह्मणजे नाट्यकलेचें केवळ भूषण आहों असें समजून रात्रींच्या रात्री रंगभूमीवर नाचण्यांत घालविल्या, अशा नीतिभ्रष्ट स्त्रियांच्या संबंधानें एकही शब्द निघूं नये, किंवा, एक शिक्षा भोगलेला मनुष्य लोकांपुढें आला ह्मणून नुकतेंच ज्या थोर लोकांच्या बायका-मुलींचें पावित्र्य भ्रष्ट झालें त्यांच्याच शेजारीं बसण्याकरितां दुराचाररत लोकांच्या झुंडीच्या झुंडी आसपास पसरलेल्या मद्यगृहासारख्या ज्या हलकट ठिकाणांतून बाहेर पडतात, त्यांची त्यांना एकवारही आठवण होऊं नये; व ज्याच्या, लोकांपुढें येण्यापासून प्रमाद घडण्याचा संभव तर मुळींच नाहीं, परंतु उलट जो त्यांचें मनोरंजन करण्याला कारण झाला, त्याच्या विषयीं मात्र त्यांनीं तिरस्कार दाखवावा, हें केवढें आश्चर्य आहे बरें? असो.

इतका वेळ नुसती तोंडाची बडबड चालली होती. परंतु आतां हातांनीं आपल्या कामास सुरुवात केली. जेवढे प्रतिष्ठित लोक होते तेवढे नाटकगृहांतून निघून गेल्यावर तिसऱ्या मजल्यावरील व तळ मजल्यावरील मंडळींनीं आपल्या करमणुकीस सुरुवात केली. मग काय? कोणीं बाकें फेकलीं, कोणीं खडे मारण्याचा सपाटा चालविला, व कोणीं एकमेकांच्या टोप्या फेकून देण्यास

आरंभ केला, अशा प्रकारचा एकच दंगा माजून राहिला; परंतु थोड्या वेळां-तच पोलिसचे शिपाई येऊन बंदोबस्त झाला ह्मणून बरें झालें. नाहीं तर पुष्कळच नुकसानी झाली असती.

एवढ्या अवधींत **मार्खम**ला व **एलन**ला पडद्यांत बसवून त्यांच्या मनाला पुन्हां हुशारी येण्याकरितां त्यांच्याकडून मद्यपान करविलें. या वेळेला त्यांच्याजवळ नाटकाचा मालक एकटाच होता. **रिचर्ड**चें भडकलेलें मन कांहींसें जाग्यावर आल्यावर आपण एका भयंकर स्वप्नांतून जागें झालों कीं काय असें त्यास वाटलें. परंतु तो दुर्मुखलेला नाटकाचा मालक त्याच्या दृष्टीस पडतांच, त्याचा सर्व भ्रम नाहींसा होऊन त्याला झालेला सर्व प्रकार खराच आहे असें वाटू लागलें, व त्याला पाहून **मार्खम** आपलें तोंड दोन्ही हातांत झांकून ढसाढसा रडूं लागला.

"खरोखर," नाटकाचा मालक ह्मणाला, "ज्या दिवशीं प्रथम तुम्ही माझ्याकडे आला तो दिवस तुह्माला व मला फार वाईट होता. या धंद्यांत आतां माझी फार नुकसानी होईल. तुमच्या ठिकाणीं विलक्षण बुद्धि आहे, पण तुह्माला आतां या धंद्यांत यश यावयाचें नाहीं. एकीकडे यशाचा पूर्ण वांटा तुह्माला मिळाला, तों दुसरीकडून अपकीर्तीचा दुःसह डाग सहन करावा लागला. विजय संपादन केला नाहीं तोंच पराभव, असा प्रकार कधीं झाला नव्हता. आतां तुमच्या बुद्धीच्या प्रभावानें ह्मणजे लोकांचें मन फिरेल असें कधीं होणार नाहीं. कांहीं असो. मी तुह्माला दोष देत नाहीं. तुमचें पूर्ववृत्त सांगण्याविषयीं मीं तुह्माला कधीं विचारलेंच नाहीं, व आज तरी तुह्माला पुढें नेण्याला मीच कारण झालों.

त्याचें हें कळवळ्याचें भाषण ऐकून **मार्खम**च्या मनाला जरा समाधान झालें. तो कांहीं वेळानें ह्मणाला:" असल्या या घातकी नाटकाकरितां तुह्मीं जे मला पैसे दिले होते ते मी तुमचे उद्यां परत करीन."

"छेः छेः छेः, तुमच्या या उदार स्वभावानें, तुमची किम्मत माझ्या मनानें पन्नास पटीनें जास्त वाढली आहे."

"खरोखरच, हे उदार आहेत बरं, फार उदार! माझे व माझ्या बापाचे हेच अन्नदाते आहेत. यांच्याच येथें आह्मी राहतों, व या वेळेपर्यंत आमचा धंदा एकमेकांना ठाऊकही नव्हता." **एलन** ह्मणाली.

"हा मोठा चमत्कार आहे. पण आजच्या योगानें माझ्या मंडळीचें जें

गुल्य जीवन तें तर नाहींसें होणार नाहीं ना ? " नाटकाचा मालक ह्मणाला.

" होय. यापुढें मी या धंद्यांत राहणार नाहीं. इतके दिवसपर्यंत मला याची मनापासून आवड होती ; पण आतां मला एकदम तिटकारा आला आहे. " **एलन**नें निक्षून सांगितलें.

असलें उपयोगी पात्र आपल्या हातून जातें ह्मणून त्याला भीति पडून तो ह्मणाला: " थोडे दिवस विश्रांति घेतली ह्मणजे तुझें मन फिरून वळेल असें मला वाटतें. "

त्या सुस्वभावाच्या गृहस्थाला जास्ती वाईट वाटूं नये ह्मणून **एलन**नें इतकेंच सांगितलें कीं, " मी विचार करीन. "

दोघांचें बोलणें झाल्यावर **मार्खम** जाण्याकरितां उठला; परंतु त्याला मालकानें सांगितलें कीं, " तुह्मी दोघांनीं एकदम बाहेर पडणें चांगलें नाहीं. कारण अजूनही खोडसाळ लोक रस्त्यांत असतील. शिवाय, तुमची दोघांची ओळख आहे, हें माझ्या मंडळीला न कळेल तितकें बरें. नाहीं तर विनाकारण **एलन**च्या नांवास कमीपणा मात्र येईल. "

**मार्खम**ला ही सूचना मनापासून आवडली. शेवटीं असें ठरलें कीं, **मार्खम**नें आंतल्या दारानें जावें, व **एलन**नें नेहमींप्रमाणें जावें. परंतु त्यांनीं जाण्यापूर्वी आपसाआपसांत असा ठराव केला कीं, आज घडलेल्या प्रकारासंबंधानें, व एकमेकांच्या धंद्यासंबंधानें कोणीं अवाक्षरही काढूं नये.

कोणाच्याही दृष्टीस न पडतां **मार्खम** नाटकगृहांतून बाहेर पडला. मानहानि झालेला, खिन्नमनाचा, उद्विग्नचित्त, व दुर्लौकिकाच्या दुःसह भारानें वांकलेला असा हा आपल्या घराकडे घाईनें चालला असतां, जिला मूर्च्छा येत आहे अशी **इझाबेले**ची मूर्ति याच्या डोळ्यासमोर दिसत होती, व हृदय भेदून जाणारी **मेरी-अन**ची किंकाळी याच्या कर्णपुटांत घोळत होती.

परंतु एक केवढी भयंकर गोष्ट त्याला कळून आली ! त्याचा पूर्ण वैरी—त्याच्या हाडीं खिळलेला त्याचा शत्रु—ज्याची कधींच रक्षा झाली असें वाटत होतें—तो मृत्युमुखांतून सुटलेला पाहून, आमच्या या हतभागी नायकाला समजून चुकलें कीं, या दुष्ट **सैताना**च्या दीर्घद्वेषरूप अग्नींत माझ्या पुढील सर्व आशेची आहुति होणार.

# भाग १२.

## एक हुजऱ्या.

**एलन**नें आपला सोंगाचा पोषाख उतरून नेहमींचा पेहराव केला, व नाटक मंडळीपैकीं कोणाचाही निरोप न घेतां ती त्या जागेंतून निघाली.

ती दरवाज्यांतून बाहेर निघाल्यावर रस्त्यांत घोटाळत असलेले कांहीं लोक तिनें पाहिले. हे लोक बहुतकरून **मार्खम**ला पाहण्याच्या उद्देशानें धांवलेले असावेत. कारण, तो न कळत निघून गेला हें कोणाला ठाऊक नव्हतें. तिनें तोंडावरून बुरखा घेण्याच्या पूर्वी त्या मंडळींतून, एक आडदांड, भेसूर तोंडाचा, पिंजारलेल्या भिवयाचा, व कावेबाज मनुष्य तिच्याकडे न्याहाळून गेला; त्यामुळें तिच्या पोटांत थोडीशी भीति उत्पन्न झाली. परंतु दैवयोगानें जवळच एक गाडी उभी असून तिचा हाकणारा दार उघडून उभाच होता. जणुं कांहीं तो कोणाची वाटच पहात आहे. त्यानें " गाडी पाहिजे कां ? " ह्मणून विचारल्याबरोबर, **एलन**नें होय ह्मणून सांगून, आपल्या ठिकाणाचा पत्ता सांगितला व लागलीच ती गाडींत बसली. त्याबरोबर गाडीवाल्यानें दार बंद केलें, व तो गाडीवर बसला.

तिला गाडींत बसलेली पाहिल्याबरोबर वर सांगितलेल्या आडदांड मनुष्यानें गाडीवाल्याला कांहीं खूण केली, व नंतर गाडी जोरानें चालूं लागली.

दुसरी एक गाडी कांहीं अंतरावर उभी होती. त्या गाडींत हा आडदांड मनुष्य जाऊन बसला. दुसरा एक मनुष्य या गाडींत पूर्वीच बसलेला होता. त्यानें हा मनुष्य येऊन बसल्यावर यास विचारलें: " कसें काय ? काम झालें?" त्याबरोबर यानें 'झालें' ह्मणून सांगितलें; व ही दुसरीही गाडी या दोन मनुष्यांना घेऊन पहिलीच्या पाठीमागून जोरानें चालूं लागली.

इकडे **एलन** गाडींत आंग टाकून स्वस्थ पडल्यावर आपल्या विचारांची धांव तिनें मोकळी सोडली.

प्रथमतः त्या दिवशींचाच प्रकार तिच्या मनांत येऊन ती आपल्या मनाशीं बोलूं लागली: " खरोखर, आजचा चमत्कार एखाद्या कादंबरींत वर्णन करण्यासारखा घडून आला यांत शंका नाहीं. इकडे जेव्हां मी नाटकांत नाचण्याचें काम करीत होतें, तेव्हां तिकडे **मार्खम** नाटक रचण्याच्या नादीं लागला होता. तिकडे त्यानें आपला धंदा गुप्त ठेवला होता, त[illegible]

चालला होता. त्याप्रमाणेंच ज्या मालकाचा त्यानें आश्रय संपादिला होता, त्याच मालकानें मलाही हातीं धरलें होतें. त्यानेंही आपलें नांव बदललें होतें व मलाही तसेंच करणें भाग पडलें होतें. कर्मधर्मसंयोगानें त्याच्याच नाटकांत सोंग घेण्याचा मला प्रसंग येऊन माझ्या बुद्धिसामर्थ्यानें त्याला रंगही बराच आला, व दैवयोगानें आम्हां दोघांचीही चांगली वाहवा झाली. आणि शेवटीं मात्र वज्राप्रमाणें भयंकर तो अपवाद येऊन त्यानें त्याला आनंदपर्वतावरून दुःखसागरांत लोटून दिलें—त्याच्या नांवाचा दुर्लौकिक झाला—व त्याच्या वैभवाला लाज आणली. " अशा तऱ्हेचे तिचे कल्पनातरंग चालत असतांना तिला वाटलें कीं, तो प्रसंग त्याच्यावर नाहीं माझ्यावर आहे. उघडच आहे. तो तिचा अन्नदाता होता, व ती त्याला पूज्य मानीत होती. त्यामुळें जों जों ती घडून आलेल्या गोष्टीसंबंधानें विचार मनांत आणी, तों तों त्याच्या दुःखाचा अनुभव मीच घेत आहें कीं काय असें तिला वाटे.

नंतर चित्रकाराच्या येथें जाण्यास आरंभ झाल्यापासून तें तहत नाटकांत येथ येईपर्यंत, पोटाकरितां ज्या ज्या अवस्थांतून तिला यावें लागलें त्या त्या सर्व क्रमशः तिनें मनांत आणल्या. चित्रकार व चितारी वगैरे धंदेवाले लोकांना आपल्या तोंडाचे, व शरिराचे ठसे व नमुने वगैरे देऊन तिनें आपल्या अवयवांचा विक्रय चालविलाच होता; परंतु थोड्याशा पैशाकरितां आपलें बिनमोल जें कौमार्य तें मुद्दां ती गमावून बसली होती. त्यानंतर राहिलेली निद्रावस्था तीही त्या मोहनीविद्या जाणणाराच्या उपयोगांत आणून, शेवटीं सर्व गोष्टींचा कळस करण्याकरितां नाटकांत नाचून हजारों लोकांचीं मनें गार करून टाकलीं; आणि आपल्यापैकीं आतां शारीरिक किंवा मानसिक असा कोणताच भाग विक्रय करण्याकरितां शिल्लक राहिला नाहीं असें पाहून ती सचिंत बसली.

अशा तऱ्हेच्या विचारांत कांहीं वेळ गेल्यावर ती एकदम शुद्धीवर येऊन खिडकीकडे पाहूं लागली. या वेळेला स्वच्छ चांदणें पडलें होतें, व हेमंतऋतूचे दिवस असल्या कारणानें थंडी कडक पडली होती. गाडी ज्या रस्त्यानें चालली होती त्याच्या दोन्ही बाजूला कांहीं वठलेलीं झाडें असून तो प्रदेश तिच्या दृष्टीला चमत्कारिक आणि नवाच भासत होता. **मार्खम**च्या घरीं नित्यशः जातांना जे रस्ते तिच्या ओळखीचे होते त्यांहून या भागाची दोन्ही दिशेकडील रचना तिला निराळी वाटली. ह्मणून खिडक्यांचीं दारें खालीं करून आसपासचा भाग ती विशेष लक्षपूर्वक पाहूं लागली. तों तिला भीति

उत्पन्न होऊन तिची खात्री झाली कीं, गाडीवाला निःसंशय रस्ता चुकला असावा. ह्मणून तिनें त्याला हाक मारून, " तूं रस्ता चुकलास ना " ह्मणून सांगितलें; परंतु त्यानें गाडी हाकतां हाकतांच, ' तुमच्या घरीं जाण्याला पुष्कळ रस्ते आहेत, तुह्मी भिऊं नका ' असें उत्तर दिलें.

हें ऐकून तेवढ्या वेळेपुरती तिची भीति नाहींशी झाली. व भोंवतालचा प्रदेश पाहण्याकरितां ती खिडकीच्या बाहेर तोंड काढून पहात आहे, तों तिच्या गाडीच्या पाठीमागून दुसऱ्या एका गाडीचा आवाज तिच्या कानीं आला.

अन्य प्रसंगीं हा प्रकार पाहून दुसरा तिसरा कांहीं विचार तिच्या मनांत आला नसता. परंतु या वेळेला **एलन**ला आणखी एखादें अरिष्ट येणार आहे कीं काय असें वाटूं लागलें. मग असें वाटण्याचें कारण, नाटक संपल्यावर झालेला प्रकार असो, किंवा आतांच तिच्या मनांतून येऊन गेलेले विचार असोत, अथवा दोन्हीही गोष्टी कारण असोत, तें आह्माला सांगतां येत नाहीं. आह्माला इतकेंच माहीत आहे कीं, अशा प्रकारची तिला भीति वाटूं लागली. व इतक्यांत, थोड्या दिवसांपूर्वी आलेल्या गुप्त पत्राची व त्यांतील मजकुराची तिला आठवण झाली. त्याबरोबर तिनें गाडीवाल्याला पुन्हां हाक मारली. परंतु या वेळेला त्यानें मुळींच उत्तर न देतां गाडी तशीच हाकली ; व थोड्या वेळानें त्या ओसाड रस्त्याच्या बाजूला एकटेंच एक झोपडें उभें होतें, त्याच्या दारापुढें आणून ती उभी केली. तों दुसरीही गाडी येऊन थडकली.

त्या गाडींतून एक मनुष्य येऊन त्यानें **एलन**च्या गाडीचें दार उघडलें व तिला खालीं उतरण्यास सांगितलें.

हा मनुष्य उंच असून वयातीत दिसत होता. याचे डोळे काळे भोर असून याच्या तोंडावरून हा चांगला मनुष्य असावा असें वाटत होतें; व याची बोलण्याची तऱ्हा, हा दुसऱ्या देशांतला असावा असें दाखवीत होती. त्यानें खालीं उतरावयास सांगितल्याबरोबर ती ह्मणाली:—

" कां बरें ? तुह्मी कोण व मी कोठें आलें हें सांगा अगोदर ? "

" तुह्मी कोठें असलांत तरी तुमच्या केसाला धक्का नाहीं. परंतु एक गृहस्थ तुमची वाट पहात आहे." तो मनुष्य ह्मणाला.

" एक गृहस्थ ! तो **ग्रीनवूड** असेल ? "

" होय. तरी पण तुह्मी भिऊं नका. "

**एलन** जात्याच धीट स्वभावाची असे. शिवाय, तिच्यावर निरनिराळे प्रसंग

येत गेल्या कारणानें तिचें मनही कठीण बनलें होतें. आपण या वेळेला राक्षसाच्या दाढेंत सांपडलों आहोंत, तेव्हां सुटण्याकरितां कांहीं दांडगाई केली तर फायदा न होतां अपायच होणार, करितां सोयीनें व दृढ मनानेंच काय होईल तें करावें, असा तिनें विचार मनांत आणून, ती त्या मनुष्याबरोबर घरांत गेली. परंतु प्रथमतः **ग्रीनवूड**च्या बाहुपाशांत इला आणून सोडणारी जी महामायावी थेरडी तिलाही या ठिकाणींच पाहून **एलन**ला किती आश्चर्य वाटलें असेल याची कल्पना वाचक करतील.

**एलन** घरांत गेल्यावर हा उंच मनुष्य परत आला व त्यानें **एलन** ज्या गाडींतून आली त्या गाडिवाल्यास थोडा वेळ थांबण्यास सांगितलें. नंतर दुसऱ्या गाडींतून त्याच्या बरोबर आलेल्या त्या भेसूर तोंडाच्या मनुष्याकडे येऊन तो ह्मणालाः—" तुझें कांहीं आतां कारण नाहीं. तिनें गडबड वगैरे कांहीं केली नाहीं. हें तुझें बक्षीस घे, व आलेल्या गाडींतून तूं परत जा. "

" ठीक आहे. तुमच्या धन्याला माझें ठिकाण ठाऊक आहेच. जरूर लागेल तेव्हां कळवा. राम राम " **सैतान्या** ह्मणाला. व तो जसा गाडींत जाऊन बसला तसा हा मनुष्य **ग्रीनवूड**ला येऊन भेटला.

" कसें काय **फिलिपो**? काम झालें ? " **ग्रीनवूड**नें हळूच विचारलें.

" होय सरकार. कांहीं जुलूम केल्याशिवाय आपलें काम झालें. आतां ती स्त्री आपल्या अगदीं ताब्यांत आली. "

" मला वाटलेंच, हें काम तुझ्याशिवाय होणार नाहीं. **लाफर** हा देखील इमानी मनुष्य आहे, व तो माझ्याकरितां पाहिजे तें करण्याला तयार होईल. पण असल्या या नाजूक कामांत बेटा अगदींच अडाणी आहे. तुझ्यासारखें काम दुसऱ्याकडून होणार नाहीं. "

" सरकारांनीं ही माझी फारच स्तुति केली. " **फिलिपो** मुजरा करून ह्मणाला.

" ही कांहीं स्तुति नाहीं. माझ्या चाकरीस राहिल्यापासून मी तुझ्यावर तीन चार कामें सोंपविलीं होतीं. तीं तुझ्याकडून होण्यासारखीं तितकीं चांगल्या रीतीनें बजावलीं गेलीं; व जरी शेवटीं त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं, तरी तो कांहीं तुझा दोष नाहीं हें मला पक्कें ठाऊक आहे. "

" महाराजांच्या लक्ष्यांत असलें ह्मणजे झालें. "

" आतां या हट्टी मुलीची एकवार मला भेट घेतली पाहिजे."

" तर मग ज्या गाडींतून ती आली ती गाडी लावून द्यायची का ? "

"ठीक आहे, जाऊं दे त्या गाडीला परत. तुला येथेंच राहायाचें आहे रात्रींचें आज."

ग्रीनवूडचा असा हुकूम मिळाल्यावरोबर, हा हुजऱ्या, ज्या गाडींतून एलनला आणली होती त्या गाडीवानाकडे आला; व त्यास ह्मणाला: " या वेळेपर्यंत काम केल्यावद्दलची ही तुझी मजूरी; आतां आणखी कांहीं मिळविण्याचें तुझ्या मनांतून आहे? "

" हें काय विचारावें महाराज ? " तो ह्मणाला.

" तर मग त्या पलिकडच्या रस्त्यावर आपली गाडी हाक. तेथें माझ्या धन्याचें एक धान्याचें कोठार आहे. त्यांत तुझें गाडी घोडें सोड. तेथें गवतापाण्याची सर्व सोय आहे. तेथें मी येईपर्यंत स्वस्थ ऐस ह्मणजे झालें."

या हुजऱ्याच्या सांगण्याप्रमाणें गाडीवाल्यानें आपली गाडी तेथें नेलेली पाहून हा घराकडे परत आला.

इकडे एलनचें शरीर आणि मन अगदीं अस्वस्थ झाल्या कारणानें ती घरांत आल्यावरोबर पलंगावर आपलें अंग टाकून पडली. तों ही थेरडी लुब्रेपणा करण्याला जवळ तयार होतीच. ती पडल्यावरोबर इनें आपली वटवट करण्यास सुरुवात केली. " फिरून आपली गांठ पडली. तूं कांहीं त्यावर मग माझ्याकडे आली नाहींस. परंतु मी दुरून तुझें कसें काय चाललें होतें तें पहात होतें. खरंच सांग, माझ्यामुळें किती चांगल्या चांगल्या गोष्टी तुझ्या दृष्टीस पडल्या बरें? "

"जर तुझ्या मनांतून माझें काम करावें असें असेल तर माझी एवढी सुटका कर. ह्मणजे तुला मी पुष्कळ पैसे देईन. " एलन ह्मणाली.

" तुझी सुटका करण्यावद्दल तूं जर मला एकपट पैसा देशील, तर तुला अटकेंत ठेवण्यावद्दल मला त्याच्या दुप्पट मिळेल समजलीस? " थेरडी ह्मणाली.

" तुला ज्यानें येथें बोलाविलें तो काय देणार हें मला सांग ह्मणजे मी त्याच्याही दुप्पट देईन."

" अग पोरी, असें करण्यांत काय अर्थ आहे? मी सांगतें तें ऐक. चांगल्या चांगल्या गाड्या घोडे बसायला मिळतील. उंचीं उंचीं वस्त्रें फाडायला सांपडतील. उत्तम उत्तम जवाहीर अंगावर पडेल. उन्हाचे किरण मुद्धां अंगावर

पडणार नाहींत असें काय वेड पांघरतेस ? मी जर तुझ्या ठिकाणीं असतें तर मीं असें कधीं केलें नसतें. ''

" गप्प बैस थेरडे. '' ती चवताळून बोलली.

तरी या थेरडीला कांहीं लाज न वाटून ती पुन्हां बोलूं लागली. " तूं जरी कितीही कडकपणानें बोललीस तरी मला कांहीं त्याचें वाटत नाहीं. तुझ्या सारख्या हटेल्या मुली मी पुष्कळ पाहिल्या आहेत. प्रथम त्या असेच नखरे करीत असतात. पण वेळेवर मग चट ऐकतात. '' असें ह्मणून तिनें मोठ्या गंभीरपणानें मान हालविली, जणूं कांहीं तिनें एक नीतिशास्त्रांतली प्रमाणसिद्ध गोष्ट बोलून दाखविली.

**एलन**नें तिच्याकडे मुळींच लक्ष्य दिलें नाहीं. या थेरडीनें मात्र आपली बटबट तशीच चालविली. ती ह्मणाली:—" अग, मीही तुझ्यासारखी तरुण रूपवान् होतें. पण कांहीं तुझ्यासारखा असा पायावर धोंडा पाडून घेत नव्हतें. मी असे चैनींत दिवस घालविले आहेत कीं, मला आतां त्यांची अठवण करवत नाहीं. माझ्याजवळ पुष्कळ पैसा जमला असता; पण मी तो एका हातानें मिळवीत असे आणि दुसऱ्या हातानें खर्च करीत असें. आतां माझें तूं ऐक. **ग्रीनवूड**ला होय ह्मण. तो देखणा आहे, पैसेवाला आहे—''

हें तिचें पुराण आणखी पुढें चाललें असतें; पण आतां ज्याचें तिनें नांव घेतलें तोच आल्या कारणानें तें तसेंच बंद ठेवलें, व आपण ती खोली सोडून गेली.

ती गेल्यावरोबर **एलन** आपल्या जागेवरून उठून तिरस्कारानें त्याशीं बोलूं लागली. " **ग्रीनवूड** असा हा भागूबाईसारखा माझ्यावर जुलूम करणारे तुह्मीच ना हे ? ''

" प्रिये, त्याला जुलूम ह्मणूं नकोस ''

" तर काय ह्मणूं ? **ग्रीनवूड**, जर तुमच्या अंगीं कांहीं मोठेपणा असेल, जर तुमच्या ठिकाणीं तुमच्या मुलाच्या आईबद्दल थोडीशी दया वसत असेल, तर मला आतांच्या आतां जाऊं द्या. ह्मणजे मी हें सर्व विसरून जाईन.''

" वेडे मुली, तुला असें का वाटतें कीं, मीं जे एवढे श्रम घेतले आहेत ते तुझ्या क्षुल्लक दमकावण्याला भ्यावें, ह्मणून घेतले आहेत ? किंवा तुला जी येथें आणली आहे, ती फक्त येथें आणून लागलीच सोडून देण्याकरितां काय ? असें नाहीं बरें. **एलन**, तुला काय सांगूं ? तुझ्यावर जें माझें प्रेम बसलें आहे, तुझ्या ठिकाणीं जें माझें मन गुंतलें आहे—''

" हीं भाषणें पुरे करा **ग्रीनवूड,**" **एलन** मध्येंच ह्मणाली, " तुह्मांला पक्कें ठाऊक असूं द्या कीं, तुमच्या या गौडबंगालानें जशा इतर स्त्रिया फसल्या तशी मी फसली जायची नाहीं."

" तर मग **एलन,** तुला मी स्पष्ट सांगतों कीं, तुला मी आपलीशी करीन—सर्वतोपरीं आपलीशी करीन व मीही तुझ्याशीं आमरण इमानानें वागेन."

" फक्त माझ्या पोराकरितां मी तुमची बायको होईन. याशिवाय दुसऱ्या कोणत्याही अटीवर मी तुमचा सहवास करूं इच्छीत नाहीं; आणि जर तुह्मी आपल्याच इच्छेप्रमाणें करून घेण्याकरितां माझ्यावर बलात्कार कराल, तर मी तुम्हाला खचीतच सांगतें कीं, त्या क्षणींच मी तुमचे सर्व बाहेर काढीन—तुमच्या सर्व गोष्टी उघडकीस आणीन—तुह्मी कोण आहांत हें जगाला महशूर करीन, व तुह्मी ज्याला लुटून एवढी संपत्ति मिळविली तो तुमचा—"

" हं! तोंड आवर **एलन,**" **ग्रीनवूड** रागानें बोलूं लागला: " तुला सांगून ठेवतों कीं, माझ्या गुप्त गोष्टींपैकीं एक शब्द बाहेर पडूं दे कीं, तुझ्या सर्व गोष्टी बाहेर निघाल्याच ह्मणून समज. मग याचा परिणाम कोणता तो तुला ठाऊकच आहे. तो हाच कीं, तुझ्या प्रिय बालकाच्या मस्तकावर तुझ्या बापाच्या शिव्याशापांचा वर्षाव. याशिवाय दुसरा कोणता नाहीं!"

" बेहेत्तर आहे, मी त्या परिणामाला मुळींच जुमानीत नाहीं—त्याप्रमाणें माझ्या हातून घडलेल्या व्यभिचाराचीही लज्जा मी धरीत नाहीं—फार तर काय? पण तुह्मी ज्या कार्याचे जनक आहांत त्याच्यादेखील जिवाची पर्वा करीत नाहीं. जें होणें असेल तें होईल; परंतु तुमच्या विषयवासनेला ह्मणून कधीं बळी पडायची नाहीं; किंवा तुमचा सूड घेतल्याशिवाय तुह्माला कधींही अनुकूल व्हायची नाहीं. तुह्मांला वाटलें असेल कीं, मी तुमचें निमूटपणें सर्व ऐकून घेऊन, तुह्मीं माझ्याशीं जो अधमपणा केला तो जगाला कळविणार नाहीं; व तुमची कोणतीही गोष्ट उघडकीस आणणार नाहीं. पण हें तुमचें वाटणें अगदीं चुकीचें आहे. तशीच माझ्या बापाची व माझ्या अन्नदात्याची जी तुह्मी मला भीति घातलीत तीही चुकीची आहे. त्यांच्यापुढें त्यांच्या पायां पडून मला एकच गोष्ट कबूल करावी लागेल; आणि ती हीच कीं, तुह्मी जो माझ्याशीं नीचपणा केलात त्याचा कळस!"

" ठीक आहे तर **एलन.** ज्याप्रमाणें तुझा निश्चय झाला त्याप्रमाणेंच माझाही झाला आहे. तुझ्यावर कोणताही मी जुलूम करीत नाहीं. परंतु तुला

येथें अटकेंत मात्र ठेवली आहे. एकांतवास आणि एकच प्रकारची त्रासदायक स्थिति यांपुढें तुझा हा दृढ निश्चय तेव्हांच ढळून जाईल. मग तूंच होऊन, घटकाभर माझ्या सहवासाला तरी असा, ह्मणून माझी आर्जव करायाला येशील. या ठिकाणाहून सुटका होण्याची तर आशाच नको.कारण या घराच्या भोंवतालीं माझे पहारेकरी हिंडत आहेत. एखादा चोर धरून आणावा त्याप्रमाणें ते तुझ्यावर दिवस आणि रात्र,दृष्टि ठेवतील.आणि जेव्हां, त्या भटुरग्यांनीं शोधून काढलेल्या मंत्रतंत्राच्या पोकळ बंधनाशिवाय—त्या शृंखला मी आपल्या गळ्यांत कदापि अडकवून घेणार नाहीं—मी तुमची आहें, असें ह्मणण्याला तूं राजी होशील, त्या वेळेस सुखोपभोगाच्या जेवढ्या वस्तु आहेत त्या प्रत्येक तुझ्यापुढें आणून मांडीन, तुझी कोणतीही इच्छा असली तरी ती पूर्ण करीन, तुला आनंद होण्याविषयीं अविश्रांत श्रम करीन, सारांश, त्या माकडचेष्टांनीं तुझा पति होण्यापेक्षां, ज्या योगानें तूं अधिकाधिक माझ्या प्रेमपाशांत बद्ध होशील त्या गोष्टी मी करीन, हा माझा निश्चय आहे. तोंपर्यंत तुझ्या बापानें चिंता करूं नये ह्मणून, कांहीं कारणाकरितां तुझें येणें होत नाहीं, अशा अर्थाच्या खुशालीच्या दोन ओळी त्याला पाहिजे तर लिही. आतां मी जातों. ही तुझी बसण्याची जागा, निजायची जागा माडीवर आहे. ही ह्मातारी, ही तुझ्या ओळखीची आहेच. ही तुझ्या दिमतीला दिली आहे. चाहील ती वस्तु घरांत आणून ठेविली आहे. हुकूम करण्याचा अवकाश. पण पुन्हां सांगतों, सुटून जाण्याचा विचार करूं नका. तो साध्य होणें नाहीं, पत्र लिहावयाचें मनांत असेल तर लिही, व तुझ्या चाकराजवळ दे. आतां उशीर झाला. एक वाजला. स्वस्थ असा.'' **एलन**नें मुळींच उत्तर केलें नाहीं,असें पाहून **ग्रीनवूड** निघून गेला.

तो निघून गेल्यावर तिनें खिडकीकडे जाऊन तिच्यावरील पडदा बाजूला केला. तों ती खिडकी बंद केलेली नाहीं असें पाहून तिला थोडेंसें आश्चर्य वाटलें. कारण **ग्रीनवूड**च्या भाषणावरून तिला वाटलें होतें कीं, या खोलींतून सुटून जातां येऊं नये ह्मणून, बहुतकरून कडेकोट बंदोबस्त केला असेल. परंतु लागलीच या घराभोंवतीं पहारेकरी हिंडत आहेत या सांगण्याचें तिला स्मरण झाल्यावरोबर,तिचें अंतःकरण खचून गेलें. पुढें कांहीं वेळ विचार केल्यावर तिनें निश्चय केला कीं, उजाडेपर्यंत स्वस्थ रहावें, व उजाडलें ह्मणजे घराची व आसपासच्या वस्तीची रचना पाहून मग सुटण्याच्या मार्गास लागावें.

तिला अगदीं दमल्याप्रमाणें वाटत होतें. ह्मणून तिनें थोडासा फलाहार

केला. नंतर दिवा घेऊन निजण्याकरिता माडीवर गेली, व आंतून दार बळकट लावून घेऊन, **ग्रीनवूड**नें सुचविल्याप्रमाणें बापाला पत्र लिहावें कीं नाहीं ह्मणून विचार करीत बसली. त्या ह्मातान्याला काय वाटेल या संबंधानें तिला मोठी चिंता पडली. **ग्रीनवूड** तर आपल्याला उघड रीतीनें सर्व हकीकत लिहूं देणार नाहीं, व त्यानें सांगितल्याप्रमाणें मोघम लिहावें तर बापाचें समाधान होणार नाहीं, अशा प्रकारें ती गोंधळांत पडली. शेवटीं, सर्वांपेक्षां कांहींच करूं नये हें बरें, असा तिनें आपल्या मनाचा विचार केला.

पुन्हां एकवार खोलीच्या बंदोबस्तीची खात्री करून घेऊन तिनें निजण्याचा विचार केला. नंतर अंगावरील वस्त्रें काढून त्या खोलींत असलेल्या एका मोठ्या आरशाजवळ गेली, व जरी अशा त्रासदायक स्थितीमध्यें ती होती तरी आपल्याला क्षणभर त्या आरशांत मोठ्या आनंदानें व गर्वानें नखशिखांत तिनें पाहून घेतलें. कारण आलीकडे सौंदर्याभिमान हा तिच्या स्वभावांतील मुख्य घटक बनून, तिला ज्या प्रकारचें आयुष्य घालविणें भाग पडलें होतें, त्या योगानें त्याची बीजोत्पत्ति व जोपासना होऊन, नंतर तो पूर्णावस्थेंत आला होता.

खरोखरच, तिचें सौंदर्य असें होतें कीं, त्याचा गर्व धरण्याला तिला पूर्ण हक्क होता. एखाद्या कुशल चितान्याच्या चित्रपटावर शोभण्यासारखें तिचें मुख त्या आरशांत तिच्या नेत्राला प्रतिबिंबित होतें. त्या आरशांत, जिचा मनोहर उंच सखल प्रदेश आणि सुंदर बांधा रेखलेलाच, परंतु पूर्ण विकास पावलेला आहे अशी तिची मूर्ति दिसत होती. तिनें अंगांत पांढरीशुभ्र कंचुकी घातली होती; ती जणूं काय, तिच्या शरीरांत अन्य कृतीनें सुधारणा होणार नाहीं जाणून, आपण होऊनच तिच्या अंगांत घटमूट बसण्याकरितां लवचीक झाली होती; व तिच्या योगानें तिच्या शरीराला शोभा यावयाची ती न येतां उलट त्या कंचुकीलाच त्या शरीरानें शोभा आणली होती. त्या आरशांत, गुलाबाच्या कळीप्रमाणें नाजूक अशा अग्रांनीं सुशोभित झालेले तिचे ते मांसल वर्तुलद्वय, आपल्या पूर्ण व स्वाभाविक गोलत्वांत राहण्याला कशाचीही अपेक्षा करीत नाहींत असे दिसत होते. त्या आरशांत तिच्या कंबरेच्या बाजूचे दोन बांक कटीघेष्टणाच्या योगानेंही एकमेकांच्या जवळ जवळ आलेले नाहींत असे दिसत होतें; व त्याप्रमाणेंच तिच्या दोन्ही जघनांचा फुगवटा आपला विस्तार वाढविण्यास किंवा त्यांत कांहीं सुधारणा करण्यास कशाचीही जरूर नाहीं असें दाखवीत होता. याप्रमाणें **एलन**नें आपली नखशिखांत मूर्ति

आरशांत पाहून तिच्या मनांत नसतांही तिची आनंदयुक्त हास्य मुद्रा झाली.

पण ऐका ! तिच्या कानीं कसले शब्द पडत आहेत बरं ?

ती चपापून सभोंवार पहात आहे—व लक्ष्य देऊन ऐकत आहे.

फिरून—तो शब्द तिला ऐकूं येत आहे.

इतक्यांत तिला, बाजूच्या खिडकीच्या दारावर कोणी तरी हळूंच टिचकी वाजवीत आहे असें समजलें. ह्मणून ती लागलींच अंगावर फिरून वस्त्रें घेऊन खिडकीजवळ आली, व पडदा वर करून पहाते तों, खिडकीच्या तोंडाशीं शिडीवर उभा राहिलेला काळ्या आकृतीचा एक मनुष्य तिच्या दृष्टीस पडला. नंतर तिनें फिरून त्याच्याकडे पाहिलें तेव्हां तिची खात्री झाली कीं, पूर्वी पाहिलेला जो उंच मनुष्य तोच हा आहे.

अशी तिची खात्री झाल्यावर ती त्याच्या अगदीं जवळ जाऊन त्यास हळूच विचारूं लागली:"तुह्माला काय पाहिजे ? या तुमच्या येण्याचा मतलब काय ?"

" मी तुह्मांला सोडवायला आलों आहें. भिऊं नका. ज्यानें तुह्मांला सावध राहण्याविषयीं पत्र लिहिलें होतें तो मी." फिलिपो इतक्या हळू शब्दांनीं बोलला कीं, ते समजण्याला मारामार पडली.

हे शब्द ऐकल्यावरोबर एलननें लागलींच खिडकीचीं दारें उघडीं केलीं.

" जरी बाह्यात्कारीं मी आपल्या धन्याचा नोकर आहें तरी आंतून माझ्या शक्तीप्रमाणें त्याच्या दुष्ट बेतांच्या आड येण्याला मी कमी करीत नाहीं. "

एलनला हें अकस्मात् पाठबळ आल्यामुळें अत्यानंद होऊन ती ह्मणाली: " माझा तुम्हांवर विश्वास आहे. मी आतां काय करावें असें तुमच्या मनांत आहे ? "

" या बिछान्यावरचीं पांघरूणें एकाला एक बांधून त्यांचें एक टोक पलंगाच्या खुराला बांधा व दुसरें खिडकीच्या बाहेर सोडून द्या आणि चला. "

तोंडांतून शब्द निघाला नाहीं तों, त्याप्रमाणें केल्यावर एलननें आपली शाल अंगावर घेऊन ती निघण्यास सिद्ध झाली.

नंतर त्याच्या सांगण्याप्रमाणें तिनें खिडकीच्या उंबरठ्यावर पाय ठेवल्याबरोबर त्यानें तिला हात देऊन सुरक्षितपणें तळाशीं आणली.

मग त्यानें ती शिडी आपल्या खांद्यावर घेतली व एक शब्दही न बोलतां तिला आपल्या मागून येण्यास सांगितलें.

घराच्या पाठीमागच्या तबेल्यापर्यंत गेल्यावर तेथें त्यानें ती शिडी ठेवली. नंतर

तेथून निघून जवळच्या एका शेतांतून ते चालूं लागले. घरापासून कांहीं अंतरावर आल्यावर तो तिला ह्मणाला: " बाई, या कामांत मी तुमच्यावर कांहीं उपकार केला आहे असें जर तुह्मांला वाटत असेल, तर त्याची फेड तुमच्या जवळ मी हीच मागतों कीं, तुमची सुटका कशी झाली या संबंधानें एक शब्द देखील बोलूं नका. "

" तुमची पक्की खत्री असूं द्या कीं, मी कांहीं तुह्माला फसविणार नाहीं. पण मी एक विचारतें कीं, असल्या दुष्ट धन्याच्या पदरीं असा उदार अंतः-करणाचा व प्रामाणिक चाकर असावा हें कसें ?"

" बाई ही गोष्ट सांगण्याला फारशी कठीण नाहीं. दूर देशांत राहणाऱ्या व जी आजला राज्यवैभवाचा उपभोग घेत आहे अशा एका उदार मनाच्या स्त्रीनें **ग्रीनवूड**च्या दुष्ट कृत्याचा नाश करण्याकरितां मला येथें धाडलें आहे. मी येथें आल्यावर दैवयोगानें मला कळलें कीं, त्याला एका चाकराची जरूर आहे. मी त्याच्याकडे अर्ज केल्याबरोबर मला जागा मिळाली. त्याच्या सर्व मसलतींत मी कळकळ दाखवितों ह्मणून तो मला इमानी समजत आहे. पण मी बहुतकरून त्याच्या मनाप्रमाणें गोष्टी घडून आणीत नाहीं. ही काय ती माझी हकीकत आहे. ही गोष्ट तुह्मीं अगदीं गुप्त ठेवली पाहिजे. यांपैकीं थोडीशी गोष्ट कां बाहेर पडली, कीं माझ्या धनिनीचे उदारपणाचे बेत सर्व ढांसळतील. असलें कपट पतकरून **ग्रीनवूड**चा घात करायचा असें तुह्मी समजूं नका. त्याच्या गुप्त मसलतीनें दुसऱ्याचा घात होऊं नये हें मात्र माझें काम आहे. पण जेथें तुह्मांला गाडींत बसायचें त्या ठिकाणीं आपण आलों. "

थोड्या वेळांत गाडी तयार होऊन आली. **एलन,** आपल्यावर ज्यानें उप-कार केला त्याची फेड करावी ह्मणून त्याला कांहीं देऊं लागली, परंतु त्यानें साफ सांगितलें कीं, " तुमच्या तोंडून याबद्दल शब्द न निघण्यापेक्षां मला दुसरें कांहीं बक्षीस नको. " असें ह्मणून त्यानें तिला गाडींत बसविली व व गाडीवाल्यास, जेथें इला जावयाचें असेल तेथें पोंचिव असें सांगितलें.

आपल्याला आज इतका उशीर कां लागला याबद्दल बापाला व **रिचर्ड**ला काय सबब सांगावी याबद्दलचे विचार जातां जातां तिच्या मनांत घोळूं लागले. तिला आतां लबाडी करण्याची फारशी भीति वाटत नव्हती हें आह्मीं पूर्वीं सांगितलेंच आहे. **ग्रीनवूड**चें नांव बापाच्या कानावर न घालण्यासारखीं तिचीं कांहीं कारणें होतीं. तेव्हां त्यानें आपला असा छळ केला हें बापाला व

रिचर्डच्या कळवून, त्यांच्या कडून शिक्षा करविण्याकरित त्याशीं हातगाईचा प्रसंग आणण्यास ती मुळींच राजी नव्हती हें उघड आहे.

शेवटीं, जेथें मी गाण्याला गेलें होतें तेथें माझी एकाएकी प्रकृति बिघडली म्हणून मला उशीर लागला असें सांगण्याचा तिनें निश्चय केला. ह्मणजे या सांगण्यानें बापाचेंही समाधान होईल, व मार्खमही आपल्या मनांत खरा प्रकार काय आहे तो समजेल अशी तिनें आपल्या मनाची समजूत केली.

असो. शेवटीं सांगावयाचें इतकेंच कीं, ती पहाटेच्या चार वाजतां सुरक्षित घरीं पोहोंचली. व तिची काळजीपूर्वक वाट पहात असलेले—तिचा बाप व मार्खम—यांस तिनें सांगितलेलें कारण ऐकून समधानही झालें.

---

## भाग९३.

### मांटोनीकडील वर्तमान.

आतां एकवार आपण डायना आर्लिंगटनकडे वळूं. ही त्या, अर्ल घरिंगटननें घेऊन दिलेल्या सुंदर बंगल्यांतच रहात होती; व इचा नित्यक्रम९१ व्या भागांत वर्णन केल्याप्रमाणें आजपर्यंत सुरळीत चालत आला होता.

अर्लचें आपल्या प्रिय पात्रावरील लक्ष्य, व त्या संबंधानें मनाचा उदारपणा हीं अबाधित चालत होतीं. डायनाही त्यांच्या जिवाची खरी आणि प्रामाणिक मैत्रीण बनली असून, आपल्या निष्कपटवर्तनानें आपल्या वरील त्यांचा विश्वास तिनें कायम ठेवला होता.

या वेळेला आमच्या वाचकांना माहित असलेल्या, तिच्या वाड्याच्या सुंदरशा दिवाणखान्यांत फिरून नेऊन सोडतों. या वेळेला ती आपला प्रातरूपहार करीत होती परंतु या खेपेला तिच्या हातांत वर्तमानपत्र असावयाचें त्या ऐवजीं, तिचें लक्ष्य एका पत्रांतील मजकुराकडे वेधलें होतें. त्या पत्रांतील मजकूर असा:—

" मांटोनी, डिसेंबर ३, १८३९.

" प्राणाहून प्रिय डायना यांस—आपणास कळविण्यास आनंद वाटतो कीं, काल रोजीं ड्यूक महाराज अंजेलो यांच्याबरोबर माझा विवाह झाला. हा योगायोग यापूर्वीच घडून यावयाचा, पण दरबारांतील कांहीं मंडळीच्या कारस्थानामुळें लांबणीवर पडला होता. आजपर्यंत माझ्याविरुद्ध निरनिराळ्या बातम्या महाराजांच्या

कानावर जात होत्या, परंतु शेवटीं महाराजांनीं आपल्या मनाची खात्री करून घेऊनं कोणाचीही पर्वा न करतां आपल्या मनासारखी गोष्ट करून घेतली. यानंतर महाराजांनीं दुसरी गोष्ट केली ती, बारन रूपर्टो आदिकरून दरबारांतील कांहीं मंडळीला, महाराजांच्या लग्नाच्या कामांत त्यांनीं कांहीं ढवळाढवळ केल्याबद्दल कामावरून दूर केलें, ही होय. या यातायातीचे, या अस्वास्थ्याचें, व या कारस्थानाचें कारण मी आहे असें पाहून मला किती वाईट वाटलें—किती दुःख झालें—हें तुम्हांला सांगणें नकोच. हा देश सोडून मला दुसरे ठिकाणीं जाऊं द्या, म्हणून महाराजांना मीं परोपरीनें विनविलें, परंतु त्यांचा दृढ निश्चय झालेला दिसला. त्यांनीं मला सांगितलें कीं, जरी मला पुष्कळ अडचणी येणाऱ्या आहेत तरी मी मागें घेणारा मनुष्य नाहीं. माझें सर्व सुख काय तें तुझ्यावर अवलंबून आहे. याप्रमाणें त्यांनीं सांगून मला स्वस्थ बसविलें. शेवटीं, दरबारांतल्या मंडळींत काय फेरबदल करायचे ते करून, नंतर माझ्याशीं विवाह करावयाचा त्यांनीं आपला उद्देश प्रधान मंडळीलें जाहीर केला. असो.

" तो महत्वाचा दिवस—म्हणजे कालचाच—आला तेव्हां माझ्या अंतःकरणाची काय स्थिति झाली होती ती मला वर्णन करून सांगतां येत नाहीं. काल मी अगदीं सकाळींच उठलें होतें, व चित्ताला स्वस्थता वाटावी म्हणून कांहीं वेळ बागेंत फिरलें. माझ्या स्थितींत एवढा फरक होणार आहे, थोड्याच वेळांत माझ्या मस्तकावर राजभूषणें चढणार आहेत, व आणखी थोड्या अवकाशानें माझ्या नांवाच्या "महाराणीसाहेब," "महाराणी साहेब," अशा ललकाऱ्या कानावर पडणार आहेत या गोष्टी कांहीं केल्यानें मला खऱ्या वाटेनात. माझ्या पूर्व स्थितीशीं, व मी आतां थोड्या वेळानें राजसिंहासनावर बसणार—हजारो मानवी प्राण्यांची राजनिष्ठा संपादन करणार—व युरोपच्या राजांपैकीं एकाच्या वैभवाची वांटेकरीण होणार—या गोष्टींची तुलना मला करितां येईना. जी एका गरीबाच्या कुळांत जन्मास आलेली, जी अर्लनें दिलेल्या निर्वाहापुरत्या साधनांवर सुखी समजणारी—जी आपल्याला स्वस्थता आणि समाधान असलें म्हणजे पुरें एवढ्यावरच समाधान मानणारी, व जी एका अर्लच्या सदैव मेहेरबानीशिवाय दुसऱ्या कशाचीही आशा न करणारी—ती आतां थोड्या वेळानें मांटोनीची महाराणी होणार ही गोष्ट संभवेल तरी कशी असा मी आपल्या मनाला प्रश्न करूं लागलें. मला तें सर्व स्वप्नवत् वाटूं लागलें. स्वप्न म्हणावें तर या भावी वैभवसुखाचा मला अगोदर थोडा थोडा अनुभव येत चालला होता. मला माझ्या सामान्य स्थितींतून काढून वरिष्ठ प्रतींत आणून बसविलें होतें. आज कित्येक दिवस "बाईसाहेब" "बाईसाहेब" म्हणवून घेण्याची मला संवय लागली होती; आणि

आज कित्येक दिवस मांटोनींच्या मोठमोठ्या सरदार स्त्रियांच्या बरोबर मी वागत होतें. तेव्हां या गोष्टी मिथ्या तरी कशा म्हणाव्या ?

"काल सकाळीं सात वाजतां सेनापतीच्या तीन मुली मला पोषाख करूं लागण्याकारितां माझ्याकडे आल्या. माझा पोषाख वगैरे झाल्यावर मी त्या बंगल्याचा शेवटचा निरोप घेतला. ज्या ठिकाणीं मी पुष्कळ दिवस सुखाचे घालविले तें ठिकाण सोडतांना माझ्या नेत्रांतून दुःख आणि आनंदाश्रू चालले होते. असो. शेवटीं मी सेनापतीच्या गाडींत बसून त्यांच्या वाड्यांत गेलें.

"या ठिकाणीं माझें पत्र संपलें. सोबत कालच्या समारंभाची मांटोनीच्या वर्तमानपत्रांत आलेली हकीकत पाठविली आहे. शेवटीं सांगायचें म्हणून इतकेंच कीं, जरी मला एवढें वैभव प्राप्त झालें आहे-मोठेपणा मिळाला आहे—तरी तुमच्या मी हृदयांत असून, तुमच्याशीं पूर्वीप्रमाणेंच सर्वकाळ कृतज्ञ, आणि ज्या दृष्टीनें तुम्ही मला ओळखीत आहां, ती मी पूर्वीचीच अगदीं साधी

"एलिझा सिडने आहें."

हें पत्र वाचून डायनाला किती आनंद झाला असेल तो वर्णन करणें मोठें कठीण आहे. या पत्रासोबत दिलेली लग्नसमारंभाची हकीकत आपण आतां वाचूं.

"ड्यूक महाराजांचा विवाहसमारंभ.

"काल रोजीं प्रातकाळीं महाराज ३ रे अंजेलो यांचा महाराणी एलिझा यांच्याशीं विवाह झाला हें वर्तमान कळविण्याला आम्हाला आनंद वाटत आहे. काल सकाळपासून नगरांत एक प्रकारची दंगल उडून राहिली होती. मोठमोठ्या रस्त्यांवरील घरें पताकांनीं, लतापुष्पांनीं, फुलांच्या कमानींनीं सुशोभित केलीं होतीं. राजाचा बावटा किल्ल्याच्या बुरजावर मोठ्या ऐटीनें फडकत राहिला होता. ज्या रस्त्यांनीं स्वारी जावयाची होती, त्या रस्त्यावरील दुकानांत प्रेक्षकांकरितां जागा केल्या होत्या, व त्या जागा जास्ती पैसे देणारांना मिळत होत्या. इतर ठिकाणचीं दुकानें बंद होतीं. सर्व कचेऱ्यांना सुट्या दिल्या होत्या. व बंदरावरील सर्व जहाजांवर निशाणें उभारलीं होतीं. याप्रमाणें देखावा एकंदर प्रेक्षणीय होता यांत संशय नाहीं.

"सकाळच्या सात वाजल्याबरोबर सर्व देवळांतील घंटानादास सुरुवात झाली. त्याबरोबर सर्व सैन्य तयार झालें. सरासरी आठ वाजण्याच्या सुमारास कोतवाल आणि इतर नगररक्षक मंडळी राजवाड्यांत जाऊन तेथें तिनें महाराजांस एक मानपत्र दिलें. सेनापतीच्या वाड्यापुढें तर अतिशयच गर्दी जमली होती. या वेळेला राजकीय विचार

सर्व विसरले गेले होते. दहा वाजतां, प्रधान, अमीर उमरावादि मंडळी आपल्या भावी महाराणीस राजवाड्यांत घेऊन जाण्याकरितां सेनापतीच्या वाड्यांत आली. राजरस्त्यावरून महाराणीची गाडी चालू लागल्याबरोबर रस्त्यावरील दुतर्फा लोकांनीं, खिडक्यांतील, सज्जावरील प्रेक्षक जनांनीं टाळ्यांचे गजर करून व आपल्या हातांतील रूमाल उडवून आपला आनंद दर्शित केला. या आदरसत्काराचा आमच्या महाराणीनें अतिशय नम्रता पूर्वक व अंतःकरणापासून स्वीकार केला. व तिचा हा विनय पाहून त्याच वेळेला सर्वांचीं अंतःकरणें तिच्याविषयीं सुप्रसन्न झालीं.

" वधूचा प्रवेश राजवाड्यांतील चौकांत झाल्याबरोबर महाराज आपल्या दरबारांतील मंडळीसहवर्तमान तिला सामोरे गेले नंतर सर्व मंडळी राजवाड्यांत शिरली. सर्व मान मानकरी जमल्यावर फिरून वधु आपल्या मैत्रिणीसहवर्तमान पूर्वीच्या गाडींत बसली व महाराज आपल्या मंत्रीमंडळासहवर्तमान राज रथांत बसल्यावर हा सर्व समारंभ देवळाकडे जाण्यास निघाला.

" त्या बरोबर तोफांना सरबत्ती मिळण्यास सुरुवात झाली. किल्ल्यावर व लढाऊ गलबतांवर एकसारखा ' धुडुम धाड ' असा शब्द चालला होता. प्रत्येक देवळांतून घंटाचा घणघणाट चालला होता. व लष्करी लोकांच्या ब्यांडांचा सूर ऐकूं येत होता.

" शेवटी स्वारी देवळांत येऊन पोंचली. धर्मोपाध्याय आपल्या प्रेषित गणांसह महाराजांच्या मंगल कार्यास तयार होते. सर्व मंडळी देवळांत आल्याबरोबर द्वारें बंद करून विवाहविधीस सुरुवात झाली. व सर्व विधी उरकल्यावर मंडळी आपआपल्या गाड्यांत येऊन बसूं लागली. त्याबरोबर फिरून तोफांचे आवाज सुरू झाले. महाराजांनीं स्वतः आपल्या हातांनीं महाराणीस राजरथांत बसविलें. नंतर हा छाबिना परत राजवाड्याकडे वळला. या वेळेला पहिल्यापेक्षांही लोकांच्या मुद्रा सुप्रसन्न दिसत होत्या. मात्र रिसाल्याकडील भागांत या प्रसंगासंबंधानें थोडेसें असमाधान दृष्टोत्पत्तीस आलें. परंतु त्यांनीं मुग्ध वृत्ति अंगिकारली होती. याप्रमाणें या समारंभाची हकीकत आहे.

" राजकीय दृष्ट्या या गोष्टीचे परिणाम फार महत्वाचे आहेत. पुढेंमागें कदाचित् महाराजांना औरस पुरुषसंतति झाली तर उभयपक्षांतील वाद एकदम मिटल्यासारखा होणार आहे. हल्लीं इंग्लंडमध्यें जाऊन राहिलेले राजपुत्र आलबर्टो यांचे पुरस्कर्ते अर्थातच या लग्नामुळें खवळून गेले आहेत, तरी कांहींजणांना समाधानही झालें आहे. आपल्या देशाचे जे खरे हितैषी आहेत त्यांनीं, महाराजांच्या मनोविकारावर दाब ठेवणें कोणत्याही दृष्टीनें प्रशस्त नाहीं, असा विचार करून, राज्यांत शांतता व स्वास्थ्य कायम ठेवण्यास व गादीला कायदेशीर वारस प्राप्त होण्याची आशा करण्यास महाराजांचा विवाह होणें हाच उत्तम उपाय पाहिला यांत शंका नाहीं. आमचेंही

प्रमाणेंच मत आहे. शेवटीं आमच्या इतिहासांत ही एक महत्वाची गोष्ट झाली म्हणून तिला आम्हीं स्वस्ति असो. असें म्हणून हा लेख संपवितों."

**डायना**नें हें पत्र वाचून संपविलें नाहीं तोंच **अर्ल** आल्याचें तिला कळलें. तिनें लागलेंच हें सर्व वर्तमान त्यांना कळविलें; व त्या सरदारानेंही **एलिझे**चें पत्र व **मांटोनो**च्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेली हकीकत मोठ्या उत्सुकतेनें वाचली. ती हकीकत वाचून जिच्यावर एकवार आपण प्रीति करीत होतों, तिची मुलगी मोठ्या वैभवाला चढली हें पाहून त्यांना फार आनंद झाला. पत्र वाचून संपल्यावर ते म्हणाले:--" खरोखर, **एलिझा**चा एका गरीब कुलांत जन्म होऊन ती जगांतील एका राष्ट्राची राणी झाली हें पाहून मला फार फार आनंद होत आहे."

" हें सर्व आपल्या चांगुलपणाचें फळ आहे." **डायना** म्हणाली.

" माझ्या न्यायदृष्टीचें हें फळ आहे असें म्हण. कारण, तिच्याशीं मी खरो-खरच न्यायानें वागलों; याबद्दल माझी मींच स्तुति करावी. व तिला जें एवढें वैभव प्राप्त झालें आहे त्यावरून आपण एक गोष्ट घ्यावी कीं, एका अपरा-धावरून मनुष्याची किंमत कधीं करूं नये. त्या दुष्ट **स्टिफन**मुळें जरी तिच्या हातून अपराध घडला तरी सद्‌गुण आणि सचोटी हे गुण तिच्या ठिकाणीं नेहमीं वास करीत होते; आणि त्या गुणांचें तिला अद्वितीय फळ मिळालें. पण हा काय चमत्कार ?" असें म्हणून ते त्या पत्राच्या पत्यावर जो शिक्का होता त्याकडे निरखून पाहूं लागले.

" काय झालें ?"

" कांहीं तरी यांत दगलबाजी झाली आहे. हें पत्र तुझ्या हातांत येण्या-पूर्वी फोडलें गेलें असावें. हो, हें पहा, यावर कालच्या तारखेचा शिक्का असून शिवाय आजच्याही तारखेचा आहे. शिवाय ही लाख पहा. ही दोन प्रकारची आहे. यांच्या रंगांत तुला फरक दिसत नाहीं ?"

" पण हें कोणीं केलें असावें ? कदाचित् **महाराणी**नेंच आपल्या नांवाची मोहोर केली नसेल कशावरून ?"

" हें पत्र ज्यांनीं फोडलें त्यांना, पत्रावर जे शिक्के केलेले असतात त्यांचे ठसे त्यांचे ठाऊक असतें. परंतु तुझ्याजवळ **मांटोनो**चीं आणखी कांहीं पत्रें आहेत काय ?"

डायनानें होय ह्मणून सांगून एलिझा सिडनेचीं आलेलीं बरींच पत्रें त्यांच्यापुढें हजर केलीं.

आर्लनीं तीं पत्रें निरखून पाहून त्यांची पक्की खात्री झाली कीं, हीं पत्रें मालकाच्या हातांत पडण्यापूर्वीं फोडलीं गेलीं आहेत; व तीं पूर्वीप्रमाणें दिसण्याकरितां व फिरून शिक्के मोहोर करण्याकरितां विशेष खबरदारी घेतली आहे. तीं पत्रें आपणाजवळ घेऊन ते ह्मणाले: "आज मला पुष्कळ दिवस संशय होताच कीं, सर्व राष्ट्राला कालिमा आणण्यासारखें हें नीच काम त्याच खात्याकडून होत असावें. ठीक आहे. याचा मी पक्का बंदोबस्त केल्याशिवाय कधीं रहायचा नाहीं." असें ह्मणून ते या कामाच्या चौकशीला जाण्यास निघाले.

ते जाऊन थोडा वेळ झाला नाहीं तोंच, ग्रीनवूडचा हुजऱ्या फिलिपो येऊन उभा राहिला.

"बाईसाहेब, काल माझ्या धन्याच्या दुसऱ्या एका बेताआड येऊन, एका तरुण स्त्रीला मीं त्याच्या कचाट्यांतून सोडविली हें सांगण्याकरितां आलों आहें."

"शाबास फिलिपो, पण तुझ्या धन्याला तुझा संशय येत नाहींना ?"

"मुळींच नाहीं. मीं अशी युक्ति केली होती कीं, तिच्या योगानें माझ्या धन्याची अशी समज झाली आहे कीं, ती स्वतःच्याच युक्तीनें खालीं उतरली असावी."

"बरें, मांटोनीकडची कांहीं खबरबात?"

"महाराणीसाहेबांचा विवाह झाला."

"हें आनंदकारक वर्तमान मला आज सकाळींच कळलें. तुझ्या धन्याचे आणखी काय काय बेत चालले आहेत ?"

"सध्यां कांहीं नाहींत बाईसाहेब. पण काल सर रूपर्ट हारवरोचे व माझ्या धन्याचें मोठें भांडण झालेलें मात्र मीं ऐकलें. त्यांच्याकडे कांहीं हजार पाऊंड येणें होते. त्यांबद्दल लार्ड ट्रिमार्लीनच्या सहीची पावती होती. परंतु खरोखरी पाहतां ती पावती हारवरोनें खोटी बनविली होती."

"खोटी पावती!"

"होय बाईसाहेब, खोटी पावती. पैसे मिळविण्याकरितां ग्रीनवूडनेंच त्याला ही युक्ति सुचविली होती. याबद्दल हारवरो, ग्रीनवूडला पुष्कळ टाकून बोलले. परंतु ग्रीनवूड आतां हें सर्व नाकबूल जात आहेत. ते ह्मणाले कीं,

जर माझे पैसे उद्यां आणून दिले नाहींत तर मी खोटा कागद केल्याबद्दल सरकारांत कळवीन. "

" मग यावर **सर रूपर्ट हारबरो** काय ह्मणाले ? "

" ते मग जरा मऊ आले, व **ग्रीनवूड**ची पायधरणी करूं लागले. परंतु ते कांहीं केल्यानें वळेनात. तेव्हां शेवटीं **हारबरो** वाईट तोंड करून निघून गेले. "

" हें त्यांचें युद्ध त्या दोघांनच चालूं दे. हारबरोची मला चांगली माहिती आहे. पण तो, तुझ्या धन्यासारखा मांग हृदयाचा असेल असें मला वाटत नाहीं. कांहीं दिवस तो माझ्याशीं चांगला होता—परंतु असो—त्याचा संबंध तुझ्याशीं नाहीं. "

" बरं तर बाईसाहेब, मी रजा घेतों. " असें ह्मणून तो निघून गेला व ही खुर्चीवर पडून स्वस्थ विचार करूं लागली.

---

# भाग १४.

## अंतर्गत खातें. *

या कचेरीच्या तळमजल्यावरील एका प्रशस्त खोलींत या खात्याचे मुख्याधिकारी बसले होते. खोलीच्या भिंतीवरून, आजपर्यंत जे या खात्यावर निरनिराळे राजकारणी पुरुष काम करून गेले त्यांचीं चित्रें लोंबत होतीं. मध्यमागीं वर्तुलाकृति मेज असून त्याच्या खालीं कागदांचा ढीग पडला होता. बाजूला वेतानें विणलेला एक पेटारा होता. त्यांत हे अधिकारी आपल्याकडे आलेलीं बहुतेक पत्रें टाकीत असत. हे अधिकारी त्या पत्रांकडे इतक्या शिताफीनें नजर फिरवीत असत कीं, त्या पत्रांकडे वर वर पाहूनच त्यांतील मतलब समजून घेण्याची अजब युक्ति तरी त्यांच्यापाशीं असावी, किंवा त्या

---

* ज्याला इंग्रजींत " होम आफिस " ( Home office ) म्हणतात त्याला हें नांव दिलें आहे. त्याची रचना विशेष खुलासेवार सांगतां येण्यासारखी नाहीं. तरी, इकडील हायकोर्टाप्रमाणें कांहीं अंशीं आहे म्हणण्यास चिंता नाहीं. इकडील कनिष्ठ कोर्टाकडून झालेल्या निकालावर जशी " हायकोर्टा "कडे दाद लावतां येते, त्याप्रमाणें तिकडे " अंतर्गत राज्यव्यवस्थे "चीं जितकीं ह्मणून खातीं आहेत त्या सर्वांच्या निकालावर दाद मागण्याकरितां " होम आफिस ' हें एक खातें आहे. यावरील अधिकाऱ्याला ' होम सेक्रेटरी ' ह्मणतात. व याचा पगार सालीना पांच हजार पौंड असतो.

पत्रांतील व्यक्तिविषयक किंवा राष्ट्रीयसंबंधी महत्वाच्या कामाकडे दुर्लक्ष करण्यांत त्यांना मुळींच फिकीर वाटत नसावी.

असो. घड्याळावर बारांचा ठोका पडल्याबरोबर एक उंच, सडपातळ, उथळ तोंडाचा असा मनुष्य हलकाच, पाय न वाजवीत आंत येऊन, व आपल्या वरिष्ठाला अति नम्रपूर्वक प्रणाम करून आपल्या जाग्यावर बसला. हे गृहस्थ त्यांचे कारकून होत.

या कारकुनानें प्रथमत: लेखणी केली. नंतर आपल्यापुढें टीप कागद मांडला, व त्यावर एक जाडा बंद ठेवून, लिहिण्याकरितां स्वारी तयार होऊन बसली. पुढें जीं या ठिकाणीं कामें उरकण्यांत आलीं तीं अशीं:-वरिष्टानें कारकुनास एकेक अर्ज वाचावयास सांगावा, व त्यावर कशी काय व्यवस्था करावयाची तिचें टिपण घेण्यास लावावें. हे अर्ज बहुतेक, ज्यांना कांहीं त्रास झालेला, ज्यांची दाद त्यांच्या वरिष्ठाकडून न लागलेली, किंवा कांहीं करानें पिडलेले, अशा लोकांकडून आलेले होते; व त्यांस उत्तरें देण्याकरितां ह्मणून जीं टिपणें सांगण्यांत येत होतीं तीं बहुतकरून:-"तुह्मी या गोष्टीचा कायद्यानें निकाल करून घ्यावा," किंवा "या कामांत हात घालण्याचें आह्मांला कारण दिसत नाहीं" किंवा फार तर, "या कामाच्या चौकशीला लौकरच सुरुवात होणार आहे,"अशा अर्थाचीं असत.तात्पर्य,ज्या निकालानें आपल्या राजकारणाला धक्का बसणार नाहीं असे निकाल या ठिकाणीं होत असत.असो.

अशा तऱ्हेनें कामाचा क्रम चालला असतांना, एका शिपायानें एक दर्शनपत्रिका आपल्या वरिष्ठाच्या पुढें ठेवली.

"**अर्ल वरिंग्टन**,ठीक आहे, त्यांना आंत घेऊन ये." असें सांगितल्याबरोबर, हा चाकर बाहेर गेला, व कारकून दुसऱ्या खोलींत गेला.

**अर्ल** येऊन उभयतांची विचारपूस झाल्यावर **अर्लनें** बोलण्यास सुरुवात केली. ते ह्मणाले, "मी आपणाकडे एका कामाकरितां आलों आहे; व आपल्या स्वभावाची जी मला माहिती आहे तिजवरून मला असें वाटतें कीं, तें काम आपल्याकडून राष्ट्रीय दृष्ट्या मोठें महत्वाचें आहे असें समजलें जाईल."

"एखाद्या गोष्टीचें आपण जें महत्व स्थापित कराल तें माझ्या दृष्टीनें हलकें कधीं व्हावयाचें नाहीं."

"न्यायदृष्ट्या ही गोष्ट आपल्या नजरेपुढें आणलेली चांगली किंवा **टपालखात्यावर**च्या वरिष्ठाला अथवा थेट **राणी सरकार**च्या मुख्य प्रधानाला स-

खविलेली चांगली हें मला चांगलेंसें समजलें नाहीं. परंतु ज्या अर्थी त्या दोघांपेक्षां आपल्या परिचयाचा मला विशेष लाभ आहे, त्या अर्थी मी आपल्याकडेच देण्याचा निश्चय केला."

"माझ्या शक्तिप्रमाणें पाहिजे त्या रीतीनें आपली सेवा करण्यास मी आनंदानें तयार होईन."

"तर मग मी आपल्या मुद्यास एकदम सुरुवात करतों. माझ्या एका विशेष ओळखीच्या मनुष्याचा—तें मनुष्य स्त्री आहे—**मांटोनी** संस्थानांत राहणाऱ्या एका स्त्रीशीं पुष्कळ दिवस पत्रव्यवहार आहे; परंतु त्या स्त्रीचीं पत्रें येथें आलेलीं फोडलीं जातात असें मानण्याला सबळ कारणें झालीं आहेत."

"अशीं सबळ कारणें कोणतीं आहेत तीं मला समजतील तर बरें होईल." ही गोष्ट ऐकून आपल्या चेहऱ्यावर कोणताही फरक न होऊं देतां वरिष्ठानें विचारलें.

"माझी अशी समजूत आहे कीं, तीं पत्रें येथील **टपाल कचेरींत** फोडलीं जात असावींत."

"येथल्या **टपाल कचेरींत**!" हे शब्द ऐकून त्यानें इतकें आश्चर्य दाखविलें कीं, तें खरें होतें किंवा खोटें होतें याचा वाचकांनींच विचार करावा.

"होय महाराज, येथल्या **टपाल कचेरींत** हा पहा प्रत्यक्ष पुरावा." असें ह्मणून त्यानें खिशांतून पत्रें काढून त्यांस दाखविलीं, व **डायना**ला ज्या खाणाखुणा दाखविल्या होत्या, त्याही त्याला सांगितल्या.

"या पत्रावर तर **मांटोनी**च्या संस्थानचा शिक्का आहे.

"त्या संस्थानची जी महाराणी तिचा **डायना**शीं, जिच्या नांवानें हीं पत्रें आलीं आहेत तिच्याशीं—पत्रव्यवहार आहे; व हा सर्व पत्रव्यवहार खाजगी आहे हें आपण कबूल करालच."

"त्या महाराणीचा आणि आपला कांहीं आप्त संबंध आहे नाहीं का?"

"तिच्याशीं माझा आप्तसंबंध, आणि **डायना आर्लिंगटन**शीं माझें मित्रत्व, या दोन गोष्टी मनांत आणूनच या गोष्टीच्या चौकशीचा—इतकेंच नव्हे तर तिला समूळ खणून काढण्याचा—मीं निश्चय केला आहे."

"पण, त्या खात्याच्या वरिष्ठाच्या हुकमानें अशा गोष्टी होतात असें आपण ह्मणणार नाहींत असें मला वाटतें."

"प्रत्यक्ष व्यक्तीवर आरोप करण्याची जबाबदारी मी अंगावर घेत नाहीं." **अर्ल** ह्मणाले.

" जेथें कांहीं कारकुनाच्या मूर्खपणामुळें अशा प्रकारच्या गोष्टी होतात तेथें विशेष चौकशी करण्यांतही कांहीं अर्थ नाहीं. "

" छे, महाराज—हा पत्रें फोडण्याचा क्रम फार व्यवस्थेनें चालत आला आहे. हें कांहीं एक दोघां कारकुनाचें—ज्यांना आपलें कृत्य उघडकीस येण्याची नेहमीं भीति आहे—काम नाहीं. या निरनिराळ्या पत्रावर दोन प्रकारची लाख दिसत आहे; आणि त्यांचे मूळचे शिक्के तसेच कायम राहिले आहेत. हें काम बोलतां बोलतां किंवा, त्याची पूर्वींच तरतूद करून ठेवल्याशिवाय होण्यासारखें नाहीं."

" तर मग आपल्याला कोणाचा संशय येत आहे ? "

" मी आपल्याला हेंच विचारण्याकरितां आलों आहें कीं, हें गौडबंगाल काय आहे ? मला जर त्याची खरी माहिती असती, तर मीं निराळाच रस्ता पाहिला असता ? "

" तो रस्ता कोणता महाराज ? "

" तो रस्ता हाच कीं, पुन्हां पार्लमेंट भरेल तेव्हां लार्ड लोकांच्या सभेंत उभा राहून सर्व जगाला ही भयंकर गोष्ट महशूर करीन कीं, स्वातंत्र्याचा झेंडा मिरविणाऱ्या या इंग्लंड देशांत अशी एक संस्था आहे कीं, तिच्यापासून, लोकाचारांचे पवित्र निर्बंध अतिनीचपणानें भ्रष्ट होत आहेत, व पायाखालीं तुडविले जात आहेत. "

" महाराज, कल्पना करा कीं, कांहीं पत्रांतील मजकूर समजणें राणीसरकारच्या राज्याला अत्यंत महत्वाचें वाटून तो फोडला जात आहे, व अशा स्थितींत चालू असलेली गोष्ट आपणाला समजली आहे; अशी कल्पना केली तर ती महत्वाची गोष्ट प्रसिद्ध करणें आपल्याला प्रशस्त वाटेल काय? "

" या वेळेला आपल्या या भाषणानें, ज्या गोष्टीसंबंधानें मी मोठ्या बुचकळ्यांत पडलों होतों तिचा धागा लागल्यासारखाच झाला म्हणावयाचा. "

" प्रसंगविशेषीं, आपल्याला जी गोष्ट कळून आली तशा गोष्टी अमलांत आणणें कसें भाग पडतें, हें आपल्या देशाच्या कल्याणाकरितां वाहून घेतलेल्या आपल्यासारख्या ग्रहस्थांस समजत असेलच. "

" आपल्या देशाकारतां वाहून घेतलेल्या गृहस्थास, राजकारणासाठीं लागणारी माहिती मिळविण्याकरितां, उपयोगांत आणलेल्या या कपटाच्या साधनाचा मनापासून तिटकारा आल्यावांचून कधीं रहावयाचा नाहीं. "

" या वेळेला आपण फारच कडकपणानें बोलतां. "

" आणि जर या वेळेला मी **पार्लमेंट** असतों तर याहीपेक्षां जास्त कडक बोललों असतों. परंतु काय करूं? या वेळेला मी आपल्याकडे आलों आहे. येथें मर्यादेचें उल्लंघन करून, मला दुसरीकडे जसें बोलतां आलें असतें तसें येथें करतां येत नाहीं. परंतु कोठें तरी मी हें काढल्याशिवाय राहावयाचा नाहीं. "

" महाराज, याचा आपण शांतपणानें, गंभीरपणानें विचार करा—"

" माझें कर्तव्यकर्म शिकवायला मला विचार करण्याची मुळींच जरूर नाहीं."

" पण **अर्ल**साहेब, अशा रीतीनें मिळविलेल्या माहितीवर देशाचें स्वास्थ्य नेहमीं अवलंबून असतें हें आपण लक्षात आणावें. "

" असें जर असेल, तर खाजगी पत्रांचा मजकूर फोडून देशाचें स्वास्थ्य राखण्यापेक्षां तें वारंवार बिघडलें तरी चिंता नाहीं. "

" आपण फारच संतापलां आहांत. "

" नाहीं महाराज, मी इतका संतापलों नाहीं. पण विचार करा, हा किती अन्याय आहे तो. बंद केलेलीं पत्रें **टपाला**शिवाय अन्य साधनानें पोंचविण्याचें कायद्यानें बंद केलें असून, तेंच **टपालखातें** त्या मजकुराचा स्फोट करतें, याला काय म्हणावें? असल्या भयंकर कृत्यावर पांघरूण घालणें मोठें पाप आहे असें मी समजतों. "

" **अर्ल**साहेब, माझें एवढें सांगणें आहे कीं, ही गोष्ट यापुढें जाऊं नये. आपल्या संबंधानें जशी पाहिजे तशी व्यवस्था करण्यांत येईल. आपला कोणताही पत्रव्यवहार यापुढें फोडला जाणार नाहीं. आतां महाराज, " या वेळेला या अधिकाऱ्यानें आपल्या मुद्रेवर असें कांहीं कावेबाजपणाचें गांभीर्य आणलें होतें कीं, तें पाहून **ग्रीनवूड**लासुद्धां त्याचा मत्सर झाला असता. "दुसऱ्या एका गोष्टीविषयीं मला आपल्याला कळवावयाचें आहे. **राणीसरकार**च्या मुख्य प्रधानानीं आपलें नांव मार्किस *च्या सदरांत घातलें आहे. व हा मान आपल्याला आतां येतें **पार्लमेंट** उघडण्यापूर्वी मिळावयाचा आहे. "

---

* तिकडील सरदार लोकांच्या प्रतींत ' मार्किस ' ही प्रत आहे. राजाच्या खालची पायरी ' ड्यूक ' ची, त्याच्या खालची 'अर्ल' ची व त्याच्या खालची "व्हायकाऊन्ट" ची. ' काऊन्ट ' ही एक पदवी युरोपमध्यें आहे व तिची योग्यता अर्लबरोबर आहे. ' मार्किस ' हें पद ज्यांना मिळालें आहे त्यांच्याकडे पूर्वी राज्याची सरहद्द रक्षण करण्याचें काम असे. परंतु आतां ती पदवी नुसती बहुमानदर्शक आहे.

" राणी सरकारानीं मला जो मोठेपणा द्यावयाचा मनांत आणला आहे तो मी आपल्या देशाची कामगिरी बजावल्याशिवाय, व त्यावद्दल माझ्या तोंडून आतां काय शब्द निघतील हें मला सांगवत नाहींत, तो अनाचार मीं उघड करून दाखविल्याशिवाय– ते मला न देतील तर फार बरें होईल. ठीक आहे महाराज, आपला आतां निरोप घेतों." असें ह्मणून अर्ल मोठ्या ताठ्यानें निघून गेले.

दुसरे दिवशीं या गोष्टीचा विचार करण्याकरितां मुद्दाम प्रधान मंडळीची सभा भरली होती.

---

# भाग १५.

## बारोनेट आणि त्याचें कुटुंब.

एके दिवशीं संध्याकाळीं सिसीला आपल्या वाड्याच्या दिवाणखान्यांत बसली होती. या वेळेला तिच्या तोंडावर दुःखाची पूर्ण छाया पसरली होती. वारंवार तिचे ओंठ कांपत होते, व वरचेवर ती दुःखाचे सुस्कारे टाकीत होती. त्यावरून तिला खरोखर अनिवार दुःख होत असावें यांत शंका नाहीं. विचार करतां करतां ती आपल्याशीं बोलूं लागली.

" माझी अशी हेळसांड करून शेवटीं मला झिडकारून दिलें काय? प्रथमतः मीच त्याच्या आधीन झालें, आणि आतां त्यानें या रीतीनें सोडून दिलें. आज कित्येक दिवस त्याचें मी दुर्लक्ष्य पहातें आहे. आतांशा पहिल्यासारखें येणें नाहीं; व कां येत नाहीं ह्मणून विचारलें ह्मणजे कांहीं तरी सबब सांगायची. मी किती वेडी कीं, मी त्याच्या शब्दांवर भरंवसा ठेवला? इतर बायकासारखी मी रागावलें असतें, कानावलें असतें, भांडलें असतें, रडलें असतें ह्मणजे तो माझा गुलाम होऊन राहिला असता. परंतु मी अतिशयच गरिबीनें वागलें. जरा ओढून आणलें असतें, पण मला तसें करायचें ठाऊक नव्हतें. ज्या वेळेला तो माझें आर्जव करी तेव्हां मी झिडकारलें असतें, माझ्या तब्येतीप्रमाणें वागलें असतें, तर किती चांगलें झालें असतें. पण मी त्याची राख बनून गेलें. रस्त्यानें हिंडणाऱ्या रांडांना जसें वागवितात त्याप्रमाणें त्यानें माझा उपभोग घेतला! त्यानें सांगितल्याप्रमाणें मी वागलें व विषयधुंद होऊन त्याच्या अर्ध्या वचनांत मी राहिलें. अरेरे!

जसा एखादा पक्षी पिंजऱ्यांत घातल्यावर त्याचें दार मोकळें ठेवून त्याला उडण्यास संधि द्यावी त्याप्रमाणें गोष्ट झाली ही. महिन्या महिन्यांत त्याच्या-जवळ मी पैशाची गोष्ट काढली नाहीं! आणि आज कोठें थोडीशी मला पैशाची जरूर लागली तर मला नाहीं ह्मणून सांगावें काय? काय चमत्कार! स्वतः येऊन भेटून जा ह्मणून सांगितलें, तर ' मला येण्याला सवड नाहीं ' ह्मणून सांगून पाठविलें! अरे कृतघ्ना! पण कित्येक वेळां तो माझ्याशीं उदार-पणानेंही वागला आहे. माझ्या मागें माझ्या नवऱ्यानें माझें जवाहीर घेऊन गहाण नेऊन ठेवलेलें त्यानें सोडवून आणलें. पण तें जवाहीर फिरून पहिल्या ठिकाणीं गेलें. आणि आतां त्याला सोडून कोण आणणार?''

अशा तऱ्हेचें मनाशीं बोलत असतां तो एकदम थांबली. तिला वाटलें कीं, कोणी तरी सवत माझ्या सुखाच्या आड आली आहे. आणि स्त्रियांना तर या सवत मत्सराच्या वेदना सर्वांत तीक्ष्णशा भासतात.

तिला आतां कळून आलें कीं, त्या विषयांधानें फक्त आपली विषयवासना तृप्त करून घेण्याकरितांच आपल्याशीं स्नेह केला होता. तिला आतां आपली किंमत कवडीमोल वाटूं लागली. मी भ्रष्ट झालें असें तिला वाटूं लागलें. पैशाकरितां मी आपल्याला विकून घेतलें हें तिला कळून आलें. प्रथम मीच होऊन कशी त्याला अनुकूल झालें याचें तिला स्मरण झालें. आणि तिचा तिलाच तिरस्कार वाटूं लागला. कारण ग्रीनवूडनेंही तिचा तिरस्कार केला होता.

आतां तिच्याजवळ सद्गुण ह्मणून राहिला नव्हता. फक्त तिचा ताठा मात्र कायम होता. सर्वांत अधिक मोल देणाराला तिचा उपभोग खुशाल घेतां आला असता, इतकी ती स्वभावतः विषयासक्त होती व आपली कोणतीही तृष्णा भागविण्याकरितां ती पाहिजे तें करण्यास तत्पर होती. प्रीति शब्दाचें पावित्र्य काय आहे तें तिला ठाऊकही नव्हतें. प्रीति ह्मणजे विषयवासना हाच अर्थ ती जाणत असे.

स्त्रियांना स्वाभाविक जो गर्व तो तिच्या अंगीं असे. आणि तो तिचा गर्व या वेळेला खालीं झाला होता. ह्मणून ती काय करावें या फिकिरींत होती. एकवार ग्रीनवूडला फिरून आपल्या मोहजाळांत आणावें असें तिला वाटे, व पुनः त्याचा सूड घ्यावा असें तिच्या मनांत येई.

अशा तऱ्हेचे तिचे विचार चालले आहेत, तों सर रूपर्ट हारबरोची स्वारी

एकदम आंत आली. हे आपले मित्र **चीस्टर** यांच्याबरोबर नुकतेच भोजन करून आल्या कारणानें, दारूची घाण यांच्या तोंडावाटें चालली होती. शिवाय अलीकडे हे काळजीग्रस्त झाल्यापासून, यांनीं पहिल्यापेक्षां जरा मोकळ्या मनानें बाटलाबाईची सोबत धरली होती.

खोलींत आल्याबरोबर, आपल्या कुटुंबाच्या समोरच एका खुर्चीवर पडून स्वारी बोलूं लागली: " **सिसिले,** आज तुला एक फार वाईट वर्तमान सांगावयाचें आहे. "

" असेल. " या शब्दांत तिनें असा भाव दर्शविला कीं, माझ्या मी काळजींत आहे, तिच्यांत आणखी दुसऱ्याचा त्रास मला नको.

" हें पहा, उद्यां बारा वाजायच्या आंत हजार पाऊंड मिळाले पाहिजेत. "

हें भाषण एकून **सिसिले**ला फक्त हंसायला मात्र आलें.

" **सिसिले,** मी दुःखांत असलों ह्मणजे तुला आनंद होतो, पण ही वेळ कांहीं हंसण्याची नाहीं. "

" मी तरी काय करूं ? आतां कांहीं माझ्याजवळ तुह्माला चोरायला दागदागिने नाहींत. "

" पण तूं माझी बायको आहेस ; तेव्हां तुझ्या नवऱ्याचा जो दुर्लौकिक तो तुला बाधक होणारच. "

" तुह्माला जर दिवाणी तुरुंगांत रहायचें भय वाटत असेल, तर त्याबद्दल तुह्मी काळजी करूं नका. "

" ती कशी ! "

" जे कोणी तुह्माला पुसायला येतील, त्यांना मी सांगत जाईन कीं, ते हिंवाळ्याकरितां **पारिस**मध्यें गेले आहेत. "

" हा पोरगळपणा आहे. यांत कांहीं अर्थ नाहीं. "

" ह्मणण्यासारखा कांहीं पोरगळपणा नाहीं. कारण, महिना महिना घर सोडून राहायची तुह्माला संवय आहेच. "

" **सिसिले,** ही वेळ उणे शब्द बोलण्याची किंवा मनांत चुरस बाळगण्याची नव्हे. जरी आपणां उभयतांमध्यें एकमेकांसंबंधानें प्रीति नाहीं तरी आपल्यावर आलेल्या प्रसंगाचा शांतपणानें विचार करायला काय हरकत आहे ? **सिसिले,**तुला मी एकच विचारतों,हजार पाऊंडांची तूं माझी गरज भागवशील ? "

जिला या रकमेचा दशांशमुद्धां मिळविण्याचें कोठें साधन नव्हतें, व जी

आपल्याला शंभर पाऊंड मिळाले नाहींत ह्मणून नुकतीच निराश होऊन बसली होती, तिला नवऱ्याचें पैशाबद्दलचें विचारणें इतकें हास्यास्पद वाटलें कीं, ती जरी आपल्या दुःखांत होती तरी, खुर्चीवर पडून ती मोठ्यानें व मनापासून हंसायला लागली.

इकडे रूपर्ट आपल्या खुर्चीवरून उठून इकडे तिकडे फिरूं लागला. पुढें काय करावें हें त्याला मुळींच सुचेना. त्याला आशा फक्त एक बायकोची होती. व तिला सर्व हकीकत सांगण्याला त्याचा तर धीर होईना. शेवटीं पुन्हां खुर्चीवर बसल्यावर कांहीं वेळानें तो ह्मणाला:—" खरेंच सिसिले, तूं मला वेड लावण्याचा विचार मांडला आहेस ! "

" हो, आलीकडे तुमचें अंतःकरण फार कोंवळें बनलें आहे; तरी तें वेड लागण्याच्या स्थितीला येईल, इतकें कोंवळें आहे हें मला ठाऊक नव्हतें. तसेंच आपल्या ठिकाणीं अधिक शहाणपणा असल्याचेंही पण मला कधीं आढळून आलें नव्हतें. "

" प्रिये, आतां ही थट्टा पुरे कर ! मी तुला खरेंच सांगतों कीं, माझ्या विनाशकालाची वेळ अगदीं जवळ येऊन ठेपली आहे; व तूं माझी बायको ह्मणून तो विनाशकाल तुलाही बाधक झाल्याशिवाय राहणार नाहीं. "

" तर मग सांगाच आतां तुमच्यावर काय प्रसंग आला आहे तो; व त्यांत मला उपयोगी पडतां येईल कां नाहीं हें मीही सांगेन. "

"तो प्रसंग काय आहे तो मला विचारूं नकोस. फक्त हजार पाऊंड—मग ते कोठून व पाहिजे त्या रीतीनें कां मिळेनात—तुला मिळतील कां नाहीं तें सांग?"

" छे:! रूपर्ट, या वेळेला माझी मलाच पंचाईत पडली आहे;आणि तुमच्या या उधळेपणाला मी कोठपर्यंत पुरवूं ? मला ठाऊक आहे कीं, हें कर्ज बहुतकरून जुगारीच्या वेळेला झालें आहे. "

" छेः; हें फार निराळें आहे. तूं प्रयत्न कर. जर उद्यां बारा वाजेपर्यंत हें काम झालें नाहीं, तर परिणाम फार वाईट होईल. मला ठाऊक आहे कीं, तुझ्या मनांत आलें तर माझ्याकरितां तुला कोठेंही उसनवार मिळेल. तुला जागा आहे. मग तो कशी असो, तिच्याबद्दल हरकत नाहीं, आणि मी तें विचारीतही नाहीं. कारण, तुझ्या गुप्त गोष्टी हुडकून काढण्याची मला मुळींच इच्छा नाहीं. "

" तुम्ही नमेच निचारीत आहांत ! माझ्या गुप्त गोष्टी हुडकून काढण्याची

तुह्मांला इच्छा नाहीं खरीच. परंतु गरज लागली ह्मणजे, माझ्या पेट्यांतून, कपाटांतून कांहीं निघण्यासारखें असल्यास तें हुडकून काढण्यास मात्र तुह्मी मागेंपुढें पहात नाहीं. " हे शब्द बोलतांना तिच्या तोंडावर सस्मित तिरस्कार व्यक्त दिसत होता.

आपल्या बायकोचें हें असें वर्तन पाहून रूपर्टचें माथें फिरून गेलें; परंतु मोठ्या प्रयत्नानें त्यानें आपला मत्सर व क्रोधाग्नि आवरून धरिला.

" बाईसाहेब, मेहेरबानी करून आपला हा विनोद बाजूला ठेवा, व क्षणभर माझ्याशीं चांगलें बोला. "

" मी बोलायला तयार आहें. पण तुह्मीच होऊन माझी थट्टा करीत आहां. तुमचा विनाशकाल आला आहे व तो मला बाधक होईल ह्मणून तुह्मी संदिग्ध सांगतां; परंतु आपलें काम करून घेण्यापेक्षां जास्ती कांहीं तुह्मी आपली खरी हकीकत सांगत नाहीं. बरें, तें काम तरी हलकें आहे? तर हजार पाऊंड पाहिजेत, व ते थोड्या अवकाशांत, जिला आतां कोणी आधार नाहीं, व जिच्याजवळ आतां गहाण ठेवायलाही कांहीं नाहीं अशीच्याजवळ मागतां—"

" ऐक ऐक सिसिले, तुला कोणाचा आधार नाहीं असें कसें होईल? आज वर्षभर तुझ्याजवळ पैसे चांगले खेळत होते. दोनदां तूं आपल्या जिनस सोडवून आणल्यास, पुष्कळ मागणेकऱ्यांचीं तूं तोंडें मिटविलींस, चाकरांचा पगार आणि घराचें भाडें वेळचे वेळेस देऊन टाकतेस, आणि—"

" आणि यांत आपल्याला जे नवरे ह्मणवून घेतात त्यांचा घरखर्चांत एक पैसा सुद्धां नाहीं—"

" हो, हें मी कबूल करतों; व यावरूनच सिद्ध होत आहे कीं, तुला कोठें तरी आधार आहे. किंवा कदाचित् तुझे आईबाप तुला गुप्तपणें पोंचवीत असतील. कांहीं असो. तुला आधार आहे खरा. तो आधार कुठला हें मी तुला विचारीत नाहीं. मला जें काय आतां पाहिजे आहे ती मदत पाहिजे व ती उद्यां बारा वाजायच्या आंत. "

" जरी मी तुह्मांला पाहिजे तेवढी रक्कम उभारली असें समजा. तरी ती कशाला पाहिजे हें मला समजल्यावांचून मी ती तुह्मांला देणार नाहीं. "

" बरें, जर मी तुला ती गोष्ट सांगितली, तर मग तूं ती रक्कम मला देशील?"

" मी खात्रीनें सांगत नाहीं. "

" पण तूं आपला प्रयत्न करून पाहशील?" रूपर्टनें लोचटपणानें विचारलें

"तुमच्यावर काय प्रसंग आहे तो कळल्याशिवाय मी कांहीं करायची नाहीं."

" आतां मी तुला फार वेळ दुग्ध्यांत ठेवीत नाहीं. माझ्या काळजीचें कारण हें आहे कीं, हजार पाऊंडांचा माझ्या हातचा कागद ग्रीनवूडकडे गुंतला आहे व त्याची मुदत उद्यांची आहे."

" अं:! हा तर देवघेवीचा साधा प्रकार आहे;आणि लोकांच्या देण्याची तुम्हां-ला मोठीशी क्षितिहि वाटत नाहीं. मग याला एवढें भ्यायला कशाला पाहिजे?"

" नुसता कर्जाचाच साधा प्रकार असता तर त्याची मीं मुळींच काळजी वाळगली नसती." आपल्या बायकोचीं हीं छद्मी भाषणें मोठ्या जुलमानें सहन करून तो बोलतो: " पण दुर्दैवानें मला काय बुद्धि झाली ती—त्या वाईट वेळेला—"

" बोला महाराज बोला ! काय तें कळूं द्या एकदां." ती या वेळेला खरो-खरच घाबरून ह्मणाली.

" सिसिले, काय बोलूं ! ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं, अगदीं नाइलाज होण्याची वेळ आली तेव्हां मीं एक खोटा कागद केलाग !"

" खोटा कागद ! अगबाई ! केवढा हा दुर्लौकिक ! माझ्या तोंडाला काळोखी कींहो आणलीत !" सिसिला प्रेतवत् पांढरी पडून बोलली.

"मी तुला सांगितलें नव्हतें कीं,माझा विनाशकाल तुला बाधक होईल ह्मणून! परंतु आणखीहि तुला थोडेंसें ऐकायचें आहेच ! मी जो खोटा कागद केला तो—"

" बोला हो लौकर एकदां !"

" लार्ड ट्रिमार्डिनच्या सहीचा केला !"

" काय ? माझ्या बापाच्या सहीचा !"

" होय. तुला मीं सर्व सांगितलें. आतां माझें काम करशील ना ?"

" छट्. तुमचें हें नीच कृत्य झांकण्याकरितां माझ्याजवळून कांहीं सुद्धां मिळण्यासारखें नाहीं."

" आणखी तूं तर असें ह्मणाली होतीस ना कीं, मीं सर्व सांगितलें तर तूं माझें काम करशील ह्मणून ?"

" तुमची हकीकत समजून घेण्याची मला फार इच्छा झाली होती; परंतु ती न सांगण्याचा जसा मला तुमचा निश्चय दिसला, तसें मीही ती तुमच्या-पासून निघते कीं नाहीं हें पाहिलें."

" तर मग तुझ्याकडून कांहीं काम होण्यासारखें नाहीं!" रूपर्टनें निराश होऊन विचारलें.

" मुळींच नाहीं! मी हजार पाउंड आणूं कोठून? तुह्मांलाच पाहिजे तर ग्रीनवूडची जाऊन समजूत करा; किंवा माझ्या बापाच्या पायां पडून त्याच्यापाशीं सर्व कबूल व्हा!"

" ग्रीनवूड हट्टी मनुष्य आहे. आणि तुझा बाप तर काय, तुला ठाऊक आहे. मला आपल्या धाब्यास सुद्धां उभा राहूं द्यावयाचा नाहीं. तेव्हां माझ्या हातून आतां कांहीं होण्यासारखें नाहीं. करशील तर तूं कांहीं करशील. कदाचित् ग्रीनवूड तुझें ऐकेल; किंवा तुझा बाप तुझ्या ह्मणण्याला रुकार देईल तसा माझ्या ह्मणण्याला देणार नाहीं."

" तुमचें असें तर ह्मणणें नाहीं ना, कीं ग्रीनवूडजवळ माझें कांहीं वजन आहे ह्मणून?"

रूपर्ट तिच्या तोंडाकडे बारीक नजरेनें पहात बोलतो: " इतकेंच नाहीं, तर माझी अशी पक्की खात्री आहे कीं, त्याच्याजवळ तुझें पुष्कळच वजन असावें. आणि तें वजन आतां माझ्याकरितां तुह्मी खर्च कराल तर माझ्यावर पुष्कळ उपकार होतील."

" तुमच्या ह्मणण्याचा अर्थ तरी काय रूपर्ट?" त्याचे उपरोधिक शब्द ऐकून लज्जेनें तिच्या तोंडावर कालिमा पसरली व ती खालीं मान घालून राहिली.

" सिसिले, तूं मला आतां जास्ती बोलायला लावूं नकोस. मला सर्व ठाऊक आहे, इतकेंच नाहीं, पण माझ्याजवळ पुरावा आहे. परंतु त्याबद्दल कांहीं हरकत नाहीं. एवढ्या अडचणींतून तूं मला मोकळे कर, ह्मणजे मी तुला कांहीं बोलणार नाहीं."

" मी काय करावें असें तुमच्या मनांत आहे?" तिनें कांपऱ्या कांपऱ्या शब्दानीं विचारलें.

" ग्रीनवूडकडे जा, आणि माझी एवढी भानगड मिटीव." रूपर्टनें मोठ्या दिमाखानें सांगितलें.

" छे, मी साफ जाणार नाहीं. त्याच्याजवळ जाऊन शब्द टाकण्याला मला काय हक्क आहे? तो नाहीं ह्मणून ह्मटल्याशिवाय कधीं रहायचा नाहीं."

" सिसिले," रूपर्ट हळूंच पण [illegible] [illegible]: " अग. जिनें, त्याला क-

थींच कोणतीही गोष्ट नाहीं ह्मणून ह्मटलें नाहीं, त्या ग्रीनवूडसारखा विलासी पुरुष तुला एखादी गोष्ट नाहीं ह्मणेल काय?''

"तुमचें असें तर ह्मणणें नाहीं ना, कीं तो–''

"हो, माझें असें ह्मणणें आहे कीं, ग्रीनवूड तुझा प्रियकर आहे, व ह्मणूनच तुझ्या नवऱ्याला वांचविण्याकरितां तुला त्याच्याजवळ शब्द टाकतां येईल.''

"अरे देवा! काय मी हें ऐकतें आहें? रूपर्ट, याला तुमच्याजवळ काय पुरावा आहे? काय आधार आहे? काय प्रत्यंतर आहे? मला सांगा.''

"माझ्याजवळ प्रत्येक पुरावा, प्रत्येक आधार, व प्रत्येक प्रत्यंतर आहे समजलीस? पण मी तुला फिरून सांगतों कीं, माझी अब्रू तूं वांचविलीस तर तुझी अब्रू मळविण्याची माझी बिलकूल इच्छा नाहीं.''

"हें अगदीं खोटें आहे. मी एवढें कबूल करतें कीं, ग्रीनवूड मला बरेच पैसे देत असे. पण ते कसे? व्याजावर.''

"व्याजावर खरेंच!'' आतां उणे शब्द बोलण्याची आपली पाळी आली आहे असें समजून तो बोलतो: "हो, व्याजावर खरेंच. माझी दुर्लौकिकरूपी पेढी व्याज देण्याला धनंतर आहेच!''

"नाहीं बरं कां! व्यापाराच्या न्यायानें व कायद्यानें बांधून घेऊन तो मला पैसे उसने देत होता. आणखी आजच त्यानें यापुढें कांहीं मिळणार नाहीं ह्मणून सांगितलें.''

"हें एखाद्याला अगदीं खरेंच वाटेल!''

"नसेल खरें वाटत तर घ्या आपलें समाधान करून.'' असें ह्मणून आपल्या चोळींतून एक पत्र काढून तिनें त्याच्यापुढें टाकलें.

ग्रीनवूड आणि सिसिला यांच्यामध्यें चाललेला पत्रव्यवहार नेहमीं थोडक्यांत व फार सावधगिरीनें लिहिलेला असे. त्यामुळें या वेळेला रूपर्टच्या हातीं गेलेल्या या पत्रांत, आपल्या बायकोच्या दुराचरणाची खात्री करण्यासारखें त्याला कांहीं दिसलें नाहीं. आपल्या धंद्याच्या संबंधानें एखादा गृहस्थ जसा एखाद्या स्त्रीला कांहीं मजकूर लिहितो, त्याप्रमाणें या पत्रांतला मजकूर होता. या पलीकडे कांहीं नाहीं.

रूपर्टनें तें पत्र वाचल्यावर फेंकून देऊन तो ह्मणाला: "त्यांतलें बीज हेंच आहे कीं, ग्रीनवूडला आतां नुसता [illegible] आला आहे; व तो कशा तरी रीतीनें तुझा संबंध तोडूं [illegible].'' नंतर तो हुकूम करतात तसा

ऐटीनें बोलूं लागला: " तर मग मी आतां तुला एक गोष्ट सांगतों त्याप्रमाणें कर. आतांच्या आतां तूं ग्रीनवूडकडे जा; व त्याला सांग कीं, आपलें सर्व उघडकीस आलें. कारण, चीस्टरनें तुह्मांला एकमेकांच्या गळ्यांत मिठी मारतांना पाहिलें त्या दिवसापासूनचा माझ्याजवळ खरा—खरा पुरावा आहे—"

" अरे मेल्या मांगा चीस्टरा ! " सिसिला म्हणाली.

"त्या दिवसापासून चीस्टर आणि मी तुझ्यावर डोळा ठेवून आहोंत, व तुला नेमलेल्या वेळीं तुझ्या प्रियकराकडे जातांना आह्मीं पुष्कळ वेळां पाहिलें आहे!"

" पण हें काम फार नीचपणाचें आहे !"

" हं, मध्यें बोलूं नकोस. तुह्मी दोघे एका भोजनगृहांत जात होता, तेव्हां मी व माझा साक्षीदार, असे तुमच्या पाठोपाठ होतों. तेथें गेल्यावर तुमच्या शेजारच्या खोलींत बसून तुमचें सर्व भाषण ऐकलें. त्याप्रमाणेंच तुमचे चाललेले विषयविलास हेही आह्मांला ठाऊक आहेत."

" क्रूरा, तुमच्या मनांतून माझा जीव कां घ्यायचा आहे ? " असें ह्मणून तिच्या डोळ्यांतून टिपें गळूं लागलीं.

" छे; माझ्या मनांतून फक्त माझी अब्रू बचवावयाची आहे. ह्मणजे मग मी तुझ्या कृत्यांवर पांघरूण घालीन. तर जा मग त्याच्याकडे. त्याला हें सर्व सांग. त्याला ह्मणावें, मला सर्व ठाऊक आहे. मी पुष्कळ दिवस तुमचे हे ढंग पहात आहें; व मी मनांत आणलें असतें तर त्याच्या त्या भिकारड्या कागदाच्या किमतीपेक्षां दसपट जास्ती अशी मी अब्रूच्या नुकसानीची फिर्याद त्याच्यावर लावली असती. परंतु त्याला असें कळीव कीं, तो कागद जर फाडून टाकशील तर मी आपसांत मिटवायला सुद्धां तयार आहें. "

" जेव्हां तुमची त्याची गांठ पडली होती, तेव्हां तुह्मींच हें त्याला बोलायचें होतें कीं नाहीं ? " सिसिला आपले डोळे पुसून बोलली; व जें कळूं नये तें कळलें, आतां उपाय नाहीं, ह्मणून आपलें मन आंवरण्याचा प्रयत्न करूं लागली.

" तुझें दुराचरण मला ठाऊक आहे, हें तुला कळूं देण्याचा माझा मुळींच विचार नव्हता. व प्रथमच ग्रीनवूडकडून माझें काम करून देण्याचें तूं कबूल केलें असतेंस तर या गोष्टी बाहेर काढण्याचें मला भागही पडलें नसतें."

" कदाचित् असाही तुमचा विचार नसेल कशावरून, कीं माझ्याकडून पैसे घेऊन नेवढी खोट्या कागदाची भानगड मिटवून टाकावी; व एकवार

ग्रीनवूडच्या कचाट्यांतून सुटल्यावर त्याच्यावरच उलट अब्रूच्या नुकसानीची फिर्याद करून आपल्या बायकोची अब्रू रस्त्यावर आणावी ? पण मला समजतें कीं, माझ्याकडून पैसे निघत नाहींत हें जसें कळलें व अब्रू जाण्याचा प्रसंग तर जवळ येऊन ठेपला हें जसें समजलें तसें आतां, 'मला तुझ्या गोष्टी सर्व ठाऊक आहेत' असें मोठ्या डौलानें सांगून, माझ्या हातून आतां आपसांत मिटविण्याची खटपट चालविली आहे."

"सिसिले, तुला वाटतें मी असें करीन म्हणून ?"

"तुम्ही ना ? काय पाहिजे तें कराल, याबद्दल माझी पक्की खात्री आहे ?" सिसिला रागानें बोलली. या वेळेला, या दुराचारी—दुष्ट—व बेतक स्त्रीचा, आपल्या नवऱ्याचे दुष्ट बेत उघडकीस आणून त्याला लाजविण्याचा प्रकार पाहण्यासारखा होता यांत कांहीं शंका नाहीं.

"असो. एकमेकांचीं वर्में काढण्यांत कांहीं अर्थ नाहीं. ग्रीनवूडकडे जाऊन हें मिटीव. म्हणजे मागचें सर्व विसरून जाऊं."

"पण ग्रीनवूडनें तो कागद नाहींसा केल्यावर जिवंत जीव असे तोंपर्यंत तुम्ही ती गोष्ट फोडणार नाहीं याला काय प्रमाण ?"

"तो सांगेल त्याप्रमाणें मी लिहून देईन मग तर झालें? पण वेळ चालला. हे पहा दहा वाजले, उद्यां बाराच्या आंत निकाल लागला पाहिजे."

सिसिला खुर्चीवरून उठून, "बरं तर, त्याच्याकडे जाऊन मी आपला प्रयत्न करून पाहतें." असें म्हणून ती आपल्या खोलींत बाहेर जाण्याचा पोषाख करण्याकरितां निघून गेली.

इकडे ह्यूर्टनें घंटा * वाजवून थोडीशी दारू मागविली, व एका चाकरास गाडी आणण्याकरितां दवडलें.

गाडी येऊन उभी राहिल्यावर, सिसिलाबाईसाहेबांची स्वारी दरवाज्याच्या उंबऱ्यावर येऊन धडकते आहे तोंच, चांगला पोषाख केलेला एक इसम येऊन

---

* हा प्रकार असा आहे कीं, घरांच्या प्रसिद्ध ठिकाणीं, म्हणजे जेथून विशेष ऐकूं येईल अशा ठिकाणीं एक घंटा बांधलेली असते; व तिला दोऱ्या बांधून त्या जेवणाच्या जागेंत, निजायच्या खोलींत, दिवाणखान्यांत वगैरे ठिकाणीं नेलेल्या असतात. चाकरांना हाक मारण्याच्या कामीं; किंवा एखादें अरिष्ट आलें तर तें कळविण्याकरितां इचा उपयोग करतात. हा संप्रदाय आपल्या इकडे अगदींच अज्ञात आहे.

आनें एक पत्र तिला दाखविलें; व हें " सर रूपर्ट हारवरोना द्यावयाचें आहे, " असें तो ह्मणाला.

सिसिलनें हें पत्र घेतल्यावर ज्या चाकरानें तें आणून दिलें तो निघून गेला. सिसिल आपल्या चाकराकडून तें तावडतोब नवऱ्याकडे पाठवून देणार होती; परंतु दिव्याच्या उजेडांत या पत्राच्या लखोट्यावरील अक्षर तिच्या नजरेस पडलें; व तें नायकाच्या नाजूक हातानें लिहिलेलें आहे असें तिला समजल्याबरोबर तिनें लागलींच तें पत्र आपल्याच जवळ ठेवून घेतलें. नंतर गाडींत बसून गाडीवाल्यास ती गाडी वसंतबागेंत हाकण्यास सांगितली.

गाडीच्या दोन्ही बाजूला मोठाले कंदील होतेच. त्यांच्या प्रकाशानें तिला या पत्रांतील मजकूर सहज वाचतां येण्यासारखा होता. तिनें लागलींच तें पत्र फोडून पाहिलें, तों त्यांत एक हजार पाऊंडांची नोट तिला सांपडली. त्या नोटेबरोबर एक चिठ्ठी होती तीः—

" ज्यानें एकवार आपलें औदार्य अनुभवलें होतें त्याला, आपण हजार पाऊंडां-करितां ज्यार्ज माटेंग ग्रीनवूडच्या कचाट्यांत सांपडलां आहांत असें अकस्मात कळल्या-वरून तो इसम आपणास ही रक्कम पाठवीत आहे. "

नांव, मित्ती, पत्ता वगैरे या पत्रावर कांहीं नव्हतें. अक्षर नाजूक हातानें लिहिलें असून, पत्र आणून देणाऱ्या चाकराचा पोषाख चांगला होता. या सर्व चिन्हांवरून तिची खात्री झाली कीं, रूपर्टशीं संबंध असणाऱ्या कोणी तरी स्त्रीनें अशा प्रकारचें त्याला साह्य केलें आहे.

हा प्रकार पाहून सिसिलची चित्तवृत्ति बदलून गेली. तथापि, या मत्सराग्नी-ची तळमळ एवढ्या मोठ्या द्रव्यलाभाच्या आनंदानें वितळून गेली हें सांगणें नकोच. असो, अशा स्थितींत तिची गाडी ग्रीनवूडच्या बागेपाशीं येऊन ठेपली.

---

## भाग १६.

### पार्लमेंटच्या सभासदाची धूळभेट.

" कां बाईसाहेब, माझ्या संध्याकाळच्या पत्रासंबंधानें कांहीं तरी बोलायला आलां असाल ! " ग्रीनवूडनें सिसिलला दिवाणखान्यांत आणून बसवि-ल्यावर विचारलें.

" मी त्याहीपेक्षां महत्वाच्या कामाकरितां आलें आहें. रूपर्टला सर्व कळलें, "

" या पाजी चीस्टरनें तर सांगितलें नसेल ना ? "

" हो, त्यानेंच आपल्या सर्व गोष्टी सांगितल्या. इतकेंच नाहीं, तर आज कित्येक दिवस आपली पाळत राखून ते होते."

" हें फार वाईट झालें. तथापि, रूपर्टची कांहीं छाती नाहीं माझ्याविरुद्ध ब्र काढण्याची. किंवा ही गोष्ट फोडण्याची ! "

" कारण ? त्याच्या हातचा खोट्या सहीचा दस्तऐवज तुमच्याजवळ आहे म्हणून होय ? "

" हं, एकूण हें देखील त्यानें तुला सांगितलें म्हणा. मग झालें तर. तो आतां माझ्या अगदीं हातांत आहे असें समज. "

" म्हणूनच, आजचें जें महत्वाचें काम आहे तें हेंच कीं, रूपर्टनें तुमची ही भानगड तोडण्याकरतां मला धाडलें आहे. "

"तुझ्यापेक्षां खुपसून दरबारी वकील दुसरा त्याला मिळाला नसता खराच."

" त्यांचें म्हणणें असें आहे कीं, तुम्ही तो रोखा त्यांच्या स्वाधीन करावा. म्हणजे ते, तुम्ही त्यांच्या बायकोशीं संबंध केल्याबद्दल तुमच्यावर कोडतांत कांहीं खटला करणार नाहीं, अशा अर्थाचा तुम्हांला वाटेल त्या शर्तीवर कागद लिहून देण्याला तयार आहेत. "

सिसिलेला जितकी या भानगडीची भीति वाटत होती तितकी ग्रीनवूडला न वाटून तो म्हणाला: " अहो वकीलीणबाई, तुम्ही सांगतां तें सर्व खरें; परंतु तुमच्या या मसलतीप्रमाणें माझा कांहीं फायदा होईल असें मला वाटत नाहीं. शिवाय, जोंपर्यंत तो रोखा माझ्या ताब्यांत आहे, तोंपर्यंत, माझ्यावर नुकसानीची फिर्याद लावण्याची तुझ्या नवऱ्याची कांहीं छाती नाहीं. कारण, त्याला पक्कें ठाऊक आहे कीं, तो माझ्यावर फिर्याद करायला निघेल तर त्याच क्षणीं मी त्याला पोलिसाच्या ताब्यांत देईन."

ज्याच्या विषयवासनेच्या ही पूर्ण अंकित होऊन गेली होती, त्याचें हें द्वाष्टपणाचें भाषण ऐकून तिला फार वाईट वाटून ती म्हणाली: " तर मग ग्रीनवूड, माझ्याकरितां तरी निदान ही गोष्ट आंतल्या आंत मिटवा. "

" एवढ्या हजार पाऊंडांच्या रकमेवर पाणी सोडायला ती रक्कम लहान का आहे ? तूंच सांग बरं सिसिले. "

" बरं, त्यानें तुमचे पैसे भरण्याकरितां कोठून जर एवढी रक्कम मिळविली तर तुम्ही काय कराल ? "

" पण त्याला सर्व पैसे देतां यावेत असा माझा कधींच उद्देश नव्हता-मीं अशी व्यवस्था करूनच ठेवली होती कीं, त्याला भय दाखवून त्याच्याकडून पांच सहाशें पाऊंड मिळवून हिशेबांत जमा करावेत व कांहीं बाकी ठेवून रोखा तसाच कायम ठेवावा; व राहिलेली बाकी तो जरी देऊं लागला तरी मी घेऊं नये. कारण, तो रोखा माझ्याजवळ राहिल्यानें त्यानें माझ्या अगदीं तावडींत रहावें."

" ग्रीनवूड, मी फिरून एकदां सांगतें कीं, माझ्या ह्मणण्याला रुकार द्या, व ही मानगड आंतल्या आंत मिटवा."

" तुझ्याचकरितां सिसिले, स्टुअर्टची मसलत ऐकणें मला भाग आहे. बरं तर, त्याच्याकडून असा कागद लिहून घेऊन ये कीं, ' मी, माझी बायको व ग्रीनवूड या उभयतांचा अयोग्य संबंध आहे असें प्रत्यक्ष पाहिलें आहे. परंतु त्या अपराधाबद्दल माझी नुकसान मला भरपूर मिळाल्याकारणानें त्याबद्दल आतां माझें कांहीं ह्मणणें नाहीं.' अशा तऱ्हेचा जर त्याच्यापासून कागद लिहून आणशील तर दोन्ही पक्षांना हितावह असा या गोष्टीचा निकाल लागेल."

" ठीक आहे. उद्यां अकरा वाजतां सकाळीं मी असा कागद लिहून आणते." असें ह्मणून ती तेथून निघून आपल्या नवऱ्याकडे आली. तो ग्रीनवूडकडून काय उत्तर येतें याची वाटच पहात बसला होता. सिसिलेनें त्याला सर्व मजकूर कळविल्याबरोबर त्यानें आपली अब्रू वांचविणारा असा, ठरल्याप्रमाणें कागद लिहून सिसिलेच्या स्वाधीन केला.

" सिसिले, झालें हें ठीकच झालें." तो ह्मणाला." आतां आणखी एक माझा विचार तुला कळवायचा आहे; व तो तुला पसंतही पडेल याविषयीं शंका नकोच."

" बोलावं महाराज काय असेल तें." ती ह्मणाली.

" बोलणं ह्मणून इतकेंच कीं, आज ज्या गोष्टी बाहेर आल्या आहेत; त्यांवरून यापुढें ह्मणजे एकमेकांविषयीं आपलीं मनें शुद्ध राहतील असें मला वाटत नाहीं. मी लबाड आहें, असें तुला कळून आलें आहे; व तूं व्यभिचारी आहेस हें मीं पाहिलें आहे. करितां, तुझी जर मर्जी असेल तर पूर्वीप्रमाणें आपण एके ठिकाणीं राहूं. परंतु तुझी खोली निराळी, माझी खोली निराळी. तुझा पंथ निराळा, माझा पंथ निराळा. तूं माझ्यामध्यें बोलूं नयेस. मी तुझ्यामध्यें बोलूं नये. मात्र, लोकांत आपण एक विचारानें आहोंत असें दाखवायचें. तसेंच, मीं एखादी रांड ठेवली असें तुला कळलें तर त्याची पंचाईत तूं करूं

नयेस, व तूं एखादा फक्कड पाहिलास तर तिकडे मीही लक्ष्य देणार नाहीं. कसें काय! हें तुला पसंत पडतें ? "

" अगदीं मनापासून. याचा लेखी करार करून टाकायचा आहे ! "

" माझ्याकडून तयारी आहे, त्याच्या दोन नकला करून एक तुझ्या जवळ ठेवीन, व एक माझ्याजवळ ठेवीन. ह्मणजे झालें कीं नाहीं ? "

**बारोनेट**नें लागलींच बोलल्याप्रमाणें कागद लिहून तिला वाचून दाखविला. तिनेंही त्याला आपली संमति दाखविली. नंतर त्याची नक्कल करून नवरा-बायकोनीं त्यांवर आपल्या सह्या केल्या ; व अशा तऱ्हेनें त्यांनीं परस्परांचीं विवाहवचनबंधनें तोडून टाकलीं.

ते मग परस्पराविषयीं निर्मळ अशा मनानें निरनिराळ्या खोल्यांत निजायला गेले. अशी त्यांच्या मनाची स्थिति आज कित्येक वर्षें नव्हती ह्मटलें तरी चालेल. **सिसिल**नें आपल्याजवळ आलेल्या पत्रासंबंधानें व हजार पाऊंडांच्या नोटेसंबंधानें नवऱ्याजवळ कांहीं उल्लेख केला नाहीं, हें वाचकांना सांगणें नकोच. असो.

दुसरे दिवशीं सकाळींच **सिसिला ग्रीनवूड**कडे आली. तों त्याच्या दरवाज्यासमोरचा रस्ता, अनाथ पोरांच्या गर्दीनें अगदीं भरून गेला होता. यांत कांहीं मुलें व मुली असून, हीं एका धर्मोपाध्यायाच्या मागून चाललीं होतीं; व यांच्याबरोबर यांचा शिक्षक व शिक्षकीण होती. या मुलांमुलींच्या दीनवाण्या तोंडांवरून, त्यांच्या हातांपायांच्या काड्यावरून व त्यांच्या पोषाखांवरूनच त्यांची रोजची दोनप्रहरची वेळ कशी भागत असेल हें उघड दिसत होतें.

**सिसिला** घरांत गेल्याबरोबर **ग्रीनवूड**च्या चाकरानें तिला दिवाणखान्यांत नेऊन बसविलें, व त्या मुलांना वाटेस लावल्यावर **ग्रीनवूड** तुह्माला येऊन भेटतील ह्मणून सांगितलें.

इकडे **लाफर**नें बराच वेळ या मुलांना थंडींत कुडकुडत ठेवल्यावर एकदांचें दरवाजा उघडून आंत घेतलें. या मुलांमुलींची पलटण मग जशी आंत जाऊं लागली, त्याबरोबर या पलटणीबरोबर आलेले धर्मोपाध्याय दरवाजाच्या एका पायरीवर मोठ्या प्रतिष्ठितपणानें उभे राहून हें लष्कर कसें आंत जात आहे तें पाहूं लागले. यांची ही गंभीरता पाहून त्या मुलांना खचीत असें वाटलें असावें कीं, या पृथ्वीच्या पाठीवर श्रेष्ठत्वास पोंचलेले असे गृहस्थ हेच आहेत; व कदाचित् त्यांच्या मनांत अशीही शंका आली असेल कीं, आह्मी ज्यांच्याकडे

आतां आलों आहोंत ते **ग्रीनवूड** यांच्यापेक्षां थोर, किंवा त्यांच्यापेक्षां हे धर्माधिकारी थोर ? असो.

हें छोटेंसें लष्कर आंत गेल्यावर हे धर्मोपाध्यायही आंत शिरले; व तेथें त्यांनीं एकवार आपल्या मस्तकावरील पत्रावळीसारखी विस्तीर्ण टोपी काढून घराच्या मालकाच्या संबंधानें आपली पूज्यबुद्धि दर्शित केली. तों थोड्या वेळानें लागलींच दिवाणखान्यांतील बाजूचें एक दार उघडून **ग्रीनवूड** साहेबांची स्वारी स्वतः हजर झाली.

त्याबरोबर या धर्मोपाध्यायांनीं आपल्या हातांतील काठी तेथील संगमरवरी फरशीवर आपटली. हा इषारा लक्ष्यांत ठेवण्याबद्दल मुलांना पूर्वीच सांगून ठेवलें असल्या कारणानें, त्यांनीं लागलींच आपल्या डोक्यांवरील टोप्या काढून, आपलीं डोकीं जराशीं खालीं करून व आपले डावे पाय थोडेसे मागें घेऊन या बड्या गृहस्थास सलाम केला. नंतर या धर्मोपाध्यायांनीं, आपल्या मोठेपणास शोभेल अशा स्वरानें व सभोंवार असलेल्या मुलांकडे डौलानें वरचेवर पहात भाषणास सुरुवात केली. "महाराज, हे अल्पपौत्र, महाराजांनीं त्यांस वस्त्रपारणादिक व अन्न अश्वासनादिक आंदण केल्याबद्दल कृतकर्माला स्मरून आपल्या कृतघ्नत्वाचे आभार्य फेडण्याकरितां अवशिष्ट झाले आहेत."

हें त्यांचें भाषण ऐकून **ग्रीनवूड** मोठ्या मोकळ्या मनानें बोलूं लागले. "**मफल**साहेब ज्यांच्याकरितां मी अतिशय कळकळ बाळगीत आहें, त्यांच्याकडून कृतज्ञतेची आलेली ही अल्पशी खूण पाहून मला फार आनंद होत आहे. शिवाय ते आपल्या यदृच्छेनें मला भेटण्याकरितां आले आहेत हें पाहून तर मला विशेषच आनंद होत आहे." (हा प्रकार **ग्रीनवूड**च्याच सांगण्यावरून **लाफर**नें घडवून आणला हें आमच्या वाचकांस सांगणें नकोच.) "ज्या अर्थीं मी एका स्वतंत्र, विद्वान् आणि महत्वाच्या अशा भागांतील लोकांचा मुकुत्यार आहें, त्या अर्थीं त्यांच्या कल्याणाकडे लक्ष्य देणें हें माझें कामच आहे. आणि ह्मणून या वेळेला या मुलांच्या आनंदमुद्रा पाहून, त्यांचें कल्याण करण्याचें ईश्वरानें माझ्या हातांत ठेवलें आहे याबद्दल त्याचे आभार मानल्यावांचून माझ्याच्यानें राहवत नाहीं."

हें भाषण संपल्यावर **मफल** साहेबांनीं आपल्या हातांतील काठी पुन्हां एकवार मोठ्या जोरानें आपटली; व पुन्हां हा इषारा पोंचतांच, तेथील मुलांमुलींनीं टाळ्यांचा गजर करून सोडला.

या प्रकार झाल्यावर, खालीप्रमाणे धर्मोपाध्यायांनी शिक्षक व शिक्षकीण यांची व ग्रीनवूडची ओळख करून दिली. नंतर शिक्षकानें मोठ्या लीनतेनें पुढें होऊन ग्रीनवूडची विनंति केली कीं, "महाराजांनीं या विद्यार्थ्यांच्या विशिक्षणाबद्दल त्यांस परिछिन्य केलें तर आम्हांवर महत प्रतोपकार होतील."

ग्रीनवूडनेंही, प्रसंगविशेषीं पार्लमेंटांत या विषयासंबंधानें बोलावें लागेल म्हणून या विनंतीला मान देऊन मुलांस प्रश्न करण्यास सुरवात केली. "मुला, तुझे आईबाप कोण ?" ग्रीनवूडनें त्याच्याजवळच उभा राहिलेल्या एका मुलास विचारलें.

"जे मला जेवायला घालतात व आंघलायला पांघलायला देतात ते."

अशा प्रकारचें उत्तर देतांना ऐकून शिक्षकांची स्वारी अगदीं कोपायमान होऊन म्हणते: "कायरे मूर्खा, नीट उत्तर द्यावयाचें समजत नाहीं का ?" नंतर हल्केंच सुचवितात:—"म्हणावें, ज्यांनीं जन्म दिला ते."

"नाहीं महालाज, ज्यांनीं जन्म दिला ते."

नंतर शिक्षक महाराजांनीं दुसरे विद्यार्थी परीक्षेकरितां हजर केले; परंतु हे जसे ग्रीनवूडपुढें येऊन उभे राहिले, तसे नखशिखांत घामानें भिजून गेले. ग्रीनवूडनें नंतर त्याच्या डोक्यावर हात फिरवून विचारलें: "बाळ, आदाम हा कोण होता?"

"पहिला पुलूष."

"शाबास ! आणि ईव्ह ही कोण होती बरं ?"

"पहिली स्त्री."

"अरे वा: ! बरं, इंग्लंडची राजधानी कोणती ?"

"महाराज, त्याला अद्याप भूगोल शिकविला नाहीं. तो नुकताच धूळाक्षर शिकत आहे." शिक्षक म्हणाला.

"कांहीं चिंता नाहीं. मुला, तुला पाडे येतात ?"

"बे एक बे—प, बे दोनी तीन, बे त्रिक आठ, बे चोक आठ, बे पंच चवदा—" अशा तऱ्हेची शिक्षकाच्या पट्टशिष्याची आगगाडी चालली होती, इतक्यांत शिक्षकानें मध्येंच चमकावल्यामुळें ती गाडी थांबून तिचा रुदनस्वर सुरू झाला. परंतु ग्रीनवूडनें, "कांहीं हरकत नाहीं. या मुलाला धर्मपुस्तक चांगलें येत आहे, व त्याचीच पुढून जरूरी आहे." असें सांगून शिक्षकाचें व धर्मोपाध्याय यांचें समाधान केलें. नंतर त्यानें स्वत: धर्मशिक्षण व

नीतिशिक्षण यावर एक जबरदस्त व्याख्यान दिलें. व अशा तऱ्हेनें हा एक मजेदार भाग संपविला.

ग्रीनवूड येथून निरोप घेऊन निघून गेल्यावर धर्मोपाध्यायांनीं पुन्हां एकवार इषारा केला. इतक्यांत लाफरनें दरवाजा उघडून दिला व हें लष्कर सावकाश बाहेर पडत चाललें. ही सर्व हकिकत दुसऱ्या दिवशींच्या वर्तमानपत्रांत यावयाची हें वाचकांना सांगणें नकोच. असो.

ग्रीनवूड येथून निघून ज्या दिवाणखान्यांत सिसिला याची वाट पहात बसली होती तेथें आल्यावर तिला ह्मणतो: " प्रिये, तुला पुष्कळ वेळ येथें थांबविलें याबद्दल क्षमा कर. काय करावें ? ज्या स्थितींत मला लोकांनीं आणून ठेवलें आहे, त्या स्थितिप्रमाणें आपल्या कर्तव्यकर्माला स्मरून वागलें पाहिजे."

" असला चवचळपणा माझ्याशीं पुरे आतां." सिसिला इतक्या तिरस्कारानें बोलली कीं, ग्रीनवूडनें तो यापूर्वी कधीं पाहिला नव्हता. " ठरल्याप्रमाणें हें घाणेरडें काम मिटविण्याकरितां मी आलें आहें. तुमच्या सांगण्याप्रमाणें त्यांच्याकडून हा मीं कागद लिहून आणला आहे. आतां त्यांच्या हातचा तेवढा कागद परत द्या ह्मणजे झालें."

ग्रीनवूडनें एकवार त्या कागदावरून वरवर नजर फिरविली; व तो आपल्या मनाप्रमाणें आहे असें त्याला समजल्यावर त्यानें आपल्याजवळ असलेली खोटी हुंडी काढून तिच्या स्वाधीन केली.

ती हुंडी हातांत पडली तशी तिच्या तोंडावर टवटवी येऊन तिचे नेत्र सतेज दिसूं लागले. या वेळेला तिनें पोषाख साधाच केला होता; परंतु ग्रीनवूडच्या दृष्टीनें ती आजच्यासारखी मनोहर कधींच दिसली नाहीं. त्यानें ती हुंडी तिच्या हातांत दिल्याबरोबर तिचा हात धेऊन त्याचें चुंबन घेण्याच्या तो विचारांत होता; परंतु इतक्यांत तिनें, एखाद्या सुशील स्त्रीला शोभणाऱ्या झटक्यानें, आपला हात माघारीं घेतला.

" हं दूर उभे रहा ग्रीनवूड," सिसिला गंभीरपणानें व बेपर्वाईनें बोलते: " तुमचा माझा आतां कांहीं संबंध नाहीं. तुह्मी दुष्ट आहांत हें मला पुरें कळून आलें आहे. भोळ्या स्त्रीचें तुमच्यावर कसें प्रेम असतें याची तुह्मांला किंमत नाहीं. तुह्मी मला—एक्या सरदाराच्या मुलीला—एखाद्या ठेवलेल्या रांडेप्रमाणें समजलांत. पण जाऊं द्या कीं, त्याचें काय आतां? मला जें वाटत होतें तें मीं तुह्मांला सांगितलें, व त्यांतच मी सगळें भरून पावलें."

" माझ्यावर एवढा गहजब करण्याला काय कारण आहे तें मला कांहीं समजत नाहीं." ग्रीनवूड टोचून बोलतो: " कदाचित् आपल्या उधळेपणाला माझ्याकडून पुरवठा मिळाला नाहीं त्याचा घुस्सा आला असेल."

" खरोखर पुसाल तर तुमचे आलीकडे माझ्यावरचें दुर्लक्ष पाहून मला अतिशय पश्चात्ताप होत आहे."

" आणखी बाईसाहेब, आपल्याकरितां, आपल्या नवऱ्याच्या नीच कृत्यावर पांघरूण घातलें तें कोणीकडेच गेलें वाटतें ! "

" हो—ज्याला तुह्मी आपल्या जाळ्यांत गुंतविलें होतें, त्याच्या बायकोशीं चाललेला तुमचा व्यवहार बाहेर पडूं नये, ह्मणून तुह्मी एक हजार पाऊंडांवर मोठ्या उदारपणानें पाणी सोडलेंत खरें. मी ह्मणजे नवऱ्याचा कैवार घेऊन बोलतें असें समजूं नका. तो निर्दय—दुष्ट—आणि अविचारी आहे हें तर खरंच. पण तुह्मी ह्मणजे त्याच्यापेक्षां कांहीं निराळे आहांत असा मुळींच प्रकार नाहीं. असो. झालें तें झालें. तुह्मी जरी ती हुंडी तशी न देतां तरी हजार पाऊन्ड मी देणारच होतें. ही सर्व भानगड कोणाला कळून—मग ती कशी कळली असेल ती कळो—त्यानें तुमचें कर्ज फेडण्याकरितां काल संध्याकाळीं हें पत्र आणि त्यांत हजार पाऊंडांची एक नोट घालून दिली. ती माझ्याच हातांत आली. स्टुअर्टला याबद्दल कांहीं माहीत नाहीं. मग हें अक्षर कोणाचें असेल तें असो."

ग्रीनवूडनें त्या पत्राकडे पाहिल्याबरोबर सांगितलें:"हें अक्षर माझ्या चांगल्या ओळखीचें आहे. हें औदार्य तुझ्या नवऱ्याची मैत्रीण डायना आर्लिंग्टन इचें आहे."

" ती कांहीं दिवस त्यांच्याजवळ होती असें मीं ऐकलें होतें खरें."

जिला यानेंच प्रथमत: नीतिपथापासून भ्रष्ट केली, तिची अशा तऱ्हेची उदार कृति पाहून ग्रीनवूडला चमत्कार वाटल्यावांचून राहिला नाहीं.

" सर स्टुअर्ट हारवरोच्या पूर्वीच्या रांडेनें अधिक स्तुत्य कृत्य केलें, का त्यांच्या बायकोच्या जारानें अधिक स्तुत्य कृत्य केलें, याचा या वेळेला निर्णय करणें मोठें अवघड आहे." सिसिला मोठ्या तिरस्कारानें ह्मणाली.

ग्रीनवूड कांहींच उत्तर न देतां स्वस्थ बसलों व सिसिला मोठ्या कुऱ्यानें त्याचा निरोप घेऊन निघून गेली. याप्रमाणें या दोघांच्या प्रेमबंधनाचा या ठिकाणीं शेवट झाला. केवळ विषयवासनातृप्तीच्या इच्छेनें जडलेल्या प्रेमांचा शेवट बहुतकरून कलहांतच व्हावयाचा.

वाचकांनीं असें समजूं नये कीं, **सिसिल**बरोबर असलेला संबंध जो **ग्रीनवूड** आलीकडे हळूं हळूं तोडीत चालला होता, तो एकदम तोडतांना **सिसिलें**नें आत्मप्रौढीचे जे विचार मनांत आणले, तेच विचार **डायना**नें कांहीं विशेष कारणाकरितां पाठविलेल्या पैशाचा उपयोग करतांनाही तिनें मनांत आणले असतील. छेः, या संबंधानें हे विचार तिला ठाऊक देखील नव्हते. तिनें, आपल्या नवऱ्याच्या पूर्वीच्या रांडेनें एवढ्या उदारपणानें पाठविलेले एक हजार पाऊंड बेधडक आपल्या खिशांत टाकले. असो.

वर सांगितलेलें **ग्रीनवूड** व **सिसिलें**चें संभाषण, त्याचा **इटली**कडून आलेला चाकर **फिलिपो** यानें सर्व ऐकलें होतें. तें त्यानें जसेंच्या तसें, दुसरे दिवशीं **डायना**ला जाऊन कळविलें; व त्यावरून तिला कळलें कीं, आपण **रूपर्ट हारवरो**करितां पाठविलेल्या पैशाचा योग्य उपयोग न होतां,ते **सिसिलें**नें मध्येंच दाबले.

---

# भाग १७.

## नव्या वर्षाचा आणखी एक दिवस.

हा १८४० च्या ज्यानेवारीचा पहिला दिवस होता.

ज्याप्रमाणें समुद्राचा महापूर आपल्या प्रचंड लाटांनीं, उंचसखल खडकाच्या तीक्ष्ण धारा बोथून टाकतो, त्याप्रमाणें कालाचा ओघ अज्ञानांधकाराची निबिडता हळूं हळूं कमी करीत आपल्या एकाच गतीनें चालत असतो. परंतु जसा जसा काल मागें जातो, तसा तसा त्यावर पांघरूण घालण्याचा मात्र आपण व्यर्थ प्रयत्न करीत असतों.

प्राणीमात्रांनीं गजबजलेलीं पृथ्वीवरील असंख्य नगरें—शत्रूंचें निर्दलन करण्यास समर्थ अशीं अनेक संस्थानिकांचीं बलाढ्य सैन्यें—व समुद्राच्या पृष्ठभागावर पसरलेलीं, शक्तीमान् अशा राष्ट्रांचीं अवाढव्य आरमारें—या सर्वांकडे पाहून **काल** आपल्या मनांत खचीत ह्मणत असेल कीं, हीं सर्व केव्हांना केव्हां तरी माझ्याच भक्ष्यस्थानीं पडणार आहेत. कारण, या जगांत अविनाशी अशी कोणतीच वस्तु नाहीं. पुरातन कालाची साक्ष देणारे, ज्यांना कधींही भंग नाहीं असे **मिसर** देशांतले मनोरे, ते देखील कधींना कधीं तरी डळमळून खालीं पडतील—अतिशय भक्कम आणि मोठमोठाल्या इमारती, त्याही धुळीस मि-

ळतील—आणि बलाढ्य अशा राष्ट्रांच्या शक्तींचेही या काळाच्या सपाट्यांत तुकडे तुकडे होतील, मग इतराची कथा काय? एवढीं ग्रीस व रोमसारखीं पराक्रमी राज्यें स्वप्नवत् झालीं—धर्मयुद्धांत आपले प्राण खर्ची घालणारे योद्धे मातींत मिसळून गेले—स्पेनच्या अजिंक्य आरामाराचा लोप झाला—नेपोलियननें उभारलेलीं राज्यें पादाक्रांत झालीं—व आपल्या क्षणभंगुर कारकीर्दीत ज्या लक्षावधि लोकांना त्यानें विजय संपादूं दिला—त्यांपैकीं किती एक हा मृत्युलोक अक्षय्य सोडून आपआपल्या थडग्यांत विश्रांति घेत स्वस्थ पडले. तेव्हां हें अखिल जगांतका, अनंता काळा! जो तूं ईश्वराच्या अचिंत्य अस्तित्वाचा प्रत्यय दाखविणारा आहेस त्या तुझी बरोबरी करील असें या जगांत काय आहे बरें?

अहाहा! या काळाच्या अंगीं वस्तुस्थितिज्ञान आणि दयाभूतता, हीं असतीं तर आज जवळ जवळ सहा हजार वर्षें चाललेल्या मानवी अस्तित्वाच्या वेदना पाहून त्याला किती बरें दुःख झालें असतें? वर्षांमागून वर्षें चाललीं आहेत; परंतु कावाडकष्ट करणाऱ्या मोलमजुरांच्या स्थितींत कांहीं तरी सुधारणा झाली आहे काय? कारण, थोड्यांच्या सुखाकरितां अनेकांनीं कष्ट करावयाचे, आणि थोड्यांनीं या जगांतील उत्तम उत्तम वस्तूंवर हात मारायचा, हा जो प्राचीनकालापासून चालत आलेला क्रम तो तसाच कायम असून, श्रमांचा मोबदला मिळेनासा झाला आहे, आणि संपत्ति व थोर कुळांत जनन यांना प्राधान्य मिळालें आहे; आणि जेव्हां जेव्हां हे कावाडकष्ट करणारे लोक काळजीनें ग्रस्त होऊन व सतत श्रमानें वेजार होऊन केविलवाणीनें धन्याशीं बोलतात, त्या वेळेस त्यांस उत्तर मिळत असतें: "बाबांनो! कष्ट करा! कष्ट करा!" या लोकांच्या कपाळीं हे शब्द जन्माचेच लागलेले आहेत. इकडे थोड्या श्रीमंतांनीं मात्र जमीन आणि उदक यांच्यापासून उत्पन्न झालेल्या पदार्थांवर चैन करून खुशाल गाड्या घोडे उडवीत असावे! असो.

हा नव्या वर्षाचा प्रथम दिवस होता. हा प्रथम दिवस म्हणजे ज्यांना कधीं दुःखाचें वारें ठाऊक नाहीं अशांच्या चैनीचा; पण दुसरीकडे मात्र ज्यांना ईश्वराचे किंवा मनुष्याचे आभार मानण्याचें मुळींच कारण नाहीं अशांच्या दुःखांनीं व काळजीनें व्यापलेला हा दिवस होता. या दिवशीं थंडी कडाक्याची पडली असून, पावसाची मुसळधार चालली होती. हिवाळ्याच्या थंडगार वाऱ्यानें सर्व रस्ते झाडून जाऊन, घराच्या आश्रयानें राहणाऱ्या निराश्रित

लोकांना नजर करून सोडलें होतें; व थंडीनें पिडिलेल्या याचकांना मजुरखा-न्यांत जाण्याची पाळी आली होती. ही वेळ संध्याकाळची असून मोठमोठ्या रस्त्यांतून फक्त अंधक अंधक दिवे दिसत होते. भिकार वस्तीच्या बोळांतून तर निव्वळ अंधार पसरला होता. प्रत्येक घराच्या खिडक्या लावल्या होत्या. व ज्या खिडक्यांना दारें नव्हतीं तेथें पडदे सोडले होते; व कोठें कोठें चिंध्या कोंबून बाहेरचा थंडगार वारा बंद केला होता.

अशा वेळेला **ग्लोब टाऊन** नांवाच्या एका भागांतल्या एका अरुंद, घाणेरड्या व ओसाड गल्लीच्या टोकावरील एका घरांत एक बाई खुर्चीवर **झोंके** घेत बसली होती. ही बाई वयानें अदमासें पंचवीस वर्षांची होती, परंतु दुराचरणानें व दुर्व्यसनानें ही पसतीस वर्षांची दिसत होती. ही देखणी असून हिच्या देखणेपणाचीं चिन्हें अद्याप कायम होतीं. हिचें खरें नांव **मार्गारेट** असें होतें; परंतु हिला **मेग** असेंही ह्मणत असत. हिच्यासमोर विद्रूप तोंडाचा एक मनुष्य बसला होता. हा दुसरा कोणी नसून वाचकांच्या ओळखीचा **सैतान्याच** होता.

प्रथमतः दारूपाणी झाल्यावर या दोघांचें भाषण सुरू झालें. मोठ्या लाडी गोडीनें ती ह्मणते: "**टानी**, आज बारा महिने आपण एका ठिकाणीं राहिल्यापासून मी अगदीं तुमच्या मर्जीप्रमाणें वागतें कां नाहीं ?"

" तूं तसें वागलेंच पाहिजेस. तूं रस्त्यांत हिंडत होतीस तें तुला घरांत आणून मी मालकीण करून ठेवलें आहे."

" तें खरें; परंतु त्या दिवशीं तुह्मी पळून आलांत तेव्हां मी तुह्मांला भेटलें; व तुह्मी आह्मी एके ठिकाणीं राहूं असें ठरविलें. तेव्हांपासून आपण एके-ठिकाणींच आहोंत. पण मधून मधून मात्र तुह्मी उगीच डोक्यांत राख घालतां."

" मी तरी काय करूं **मेग** ! माझी आई व माझा स्नेही **टाम** हे माझ्या डोळ्यांदेखत, माझ्याच हातानें मेले याची मला आठवण झाली म्हणजे मला कांहीं सुचत नाहीं. परंतु त्याबद्दलही मी आपल्याकडे फारसा दोष लावून घेत नाहीं. त्याला इलाजच नव्हता. नाहीं तर आह्मांला तिघांनाही तुरुंगांत जावें लागलें असतें. मग बाहेरचा वाराही आह्मांला न लागतां, फक्त दोनदां कायतें बाहेर यावें लागलें असतें. एकदां खटल्याच्या चौकशीच्या वेळेस, व दुसऱ्यांदा फाशी जायच्या वेळेस."

"पण तुमच्यावर कांहीं पुरावा शाबीत झाला असता कां?" तिनें विचारलें.

" अग तर. पोलिस लोक आंत शिरले त्या वेळेला पुढच्याचे खोलींत एक उलटा मुडदा टांगलेला होता."

" मग तुम्ही त्या जागेला आग लावून दिलीत हें चांगलें केलेंत."

" चांगलें केलें तर. इतका बेसावध राहणारा मी मनुष्य नाहीं. आमच्या चोरवाड्याच्या पाठीमागच्या खोलींत मी बंदुकीची दारू सांठवून ठेवली होती. व कांहीं दारू मी आपल्या कपाटांत ठेवली होती. त्या कपाटाला भोंक पाडून त्यांत एक नळी घातली होती व ती नळी, घराच्या मागच्या भिंतींत खेळवली होती. त्या नळीवर लांकडाची दुसरी नळी बसविली होती.कारण पहाणाराला ती पाण्याची नळी आहे असें वाटावें ह्मणून. तीही नळी दारूनें गच्च भरली होती. कीं, वेळ पडली तर काडी लावण्याचा अवकाश कीं काम झालेंच. ही व्यवस्था मी किती एक दिवस अगोदरच करून ठेवली होती ह्मणून बरें झालें. ते लोक आंत शिरल्याबरोबर मी मागच्या खोलींत जाऊन तेथून खिडकींतून उडी टाकली, त्या नळीपाशीं गेलों, काडी चेतवली आणि एका क्षणांत धडाका उडवून दिला. पण पुढें मला कळलें कीं, हें सर्व कृत्य त्या मार्सेमचें होतें." असें म्हणून क्रोधाच्या आवेशानें त्याचें तोंड फार भयंकर दिसूं लागलें.

" टार्नी, आतां संताप करून घेऊ नका. तुह्मी संतापूं लागतात ह्मणजे मला फार भय वाटतें."

" मी कांहीं आतां संताप करीत नाहीं म्हणा. पण त्याचा सूड घेतल्याशिवाय मला कधीं सुख व्हायचें नाहीं. त्या नाटकगृहांत ज्या दिवशीं तो कोण आहे हें मी सांगितलें तेंव्हां मला किती आनंद झाला ह्मणून सांगूं. त्याच्यामुळें मला हा तुरुंगवास भोगावा लागत आहे—कारण येथें राहणें तुरुंगापेक्षां कांहीं कमी नाहीं. त्याच्याचमुळें माझा जिवाचा मित्र टाम व माझी आई मला अंतरली. या सर्व गोष्टी मनांत आल्या ह्मणजे मला वेड लागल्यासारखें होतें. व जर त्याचा सूड उगविण्याची मला आशा नसती तर मी कदाचित् वेडाही झालों असतों." असें त्यांचें भाषण चाललें आहे इतक्यांत रस्त्यांतल्या दारावर कोणी ठोठावल्याचा आवाज ऐकूं आला. त्याबरोबर मेगनें जाऊन दार उघडलें, तों बफर व त्याची बायको आंत आलीं.

# भाग १८.

## गुप्त बेत आणि मसलती.

बफर हा मानव जातीला कालिमा आणणारा असा एक भयंकर दुष्ट मनुष्य होता. त्याला ठाऊक नाहीं असें या जगांत एकही अघोर कर्म नव्हतें. सुदैवानें त्याला बायको मिळाली होती तीही त्याच्या योग्य होती. ती-या कथारंगभूमीच्या पूर्व भागांत येऊन गेलेल्या **क्लिकप्लेयरची** बहीण होय.

**बफर** हा शरिरानें ठेंगणा, अंगानें किडकिडीत, जात्या चपळ व शक्तीनें दांडगा असा असे. आणि त्याच्या चेहेऱ्याची ठेवण अशी असे कीं, त्यावरून त्याच्या मनाची परिक्षा होऊं नये.

त्याची बायको वयानें अदमासें पंचवीस वर्षांची असून, केवळ कुरूप अशी नव्हती. परंतु तिची मुद्रा तिच्या नवऱ्याच्या अगदीं उलट—ह्मणजे प्रत्येक दुष्ट विचार व्यक्त करणारी—कीं, ज्याच्या योगानें स्त्री जातीविषयीं तिट्काराच उत्पन्न व्हावा—अशी होती. असो. या दोघांचे कपडे पावसानें चिंब होऊन गेल्या कारणानें ते आल्याबरोबर अगोदर विस्तवाजवळ जाऊन बसले. बसल्यावर खोलीच्या उबाऱ्यानें व दारूचे एक दोन ग्लास ढोंकल्यानें त्यांना तेव्हांच बरें वाटलें. नंतर **सैतान्यानें** कामास सुरुवात केली.

" कायरे बोवा, **मार्खम**कडचें काय वर्तमान आहे?" त्यानें **बफर**ला विचारलें.

" ठरल्याप्रमाणें, उद्यां रात्रीं तो आपल्या भावाला भेटायला येणार आहे." **बफर** म्हणाला.

" उद्यां रात्रीं येणार आहे तर मग ! बरं तर त्याच्याकडे गेल्यापासून काय काय झालें तें मला सांग. ह्मणजे मग तो येईल कां नाहीं हें मी सांगतों."

" तूं सांगितल्याप्रमाणें मी अगदीं स्वच्छ होऊन आज सकाळीं त्याच्या घरीं गेलों. प्रथमतः दारावर थाप मारल्याबरोबर एका लठ्ठ्या मनुष्यानें दार उघडलें. त्यानें काय काम आहे ह्मणून विचारल्यावर मी सांगितलें कीं, मला **मार्खम**शीं एकांतांत कांहीं बोलावयाचें आहे. त्यानें मग मला जेथें **मार्खम** होता तेथें नेलें. तो वाचीत बसला होता व त्याचें तोंड अगदीं सुकलेलें दिसत होतें. जसा कांहीं नुकताच तो दुखण्यांतून उठला आहे."

" हं समजलों, नाटकाच्या दिवशींच्या त्या गोष्टीबद्दल धुमसत असेल." **सैतान्या** म्हणाला.

" कोणत्या गोष्टीबद्दल ? " बफरनें विचारलें.

" कोणत्या नाहीं चालूं दे."

" मार्खमजवळ मी गेल्यावर त्याचा चाकर निघून गेला. मग त्यानें मला काय काम आहे ह्मणून विचारलें. मला तूं सांगितल्याप्रमाणें मी खडानूखडा त्याच्यापाशीं बोललों. तें ऐकून तो नाचायला काय लागला, उडायला काय लागला, हसायला काय लागला तें कांहीं विचारूं नकोस. नंतर त्यानें मला कांहीं पैसे दिले ; व स्वैपाकघरांत जायला सांगितलें. तेथें काय माझी चैन. यथास्थित खायला व दारू प्यायला मिळाली. मार्खमनें आपल्या आचाऱ्याला बोलावून नेलें, मला वाटतें तें आनंदाचें वर्तमान सांगण्याकरितां असेल. कारण तेव्हां तो परत आला तेव्हां तो माझ्याशीं पुष्कळ सलगीनें वागूं लागला, मला परचेवर प्रश्न काय करी. पण मीही त्याला खूप थापा ठोकून दिल्या आणि आलों निघून."

" शाबास, पण त्याला कांहीं देखील संशय आला नाहीं ? "

" मुळीं देखील नाहीं. पण कायरे गड्या, मला एक विचारायचें आहे कीं, तुला काय ठाऊक कीं, ही गोष्ट त्याला सांगितली ह्मणजे त्याला आनंद होईल?" बफरनें विचारलें.

"मी तुला पूर्वींच नाहीं सांगितलें कीं, मार्खम आणि मी चार वर्षांपूर्वीं एका तुरुंगांत होतों. तेथें आर्मस्ट्रांग नांवाचाही एक मनुष्य कैदी होता. त्याची व मार्खमची फारच सलगी असून, त्याच्याजवळ हा आपल्या घरच्या, भावाच्या व दुसऱ्या पुष्कळ गोष्टी बोलत असे. त्या मला नेहेमी ऐकायला सांपडत असत. ह्मणून मला ही सर्व माहिती."

" ठीक आहे तर मग, उद्यां त्या माशाला आपण फासांत धरणार. "

" यांत काय संशय. तो आतां माझ्या हातांत आहे. त्याचा सूड उगवि-ल्याशिवाय मी कधीं सोडायचा नाहीं. "—सैतान्या दांत खाऊन बोलतो—"पुढें माझे बेत काय आहेत ते आतांच सांगेन.पण त्या ह्मातान्याचे कसे काय?"

" तो तर मेला ? " बफरची बायको ह्मणते.

" मेला ! आणि पैशाची काय वाट ? " सैतान्या ह्मणाला.

" छे; पैसे कुठले. तो नुसता तिला भ्रम झाला होता. " बफर ह्मणतो.

" कां बरं ? आणि तुह्मांला नव्हता झाला ? " ती ह्मणते. " तुह्मी

आणि मीच येथें जागा पाहायला गेलों. तो म्हातारा आपल्याच डोक्यावर राहत असे. तो बाहेर कुठें पडत नसे, व उद्योगधंदाही कांहीं करीत नसे. तरी जागेचें भाडें तो वेळेच्या वेळेला चुकवीत असे. कोणाचें त्याला देणें म्हणून नव्हतें. म्हणून मला वाटलें कीं, त्याच्याजवळ पैसा असावा. ''

"पण ती भाकडकथा आतां सांगून काय करायची?'' वफर त्रासून म्हणाला.

" तुमचें नेहमी असेंच. एखादी गोष्ट चुकली म्हणजे ती मग माझ्यावर घालता. तो म्हातारा आजारी पडला तेव्हां तुम्हीच नाहीं मला सांगितलें कीं, त्याला औषधपाणी द्यायला जात जा, म्हणजे तो मेला गेला तर तुला कांहीं देईल किंवा, तो आपले पैसे कोठें ठेवतो हें समजेल व आपल्याला एकदम त्यावर हात मारायला सांपडेल. असें तुम्ही मला सांगितलें म्हणून मी गेलें व—''

" पुरे. आतां भांडून काय उपयोग. तो म्हातारा मेला कसा तें सांग म्हणजे झालें. '' सैतान्या म्हणाला.

" मी तेंच सांगत होतें. त्या म्हाताऱ्याची आज सकाळीं एकाएकीं प्रकृति बिघडली. तेव्हां आमच्या घराची मालकीण म्हणाली कीं, डाक्तराला बोलाऊन आणावा. म्हाताऱ्याच्या मनांतून डाक्तराला आणायचें नव्हतें. परंतु तिचा आग्रह पडून शेवटीं डाक्तर आणला. तो मग आम्हांला त्या म्हाताऱ्याचें नांव गांव विचारूं लागला. परंतु आम्हांला त्याबद्दल कांहींच ठाऊक नव्हतें. कारण त्याच्याकडे कधीं कोणीं येत नव्हतें, व तोही कधीं बाहेर पडत नसे. असो. त्या डाक्तरानें त्याच्या पायाला मोहोऱ्या चोळायला आम्हाला सांगितलें; पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. कारण त्या म्हाताऱ्यानें दोनप्रहरींच राम म्हटला.''

" मग तो मेल्यावर त्याच्या पेटींत तुम्ही हात घातला असेल? '' सैतान्यानें विचारलें.

" आम्हाला जेव्हां कळलें कीं, तो मेला. तेव्हां मग आम्ही त्याची खोली धुंडाळायला लागलों. पहिल्यांदा आम्हांला फक्त त्याचा एक मळकट आंगरखा, दोन पायमोज्याचे जोड आणि एक तपकिरीचें मडकें एवढें सांपडलें. परंतु घराची मालकीण म्हणाली कीं, त्याच्या जवळ पैसा असावा. कारण जेव्हां त्याला कांहीं बाजारचा जिन्नस लागे, तेव्हां अगोदर तिला तो कांहीं निमित्तानें खोलींतून जाण्यास सांगत असे, व फिरून हाक मारून पैसा देत असे. म्हणून त्याच्या जवळ कांहीं तरी असावें अशी आमची खात्री झाली. मग त्याचें आंथरूण आम्ही बाजूला ओढलें—तो भिंतीच्या एका कोपऱ्याला आम्हाला

एक भोंक दिसलें. त्यांत तिनें हात घातल्यावर तिच्या हाताला एक पिशवी लागली. ती पिशवी बाहेर काढून ओतली तो तींत सारे चाळीस पाऊंड होते."

सैतान्याला मरतांना त्याच्याजवळ काय होतें, एवढेंच समजून घ्यायचें होतें. हे चाळीस पाऊंड जरी मोठीशी रक्कम नव्हती, तरी ती देखील घरधनीनीच्या हातांत पडावी हें त्याला प्रशस्त दिसेना. ती आपल्याला कशी मिळेल या बद्दल या चौकडींत मग खल सुरू झाला. बफरच्या विचाराला त्या बाईला एकदम ठार मारावी असें आलें; परंतु सैतान्या हा आपल्या आंगावर शेंकण्यासारखें अविचाराचें कृत्य करणारा मनुष्य नव्हता. त्याच्या डोक्यांतून अशी एखादी युक्ति निघावयाची कीं, ती अमलांत आणली असतां, कांहीं पंचाईत पडूं नये. व त्याच्या या कामांतल्या कसबाविषयीं, लुच्चेगिरी विषयीं, व कापट्याविषयीं, त्याच्या टोळींतल्या मंडळीला मोठें नवल वाटत असे.

असो. ते पैसे कसे प्राप्त करून घ्यावेत या विचारांत सैतान्या निमग्न झाला असतां, त्याच्या मनांत कांहीं गोष्ट येऊन तो एकदम बफरच्या बायकोला ह्मणाला: "त्या ह्मातारीला कधीं पुरायचें या बद्दल ती कोणाजवळ बोलली कीं काय हें तुला ठाऊक आहे? "

"आज हवा बिघडली आहे, उद्यांच त्याला पुरूं असें ती ह्मणाली. "

"ठीक आहे. तर आतां असें कर. ती छत्री घे, आणि मी सांगतों तें काम तावडतोब जाऊन कर." असें ह्मणून त्यानें एक पत्र लिहून तिच्या स्वाधीन केलें; आणि तिला ह्मणाला: "धांवत जाऊन हें ब्यांकच्या स्वाधीन कर. हें बघ त्याच्याच हातांत दे. आणि जर तो घरीं नसला तर येई पर्यंत वाट पहा."

"आतां कोणती युक्ति लढविली आहेस ?" आपली बायको गेल्यावर दार बंद करून बफरनें विचारलें.

"तूं पहासील आतां. पण आतां दारू पिऊन जरा हुशारी आणूंया." असें ह्मटल्याबरोबर मेगनें दारूनें ग्लास भरून ठेवले व या दोघांनीं आपल्या विड्या चेतवल्या.

"आज पावसाची झड लागून राहिली आहे नाहीं !" बफर ह्मणाला.

"वाराही पण वादळासारखा सुटला आहे. आज नव्या वर्षाचा पहिला दिवस. मागच्या वर्षाच्या पहिल्या दिवसापेक्षां आजची हवा किती निराळी आहे."

"मागच्या वर्षाचा पहिला दिवस कसा होता? "

"फार छान! कारण त्या दिवशींच मी आणि टामनीं मिळून त्या हालफर्डच्या राजवाड्याच्या भिंतीवर चढविलें."

"आणि त्या कामांत तुह्मी फसलात नाहीं?"

"त्या गुलामाचा तेथें लाग सापला नसावा किंवा त्यानें आमच्याशीं लबाडी केली असावी. काय असेल तें कांहीं मला समजलें नाहीं. परंतु त्याचे अद्याप मला पैसे द्यायचे आहेत. जेव्हां भेटेल तेव्हां त्याला माझ्याशीं लबाडी केल्याचा काय परिणाम होतो तो दाखवीन."

इतकें बोलणें झाल्यावर, दोघेही न बोलतां, मोठ्या शांतपणानें आपआपल्या विड्याचा धूर काढूं लागले; जणूं कांहीं यांचा एखादा गहन विचार चालला आहे; इकडे मेगनेंही शेगडींत आणखी लांकडें घालून असा विस्तव करून दिला कीं, त्याच्या ज्वाळा आढ्यापर्यंत जाऊन पोंचल्या.

"चल मेग, एखादें गाणें म्हण पाहूं." कांहीं वेळानें बफर म्हणाला.

"मला आज थंडी झाली आहे. मी नाहीं ह्मणत."

"बर तर आज सैतान्याच आम्हाला आपल्या आचाटपणाच्या गोष्टी सांगून माझी बायको येईपर्यंत आपल्याला करमणूक करील."

"मला बोवा, त्याच त्या गोष्टी पुन्हां पुन्हां सांगण्याचा कंटाळा आला आहे. आह्मी तुझी हकीकत कांहीं ऐकली नाहीं. तीच तूं सांग ह्मणजे झालें."

"माझ्या हकीकतींत सांगण्यासारखें कांहीं नाहीं पण आतां तूं ह्मणतोच आहेस तर सांगतों." असें ह्मणून त्यानें आपली हकीकत सांगण्यास आरंभ केला.

---

# भाग १९.

## बफरची हकीकत.

बफर हा कोळसेविक्याचा मुलगा होता. याला याच्या बापानें लिहिणें वाचणें कांहीं न शिकवितां, त्याच्या बाराव्या वर्षी याला आपल्या धंद्याच्या कामीं लावलें. गिन्हाइकांच्या घरीं कोळसे नेऊन पोंचविण्याचें काम याच्याकडे सोंपविलें होतें. परंतु याला वाटेंत गोट्या खेळण्याचा नाद लागल्यामुळें, गिन्हाइकांकडून आलेले पैसे तो खेळण्यांत उडवून टाकी; व बापाला कांहीं तरी सबब सांगे. परंतु शेवटीं बापाच्या लक्षांत ही लबाडी येऊन, त्यानें त्याला कांहीं एक न

बोलतां, एका साखरविक्याच्या दुकानीं अडकवून दिलें. तेथें सरासरी तो सहा वर्षें होता. इतक्यांत त्याचा बाप वारल्यामुळें, त्याला घरीं परत येऊन आपला पहिला धंदा पतकरावा लागला. परंतु पुढें त्याला जुगारीचा नाद लागून त्याचा सर्वस्वीं नाश झाला, त्याची आई मरून गेली व त्याला पोटाची पंचाईत पडली. शेवटीं त्याला एका लिलांववाल्याच्या येथें नोकरी लागली. याच्याकडे तेथें काम एवढेंच होतें कीं, लिलाव चालला असतांना, एकादा जिन्नस कमी किंमतीला जाऊं लागला ह्मणजे त्यानें त्या जिनसेची किंमत चढवावी. परंतु या कामावर असतांना हा एकाची चोरी करून पळाला. पुढें याची व छीक आणि बिल—जे दोन राक्षस या गोष्टीच्या पूर्वभागांत येऊन गेले आहेत—यांची ओळख झाली. यांच्या मदतीनें, त्यानें एका सोनाराच्या घरावर धाड घातली. परंतु या कामांत यांच्याच जिवावर येऊन बेतली होती. पुढें या दोघांनीं, छीकच्या बहीणीला—जी पुढें याची बायको झाली—नादीं लावणाऱ्या एका मनुष्याचा खून केला. नंतर कांहीं दिवसांनीं ज्या सोनाराच्या येथें यांनीं दरवडा घालण्याचा प्रयत्न केला होता त्याची व याची गांठ पडून त्यानें याला पकडलें. व याच्यावर खटला करून याला दोन वर्षांची शिक्षा दिली. मुदत संपल्यावर तुरुंगांतून हा बाहेर पडला. जवळ तर एक पैसा नाहीं. व थोड्या वेळानें क्षुधेची तर पीडा होऊं लागणार, तेव्हां काय करावें, अशा दीन स्थितींत तो एका कंदीलाच्या खांबाशीं विचार करीत उभा राहिला. व आतां जर चांगल्या रीतीनें पोटाला मिळालें नाहीं तर, पहिल्याप्रमाणेंच चोऱ्या माऱ्या कराव्या लागणार हें पाहून त्याला अतिशय वाईट वाटलें; परंतु त्याला इतक्यांत मजुरखान्याची* आठवण झाली, व त्यांत जाण्याचें त्यानें ठरविलें. सरासरी दोनच महिने या मजुरखान्यांत तो राहिला असेल. तेथील कामाची दगदग आणि उपासमार हीं त्याच्यानें सहन करवेनात, ह्मणून लागलीच त्यानें आपली सुटका करून

---

* गरीब दुबळ्या, व अनाथ लोकांकरितां, तिकडे " work-house " नांवाची संस्था असे—ती आतां आहे कीं नाहीं हें माहीत नाहीं—परंतु तिचा उपयोग करून घेण्याला, अन्नपाण्यावांचून मरणारे लोक देखील कबूल नव्हते असें रेनाल्डच्या पुस्तकांतील वर्णनावरून दिसतें. work-house म्हणजे यातनागृह अशी लोकांची समजूत झाली होती. या गृहांत जिवाविशेष कामें करून एक वेळचें पोट भरण्यापुरतें देखील अन्न मिळत नाहीं, अशा समजुतीनें, या ठिकाणीं जाण्याचा प्रसंग आलाच तर लोक आत्मघात करून घेत. भाग १८ पहा.

घेतली. त्याच दिवशीं डीकची व त्याची गांठ पडून त्या रात्रीं त्यांनीं एकाद्या घरावर दरवडा घालून कांहीं लाग साधला. यानें आपलें बिऱ्हाड मग डीकच्याच येथें ठेवलें, व पुढें कांहीं दिवसांनीं डीकच्या बहिणीशीं त्यानें लग्नही लावलें; ही गोष्ट घडल्यानंतर सुमारें आठ नऊ महिन्यांनींच डीकचा खून झाला.

# भाग १००.

## तळमजल्यावरील खोलींतील चमत्कार.

याप्रमाणें **बफर** आपली हकीकत सांगत आहे तों त्याची बायको पावसानें थबथबलेली आंत आली; आणि लागलीच विस्तवाजवळ जाऊन शेकत बसली. नंतर थोडीशी दारू पिऊन आंगांत गरमपणा आल्यावर तिनें बजावलेल्या कामगिरीची हकीकत सांगण्यास आरंभ केला. त्या हकीकतीचा मतलब इतकाच होता कीं, **सैतान्यानें** सांगितल्याप्रमाणें तिनें तें पत्र **ब्यांक**च्या स्वाधीन करून ती परत येत असतां जो शस्त्रवैद्य, ह्मातान्याच्या मरणाच्या वेळेस नेला होता, तो तिला वाटेंत भेटला व ह्मातान्याच्या मरणाचें कारण मला समजून घ्यायचें आहे, एवढ्याकरितां तुझ्या नवऱ्याला माझ्याकडे पाठवून दे, असें त्यानें तिच्याजवळ सांगितलें. हा शस्त्रवैद्य **सैतान्या**च्याही ओळखीचा होताच. तेव्हां, **बफरनें** त्याला जाऊन भेटण्यापेक्षां मीच त्याची गांठ घेऊन काय करायचें तें ठरवितों. तूं उद्यां रात्रीं मात्र आपल्या त्या कामाकरितां तयार ऐस, असें **सैतान्यानें** त्याला सांगितलें, व इतका प्रकार झाल्यावर **बफर** आपल्या बायकोसहवर्तमान आपल्या बिऱ्हाडीं निघून गेला.

नंतर **सैतान्या** आपल्या पात्रास ह्मणतो: "हं आतां बारा वाजले. तूं निजायला जा. मी थोडासा बाहेर जाऊन येतो."

"दानीं, तुह्मी रोज रात्रीं कोठें बाहेर जातां?"

"मी तुला शंभरदां सांगितलें ना माझ्या पंचाईती करूं नकोस ह्मणून? आपलें काम कर आणि मी सांगेन तेवढें ऐकत जा. नाहीं तर बघ मग." **सैतान्या** रागानें ह्मणाला.

"बर चुकलें. आतां नाहीं विचारायची. ह्मटलें, पाऊस असो, पाणी असो, तुह्मी रात्रीं बाहेर पडतां, याचा मला चमत्कार वाटला म्हणून विचारलें."

" याचा तुला चमत्कार वाटला तर आणखी वाटूं दे मला नको सांगूं. " सैतान्या तिच्या अंगावर खसकावून बोलला.

इतकें भाषण झाल्यावर **मार्गारेट** दिवा घेऊन आपल्या खोलींत निजायला गेली. इकडे सैतान्यानें ग्लासभर दारू घशाखालीं रिचवल्यावर डोक्यावर टोपी ठेवून आपली खोली सोडली.

ज्या घरांत हे दोघे रहात असत तें घर एका घाणेरड्या, अरुंद व ओसाड गल्लीच्या टोकाला होतें हें आमच्या वाचकांना ठाऊक आहेच. हें घर दुमजला असून याची रचना कांहीं चमत्कारिक होती. प्रथमतः दारांत पाऊल ठेवल्याबरोबरच दुसऱ्या मजल्यावर जाण्याकरितां शिडीसारखा जिना चढून गेलें कीं, एक दालन होतें. या दालनांत दोन खोल्या असून, एका खोलींतून दुसऱ्या खोलींत जाण्याकरितां मध्यभागीं दार होतें, परंतु तळमजल्यावर जाण्याकरितां एकादा जिना किंवा दुसरें कांहीं साधन येथें मुळींच नव्हतें. खालच्या भागांत जाण्याचा रस्ता, फक्त, घराच्या बाजूच्या गल्लींतील एका दारानें ठेवलेला होता यामुळें, खालच्या भागाशीं वरच्या भागाचा मुळींच संबंध नसे म्हटलें तरी चालेल. असो.

**सैतान्या** जिना उतरून खालीं आल्यावर, पुढलें दार नुसतें ओढून घेऊन, लागलीच बाजूच्या अंधाऱ्या गल्लींत शिरला; परंतु या वेळेला, याचा पाठलाग करीत याची रांड **मार्गारेट**, ही येत होती.

तो कोठें जातो हें समजून घेण्याची तिला इतकी कांहीं जिज्ञासा झाली होती कीं, तो घरांतून बाहेर पडला नाहीं तोंच, ही जिना उतरून खालीं आली; व त्याला बाजूच्या गल्लींत वळतांना पाहून आपल्या मनाशीं बोलूं लागली; " मला तळमजल्यावर कां येऊं देत नाहीं याचें कारण आतां कदाचित् समजेल. "

गल्लीच्या अर्ध्या रस्त्यावर गेल्यावर **सैतान्यानें** खिशांतून किल्ली काढली, व ती या चमत्कारिक तऱ्हेनें बांधलेल्या घराच्या तळमजल्याच्या दाराला लाऊन, तो आंत शिरला. तों लागलीच **मेगही** त्या दाराजवळ जाऊन उभी राहिली. तिनें प्रथमतः दाराच्या फटीला कान देऊन ऐकलें, तों त्याच्या पावलांचा नाद तिच्यावर कानावर आला. नंतर तिनें फटींतून पाहिलें तेव्हां तिला आंत दिवा लागलेला दृष्टीस पडला. पुढें तो काय करतो तें पाहण्याची अनिवार उत्कंठा झाल्याकारणानें तिनें हलकेंच दाराचा आंकडा बाजूला केला व थोडेंसें दार उघडून आंत डोकें घालून पाहूं लागली.

या जागेंत एक लहानसा बोळ असून त्याच्या दोन्ही बाजूला दोन खोल्या

होत्या. पैकीं एकीचें दार उघडें होतें. याच खोलींत सैतान्या शिरला. व दिव्याकडे तोंड आणि दाराकडे पाठ करून उभा राहिला, त्यामुळें तिला याच्या चाललेल्या सर्व क्रिया दृष्टी पडण्याला सुलभ पडलें !

प्रथमतः त्यानें आंगाभोंवतीं एक मोठें काळें भोंत गुरफटून घेऊन तोंडांवर काळ्या कापडाचा मुखवटा घातला. नंतर कपाटाकडे जाऊन त्यांतून कांहीं पदार्थ घेऊन ते जवळ पडलेल्या एका टोपलींत घातले. हें काम झाल्यावर तो एकदम खोली सोडण्याकरितां वळला, त्या बरोबर मेजच्या हातपायाचा थरकांप होऊन, माझें तोंड यानें पाहिलें कीं काय असें तिला वाटावयास लागलें. ह्मणून तिनें मागें होऊन दार आपल्या बाजूला ओढून घेतलें. त्या वेळेस आपण आलों तसें परत जावें असें तिच्या मनांतही आलें, परंतु फिरून तो काय करतो तें पाहण्याची तिला अनिवार इच्छा झाली.

पुन्हां तिनें तें दार थोडें उघडून आंत पाहिलें, तों तेथें दिवा नसून सर्व खोलींत गडद अंधार दिसत होता. तरी तेथें सर्व सामसूम नव्हतें. दगडाच्या जिन्यांवरून कोणी तरी खालीं उतरतांना पावलांचे आवाज तिच्या कानीं पडूं लागले. पुढें हळूं हळूं ते आवाजही ऐकूं येण्याचें बंद पडून, त्या भागांत नुसता घुंद असा शब्द मात्र घुमूं लागला.

हा सर्व प्रकार पाहून ती अगदीं गर्भगळित होऊन गेली, व त्याच्या क्रूरपणाच्या हजारो गोष्टी एकामागून एक तिच्या मनांत उभ्या राहिल्या. इतक्यांत, जमिनीच्या पोटांतून आल्यासारखी, एक आरोळी तिच्या कानीं पडली. ती आरोळी, अशी कांहीं वेदना जाणविणारी होती कीं, ती ऐकून इचें काळीज इतकें कठीण बनलेलें, पण तेंसुद्धां चर्रर झालें. ती आरोळी फिरून जरी ऐकूं आली नाहीं, तरी तिचा ध्वनी त्या सर्व भागांत दुमदुमून इच्या कानांत अद्याप घोळत होता.

कांहीं वेळानें, घोगऱ्या आवाजाचे अव्यक्त शब्द तिला ऐकूं येऊं लागले, परंतु जसे जसे ते मोठ्यानें येऊं लागले तसे ते सैतान्याचेच भय घालणारे शब्द आहेत असें तिनें ओळखलें.

ज्या इच्छेनें ती आपल्या याराच्या पाठीमागें लागून आली होती, तिच्या जागीं आतां अनिवार भीति उत्पन्न झाली—तें काळें भोंत—तो काळा मुखवटा—ती टोपली—ते त्याचे भय घालणारे शब्द—आणि ती काळीज भेदणारी आरोळी, या सर्व गोष्टी तिच्या मनांत येऊन तिची अगदीं गाळण झाली

लागलीच तिनें तें दार बंद करून तेथून अगोदर पळ काढला. व गेल्या वाटेनें परत येऊन आंगावरील वस्त्रें काढल्यावर बिछान्यावर जाऊन पडली. तों थोड्या वेळानें, मागून सैतान्याही आला.

याच्या लक्ष्यांत कनी जास्ती प्रकार येऊं नये ह्मणून तिनें प्रथमतः झोपेचें सोंग घेतलें होतें. परंतु खरोखरीच जेव्हां तिला झोंप लागली, तेव्हां तिच्या स्वमांत, भोंत पांघरलेली, तोंडाला काळें कापड लावलेली वगैरे प्रकारची आकृति दिसत होती.

## भाग १०१.

### घरधनीन.

**ज्यानेवारी** महिन्याचा हिंवाळा, प्रातःकाळचा समय, त्यांत बर्फाचा पाऊस, आणि काळ्या कुळकुळीत ढगांनीं सर्व आकाश भरून गेलेलें अशा स्थितींत जणूं काय, पृथ्वीची आणि सूर्याची अक्षयीची फारकत झाली आहे असें दिसत होतें.

खरोखरच **लंदन** शहराच्या पूर्वेकडच्या भागाची स्थिति फारच दुर्दर्शनीय यांत कांहीं संशय नाहीं. दिवस उगवला कीं, बायकांनीं आपल्या फाटक्या वस्त्रांनिशीं पावसांत भिजत बाजारांत जावें, व दोन प्रहरच्या वेळेकरितां घांसभर अन्न घेऊन यावें. किंवा जवळ पैसे नसल्यास एखादा भिकार जिन्नस गहाण ठेवून काम करून घ्यावें. ह्याप्रमाणेंच, ज्यांना पोटभर अन्न ह्मणून कधींच ठाऊक नाहीं, ज्यांना कष्ट मात्र जनावराप्रमाणें करावे लागतात, अशा अर्ध पोटी दुर्दैवी लोकांनीं निरुपायानें दारूच्या गुत्यांत जावें, व तेथें आपल्या दुर्व्यसनाबद्दल लोकांकडून भडिमार करून घ्यावा. ज्यांना इष्ट मित्र नाहीं अशा बहिष्कृत लोकांची तर स्थिति विचारूंच नका. त्यांना कांहीं व्याधि झाली ह्मणजे इस्पितळांत जाण्याशिवाय मार्ग नाहीं, व खायाला नसलें ह्मणजे मजूरखान्याशिवाय आश्रय नाहीं. बिचारे हतभागी, कोणीकडून आह्मला प्रीतीचा प्रभाव समजला, व ही संसाराची बिडी अडकवून घेण्याची इच्छा झाली, म्हणून रात्रंदिवस तळतळत असतात. कारण त्यांपासून त्यांना संतति होऊन, त्यांच्या डोळ्या देखत अन्नावाचून ती मरत असे. व असे लोक, आपला निर्वाह—कोठें लोखंडी रस्त्यावर—कोठें कालव्यावर—व कोठें—गोदींत खपून चालवीत असत.

सकाळच्या आठ वाजण्याचा सुमार होता. अशा वेळेला मळकट पोषाख केलेला एक गृहस्थ स्मार्ट गल्लींतून सावकाश चालला होता. याचें वय वास्तवीक साठ वर्षांचें होतें, परंतु हा आपल्या केसांना रंग देऊन तें सरासरी पन्नासांचें भासवीत असे. याची रीतभात पोक्तपणाची असे. व या वेळेला पावसाची जरी अगदीं मुसळधार चालली होती, तरी या खप्पीनें ह्मणून, आपली एकेक पाऊल शोकांत टाकण्याची ढब सोडली नव्हती. आपल्या जुन्या टोपीला पाऊस लागूं नये म्हणून त्यानें डोक्यावर एक जुनीच छत्री धरली होती, परंतु तिचा कांहीं उपयोग न होतां, तिच्यांतून पावसाचें पाणी येई तें टोपीवर पडून, याचे दोन प्रवाह याच्या अर्धवट हंसऱ्या, व पूर्ण बकध्यानी मुद्रेवरून खालीं येत होते. सरासरीं अर्ध्या वाटेंत आल्यावर थांबून हा घराचे नंबर पाहूं लागला. शेवटीं जें घर पाहिजे होतें तें सांपडल्यावर त्यानें त्याचें दार ठोठावलें; व त्या बरोबर एक बाई बाहेर आली

" स्मिथबाई येथेंच राहतात काय ? " या मनुष्यानें विचारलें ?

" मीच ती बाई. "

"असं काय? माझें थोडेंसें तुमच्याशीं काम आहे, पण जर तुम्हाला रिकामपण असेल तर. " त्या बाईनें लागलीच त्याला घरांत नेऊन काय काम आहे म्हणून विचारलें.

" तुमच्या घरांत कोणी मनुष्य मेलें आहे नाहीं? "

" हो. माझ्या घरांत एक बिऱ्हाडकरू राहत असे, तो मेला आहे. " त्या बाईला हा कोणी तरी त्या मनुष्याचा नातेवाईक आहे असें वाटून ती ह्मणाली.

" अरेरे ! बाई या जगांत रावापासून रंकापर्यंत मरण हें आहेच. पण हें एक प्रकारानें सूखच समजलें पाहिजे कीं, मनुष्य एकवार हा मृत्युलोक सोडून गेला ह्मणजे तो या संसाराच्या यातायातीपासून तरी सुटतो. या मृत्युलोकची वस्ती किती क्षणभंगूर आहे ही एक गोष्ट नेहेमी लक्ष्यांत ठेवीत जावी. व सर्व काल आपण ईश्वरचरणाकडे लावावा. असो. त्या प्राण्याच्या आत्म्याची नीट व्यवस्था लावणें, व त्याला उत्तम गति देणें हें आपलें आतां काम आहे. व हें काम त्याला योग्य रीतीनें मूठमाती दिली ह्मणजेच होणार आहे. "

इतका वेळ पर्यंत इला जें, हा कोणी तरी त्याचा नातेवाईक असावा असें वाटत होतें, तें आतां याचें हें पारलौकिक भाषण ऐकून हा पाद्री वर्गांतील असावा असें तिला वाटूं लागलें. ती ह्मणाली: " आपण ह्मणतां तें खरें

आहे. व आपण तेवढ्याकरितांच आला आहांत हे मज गरिबावर उपकार आहेत. नाहीं तर हें काम माझ्या हातून कशाचें होतें?"

"तें काम मी करीन. परंतु प्रथमतः त्याचें प्रेत कोठें आहे तें दाखवा बरें."

असें करण्याचा याला कांहीं तरी अधिकार असावा असें तिला वाटून तिनें ज्या खोलींत तें प्रेत होतें तेथें त्याला नेलें. तेथें गेल्यावर त्यानें त्याच्या अंगावरचें वस्त्र बाजूला केलें व खिशांतून एक पट्टी काढून तें प्रेत तो मोजूं लागला.

हा चमत्कारिक प्रकार पाहून तिला कांहींसें आश्चर्य वाटून तिनें विचारलें: "महाराज आपण कोण आहांत?"

"बाई, मी प्रेतवाहक * आहे."

"प्रेतवाहक! मी समजलें होतें कीं, आपण कोणी तरी उपदेशक आहांत." ती खिन्न होऊन म्हणाली.

"माझें नांव एडवर्ड ठ्यांक. तुमच्या नवऱ्याचा व माझा फारच स्नेह होता. आम्ही पुष्कळ वेळ एके ठिकाणीं हंसलो बसलों आहोंत."

परंतु सगळ्या जन्मांत तिच्या नवऱ्यानें याचें नांव इच्याजवळ काढलें नव्हतें. आणि हा तर त्यांचा माझा स्नेह होता असें म्हणतो, या गोष्टीचें तिला आश्चर्य वाटलें. व त्याप्रमाणें तिनें बोलूनही दाखविलें. परंतु त्यानें कांहीं तरी सांगून वेळ मारून नेली. शेवटीं, या प्रेताला मूठमाती देण्यासंबंधानें पैशाचा ठराव त्याच्याशीं करून तिनें त्याला जाण्यास निरोप दिला. जातांना, "मला एका धर्मोपदेशकाची जरूर आहे. तेवढा माझ्याकडे पाठवून द्या." असें तिनें सांगितलें व हा "एक उत्तम धर्मोपदेशक पाठवून देतों." म्हणून सांगून निघून गेला.

ठ्यांक तेथून निघाला तो सैतान्याकडे आला व तेथें त्यानें वर घडलेली सर्व हकीकत त्याला सांगितली. हा नुकताच, जो शस्त्रवैद्य ह्यात त्याच्या मरणाच्या वेळेस हजर होता त्याच्याकडून आला होता—तेथें जाऊन त्यानें काय काम केलें तें पुढें सांगण्यांत येईल

---

* याला "Under taker" म्हणतात. प्रेताचा पुरण्याची वगैरे व्यवस्था लावण्याचें याचें काम असतें. प्रेताच्या लांबीची पटी, व तितक्याच लांबीचें थडगें बांधावें लागतें म्हणून तें प्रेत पूर्वी मोजून घेतात. हा तिकडे एक स्वतंत्र धंदा आहे.

# भाग १०२.

## धर्मोपदेशक.

**ब्यांक** निघून गेल्यावर ही बाई आपल्या मनाशीं विचार करीत पडली. इतक्यांत त्यानें पाठवून दिलेला धर्मोपदेशक तिच्या पुढें येऊन उभा राहिला. तिचें याच्याशीं काम हें होतें कीं, त्या ह्यातार्‍याच्या मरणानंतर शिल्लक राहिलेल्या तीस पौंडांची तिच्या मनांतून चांगल्या तर्‍हेनें व्यवस्था लावायची होती. ती स्वभावतः पापभीरु असल्या कारणानें त्याच्या पैशाचा उपभोग स्वतःकडे करण्याचें तिच्या मनांत देखील आलें नाहीं. तर एखाद्या धर्मोपदेशकाच्या सल्ल्यानें त्याची व्यवस्था लावावी असा विचार तिनें मनांत आणला. व एवढ्याचकरितां त्याला तिनें **ब्यांक**कडून बोलावून आणलें. तो आल्यावर तिनें त्याला त्या पैशाचा विनियोग कसा करावा ह्मणून विचारलें. त्यावर त्यानेंही दोन मार्ग सांगितले. एक, ते पैसे सरकारांत गुदरावेत किंवा त्या प्रेताबरोबर पेटींत घालावेत. परंतु त्या बाईच्या दृष्टीनें हा दुसराच मार्ग तिला योग्य दिसला. व त्याप्रमाणें तिनें आपली इच्छा दर्शविली. त्याबरोबर त्यानेंही बरें आहे ह्मणून ह्मटलें. परंतु ही गोष्ट **ब्यांक**शिवाय दुसर्‍या कोणालाही कळवूं नका, एवढें मात्र त्यांत जास्ती सांगितलें.

धर्मोपदेशकाच्या या सूचनेनें त्या बाईची मोठी काळजी दूर झाली. व तिनें त्याच्या सांगण्याप्रमाणें वागण्याचा निश्चय केला. असो.

इकडे, **मार्गारेट** आपल्या जाराबरोबर ज्या घरांत राहत असे, तेथें या वेळेला एकटीच होती. **ब्यांक** येऊन गेल्यावर थोड्या वेळानें, **सैतान्यानें** आपला नेहमींचा पोषाख बदलून काळा पोषाख केला. परंतु हा पोषाख जरा घाईनें केल्यामुळें पूर्वीच्या आंगरख्याच्या खिशांतील जिनसा जातांना बरोबर घ्यावयाच्या त्या विसरून गेला. शेवटीं तो बाहेर गेल्याबरोबर, तिनें त्याचा खिसा चांचपण्यास सुरुवात केली.

त्यांत कांहीं कागदाचीं चिठोरीं तिच्या हाताला लागलीं; परंतु त्यांची तिनें चौकशी केली नाहीं व त्यांत कांहीं पैसे होते, तेही तिनें पाहिले नाहींत. तिला जें काय पाहिजे होतें, तो फक्त किल्ल्याचा जुडगा पाहिजे होता. तो सांपडल्याबरोबर, लागलींच ती जिना उतरून खालीं आली, व घराबाहेरच्या गल्लींत येऊन तिनें त्या घराच्या दाराला त्या किल्ल्यांपैकीं एक किल्ली लावली.

ती आंत शिरली तशी तिचें अंतःकरण आनंदानें फुरफुरूं लागलें. आंतून दार व्यवस्थेनें लावून घेतल्यावर प्रथमतः ती पहिल्या खोलींत गेली. तेथें फक्त, खोरीं, कुदळी, वगैरे प्रेतें उकरण्याचीं हत्यारें, भोंकाच्या उजेडानें तिला दिसलीं. नंतर ती दुसऱ्या खोलींत गेली. ती खोली लहान असून अगदीं कोंदट होती. ठिकठिकाणीं भिंतीचा गिलावा पडला होता; व तिच्या एकंदर चिन्हांवरून आज कित्येक वर्षांत तेथें वस्ती नाहीं असें दिसत होतें.

एक मेज, एक खुर्ची, व एक कपाट हें काय तें सामान तेथें होतें. कपाट बंद होतें, तें तिनें किल्ल्या चालवून उघडलें, परंतु त्यांत कांहीं नव्हतें. ती मग त्या खोलीच्या भुयाराला एखादें चोरदार असेल या समजुतीनें, ती खोली शोधायला लागली. कारण, तिनें पूर्व रात्रींच सैतान्याच्या पावलांचा जो शब्द ऐकला होता त्यावरून, व त्याच वेळेला तिनें जी एक आरोळी ऐकली होती तिच्यावरून तिची अशी खात्री झाली होती कीं, ती आरोळी या खोलीपासून दूर अंतरावरून किंवा तिच्या तळघरांतून आली असावी. परंतु याबद्दल खात्री करून घेण्याचे तिचे श्रम व्यर्थ गेले. कारण, इकडे सैतान्या येऊन आपल्याला पाहील कीं काय, ही भीति तिला वाटूं लागली. तेव्हां घाईनें ती त्या ठिकाणाहून निघून, व दाराला पहिल्याप्रमाणें कुलूप लावून माडीवर आली; आणि किल्ल्या जेथल्या तेथें ठेवते आहे तोंच सैतान्याला जिना चढतांना तिनें ऐकलें.

तो खोलींत येऊन पाहतो, तों ती आपल्या कामांत गुंतलेली त्याला आढळली, व तो आल्याबरोबर नेहमींप्रमाणेंच तिनें याची विचारपूस केल्यामुळें, आपल्या पाठीमागें तिनें काय केलें याविषयीं त्याच्या मनांत बिलकूल शंका आली नाहीं.

आपला पहिला पोषाख केल्यावर तो तिला ह्मणतो: " आज मी कांहीं कामाकरितां धर्मोपदेशक बनलों होतों; आणि त्या ह्मातारच्या बाईनें त्या प्रेताबरोबर ते पैसे पुरण्याचें कबूल केलेंही. आतां मी हें पत्र चीस्टर नांवाच्या एका मनुष्याला लिहितों. तें तूं स्वतः टपालांत नेऊन टाक. हें काम झाल्यावर रात्रीपर्यंत मला कांहीं काम नाहीं. मग—दांत ओंठ खाऊन, " मग त्या रिचर्ड मार्लव्ह्याचा समाचार घ्यायचा! "

# भाग १०३.

## आशा आणि भय.

आपण आतां थोडेसे मागें वळूं. बफरनें मार्खमकडे जाऊन त्याला एक वर्तमान सांगितलें. व मार्खमनें त्याला स्वयपाकघरांत धाडलें येथपर्यंतचें वर्तमान वाचकांना ठाऊक आहेच; पुढें काय झालें तें आपण पाहूं.

तो स्वयपाकघरांत गेल्यावर मार्खम लागलींच जेथें एलन आणि मनरो बसले होते तेथें आला. या वेळेला, आजपर्यंत जीं जीं त्यानें दुःखें भोगलीं होतीं, तीं तो सर्व विसरला होता, नाटकगृहामध्यें नुकताच जो प्रकार घडून आला होता—कीं, ज्या योगानें त्याच्या स्वपराक्रमानें मिळविलेल्या कीर्तीवर पाणी पडलें, व ज्या योगानें एलनलाही ज्यांत नांव मिळालें तो धंदा सोडावा लागला—तोही तो विसरला होता, गालावर नुकतीच टवटवी आली होती, व आनंदानें नेत्र खुललेले दिसत होते. असा तो मार्खम या दोघांकडे आल्यावर त्यांना ह्मणालाः— " आपला दादा शेवटीं परत आला. "

" कोण तुमचा भाऊ ! " हे शब्द ऐकून एलनच्या तोंडावर एकदम प्रेतकळा पसरली.

" काय ? युजेन परत आला ? " मनरोनें उत्साहपूर्वक विचारलें.

" होय. तो लंडनमध्यें आला आहे. हें आनंदाचें वर्तमान सांगायला आताच एक गृहस्थ आला होता. आणि उद्यां रात्रीं त्याची माझी गांठ पडायची आहे."

" उद्यां रात्रीं ? कां बरं. या घटकेलाच का नाहीं ? " मनरोनें विचारलें.

" तो कांहीं संकटांत आहे, ह्मणून त्याच्यानें एकदम या घरांत येववत नाहीं. तें काय संकट आहे हें मला कळलें नाहीं, पण त्याला माझी मदत पाहिजे एवढी गोष्ट खरी. "

" आणि त्याला तूं कोठें भेटणार ? " मनरोला या गोष्टीचा कांहींसा चमत्कार वाटून त्यानें विचारलें.

" या शहरच्या पूर्वेस जो कालवा वाहतो त्याच्या कांठावर. "

" बरं, किती वाजतां ? " मनरोनें विचारलें.

" उद्या रात्रीं दहा वाजतां. "

" ज्यानें तुह्माला हें वर्तमान सांगितलें तो तुमच्या ओळखीचा आहे का ? कां तुह्मांला एखादें पत्र आलें ? " एलननें विचारलें.

" मी त्या मनुष्याला पूर्वी कधीं पाहिलें नाहीं, व मला एखादें पत्रही आलें नाहीं. मला कोणीं फसवायचा विचार मांडला आहे असें तुला वाटतें कीं काय?"

" हो, मला तर असेंच वाटतें." **एलन** खात्रीपूर्वक ह्मणाली.

" छे, छे, असें कधीं व्हायचें नाहीं." जी आशा त्याला एका क्षणापूर्वीच सुखाची वाटत होती, ती संशयरूपी धुक्यांत नाहींशी करण्याचें त्याला बरें वाटेना. इतक्यांत कांहीं मनांत येऊन त्यानें जोरानें घंटा वाजविली. तों **विदिंगहम** लागलींच पुढें येऊन उभा राहिला.

" जो मनुष्य मी आतां स्वयपाकघरांत पाठविला आहे, तो सांगतो कीं, माझा भाऊ येथें आहे." **रिचर्ड** ह्मणाला.

" ओहो! **युजेन**राज प्रसवले! **युजेन**राज प्रसवले!" असें ह्मणून तो टिऱ्या बडवून नाचूं लागला.

" आणि उद्यां मला लांब एक्या ठिकाणीं तो भेटणार आहे. पण याबद्दल **एलन**ला फार संशय येत आहे."

" मला नुसता संशयच ये नाहीं, तर माझी खात्री आहे." **एलन** पूर्वीप्रमाणेंच खात्रीपूर्वक बोलली.

" **विदिंगहम**, स्वयपाकघरांत जाऊन त्याच्याशीं कांहीं बोलत बैस. मग काय तें येऊन मला सांग." **रिचर्ड**नें असें सांगितल्याबरोबर तो हुकमाप्रमाणें काम करण्यास गेला.

" माझ्यावर एखादें अरिष्ट आणणारा कोणी असेल असें मला वाटत नाहीं. त्याला असें करून मिळणार काय? शिवाय, त्या मनुष्यानें, आमची भेट होण्याचा जो दिवस ठरला आहे त्याचीही ओळख दिली. यावरून तो **युजेन**कडून आला आहे हें उघड होतें."

" ही गोष्ट पुष्कळांना ठाऊक आहे. तुम्हा दोघांची भेट १८४३ च्या जुलई महिन्याच्या १० व्या तारखेस व्हायची हें आसपासच्या प्रत्येक मनुष्याला ठाऊक आहे. माझी अगदीं पक्की खात्री आहे कीं, जर त्याला एका ओसाड जागेंत, भलत्याच वेळेला, तुम्हाला भेटायला यायचें म्हणून या मनुष्याच्या हातीं निरोप पाठवायचा असता, तर त्याच्याबरोबर तुह्माला चांगली खूण पटेल असें कांहीं तरी त्यानें दिलें असतें." **एलन** ह्मणाली.

" **एलन**, तुझें ह्मणणें सयुक्तिक आहे; तरी माझ्या मनांत जी आशा उत्पन्न झाली आहे, ती कांहीं केल्यानें जात नाहीं."

" जर तुमचा भाऊ खराच आला असता तर तो तुह्माला पत्र पाठविल्याशिवाय कधीं न राहता, असें मला वाटतें."

" मनरो, तुमचें ह्मणणें कसें काय ?" रिचर्डनें विचारलें ?

" माझें मन या वेळेला द्विधा झालें आहे. एकवार तुझ्याप्रमाणें वाटतें, पुन्हां एलनचेंही ह्मणणें सयुक्तिक दिसतें."

असें यांचें संभाषण चाललें आहे तोंच विटिंगहम आला. " धनीसाहेब, ते आलेले मानव गहन झाले, व त्यांनीं जें काय विदिष्ट केलें त्यावरून माझी विस्तीर्ण विचक्षणा आहे कीं, त्यांचा कथाभाग उचिष्ट आहे." तो ह्मणाला.

" तूं त्याला खोदून खोदून विचारलेंस का ?"

" मी त्याला एक दोन वेळां परिछिन्न केलें. त्यावरून ते मला प्रामाणिष्ट सुष्ठ अंतर्ज्ञानाचे आणि विज्ञान असे वाटतात." विटिंगहम ह्मणाला.

" झालें तर मग. उद्यां त्याला भेटायचें हें ठरलें. त्याच्यावर कोणतें संकट आलें असेल याचा काय नियम ? अशा सावधगिरीनें तो मला भेटणार याला कांहीं तरी कारण असेल. आपल्या बंधुधर्मांत संशय घेणें वाईट आहे. या वेळेला त्याच्यावर एखादा प्रसंग आला, आणि त्याला कोणी उपयोगी पडलें नाहीं, याचें पुढें वाईट वाटायला नको. मी अशी वेळ कधीं येऊं देणार नाहीं. उद्यां ठरलेल्या वेळेला मी जाणारच."

रिचर्ड, तुह्माला हात जोडून सांगतें कीं, तुह्मीं आपला जीव धोक्यांत घालण्यापूर्वी विचार करा. भलत्याच वेळेला, भलत्याच जागेंत तुम्ही जात आहां, तुमच्या वाइटावर पुष्कळ लोक आहेत, व एकवार तर तुह्मी त्या मांगाच्या हातून मृत्यूच्या दाढेंत जात होतां, याचें स्मरण करा. या सर्व गोष्टी तुम्हीचना पुष्कळदां सांगितल्या आहेत ?"

" तूं काय ह्मणतेस तें मी समजलों. पण यांत सैतान्याचा कांहीं संबंध नाहीं. हा सरळ मार्ग आहे—माझी अगदीं खात्री आहे."

मार्खमच्या या शब्दानें पुढें बोलायला जागा राहिली नाहीं असें पाहून ती खुर्चीवर पडून विचार करूं लागली. शेवटीं ती तेथून उठली, व आपल्या खोलींत येऊन मनाशीं बोलूं लागली: " मार्खमची खात्री करायला आतां काय बरं इलाज करावा ? खरोखर कोणी तरी दुष्टानें त्याचा घात करायचा विचार मांडला आहे. पण त्यांना आतां कसें सांगावें कीं, तुह्मीं फसतां आहां. त्याला

एकच उपाय आहे–" परंतु लागलींच, जो विचार तिच्या मनांत आला होता तो उपयोगी नाहीं असें तिला वाटलें.

"छे, तसें नाहीं व्हायचें." ती फिरून बोलूं लागली. "तो मेला सैतान्याच या कयांत असेल. आणि तो जर असेल तर त्याच्या जिवाची आम्हास नको. अगबाई! ज्यानें आह्माला आश्रय दिला त्या माझ्या अन्नदात्याच्या कां जिवावर वेतायची ! छेः, असें मी कधीं होऊं देणार नाहीं. जरी मला सर्व याच्या जवळ सांगतां येत नाहीं, तरी याचा जीव वाचवायला मी कांहीं तरी करीन."

असें ह्मणून लागलीच तिनें एक पत्र लिहिलें, व तें बंद केल्यावर घंटा वाजवून मेरियनला हाक मारली. "मेरियन, हें पत्र घेऊन ग्रीनवूडच्या घरीं जा, व त्याचा फिलीपो ह्मणून एक चाकर आहे त्याला दे. तुझ्या तो ओळखीचा नाहीं, तरी तो उंच आहे यावरून तूं त्याला ओळखशील. जर ग्रीनवूड अकस्मात भेटलाच, तर ह्मणावं एलनच्या मुलाची प्रकृति बरी आहे हें तुह्माला सांगायला आलें आहे."

"मुली, आजकाल तूं आपल्या मुलाला भेटायला गेली होतीस का ?"

"मी कालच गेलें होतें. त्या वेळेला त्याची आई त्याला दूध पाजीत होती. मी त्याला आपल्या जवळ घेतलें, कुरवाळलें, पण तो रडायलाच लागला. त्याची माझी काय ओळख ? तो दुसरीलाच आपली आई ह्मणून समजेल ! मेरियन, याचें मला फारच दुःख होतें !"

"मुली, असा धीर सोडूं नकोस. तुला चांगले दिवस कधीं तरी येतील."

"परंतु, त्याची मी आई आहें असें उघड सांगण्याचा दिवस कधीं देखील हो यायच्या नाहीं !"

---

# भाग १०४.

## सींचें धारिष्ट.

सरासरीं संध्याकाळचे सात वाजले होते, अशा वेळेला एलन, आपल्याला बुरख्याखालीं झांकून घेऊन घराबाहेर पडली. ज्या रस्त्यानें ती चालली होती, तो रस्ता, तयार केलेले कपडे विकणाऱ्या दुकानांनीं भरला होता.

अशा रस्त्यानें ती पहात पहात चालली असतां, शेवटीं तिनें, एक बाई आपल्या दुकानाच्या उंबरठ्यावर उभी असतांना पाहिली.

ती लागलीच दुकानांत शिरून तिला ह्मणाली: "माझ्या करितां एक पुरुषाचा पोषाख पाहिजे आहे. तो लौकर द्या, आणि आपली काय वाटेल ती किंमत बोला."

हे शब्द ऐकल्यावरोबर तिनें गडबड करून, एलनच्या पुढें इतक्या प्रकारचे पोषाख पसरले कीं, ते पाहून ती गोंधळून गेली. शेवटीं तिनें त्या बाईच्याच पसंतीनें तिला होईल असा एक पोषाख घेऊन तेथच्या तेथेंच अंगाला घातला, व मागण्याप्रमाणें पैसे देऊन तिनें तें दुकान सोडलें.

आमच्या वाचकांना माहीत आहेच कीं, एलनवर निरनिराळे प्रसंग येत गेल्या कारणानें ती बरीच धीट झाली होती; व त्यामुळें, जरी ती आतां पुरुषवेषानें चालली होती, तरी तिच्या हातून तिचा स्वाभाविक भित्रेपणा उघड होणारा नव्हता. तिचें चालणें इतकें निर्धास्त होतें कीं, तिच्याविषयीं कोणालाही संशय उत्पन्न झाला नाहीं.

चालतां चालतां ठरलेल्या ठिकाणीं आल्यावर तेथें उभी राहून ती चोहोंकडे पाहूं लागली. तों कांहीं वेळानें एक उंच मनुष्य—तोही आपणाला झांकून घेतलेला—तिच्यापुढें येऊन उभा राहिला.

"कोण ? फिलिपो आलांत कां ?" तिनें विचारलें.

"होय, एलन, तुझ्या सांगण्याप्रमाणें मी आलों. मी कालच तुझ्या मनुष्याच्या हातीं निरोप पाठविला कीं, आज रात्रीं मी साडे आठ वाजतां येथें येईन. त्याप्रमाणें आलों."

"तुमचे माझ्यावर फार उपकार आहेत, ते माझ्या हातून कधीं फिटायचे नाहींत. पूर्वींचें तुमचें माझ्याविषयीं मोठें मन पाहून या वेळेला फिरून तुमचें साह्य मागण्याचा मला धीर आला आहे. मी तुम्हाला पत्रांत सांगितलेंच होतें कीं, अशा प्रकारचा वेष मला घ्यावा लागेल. तसेंच तुम्हाला दोन पिस्तुल घेऊन यायलाही सांगितलें होतें, ते तुम्ही आणलेच असतील. आज एका मनुष्यावर मोठा प्रसंग गुदरणार आहे. मग त्यांत त्याच्या जिवालाही अपाय घडणार आहे, कीं काय हें समजत नाहीं. पण तो मात्र न जाणून या जाळ्यांत सांपडणार आहे. आतां दहा वाजतां तो ग्लोब टौनच्या शेवटीं कालव्याच्या कांठावर येणार आहे. तेथें आपल्याला गेलें पाहिजे; व दूर राहून काय होतें तें पाहिलें पाहिजे. प्रसंग पडलाच तर मध्यें पडून त्याला सोडवूं."

" यापेक्षां साधा उपाय हा आहे कीं, त्याला या प्रसंगाविषयीं सावध करावें."

" मी तें केलें. परंतु त्याच्याशीं कोणी विश्वासघात करील असें त्याला वाटत नाहीं."

" मग दुसरा एक मार्ग आहे कीं, पोलीसला जाऊन वर्दी द्यावी."

" असें जर आपण करायला गेलों, तर ज्या गोष्टी बाहेर पडायला नको आहेत त्या आणाव्या लागतील."

" यावरून **एलन**, जें काम करण्याचें तूं मनांत आणलें आहेस तें इतकें तोहमतीचें आहे कीं, त्यांत आपण पडावें कां नाहीं असें मला वाटूं लागलें आहे."

" छे छे; असें करूं नका. मी तुमच्या पायां पडतें. जर तुमचा आग्रहच असेल तर मी सर्व सांगतें.कारण आतां तुह्मी जाऊं लागलांत तर लागलींच मला दुसरी मदत कोठून मिळणार? मग तुह्मांला काय वाटेल तें करा. मी ह्मणून येथून परतायची नाहीं. पण मेहेरबानी करून तेवढें पिस्तूल तरी माझ्याजवळ द्या.

" **एलन**, तूं ह्मणतेस तें खरें आहे; तुझे हेतूही चांगले आहेत. पण तूं कोणाचा या कामांत विचार घेतलास का ?"

" ऐका मी सर्व सांगतें. आज ज्याला आपण सोडवायला जाणार आहोंत. तो **रिचर्ड मार्खम** आज धोक्यांत पडणार आहे."

" यांचें नांव **ग्रीनवूड**च्या तोंडून पुष्कळ वेळां मीं ऐकलें आहे खरें." तो ह्मणाला.

" त्याला कोणीं एकानें काल येऊन सांगितलें कीं, तुमचा भाऊ—जो आज पुष्कळ दिवस नाहींसा झाला आहे—तो तुह्माला भेटायला येणार आहे. परंतु कांहीं कारणावरून माझी पक्की खात्री आहे कीं, त्याच्या शत्रूंपैकीं कोणीं तरी त्याच्या विरुद्ध हा बिभु रचला आहे. आणि हीं 'कांहीं कारणें' अतिशय गुप्त असल्यामुळें पोलिसाची मदत आपल्याला मागतां येत नाहीं. पुढेंही तुह्माला सांगून ठेवतें कीं, **मार्खम**ची व तुमची कदाचित् आतां गांठ पडलीच तर—तुह्मी कोण आहांत—माझ्याबरोबर कसे आलांत—विशेषतः **ग्रीनवूड**चे तुह्मी चाकर या गोष्टी अगदीं गुप्त असूं द्या. सांगण्याचाच प्रसंग आला तर मी सांगेन, समजलांत ? आतां काय तुमचें ह्मणणें आहे?'

" आतां माझें ह्मणणें कांहीं नाहीं. मी तुह्मांबरोबर येण्याला तयार आहें."

" तर मग तेवढा पिस्तूल करा इकडे."

" पण एलन—"

" तुह्मी भिऊं नका. मी नाटकांत असतांना पिस्तूल उडवायला शिकलें आहे." असें ह्मणून तिनें त्याच्यापासून भरलेला पिस्तूल घेतला; व ते बलदीनें ग्लोब टाऊनकडे चालूं लागले.

---

# भाग १०५.

## द्वंद्व.

एलननें आणि मनरोनें जरी त्या भेटीच्या खरेपणाविषयीं पुष्कळ संशय घेतले होते. तरी मार्लेननें जाण्याचाच शेवटीं निश्चय केला व त्याप्रमाणें तो निघाला असतां त्याचे याप्रमाणें विचार चालले होते:—

" जर माझ्या भावाला कांहीं पैशाची अडचण पडली असेल तर माझें सर्वस्व मी त्याला अर्पण करीन. त्याचा माझा वियोग झाल्याला आज साडे आठ वर्षें झालीं. तो गर्विष्ट, हट्टी व स्वच्छ मनुष्य आहे—तो जर चांगल्या स्थितींत असतां तर नेमलेल्या दिवसापूर्वीं—ह्मणजे ता० १० जुलई १८४२ रोजीं—तो मला कधींही भेटायला न येता. यावरून खचीत त्याच्यावर कांहीं तरी प्रसंग आहे. देव करो, आणि तो कसाही असला तरी मला भेटो! पण याही वेळेचा माझें दुर्दैव माझ्या पाठीस लागून मला निराश न करो ह्मणजे झालें! परंतु असें होणार नाहीं. मला असा कोण शत्रु आहे कीं, तो माझ्या जिवावर उठून माझें द्रव्य हरण करील. छे, ही कल्पना क्षुद्र आहे! माझा भाऊ युजेन मला भेटेल यांत शंका नाहीं." असें मनाशीं बोलत तो नेमलेल्या ठिकाणीं आला, परंतु ठरलेल्या वेळेपूर्वीं तो बराच अगोदर आला.

त्या ठिकाणची निर्जन आणि एकांत स्थिति पाहून तो चपापून गेला. नुकत्याच पडलेल्या पावसानें सर्व जमीन चिखलाळ होऊन गेली होती. कालव्याला पूर येऊन त्याचें गढूळ पाणी दोन्ही कांठांमधून जोरानें वाहत होतें, चंद्रप्रकाश मंद असून उदकांत त्याचें प्रतिबिंब पडण्याला कठीण जात होतें, व ठिकठिकाणीं पुष्कळ खाचखळगे दिसत होते. त्यामुळें रिचर्डला तेथें फिरणें असमाधानकारक वाटेल इतकेंच नव्हे, तर भयंकरही वाटलें.

तथापि तो त्या ठिकाणीं इकडे तिकडे फिरत राहिला. सरासरी अर्धा तास गेल्यावर, पावलांची चाहूल त्यानें ऐकली. व कांहीं वेळानें ती चाहूल जवळ येत येत वटीं काळोखांत एक मनुष्य त्याच्या समोर येऊन उभा राहिला.

" तुह्मी वेळेला आलांत खरें, " ज्या ठिकाणीं **रिचर्ड** उभा होता, त्या ठिकाणीं आल्यावर तो मनुष्य ह्मणाला. हा दुसरा कोणी नसून **बफर** होता.

" पण माझा भाऊ कोठें आहे तो दिसत नाहीं ? " **रिचर्डनें** विचारलें.

" तो आतां इतक्यांत येईल. "

" मग त्यानें तुह्मालाच कां पुढें पाठविलें ? त्याचा भाऊ त्याला फसवील असें त्याला वाटलें काय ? "

" छे, असें कांहीं नाहीं. पण—हा पहा तो येत आहे. "

फिरून आणखी कोणी येत आहे असें त्यानें ऐकलें. तों त्या काळोखांत दुसरी एक मनुष्याची आकृति दिसूं लागली व त्याबरोबर **मार्खमचें** काळीज धडधड उडूं लागलें.

" हा पहा तुमचा भाऊ ! " **बफर** ह्मणाला.

" युजेन–युजेन ! " असें ह्मणून त्यास मिठी मारण्याकरितां **रिचर्ड** पुढें धांवत गेला. तों—

" तुला भाऊ पाहिजे काय ? " असा भयंकर शब्द **सैतान्याच्या** तोंडून निघाला ; व त्याबरोबर **बफरनें** पाठीमागच्या बाजूनें मोठ्या शिताफीनें **मार्खमच्या** मुसक्या बांधून व त्याच्या मानेभोंवतीं चऱ्हाट टाकून त्याचे दोन्ही हात एके ठिकाणीं जखडून टाकले.

**रिचर्डनें** सुटण्याविषयीं होता तितका प्रयत्न केला, पण व्यर्थ—कारण **सैतान्यानें** त्याला जोरानें तेथल्या तेथेंच त्या गवताळ जमिनीवर आपटलें. व " आतां आपल्या जिवाची आशा सोड. आतांच्या आतांच तुला या कालव्याच्या तळाशीं नेऊन पोंचवितों. आणि मग—" पुढें तो बोलणार, इतक्यांत दुसऱ्या एका मनुष्यानें तेथें येऊन आपल्या पिस्तुलाच्या दस्त्यानें त्याला खालीं पाडलें. परंतु तो जमिनीला लागतो आहे नाहीं तोंच त्यानें त्या अकस्मात् आलेल्या मनुष्यालाही इतक्या जोरानें हासडलें कीं, **फिलिपोही**—अवचित आलेला मनुष्य हा होता—त्याबरोबर जमिनीवर पडला.

त्यानंतरशीं **सैतान्या** उडी मारून त्याच्या छातीवर जाऊन बसला; व त्याचा गळा इतक्या जोरानें त्यानें दाबला कीं, तो गुदमरून जाऊन त्याचे पंचप्राण क्या-

कूळ झाले ; परंतु इतक्यांत अवचित एक ं ुलाची गोळी येऊन, ती **सैतान्या**च्या कानाशीं लागून गेली, त्यामुळें हें सर्वच पारडें फिरलें. **सैतान्या** मग आपल्या हातची शिकार सोडून एकदम अंगांत विजेचा संचार झाल्याप्रमाणें तेथून उठला.

इकडे, **फिलिपो**चा अवचित हल्ला पाहून **वफर**नें घाबरून, आपल्या हातांतला **रिचर्ड**ला बांधलेला दोर सोडून दिला. ही मदत मिळाली तसें, **मार्खम**लाही अवसान येऊन तो एकदम **वफर**च्या अंगावर धांवून गेला ; व त्याला उताणा पाडून त्याच्या छातीवर गुडघा देऊन बसला.

**सैतान्या**नें ही वेळ विचार करण्याची नव्हे असें मनांत आणून, **एलन**ला बाजूला ढकलून दिलें, व **फिलिपो**ला पुन्हां एकवार जोरानें जमिनीवर आदळून, आपण **मार्खम**वर धांवत गेला.

इतका प्रकार होत आहे तों लागलींच पाण्याचें हिसळणें ऐकूं आलें. त्याबरोबर **एलन**नें किंकाळी फोडली; व त्या सरशीं **सैतान्या** ' पळ ! पळ ! ' असें ह्मणत नाहींसा झाला; परंतु या वेळेला **एलन**नें किंवा **फिलिपो**नेंही त्यांना पळतांना आडविलें नाहीं.

" या मांगांनीं त्याला बुडविलें वाटतें. " असें ह्मणतां ह्मणतांच **फिलिपो**नें पाण्यांत उडी घातली.

इतक्यांत **एलन**नें तेथें पडलेल्या दोरखंडाचें एक टोंक आपल्या हातांत धरून दुसरें **फिलिपो**कडे पाण्यांत टाकलें. व आपणही आंत उडी घालण्यास तयार झाली; तों दुरून, ' बुडतों! बुडतों! ' असे शब्द तिच्या कानीं पडल्याबरोबर ती तशीच ज्या दिशेनें हा शब्द आला होता त्या दिशेकडे कालव्याच्या काठांवरून चालली. कांहीं वेळानें कोणीसें पाण्यावर तरंगतांना तिला दिसलें, परंतु हें ती पाहत आहे तोंच तें नाहींसेंही झालें.

इकडे **फिलिपो**, अगोदरच पोहत पोहत या ठिकाणीं आला होता. तो जरी या वेळेला अगदीं दमला होता, तरी त्यानें निर्भयपणानें पाण्यांत पोहून **रिचर्ड**ला शोधून काढलें; व ' ते सुरक्षित आहेत !' असें ह्मणून त्यानें त्याला पाण्यावर धरलें. मग **एलन**नें त्याच्याकडे दोर टाकल्याबरोबर त्याला धरून तो कांठाला लागला.

**मार्खम** अगदीं बेसावध झाला होता. परंतु **एलन**नें व **फिलिपो**नें त्याचें कपाळ व हात वगैरे चोळून त्यांना ऊब आणली; त्याबरोबर **रिचर्ड** सावध

होत चालल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. मग मात्र या दोघांनीं आपलें लक्ष्य याच्याकडे विशेष लावलें. फिलिपोच्या मनांतून त्याला आसपासच्या घरांत न्यावयाचें होतें, इतक्यांत रिचर्डनें सावध होऊन हलकेंच विचारलें. " मी कोठें आहे? "

त्याबरोबर एलनला आनंद होऊन तिनें सांगितलें: " तुह्मी आपल्या मित्रांजवळ आहांत. "

" कोण एलन, तूंच ती आहेस ? कां मी स्वप्नांत आहें? "

" नाहीं नाहीं रिचर्ड, मीच तीच मी, या शूर मनुष्याच्या मदतीनें आज तुमचा जीव वांचवायला कारण झालें. "

" आणखी हे कोण ? त्यांचें नांव सांग. "

" रिचर्ड तुह्मी आतां जास्ती बोलून श्रम करूं नका. या ठिकाणीं तुमचें येणें सुरक्षित नाहीं, असें माझें मन मला सांगूं लागलें. तेव्हां मी असा वेष घेऊन तुमच्या पाठीमागें आलें. इतक्यांत या गृहस्थाची माझी अवचित गांठ पडून यांनीं मला मदत करण्याचें कबूल केलें. "

" एलन, तुझे व ह्याचे माझ्यावर फार उपकार झाले आहेत ते कधीं फिटणार नाहींत. "

नंतर त्या दोघांनीं त्याला उठविलें, व त्याचे हात धरून हळू हळू त्याला गाडीच्या टप्प्यापर्यंत आणलें. येथें आल्यावर फिलिपो त्यांचा निरोप घेऊन निघून गेला, व हे दोघे गाडींत बसून घराकडे वळले.

---

## भाग १०६.

### प्रेतउकऱ्या.

मागील भागांतला प्रकार झाल्यानंतर तिसऱ्या दिवशीं सकाळींच, एक मजूर खांद्यावर खोरें, कुदळ घेऊन ग्लोब गल्ली जवळच्या एका आवारांत शिरला.

या आवाराच्या एका बाजूलाच थोडींशीं घरें असून बाकीच्या बाजूंनीं लहान भिंती होत्या. आवारांतील जमीन ओलसर असून तिचा रोगट वास सर्वत्र मिसळला होता कितीही दिवस जरी ऊन पडलें असलें तरी ती दुर्गंधि इतकी त्रासदायक असे कीं, आसपासच्या घरांच्या खिडक्या कधींही उघड्या

मिळायच्या नाहींत. ती आसपासच्या घरादारांत, कोनाकोपऱ्यांत, गरिब-गुरिबांच्या अन्नवस्त्रांत खेळलेली असे—ती असेच.

या आवारांत प्रेतांची तर अतिशयच गर्दी झालेली असे. थोड्या जागेंत पुष्कळ प्रेतांची गर्दी करावयाची, एवढें या जागेच्या मालकाला ठाऊक असे. त्याचा परिणाम असा झाला होता कीं, जमिनींत प्रेतें जास्ती झालीं आहेत, कां अद्याप प्रेतांचा समावेश होण्याला जमीन शिल्लक आहे, हें सांगण्याला कठीण पडे. तरी नवीं प्रेतें देण्याकरितां आवाराचें सदोदित द्वार मोकळें ठेवलें होतें. एखादें नवें प्रेत आलें कीं, नुकतेंच पुरलेलें प्रेत असेल तें खुशाल उकरावें व त्याच्या जागीं नवें पुरावें.

याच आवारांत एक विटांची खोली केली होती. तिचें नांव 'हाडाची खोपटी.' इच्यांत एक विस्तव पेटविण्याची जागा असे. या खोलींतून धूर निघाल्याशिवाय एकही दिवस जात नसे ह्मटलें तरी चालेल.

आवाराजवळच्या भागांतील कांहीं लोकांनीं या उपसर्गाबद्दल देवळाकडील अधिकाऱ्याकडे एक दोन वेळ वर्दी पोंचविली होती, परंतु त्यांस एकच उत्तर मिळे. "तुह्माला पसंत नसेल तर **पार्लमेंटा**कडे दाद घ्या."

कसें तरी काही करून पोट भरणारे, त्यांनीं ह्मणें **पार्लमेंट**कडे दाद घ्यायची! दाद नेणें—हक्क शाबीत करणें—न्यायमार्गानें—जुलूम बंद करणें—या ज्या गोष्टी आहेत त्या फक्त श्रीमंताकरितां आहेत. गरीब ते गरीबच! त्यांच्याकरितां कायदा करण्याचें कोणी कधीं मनांत आणलें आहे? उलट त्यांच्याविरुद्ध पाहिजे तितके कायदे होतील. कायद्यावर कायदे करा—कलमा पाठीमागून कलमें सुचवा—सूचनेवर प्रतिसूचना काढा—साध्या शब्दांनीं जेथें काम व्हावयाचें असेल त्या ठिकाणीं अतिशय दुर्गम परिभाषा घाला—अर्थाचें रूप फिरवून, तें अगदीं दुर्बोध होईपर्यंत निरर्थक शब्दांचा त्यांत समावेश करा—सारांश, कायद्याचें खरें स्वरूप बदलून त्याचें—ज्या योगानें गरीब लोकांना, त्यांत पाय गुंतल्याशिवाय एक पाऊलही टाकतां येऊं नये असें—कावेबाजपणाचें त्यांना माहीत नाहीं असें व त्यांना समजणार नाहीं असें जाळें पसरा—या गोष्टी तुह्मी केल्यात कीं, तुमच्यासारखा मुत्सद्दी—तुमच्यासारखा राजकारणी पुरुष मिळणार नाहीं. यालाच गरीब लोकांच्या विरुद्ध कायदे करणें असें ह्मणतात; व ह्मणूनच आह्मी पुन्हां विचारतों कीं, गरीब लोकांकरितां कायदे करण्याचें कधीं तरी मनांत आणलें आहे काय? असो. आपण आपल्या गोष्टीकडे वळूं.

तो प्रेतउकऱ्या आवारांत शिरल्याबरोबर, आतां कोणतें थडगें फोडावें हें समजण्याकरितां त्यानें एकवार आपल्या संभोवतीं दृष्टि फेकली. शेवटीं एका थडग्याजवळ जाऊन, तेथें त्यानें आपली कुदळ हाणली व ' हं, हें बरें आहे ' असें ह्मणून तो तेथून निघून हाडाच्या खोपटींत गेला. तेथून एक लांब लोखंडाची सळई आणून त्यानें त्या थडग्याजवळच्या जमिनींत जोरानें खुपसली. सरासरी पुरुष दीड पुरुष ती सळई जमिनींत शिरल्यावर ती जमीन भुसभुशीत आहे अशी त्याची खात्री झाली. नंतर तो पुन्हां या खोपटीकडे आला; व लांकडांचा ढीग एके ठिकाणीं करून त्याला त्यानें जाळ लाऊन दिला.

यानंतर त्यानें जो क्रम आरंभला तो असाः—एक प्रेत उकरावें, तें नेऊन त्या लांकडाच्या चितेवर ठेवावें, फिरून दुसरें प्रेत उकरावें, व त्याचीहीं तशीच व्यवस्था करावी. याप्रमाणें तो प्रेतउकऱ्या नव्या प्रेतांना जागा पाहिजे ह्मणून जुन्याची व्यवस्था लावीत असे.

अरेरे ! मेलेल्या मनुष्याचे आप्तसंबंधी व इष्टमित्र त्याच्या या विश्रांतिस्थळाबद्दल किती पूज्यभाव दाखवीत असतात, किती भक्तीनें बोलत असतात, किती सद्दीत अंतःकरणानें त्याचें गीत गात असतात; पण त्या विचाऱ्यांना काय ठाऊक कीं, ज्या थडग्याला आपण विश्रांतिस्थल, असें ह्मणतों त्यावर खोरेंकुदळीचे घाव बसून, त्यांतील प्रेतें शेवटीं अग्निमुखांत पडतात. असो.

याप्रमाणें त्यानें दोन तास काम केल्यावर त्याला क्षुधा लागली. ह्मणून त्यानें आपल्या बरोबर आणलेल्या पदार्थांचा उपाहार केला.

इतक्यांत ब्यांक येऊन, त्यानें "दोन वाजतां एक प्रेत यायचें आहे त्याच्याकरितां एक खड्डा तयार कर." असें त्यास सांगितलें. त्याबरोबर प्रेतउकऱ्या पुन्हां कामाला लागला, व ब्यांक निघून गेला.

---

# भाग १०७.

## थांग.

दोन वाजण्याचा सुमार होता अशा वेळेला एक प्रेत आवारांत आलें. हें प्रेत दिसण्यांत भयंकर अशा चार मनुष्यांनीं उचललें होतें. या चौघांपैकीं फक्त ब्यांकनेंच कायतें दुःख झाल्याचें थोडेंसें आपल्या तोंडावरून दाखविलें होतें. याच्याजवळ अशा प्रसंगाच्या दुःखप्रदर्शनाच्या निरनिराळ्या प्रति

असत. जो जास्ती पैसे देईल, त्याच्या प्रेताकरितां जास्ती दुःख दाखवावयाचें असा याचा क्रम असे.

असो. हा प्रेत संस्कार **सैतान्यानेंच** पार पाडला. नंतर या चौघांपैकीं, शस्त्रवैद्यानें निरोप घेतल्याबरोबर, **सैतान्या, बफर** व **ब्यांक** हे तिघे **सैतान्या**-च्या घरीं आले, व तेथें आल्यावर दारूपाणी होऊन यांच्या भाषणास सुरुवात झाली.

"कसं काय,एक पुरण्याचें जें कठीण काम तें तर झालें." **ब्यांक** ह्मणाला.

"पण फिरून उकरून काढण्याचें राहिलें आहे. तुला कसें वाटतें, त्या बाईनें ते पैसे त्या पेटींत घातले ?" **सैतान्यानें** विचारलें.

" त्याबद्दल शंका नकोच. तिनें ते पैसे फडक्यांत गुंडाळून त्याच्या उ-शाशीं ठेवले आहेत. ह्मणजे, त्याच्या डोक्याकडे उकरलें कीं, हात घातल्या-बरोबर पैसे हाताला लागावेत. " **ब्यांक** ह्मणाला.

" हें एक बरें झालें. नाहीं तर आपल्याला सगळें धडगें उकरावें लागतें. ह्मणजे विनाकारण काम वाढणार. "

" बरं, तो शस्त्रवैद्य आवारांत केव्हां येणार आहे ? "

" तो मुळींच येत नाहीं. आह्मीच त्याच्या घरीं रात्रीं दोन वाजतां जायचें कबूल केलें आहे. " **सैतान्या** म्हणाला.

" इतक्या लौकर ? बारा वाजायच्या पूर्वी तर आपल्याला कामाला सुरुवात करतां येणार नाहीं. कारण तोंपर्यंत कांहीं सामसूम होत नाहीं. " **बफर** ह्मणाला.

" एका तासांत आपण तें काम करून टाकूं. आतां मी एक पत्र लि-हितों, तें **मेग,** तूं टपालांत नेऊन टाक. " असें ह्मणून त्यानें एक **आ-र्थर चीस्टर**ला पत्र लिहिलें, व तें **मार्गारेट**करून टपालांत नेऊन टाकविलें.

नंतर रात्रींच्या साडे अकरा वाजेपर्यंत त्यांनीं दारू पीत व गप्पाष्टकें झों-कीत वेळ काढला. शेवटीं त्यांची वेळ झाली तसा **सैतान्या** ह्मणाला: "**ब्यांक,** तूं आतां घरीं जा आणि बरोबर एक वाजतां गाडी घेऊन आवारांत ये. **बफर** व मी पुढें जातों. "

असें ह्मणून ते तिघेही उठले. **ब्यांक** आपल्या घरीं गेला, व **सैतान्या** आणि **बफर** घराबाहेर पडून बाजूच्या गल्लीनें या घराच्या तळमजल्यांत आले. तेथें त्यांनीं दिवा लावून प्रेतें उकरण्याचीं हत्यारें बरोबर घेतलीं, व ते बाहेर

पडणार, इतक्यांत दफरनें कोणीं कन्हल्यासारखें ऐकून तो भेदरून गेला. परंतु सैतान्यानें त्याला धीर देऊन बाहेर काढलें, व ते दोघे त्या मध्यरात्रीं आपला धंदा करण्याकरितां निघाले.

कांहीं वेळ आपण यांना सोडून मार्गारेटकडे वळूं.

ते घरांतून बाहेर पडल्यावर सरासरी दहा मिनिटें जाऊं देऊन ती हातांत एक चोरकंदील व नुकताच आणलेला एक किल्ल्यांचा जुडगा घेऊन बाहेर पडली.

दाराजवळ येऊन किल्ली लावल्यावर दार उघडून ती आंत गेली; व आंतून दार बंदोबस्तानें लावून घेऊन मागच्या खोलींत शिरली. या खोलींत कांहीं फेरफार झाला नव्हता. तें भोंत, व तोंडाचा मुखवटा तेथेंच पडला होता. परंतु कपाट पूर्वीप्रमाणें रिकामें नसून त्यांत खाण्याचे पदार्थ ठेवले होते. ते पाहून ती ह्मणाली. " येथें कोणी तरी मनुष्य असावें. ह्मणूनच हे खाण्याचे पदार्थ तेथें ठेवले आहेत. "

तिनें येथें कोणी मनुष्य आहे कीं काय ह्मणून कानोसा घेऊं लागली. परंतु तिच्या कानावर कांहींच शब्द पडले नाहींत. मग ती, एखादें चोरदार सांपडेल या हेतूनें ती खोली बारीक दृष्टीनें पाहूं लागली. घराच्या रचनेवरून, तळमजल्यावर आणखी एखादी खोली नाहीं हें तिला ठाऊक होतें. तेव्हां, जर येथें एखादी गुप्त जागा असेल तर ती जमिनीखालींच असली पाहिजे अशी तिची खात्री झाली.

ह्मणून ती जमीन फारच बारकाईनें ती पाहूं लागली. परंतु भुयारांत जाणारें चोरदार असल्याचें तिला कोठेंच चिन्ह दिसलें नाहीं. नंतर ती धुराड्याजवळ गेली. तों तेथें मात्र तिला चुलीखालचा पायांखालील दगड हाल्लासा वाटला.

मग तिच्या आनंदाला काय विचारायचें आहे! हातांतला कंदील खालीं ठेवून तो दगड उचलण्याचा ती प्रयत्न करूं लागली. परंतु तो जरी हालत असे तरी तो तिला उचलला जाईना. तरी ती निराश झाली नाहीं. तिनें त्या दगडाच्या चारी बाजूंनीं एखादें कुलूप, किंवा एखादी कळ दृष्टीस पडेल ह्मणून पाहिलें. परंतु कांहीं फायदा झाला नाहीं. शेवटीं ती हातानेंच आजूबाजूला चांचपूं लागली. इतक्यांत त्या धुराड्याच्या भिंतींतून एक वीट खालीं पडली.

त्याबरोबर जेथून ती वीट पडली तेथें दिवा घेऊन तिनें पाहिलें तों त्या ठिकाणीं तिला एक लहानशी लोखंडाची कडी दृष्टीस पडली. ती तिनें

ओढल्याबरोबर सरासरी एक हात लांब तार तिला लागून बाहेर आली. नंतर तिनें फिरून दगड हालविण्याचा प्रयत्न केला, तों इचा हात लागल्याबरोबर तो दगड बाजूला झाला.

दगड बाजूला झाल्यावर इनें आंत डोकावून पाहिलें, तों तिला दगडांच्या अरुंद पायऱ्या व तळाशीं गड्द अंधार दृष्टीस पडला.

आंत काय आहे तें पाहण्याविषयीं तिच्या मनांत आलें. परंतु आंतला तो अंधार पाहूनच तिच्या उरांत धडकी भरली; व त्याबरोबर सैतान्याचीं सर्व अघोरकर्मे तिच्या मनांत येऊन, भुयारांत उतरण्याला तिचे पाय कांपूं लागले. तिला वाटे कीं, " मी परत येईन कीं नाहीं कोण जाणें. "

शिवाय, त्या दोघांना जाऊन एक तास झाला होता. त्यांचें काम संपलें असेल किंवा कदाचित् वाटेंतूनच ते कांहीं कामानिमित्त परत येतील, व जर त्यांनीं मला येथें पाहिलें तर माझ्या जिवाची आशाच नको, असे विचार तिच्या मनांत येऊन, या घरांतले चमत्कार पाहण्याचें पुढच्या वेळेवर तिनें टाकलें; व ती जेथल्या तेथें पहिल्याप्रमाणें बंदोबस्त करून, घरीं येऊन निजून राहिली.

---

## भाग १०८.

जिकडे तिकडे चांदणें पडून रात्रीची हवा स्वच्छ झाली होती, अशा वेळेला सैतान्या आणि बफर आवाराच्या रस्त्यानें चालले होते. कांहीं वेळ ते दोघेही बोलत नव्हते. शेवटीं बफर ह्मणाला: " गड्या, परवां रात्रीं ते मार्खमचें काम जसें चकलें तसें हें तरी चकूं नये ह्मणजे झालें. "

" होय, भांचोद, तें चकलें खरें. पण त्याला ह्मणावें खूप समजून ऐस. एक वेळ माझ्या हातून सुटलास, ह्मणून पुन्हां सुटणार नाहींस. " आपले दांत खाऊन सैतान्या ह्मणाला.

" मला तर असें वाटतें कीं, तूं आतां त्याचें नांव सोडून द्यावेंस. इच्या बहीन ज्यांत कांहीं फायदा नसून घडी घडी जिवाला दगदग असेल तें काम आपल्याला आवडत नाहीं. बाकी तुझ्याकरितां मी पाहिजे तें करायला तयार आहें. " बफर ह्मणाला .

" बरं, तूं ह्मणतोस तसेंच. पण हें पहा आपण आलों. "

असें तो ह्मणत आहे तों, ते आवाराच्या भिंतजिवळ आले. त्याबरोबर

बफर भिंतीवर चढला; व सैतान्यानें खालून सर्व हत्यारें त्याच्या हातीं दिलीं. तीं त्यानें हळूच आंत टाकून, सैतान्याला हात देऊन वर घेतलें, व नंतर दोघेही आवारांत उतरले.

यांचा नेहमींचा हाच धंदा पडल्या कारणानें अंधारांत चालण्याला त्यांचे डोळे इतके घटावले होते कीं, मांजराप्रमाणें त्यांची दृष्टी सूक्ष्म झाली होती. असो.

आवारांत उतरल्यावर त्यांनीं आपलीं हत्यारें खांद्यांवर टाकून, ज्या ठिकाणीं त्या स्मिथबाईच्या येथें राहणाऱ्या, नावगांव विरहित झालेल्या मनुष्याचें प्रेत पुरलें होतें त्या ठिकाणीं ते आले. नंतर सैतान्यानें त्या थडग्याच्या डोक्यापासून पांच पावलें जागा मोजली; व तेथून एक लोखंडाची सळई तिरकस धरून अशा बेतानें जमिनींत खुपसली कीं, ती तावडतोब आंतल्या पेटीला जाऊन भिडली. नंतर कुदळ घेऊन सैतान्यानें जमीन उकरण्यास सुरुवात केली. दोघांनीं मिळून सरासरी अर्ध्या तासांत दहा बारा हात लांब व तोंडाशीं दोन हात रुंद असा खड्डा केला. सैतान्यानें आपल्याबरोबर, ठोकतांना आवाज होऊं नये म्हणून, ज्याच्या मुठीला कातडें लावलें आहे असें एक किकरें, व त्याचप्रमाणें ज्याची व्यवस्था केलेली असें एक ठोकणें आणलें होतें. त्या हत्यारानें त्यानें प्रेताच्या पेटीचे सांधे डोक्याच्या बाजूला फोडून तें अंग मोकळें केलें. नंतर एक दोरखंड घेऊन त्याचें शेवट प्रेताच्या खवाल्याला फसून बांधून टाकलें, व सैतान्या वर आला.

त्या दोघांनीं मग तो दोर धरून तें प्रेत ओढून बाहेर आणलें. सैतान्या लागलींच त्याच्या छातीवर पैसे आहेत कीं नाहींत म्हणून पाहूं लागला, तों ते पैसे तेथें होतेच. ते पाहिल्यावर त्याचा जीव थंड होऊन त्यानें ते तावडतोब आपल्या खिशांत घातले.

त्यांनीं मग तो खड्डा बुजविण्यास प्रारंभ केला. त्यांनीं चांपूनचोपून जरी जमिनीपर्यंत माती भरीत आणली तरी बरीच माती शिल्लक आहे असें पाहून दोन पोत्यांत ती भरली व तीं पोतीं ठिकठिकाणीं जाऊन रिकामीं केलीं. इतक्यांत आवाराबाहेर चाकांचा शब्द त्यांच्या कानीं आला.

त्याबरोबर त्यांनीं तें प्रेत पोत्यांत घालून आपलीं हत्यारें गोळा केलीं, व ओझें भिंतीवर आणून ठेवलें. बफरनें मग तें प्रेत क्र्यांकच्या अंगावर ढकललें, आणि त्यानें तें गाडींत घातलें. नंतर ते दोघेही गाडींत येऊन बसले

ती गाडी तेथून निघाली ती थेट शस्त्रवैद्याच्या दारापुढें येऊन ठेपली. व तेथें आल्यावर या दोघांनीं तें पोतें खालीं काढून घेतलें व गाडी निघून गेली.

सैतान्यानें व बफरनें तें प्रेत मग त्या शस्त्र वैद्याच्या एका खोलीत आणून ठेवलें. नंतर सैतान्या आपल्या गड्यास ह्मणतो: " ज्याक, तूं हें प्रेत पोत्यांतून काढून मेजावर ठेव, तों मी शस्त्रवैद्याकडे जाऊन आपले पैसे चुकते करून आणतों." असें ह्मणून तो निघून गेला.

इकडे बफरनें वाऱ्यानें दिवा जाऊं नये ह्मणून खोलीचें दार लावून घेतलें; व तें प्रेत पोत्यांतून काढून मेजावर पसरून ठेवलें. नंतर प्रेताकडे पाठ करून मेजाला टेकून तो याप्रमाणें विचार करूं लागला: " प्रेतावरचे तीस पौंड, व आतां हें प्रेत उकरल्याबद्दल शस्त्रवैद्याकडून मिळणार ते दहा पौंड, मिळून चाळीस झाले. याच्यांत तीन वाटेकरी. ह्मणजे किती झाले? तीन तीन चार वेळा मोजायचे—व तीन तीन अकरा वेळां एकदां मोजायचें—ह्मणजे तेरा पौंडांचा एकेक वाटा होऊन, दोन पौंड वरती राहतात. त्याचे आतां तुकडे करूं—"

असें तो आपल्याशीं बोलत आहे, इतक्यांत प्रेताची हालचाल झाली असें त्याला वाटून, त्याच्या सर्वांगाला कांपरें सुटलें. तों लागलींच खिडकीवरही कांहींसें आदळून तिच्या भिंगाचे तुकडे तुकडे झाले; दिवा विझून गेला, व सर्व खोलींत अंधार पसरला. इतक्यांत, त्याचा एकदम कोणी तरी बळकट हात धरला असें त्यास वाटून त्यानें मोठ्यानें किंकाळी फोडली, व त्याबरोबर तो जमिनीवर बेसावध पडला.

---

# भाग १०९.

## जेम्स टाम्लीन्सन.

एका रहदारीच्या रस्त्यावरील एका दुकानाच्या भिंगाच्या दारावर " जेम्स टाम्लीन्सन दलाल " अशीं अक्षरें झळकत होतीं.

सुमारें सकाळच्या अकरा वाजण्याचा सुमार होता. अशा वेळेला वरील दुकानांत पुढच्याच बाजूला एक कारकून आपल्या कामांत गुंतून गेला होता. दुकानांत चोहोंकडे, व्यापाराच्या शर्तींचीं, माहितीचीं, फायद्याच्या कलमाचीं हस्तपत्रकें, हिशेबवार तक्ते व अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजिनदार, चिटनीस, वगैरेंच्या भपकेदार सह्यांच्या जाहिराती लोंबत राहिल्या होत्या. स्वतः मालकही एका

भपकेदार खोलींत बसले असून, बरेच सुटलेले दिसत होते. तरी मनुष्य एकवार लाहा घेऊन आपला उजळ माथा करून बसल्यावर जसा निष्काळजी दिसतो, तसे अद्याप हे दिसत नव्हते. त्यांना फिरून लोकांत यायला बऱ्याच खस्ता सोसाव्या लागत, व त्याकरितां त्यांना अनेक कामांत इतकी ढवळाढवळ करावी लागे कीं, ती त्यांच्या कोवळ्या मनाला फार खात असे. असो.

हे आपल्या दुकानांत बसले असतांना **ग्रीनवूड**ची स्वारी एकदम येऊन त्या ठिकाणीं धडकली. प्रथमतः कांहीं वेळ त्यांचें थट्टामस्करीचें भाषण झाल्यावर **ग्रीनवूड** ज्या कामाकरितां आला होता त्याविषयीं बोलण्यास त्यानें सुरुवात केली. तो ह्मणालाः—

" मी आज कांहीं तुमच्याशीं रिकाम्या गप्पा मारायला आलों नाहीं. माझें तुमच्याशीं आज एक काम आहे. माझ्या एका ओळखीच्या गृहस्थास, एका नाजूक पण महत्वाच्या कामांत एका दलालाची जरूर आहे; व तें काम जर त्यानें बिनबोभाट केलें तर त्यावद्दल त्याला पांचशें पौंड मिळतील. "

" ज्यांत कांहीं धोक्याचें असेल असें कोणतेंही काम मी करणार नाहीं. " **टाम्लोम्सन** ह्मणाला.

" छे, छे, तसें कांहीं करावें लागणार नाहीं. ज्या गृहस्थाला तुमची जरूर आहे, तोच तुमच्याकडे येणार आहे. तो आला ह्मणजे तुह्माला सर्व समजेल."

" त्या गृहस्थाचें नांव काय वरं ?"

" **आर्थर चीस्टर.** " **ग्रीनवूड**नें सांगितलें.

" **चीस्टर** ! याचें नांव मी तुमच्या तोंडून ऐकलें आहे. तुह्मीच मला सांगितलें होतें कीं,त्यानें तुमच्यामध्यें व कोणी **सर रूपर्ट हारबरो**मध्यें कांहीं कळ लावून दिली ह्मणून."

" हो, सांगितलें होतें खरें. परंतु ही गोष्ट मला कळण्यापूर्वीच, त्याच्या एका गोष्टींत साह्य करण्याचें मी त्याला वचन देऊन ठेवलें होतें; त्यामुळें तें मला पुरें करणें भाग आहे. शिवाय **हारबरो**चा व माझा जो कांहीं थोडासा गैरसमज झाला होता तोही मिटला. तेव्हां विनाकारण द्वेष बाळगण्यांत काय अर्थ आहे ? मुख्यतः फायद्याच्या वेळेला तर पडतेंच घेतलें पाहिजे. "

" मला वाटलेंच होतें तुह्मी असें ह्मणाल ह्मणून. बरें आहे. तुमचा कोण मनुष्य आहे त्याला मी भेटेन; व जर कोठें भानगड नसली तर पांचशें पौंड मिळवायलाही कमी करणार नाहीं. ते गमावण्यासारखी सध्यां माझी स्थिति नाहीं".

" शाबास. हें तुम्ही एकाद्या समजूतदार मनुष्याप्रमाणें बोललांत. अहो, बारीक सारीक गोष्टी मनांत आणूं नयेत. मी जर असें करीत आलों असतों, तर या योग्यतेला कधीं तरी चढलों असतों कां ? ही एवढी माझी चैन चाललीं असती कां ? व **पार्लमेंट**मध्यें जाण्याचा तरी प्रसंग येता का ? एवढ्याकरितां जेव्हां एखादी गोष्ट करण्याबद्दल तुमचें मन घोटाळूं लागेल, त्या वेळेस माझी आठवण करा. अहो जसा येईल तसा पैसा मिळवावा—प्रामाणिकपणानें मिळवितां आला तर बरेंच झालें ; नाहीं तरी मिळविल्याशिवाय राहूं नये. " असें सांगून **ग्रीनवूड** निघून गेला.

नंतर **टाम्लीन्सन** मनाशीं बोलूं लागला: " त्याचें ह्मणणें अगदीं खरें आहे. प्रामाणिकपणानें पैसा मिळवितां आला तर बरेंच झालें; नाहीं तरी तो मिळविल्याशिवाय राहूं नये, एवढा मंत्र त्याला ठाऊक आहे. मग त्याचा जप मीं तरी कां न करावा ? जिकडे तिकडे हाच व्यवहार आहे, व त्याशिवाय मोठेपणाही नाहीं. लक्ष्मी आपण होऊन चालत येत असतां तिला झिडकारून देणारा दुर्दैवी समजला पाहिजे. ठीक आहे. **ग्रीनवूड**च्याच मंत्राचा आतां जप करायचा. " असे त्याचे विचार चालले आहेत तों **चीस्टर** आल्याची वर्दी आली.

**चीस्टर**चा पोषाख नहमींप्रमाणें भपक्याचा असून, निष्काळजीपणाची जी त्याची वृत्ति तिच्यांत कांहीं कमी झालें नव्हतें. ही स्वारी येऊन खुर्चीवर बसल्यावर ह्मणाली: " आपले परम मित्र **ग्रीनवूड** यांनीं बहुतकरून मी कोण आहें हें आपणास कळविलें असेलच; व त्याप्रमाणें मी आपल्याला भेटायला येणार आहें, हेंही कळविलें असेल! "

" हो, तें त्यांनीं सांगितलें आहे ; पण आपल्या भेटीचा हेतु मात्र त्यांनीं मला कळविला नाहीं. "

" कांहीं कळविला नाहीं ? " **चीस्टर**नें विचारलें.

" एवढें मात्र सांगितलें कीं, एका नाजूक—पण महत्वाच्या कामांत माझी गरज असून, त्याबद्दल मला पांचशें पौंड मिळतील. "

" मग कसं काय ? मला साह्य करण्याचें आपल्या मनांत येतें काय ? "

" प्रथमतः ज्या कामांत माझी जरूर आहे, त्या कामाचें स्वरूप मला कळल्याशिवाय मला कांहीं सांगतां येणार नाहीं. "

" व जर आपण पुढें नाकारलें तर ? " **चीस्टर**नें विचारलें.

" तर आजन्मांत त्याबद्दल चकार शब्दही बाहेर पडणार नाहीं, अशी तुह्माला शपथ देईन."

" ठीक आहे तर मग. आतां मी आपली हकीकत सांगण्याला आरंभ करतों. सुमारें तीन महिन्यांपूर्वी एका स्त्रीशीं मीं लग्न लाविलें आहे. ती जरी मोठीशी चांगली नाहीं तरी माझें मन तिच्याकडे ओढण्याला असें कारण झालें कीं, ती आज सोळा हजार पाऊंडांची धनीन आहे. तिचें नांव **व्हायोला** मी तुझ्या पैशाला हात लावणार नाहीं असा लग्नापूर्वीच तिला मीं करार करून दिला होता. परंतु लग्न झाल्यानंतर कांहीं दिवसांनीं ही अडचण दूर करण्याचा निश्चय केला. कारण, दिवसेंदिवस माझें देणें वाढत चाललें, लोकांचे तगादे पाठीमागें लागले, व जवळ तर कवडी नाहीं. तिच्याशीं मीं जें लग्न लावलें तें चार लोकांनीं, मी तिचा नवरा व ती माझी बायको, असें म्हणावें ह्मणून लावलें न्हतें. मला पैशाकरितां तिची जरूर होती. मीं तिला लागलींच सांगितलें कीं, माझ्याजवळ एक पैसा सुद्धां नाहीं. तूं मला तो पुरविला पाहिजे. त्याबरोबर तिनें आकाशपाताळ एकच करून सोडलें. मला वाटलें--ती मला खाते कीं काय कोण जाणे! परंतु पुढें मीच पडतें घेऊन कांहीं दिवस तिच्या अतिशय आर्जवानें वागूं लागलों. तेव्हां एके दिवशीं ती मला ह्मणाली: ' **आर्थर,** आतां झालें तें झालें. तुह्मी मला जरी फसविलें तरी आतां मी तें विसरून जाईन. तुह्मी मात्र माझ्याशीं चांगले वागा ह्मणजे झालें. ' परंतु हें सर्व वरकरणीं होतें. आपल्या पैशाला ह्मणून ती हात लावूं देईना. मला कर्ज आहे, असें मी तिला सांगितलें. तेव्हां ती ह्मणाली: ' तुमचे सावकार माझ्याकडे आणा ह्मणजे मीच त्याचा निकाल करून टाकतें. ' परंतु मला दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिणें बिलकुल आवडेना. माझ्या हातांत मला पैसे पाहिजे होते, आणि ती तर ऐकेना. तेव्हां आपल्या मित्राचा या कामांत सल्ला घ्यावा ह्मणून मी एके दिवशीं निघालों. तों वाटेंत मला **ग्रीनवूड** भेटले. त्यांनीं मी काळजींत कां दिसतो ह्मणून विचारलें. तेव्हां मीं ही सर्व हकीकत त्यांना सांगितली. त्यांनीं मग कांहीं वेळ विचार करून एक बेत योजला; व त्याबद्दल बक्षीस काय घ्यायचें तें माझ्यापासून ठरवून घेऊन, या कामांत मला शेवटपर्यंत साह्य करण्याचें वचन दिलें. खरोखर त्यांनीं अशी कांहीं अजब युक्ति लढविली कीं, तुह्मी तोंडांत बोट घालून रहाल."

" ती त्यांच्याशिवाय कोणाच्याच साधायची नाहीं."

" खरोखरच नाहीं. प्रथमत: त्यानें दोन वैद्य माझ्याकडे पाठवून दिले. परंतु ते एका वेळेला नाहींत; व जसे कांहीं मला सहज भेटायला ह्मणून ते आले होते. तेथें अर्थातच आमची बायकोही त्यांच्या दृष्टीस पडली. मग आमचें काय काम होतें तें झालें."

" तें कोणचें ? त्यांनीं तुमच्या बायकोला वेडी ठरविली ?"

" उघडच आहे. ही सर्व व्यवस्था ग्रीनवूडची. त्यांनीं मला एक वेड्याचें इस्पितळही पाहून दिलें. या गोष्टीला दोन तीन दिवस लागले. तेवढा वेळ तिच्यापाशीं मी फार गोडीनें वागलों. परंतु तितक्यांत जर मीं पैशाचा कांहीं शब्द काढला तर लागलींच तिनें डोळे फिरवावेत. ही गोष्ट इतक्या थराला नेण्याचें कांहीं कारण नव्हतें; पण तेथें यावांचून दुसरा इलाजच चालेना त्याला मीं तरी काय करावें ? एके दिवशीं तिला सहज फिरायला ह्मणून बाहेर काढली. व बोलत बोलत एका ओसाड गल्लींतल्या इस्पितळाजवळ तिला आणलें. या वेळेला अंधार पडत चालला होता. इस्पितळाच्या मालकालाही अगोदर सांगून ठेवलेंच होतें. त्याच्या घराजवळ आह्मी जसे गेलों, तसें त्यानें एकदम येऊन, तिनें ओरडूं नये ह्मणून तिच्या तोंडांत बोळा घातला, व तिला उचलून इस्पितळांत नेऊन ठेवली."

" या गोष्टीला तीन वार झाले नाहीं काय ?" टामलीन्सननें विचारलें.

" हो, व आतां ती शुद्धीवर येत चालली आहे. त्या मनुष्याकडून कालच मला पत्र आलें आहे कीं, आतां ती आपल्या नवऱ्याची पाहिजे ती गोष्ट ऐकण्यास तयार झाली आहे. थोड्या दिवसांपूर्वींच्या पत्रांत त्यानें असें लिहिलें होतें कीं, तिला ताळ्यावर आणण्याचे जे उपाय चालले आहेत त्यांचा बराच उपयोग होत आहे, व कालचें पत्र तर असें आहे."

" आतां पुढें काय करण्याचा तुमचा विचार आहे ?" आपलें काम आतां कोठें लागणार आहे, हें त्याच्या मनांत येऊन त्यानें विचारलें.

" दुसरें पत्र आल्याबरोबर मीं ग्रीनवूडला कळविलें; व त्यांनीं मला या कामाचा शेवट करण्याकरितां तुमची मदत मागण्यास सांगितलें. माझी बायको आतां, मला आपली अर्धी संपत्ति—ह्मणजे आठ हजार पौंड—देण्याला कबूल झाली आहे; व मीही सगळीच्या ऐवजीं अर्धीच घेण्याविषयीं मोठें मन केलें आहे."

" व ते आठ हजार पौंड तुमच्या नांवावर घेण्याकरितां तुह्माला आतां

दलालाची जरूर आहे. पण या कामांत तुमच्या बायकोची सही पाहिजे. ” टाम्लीन्सन ह्मणाला.

“ पण तुह्मालाही जेथें माझी बायको आहे तेथें आलें पाहिजे. ”

“ जर ती सही देण्याला खुषी असेल, तर मीही येण्याला खुषी आहें. पण तुमची खात्री आहेना—कीं, ती पुढें ही सर्व हकीकत सरकारपर्यंत नेणार नाहीं ह्मणून ! ”

“ त्याचें असें करायचें कीं, आठ हजार पौंड माझ्या नांवानें करून देण्याबद्दल जो दस्तऐवज, ती मला करून देणार आहे तो मुळींच दोन महिन्यांपूर्वीच्या तारखेचा—ह्मणजे लग्न झाल्यावर एक महिन्यानंतरचा—करावयाचा; व आह्मी तुमच्या येथें येऊन, तिनें तुमच्या देखत त्या कागदावर सही केली, असा त्यांत लेख आणावयाचा. आज रात्रीं अशा प्रकारचा कागद करून उद्यां तो पैसा आपल्या ताब्यांत घ्यावयाचा;व उद्यां रात्रीं तिला तिच्या घरीं पोंचवायची. तिनें कदाचित् पुढें सरकारांत ही हकीकत नेलीच, व ‘माझ्यापासून जबरदस्तीनें अशा तऱ्हेनें कागद करून घेतला,’ ह्मणून सांगितलेंच तर, ‘तो कागद दोन महिन्यांपूर्वीं माझ्या देखत झाला’ह्मणून तुह्मी पुरावा करालच मग तिच्या ह्मणण्यावर कोण विश्वास ठेवणार ? शिवाय, तिला वेड लागलें आहे, अशाबद्दल दोन वैद्यांचा पुरावा आहेच. इतका प्रकार झाल्यावर तिची मुळींच छाती नाहीं, एखादा शब्द विरुद्ध बोलण्याची. ”

“ ही ग्रीनवूडची मसलत. मग काय पुसायचें आहे ? कोणावरही न येऊं देतां एखादा हेतु साध्य करून घेण्याच्या कामांत, त्याच्या सारखा मनुष्य मिळायचा नाहीं ह्मटलें तरी चालेल.”

“ मग कसं काय? तुमचें या कामांत साह्य आहे कीं नाहीं ? याबद्दल तुह्माला पांचशें पाऊंड मिळतील. ”

“ ठीक आहे. मी तुह्माला रुकार देतों. ” असें ह्मणून त्यानें ग्रीनवूडचा ‘पैसा मिळवावा’ हा जो मंत्र तो मनांत आणला.

“मग रात्रीं दहा वाजतां तुह्मी माझ्या घरीं याल का?” चीस्टरनें विचारलें.

टाम्लीन्सननें होय ह्मणून सांगितल्यावर तो निघून गेला, व हा आपल्या मनाशीं विचार करूं लागला:

“ फासा तर टाकला आहे—व त्यामुळें, अनीतीच्या मार्गांत पाऊलही पडलें आहे. या लबाडीच्या युक्त्या—हें अप्रामाणिकपणाचें वर्तन—व या फसवेगिरीच्या

सलामसल्ती—आम्हां दलाल लोकांना जास्ती जास्ती अधर्मप्रवर्तन व बेहोष होण्याला उपयोगी पडत असतात. एका घटकेंत पांचशें पाऊंड, माझ्यासारख्या भाग्यहीन मनुष्याला थोडेसे तरी उपयोगाचे आहेत. पैकीं, चारशे पौंड ग्रीनवूडला देईन, व शंभर पौंड पेढीवर जमा करीन. या शहरांत पतीशिवाय कांहीं धंदा चालत नाहीं. ”

अशा तऱ्हेचे विचार करून तो थांवतो आहे तोंच, कारकुनानें येऊन सांगितलें कीं, “ एक मनुष्य आपल्या भेटीची इच्छा करीत आहे, पण आपलें नांव सांगत नाहीं. ”

“ त्याला आंत येऊं दे. ” असें सांगितल्याबरोबर, कारकुनानें एका भेसूर दिसणाऱ्या मनुष्यास याच्यापुढें आणून उभें केलें.

“ तुमचें काय काम आहे माझ्याशीं ? ” टाम्लीन्सनला हा मनुष्य न आवडून त्यानें विचारलें.

हा प्रश्न विचारल्याबरोबर या मनुष्यानें आपल्या कोटाच्या खिशांतून एक चिठोरें काढून त्याकडे पहात विचारलें. “ तुमचें नांव जेम्स टाम्लान्सन, लांबार्ड गल्लींतले माजी पेढीवाले नाहीं काय ? ”

“ होय तेंच. काय तुमचें काम आहे ? ”

“ एका मनुष्याला तुमची भेट घ्यायची इच्छा झाली आहे. ”

“ कोण तो मनुष्य ? ” टाम्लीन्सननें विचारलें.

“ तो कोण आहे हें मला ठाऊक नाहीं. परंतु त्याच्या बरळण्यावरून मला असें वाटतें कीं, तो तुह्मांला चांगला ओळखीत आहे. ”

“ काय, तो बरळतो आहे ? ” त्याच्या मनांत कांहीं संशय येऊन त्यानें विचारलें.

“ बरळेल नाहीं तर काय करील ? ज्याला चार दिवस प्रेत ह्मणून ठेवलें होतें, नंतर पेटींत घालून पुरलें व पुन्हां दहा बारा तासांनीं बाहेर काढलें. इतका प्रकार झाल्यावर जर मनुष्य बरळणार नाहीं? तर बरळणार तरी कशानें?”

“ तुमच्या या भाषणानें मी जास्ती जास्तीच बुचकळ्यांत पडत चाललों आहे. तर एकवार सर्व उघड करून सांगा. ”

“ बर तर सांगतोंच आतां. मिचेल मार्टीन या नांवाचा कोणी मनुष्य तुह्मांला ठाऊक आहे ? ”

“ मिचेल मार्टीन ! त्याचें काय झालें सांगा ? ”

" तो आजारी होता—"

" तो आजारी होता ? आणि मला हें कळलें नाहीं ! "

" एवढेंच नाहीं तर तो मेला—"

" मेला ! केव्हां ? कोठें ? " **टाम्लीन्सननें** विचारलें.

" हो मेला. आणि त्याला पुरलें देखील ! "

" अशी चेष्टा करूं नका. तो कधीं मेला, त्याला कोठें पुरलें हें सर्व मला सांगा."

" अहो, तो मेल्यावर त्याला पुरलें होतें, परंतु तो फिरून जिवंत झाला."

" हें पहा, **मिचेल मार्टीन**संबंधानें जर तुह्मी मला कांहीं सांगायला आला असाल, तर पडदा ठेवल्याशिवाय सर्व सांगा."

" ऐका तर. ज्याला नांव गांव कांहीं नव्हतें, असा एक म्हातारा **ग्लोब टौनच्या** एका आडगल्लींत राहत असे. तो पुढें आजारी पडला. व कांहीं दिवसांनीं सर्वांच्या दृष्टीनें मेलासा वाटला, तेव्हां त्याला मूठमाती दिली. परंतु एका शस्त्रवैद्याला त्याच्यावर शस्त्र प्रयोग करावेसे वाटले ह्मणून त्यानें मला व माझ्या एका दोस्ताला तें प्रेत उकरून आणण्यास सांगितलें. आम्ही तें प्रेत उकरून आणून, त्याच्या खोलींत एका मेजावर नेऊन पसरलें. व माझ्या दोस्ताला प्रेताजवळ ठेवून, मी शस्त्रवैद्याबरोबर पैसे चुकते करून घ्यायला गेलों. इकडे पाठीमागें असा प्रकार झाला कीं; या शस्त्रवैद्याच्या शेजारच्या एका मनुष्याला हा शस्त्र प्रयोग पाहण्याची इच्छा झाली. ह्मणून त्यानें जशी आमची गाडी त्याच्या दारापुढें आलेली पाहिली, तसा तो चोरून ज्या खोलींत तें प्रेत ठेवलें होतें, तिच्या खिडकीपाशीं आला. परंतु त्या खिडकींतच दिवा असून तिच्यावर काळा पडदा सोडला होता, त्यामुळें आंतला भाग त्याला कांहींच दिसेना. तेव्हां त्यानें तेथलाच एक टोला उचलून असा जोरानें खिडकीवर फेंकून दिला कीं, तिच्या भिंगांचे तुकडे तुकडे होऊन आंतला दिवा विझून गेला. माझ्या दोस्ताला याचा थोडासा चमत्कार वाटला. इतक्यांत प्रेतानें आपला हात धरला असें त्याला वाटून तो—"

" एकूण मिचेल मार्टीन मेला नव्हता तर!" टाम्लिन्सननें अशा भावानें विचारलें कीं, या वेळेला त्याच्या मरणाची बातमी त्याला विशेष इष्ट वाटली असती.

" नाहीं तो मेला नव्हता. खिडकीचा तडकन् आवाज व धक्का—नाहीं, माझ्या दोस्ताची आरोळी ऐकून आम्ही त्या खोलींत दिवा घेऊन आलों, तों

माझा दोस्त बेसावध पडलेला दृष्टीस पडला. परंतु विशेष आश्चर्याची गोष्ट आह्मी ही पाहिली कीं, तें प्रेत धापा टाकीत होतें. त्याबरोबर, हा कांहीं मेला नाहीं असें तो शस्त्रवैद्य ह्मणाला. व लागलीच त्यानें एक चाकू घेऊन त्या प्रेताचा दंड कापला. प्रथम रक्त मोकळें वाहिना, तेव्हां त्यानें त्याचे हात कपाळ वगैरे उबविलें. त्याबरोबर त्या जखमेंतून रक्त चांगलें वाहूं लागलें. इकडे मीही आपल्या दोस्ताला सावध करून त्याला हें वर्तमान सांगितलें. असे प्रकार पुष्कळ होतात. दीड वर्षापूर्वीं आह्मी असेंच एक प्रेत उकरायला गेलों होतों, तों तें प्रेत तर सपशेल पालथें पडलें होतें. ”

“ सध्यां चालली आहे हकिकत तीच सांगा ह्मणजे झालें. ” आपणासमोर एक प्रेत उकऱ्या आहे याचा त्याला अतिशय तिरस्कार येऊन तो बोलला.

“ ठीक आहे. आतां कोठपर्यंत आलें होतें ? हं—त्या जखमेंतून रक्त वाहूं लागलें. नंतर कांहीं वेळानें तें प्रेत हालचाल करूं लागलें. इकडे तो शस्त्रवैद्य मला हें आण, तें आण ह्मणून सांगून उगीच खेपा घालायला लावीत होता. अशी खटपट करतां करतां तो ह्मातारा एकदांचा चांगला सावध झाला. प्रथमतां त्यानें मोठा उसासा टाकला. नंतर डोळे उघडून ‘ मी कोठें आहे ? ’ ह्मणून विचारलें. तेव्हां वैद्यानें, तुह्मी फार आजारी होता वगैरे कांहीं गोष्टी त्याला सांगितल्या. नंतर एक मऊ बिछाना तयार करवून त्यावर त्याला निजविलें. थोडीशी दारू त्याला पाजली. व सरासरी अर्ध्या तास गेल्यावर थोडेसे शब्द तो बोलूं लागला. परंतु त्या बोलण्यांत धरबंध नसे. फक्त तो आपलें नांव घेई तें व तुमचें, एवढें आह्माला समजलें. ”

“ परंतु तो आणखी कांहीं—आणखी कांहीं ह्मणाला कीं—” **टामलीन्सन**नें घाबऱ्या घाबऱ्या विचारलें.

“ हो, तो पुष्कळ बोलला. त्यांत त्यानें एवढें सिद्ध करून दाखविलें कीं, विश्वासघात केल्याचा जो आरोप माझ्यावर आहे तो खरा नाहीं. ”

“ अरेरे ! देवा शेवटीं तूं मला दंड केल्याशिवाय राहत नाहींसच तर मग! ”असें ह्मणून तो प्रेतवत झाला व खुर्चीवर बसल्या बसल्याच कांपूं लागला.

“ परंतु तुह्मी कांहीं भिऊं नका. मी ही गोष्ट फोडणार नाहीं. व त्या शस्त्रवैद्यालाही फोडतां यायची नाहीं. तो जर अशी गोष्ट करील, तर तें प्रेत त्याच्या घरांत कसें आलें याची पुसतपास झाल्याशिवाय राहणार नाहीं. जे

प्रेत उकरतात त्यांना, व जे त्यांना उत्तेजन देतात त्यांना कायद्यानें काळ्या पाण्याची शिक्षा ठेविली आहे."

"तर मग तुम्ही कांहीं मला फसविणार नाहीं?" त्याच्या तोंडावर लागलीच हुशारी येऊन त्यानें विचारलें.

"तुम्हांला फसवून मला काय मिळणार आहे? जो **मिचेलमार्टीन**ला धरून देईल त्याला तीन हजार पौंडांचें बक्षीस लावलें होतें हें तुम्हाला ठाऊक आहेच. परंतु तें मला घेतां आलें नाहीं. तरी ही गोष्ट गुप्त राहील असें नाहीं. कदाचित् माझ्या तोंडून बाहेर पडेल, किंवा माझ्या दोस्ताच्या तोंडून बाहेर पडेल; कोणाच्याही तोंडून बाहेर पडली तरी, त्या ह्यातार्‍याचा शोध हा होणारच. तेव्हां तुम्हीच समजून आमचीं तोंडें बंद करावीं हें बरें. आम्ही म्हणजे तुम्हांला अगदीं जिकिरीस आणूं असें नाहीं—परंतु तुम्ही अगोदर त्याला भेटा. म्हणजे मी सांगतों हें खरें कां नाहीं याबद्दल तुमची खात्री होईल."

"तो मला कोठें भेटेल? कोठें आहे तो?"

"संध्याकाळ होईपर्यंत तुम्ही थांबा. मला तुमच्याबरोबर यायचें आहे. दिवसाचाच मी येईन तर त्या शस्त्रवैद्याला तें आवडायचें नाहीं."

"रात्रीं नऊ पासून दहापर्यंत मला काम आहे." **टामलीन्सन** म्हणाला.

"त्याच वेळेला मलाही आहे. सात वाजतां तुम्हाला फावेल? त्या वेळेलाही अंधार असतोच."

"ती वेळ बरी आहे. तुम्हाला मी कोठें भेटूं?"

"नव्या देवळाजवळ. तेथें येऊन तुम्ही उभे राहतां तोंच मी आलों पहा."

"ठीक आहे. पण फिरून मी विचारतों, मला फसवायचा नाहींस ना?"

"भलतेंच!"

"पण तो शस्त्रवैद्य, बक्षिसाच्या लालचीनें नाहीं ना—"

"तुम्हाला वाटतें, तुरुंगांत जाण्याचा तो होऊन आपल्यावर प्रसंग आणील. तुम्ही इतके भितां का? आपण याबद्दल मग ठरवूं." असें म्हणून प्रेतउकर्‍या निघून गेला.

तो निघून गेल्यावर **टामलीन्सन** आपल्या मनाशीं म्हणाला: "किती एक दिवस त्या बिचार्‍याची व माझी फिरून गांठ पडावी म्हणून मी इच्छा करीत होतों. ती माझी इच्छा पूर्ण झाली—पण ती केवळ माझ्या अपराधाचें शासन मला करण्याकरितांच झाली म्हणण्यास चिंता नाहीं."

# भाग ११०.

## समाधीचा परिणाम.

रात्रींच्या नऊ वाजण्याचा सुमार होता. अशा वेळेला शस्त्रवैद्याच्या घरांतील एका खोलींत बिछान्यावर **मिचेल मार्टिन** पडला असून जवळ **जेम्स टामलीन्सन** बसला होता. या वेळेला या दोघांशिवाय खोलींत दुसरें कोणीही नव्हतें.

कांहीं वेळ एकमेकांच्या हकीकती सांगणें झाल्यावर **टामलीन्सन** बोलूं लागला: " अहाहा ! माझ्या इमानी मित्रा ! माझ्याकरितां तूं आपली एवढी नुकसानी करून घेतलीसना ? पण तुला खरेंच सांगतों, तुझ्या या अलौकिक कृत्यांचें स्मरण झाल्याशिवाय एक दिवस देखील जात नव्हता बरं. "

" तें मी समजतों आहे. तुम्ही जर माझ्याशीं प्रेमानें नसतां तर मीही तुमच्या करितां जें केलें, तें केलें नसतें, पण मला सांगा, तुम्हाला कसें वाटतें, तो शस्त्रवैद्य व तो भयंकर मनुष्य—"

त्याच्या मनांत काय आलें आहे तें ओळखून हा म्हणतो: " त्याबद्दल तूं कांहीं काळजी करूं नकोस. दुसऱ्या कोणत्याही चांगल्या हेतूनें जरी त्यांनीं हें गुप्त ठेवलें नाहीं तरी भीतीनें तरी त्यांना हें गुप्त ठेवलेंच पाहिजे. तो शस्त्रवैद्य प्रामाणिक मनुष्य दिसतो, त्याच्यावर विश्वास ठेवायला हरकत नाहीं. व जर तो उघड करूंच लागेल तर तें त्याच्या गळ्याशीं आल्याशिवाय राहायचें नाहीं. आणि जो मनुष्य माझ्याकडे आला होता तो व त्याचा साथीदार यांचीं तोंडें दाबण्याची मी तजवीज करून ठेवलीच आहे. "

" परंतु अशी तजवीज करायला तुम्ही समर्थ नाहींत हें मला माहीत आहे. आणि माझ्याकरितां तुम्ही एखाद्या अडचणींत पडावें असें मला वाटत नाहीं. "

" खरोखर अडचणींत न पडतां त्यांचीं तोंडें दाबण्याचें सामर्थ्य माझ्यांत अद्याप आहे. " **टामलीन्सन** म्हणाला.

" परंतु तुम्ही आतांच सांगितलें ना कीं, तुम्ही कसेबसे दिवस ढकलीत आहां म्हणून? त्या मांगाना काय द्यायचें कबूल केलें आहे? "

" दोनशें पौंड. " **टामलीन्सन**नें सांगितलें.

" दोनशे पौंड! छे, छे, धनीसाहेब तुमची ऐपत एवढी रक्कम देण्याची नाहीं हें मला ठाऊक आहे. "

" कांहीं दलाली संबंधानें आज मला पांचशे पौंड मिळायचे आहेत. त्यांतले खर्च करून तुझें व माझें दोघांचेंही रक्षण करूं ह्मणजे झालें. "

" ठीक आहे. हें केलेंच पाहिजे. करातर मग. " आपल्या पूर्वीच्या धन्याच्या कल्याणाची ज्याच्या मनांत सदोदित इच्छा असा तो मिचेल बोलला.

नंतर कांहीं वेळ दोघेही स्वस्थ बसले. इतक्यांत मार्टीन आपल्या धन्याकडे वळून ह्मणाला: " आज तुह्माला पांचशे पौंड मिळायचे आहेत नाहीं का? "

आपलें तोंड बाजूला फिरवून टामलीन्सन ह्मणाला: " असें तर मला वाटतें. "

" पण माझ्या तोंडाकडे पाहून कां सांगत नाहीं? ते पैसे तुह्माला कोठून मिळायचे आहेत? "

" माझ्या एका कुळाकडून—ज्याला मी एका कामांत मदत करणार आहे. " तो अडखळत बोलला.

" एका रात्रींत पांचशे पौंड मिळवून देणारें असें काय काम आहे? मला तें कांहीं खरें वाटत नाहीं. "

" मी शफत पूर्वक सांगतों कीं, मी सांगितलें तें अगदीं खरें आहे. "

" असें जर असेल, तर तुह्मी जें काम करणार आहात तें प्रामाणिकपणाचें तरी नसलें पाहिजे. "

यापुढें कांहीं तरी उत्तर घेऊन हा विषय बंद करण्याचा टामलीन्सनचा विचार होता, परंतु इतक्यांत मार्टीन बिछान्यावर उठून बसला. व आपले डोळे आपल्या धन्याकडे लावून त्यानें बोलण्यास सुरवात केली; " धनीसाहेब फसवाफसवी, लबाडी, विश्वासघात इत्यादि अनीतिरूप तुमचा समुद्रप्रवास—ज्याचा तुह्मी पुष्कळ अनुभव घेतला आहे—तो अद्याप पुरा झाला नाहीं काय? तुह्मांला मी पक्कें सांगून ठेवतों कीं, या समुद्रांच्या लाटा जरी कांहीं काळ तुह्मांला बिनधोक चालवितील ; तरी कधीं ना कधीं तरी त्या तुह्मांला एखाद्या गुप्त खडकावर नेऊन आदळल्याशिवाय राहणार नाहींत. मग जर तुह्मी ह्मणाल कीं, मी कशाला तरी धरून राहीन, पण तें मात्र चालणार नाहीं. खरोखर, मी नुकताच ज्याचा अनुभव घेतला आहे, तो जर तुह्मी घेतला असता तर माझ्या सांगण्याची तुह्मी कधीं उपेक्षा करतां ना. मी या जगांतून दुसऱ्या जगांत जाऊन, तेथून शाश्वत स्थितीचें मुख्य, अति उच्च व पारलौकिक असें जें गौप्य तें शिकून आलों हें तुह्मांस माहीत तरी आहे? ज्या वेळेला या पंचभूतात्मक देहाला जिवानें सोडलें त्या वेळेला त्यांतील आत्मा

वायुवेगानें भराऱ्या मारीत त्या अनंत विश्वांत निघून गेलो. जरी स्पर्शज्ञान होण्याला हस्तपादादि मला अवयव नव्हते, व मी वायुरूपानें होतों तरी जणूं काय मला नाक, कान, डोळे, इत्यादि इंद्रियें आहेत असें मला वाटे. तेथील अनुपमेय स्वर्गसुखाचीही मी चव घेतली, व महा यातनाकारक जो नर्कवास त्याचाही मी अनुभव घेतला—परंतु दोन्हीही अल्पकाळच. महाराज, ईश्वर जो मनुष्यास एकदां मारतो व पुन्हां जन्मास घालतो तो कां, याचें कारण तुह्मांस माहीत आहे? याचें कारण, त्या मनुष्यानें सत्कृत्याचें फल अक्षय्य स्वर्गसुख, व दुष्कृतीचा परिणाम नर्कवास आहे, असें मनुष्यमात्रास सांगत फिरावें हेंच होय. व एवढ्या करितांच त्यानें मला—एका कीटकाला—एका क्षुद्रप्राण्याला—तेथें नेलें होतें. स्वर्गवासाचें सुख काय आहे, व नर्कवासाच्या यातना कोणत्या आहेत हें मी सांगूं शकत नाहीं. तेथील सुखदुःख हीं मनुष्याच्या अगदीं कल्पने बाहेरचीं आहेत. ह्मणून सांगतों महाराज, जो चार दिवस हें जग सोडून तेथील सर्व रहस्य पाहून आला त्या **मिचेल मार्टीन**चे हे शब्द ऐकून तरी सावध असा." असें ह्मणून तो थकल्यासारखा होऊन फिरून जमिनीवर पडला.

**टामलीन्सन**ला याची पुष्कळ दिवस माहिती असल्यामुळें, याच्या आजपर्यंतच्या एकंदर भ्रांतिष्ट वृत्तीशीं न मिळणारें असें हें आतांचें भाषण ऐकून तो अगदीं थक्क होऊन खुर्चीवरच डांबून टाकल्यासारखा स्तब्ध बसला. एकाच्याही तोंडून मग तेथें शब्द निघेना. शेवटीं शस्त्रवैद्य आला व त्यानें "कसे काय आहेत आमचे रोगी आतां?" असें बिछान्याजवळ जाऊन विचारलें.

"मला वाटतें याचें मस्तक भ्रमण करीत आहे." **टामलीन्सन** ह्मणाला.

"कांहीं दिवस असा प्रकार व्हायाचाच." हा मेलेला जिवंत झाल्याप्रमाणें जरी होता तरी याचें या शस्त्रवैद्याला कांहींच आश्चर्य न वाटून, सामान्य रोग्याची अशी चिकित्सा करावी त्या प्रमाणें तो बोलला.

"परंतु हा कांहीं विलक्षण—विलक्षणच बरळतो आहे. कोठें स्वर्गलोकच्या गोष्टी सांगतो, कोठें नर्कवा—"

"तो काय पाहिजे तें बरळेल. आपण मात्र तिकडे लक्ष्य देऊं नये. या वेळेला याला अतिशय ताप चढला आहे. कदाचित् या स्थितींत फार बोलण्यानेंही चढला असेल. तेव्हां आज आतां याला पुन्हा भेटायचें करूं नका. उद्याला तो बरा होईल."

" कांहीं खर्च झाला तरी चिंता नाहीं. जितकी त्याची काळजी तुह्माला घेववेल तितकी घ्या. तुमचे सर्व उपकार मी फेडीन."

" कांहीं हरकत नाहीं. त्याबद्दल आपण मग बोलूं. उद्यां तुह्मी या वेळेला या. " नंतर **टामलीन्सन** त्याचा निरोप घेऊन निघून गेला.

---

# भाग १११.

## चीस्टरच्या येथील प्रकार.

वर सांगितलेला प्रकार झाला त्याच दिवशीं रात्रीं सुमारें साडेनऊ वाजतां, **चीस्टर** आपल्या खोलींत दारू पीत बसला होता. व एकीकडे, जिनें त्याला आपलें शरीर आर्पण करून आपल्या सुखाचा वाटेकरी केलें होतें, त्या बायकोची जुलुमानें व कपटानें अर्धी संपत्ति हरण केल्यावर कोणत्या तऱ्हेनें चैन करावी याबद्दल त्याचे विचार चालले होते.

अशा तऱ्हेनें हा बसला असतां एका मोलकरणीनें येऊन, **टामलीन्सन** आल्याची वर्दी दिली.

तो येऊन बसल्यावर, **चीस्टर** या मोलकरणीच्या मागें गेला व बाहेर आल्यावर तिला त्यानें हळूंच सांगितलें: " हें पहा, तो दुसरा मनुष्य येईल कीं नाहीं, त्याला मागच्या खोलींत बसायला सांग. कारण या गृहस्थाशीं मला कांहीं बोलायचें आहे. " असें सांगून तो, जेथें **टामलीनसन** बसला होता तेथें आला.

" तुह्मी तर बोवा वेळेपूर्वी आलात. कामाची कळकळ ह्मणतात ती हीच. " **चीस्टर** ह्मणाला.

" मला इकडच्याच महल्यांत कांहीं काम होतें. तें करून परस्पर मी तुमच्याचकडे आलों."

" आपल्याला दहा साहिदहापर्यंत इस्पितळांत जातां येत नाहीं. कारण त्याच्या मालकानें, 'मीच तेथें येईन' ह्मणून सांगितलें आहे. तो आतां आला ह्मणजे समजेल, ती अजून आपलेंच ह्मणणें घेऊन बसली आहे किंवा कांहीं माळयावर आली आहे. "

" असलें हें घाणेरडें काम कांहीं सुध्या मार्गानें तडीस जाईल तर मला फार आनंद होईल पहा. "

" छे हो, तें कसलें होतें. मी सांगितलं या शिवाय त्याला रस्ताच नाहीं. तुह्मी जें मला वचन दिलें आहे तें मागें घेणार नाहीं अशी मी आशा करतों."

" खरं पुसाल तर सध्यां जशी मला पैशाची जरूर आहे तशी — या शहरांत कोणाला नाहीं ह्मटलें तरी चालेल. कारण सध्यांच मी कांहीं मनुष्याला दोनशे पौंड द्यायचें कबूल केलें आहे. आणि ते जर त्यांना पोंचले नाहींत, तर ते स्वस्थ बसणारे मनुष्य नाहींत. व जरी पेढीवर माझे पैसे जमा आहेत तरी प्रत्येक खेपेला मला पैसा काढतां येत नाहीं.—त्यामुळें माझी पत नाहींशी होईल."

" वा: माझें काम होण्याला ही तर बळकटीच झाली ह्मणायची." दारूचा ग्लास भरतां भरतां **चीस्टर** बोलला.

" पण खोट्या कामांत पाय टाकण्याला माझा धीर होत नाहीं."

" ज्याला पैशाची इतकी जरूर आहे, त्यानें इतकें भिणें काय उपयोगाचें ? तर **टाम्लीसन** आपल्याला मी खरें विचारतों, या कामांत आपण हात घालणार कीं नाहीं!"

" तुह्मी खरें पुसतां तर मीही सांगतों कीं, या कामांत पडूं नयेसें मला वाटतें."

" तर मग तुह्मी मला विनाकारण खोटी आशा लावली, ही चूक केली. माझी वेळ मात्र व्यर्थ दवडलीत. एवढ्या वेळांत मी दुसरा एखादा, तुमच्यापेक्षां कमी कोवळ्या मनाचा मनुष्य पाहिला असता."

" तुमची ही गैरसोय झाली, याबद्दल मला फार वाईट वाटतें. एक तासापूर्वी तुमचें काम करण्याचा माझा निश्चय होता व त्याप्रमाणें जरूरीचे कागदपत्रही मी बरोबर आणले आहेत."

" मग इतक्यांतच तुमचा निश्चय ढळायला मध्येंच माशी कोठें शिंकली?"

" मी जरी धर्मभोळा नाहीं, तरी मला वाटतें कीं, कांहीं दैविक वाणीच मला हें काम न करण्याविषयीं—"

"**टामलिन्सन**, तुमच्या या भ्रांतिष्ट वर्तनानें माझ्या बायकोचा तुरुंगवास मात्र जास्त लांबेल."

" पण त्याचा जबाबदार कोण आहे ?"

" तो भाग निराळा. या वेळेला प्रत्येक पळ महत्वाचें आहे—कारण माझी बायको खरोखरीच वेडी होत चालली आहे."

" तर मग तुह्मांला देवाची शफत आहे तुह्मी तिला आतांच्या आतां मुक्त करा."

" छे—तिनें तो कागद करून दिल्याशिवाय नाहीं."

"तिला सोडा.माझ्या कचेरींत घेऊन या.ह्मणजे तेथें तो कागदकरून देईल."

" तुह्मी काय वेडे आहात ? तुह्मांला वाटतें एकदां ती सुटल्यावर लेखणीला नुसता हात तरी लावील ? तुमचें हें वेडेपण पाहून मला नवल वाटतें, व तुमचा हा भागूबाईपणा पाहून तुमचा रागही येतो. तुह्माला धंदा कसा करावा, व जगांत कसें वागावें हें कांहीं माहीत नाहीं असें ह्मटलें पाहिजे. तुह्मी त्याच वेळेला मला होय कां नाहीं तें सांगायचें होतें. हं चला, अंगांत कांहीं पुरुषत्व येऊंद्या. उद्यां दोनशे पाऊंड दोन मनुष्यांना द्यायचे आहेत हें लक्षांत आणा."

" चोस्टर मी आपल्या मनाचा निश्चय केला—या कामांत पडायचें नाहीं." असें ह्मणून तो जाण्याकरितां उठला.

परंतु इतक्यांत मधलें दार उघडून आंतल्या खोलींतून एक भयंकर तोंडाचा मनुष्य दत्त ह्मणून पुढें उभा राहिला.

" छे, छे, तुमचे शब्द खरे झालेच पाहिजेत." हा मनुष्य ह्मणाला. व ज्याला टामलीन्सननेंही हा मार्टीनचें प्रेत उकरणारा आहे असें ओळखलें. व त्याबरोबर त्यानें चीस्टरला विचारलें. " हा मनुष्य येथें काय करतो ? "

" मी येथें काय करतों होय ? जें इतर ठिकाणीं करतों तेंच येथें. या सैतान्याला माहीत नाहीं अशी एक तरी गोष्ट आहे का? " तो हांसून बोलला " परंतु चीस्टरच्या कामांत तुह्मीच आहात हें मात्र, जेव्हां तुमची आज गांठ पडली होती तेव्हां मला ठाऊक नव्हतें."

" एकूण तुमची दोघांची ओळख आहे तर ? असा कोणता सुप्रसंग आला होता कीं, तुह्मां दोघांची गाठ एके ठिकाणीं पडली ? " चीस्टरनें हंसून विचारलें.

" आतां मी टामलीन्सनची गुप्त गोष्ट झांकावी कां सर्वांना महशूर करावी, याचा निकाल करणें त्यांच्या कडेच आहे." सैतान्या दारूचा ग्लास झोकीत बोलला.

" जर ठरल्याप्रमाणें तुला मी दोनशे पौंड दिले तर तुझें आणखी काय ह्मणणें आहे ? " टामलीन्सननें विचारलें.

" माझें आणखी ह्मणणें असें आहे कीं, चीस्टरला वचन दिल्याप्रमाणें त्यांचेंही काम करावें. " सैतान्या ह्मणाला.

" त्या कामाशीं तुझा काय संबंध ? तूं तर सांगितलेंच आहेस कीं, मी—"

" मी प्रेत उकऱ्या आहे. परंतु वेळ पडली ह्मणजे मी वेड्याच्या इस्पितळाचा मालकही होतों. "

" काय ? यांची बायको ज्या तुरुंगांत आहे त्या तुरुंगाचे रक्षक तुह्मी आहात? " टामलीन्सननें आश्चर्यपूर्वक विचारलें.

" हो हाच आहे. याचा सारखा रक्षक दुसरा कोठेंही मिळणार नाहीं. आतां तुह्माला समजलें? " चीस्टर म्हणाला.

" टामलीन्सन माझ्याच बरोबर माझ्या घरीं येतील. चीस्टर तुह्मी जरा मागून या. तिघांनीं एकदम जाणें जरा चमत्कारिक दिसेल. " सैतान्या ह्मणाला.

" खरोखर माझी अगदीं खुषी नाहीं. " मिचेलच्या शब्दांची आठवण होऊन टामलीन्सन ह्मणाला.

" हें पहा टामलीन्सन, मी मनांत येईल तें करणारा मनुष्य आहे. मला असला वात्रटपणा आवडत नाहीं. व दुसऱ्यालाही मी करूं देणारा नाहीं. एक माझ्याबरोबर चला तरी—नाहीं तर हा पोलिस बोलावला पहा. मग माझें कांहीं झालें तरी चिंता नाहीं. " सैतान्या ह्मणाला.

" नको—नको—मी तुझ्या पाया पडतों. "

" हा निव्वळ पोरखेळ आहे. " चीस्टर ह्मणाला.

" पण मी तो बंद करीन. कसं काय यायचें का नाहीं ? नाहीं तर तो ह्यातारा मेला ह्मणून समजा. " सैतान्या ह्मणाला.

" बर आहे, मी येतों तुझ्याबरोबर. " नंतर आपल्या मनाशीं ह्मणतोः " पण मी किती जुलमानें जात आहे हें ईश्वराला ठाऊक असेल. "

सैतान्यानें मग त्याला दंडाला धरून बाहेर काढलें, व मागाहून कांहीं वेळानें चीस्टर निघाला.

---

## भाग ११२.

### व्हायेला.

सैतान्या आणि टामलीन्सन कांहीं न बोलतां, त्या घराच्या बाजूच्या

दाराजवळ आण्याला जी गल्ली असे तेथें येऊन **चीस्टरची** वाट पहात उभे राहिले. तेवढ्या वेळांत **टामलीन्सननें सैतान्याची, मिचेल मार्टीन** संबंधानें **चीस्टरला** कांहीं न सांगण्याविषयीं विनंति केली.

**सैतान्यानें**ही त्याला सांगितलें कीं, " मलाही तुरुंगांत जाण्याच्या भीतीनें तशी गोष्ट करतां येत नाहीं. शिवाय माझा धंदा असा आहे कीं, ज्याच्या करितां मी एक काम करीत असतों, त्याला मी दुसरीकडे काय करतों हें मुळींच माहीत नसतें. मग त्याच्याच हातानें तसा प्रसंग आला तर माझा इलाज नाहीं. तुह्मी स्वस्थ असा ह्मणजे झालें. "

असें तो बोलत आहे तोंच **चीस्टर** येऊन थडकला. मग ते तिघेही दाराजवळ जाऊन **सैतान्यानें** दार उघडलें व सर्व आंत गेले.

या ठिकाणची व्यवस्था पूर्वी वर्णन केल्याप्रमाणेंच होती. परंतु हा सर्व स्मशाण देखावा पाहून **टामलीन्सन**च्या मात्र अंगावर काटा आला. त्यानें मग सर्व खोलीभर पहाण्यास सुरवात केली. इतक्यांत **चीस्टरनें** तेथील जिनसा—सोंडाचा मुखवटा, भोंत वगैरे—**सैतान्याच्या** सांगण्यावरून लपवून ठेवल्या. इकडे **टामलीन्सन** खोलींत पाहत असतां त्याची दृष्टी घुराड्याकडे गेली, तों **सैतान्या** चुलीखालचा दगड बाजूला करून आंत उतरलेला—त्याचें अर्धें अंग आंत व अर्धें बाहेर—असा दृष्टीस पडला. हा प्रकार पाहून, पुढें या कामांत पाऊल टाकावें कां नाहीं या विषयीं त्याचें मन साशंक होऊं लागलें, परंतु इतक्यांत **सैतान्यानें** त्याला आपल्या मागून चलण्याविषयीं सांगितल्यामुळें त्याच्या मनांतला हेतु तेथल्या तेथेंच राहिला. असो.

**सैतान्या** हातांत दिवा घेऊन पुढें चालला व हा त्याच्या मागून जिना उतरत होता. प्रथमतः ते एका भुयारांत गेले. हें भुयार सरासरी वीस फूट लांब व चार फूट रुंद असून त्याच्या चोहों बाजूंनीं लोखंडाचे खिळे मारलेले चार भक्कम दारें होतीं. येथें आल्यावर **सैतान्या** त्याला ह्मणाला;—

" प्राचीन काळीं ह्मणजे ज्या वेळेस मनुष्याला आतांप्रमाणें चांगलें मागवीत नव्हते तेव्हां ही जागा वेड्या करितांच असे. परंतु परवांपर्यंत सरासरी तीस वर्षें इचा उपयोग होत नव्हता. "

" ह्मणून आतां तिचा पहिल्याप्रमाणें उपयोग करण्याकरितां तूं ही भाड्यानें घेतली आहेस होय? "

" छे, छे, मी नाहीं. " इतक्यांत **चीस्टरही** खालीं आला.

नंतर सैतान्यानें एका दारानें कुलुप उघडलें. या वेळेला टामलीन्सनची कांहीं विलक्षण स्थिति झाली होती. मी एखादा भयंकर अपराध किंवा कोणाचा खून करतों कीं काय असें त्याला वाटायला लागलें, व त्याच्या अंगाला दरदरून घाम सुटून, तो नख शिखांत कांपूं लागला. कारण, भयंकर अपराध करण्याच्या कामांत तो अद्याप भित्राच होता.

सैतान्या दार उघडून एका घुमटवजा लहानशा खोलींत शिरला. ही खोली जणूं काय कोणाला जिवंत समाधि देण्याकरितांच बनविली होती. यांतल्या यांतच एक लहानसें अंथरूण, एक मेज, एक दिवा, व दुसऱ्या कांहीं जरूरीच्या जिनसा ठेवल्या होत्या; व अंगावर पांघरूण घेऊन अंथरुणावर एक स्त्री निजली होती. हातावर तिनें डोकें टेंकलें होतें, व त्यावरून तिचे सडक केस इकडे तिकडे पसरले होते. ती अगदीं कृश झाली होती, तरी तिची मुद्रा मोहक होती. तिला गाढ निद्रा लागली होती, परंतु ती—एखाद्या फांशीं जाणाऱ्या अपराध्याला मरणाच्या पूर्व दिवशीं रात्रीं जशी अस्वस्थ निद्रा लागते तशी तिला लागली होती. असो.

पोरटर तिला हात धरून उठवणार इतक्यांत ती जागी होऊन, उठून बसली; व त्यांस म्हणाली: " मांगांनो, आतां माझा जीव कां घेणार तुम्ही? "

"छे! प्रिये, सैतान्यानें तुला सांगितल्याप्रमाणें, त्या कामाचा शेवट लावायला आलों आहोंत आम्ही."

" अरे मेल्या ! " असें म्हणून ती टामलीन्सनकडे व सैतान्याकडे संशययुक्त मुद्रेनें पाहूं लागली.

" बाई, माझ्याकडे असें पाहूं नको. मीच कबूल करतों कीं, रोज रात्रीं तुला अन्न आणून देत असतों मी. " सैतान्या म्हणाला.

"अरे चेरा, तूंच का तो, रोज मध्यरात्रीं वेष पालटून येऊन मला नानातऱ्हेनें छळीत असस तो ? " ती चवताळून उठून बोलली.

" हं! खबरदार, एक शब्द बोललीस तर ! मी सर्व विसरेन असें तूं कबूल केलें आहेस. कसं काय ? आपला शब्द खरा करायचा आहे कां नाही ! कां आम्ही जाऊं ?" सैतान्या म्हणाला.

" हे गृहस्थ कोण ?"

" हे दलाल आहेत. तुम्ही कागदावर सही घेण्याकरितां आले आहेत," पोरटरनें उत्तर दिलें.

" मग महाराज !" ती टामलीन्सनला ह्मणूं लागली: " ज्या अर्थी तुम्ही चांगला धंदा चालवीत आहां, त्या अर्थी, या कामांतही तुम्ही चांगलेपणा दाखवा. तुमच्यापुढें एक अनाथ अबला आहे इची कांहीं तरी तुम्हांला दया येऊं द्या. अज्ञानपणानें या राक्षसाशीं मीं लग्न लावलें, व यानें आपल्याहीपेक्षां बेरड अशा दुसऱ्या राक्षसाच्या मदतीनें मला या भयंकर गुहेंत आणून टाकलें. तुम्हाला, मी वेडी आहें असें यांनीं सांगितलें असेल; पण मी वेडी दिसते का हो ! व वेड्या माणसाची सही तुमच्या तरी उपयोगी आहे का ! महाराज, माझ्या पहिल्या नवऱ्यानें दिलेली संपत्ति माझ्यापासून कशी जुलमानें हे लुटून घेतात ती तुम्हीं पाहिलीत ना ? "

" हं. पुरे पुरे ! त्यांना सर्व ठाऊक आहे; व ते माझेंच काम करण्याकरितां येथें आले आहेत. " चोस्टर ह्मणाला.

" महाराज हें खरें आहे का ? प्रतिष्ठितपणाचा धंदा करणारा मनुष्य असल्या बेरड लोकांशीं मिसळेल हें संभवेल तरी का ? छे, छे, असें कधीं होणार नाहीं. "

" मी तुला सांगितलें नाहीं, यांना सर्व ठाऊक आहे ह्मणून? आह्मी कांहीं झाल्या गोष्टीबद्दल पंचाईत करायला आलों नाहीं. तर, आह्माला पुढचें पहायचें आहे. "

" तर मग तुह्मी मला बुचाडणारच ना ? माझ्या नवऱ्यानें वर्षानुवर्षें काबाडकष्ट करून किती हा पैसा मिळविला. तो आतां मातीच्या मोलानें जाणार काय ? महाराज, यांचें ह्मणणें मीं ऐकावें ह्मणून किती तरी प्रकारानें यानें मला छळलें हें तुह्मी ऐकाल तर तुमचें काळीज चर्र होऊन जाईल. प्रत्येक दिवशीं हा वेष पालटून येथें येत असे. याला आजच मी असा पहातें आहें."

" मीं काय केलें तें केलें वस्स! त्याचें आतां काय करायचें आहे ? जर कांहीं निकाल करायचा असेल तर होऊं द्या. नाहीं तर तिला अशीच येथें पडूं द्या. " सैतान्या उद्धटपणानें बोलला

" मग कसं काय करायचें? " चोस्टरनें विचारलें.

" तें आतां या गृहस्थाकडे आहे. " ती टाम्लीन्सनकडे पाहून ह्मणाली.

" या कारागृहांतून सुटका व्हावी अशी माझी फार इच्छा आहे. ह्मणून ह्मणतें महाराज, आपल्या ठिकाणीं थोडासा मोठेपणा असेल, थोडीशी दया असेल, व थोडीशी परोपकारबुद्धि असेल, तर यांच्या दुष्ट बेतांत शिरूं नका."

" हा पोरगळपणा पुरे आतां. इतका वेळपर्यंत मीं ऐकून घेतलें हा माझाच गाढवपणा आहे आधीं! टाम्लीन्सन, तुह्मी इच्यापासून सही करून घेतां का नाहीं? का—" सैतान्या पुढचे शब्द त्याच्या कानांत सांगतो—" त्या ह्मातान्याची वर्दी सरकारांत देऊं ? "

हे शब्द त्याच्या कानांत जादुगाराच्या मंत्राप्रमाणें शिरले. त्यामुळें आपल्या समोर एक दोन झालेली स्त्री आहे हें त्यास दिसेनासें होऊन स्वत:चें पुढचें मरण मूर्तिमंत त्याच्या डोळ्यांपुढें उभें राहिलें. तेव्हां तो हातांत कागद घेऊन मेजाजवळ गेला; आणि ह्मणाला: " या बाईची सही घ्यायला मी हा तयार आहें "

सैतान्यानेंही आपल्या खिशांतून दऊतलेखणी काढून त्याच्यापुढें ठेवली. नंतर टाम्लीन्सननें खुर्चीवर बसून कागद लिहिण्यास सुरुवात केली. " कोणाच्या नांवानें कागद करून घ्यायचा ? " त्यानें विचारलें.

" महाराज, तुमचाही निश्चय झाला तर त्यांना साक्ष करण्याचा ? " तिनें विचारलें.

" बाई, दुर्दैवानें मी यांचा—"

" नको—नको—तुम्हीही जर त्यांच्यासारखे पाषाणहृदयी असलां तर तुमच्या भीं कितीही विनवण्या केल्या तरी काय फायदा आहे? "

" बाई, ईश्वरसाक्ष मी सांगतों कीं, माझा अगदीं नाइलाज आहे! " असें ह्मणून त्यानें हातांतली लेखणी टाकून दिली. परंतु लागलींच सैतान्यानें त्याचें मणगट बळकट धरून, तो त्यास ह्मणाला: " पहा मग, मघां सांगितलें तसें करीन. "

त्या बरोबर फिरून लेखणी उचलून, " कोणाच्या नांवानें कागद करायचा ? " असें त्यानें विचारलें.

" आर्थर चीस्टरच्या नांवानें ? " तिनेंच मोठ्या धिम्मेपणानें सांगितलें.

" किती रक्कम त्याच्या नांवानें द्यायची ? "

" आठ हजार पाऊंड. " तिनें शांतपणानें सांगितलें. पण ही शांति फक्त बाह्यात्कारीं होती, हें सांगणें नकोच.

टाम्लीन्सननें तो कागद मग ठरल्याप्रमाणें सर्व लिहून काढून तिला सांगितलें—पण या वेळेस तिच्याकडे यानें नजरदेखील केली नाहीं—" बाई, हा कागद दोन महिन्यांपूर्वीच्या मित्तीचा आहे हें तुह्मांला ठाऊक आहे ना ?"

तिनें, आहे असें म्हटल्यावर त्यानें त्यावर सही करण्यास सांगितलें. त्याबरोबर ती त्याच्याजवळ गेली; व हातांत लेखणी घेतल्यावर आतां सही करणार इतक्यांत तिला स्मरण होऊन ती म्हणाली: " पण हा कागद करून दिल्यावर खरी माझी सुटका होईल याला प्रमाण काय ? "

" उद्यां रात्रीं तुला घरीं नेऊन पोंचवूं. " चीस्टरनें सांगितलें.

" आणि आतांच कां नाहीं बरं ? " तिनें विचारलें.

" कारण पैसा माझ्या पदरांत अगोदर पडला पाहिजे. "

" हामलीन्सन, या दोघांपेक्षां माझा तुमच्यावरच अधिक विश्वास आहे. कारण, मला असें दिसतें कीं, तुम्ही खुषीनें कांहीं यांच्या मसलतींत पडले नसावेत ; तेव्हां तुम्ही जर मला वचन देत असाल तर उद्यां रात्रीपर्यंत मी येथें राहीन. "

" बाई, मी वचन देऊन सांगतों कीं, तुम्हाला उद्यां रात्रीं खचीत-खचीत तुमच्या घरीं नेऊन पोंचवूं. परंतु तुमच्या जवळूनही एक गोष्ट कबूल करून घ्यावयाची आहे कीं, या गोष्टींतन्यानें एक चकार शब्द बाहेर पडूं नये. "

" हो, त्याला मी कबूल आहें. " ती कृतज्ञतापूर्वक म्हणाली.

" सर्व बाजूंनीं गुप्तता राखणें, हें आजच्या खटल्याचें पहिलें कलम आहे. " चीस्टर म्हणाला.

" आणि जर इनें हें कलम मोडलें तर त्याचा इला पस्तावा होईल कारण, मी तिला सांगून ठेवतों कीं, तिच्या भोंवतीं तिचे स्नेही असोत, किंवा तिच्या-वर संरक्षाचा पहारा असो, किंवा ती राजवाड्यांत जाऊन बसो, तेथून मी तिला हुडकून काढून या कोठडींत फिरून आणून टाकीन. "

" मी तुमच्या आतां हातांत आहें तुम्हाला काय करायचें असेल तें करा झालें. " कागदावर सही केल्यावर ती दीनवाणीनें म्हणाली.

" आम्ही तुला फसवूं, असें तूं मनांत देखील आणूं नकोस. " चीस्टर हंसून म्हणाला.

तिच्या मनांतून त्याला उत्तर द्यावयाचें आलें होतें. परंतु तिनें मोठ्या कष्टानें तें दाबलें. तिनें मनांत विचार केला कीं, आपण यांच्या अद्याप ताब्यांत आहोंत, यांना बोलून जास्ती चिडवून उपयोग नाहीं.

इतका प्रकार झाल्यावर, सैतान्या त्या दोघांना येथेंच सोडून वर गेला. व तेथून पुढच्या चोवीस तासांची अन्न सामुग्री आणून त्यानें तिच्यापुढें ठेवली,

व तिला तो ह्मणाला. "आतां आह्मी जातों. उद्यां रात्रीं तुझी सुटका होईल."

असें म्हणून ते तिघे तेथून निघाले. परंतु दार उघडण्यापूर्वी तिनें फिरून टामलीन्सनला वचनाचें स्मरण ठेवण्याविषयीं आठवण दिली, व त्यानेंही तिची खात्री केली.

नंतर ती आपल्या कोठडींत परत आली, व मागून दार लागलेलें तिनें ऐकलें. तेव्हां ती हात जोडून म्हणाली: "देवा, आतां तरी मला फसविण्याची त्यांना बुद्धि देऊं नकोस!"

पण लागलींच, कदाचित् मला जन्मभर ते या गुहेंत ठेवतील, किंवा माझे राहिलेलेही पैसे माझ्याजवळून बुचाडून घेतील, तेव्हां मला मुक्त करतील, अशी तिला शंका येऊन ती अगदींच निराश होऊन ह्मणाली: "अरेरे! त्या कागदावर म्यां सही केली हा केवढा मूर्खपणा झाला! द्रव्यलोभाच्या इच्छेनें ज्यांनीं दयामाया चटसारी झुगारून देऊन माझ्यावर भयंकर जुलूम चालविला, ते तेवढ्यानेंच संतुष्ट होतील काय? छे, छे, छे—आपला अपराध पूर्णपणें झाकण्याकरितां, माझ्या रक्तानें ते आपले हात भिजविल्याशिवाय कधीं रहायचे नाहींत." ही कल्पना मनांत येऊन ती अंथरुणावर पडून आतिशय रडूं लागली.

बराच वेळ डोळ्यांतून पाणी गेल्यावर, तिचें अंतःकरण हलकें होऊन तिला थोडेंसें बरें वाटूं लागलें. नंतर दुसरी कल्पना तिच्या मनांत आली. टामलीन्सनच्या एकंदर वृत्तीवरून, तो दगा देणार नाहीं असें तिला वाटलें; व त्यामुळें तिची निराशा किंचित् कमी झाली.

याप्रमाणें विचार तिच्या मनांतून येऊन गेल्यावर तिला थकल्यासारखें वाटून तिचें मस्तक भ्रमण करूं लागलें; ह्मणून ती तेथल्यातेथेंच इकडे तिकडे फिरूं लागली. इतक्यांत तिला आठवण झाली कीं, मला खाऊन पुष्कळ वेळ झाला आहे, तेव्हां तिनें मेजाजवळ जाऊन घासभर अन्न पोटांत घातलें व ग्लास भरून दारू घेतली. ती दारू घशाखालीं उतरली नाहीं तोंच तिला घेरी आल्यासारखें होऊन तिच्या हातांतून ग्लास खालीं पडला; व खुर्चीवरून उठून दोन पावलें चालते आहे तोंच, बेशुद्ध होऊन ती बिछान्यावर पडली.

---

## भाग ११३.

### प्रेमपत्रें.

मागील भागांतील गोष्ट घडून आल्यावर त्याच्या दुसरे दिवशीं सकाळीं, रिचर्ड

**मार्खम, कौंट आल्टरोनी**च्या वाड्याच्या मागील भागाच्या शेतांतून घाईनें चालला होता. सरासरी पाव मैलाच्या अंतरावर, त्याच्यापासून **कौंट आल्टरोनी**चा वाडा होता. तो पाहतांच त्यानें एकवार तेथें जे सुखाचे दिवस घालविले होते त्यांचें त्याला स्मरण होऊन त्याच्या तोंडावर औदासिन्याची छाया आली. परंतु समोरून विद्युल्लतेप्रमाणें चमकत येणारी मूर्ति त्याच्या दृष्टीस पडल्याबरोबर, याच्या मनावरील हें क्षणिक पटल तेव्हांच वितळून गेलें.

थोड्या वेळानें, कांहीं दिवसांपूर्वी, ज्या जागेंत याची व **इझाबेले**ची गांठ पडून तिनें याला, कधीं न भंग पावणारें असें आपलें प्रीतिवचन दिलें होतें तेथें तो आला, व थांबून चोहोंकडे पाहूं लागला. इतक्यांत **इझाबेला** जवळ आली.

त्याबरोबर **रिचर्ड**नें धांवत जाऊन एकदम तिला घट्ट आलिंगन दिलें; व त्या आनंदाचा पहिला उमाळा गेल्यावर तो तिला ह्मणाला: " प्रिये, मला आपलें दर्शन देण्याची तुला कोणत्या देवानें बुद्धि दिली ? "

" प्रिया, माझ्या हातून ही अमर्यादा झाली नाहीं ?" त्याचा हात धरून, त्याच्या तोंडाकडे भीतियुक्त दृष्टीनें पाहत तिनें विचारलें.

" जिवलगे, ज्या तुझ्या चांगुलपणामुळें आपल्या भेटीचें सुख मला देण्याची तुला इच्छा उत्पन्न झाली, त्याबद्दल मी दोष देईन असें तुला वाटतें तरी कसें?"

" **रिचर्ड**, सात आठ महिन्यापूर्वी जेव्हां आपली गांठ येथें पडली होती, त्या वेळेस मीं सांगितलें होतें कीं, मी अशी सांदीकोंदीला गांठ घेणार नाहीं ह्मणून. आणि आतां—"

" आतां तूं माझी अशी गांठ घेतलीस, ह्मणून मला आतां असें वाटायला लागलें कीं, जशी माझी प्रीति तुजवर आहे, तशीच तुझीही पण माझ्यावर आहे. याशिवाय दुसरी कोणती कल्पना माझ्या मनांत येणार आहे ? अहाहा ! प्रिये, काल तुझें पत्र पाहून मला जो परमानंद झाला तो कांहीं सांगतां येत नाहीं. तुझें अक्षर मीं तत्काळ ओळखलें, व एकाद्या आहुप्याप्रमाणें मी तें पत्र हातांत धरून बसलों. **इझाबेले**, तुला सांगितलें तर वाईट वाटेल, पण मी सांगतोंच—तें पत्र फोडायला माझा हात कांपूं लागला. ह्मणून मीं तें पत्र खालीं ठेवलें. प्रिये, रागावूं नकोस! माझ्या मनांत असें आलें कीं,—"

" मी तुम्हांला दिलेली शपथ विसरलें ? असेंच तुमच्या मनांत आलें ना?" तिनें विचारलें.

" प्रिये, मी तुला प्रथमच सांगितलें कीं, रागावूं नकोस. मी तरी काय करावें बरें ? मला या जगांत आजपर्यंत इतक्या ठेंचा लागत गेल्या कीं—"

" प्रिया, मागल्या गोष्टीची आतां कशाला बरें आठवण काढतां ?" ती ममतेनें ह्मणाली.

"ज्या अर्थी माझा पुढचा आशातंतु समूळ गळून पडला, त्या अर्थी मागच्या गोष्टी तरी मी कशा विसरेन ? "

" अजून मला आशा आहे, तेव्हां सर्वच आशा नाहींशी झाली असें अद्याप ह्मणतां येत नाहीं. " इझाबेला ह्मणाली.

" प्रिये, वरचेवर तूं माझ्या मनाला धीर देत आहेस, तेव्हां मी किती उतावळा आहे बरें !"

" पण रिचर्ड, तुह्मी पत्रासंबंधानें बोलत होतांना ?"

" हो हो, खरेंच. परंतु मनाला वरचेवर असा हा उद्वेग झाल्या कारणानें गोंधळ होतो. असो. तुझें पत्र माझ्याच्यानें एकदम फोडवेना. आणखीही एखादी दुर्वार्ता कानीं पडायची कीं काय असें माझ्या मनांत आलें. शेवटीं मनाचा धडा करून तें पत्र एकदांचें मीं फोडलें. काय सांगूं प्रिये, मृत्यूची शिक्षा झालेल्या अपराध्यास जसें जीवदान मिळावें, त्याप्रमाणें, तुझ्या पत्राच्या पहिल्या ओळी वाचूनच मला झालें. तुझ्या पत्रांतील शब्दावरून मीं अनुमान केलें कीं, आज या वेळेला तूं मला येथें बोलाविलें आहेस. खरोखर सांगतों. असा आनंद मला कधीं झाला नव्हता."

" तरी मी आपल्या पत्रांत लिहिलें होतें कीं, मला कांहीं महत्वाचें तुमच्याशीं काम आहे. "

" जाऊं देग, केवळ व्यवहारिक गोष्टी आपल्या या प्रेमाच्या कां आड आणतेस ? तुला सांगतों, आपल्या परस्परामध्यें जर ही प्रीति नसती तर आजपर्यंत जे जे प्रसंग माझ्यावर आले आहेत ते माझ्याच्यानें काढवले ना ? "

" रिचर्ड, मघां मी सांगितलेना, मागच्या गोष्टी मनांत आणूं नका ह्मणून ? त्या रात्रीं मला फार—फारच दुःख झालें बरं ! "

" त्या नाटकांत मी आनंदशिखरावर असतांना प्रसिद्धपणें मला तेथून ओढून काढलें, त्या वेळेस होय ? हो, माझ्या दुर्दैवाची सीमा पाहायला त्या दिवशीं तूं तेथें होतीस खरा. "

" आह्मी सहज त्या दिवशीं तेथें आलों. बाबांनीं कोठें ऐकलें होतें कीं,

एक चांगलें नाटक रंगभूमीवर यायचें आहे. तेव्हां त्यांनीं मला व आईला चलण्याविषयीं फार आग्रह केला. मला जरी मंडळींत जाणें आवडत नाहीं, तरी त्यांचें ह्मणणें ऐकणें मला भाग पडलें. ज्या वेळेस लोकांनीं तुह्मांला पुढें आणलें त्या वेळेस,मला किती आनंद झाला असेल–किती आश्चर्य वाटलें असेल याची कल्पना तुह्मीच करा. आणि जेव्हां– पण जाऊं द्या कीं, तो विषयच आपण सोडून देऊं. त्याची आठवण झाली ह्मणजे अंगावर कांटा उभा राहतो."

" बोल, बोल प्रिये, त्या भयंकर प्रसंगाची आठवण करणें ह्मणजे, जखमेवर तापलेलें तेल ओतण्याप्रमाणें जरी आहे, तरी तुझ्या तोंडून हे कळवळ्याचे शब्द ऐकणें मला फारच प्रिय आहे."

" मला आतां कांहीं फार सांगायचें नाहीं. त्या भयंकर मनुष्याचे शब्द, वर्मीं बाण लागल्यासारखे होऊन मी जेथल्या तेथें बेशुद्ध पडलें. तेव्हां रिचर्ड, आईला माझा संशय आला, किंवा तिला जो माझ्याविषयीं संशय होता, त्याची खात्री झाली असें कां ह्मणाना ?"

" तुझें हें असें वर्तन पाहून तिला फार वाईट वाटलें असेल ?"

" छे छे ? ती फारच चांगली आहे वरं. तुमच्या संबंधानें तिचें मन निर्मळ आहे हें मी तुह्मांला पूर्वींच सांगितलें आहे. ती कांहीं फारसें बोलली नाहीं. पण बाबा मात्र—"

" त्यांनीं तर माझ्यावर वर्षाव केला असेल नाहीं ?" रिचर्डनें विचारलें.

" दुसरे दिवशीं जेव्हां ते याबद्दल माझ्याशीं बोलायला आले त्या वेळेस ते शांत होते. मी मग उघड उघड काय होतें तें त्यांना सांगितलें."

" मग ते काय ह्मणाले ? अगदीं अक्षरशः सांग; एक शब्द सुद्धां ठेवूं नकोस."

" त्यांनीं मला फारच रडवलें." तिच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा चालून ती बोलली. " पण प्रिया, जी गोष्ट सांगून तुह्मांला व मला, दोघांनाही जर दुःख होत आहे तर काय करायचें आहे? मी इतकें सांगतें ह्मणजे झालें–कीं मला जितकें बोलतां आलें तितकें मी बोललें. आणि शेवटीं मी तो कागद –तो टालब्राटची कबुली–त्यांना दाखविला. इतकेंच करून मी राहिलें नाहीं तर, त्यांना निर्भीडपणानें असें देखील सांगितलें कीं, ज्यानें तुमची सुटका केली–ज्यानें तुमच्या तुरुंगाचीं दारें मोकळीं केलीं–व ज्यानें तुह्मांला मोठ्या उदार मनानें मदत केली ते दुसरे कोणी नसून रिचर्ड मार्खमच आहेत !"

" इझाबेले, हें सुद्धां तूं सांगितलेंस ना ? आणि तें तर तुला ठाऊकही नव्हतें. "

" पण माझी बहुतेक खात्रीच होती. **रिचर्ड**, जर कधीं तुमच्याविषयीं, माझी प्रीति क्षणभर डळमळली असेल—जर कधीं, या जगांतल्या मोह पाडणाऱ्या इतर गोष्टी मनांत येऊन तुह्मांला मी जें वचन दिलें आहे त्याविषयीं मला पश्चाताप झाला असेल तर—माझ्या बापाला दुःखमुक्त करण्याकरितां, तुह्मीं उदार मनानें आपल्या संपत्तीवर पाणी सोडून जें औदार्य दाखविलें आहे तें पाहूनच माझें मन आजन्म तुमचें झालें आहे. "

" अहाहा ! प्रिये, ही वेळ माझ्या आयुष्यांतील अतिशय सुखाची समजली पाहिजे. "

" आणखी सांगतें **रिचर्ड**, जर कधीं माझ्या मनांत, तुमचा व माझा वियोग कधींही व्हायचा नाहीं असें आलें असलें—जर कधीं माझ्या बापाच्या राजकीय मोठेपणापासून वैभवसुख भोगण्याची मी इच्छा केली असेल—"

हे तिचे शब्द ऐकून **रिचर्डनें** जो आपला हात तिच्या अंगावर टाकला होता तो काढून आपण मागें सरून तिला ह्मणतो: "**इझाबेले**, या तुझ्या बोलण्याचा अर्थ मी कांहीं समजलों नाहीं. "

" या बोलण्याचा अर्थ इतकाच **रिचर्ड**, कीं, यापुढें तुमच्या माझ्यामध्यें कांहीं गुह्य असूं नये. आजपर्यंत पुष्कळ वेळां माझ्या मनांत आलें, तें तुह्मांला सांगून टाकावें ह्मणून—माझ्या बाबांनींही अजून तें कोणालाच कळविलें नाहीं—परंतु मी तें आतां तुह्मांला सांगतेंच—कीं, ज्यांना सर्व लोक **कौन्ट आल्ट्रोनो** असें समजतात ते **मांटोनीचे राजपुत्र आलबर्टो** आहेत !"

ही बातमी ऐकून **मार्खमची** कांहीं विलक्षण प्रकारची स्थिति झाली. प्रखर रामीच्या तापामध्यें मनुष्य अगून, त्यावर जशी एकदम वर्फवृष्टि व्हावी त्याप्रमाणें त्याला झालें. त्याचें मस्तक भ्रमण करूं लागलें—डोळ्यांपुढें अंधेरी आली—व आतां घेरी येऊन तो पडणार इतक्यांत **इझाबेलेनें** पुढें जाऊन त्याला धरलें, व ती ह्मणाली: " प्रिया—माझी प्रीति तुह्मावर किती आहे, याच्यावर तुमचा मुळींच भरंवसा नाहींना ? "

तिच्या मुखांतून हे गोड व ममतेचे शब्द निघाल्याबरोबर तो सावध होऊन ह्मणतो: " **इझाबेले**, तुझा व माझा संबंध तोडण्याकरितां केवढी भयंकर अडचण मध्यें आली ही ? "

" आणखी प्रिया–जर ही अडचण तुम्हाला कळली नसती, तर ती आतांपेक्षां तुम्हांला कमी भयंकर वाटली असती काय ! "

" मला तर असेंच वाटतें! तूं इतक्या श्रेष्ठ पदाला पोंचली आहेस कीं, त्याला स्पर्श करण्याची मी कधींही आशा करूं नये. अरेरे ! कांहीं दिवसांनीं जिच्या मस्तकावर छत्रचामरें ढळणार अशा एका राजकन्येकडे महत्वाकांक्षेनें पाहण्याचें मीं धाडस केलें, केवढा माझा प्रमाद हा ! परंतु मी ज्या मोहांत पडलों होतों तो मोह नाहींसा होऊन, मोठ्या स्वप्नांतून मनुष्य जसा जागा होतो तसा आतां मी देहभानावर आलों आहें. परंतु हे राजकन्ये, माझें एक तुला विचारणें आहे. जो आशावृक्ष मी आपल्या अंतःकरणांत लावून ठेवला आहे याचा तावडतोब समूळ उच्छेद करावा ह्मणून आजची ही वार्ता तूं मला सांगितलीस काय ?"

" **रिचर्ड**, माझी तुह्माला परीक्षा झाली नाहीं हो–खरोखर परीक्षा झाली नाहीं." तिला रडूं येऊन ती बोलली.

" प्रिये, असें असेल तर क्षमा कर. मी अगदीं वेडा झालों आहे. मीं काय बोलतों तें माझें मलाच समजत नाहीं."

" पूर्वी जेव्हां आपली येथें गांठ पडली होती, त्या वेळेस देखील तुम्हाला माझ्या मनाचा असाच संशय आला होता. किती वेळां बरं माझ्या अंतःकरणाची कसोटी पहायची ? अद्याप संशय घेणें पुरें नाहीं कां झालें? "

" प्रिये मी एकदां ह्मणालों ना कीं, क्षमा कर ह्मणून ? मी पदर पसरून मागतों—"

" बरं तर, मी तें विसरतें, मग तर झालें? पण माझ्याकारितां प्रिया, आतां तुह्मी शांत व्हाल ना? " असें ह्मणून तिनें त्याच्या तोंडाकडे प्रेमदृष्टीनें पाहिलें.

" **इझाबेले**, मी आतां शांत झालों. "

" आतां **रिचर्ड**, पत्रांत, तुमच्याशीं मला कांहीं काम आहे म्हणून मी ह्मटलें होतें, तें काम कोणतें तें सांगतें. मी जेव्हां बाबांना सांगितलें कीं, तुमची सुटका करणारे **मार्खम**शिवाय कोणी नाहीं, तेव्हां ते म्हणाले ' अरेरे, किती तरी चांगल्या मनाचा मनुष्य आहे तो. मीं विनाकारण त्या चोरीविषयीं त्याचा संशय घेऊन त्याला दुखविलें.' हे मीं त्यांचेच शब्द सांगितले आहेत. "

" प्रिये, मला सर्व सांग. तर मग आतां यापुढें त्यांच्या मनांत त्याविषयीं कांहीं संशय राहिला नाहीं ना ? "

" जो मनुष्य चोरी करील तोच, त्यांच्या सुटकेकरितां दोन हजार पाऊंड खर्च करील, हें त्यांना कसें खरें वाटेल ? त्या गोष्टीविषयीं आतां त्यांच्या मनांत कांहीं नाहीं. असेंच जर दुसऱ्या गोष्टीविषयींही त्यांचें मन निर्मळ होईल तर आणखी काय पाहिजे ? "

" हं मी समजलों. त्यांचें ह्मणणें कीं, जो कैदेसारखी नीच शिक्षा भोगून त्यांच्या कन्येचें पाणिग्रहण करण्याची इच्छा करतो, त्याच्याशीं पुन्हां संबंध ठेवण्याला ते खुषी नाहींत, असेंचना ? "

" होय रिचर्ड, असा त्यांचा दुराग्रह झाला आहे खरा. " आपले डोळे पुसून ती ह्मणाली: " तथापि, आपण आशा करीत असावें. यांतल्या यांत एक गोष्ट चांगली झाली आहे कीं, तुह्मी अपराधी नसून दुर्दैवानें तुमच्यावरं प्रसंग आले होते असें त्यांना आतां वाटायलां लागलें आहे. ही मोठी अडचण दूर झाल्यासारखी झाली. आणि माझी आई तर तुमचा नेहमीच पक्ष घेत असते.— तरी तिच्याही मोठेपणासंबंधाच्या समजुती—"

" त्याचेंच तर मला थोडेंसें भय वाटतें. "

"भिण्याचें कांहीं कारण नाहीं.चांगल्या गोष्टीची आपण आशा करीत असावी."

" हो, मी तसेंच करीन वरं. " रिचर्ड ह्मणाला.

" असो. मी आपली हकिकत आतां पुरी करून टाकतें. माझ्या बाबांचा असा निश्चय होता कीं, सवड झाल्याबरोबर तुह्मी उदार मनानें जे पैसे त्यांना उपयोगीं पडण्याकरितां पुढें केले होते, ते तावडतोब तुमचे तुह्मास परत करायचे. तो समय आतां आला आहे. कारण, नुक्ताच मांटोनीच्या ड्यूक महाराजांनीं त्यांना सालीना दहा हजार पौंडांची नेमणूक व शिवाय रोख वीस हजार पौंडांची देणगी देण्याचा ठराव केला आहे. या देणगिवर राज प्रकरणीं कोणतीही अट लागू केली नसून, ती फक्त आमची तिकडची मालमत्ता जप्त केल्यामुळें जी आमची नुकसानी झालेली आहे ती भरून देण्याच्याच हेतूनें दिली, ह्मणून आमच्या बाबांनींही ती स्वकारली. तिकडून हुकूम येण्याचीच ते वाट पहात होते. शेवटीं काल त्यांनीं हें पत्र, " एक मोहोरबंद केलेला लखोटा तिनें आपल्या चोळींतून काढला, " एका चाकराच्या स्वाधीन करून त्याला टपालांत नेऊन टाकण्याविषयीं सांगितलें, तें पत्र मी स्वतः तुमच्या हातांत द्यावें—व तुह्माला ही वार्ताही कळवावी या उद्देशानें मीं त्यांच्याजवळून कोणाला न सांगतां पुन्हां मागून घेतलें, तें हें घ्या. "

" इझाबेले, तुझ्या बापाला प्रसंगीं उपयोगीं पडावी ह्मणून मीं जी त्या वेळेला यथाशक्ति मदत केली, ती परत करण्याची दैवयोगानें त्यांना शक्ति आली ह्मणूनच मी हें पत्र—आंतल्या बावीसुद्धां तुझ्यापासून घेत आहें. शिवाय, हें पत्र देण्याच्या हेतूनें ज्या अर्थी तुझ्या दर्शनाचा मला लाभ झाला आहे—या-अर्थी याचें मोल या वेळेला मला त्याच्या मूळ किंमतीहून दहा हजार पटीनें जास्त वाटत आहे. "

" प्रिया, मला एवढेंच सांगायचें होतें. तें मला सर्व पत्रांत लिहितां येईना ह्मणून मीं ही तजवीज योजली—हो कदाचित् अमर्यादपणाचीही असेल. "

" फिरून ते शब्द कां वर काढतेस ? ' माझी तुमच्यावर प्रीति आहे ' असें तूच मला सांगतेस; आणि तुझी पुनरपि गांठ पडल्यानें—तुझ्याशीं दोन शब्द मला बोलण्यास सांपडल्यानें—व तुझें एकवार आलिंगनसुख घेतल्यानें नें माझ्या मनाला सुख वाटत आहे त्याबद्दल तुला खेद होतो काय ? आणि आशामुखामध्यें मी जरी आहें तरी वरचेवर आतां फिरून तुझी गांठ केंव्हां पडेल, हे विचार मनांत येतच आहेत. "

" आजपर्यंत जशी कांहीं प्रसंगानें आपली गांठ पडली तशी पुढेंही पडेल. आपणां गरिबांची दया ईश्वराला आलीच पाहिजे. "

" परंतु तुझ्या आईचे व बापाचे, पदवी, मोठेपणा इत्यादि संबंधानें जे दुराग्रह आहेत त्यांपुढें माझ्यासारख्या दीन मनुष्यानें आशा करायला कोठें जागा आहे ? एका स्वतंत्र व बलाढ्य राष्ट्राच्या राजकन्येचें पाणिग्रहण कर-ण्याचें मीं मनांत तरी कसें आणावें ? "

" असें कां ह्मणतां बरें ? इलिझा विडनेनें मांटोनीच्या महाराजांना वरलें कां नाहीं ? "

" हो हो. आतां माझ्या लक्षांत आलें. आणि तीही माझ्याप्रमाणेंच हत-भागी असून, तिच्यावरही दुस्तर कारागृहवास भोगण्याचा प्रसंग आला होता. झालें तर मग, हा शकूनच आहे असें मी समजतों. " इतकें बोलून रिचर्डच्या तोंडावर आनंदाची मुरखाई आली. नंतर तो पुन्हां बोलूं लागला:—

" अहाहा ! जर कधीं माझ्या मनांतली गोष्ट घडून आली—जर कधीं माझ्यासारख्या सामान्य आणि अप्रसिद्ध मनुष्याचा राजकुळांत जन्मलेल्या मुलीशीं संबंध जुळून आला—तर मला किती—किती धन्य वाटेल बरें ! स्वतः माझ्याविषयीं ह्मणशील तर मला या जगांतील ऐश्वर्याची मोठीशी आकांक्षा

आहे असा प्रकार मुळींच नाहीं. कारण, तुझा जरी अगदीं सामान्य कुळांत जन्म झाला असता तरी माझी तुजवर याप्रमाणेंच भक्ति राहिली असती ; व त्यांत मला याहून विशेष सुखही झालें असतें. कारण, आपल्या सुखामध्यें व्यत्यय आणण्याकरितां आतां ज्या गोष्टी उत्पन्न झाल्या आहेत, त्या तरी मग झाल्या नसत्या. ''

''रिचर्ड, आणखी एक तुह्माला सांगून ठेवतें. तुमच्या प्रीतीला मी योग्य आहें असें ज्या दिवशीं मला वाटेल तोच दिवस माझ्या पूर्ण सुखाचा आहे असें मी समजेन. माझे बाबा गादीचे वारस होवोत किंवा न होवोत, त्यांची जी संपत्ति मला मिळणार आहे, तिचा जर मला कधीं आनंद होत असेल—आमच्या कुटुंबाच्या मोठेपणासंबंधानें जर मला कधीं गर्व वाटत असेल—व माझा बाप कधीं तरी राजाच्या पदवीला पोंचेल अशी मी आशा धरीत असेन—तर तो आनंद, तो गर्व व ती आशा हीं फक्त तुमच्याचकरितां आहेत असें समजा. तुमच्याप्रमाणेंच मलाही या राजवैभवाची पर्वा आहे असें नाहीं. परंतु तें मिळून, 'रिचर्ड, माझें सर्व वैभव हें तुमचें आहे, याचा तुह्मी उपभोग घ्या' असें ह्मणण्याचा ज्या दिवशीं प्रसंग येईल, तो दिवस मला दसपट सुखाचा वाटेल! कारण, येथल्याप्रमाणें आमच्या इकडे वहिवाट नाहीं. तिकडे राजकन्या ज्याला वरते त्यालाही राजवैभवाचा अधिकार मिळत असतो. असें झाल्यावर मग प्रियकरा, कोणाची छाती आहे तुमचें मन दुखविण्याची! मला माझ्या भावी वैभवाचा जो आनंद होत आहे त्याचें कारण हें कीं—तो तुमच्याच करितां आहे! ''

''अहाहा! सुंदरी, तुझ्यावर मी कितीही ममता केली—प्रीति केली—लक्ष ठेवलें— तरी तुझ्या प्रीतीचे माझ्यावर जे उपकार आहेत ते कधींही फिटावयाचे नाहींत! ''

'' तुमच्या मनाचा उदारपणा जर मला कळला नसता तर तुमच्यावर याप्रमाणें मीं प्रीति केली असती असें तुह्माला वाटतें का? दुर्दैवानें तुमच्याजवळ संपत्ति नाहीं हें मला ठाऊक आहे. तरी, माझ्या बापाला मुक्त करण्याकरितां उदार मनानें तुह्मी आपली मोठी नुकसानी केली, हे तुमचे गुण मी कधीं तरी विसरेन? आणि तुह्मी माझे उपकार फेडण्याबद्दल बोलत आहां; पण तुमचे माझ्यावर किती उपकार आहेत बरं? ''

अशा प्रकारचें संभाषण झाल्यावर तीं दोघें न बोलतां त्या भागांत बराच

वेळ फिरलीं. प्रत्येकजण आपापल्या विचारांत निमग्न झाला. शेवटीं **इझाबेलेनें** आपल्या प्रियकराला, मला आतां गेलें पाहिजे, असें सांगून, त्याला प्रेमपूर्वक आलिंगन देऊन त्याचा निरोप घेतला.

**रिचर्ड** ती दृष्टीआड होईपर्यंत तिच्याकडे पहात होता. शेवटीं ती आपल्या बागेंत शिरून दिसेनाशी झाली, तसें त्यानें आपलें पाऊल मागें घेऊन घराचा मार्ग धरला.

---

# भाग ११४.

## पत्रांतील विषय.

**आलबर्टोनीं** आपली राजकीय पदवी झांकण्याकरितां, हद्दपार होऊन ते **इंग्लंड**मध्यें येऊन राहिल्यावर आपल्याला **कौन्ट आलटरोनी** असें नांव लावून घेतलें होतें. हें नांव **इटली**मधल्या त्यांच्या जाहगिरीचें असून, ती जाहगीर त्यांच्या इतर दौलतीबरोबर त्यांचे चुलते जे **ड्यूक महाराज** यांच्या हुकमानें जप्त झाली होती. **आलबर्टोंना** हद्दपार होण्याचें कारण असें झालें कीं, राज्यांत अतिशयच अंदाधुंदी झाल्यामुळें, प्रजेची स्थिति सुधारण्याकरितां यांनीं पुढाकार घेऊन, राज्यांत, लोकसत्तात्मकता स्थापण्याकरितां जो एक पक्ष उपस्थित झाला होता, त्याचें पुरस्कर्तृत्वही आपणाकडे घेतलें होतें. त्यामुळें, यांच्या चुलत्याची मर्जी खप्पा होऊन, त्यांनीं व दरबारांतल्या जुन्या मंडळींनीं यांना हद्दपार केलें होतें.

यांच्या मंडळींनीं यांना लढाईला उभे राहण्याविषयीं देखील सल्ला दिली होती; व देशांत चोंहोंकडे स्थानिकस्वातंत्र्याला अनुकूल अशा सभाही भरूं लागल्या होत्या; परंतु शस्त्रास्त्रें उभारून आपली जन्मभूमि रक्तानें भिजविण्यापेक्षां, आपण देशत्याग करून, अज्ञातवास केलेला बरा, असा त्यांनीं निश्चय केला. त्यांचें मन इतकें थोर असे कीं, देशांत स्वास्थ्य ठेवण्याकरितां आपली पाहिजे ती नुकसान कशी करावी हें त्यांना माहीत असे.

म्हणून त्यांनीं **लंडन**मध्यें आल्यावर आपल्या स्थितीला शोभेल असें नांव स्वीकारलें. त्यांना ठाऊक होतें कीं, मी जर खऱ्या नांवानें येथें राहीन तर माझ्याप्रमाणेंच तिकडून हद्दपार होऊन येणाऱ्या सरदारांना माझ्या घरीं येण्यास मज्जाव करतां येणार नाहीं. आणि शस्त्रांचा उपयोगानें देशकल्याण करणारांना

आपल्या घरांत जमवून गादी चालविणाऱ्या राजाविरुद्ध धडधडीत बंड उपस्थित करण्यास तर ते बिलकूल खुषी नव्हते. ह्मणून त्यांनीं आपल्या मित्रांना व साह्यकर्त्यांना कळवून ठेवलें होतें कीं, माझ्या जन्मभूमीला स्वतंत्रता मिळेपावेतों मी अज्ञातवासांत आयुष्य घालविण्याचा विचार केला आहे.

ही यांची गुह्य गोष्ट, यांचे परम स्नेही **अर्ल वरिंगटन, आर्मस्ट्रांग व ट्रिमार्डीन** वगैरे इंग्लिश सरदारांना माहीत होती; व ती त्यांनीं मोठ्या काळजीनें गुप्त ठेवली होती. **आर्मस्ट्रांग**नें **रिचर्ड मार्खम**ची व यांची जेव्हां ओळख घालून दिली तेव्हां त्यानें **मार्खम**लादेखील ही गोष्ट कळविली नाहीं; व **अर्ल वरिंगटन**नीं **एलिझा सिडने**करितां पत्रें मागून घेतलीं, व त्यांचा कसा उपयोग झाला तो आमच्या वाचकांना ठाऊकच आहे. परंतु जिच्याकरितां **अर्ल**नीं पत्रें मागितलीं व ज्यांनीं तीं दिलीं, त्यांच्या व मागणारांच्या, या पत्रांचा परिणाम विलक्षण होऊन तिच्या स्थितींत एवढा फरक पडेल हें स्वप्नींदेखील नव्हतें.

एका मुद्द्यासंबंधानें पूर्वी आह्मीं विशेष खुलाशानें कळविलेंच आहे कीं, **आलबर्टो**ला गादी मिळण्याचा संभव, आतां केवळ, ३ ऱ्या **अंजेलो**चा हा जो नुकताच विवाह झाला, यापासून होणाऱ्या संततीवर अवलंबून आहे. ह्मणून हा विवाह झाला नाहीं तोंच, **मांटोनी** संस्थानच्या परराष्ट्रीय मंत्र्यानें, **इंग्लंड**च्या दरबारांत असलेल्या आपल्या वकिलाकडून राजपुत्र **आलबर्टो**शीं नेमणुकीचें बोलणें लावलें होतें; व या नेमणुकीशीं राज्यप्रकरणीं कांहीं अट न ठेवल्यामुळें त्यांनींही तीं नेमणूक कबूल केली. **मांटोनी**च्या वर्तमानपत्रांत तर असें ह्मटलें होतें कीं, ही नेमणूक **महाराणी**नेंच कांहीं मंत्रिमंडळीच्या सल्ल्यानें **ड्यूक महाराजां**कडून देवविली. याप्रमाणें आमच्या नायिकेच्या बापाच्या खऱ्या स्थितीची हकीकत आहे. असो.

**इझाबेला** गेल्यावर **मार्खम** घराकडे निघाला हें आमच्या वाचकांना ठाऊक आहेच. तिनें याच्या हातांत दिलेला लखोटा फोडून पाहण्याविषयीं हा फार आतुर झाला होता. ही आतुरता पैशाच्या हेतूनें नसून, तिच्या बापाकडून आपल्याला दोन बोटें तरी चिठ्ठी आली आहे कां नाहीं, हें पाहण्याकरितां असे.

घरीं येतां क्षणींच त्यानें तो लखोटा फोडून पाहिला. तों, त्यांत एक पत्र व एक नोट होती. ती तशीच जमिनीवर पडूं देऊन त्यानें पुढील पत्र अगोदर वाचण्यास सुरवात केली:—

" तुम्हीं जे माझ्यावर उपकार केले आहेत ते मला बोलून दाखवितां येत नाहींत. ऐन अडचणीच्या वेळीं, मला उपयोगी पडेल अशी व तुमच्या थोर स्वभावाला शोभती-ल अशी तुम्ही जी रक्कम माझ्याकरितां खर्च केली, ती मी आज कृतज्ञतापूर्वक परत करीत आहें. कांहीं प्रसंगानें, तुम्हाला दुःखकारक असे तुमच्या संबधानें मीं संशय बाळगले होते, त्याचा आतां मला फारच खेद होत आहे. त्या वेळेला प्रसंग असे चमत्कारिक रीतीनें जळून आले कीं, तेथें दुसरे विचारच मनांत येईनात. परंतु त्या वेळेला मी जें बाललों असेन किंवा, जें माझ्या हातून झालें असेल त्याबद्दल मी तुमची मनःपूर्वक क्षमा मागतों.

"आतां दुसऱ्या एका गोष्टीसंबंधानें मला सांगायाचें आहे. ज्या कागदावरून तुमचें निरपराधित्व सिद्ध होत आहे तो कागद हातीस पडून तुमच्या निरपराधित्वाबद्दल माझी खात्री झाली आहे. परंतु माझ्या मुलीवर तुमचा लोभ जडला असून, तो परस्पर आहे, असें माझ्या समजण्यांत आलें आहे. परंतु तो तुम्हां दोघांचीही निराशा केल्या-वांचून राहणार नाहीं. एवढ्याकारितां तो विकार तुम्ही आपल्या अंतःकरणांतून समूळ काढून टाकावा; व जी माझी एकुलती एक मुलगी असून--तुमची पत्नी होण्याचा जिला मुळीच--मुळींच संभव नाहीं, तिच्या मनाच्या स्वास्थ्याकरितां तिला भेटण्याचें मनांत आणूं नये असें माझें तुम्हांला विनंतीपूर्वक मागणें आहे. माझें निक्षून तुम्हांला सांगणें आहे कीं, तुम्हीं तिचें नांव सोडावें. कारण, मध्यें तुम्हांला न कळविण्यासारख्या अशा कांहीं गोष्टी आहेत कीं, तुम्हा उभयतांचा संगम जुळून येणें अगदीं अशक्य आहे. मित्रत्वाच्या नात्यानें मी हें तुम्हाला सांगत आहें. तुमचें थोरपण, या माझ्या सांगण्याला कसा मान द्यावा, हें तुम्हाला सांगेलच.

" तुम्ही पूर्वीप्रमाणें सधन नाहीं हें मला चांगलें माहीत आहे. पैशाच्या संबंधानें ईश्वरानें माझी काळजी नुकतीच दूर केली आहे. जेव्हां मी अडचणींत होतों त्या वेळेस तुम्ही मला साह्य केलें आहे, तर तुम्हाला यथाशक्ति मदत करण्याला तुम्ही मला-ही संधि द्यावी. कारितां या सोबत पाठविलेल्या वस्तूचा उपयोग तुम्हां आपल्या विलक्षण बुद्धिसामर्थ्यानें चांगलाच कराल अशी माझी खात्री आहे. हें मी तुमचे उपकार फेडण्याकारितां करीत आहे असें बिलकूल समजूं नये. तुमचे माझ्यावर असे अगणित उपकार आहेत कीं, मी आजन्म तुमचा ऋणी आहें. परंतु मित्रभावानें मी आपली पिशवी तुमच्यापुढें करीत आहें. तिचा तुम्ही वाटेल तो उपयोग करून सवडीप्रमाणें माझे पैसे परत द्यावेत. हे पाठविलेले पैसे तुमचा हेतु साधण्याला अपुरे आहेत असें तुम्हाला वाटलें तर मला कळविण्याला आळस करूं नका.

" सध्यां मी थांबतों. जगामध्यें तुमचा उत्कर्ष पाहून ज्याला विशेष आनंद होईल

असा कोणी आहे असें तुम्हाला वाटत असेल तर तो तुमचा हितेच्छु मित्र

" आल्टरोनीच. "

पत्र वाचून झाल्यावर **मार्खम**नें ती नोट उचलली. तों ती पांच हजार पाऊंडांची होती. परंतु त्यानें आपले तेवढे पैसे घेऊन बाकीचे परत करण्यांचा निश्चय केला.

**कौन्ट**नीं **इझाबेले**बद्दल जरी निक्षून लिहिलें होतें, तरी त्याची निराशा न होतां त्याला आशाच उत्पन्न झाली. नंतर त्यानें **कौन्टला** पत्र लिहिलें:—

" आपल्या पत्राबद्दल आपले फार फार आभार आहेत. माझ्या निरपराधित्वाबद्दल आपली खात्री झाली हें पाहून मला किती आनंद होत आहे तो व्यक्त करून दाखवितां येत नाहीं. "

" आपल्या कन्येला पुनरपि मी न भेटण्याविषयीं जी आपली इच्छा आहे ती शिरसावंद्य आहे. आतां माझ्या अंतःकरणांत तिच्याविषयीं जो लोभ वसत आहे तो नाहींसा करण्यास आपण सांगत आहां, पण तें करण्याचें आतां मानवी शक्तीच्या बाहेरचें आहे.

" आपल्याला मी जें अल्पसें साह्य केलें तें परत करण्याचेंच नुसतें नव्हे—पण माझी ढांसळलेली द्रव्यरूप इमारत पुन्हां बांधण्यास उत्तेजन देण्याचें सामर्थ्य आपल्यास आलें आहे असें आपल्या पत्रावरून समजतें, तें पाहून मला अत्यानंद होत आहे. परंतु महाराज, आपल्या या मेहेरबानीचा उपयोग करण्याला मी अगदीं असमर्थ आहें. कारण, एकवार मला जो कलंक लागला आहे तो, पुनरपि मला चांगल्या मार्गानें या जगांत डोकें कधींही वर काढूं द्यायचा नाहीं. शिवाय, माझ्यापुरतें मला यथास्थित आहे. तेव्हां एका अर्थानें मी सधनच म्हटलें पाहिजे. एवढ्याकरितां आपण कृपा करून केलेल्या मदतीचा मीं फायदा करून घेतला नाहीं, तर त्याचा आपण रोष मानूं नये. ती मदत, जरी नुसत्या प्रेमभावानें केलेली आहे तरी ती मला नाकारणें भाग आहे. म्हणून अतिशय कृतज्ञतापूर्वक आपली मदत मी परत करतों. तरी वेळ पडल्यास आपल्या औदार्याचा उपयोग करण्यास मी कधीं अनमान करावयाचा नाहीं हें आपण ध्यानांत ठेवावें.

" शेवटीं, आपलें व आपल्या कुटुंबाचें सदैव अभीष्ट असो, असें चिंतून हा लेख संपवितों.

" महाराजांचा कृतज्ञ आणि इमानीसेवक

" **रिचर्ड मार्खम.** "

या पत्राचा झोंक जरा आवरून धरला होता. बाह्यात्कारीं जरी त्यानें ज्यांना

पत्र लिहावयाचें त्यांच्या खऱ्या मोठेपणाविषयीं अज्ञान दाखविलें होतें, तरी लिहितांना, मी हें पत्र **मांटोनी**च्या राजकुलांतल्या एका गृहस्थाला लिहीत आहें, हें तो विसरला नव्हता.

---

# भाग ११५.

## खजीना—नवी कल्पना.

अरेरे ! स्त्रीपुरुषांच्या प्रेमविषयक मनोहर गोष्टी सोडून आह्मांला, दुराचण आणि भयंकर अपराध यांकडे जाणें भाग पडावें ना ! परंतु जगाचें रहाटगाडगें हें असेंच चालत असतें. कोणत्याही सत्यनिष्ठ इतिहासकाराची त्याला सोडून चालण्याची छाती नाहीं.

या कथारूप चित्रपटावर अद्याप पुष्कळ भयानक, उदास व भयंकर असे भाग दाखवावयाचे आहेत. तथापि, वाचकांच्या नेत्राला विश्रांति मिळण्याकरितां मधून मधून आनंदकारक व मनोहर देखावेही कांहीं कमी नाहींत असें आह्मी वचन देतों. असो.

मागील दोन भागांतला प्रकार घडून आला त्या दिवशीं संध्याकाळीं ह्मणजे **व्हायोलेनें** आपल्या नवऱ्याला अर्धी संपत्ति देण्याकरितां सही दिली त्याच्या दुसरे दिवशीं—पांच वाजतां **सैतान्या** आपल्या घरीं आला. परंतु प्रथमतः तो तळमजल्यावर जाऊन तेथून भुयारांत गेला; व तेथें गेल्यावर ज्या खोलींत **व्हायोलेला** ठेवली होती तिच्या समोरची दुसरी एक खोली त्यानें उघडली. ही खोली मोकळीच होती.

या खोलींत आल्यावर त्यानें जमिनीवरचा एक दगड बाजूला केला, व सरासरी एक हात लांब रुंद बळदांतून त्यानें कातड्याची एक पिशवी काढली. ती वर काढली तशी तिच्यांतून नाणें असल्याचा आवाज निघाला. नंतर खालीं बसून त्यानें ती पिशवी आपल्या टोपींत ओतली. व त्या खजिन्याकडे पाहून त्याचे डोळे दिपून गेले.

" दोनशें पौंड—सोनेरी नाणें—तर झालें. याकरितां मला किती अचाट गोष्टी कराव्या लागल्या. त्यांत आणखी हे **टामलीन**कडून मिळालेले शंभर. **बफरचा** वाटा त्यानें घेतलाच. पण तो तेव्हांच उधळून टाकील. आतांशा मी पुष्कळ काटकसर करीत असतों. ह्मातारपणाकरितां राखून ठेवायचा माझा

विचार आहे, पण–" इतक्यांत त्याच्या मनांत कल्पना आली कीं, माझ्या अशा आचरणामुळें न्यायदेवतेच्या भक्ष्यस्थानीं मध्येंच केव्हां तरी मला पडावें लागेल.

आजच्या आज त्याच्याजवळ सहाशें पाऊंड झाले. पहिले दोनशें, **टामलीन्सन**चे शंभर व **चीस्टर**नें आपल्या कामाबद्दल दिले ते तीनशें, मिळून सहाशें पाऊंड त्याच्याजवळ झाले. हे तो पिशवींत भरून ठेवीत आहे, इतक्यांत पावलांचा शब्द ऐकून तो चपापला, व कान देऊन ऐकूं लागला. परंतु पुन्हां तो शब्द त्यानें ऐकला नाहीं. तेव्हां तो उठून बाहेर आला, आणि पाहतो तों सर्व सामसूम होतें. मग त्याची त्यालाच लाज वाटून तो परत खोलींत गेला, व आपली संपत्ति पहिल्याप्रमाणें झांकून ठेवून बाहेर आला.

नंतर तो **व्हायोला** ज्या गुहेंत होती तेथें आला, व पाहतो तों दिवा विझून जाऊन ती अंथरूणावर झोंप घेत पडली होती. तिला पाहून तो ह्मणतो; " ठीक आहे. अंमल बराच आला आहे. आतां हिला इच्या घरीं नेण्यास सोयीचें होईल. ही **चीस्टर**ची युक्ति. बरं आहे तर. निजूं द्या इला. रात्रीं नऊ वाजतां **चीस्टर** आणि **टामलीन** येऊन तिला घेऊन जातील."

असा तो विचार करीत आहे, इतक्यांत त्याला एक नवी कल्पना सुचली. आजपर्यंत त्यानें **चीस्टर**चें काम केलें. आतां स्वतःसंबंधानेंच कांहीं उपयोग झाला तर पहावा असें त्याला वाटूं लागलें. तिचे आठ हजार पौंड गेले होतें, व अजून तितकेच शिलक आहेत. ते सर्व, किंवा त्यांतला कांहीं भाग तरी आपल्याला मिळावा असें त्याच्या मनांत आलें. आजपर्यंत तिला ज्या रीतीनें वागविलें, त्या योगानें आठ हजार पाऊंड निघाले. तर आणखीही थोडासा त्रास देऊन ज्यास्ती निघायाचे नाहींत काय ? हे विचार सुचल्याबरोबर, ही कल्पना पूर्वींच कशी नाहीं माझ्या मनांत आली ? असें त्यास वाटून त्यानें आपल्याला फार दोष लावून घेतला.

जसा जसा हा विचार त्याच्या मनांत शिरे, तसा तसा तो त्याला अधिक प्रिय वाटे. त्याला पक्कें ठाऊक होतें कीं, **चीस्टर** किंवा **टामलीन** कोणीही माझ्या वेताआड येण्यास समर्थ नाहींत. शेवटीं तो एकदम मोठ्यानें ओरडून ह्मणाला " देवाशपथ ! आपण तें करणारच !"

तेथून तो बंदोबस्त करून वर आला, तों **मार्गारेट** जेवणाची तयारी करीत आहेशी त्यानें पाहिली. तेव्हां तो तिला ह्मणाला: " **मेग**, आज मला भक

नाहीं. पण थोडीशी दारू घ्यावीशी वाटते. ती मी पितों आणि मग तूं माझ्याजवळ येऊन गोष्टी सांगत बैस."

"ठीक आहे **टानी**, आज तुह्मी अगदीं खुषींत आहांत नाहीं बर?" नित्यापेक्षांही लाडीगोडीनें तिनें विचारलें.

"आज मी तसेंच काम केलें आहे. ह्मणून रात्रीं नऊ वाजेपर्यंत आतां चैन करायची. मग दोन गृहस्थ माझ्याकडे यायचे आहेत कांहीं कामाला."

"**टानी**, तुह्मी काय करीत असतां हें मला कधींच सांगत नाहीं, असें का बरें?"

"मला बायकांवर फाजील विश्वास टाकणें आवडत नाहीं. किरकोळ गोष्टी मी सांगतोंच; पण महत्वाच्या—छे, कधीं नाहीं सांगायचा."

"बरं, जशी तुमची मर्जी असेल तसें." असें ह्मणून ती स्वस्थ राहिली. जणूं काय त्याच्या शब्दानें तिचें समाधान झालें.

"हं **मेग**, जेवळ येऊन गाणें ह्मणत बैस. मी आज फारच खुषींत आहें. पण—नको, गाणें नको. तुझी हकिकत सांग. ती मीं पूर्वी ऐकली आहे; पण माझ्या चांगलीशी लक्ष्यांत नाहीं. ती पुन्हां ऐकूं दे."

कोणतीही गोष्ट त्यानें सांगितलेली ही ऐकत असे. शिवाय, या वेळेला त्याला अगदीं खुषींत ठेवण्यांत तिचा कांहीं हेतूही होता. तेव्हां त्यानें हुकूम केल्याबरोबर ती आपली हकीकत सांगूं लागली. ती आह्मी सारांशानें देतों.

---

# भाग ११६.

## मार्गारेटची हकीकत.

हिचा जन्म कोळशाच्या खाणींत झाला होता. हिची आई कोळशाच्या खाणींत काम करीत असल्यामुळें इचें लहानपण बहुतेक त्यांतच गेलें. व तिला बाहेरचा वाराही ठाऊक झाला नाहीं. सरासरी ही सात वर्षांची झाली तसें इच्या आईनें इला खाणींत कामाला लावलें. या खाणींत काम करायचें ह्मणजे जिवावरचें काम असे. ही खाणी ह्मणजे एक प्रकारची खोल गुहाच. इच्यांत काम करणाऱ्या मजुरांचे सर्व व्यवहार बहुतेक इच्यांतच होत असत. या खाणींत उतरण्याचढण्याची व्यवस्था अशी केली असे कीं, विहिरीप्रमाणें इच्या वरच्या बाजूला एक रहाट असून त्याला एक लांब दोर लावलेला असे. व

त्या दोराच्या शेवटाला सरासरी तीन फूट लांब असा लोखंडाचा दांडा तराजूच्या दांड्याप्रमाणें मधोमध बांधून, त्या दांड्याच्याही दोन्ही टोकाला कोळशाच्या पाट्या वर घेण्याकरितां लोखंडाच्या सांखळ्या लोंबत असत. मनुष्यांना वर चढायचें झालें किंवा खालीं उतरायचें झालें तर दोन मनुष्यांनीं दांड्याच्या दोन बाजूनां बसून मधला दोर धरून चढावें किंवा उतरावें. रहाटाचें चाक ओढण्याकरितां वर एक बाई बसविलेली असे. व इच्याच हातांत बहुतकरून मनुष्यांना चढवितां-उतरवितांना त्यांच्या जिवाचें रक्षण करायचें असें, म्हटलें तरी चिंता नाहीं. असो.

सरासरी बारा वर्षांची होई तोंपर्यंत इनें खाणींत काम केलें. परंतु तोंपर्यंत तिला अन्य गोष्टींचें ज्ञान म्हणून झालें नाहीं. केवळ रानटी स्थितींत ती वाढली. इचीच म्हणजे अशा प्रकारची स्थिति होती, असें नाहीं. सर्वांची हीच स्थिति. सर्व प्रकारांनीं ते गदळ असावयाचे. त्यांनीं तरी काय करावें ? उजाडलें नाहीं तों खाणींत काम करण्याकरितां जें जावयाचें तें संध्याकाळ होऊन बरीच वेळ गेल्यावर परत यायचें. मग फक्त रात्रींच्या सातआठ तासाकरितांच स्वच्छता बाळगून त्यांना काय करायचें असतें. आणि अशा स्थितींत त्यांनीं इतर गोष्टी पहाण्यात कशा व शिकाव्यात तरी केव्हां ? असो.

ती बारा वर्षांची झाली तेव्हां तिनें ती खाणी सोडण्याचा निश्चय केला. व एके दिवशीं, ती आईला न विचारतां तेथून निघाली. या वेळेला तिच्याजवळ कांहीं नव्हतें, फक्त उपासमारापासून रक्षण करण्याकरितां थोडेसे भाकरीचे तुकडे मात्र होते. सरासरी तीन कोस लांब गेली असेल तों ती चालून चालून दमून गेली. व थंडीनेंही अतिशय कांकडून जाऊन रात्रींच्या पुरता कोठें तरी आश्रय मिळेल तर बरें होईल असें तिला वाटूं लागलें. शेवटीं चालतां चालतां एकेठिकाणीं तिच्या दृष्टीस दिव्याचा प्रकाश पडला, तेव्हां तिनें, जवळ जाऊन पाहिलें तों तो विस्तवाचा जाळ असून, त्याच्याजवळ एक पंधरा वर्षांचा मुलगा, अंगावर नुसत्या चिंध्या आहेत, अगदीं घाणेरडा व उपासमार झालेला असा—तिच्या दृष्टीस पडला. तिनें त्याच्याजवळ जाऊन, मला शेकूं देतोस कां ? म्हणून विचारलें व त्यानेंही दयाळूपणानें तिला आपल्याजवळ बसूं दिलें. नंतर त्यांनीं एकमेकांना आपली हकीकत सांगितली, त्याला आईबाप कोणी नव्हते. जन्मापासून तो मजूरखान्यांतच होता. परंतु हा आठ वर्षांचा झाला तसा, तेथील मालकानें यालाही कोळशाच्या खाणींत कामाला लावलें. याचें नांव सिलोग, परंतु त्याच्या शरीराच्या बारीकपणावरून त्याला शेकाट्यासी म्हणत

असत. ज्या खाणींत हा काम करीत असे, तेथें याला फारच वाईट रीतीनें वागवीत असत. परंतु तितकेंही त्यानें सात वर्षें सोसलें. शेवटीं त्यानें तेथून पळ काढून बाहेरचा रस्ता धरला. सरासरी महिनाभर जें मिळेल तें खाऊन त्यानें भटकत दिवस काढले. तों इची गाठ पडली. दोघांची स्थिति सारखी, दोघांजवळही पैसा नाहीं. तेव्हां त्यांनीं चोरी करून पोट भरण्याचा निश्चय केला.

शेवटीं त्यानें एक चोरी करून, कांहीं जिन्नस इच्या जवळ विकण्याकरितां दिले. ती हे जिन्नस घेऊन एका दुकानदाराकडे गेली. त्याला इचा संशय आल्यावरून त्यानें इला सरकारांत गुदरली. तेथें इनें, तुरुंगांत गेल्याव खायाला तरी मिळेल, या हेतूनें मींच ही चोरी केली असें सांगितलें. परंतु इतक्यांत, **सिलीग** तेथें हजर होऊन त्यानें आपला अपराध कबूल केला. त्यामुळें त्याला थोडीशी शिक्षा झाली व इला सोडून दिलें. पुढें एकानें इच्यावर दया करून इची चांगली सोय लाऊन दिली. तेथें ही असतांना आई मेल्याची बातमी इला कळली. एके दिवशीं ही बाहेरून येत असतां वाटेंत इची व **सिलीग**ची गांठ पडून त्यानें इला आपल्या जवळ राहण्याविषयीं गोष्ट काढली. इनेंही ती कबूल करून—"

## भाग ११७.

### मार्गारेट.

या प्रमाणें ती आपली हकीकत सांगत आहे, तोंच **सैतान्या**ला खुर्चीवरच झोंप लागली. **सैतान्या**चा आपल्या झोपेवर इतका कांहीं अम्मल असे कीं, केव्हांही जरी तो निजला तरी एक तासापूर्वी फिरून सावध व्हायचाच असा त्याचा नियम असे. तेव्हां याला झोंप लागलेली तिनें जशी पाहिली, तसें आतां एक क्षण देखील दवडून उपयोगी नाहीं असा तिनें विचार करून ती जाग्यावरून उठली व पुन्हां एकवार त्याला खरी झोंप लागली आहे कीं नाहीं याविषयीं खात्रीं करून घेऊन, ती आपल्या बरोबर किल्या व काड्याची पेटी घेऊन घराबाहेर पडली.

जर **सैतान्या** मध्येंच जागा झाला व मी तेथें नाहीं असें त्यानें पाहिलें तर मग पळभर देखील माझ्या जिवाची आशा नको हें तिला पक्कें ठाऊक होतें; तरी ज्या निश्चयानें ती घरांतून बाहेर पडली, तो इतका विलक्षण होता कीं—ती अगदीं अनावार झाली. असो.

पुढें मग कांहीं विचार न करतां तिनें दार उघडलें. व आंतून पक्का बंदोबस्त करून, ती तळमजल्याच्या मागल्या खोलींत गेली. तेथें तिनें दिवा लावला, तें भुयाराचें दार बाजूला केलें, व निर्भयपणानें जिना उतरून ती खालीं गेली.

नंतर ज्या खोलींत सैतान्यानें आपलें द्रव्य पुरलें होतें त्या खोलींत ती गेली, व त्या बळदावरचा दगड बाजूला करून मघाशीं पाहिली थैली तिनें आपल्या हस्तगत करून घेतली. पुन्हां तो दगड जेथल्या तेथें तिनें ठेवला व मागें परतून आतां चालू लागणार इतक्यांत, ज्या दाराच्या उंबरठ्यावर ही उभी होती त्याच्या समोरच्या दाराच्या फटींतून दिव्याचा उजेड इच्या दृष्टीस पडला. त्या बरोबर-सैतान्याचें रात्रीं बे रात्रीं या ठिकाणीं येणें, खाण्याचे पदार्थ, एक्या प्रसंगीं या गुहेंतून निघालेली तिनें ऐकलेली आरोळी इत्यादि गोष्टी तिच्या मनांत येऊन आंत कोणी मनुष्य असावें कीं नसावें या बद्दल तिच्या मनात संशय राहिला नाहीं. कोणी तरी स्त्री आंत कोंडली आहे अशी तिची पक्की खात्री झाली.

आंत कोण आहे तें पाहवें या हेतूनें व कदाचित् सैतान्या आलाच तर आंतल्या मनुष्यापासून आपल्यास साह्य मिळावें किंवा आंत जें कोणी असेल त्याला तरी आपण साह्य करावें या हेतूनें तिनें एकदम तें दार उघडलें. याबरोबर व्हायोला चपापून सावध झाली व अंथरुणावरून उठून तिनें विचारलें. " मी कोठें आहें ? "

" हं बोलूं नका ! माझ्या मागून या म्हणजे झालें. भिण्याचें कांहीं कारण नाहीं. " असें म्हणून मार्गारेट तेथून निघाली.व तिच्या मागून व्हायोला चालूं लागली. खालचीं दारें न लावतां त्या मग तशाच वर आल्या. या वेळेला मार्गारेटच्या अंगाचा इतका थरकांप होत होता कीं, दारापाशीं आल्यावर कुलुपाची किल्ली देखील तिच्या हातून फिरे ना. त्या बरोबर ती फारच घाबरून म्हणाली. " अरे देवा ! इतक्यांत जर तो आला तर माझें कसें होईल ! " असें जों ती बोलत आहे, तों तिला वाटलें कीं, कोणाचीं तरी पावलें ऐकूं येत आहेत, म्हणून व्हायोला कान देऊन ऐकूं लागली; परंतु तिला कांहीं ऐकूं आलें नाहीं. तेव्हां हा नुसता भास झाला असें म्हणून तिनें दाराला तीच किल्ली लावली व दार उघडून त्या बाहेर आल्या.

नंतर व्हायोला पुढें व मार्गारेट मागें अशा त्या पळत सुटल्या. आपण

कोणत्या दिशेला जात आहों याचाही त्यांनीं विचार केला नाहीं. त्यांना असें वाटलें कीं, **सैतान्या** जणूं खरोखरींच आपल्या मागून येत आहे. पहिलीनें दुसरी कोण आहे, इचा विचार केला नाहीं, व दुसरीनें पहिली या गुहेंत कशी आली, का आली याची चौकशी केली नाहीं. दोघींना आपला जीव रक्षण करण्याचा मार्ग फक्त दिसत होता. शेवटीं त्या एका रस्त्यावर आल्या व जरी त्यांना अद्याप **सैतान्या** येण्याची भीति होती तरी अगदीं दमून गेल्यामुळें त्या क्षणभर तेथें थांबल्या. शेवटीं " आतां तुह्मी कोठें जाणार ? " असें **मार्गारेट**नें विचारलें.

" माझें घर येथून जवळच आहे. पण तुह्मीं कोठें जाणार ! जर तुह्मी माझ्या बरोबर आलांत आणि माझ्या येथें—"

" छे छे, मी कोण आहे हें तुह्माला ठाऊक असतें तर तुह्मी आपलें एवढें थोर मन केलें नसतें."

" असें का बर ह्मणतां? त्या कारागृहांतून तुह्मी नाहीं माझी सुटका केलीत? हें जरी खरें आहे कीं, आज माझी सुटका करण्याचें त्यांनीं मला वचन दिलें होतें, तरी त्यांच्यावर कितपत भरवंसा ठेवावा हें मला ठाऊक आहे."

" बाई, तुह्माला तुरुंगांत ठेऊन आतां कांहीं फायदा नाहीं अशी त्यांची खात्री झाल्याशिवाय, त्यांनीं तुह्माला कधीं सोडलें नसतें हें पक्कें लक्ष्यांत ठेवा."

" असो. त्याबद्दल मग बोलूं, पण माझ्या घरापर्यंत तरी तुह्मी चला."

" बरं आहे. मी तुह्माला घरीं पोंचवीन, आणि मग मी जाईन. " असें ह्मणून त्या दोघी **व्हायोले**च्या घरापर्यंत आल्या. **व्हायोले**नें पुन्हां एकवार **मार्गारेट**ला आपल्या घरीं राहण्याविषयीं आग्रह केला. परंतु तिला या शहरांत राहणें निर्भय नसल्यामुळें तिनें इचें ह्मणणें मान्य केलें. नाहीं शेवटीं ती इचा निरोप घेऊन निघून गेली.

इकडे **व्हायोला** घरांत आल्यावर इला पाहून इच्या चाकराला फार आश्चर्य वाटलें; परंतु इनें घरांत शिरल्याबरोबर अगोदर दार बळकट लावून बंदोबस्त करण्यास चाकरांस सांगितलें. पुढें त्यांच्याकडून इला कळलें कीं, **फॉस्टर** आज सकाळींच आपलें सर्व सामान घेऊन घर सोडून गेला. ही बातमी ऐकून तिला एक उपाधि गेल्याप्रमाणें वाटून तिनें दुसऱ्याच दिवशीं भरवस्तीच्या ठिकाणीं जाऊन राहण्याचा निश्चय केला.

# भाग ११८.

## दोन मैत्रिणी.

मागील भागांतली गोष्ट घडून आल्यानंतर सुमारें दहा दिवसांनीं सकाळीं दोन तरुण स्त्रिया **कौन्ट आल्टशेनी**च्या ( ते आपलें खरें नांव प्रसिद्ध करतील तोंपर्यंत आपण त्यांस हेंच नांव देऊं.) घराजवळच्या रस्त्यावरून हिंडत होत्या.

या दोघींच्या सौंदर्यांत एक प्रकारचा विलक्षण विरोध नजरेस पडत असे. एकीचा वर्ण सांवळा—तर दुसरीचा शुभ्र; एकीच्या मुखावर आरक्ततेची सुरखाई—तर दुसरी केवळ संगमरवरी शिळेची मूर्तीच; पहिली उदार व थोर मनाची व दुसरी मोकळ्या मनाची व निष्कपटी; एकीचा बांधा गोंडस—व दुसरी नाजूक आणि कृश; एकीचें सौंदर्य नेत्र दिपविणारें—तर दुसरीचें मोह पाडणारें; आणि एकीचा जन्म **इटली**च्या ऊष्ण हवेंत, तर दुसरीचा **इंग्लंड**च्या एका बेटांत.

परंतु **मेरी—अॅन**च्या तोंडावर पूर्ण औदासिन्याची छाया पसरली होती. तिची पहिली सानंदवृत्ति व अल्लडपणा हीं मावळून जाऊन त्यांच्या ठिकाणीं खिन्नता आली होती. तिची पूर्वीची हास्यमुद्रा बदलून ती चिंता व काळजीग्रस्त आहे अशी दिसे. तिच्या वयाला सोळा वर्षें सरून जरी कांहीं महिनेच झाले होते, तरी संतत विचारानें, काळजीनें आणि दुःखानें तिच्या मनाच्या ठिकाणीं बरीच प्रगल्भता आली होती. **रिचर्ड मार्खम** इच्या भावांना ज्या वेळेस शिकवायला जात होता तेव्हांचा इचा तो अचपळपणा, इची आनंदवृत्ति, व इचा चंचळपणा हीं सर्व नाहींशीं होऊन, इची वृत्ति इतकी कांहीं शांत, खिन्न, व गंभीर झाली होती कीं, तिच्या वयाचा विचार मनांत आणला ह्मणजे ती तिला शोभत नसे. एखादी गुलाबाची कळी उमलून तिचें फूल होण्यापूर्वीच तिला आंतल्याआंत कीड लागून जसा तिचा नाश व्हावा, त्याप्रमाणें या तरुणीच्या कोमल अंतःकरणाला कीड लागली होती. आणि हीं सर्व लक्षणें व या सर्व भावना जों जों **इझाबेले**च्या सशक्ततेशीं, व नवयौवनाशीं मिळवून पाहिल्या जात, तों तों तीं लक्षणें, व त्या भावना अधिक व्यक्त होत.

दोघींच्याही मनाला प्रीतीचा संस्कार होता. परंतु एकीला मुळींच आशा नव्हती, व दुसरी आपल्या प्रीतीरूप वृक्षाची अंतःकरणपूर्वक जोपासना करून होती.

पण या दोघींची ओळख कशी झाली ? हें कदाचित् त्यांच्या संभाषणावरून आपल्याला समजेल.

प्रथमतः **मेरी** ह्मणते: " बाई, आपली ओळख होऊन सारे आठच दिवस झाले. पण जसें कांहीं देवानेंच तुह्माला माझ्या जिवाची मैत्रिण पाठविली असें मला वाटतें. "

" सहजा सहजींच आपली ओळख झाली. पण पहिल्या प्रसंगींच माझें मन तुमच्याकडे ओढलें. एखाद्या वेळेला असा प्रकार घडून येतो कीं, त्या प्रसंगामुळें, दोन मनुष्यांची थोड्या आवकाशांत जितकी दृढ मैत्री बनते, तितकी इतर कारणामुळें पुष्कळ वर्षांतही होत नाहीं."

" अगदीं माझ्या मनांतली गोष्ट तुह्मी बोललात. तुमचा हा चांगूलपणा पाहून मला असें वाटतें कीं, तुमची मी मैत्री संपादन करावी. "

" तुमच्या स्नेहाला मी पात्र आहे असें तुह्माला वाटत असेल तर ती अगोदरच झाली आहे. आतां तुमचें दुःख जरी मला दूर करतां येत नाहीं तरी, तें पाहून माझें मन फार कळवतें. "

" हें तुह्माला कसें समजलें कीं, माझें मन फार दुःखी आहे ह्मणून ? "

" मी सांगतें कसें तें. एके दिवशीं तुह्मी आपल्या बापाबरोबर घोड्यावर बसून या रस्त्यानें चालला होता. त्या वेळेस मी आपल्या खोलींत होतें. तरी तितक्या अंतरावरून तुह्मांला पाहतांच माझें मन तुमच्याकडे ओढलें. तुह्मी माझ्या दृष्टीच्या अगदीं पार होईपर्यंत मी तुमच्याकडे पहात होतें. व तुह्मी गेल्यावर देखील तुह्मी कोण असावेत याबद्दल मी विचार करीत होतें. शेवटीं तुह्मी परत आलात. पुढें तुमचा घोडा तुफान होऊन तुह्मी आमच्याच घरापुढें खालीं पडला. त्याबरोबर मी धांवत खालीं येऊन, चांकरास हाका मारल्या. व तुमच्याजवळ येऊन पाहतें तों तुह्मी बेशुद्ध होऊन पडला होता, व तुमच्या बापानें तुह्माला उचलून धरलें होतें. ते अगदीं घाबरून जाऊन तुमची आतां मुळींच आशा नाहीं असें त्यांना वाटूं लागलें; परंतु तुमच्यांत जीव असल्याबद्दल मी त्यांची खात्री केली. आणि चाकरांना सांगून तुह्माला माझ्या बिछान्यावर नेऊन निजविलें. पुढें जसें जसें तुह्मी बोलूं चालूं लागलात तसें माझें चित्त तुमच्याकडे फारच ओढूं लागलें. शेवटीं, बाबानें तुमच्या वडलाला, तुमची प्रकृति चांगली वरी होईपर्यंत येथेंच राहूं द्या असें जेव्हां सांगितलें तेव्हां खरो- खर मला फारच आनंद झाला. पुढें मला लागलीच कळून आलें कीं, तुमच्या

मनाला कांहीं तरी दुःख आहे. क्षणोक्षणीं बदलणारी तुमची वृत्ति, व तुमची चिंताक्रांत मुद्रा पाहून मी आपल्या मनाला प्रश्न करी कीं, असल्या सुंदर स्त्रीला इतक्यांतच दुःखाचा संसर्ग होण्याला असें कोणतें कारण असावें ? त्या दिवसापासून तुमच्याबद्दल मला फार फार वाईट वाटत आहे. कारण मलाही दुःखाचा अनुभव आहेच. ''

" अहाहा ! तुमच्या या प्रेमाची माझ्याकडून कधीं देखील फेड व्हायची नाहीं. मला असें वाटतें कीं, माझें सर्व दुःख मी जर तुह्मांला उघडें करून दाखवीन तर मला फार सुख होईल. पण माझ्या मनांत असेंही येतें कीं, कदाचित् तुह्मी मला मूर्ख ह्मणाल, अविचारी ह्मणाल. "

" प्रसंगी मनुष्याच्या हातून मूर्खपणा होतो, परंतु माझी पक्की खात्री आहे कीं, अविचार तुमच्या हातून कधीं व्हायचा नाहीं. "

" जी कधीं सफळ व्हायची नाहीं अशी आशा मनांत बाळगणें अविचारच नाहीं तर काय ! ज्याची प्रीति आपणावर नाहीं, त्यावर प्रीति करणें हा अविचारच आहे. "

" छे छे, याला अविचार ह्मणतां येत नाहीं. कारण मनावर अम्मल करण्याची कोणाची शक्ति आहे? "

" तर मग प्रीतीसंबंधानें तुमचें अंतःकरण कांहीं अजाण नाहीं ?" मेरीनें तिच्याकडे पाहून विचारलें.

" मी जर तुमच्यापासून कांहीं चोरून ठेवीन तर तुमच्या विश्वासाला मी पात्र नाहीं असें होईल. तर मी आतां उघड करून सांगतें कीं, ज्याच्या शिवाय दुसऱ्याचें उदार मन सांपडणार नाहीं, अशा एकाला मी आपलें वचन दिलें आहे. परंतु आमचा संबंध जुळून येण्याला मध्यें कांहीं आडचणी आहेत.आणि मला असें देखील वाटतें कीं,त्या कधींही नाहींशा होणाऱ्या नाहींत."

" खरोखरच, तुमची ही हकीकत ऐकून मला फार वाईट वाटतें. परंतु तितक्यांत मला आनंदही होत आहे कीं, तुह्मी आपलें मन माझ्याजवळ मोकळें केलें. व त्यामुळें माझ्या मनावरचें ओझें दूर करण्याला मला आतां धीर येत आहे."

" मेरी, तुह्मांला वाटेल तें माझ्याजवळ मोकळें मन करून सांगा. माझ्या हातून दुसरें कांहीं झालें नाहीं तरी, होतां होईल तितकें मी तुमचें समाधान तरी करीन. "

" बरें तर मी आतां सर्व सांगतें. मी तुह्मांला पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, मला दोन भाऊ आहेत. कांहीं दिवसांमागें, ते घरींच अभ्यास करीत होते. त्यांच्याकरितां माझ्या बापानें एक शिक्षक ठेवला. तो शिक्षक पूर्वीं कायमचा श्रीमंत होता, परंतु पुढें त्याला फार वाईट दिवस आले. जेव्हां प्रथम मला कळलें कीं, माझ्या भावांकरितां एक शिक्षक ठेवला तेव्हां मला असें वाटलें कीं, कोणी तरी ह्मातारा, गदळ, तिरसट मनुष्य पाहिला असेल, परंतु जेव्हां तो तरुण, देखणा, सभ्य आहे असा मी पाहिला तेव्हां मला फारच चमत्कार वाटला. अरेरे ! ज्या दिवशीं तो आमच्या येथें आला त्या दिवशीं कोण वेळ होती कोणाला ठाऊक ! दिवसेंदिवस त्याचा मला फारच नाद लागून तो नसला ह्मणजे चैन पडूं नये. तो असला ह्मणजे मला, फार आनंद व्हावा. व त्याच्या पाठीमागें, तो असा बोलला, त्यानें असें पाहिलें, तो असा हंसला, या गोष्टी माझ्या मनांत घोळत. याप्रमाणें कांहीं दिवस लोटले. एके दिवशीं माझ्या बापानें, कांहीं दिवस मुलांना विश्रांति देण्याचा आपला विचार कळविला. तें ऐकून मला वाईट वाटलें. व त्याप्रमाणें मी बोलूनहीं दाखविलें. "

यापुढें ती मार्थमच्या येथें गेली, व तेथें त्याचें तिचें झालेलें संभाषण तिनें अक्षरशः इझाबेलेला सांगितलें. त्यावर इझाबेला ह्मणाली: " येथें मात्र, तुह्मी त्यांच्याकडे गेल्यानें तुमच्या हातून अविचार झाला असें ह्मणावें लागतें. परंतु ज्याचें मन थोर आहे, त्याला तुमची ही स्थिति पाहून वाईटच वाटेल. तो कधीं तुह्मांला दोष द्यायचा नाहीं. "

" पुढें कित्येक दिवस माझ्या मनाला स्वस्थता कशी ती ठाऊक नव्हती. मी कसे दिवस काढले ते माझे मलाच ठाऊक ! मी रात्रंदिवस देवाजवळ प्रार्थना करी, देवा माझ्या मानसिक वेदना दूर करून पहिल्याप्रमाणें माझ्या मनाला स्वस्थता दे. शेवटीं बापानें एके दिवशीं, अगोदर न कळवितां एकदम मला कांहीं दिवस राहण्याकरितां ह्मणून एका स्नेह्याच्या येथें पाठविलें. प्रथमतः माझ्या मनांत जायचें नव्हतें, पण मींच विचार केला कीं, थोरपालट केल्यानें मनांतलि दुःखाचा विसर तरी पडेल. असो. कांहीं दिवस गेल्यावर मी परत आलें, तों मला कळलें कीं, शिक्षकाला बंद केला आहे. मग, मला एकदम दुसऱ्या ठिकाणीं धाडण्यांत व त्यालाही बंद करण्यांत त्यांचा कांहीं हेतु होता कीं काय हें मला ठाऊक नाहीं. त्याप्रमाणेंच मी परत आल्यावर जेणें

कडून माझ्या मनाला करमणूक होईल असें करण्यांत त्यांना कांहीं कारण आढळलें कीं काय हेंही मला माहीत नाहीं. ते मला सुख वाटविण्याचा प्रयत्न करूं लागले एवढें मात्र खरें. त्यांनीं मला लागेल तो जिन्नस पुरवावा, नाटकाला, गाण्याला घेऊन जावें, तऱ्हेतऱ्हेचीं पुस्तकें, चित्रें पुरवावींत ; परंतु माझ्या अंतःकरणांत त्या शिक्षकाची मूर्ति जी डांबून बसली होती ती कांहीं केल्यानें ढळेना. तथापि मी आपल्या बापाच्या इच्छेप्रमाणें करमणुक करी. एके दिवशीं मी त्याच्याबरोबर नाटकाला गेलें. तें नाटक फारच प्रेक्षणीय होतें. त्यांतली नायिका आपल्या प्रीतीच्या निराशेचें वर्णन करीत होती. तिचें भाषण मी लक्ष्यपूर्वक ऐकूं लागलें. जसें जसें तिचें भाषण भरांत आलें तसें तिच्या भाषणांत आणि माझ्या स्थितींत मला साम्य दिसूं लागलें. शेवटीं नाटकावरचें माझें लक्ष्य उडून मी विचारांत निमग्न झालें. इतक्यांत नाटक संपून, ग्रंथकार, नाटकांतील नायिकेला हातीं धरून रंगभूमीवर आला. तो मी पाहतें तों तो दुसरा कोणी नसून माझ्या भावांचा शिक्षक होता. ''

" काय शिक्षक होता ! " **इझाबेलेनें** आश्चर्यानें विचारलें.

" हो. ज्याच्यावर माझें मन बसलें होतें तो होता. "

" त्याचें नांव काय बरं ? "

" त्याचें नांव सांगण्याला कांहीं हरकत नाहीं. कदाचित् **रिचर्ड मार्खमचें** नांव तुह्मी ऐकलेंही नसेल ? "

" अरेरे दुर्दैवी बिचारी !" किंचित्ही मत्सर मनांत न आणतां, **इझाबेलला** वाईट वाटून ती ह्मणाली: " आतां सर्व उघड करून सांगण्याची माझी पाळी आली आहे. पण मी आतां जें सांगणार आहे, त्या योगानें तुमच्या दुःखाचें शमन न होतां उलट ज्यावर तुह्मी प्रीति करतां त्याचें मन दुसरीवर आहे याबद्दल तुमची ज्यास्ती खात्री मात्र होईल."

" तुमचें बोलणें मला कांहीं नाहीं समजलें. उघड करून सांगा. "

" बरं तर मी सांगतेंच आतां कीं, **रिचर्ड मार्खमवरच** माझ्या सर्व सुखाची आशा असून, त्यांना मी ' तुमच्याशिवाय कोणाला वरणार नाहीं ' अशी शफत देऊनही ठेवली आहे."

" अहाहा ! त्यांच्या प्रीतीचें स्थान तुम्ही आहात काय ? **इझाबेला** बाई ज्यावर तुह्मी प्रीति करतां, त्यावरच मीही मन ठेवलें या बद्दल तुह्मी क्षमा करा बरं! "

" छे— छे— छे; असें ह्मणूं नका. तुमची ही स्थिति पाहून मला फारच वाईट वाटतें. मी तुह्माला सांगून ठेवतें कीं, तुमच्या माझ्या स्नेहांत कोणतीही मत्तरबुद्धि व्यत्यय आणणार नाहीं." इझाबेला ह्मणाली.

" तुमचें मन तसेंच थोर आहे. व मीही तुह्माला सांगतें कीं, हें वर्तमान ऐकून जरी मला थोडेंसें वाईट वाटलें असलें, तरी तुह्माला योग्य अशा पुरुषाशीं तुमचा संबंध घडणार आहे या गोष्टीचा मला अत्यानंद होत आहे. त्याच्या विरुद्ध लोक काय पाहिजे तें ह्मणोत, परंतु तो तुमच्या प्रीतीला योग्य पुरुष आहे यांत कांहीं शंका नाहीं."

" त्या रात्रीं त्या भयंकर मनुष्यानें त्यांच्यावर जो आरोप केला त्या प्रमाणें ते अपराधी नाहींत ती गोष्ट जरी लांब आहे तरी मी तुह्माला सांगतेंच." असें ह्मणून तिनें आपल्या मैत्रीणीला मार्स्टनच्या दुर्दैवाची सर्व हकीकत सांगितली. मेरीनेंही ती हकीकत लक्ष्य देऊन ऐकिली. शेवटीं इझाबेलेनें जेव्हां आपली हकीकत संपविली तेव्हां ती ह्मणाली:—

" मला वाटलेंच, तो सर्वगुणसंपन्न असावा ह्मणून!"

नंतर दोघीही कांहीं वेळ स्तब्ध राहिल्या. शेवटीं मेरी ह्मणाली: " तुह्मा दोघांचा संगम होईपर्यंत तरी देवानें मला वाचवावें. ह्मणजे मग मी सुखानें मरेन."

" इतक्यांतच मरणाची गोष्ट का बोलतां? कांहीं काळानें हें दुःख कमी होईल."

" खरी प्रीति कधीं काळानें कमी होत असते काय?"

" खऱ्या प्रीतीच्या निराशेमुळें झालेलें दुःख जरी अगदीं नाहींसें व्हायचें नाहीं. तरी त्याच्या यातना तरी कांहीं कमी होतील." तिला समाधान व्हावें या हेतूनें इझाबेला ह्मणाली.

" छे छे; अंतःकरणाला लागलेली ही कीड नाहींशी तर होत नाहींच; पण जसा जसा काल अधिक जातो, तशी तशी ती पक्कदशेस मात्र येत असते. माझ्या अंतःकरणाला जी जखम लागलेली आहे, तिचा परिणाम जरी सावकाशीनें होणार असला, तरी त्यांत माझा अंत झाल्याशिवाय कधीं राहायचा नाहीं. आणखी थोडीं वर्षें माझें काय आयुष्य असेल तें असेल. तोंपर्यंत मी अशीच झुरत राहणार. अरेरे! ज्या दिवसांत माझ्या वयाच्या स्त्रिया आपल्या पूर्ण तारुण्याचा, संसारसुखाचा व ऐश्वर्याचा उपभोग घेणार त्या दिवसांत मी हें जग सोडून जावेंना! अरे! अरे! याचें मला फार वाईट वाटतें!"

" नाहीं बरं माझे प्रियकरणी ! तूं आपल्या भावीस्थितीचें इतकें जें उदासवाणें चित्र काढलें आहेस, तितकें तें तसें नाहीं. आपणा सर्वांकरितां ईश्वरानें समाधानाला एक मार्ग ठेवला आहे. आणि तो मार्ग कोणता—तर आशा."

" अं: आशेचें जर माझ्या अंतःकरणांत मुळींच नायनाट झालें आहे, तर ती आतां कोठून येणार ? "

" एका अर्थानें आशा जरी अगदीं नाहींशी झाली आहे, तरी ती ह्मणजे एका गोष्टीकरितांच असते असें नाहीं. तुमच्या इष्टमित्रांचें तुमच्यावर असलेलें प्रेम पाहून तुह्मांला आनंद वाटेल, तुमच्या मनाला स्वस्थता मिळेल—व कदाचित तुह्मांला सुखही वाटेल. विचार करा—तुह्मांला बाप आहे, व तोही आपल्या ऐन कुवतीमध्यें आहे. त्याच्या करितां तरी तुह्मांला राहिलें पाहिजे. तुह्मांला दोन भाऊ आहेत, ते पुढेंमागें लवकरच या जगांत नांव मिळवतील, त्यांच्याकरितां तरी तुह्मांला राहिलें पाहिजे. तुमच्यावर जीव करणारे तुह्मांला मित्र आहेत त्यांच्याकरितां तरी तुह्मांला राहिलें पाहिजे. असें असून मरणाची कां हो वाट पहाता ! इतक्यांतच त्याला कां पाचारण करतां ? आपण स्वतःकरितांच या जगांत राहतों असें नाहीं. दुसऱ्याकरितांही आपल्याला राहावें लागतें. वरचेवर दुःखकारक विचारांना वाट देणें ह्मणजे हळूं हळूं आत्मघात करण्यासारखेंच आहे. मनुष्य असो किंवा देव असो, त्यानें दुःखाला डोकें पुढें केलेंच पाहिजे. "

" तुमच्याप्रमाणें मानसिक धैर्य माझ्या ठिकाणीं नाहीं याला मी तरी काय करूं ? एखादें निर्जीव रोंपडें जसें वाऱ्याची नुसती झुळूक आली तरी कोलमडून पडतें, त्याप्रमाणें माझी स्थिति आहे. तर या भयंकर वाऱ्याच्या सोसाट्याला मी कशी पाठ द्यावी ?"

" प्रत्येक मनुष्याला थोडें बहुत धारिष्ट दिलेलेंच असतें, तेंच हळू हळू उपयोगांत आणून दुःखाला पाठ द्यावी ह्मणजे झालें. "

हे शब्द ऐकून मेरीनें कांहीं उत्तर दिलें नाहीं. ती फक्त सुस्कारा टाकून स्वस्थ राहिली.

यांना लांब फिरून कंटाळल्यासारखें वाटूं लागलें. ह्मणून त्या मग घराकडेच वळल्या.

# भाग ११९.

## एलन !

संध्याकाळचा समय होता. मार्खमच्या वाड्यांत मनरो खुर्चीवर बसून झोप घेत होता, एलन त्याच्याजवळ पुस्तक वाचीत बसली होती, शेगडींत विस्तव धगधगलेला होता, व मार्खम आपल्या खोलींत अभ्यास करीत होता.

वरचेवर एलन आपलें पुस्तक एकीकडे करी, व विचारांत गढून जाई. एखाद्या विषयाच्या विचारांत ह्मणजे तिचें मन गढून जात असे असा प्रकार मुळींच नव्हता, परंतु तिच्या चरित्रांतल्या एकंदर गोष्टी तिच्या मनांत आल्या ह्मणजे त्या पुष्कळ वेळ विचाराबाहेर टाकण्याचें तिला फार जड जाई.

जसे जसे दिवस जात, तसा एक विचार तिच्या मनांत जास्त येत असे. तिला वाटे कीं, सृष्टीक्रमाप्रमाणें व आपल्या बापानें आजपर्यंत जे जे कष्ट, व उपासमार सोसले आहेत त्या योगानें तो कांहीं आतां फार दिवसाचा सोबती नाहीं. व असें झालें ह्मणजे त्याच्या पाठीमागें आपल्याला रिचर्डच्या येथें राहतां यायचें नाहीं. आणि तिच्या मानीस्वभावामुळें मार्खमकडून धर्मार्थ ह्मणून मदत घेण्याची नुसती कल्पना देखील तिला दुःसह वाटे. तिनें नाटकांत असतांना मिळवलेले पैसे साठवून ठेवले होते, परंतु ते पुष्कळ दिवस पुरण्यासारखे नव्हते. ह्मणून ती कोणता धंदा करावा या काळजींतच नेहेमीं असे. आजपर्यंत तिनें जे जे धंदे केले त्यांपैकीं, तिला फक्त नाटकाचाच कायतो बरासा वाटे, त्यामुळें एखादे वेळीं तिच्या असेंदेखील मनांत येई कीं, आपण, बाप असतांनाच फिरून त्या धंद्यांत जावें.

लज्जाविनयादि गुणांनीं जी अतिशय रम्य दिसली असती, व जी आपल्या सौंदर्यानें स्त्री जातीला भूषविणारी ती प्रसंगानें पावित्र्यापासून ढळावी ही खरोखर किती दुःखाची गोष्ट आहे ! इच्या लावण्याला भुलून इचें पाणीग्रहण करण्याची जर आपली इच्छा एखाद्यानें दर्शविली, तर इला त्या गोष्टीबद्दल रुकार देतां येईल काय? कारण रुकार देतांना तिनें जो प्रकार त्याला कळणें इष्ट नाहीं तो तरी गुप्त ठेवला पाहिजे. किंवा पत्नीत्वांत राहण्याची जन्मपर्यंत आशा सोडली पाहिजे. याशिवाय तिला मार्गच नव्हता. कारण केव्हांही तिला आपली गुप्त गोष्ट प्रगट करतां येणारी नव्हती.

अशा प्रकारच्या स्थितींत ती असल्यामुळें तिला सुख नव्हतें ह्मटलें तरी

चालेल. व ता जेव्हां तेव्हां चिंताक्रांत असे याचेंही आतां वाचकांना आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

तिच्या वयाला नुकतींच वीस वर्षें झालीं होतीं. व जरी बऱ्याच हालअपेष्टांनून तिला दिवस काढावे लागले होते, तरी तिच्या तारुण्याची टवटवी अगदीं अबाधित होती.

**एलन** ! जे ह्मणून दयाशील असतील, त्यांना तुझ्याकरितां वाईट वाटल्या वांचून कधीं राहायचें नाहीं. कारण स्वभावतः तुझें **दुर्मार्गाकडे** लक्ष्य नाहीं. विपत्तीमुळें दुर्दैवानें तुझें पाऊल वांकडे पडलें, परंतु त्यापूर्वी तुझ्याहून सच्छील असें कोणीही नव्हतें, ह्मटलें तरी चालेल. व आतां तुझ्या अपराधाबद्दल तुला जो पश्चाताप करावा लागत आहे तो, तुझ्या अपराधाचें फळ नसून, तुझा तो खडतर प्राक्तनयोग समजला पाहिजे. असो. आपण आपल्या गोष्टीकडे वळूं.

**मनरो** खुर्चीवर झोप घेत होता व **एलन**नें आपलें लक्ष्य पुन्हां पुस्तकाकडे लावलें होतें. इतक्यांत **मेरियन** तेथें आली, व तिनें **मनरो**ला झोप लागली आहे असें पाहून **एलन**ला खुण करून आलीकडे बोलावलें, व तिच्या हातांत एक चिठ्ठी देऊन आपण निघून गेली. **एलन**नें तें पत्र फोडून वाचलें तों त्यांत याप्रमाणें मजकूर होताः—

" कळविण्यास वाईट वाटतें कीं, तुझा मुलगा रिचर्ड एकाएकीं **बेमार** आजारी पडला आहे. तर *सवड साधून घटकाभर येऊन जायाचें होईल तर फार चांगलें. तुझ्या विश्वासू दासीच्या मार्फत हें पत्र देण्याकरितां मी आपल्या चाकराला पाठविला आहे. कळावें.

" **डेव्हिड वेंटवर्थ.**"

हें पत्र वाचल्यावर **एलन**नें तें तसेंच पडूं दिलें व तावडतोब ती खोली सोडली. नंतर **मेरियन**ला बापाजवळ बसण्यास सांगून ती तडक आपल्या मुलाच्या पालकाच्या येथें गेली. ती तेथें जाऊन पोंचल्यावर त्याच्या बायकोनें आतां भिण्याचें कारण नाहीं, तुमचा मुलगा सुखरूप आहे, असें तिला सांगितलें. परंतु **एलन**ला स्वतः आपला मुलगा पाहण्याची फार उत्सुकता झाली होती. ह्मणून ती ज्या ठिकाणीं तो निजला होता तेथें गेली. तों त्याला शांत निद्रा लागली असून त्याच्याजवळ त्याचा पालक बसला होता.

त्याच्याही तोंडून तिला कळलें कीं, आतां भिण्याचें कारण नाहीं. परंतु

णखी कांहीं वेळ तेथें थांबण्याचा तिनें विचार केला. या वेळेला सर्व विचार तिच्या मनांतून गेले होते. बापाचीही तिला आठवण नव्हती. व रिचर्ड आणि माझा बाप आपल्या बाहेर येण्यानें घाबरतील याचीही तिला शुद्ध नव्हती, ती एकसारखी आपल्या मुलाकडे प्रेम दृष्टीनें पहात होती.

अहाहा ! एक तरुण स्त्री आपल्या निद्रित असलेल्या तान्ह्या बालकाकडे प्रेमदृष्टीनें पहात आहे, यापेक्षां कोणता सुंदर देखावा चितारी आपल्या कलमानें काढूं शकेल ? किंवा यापेक्षां कोणतें मोहक काव्य कवि आपल्या बुद्धि- सामर्थ्यानें करूं शकेल बरें?

पुष्कळ वेळ गेल्यावर तिचा मुलगा जागा झाला.त्यासरसें तिनें त्याला पोटाशीं धरून कुरवाळलें. तो जरी या वेळेला आजारी होता, तरी इच्याकडे पाहून हंसला. परंतु ज्या वेळेला त्याच्या दुखण्याच्या त्याला वेदना होऊं लागल्या, त्या वेळेस त्याला शांत करण्याचें काम एलनचें नसून त्याची उपमाता जी वेंटवर्थची बायको, तिचें होतें. अरेरे ! आपल्या पोटच्या पोराला जेथें आपण लळा लावायचा तेथें दुसरीनें लावण्याचा प्रसंग यावा, किती दुर्दैवाची गोष्ट ही!

बराच वेळ ती बसली. शेवटीं डाक्तरानें मुलाला आतां भय नाहीं असें सांगितल्यावर ती तेथून निघाली. व घरीं येऊन मेरियनला ह्मणाली: " माझें बाळ आतां बरें आहे. पण बाबांनीं माझी चौकशी केली काय ? "

" मुळींच नाहीं. ते आणि मार्खम दिवाणखान्यांत बोलत बसले आहेत."

नंतर एलन हळूच आपल्या खोलींत गेली. ती अगदीं दमली होती, तरी तिला झोंप येईना. अंथरुणावर पडून कोठें थोडा वेळ झाला असेल नसेल इतक्यांत तिचा बाप हातांत दिवा घेऊन हलकेंच दार उघडून आंत आला.

या वेळेला याचें तोंड अगदीं उतरून जाऊन, डोळे कावरे बावरे झाले होते, व त्यावरूनच त्याची वृत्ति क्षुब्ध झालेली दिसत होती.

तो बिछान्याजवळ गेला. व कांहीं वेळ तिची मुद्रा न्याहाळीत उभा राहिला. इतक्यांत एलन डोळे उघडून याला पाहतांच चपापून उठून बसली. व " बाबा काय झालें तुह्मांला ? " म्हणून तिनें विचारलें.

" एलन," आपल्या हातांतला दिवा खालीं ठेवून तो विचारतो. "एलन, मी तुला विचारतों तें खरें सांग. एकच शब्द सांग, कीं, मी तुला ज्याप्रमाणें आजपर्यंत पवित्र आणि निष्कलंक समजत आलों तशी तूं आहेस का नाहींस?"

" बाबा तुह्मी हा प्रश्न काय ह्मणून मला विचारीत आहांत ? "

" कारण माझ्या पोटांत एक वाईट संशय आला आहे. आणि मला खरें कळल्याशिवाय तर झोंप यायची नाहीं. मग सांग, काय खरें असेल तें.

" बाबा तुह्मी मला मोठ्या संकटांत घालीत आहा बरं !"

" **एलन** मी तुला एक शब्द विचारतों. या पत्राचा अर्थ काय ?" असें ह्मणून त्यानें तें पत्र तिच्यापुढें फेकलें.

तें पत्र पाहतांच तिला आठवण झाली कीं, मी हें पत्र तेथेंच विसरलें होतें खरी. लागलीच तिनें आपले दोन्ही हात जोडून बापाची प्रार्थना केली. " बाबा क्षमा करा—हो क्षमा करा. या हतभाग्य मुलीवर कोप करूं नका!" असें ह्मणून ती अधोमुख करून रडूं लागली.

कांहीं वेळ तिच्या बापाच्याही तोंडून शब्द निघेना. परंतु त्याचे ओंठ कांपत होते, व त्याच्या कपाळावरच्या शिरा फुगल्या होत्या, त्यावरून त्याच्या अंतःकरणांत काय कल्होळ माजून राहिला होता तो दिसत होता. शेवटीं त्यालाही रडूं कोसळून, आपलें तोंड हातांनीं झांकून तो ह्मणाला: " देवा ! हे सोहळे पाहण्यापेक्षां या पूर्वीचे कारे नाहीं माझी गठडी केलीस !"

हे शब्द तो इतकें अंतःकरण पिळवटून बोलला कीं, **एलन**ला त्याच्या जिवाची भीति वाटूं लागली. त्याबरोबर ती गुडघे टेकून आपल्या बापाला ह्मणूं लागली: " बाबा क्षमा करा हो. जर या वेळेला माझें मूल येथें असतें तर त्याला तुमच्या पुढें करून मी तुमची क्षमा मागितली असती."

" **एलन** या वेळेला तूं माझ्या काळजांत केवळ सुरी खुपसलीस बघ." नंतर तिच्याकडून आपलें तोंड फिरवून तो बोलूं लागला. " देवा या वेळेला इच्या आईला तूं येथें ठेवलें नाहींस ही मोठी खैर केलीस. कार्टे, ज्या मांगानें तुला भ्रष्ट केलें त्याचें नांव तरी सांग. कारण—तें घातकी पत्र व त्यांत तुझ्या मुलाचें नांव पाहून, माझ्या संतापाच्या भरांत, आपल्या अन्नदात्याला ह्या मूर्खानें मोठ्या कृतघ्नपणानें दोष दिला. "

" काय **रिचर्ड**ला ! अरे देवा! नाहीं बर ! नाहीं—नाहीं." हे शब्द ऐकून तिला अतिशयच वाईट वाटलें. इतक्यांत आपल्या मुलाचा जनक कोण आहे याची तिला आठवण होऊन तिनें मोठ्यानें सुस्कारा टाकला व ती बेशुद्ध होऊन खालीं पडली.

" **एलन—एलन**, माझे लाडके—अरेरे मी इचा प्राण घेतला ! " असें तो

बोलत आहे; इतक्यांत **मेरियन** दिवा घेऊन तेथें आली. तिला पाहतांच, तो ह्मणाला:" थोडेंसें पाणी आण बर! ही बेशुद्ध झाली आहे."

त्याबरोबर तिनें पाणी दिलें, तें घेऊन त्यानें तिच्या कपाळावर थापलें. कांहीं वेळानें **एलन** थोडीशी सावध होऊन डोळे उघडून पाहूं लागली.

" **एलन** सावध झालीसना? माझ्याकडे पहा! मी तुला क्षमा केली, मग तर झालें? **एलन,** मी तुझ्यावर फारच संतापलों होतों. अहाहा! तूं माझ्यावर किती प्रेम करीत होतीस?"

" महाराज कांहीं वेळ तुह्मी जा. तिला जरा आपलें मन स्वस्थ करूं द्या. ही गोष्ट उघडकीस आल्यानें तिच्या मनाला मोठाच दचका बसला आहे." **मेरियन** ह्मणाली.

" ठीक आहे मी जातों.तूं येथें ऐस. मी सकाळीं इला भेटेन."असें ह्मणून **मनरो** निघून गेला.

---

# भाग १२०.

## बाप आणि मुलगी.

सरासरी सकाळचे नऊ वाजले होते. **एलन** बिछान्यावर पडली असून जवळ तिचा बाप बसला होता. रात्रीं घडून आलेल्या गोष्टीमुळें त्याच्या चेहऱ्यांत पुष्कळच बदल झाला होता. मध्येंच तो आपले ओंठ चावून घेई. जणूं त्याला अतिशय संताप झाला आहे व कांहीं वेळानें आपले पाण्यानें भरलेले डोळे पुसून टाकी. हे सर्व प्रकार **एलन** लक्ष्यपूर्वक पहात होती. शेवटीं तो बोलूं लागला " **एलन,** ज्यानें तुला विटाळलें, त्याचें नांव मला सांगत नाहींसना मग!"

" बाबा, मला जास्ती जास्ती दुःख देण्याचा का आतां आग्रह धरतां? मी आजपर्यंत सोसलें तितकें पुरें नाहीं झालें का?"

" तुला आजपर्यंत पुष्कळ दुःखें सोसावीं लागलीं तीं मला माहीत आहेत. तुझें मी इतक्या चांगल्या तऱ्हेनें पालन केलें आहे कीं, वाईट मार्गांत तुझें पाऊल पडलें, तर त्याचा तुला पश्चाताप झाल्याशिवाय राहूं नये. आजपर्यंत तूं जरी पुष्कळ दुःख काढलें आहेस तरी तें माझ्या रात्रींच्या दुःखाच्या पासंगालाही नाहीं. जेव्हां तें पत्र मी वाचलें तेव्हां मी शुद्ध वेडा

बनलों. त्या मुलाचें नांव **रिचर्ड** आहे असें पाहून, मी तडक **मार्खम**कडे गेलों आणि त्याला ह्मणालों: " अधमा आह्मांला अन्न घालतोस याबद्दलचे उपकार माझ्या मुलीचें पावित्र्य भ्रष्ट करून फेडून घेतलेस काय? " असें ह्मणून मी त्याला तें पत्र दाखविलें. तो अगदीं चकित होऊन गेला. व डोळ्यांत पाणी आणून त्यानें विचारलें; असला अधमपणा माझ्या हातून होईल असें तुह्माला वाटतें काय? नंतर तो व मी याबद्दल बराच वेळ बोलत बसलों. त्याच्या निष्कपट-पणावरून माझी खात्री झाली कीं, मी चुकलों—मी फार वेडेपणा केला. पुढें त्यानें मला तेवढी रात्र जाऊं देण्याविषयीं सांगितलें. त्याला वाटलें कीं, विश्रांतीनें माझें अंतःकरण जरा शांत होईल. परंतु मला कशाची विश्रांति आली आहे! मी आपल्या खोलींत गेलों. पण मला ती तळमळ सहन होईना, ह्मणून तुझ्याकडे आलों. व मी आपले संशय फेडून घेतले.

" बाबा, तुह्माला जर सर्व हकीकत कळेल, तर तुह्मालामुद्धां हो फार वाईट वाटेल.केवळ विषयवासना तृप्त करून घेण्याकरितां,किंवा एखाद्यावर आसक्त होऊन मी हें पातक केलें नाहीं बरं! " ती रडत रडत ह्मणाली.

" कार्टे ह्मणतेस तरी काय? केलेल्या अपराधावर पांघरूण घालण्याकरि-तां, बायका अशा वेळेला ज्या सबबी पुढें आणतात तसें कां तूं करीत आहेस? बोल तरी? "

"बाबा मला जितकें माहीत आहे तितकें मी सांगतें तर आतां. आपल्या-ला जेव्हां विपत्ति आली,तेव्हां आपण पुन्हां **गोल्डन** गल्लीमध्यें राहायला गेलों हें तुह्माला आठवत असेलच, व तेथें आपल्याला किती उपासमार सोसावे लागले हेंही तुह्माला स्मरत असेलच; शेवटीं आपली विपत्ति शिखराला जाऊन पुढें अगदीं उपाय नाहींसा झाला, तेव्हां एके दिवशीं सकाळीं तुह्मी **रिचर्ड मार्खम**-कडे येण्याकरितां निघाला—"

" तें मला स्मरतें पुढें सांग. "

" पुढें तुह्मी जेव्हां परत आला, तेव्हां मी घरीं नव्हतें—"

" हो—हो—मी पैसे घेऊन आलों, त्यावेळेस पुष्कळ वेळ झाला तरी तूं आली नव्हतीस. "

" आणि पुष्कळ वेळानें जेव्हां मी परत आलें, तेव्हां मीही पैसे आणले! "

" **एलन**, पुरे—पुरे. आतां एक गुद्धां बोलूं नकोस. नाहीं तर मला वेड

लागेल. आतां सर्व मला समजलें. पैशाकरितां तूं आपला देह विटाळलास." असें ह्मणून तो तिच्या गळा पडून रडूं लागला.

" बाबा—बाबा शांत व्हा. तुमचे हाल मला पाहवेनात, व **मार्खम**कडे येऊन कांहीं फायदा होईल अशीही आशा मला दिसेना। तेव्हां मला एकच उपाय दिसला. मी देवाला स्मरून सांगतें कीं, तें मी माझ्या स्वतः करितां केलें नाहीं. तसें करण्यापेक्षां मी आपला प्राण दिला असता. पण बाबा, तुमचे हाल मला पाहवेनात हो, तुमचे उपासमार मला सोसवेनात! त्याकरितां एक वार—फक्त एक वार माझ्या हातून पातक घडलें, आणि त्याचें हें फळ आहे ! "

हे तिचे शब्द ऐकून ह्यातान्याला फारच दुःख झालें तो हुंदके देऊन रडूं लागला. शेवटीं तो ह्मणाला: ' **एलन**, उलट मीच तुझी क्षमा मागावी अशी तूं आहेस!"

"बाबा असें ह्मणूं नका बरं! विपत्तीमुळें जर मी चुकून पाऊल टाकलें तर हा तुमचा अपराध नाहीं, परंतु माझी स्थिति वाईट वाटण्यासारखी आहे कीं नाहीं हें तुह्माला आतां समजलें असेल."

आपल्या एकुलत्याएक, सद्गुणी, तरूण मुलीचा विपत्तीमुळें असा नाश झाला, याचें त्या ह्यातान्याला इतकें दुःख झालें कीं, **एलन**नें त्याचें समाधान करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु कांहीं नाहीं. शेवटीं तो जेव्हां अगदीं बेफाम होऊन आपलें वक्षस्थळ बडवून घेऊं लागली, तेव्हां तो शुद्धीवर येऊन आपलें मन आवरूं लागला.

शेवटीं, एकमेकांच्या प्रयत्नानें तीं दोघेंही कांहींशीं शांत झालीं. इतक्यांत दार उघडून **मार्खम** व त्याच्या मागून **मेरियन** अशीं आंत आलीं.

परंतु **मेरियन**च्या हातांत **एलन**चा मुलगा होता. तो तिनें **एलन** पुढें केला. त्या वेळेला **मनरो**ला किती आश्चर्य व **एलन**ला आपलें मूल पाहून किती आनंद झाला असेल बरें ?

" आई वेगळें मूल कधींही असूं नये. **एलन**, आजपासून या मुलाचा संभाळ तूंच करावास ?" **रिचर्ड** ह्मणाला.

" अहाहा रे माझ्या उदारा अन्नदात्या ! काय तुझी गोष्ट सांगूं मी !" असें ह्मणून तिनें आपलें बाळक पोटाशीं कवटाळलें. या वेळेस तिच्या आनंदाला इतका कांहीं कढ आला कीं, त्याला हर्षवायूही ह्मणतां येईल.

"**रिचर्ड**, आजपर्यंत कोणत्याही प्राण्याच्या ठिकाणीं पाहिलें नाहीं असें तुझें उदार अंतःकरण आहे हें !" **मनरो** ह्मणाला.

" बाबा, माझी सर्व हकीकत आपल्या अन्नदात्याला कळणें जरूर आहे. त्याच्यापासून कांहीं चोरून ठेवायचें नाहीं."

" एलन, मला सर्व कांहीं समजलें आहे. ज्या वेळेला तूं आपली हकीकत बापाजवळ सांगत होतीस; त्याच वेळेस मी दारापाशीं आलों. व या वेळेला मध्येंच जाणें चांगलें नाहीं ह्मणून मी तेथेंच थांबलों. आणि जरी मी तुझी ती दुःखकारक हकीकत ऐकली असली, तरी ती क्षुद्रबुद्धीनें नव्हे. तर—त्याला कारण, तुझ्या संबंधानें माझें मन फार कळवळतें हें होय."

" तर मग तुह्माला माझा राग नाहींना आला? "

" तुझा राग! छे, उलट मला तुझी दया येते. तूं कांहीं अपराधी नाहींस! तुझें अंतःकरण शुद्ध आणि निष्कलंक आहे." **रिचर्ड** ह्मणाला.

" पण—पण, माझ्या हातांत या मुलाला पाहून लोक काय ह्मणतील !"

" त्यांच्या ह्मणण्याला किंमत द्यावी अशा तऱ्हेनें लोकांनीं तुला वागविलें नाहीं. **एलन** त्यांना काय पाहिजे तें ह्मणूं दे. आई वेगळें मूल ठेवणें हा निव्वळ निर्दयपणा आहे. तुझी जर अशी इच्छा असेल कीं, तें मूल लोकांनीं वाढवावें तर मात्र माझें कांहीं ह्मणणें नाहीं." **मार्खम** ह्मणाला.

" पण मीही आपल्याकडून तुमच्या मनाला धक्का बसूं द्यायची नाहीं; व तुमच्या घरांतल्या एका अविवाहित स्त्रीला मूल झालें याबद्दल लोकांतही चर्चा होऊं द्यायची नाहीं. बाबा व मी मिळून कोठें तरी दुसरीकडे जाऊन राहूं."

" एलन, तुझ्या ह्मणण्याप्रमाणें मी रुकार देईन तर लोकापवादाला मी भ्यालासारखें होईल. व तुझ्या संबंधानें माझें मन कळवळतें ह्मणून मी जें आतांच ह्मटलें त्याला खोटेंपणा येईल. ह्मणून माझें तुह्माला असें सांगणें आहे कीं, तुह्माला कंटाळा येईपर्यंत तुह्मी माझ्या घरीं रहावें. मग लोकांना याबद्दल काय चर्चा करायची असेल ती करूं द्या."

" तुह्मी जी ह्मणून गोष्ट कराल तिला यथार्थता आणण्याला तुमची परोपकारबुद्धि समर्थ आहे. **रिचर्ड** जर राजाच्या कुळांत तुह्मी जन्म घेतला असता तर लोकांचें तुमच्या हातून कल्याण झालें असतें. "

" मी जीं दुःखें अनुभवलीं आहेत त्यामुळें मला दुसऱ्याचें दुःख तेव्हांच समजतें. आणि जर लोकांत हल्लीं एकमेकांचीं छिद्रें काढण्याची प्रवृत्ति आहे आहे तिच्या ऐवजीं प्रत्येकाविषयीं स्नेहभाव ठेवण्याची चाल पडती तर

जगांत सध्यां आपल्याला जे मद, मत्सर, अपहार इत्यादि रोग माजलेले दिसता-त ते कदापि दिसले नसते. ''

# भाग १२१.

## त्याचा मुलगा.

**रिचर्ड मार्खम**नें **एलन**चें मूल तिच्या स्वाधीन केलें त्याच दिवशीं स-काळीं **ग्रीनवूड** आपल्या भपकेदार दिवाणखान्यांत बसला होता.

येत्या **पार्लमेंटांत** बोलण्याचीं भाषणें तो या वेळेला पाठ करीत होता. हीं त्याचीं भाषणें रचून देण्याकरितां त्यानें मुद्दाम दोन मनुष्यें नोकरीस ठेविलीं होतीं. एकानें किरकोळ मुद्दे काढावेत, व दुसऱ्यानें अर्थगांभीर्य, शब्दलालित्य इत्यादि जे भाषणालंकार ते पाहवेत. या कामाबद्दल त्यांना महिन्याचे तीस शिलींग पगार असे. व त्यांनीं सकाळच्या नऊ वाजल्यापासून तें रात्रींच्या नऊ वाजेपर्यंत काम करावें. फक्त मध्यें तीन वेळां अर्धा अर्धा तास जेवणाकरितां त्यांना मोकळीक असे. याप्रमाणें **ग्रीनवूड** आपल्या कारकुनांच्या अंगमेहन-तीवर मोठेपणा मिळवीत असे. असो.

तो आपलें भाषण पाठ करीत होता, इतक्यांत **चीस्टर**ची स्वारी आंत आली. नंतर त्यानें **ग्रीनवूड**ला **हारबरो**चा व आपला उदईक **फ्रान्स**ला जाण्या-चा विचार कळविला. तसेंच, आपण **व्हायोले**ची सुटका करण्याकरितां जाण्या-च्या पूर्वीच ती तेथून नाहींशी झाली, **सैतान्या**चें द्रव्य चोरीस गेलें, वगैरे गोष्टी त्यानें **ग्रीनवूड**ला सांगितल्या. शिवाय, आलीकडे **सिसिले**कडे पुष्कळ मंडळी येत असते, तिनें शुद्ध दुकान मांडलें असून ती एका लष्करी मनुष्याच्या नादीं लागली आहे, व नवरा बायको एकमेकांच्या अगदीं पंचाइतींत पडत नाहींत हेही प्रकार त्याच्याकडून **ग्रीनवूड**ला कळले. याप्रमाणें त्यांच्या इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर **चीस्टर** निघून गेला. व फिरून आपला अभ्यास यानें चालविला. तों **मेरियन** आली.

तिनें मागील दोन भागांत घडलेली हकीकत इत्थंभूत **ग्रीनवूड**ला सांगून, शेवटीं ती ह्मणाली: "महाराज माझे धनी **मार्खम**, यांच्यासारखा उदार मनुष्य कोठेंही सांपडणार नाहीं. ज्याला प्रामाणिकपणा, औदार्य, व दया-शीलता ह्मणतात ते सर्व गुण त्यांच्या ठिकाणीं वसत आहेत. "

हें भाषण ऐकून **ग्रीनवूडनें** कांहीं उत्तर केलें नाहीं, जसें कांहीं आपलें लक्ष्य आपल्या पुढच्या कागदांकडे आहे, असें त्यानें दाखविलें. परंतु हातांतल्या रुमालानें आपले डोळे मात्र त्यानें वझरते पुसले.असो.पुढें त्यानें **लाफरला** हाक मारून याप्रमाणें सांगितलें. " हें पहा आतांच्या आतां **वेंटवर्थकडे** जाऊन त्याला ही पन्नास पौंडाची नोट दे. आणि त्याला ह्मणावें, या मुलाचें आजपर्यंत तुह्मी ममतेनें पालन केलें याबद्दल त्याच्या बापानें कृतज्ञतापूर्वक तुह्मांला ही अल्पशी देणगी दिली आहे, व त्यांची अशी इच्छा आहे कीं, तुह्मी या बाबतींत सर्व प्रकारें गुप्तता राखावी. जा, लौकर ये. "

**लाफर** गेल्यावर त्यानें **मेरियनलाही** निरोप दिला. व मग खुर्चीवर पडून तो ह्मणाला, " माझा मुलगा **रिचर्डच्या** आश्रयानें राहिला काय ? बरें आहे. "

---

# भाग १२२.

## स्थितींत पालट.

सरासरी दोन प्रहरच्या तीन वाजतां, **अर्ल बरिंग्टन डायनाच्या** दारापुढें आपल्या घोड्यावरून खालीं उतरले, व घोडा मोतद्दाराच्या स्वाधीन करून ते आंत शिरले.

**डायना** नियमाप्रमाणें त्यांचें स्वागत करायाला गेली, तों त्यांची मुद्रा जरा फिरलेली तिच्या दृष्टीस पडून तिला आश्चर्य वाटलें. पुढें ज्या कोचावर ही बसली होती त्याच्यापासून कांहीं अंतरावरच्या खुर्चीवर हे जाऊन बसले. परंतु बराच वेळ यांनीं कांहीं भाषणच केलें नाहीं. व **डायनाला**, माझ्याहातून कोणताही अपराध झाला नाहीं, असें वाटत असल्यामुळें, तुमची वृत्ति अशी का ह्मणून तिनेंही आढ्यतेनें विचारलें नाहीं.

शेवटीं, दोघांनाही संकोच करणारें हें मौन **अर्लनींच** सोडून भाषणास सुरवात केली: " **डायना**, आपला संबंध तुटण्याची वेळ आली आहे, तुझ्या हातून अशी एक गोष्ट झाली आहे कीं, तिनें, ज्यांना ज्यांना मी माहीत आहे, त्यांचा उपहासाविषयक पदार्थच मला बनवून सोडलें आहे. "

हे शब्द ऐकून अतिशय आश्चर्यानें **डायनानें** विचारलें. " महाराज, आपला कांहीं तरी गैरसमज झाला असावा, किंवा आपण माझी थट्टा चालविली असावी. "

" दोन्हीही नाहींत. मला वाटतें, **सर रूपर्ट हारबरोबर** तुह्मी केलेली

मेहरबानी मला कळली, असें तुह्माला सांगितलें ह्मणजे मी थट्टा करीत आहे असें तुह्मी ह्मणणार नाहीं. "

" महाराज, त्याला एका भयंकर प्रसंगांतून वाचविण्याकरितां बिननांवानें मी याच्याकडे एक रक्कम पाठविली हें मी नाहीं ह्मणत नाहीं. "

" एका बदफैली मनुष्याकरितां तूं जे पैसे उधळले ते पैसे कोठून आले, हें विचारणें मला प्रशस्त नाहीं, पण माझ्या पैशावर लोकांनीं चैन केले-ली मला पसंत वाटेल असें तुला वाटतें काय ? "

" महाराज आपल्या मनाला वाईट वाटेल असें करणारी मी बायको नाहीं, हें तुह्मांला माहीत आहेच. ही कदाचित् मी चूक—"

" या शिवाय तुला कांहीं ह्मणतां यायचेंच नाहीं. पण जाऊं द्या, जें झालें तें झालें. त्याबद्दल आतां वाद करून काय करायचें आहे ? "

" यावरून आपला विचार—"

" असा आहे कीं, तुझा माझा आतां संबंध नसावा. " डायनानें विचारलें नाहीं तोंच अर्लनीं सांगूनही टाकलें.

" महाराज माझा अपराध आपल्या दृष्टीनें न भरून येण्यासारखा वाटला ना? " डोळ्यांत पाणी येऊन तिनें विचारलें.

" उपहास कोणाला सहन होईल बरें? आणि त्या बाबतींत माझें मन तर फार कोवळें आहे? "

" पण महाराज ही गोष्ट आपल्याला कोठून कळली? "

" तें तुला सांगतों. क्यापटन फिझार नांवाचा एक लष्करी अम्मलदार माझ्या ओळखीचा आहे. आणि त्याचें ह्यारबरोच्या घरीं नेहेमीं जाणें येणें आहे. त्याला काल सिसिलेनें एक गंमत सांगितली. ती ह्मणाली, मी आपल्या नवऱ्याला हजार पाऊंडाला फसवलें आहे. नंतर तिनें ते पैसे कसे आले, कोठून आले वगैरे सर्व सांगून शेवटीं ती ह्मणाली, ' अर्ल बारिंगटन इतके पैसे उधळतात कीं, त्यांचें पात्र आपल्या पहिल्या यजमानाला पैसे पोंचवीत असतें. ' हें तूं मला विचारलेंस ह्मणून त्यानें मला जें सांगितलें तें मी तुला सांगितलें. हें तूं फार अविचाराचें वर्तन केलेंस. मी असें ह्मणत नाहीं कीं, हे पैसे पाठविण्यांत तुझा कांहीं विशेष हेतु होता. परंतु—"

" महाराज, माझ्या मनाचा निर्मळपणा एक ईश्वर जाणत असेल. " डायना डोळे पुसीत ह्मणाली.

" असल्या गोष्टींत तुझ्या मनाचा निर्मळपणा लोक मुळींच कबूल कर-णार नाहींत. याबद्दल ते काय ह्मणत असतील विचार कर बरें ?"

" महाराज, रूपर्टला मदन करण्यांत माझा कांहीं वाईट हेतु होता असें तुह्माला देखील वाटतें ना ?"

" तुझें, माझ्याशीं असलेल्या वाह्याचरणावरून मला नाहीं असें ह्मणतां येईल, परंतु ज्या अर्थी थोडा तरी मनांत संशय येण्याला कारण झालें आहे, त्या अर्थी यापुढें आपल्याला एके ठिकाणीं राहून सुख व्हायचें नाहीं. आपला स्नेह हा सुटलाच पाहिजे—पण तो गोडीनें सोडूं."

" जशी आपली मर्जी असेल तसें." तिला आपला अपमान झालासा वाटून ती बोलली. व एकीकडे तिनें आपल्या मनाचा उद्वेग आंवरून धरला.

"हें घर आणि त्यांतील प्रत्येक वस्तु ही तुला दिली. शिवाय, त्या पुस्तकांत एक नोट—"

" नाहीं महाराज, आजपर्यंत माझ्या योग्यतेहूनही अधिक, तुह्मी मला दिलें आहे. यापुढें आतां आपल्या मेहेरबानीचा मला स्वीकार करतां येत नाहीं."

ही तिची निस्पृहता पाहून अर्ल अगदीं चकित होऊन गेले, व पुनरपि तिशीं मिळवून घेण्याच्या बेतांत येतात इतक्यांत लोकांच्या उपहासाचें भय, त्यांच्या मनांत उत्पन्न होऊन, तिच्याविषयीं यांच्या अंतःकरणांत उद्भवलेला स्नेहभाव जेथल्या तेथें थिजून गेला.

" मग मी ही देणगी तुला देत आहें ती तूं घेत नाहींस तर ?"

" महाराज, कृतज्ञतापूर्वक, अतिशय नम्रतेनें आपली ही मेहेरबानी मी नाकारतें."

फिरून त्याचें मन घोटाळूं लागलें. व जिनें यांचें अंतःकरण मोहून टाकिलें, जिनें आजपर्यंत यांना निरनिराळ्या कामांत जिवलग स्नेह्याप्रमाणें सल्ला-मसलत दिली, व जी एवढीच गोष्ट शिवाय करून यांच्याशीं अगदीं इमानें इतबारें वागली; तिच्याकडे न्याहाळून पाहत असतां, त्यांच्या मनाचें काठिण्य हळूं हळूं वितळूं लागलें.

पुढें तिच्याशीं तें कांहीं बोलणार, इतक्यांत रस्त्यांत कांहीं गडबड ऐकून त्याचें लक्ष्य खिडकीकडे गेलें. तों खालीं क्यापटन फिझार व आणखी एक गृहस्थ रस्त्यांतून घोड्यावरून चालत असतां, या घराकडे पाहून हसत होते. ह्यारमानें आपल्या चाणाक्षपणानें अर्लच्या मनाची स्थिति तेव्हांच

ओळखली. परंतु रस्त्यांतलें त्या दोघां गृहस्थाचें खिदळणें ऐकून अर्लचें तोंड उतरलें असें जेव्हां इनें पाहिलें तेव्हां हें आतां आपल्या हातचे जातात असें तिला वाटलें.

शेवटीं अर्ल उठून तिला ह्मणाले: " हं तुझा हात इकडे कर पाहूं. मघाशीं सांगितल्या प्रमाणें गोडीनें आपला संबंध सोडूं. तुला साह्य करण्याला मी नेहेमी तयार आहे हें मात्र लक्ष्यांत ठेव. येतो आतां. "

" ठीक आहे महाराज, ईश्वर आपलें कल्याण करो. " असें ह्मणून तिनें आपला हात पुढें केला व तो त्यांनीं प्रेमपूर्वक दाबला.

नंतर कदाचित् पुन्हां मनाला मोह पडेल या भीतीनें त्यांनीं तेथून जलदीनें पाय काढला. ते जसे घोड्यांवर जाऊन बसले तशी डायना खिडकीजवळ येऊन पडद्याआडून पाहूं लागली. परंतु अर्लनें एकवार देखील वर पाहिलें नाहीं. कदाचित्, ही पहात आहे असें त्यांना वाटून त्यांनीं पाहिलें नसल्यास नकळे!

शेवटीं ते जसे दृष्टी आड आले तशी ती पलंगावर पडून रडूं लागली: " अहाहा, त्यांनीं जेव्हां माझा हात धरला, तेव्हां मी एक शब्द बोललें असतें तर त्यांना मी ठेवून घेतलें असतें. परंतु आतां ते हातचे गेले. अरेरे! माझ्या जिवाचा मित्र गेला! "

परंतु डायना ही फार वेळ शोक करीत बसणारी बायको नव्हती. तिच्या ठिकाणीं बरेंच आत्मसंयमन असे. व क्षणमात्र जरी तें खालीं दबलें गेलें होतें, तरी शेवटीं त्यानें तिच्या या दुष्ट मानसिक दुःखावर वर्चस्व मिळविलेंच.

पुढें ती आपल्या स्थितीचा विचार करूं लागली. तिच्या घरांत कोणत्याही वस्तूची वाण नव्हती, व रोख पैसाही तिच्याजवळ पुष्कळ होता. त्यामुळें तिला सध्यांची काळजी मुळींच नव्हती ह्मटलें तरी चालेल. व पुढची पंचाईत तिला करण्याचें कारण नव्हतें. कारण तिचें स्वाभाविक सौंदर्य व अंगचे गुण असे होते कीं, त्यामुळें पाहिजे तितके पुरुष तिच्या पायांशीं लोळण्या घालण्याकरितां येण्यासारखे होते. परंतु या प्रकारचें आयुष्य घालविण्याचा तिला खरोखर कंटाळा आला होता. ह्मणून तिनें आतां स्वतंत्र व चांगल्या रीतीनें राहावें असा विचार केला.

आपल्या हेतूप्रमाणें निरनिराळे विचार करण्यांत तिनें दिवस घालविला. रात्रीं ती जरा लौकरच निजण्याकरितां गेली,—ती झोप घेण्याचा इच्छेनें नसून

कांहीं तरी वाचून करमणूक करावी या हेतूनें गेली. व उशाशीं मेणबत्ती जळत ठेवून, मऊ गिरद्यांवर टेकून बायरनच्या पुस्तकांतील कांहीं भाग वाचीत पडली.

सरासरी एका तासानंतर तिला गुंगी येऊन तिच्या हातांतलें पुस्तक खालीं पडलें, व शेवटीं तिचे डोळे मिटले.

कांहीं वेळानें अंगाला चटका बसून ती एकदम जागी झाली आणि उठून पाहते तों सर्व बिछाना पेटला आहे.

त्या बरोबर तिनें जमिनीवर उडी टाकली. परंतु तिच्या आंगावरील वस्त्रानें पेट घेतला होता, तो तिनें पाहिला. तशी ती जमिनीवर गडबडां लोळून मोठ्यानें ओरडूं लागली.

इकडे रस्त्यांतूनही " आग लागली, आग लागली, " ह्मणून ओरडा चाललाच होता. इतक्यांत एका मनुष्यानें तळमजल्याच्या खिडकीवाटें येऊन तिच्या खोलीचें दार फोडलें, व तिला खांद्यावर टाकून खालीं आणलें. हि बेशुद्ध झाली होती, तशीच तिला शेजारच्या एका भोजनगृहांत नेलें. दैवयोगानें एक वैद्यही तेथें होताच, तोही मग इच्या व्यवस्थेला लागला.

पाठीमागें आगीनें मोठाच भडका उडवून दिल्या कारणानें तिच्या घरांतलें सामान कांहीं एक निघालें नाहीं. पाण्याचाही पुरवठा बरोबर झाला नाहीं, त्यामुळें आगीच्या ज्वाळा असमानपर्यंत जाऊन त्यांवर दोनप्रहरच्या उन्हाप्रमाणें त्यांचा प्रकाश पसरला. ही आग आसपासचीं घरें घेते कीं काय अशीही कांहीं वेळ भीति पडली. परंतु इतक्यांत जळतें घर मध्येंच कोसळल्यामुळें ही आग दबल्यासारखी झाली.

दुसऱ्या दिवशींच्या वर्तमानपत्रावरून असें समजलें कीं, डायनाच्या मालमत्तेचा विमा उतरलेला नसून तीही स्वतः भयंकर स्थितींत आहे.

---

# भाग १२३.

## थड्या घराण्यांतील मजा.

मागील भागांतली गोष्ट ज्या रात्रीं घडून आली, त्याच रात्रीं पहाटें सरस्पर्टच्या येथें कांहींसा मजेदार प्रकार घडून आला तो आह्मी आमच्या वाचकांना सादर करतों.

पहाटेचा समय असून, अद्याप काळोख होता. अशा वेळेला रूपर्ट आपल्या रात्रीच्याच पोषाखानें, एका हातानें कठडा धरून व दुसऱ्या हातानें एका तरुण स्त्रीला घेऊन हलकेंच जिना उतरत होते. ते दोघे इतक्या सावध रीतीनें जिना उतरत होते कीं, त्यावरून त्यांचा हेतु, आपण लोकांच्या कळण्यांत न यावें असा होता हा उघड दिसे. तरी जिना उतरतांना, रूपर्टच्या मनांत विचार येतच होते कीं, आपल्या प्रिय पात्राला प्रसिद्ध रीतीनें आणण्यानेण्यास आपल्याला काय म्हणून प्रत्यवाय असावा ? परंतु फिरून त्यांच्या मनांत असेंही येई कीं, सिसिलेचा व आपला कसा जरी ठराव झाला असला,तरी निदान चाकरमाणसांकरितां आपल्याला मर्यादा राखणें अवश्य आहे.असे विचार चालले आहेत इतक्यांत, तोच जिना उतरून आणखी कोणी येत आहे असें यांनीं ऐकलें.या वेळेचीं पावलें हलकेंच पडत असत,परंतु पूर्वीप्रमाणें हीं पावलें टाकण्यांत फारसा सावधपणा आहे असें दिसत नसे.

वरून कोणी येत आहे असें समजल्याबरोबर रूपर्टनें आपल्या पात्राला हातीं धरून पुढच्या दाराजवळच्याच एका कोपऱ्यांत नेऊन उभें केलें, व आपणही तेथेंच उभा राहिला.

त्या जागेंत सर्व जरी अंधार होता तरी पावलावरून त्यानें तर्क केला कीं, कोणा तरी स्त्रीपुरुषांचें युग्म या ठिकाणीं येत असावें. परंतु याविषयीं लागलीच त्याची संशयनिवृत्ति झाली. कारण तीं दोन मनुष्यें जिना उतरून दाराजवळ गेल्यावर त्यामध्यें कुजबुज सुरू झाली. प्रथमतः पुरुष म्हणाला: " प्रिये सिसिले, जाऊंना मी आतां ? "

" प्राणसख्या जा वरं! " असें ऐकल्यावर कांहीं वेळ नुसतें चुंबनाचेंच घर्षण ऐकूं येऊं लागलें.

" प्रिये आतां फिरून आपली भेट केव्हां होईल ? " फिझारनें विचारलें.

" नेहमीप्रमाणें रात्रीं. आपल्या जिवलग मित्राबरोबर रूपर्ट उद्यां फान्सला जाणार आहेत. "

" वाहवा वाहवा! मग फार मजा होईल बोवा. आतां फक्त रात्रीं पुरतेंच तुझें वियोगदुःख मला सहन करावयाचें आहे तर ? पण प्रिये, आणखी एक वार तुला विचारतों, अशीच तूं शेवटपर्यंत माझ्यावर आसक्त राहशील ना ? "

" अशीच राहीन बरं—अशीच राहीन. " इतकें बोलणें झाल्यावर आणखी एकवार चुंबनांची देवघेव झाली.

" " आणखी प्रिये, ज्यावर तुझें प्रथमतःच मन गेलें असा; व तुझ्या नवऱ्या खेरीज, ज्याला तुझें आलिंगनसुख सांपडून अधरामृतपान मिळालें असा भाग्यवंत पुरुष मीच ना? सांग बरं—सांग—सांग. "

" प्राणप्रिया, ज्याला मोहून मी आपलीं विवाहवचनें विसरून गेलें असे पुरुष फक्त तुह्मीच आहांत बरं. "

" अहाहा ! प्रिये सखे **सिसिले**, आतां मी सुखानें जाईन! " असें ह्मणून पुन्हां एकवार त्यानें तिचें अधरपान केलें.

नंतर तो दाराची कडी धरून दार ओढूं लागला; तों तीं भक्कम बसून दार मुळींच उघडेना, तेव्हां त्यानें **सिसिले**ला सांगितलें; तिनेंही प्रयत्न करून पाहिला; परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं ती त्याला तेथेंच उभा करून दिवा आणण्याकरितां गेली.

पाठीमागें हा तेथें स्तंभासारखा उभा राहिला. याच्या मनांत या प्रसंगाच्या परिणामाच्या बहुतेक कल्पना येऊं लागल्या ; परंतु इतक्यांत **सिसिला** हातांत दिवा घेऊन आलीच.

तरी ज्या कोपऱ्यांत **रूपर्ट** आणि त्याचें पात्र उभें होतें त्याठिकाणीं अंधारच होता. व त्यांना मात्र त्या जागेपासून सरासरीं पांच साहा हातांच्या अंतरावर असलेले, **सिसिला** व तिचा प्रियकर दिसत होते.

परंतु **सिसिला** दाराजवळ गेली तसा, या वेळपर्यंत अंधार असलेल्या कोपऱ्यांत दिव्याचा प्रकाश गेला, व त्या बरोबर **सिसिला** ओरडून तिच्या हातांतला दिवा खालीं पडला. परंतु दैवयोगानें तो विझला नाहीं. **रूपर्ट**नें लागलीच पुढें होऊन तो उचलला. त्याबरोबर चौघेहीजण आपआपल्या जागीं ओशाळे होऊन गेले. परंतु **रूपर्ट**ला मात्र मोठ्यानें हासूं आलें. तें पाहून हा गृहस्थ पुढें होऊन **रूपर्ट**ला ह्मणूं लागला:—

"महाराज,आपणासर्वांकरितांच हा प्रकार बाहेर पडूं नये परंतु आपल्या मनाचें समाधानच करून घेणें असेल तर माझें नांव,माझें घर तुह्माला ठाऊक आहेच."

आपल्याप्रमाणेंच आपल्या नवऱ्याचीही स्थिति आहे, या ठिकाणीं कोणी कोणाला लाजण्याचें कारण नाहीं असें **सिसिले**नें मनांत आणून ती ह्मणाली: " काय ? कोणाचें समाधान करायचें ! जर **रूपर्ट** असल्या बाजारणीला घरांत आणतात तर यांत त्यांचें काय समाधान करायचें आहे ? " असें ह्मणून तिनें आपल्या नवऱ्याच्या पात्राकडे तिरस्कारानें पाहिलें.

या शब्दाची त्या स्त्रीलाही चिरड येऊन ती ह्मणाली: " मी बाजारीण खरीच आहे. परंतु बाईसाहेब माझ्यापेक्षां आपल्याला नाक वर करून बोलायला कांहीं जागा आहे असें मला वाटत नाहीं." परंतु हा निर्लज्जपणाचा प्रकार पाहून तिच्या डोळ्यांतून पाणी आलें.

हे मदांधे सिसिले, तूं स्वतः केवळ विषयधुंद होऊन पापमार्गी झालीस, पण जिच्या पोटाकरितां पाप करावें लागलें, ती तुझ्या दृष्टीसमोर देखील खपली नाहींना ? असो.

रूपर्टनीं त्या दोघांना तेथेंच उभें केलें. व आपण दार उघडून आपल्या पात्राचा बाहेर घालविलें. नंतर पुन्हां ते या दोघांजवळ आले व मोठ्यानें हांसून ह्मणू लागले: " खरोखर अशी मजा आपण कधीं पाहिली नव्हती बोवा! "

" महाराज एवढ्याचकरितां मला येथें उभें केलें काय? " क्यापटननें रागानें विचारलें.

" तर मग आपण सर्व मिळून एकदम हसूं या. तुमच्यावर मी अब्रूच्या नुकसानीची फिर्याद लावीन अशी तुह्माला भीति वाटूं देऊं नका. कारण आम्ही नवराबायको आमच्या मर्जीप्रमाणें वागत असतों."

या दोघांमध्यें पूर्वी झालेला ठराव आपल्या प्रियकरास कळावा अशी तिची मुळींच इच्छा नव्हती. ह्मणून तिनें रूपर्टकडे पाहिलें. परंतु त्यानें तिकडे लक्ष न देतां बोलण्यास सुरुवात केली. " प्रिये, ज्या शर्तीवर तूं आपल्या प्रियकराला आज घरांत घेतलेंस ती शर्त त्यांना माहीत असणें प्रशस्त नव्हे काय ! " नंतर तो क्यापटनकडे वळून ह्मणाला: " मी तुह्माला पूर्वीच सांगितलें आहे कीं, माझ्यापासून भिण्याचें तुह्माला कांहीं कारण नाहीं. परंतु तुह्मी मला, मी भित्रा आहे, किंवा माझ्यांत पाणी नाहीं असें समजू नये एवढ्याकरितां कोणत्या कारणानें मी तुमची गय करतों हें मला स्पष्ट करून सांगितलें पाहिजे. "

" तर मग मला माझ्या खोलींत जाऊं द्या. " असें ह्मणून सिसिला जाण्याकरितां उठली. परंतु रूपर्टनें लागलीच तिला हात धरून खालीं बसविलें.

" छे छे, मी यांना सांगणार तें खरें आहे कां नाहीं हें पाहण्याकरितां तूं येथें असलेंच पाहिजे. " असें तो ह्मणाल्यावर तिला निरुपायानें बसणें भाग पडलें. व रूपर्टनें आपल्या बोलण्यास सुरुवात केली.

" आमच्या परस्परामध्यें असें ठरलें आहे कीं, विवाहबंधनाचा विचार मनांत न आणतां आह्मी वाटेल तसें वागावें. हा प्रकार दिसण्यांत चमत्कारिक आहे,

तरी खरा आहे. ह्मणून तुमच्याबद्दल तिच्याशीं भांडण्याला मला हक्क नाहीं, व जी स्त्री माझ्याकडे आली होती तिच्याबद्दल भांडण्याला माझ्या बायकोलाही हक्क नाहीं. तिनें फक्त तुमच्यावरच मन ठेवलें व तुह्मालाच फक्त तिच्या आलिंगनसुखाचा लाभ मिळाला याबद्दल आतां तुह्माला किती आनंद मानावयाचा असेल तो खुशाल माना."

"तर मग माझ्याबद्दल तुमच्या मनांत बिलकूल राग नाहीं." त्यानें आश्चर्य वाटून विचारलें.

"मुळींच नाहीं! उलट तुह्मी आह्मी आतां मित्र झालों."

इतकें झाल्यावर क्याप्टन रूपर्टला रामराम करून उठले. त्याबरोबर रूपर्टही मोठ्या सभ्यपणानें उठून त्याला दाराबाहेर पोंचविण्यास आला.

रूपर्ट पोंचवून आल्यावर सिसिला त्याला ह्मणाली. "आपले दोघांचे करार मदार झाले असून तुह्मी काय केलेंत हें!"

"प्रिये तूं ज्या रीतीनें माझ्या मनुष्याशीं वागलीस, त्याप्रमाणें मलाही थोडेंसें वागावेंसें वाटलें. शिवाय, ही गोष्ट मी त्याला न सांगतों तर तो माझ्या ठिकाणीं पाणी नाहीं असें समजता. तर तें मी कां करूं द्यावें बरें?"

"परंतु तो आपल्या मनांत माझ्याविषयीं काय ह्मणेल बरें?"

"त्याची तुला मुळींच भीति नको. तूं जें त्याला सांगितलें आहेस कीं, तुमच्या वांचून मला कोणी पुरुष ठाऊक नाहीं. त्यावर भुलूनच तो तुझ्याकडे येईल, शिवाय मी आज रात्रीं फ्रान्सला जाणार आहेच कीं नाहीं? असो. त्याबद्दल आतां वाटाघाट नको. जो आपला करार झाला आहे त्याप्रमाणें वागत जा. आणि माझ्याकडे जर कोणी आलें तर त्याचा असा अपमान करीत जाऊं नकोस."

"पण माझ्या घरांत कसबीण काय ह्मणून?" सिसिला ह्मणाली.

"आणि माझ्या तरी घरांत माझ्या बायकोचा यार काय ह्मणून?"

"त्यांची माझी कांहीं तरी बरोबरी लागेल. परंतु असली हलकट रांड—"

"पुरे करा शहाणपणा. चाकर माणसें आतां येतील, आपल्या खोलींत जाऊन पडा कशा!" इतका प्रकार होऊन हा भाग येथें संपला.

# भाग १२४.

## व्यभिचारिणीचा ढालगजपणा.

सिसिला मेहून उठून आपल्या खोलींत जाऊन रडत बसली. हें

रडणें, तिला आपल्या आचरणाचा पश्चात्ताप होऊन आलें होतें असें नव्हे, तर आपल्या नवऱ्यानें आपल्या नूतन प्रियकराला ज्या गोष्टी सांगितल्या, त्या ऐकून त्याचें मन आपल्याविषयीं कसें कलुषित होईल याबद्दल तिच्या मनांत काळजी उत्पन्न होऊन हे दुःखाश्रु चालले होते. कारण **क्यापटन फिझार** हा श्रीमान् गृहस्थ असून भोळा होता, व त्याचा, आपला धोतालपणा पुरविण्याकडे, व विषयवासनातृप्तीकडे उपयोग करण्याचा या साहसी स्त्रीनें विचार केला होता.

असें कोणी समजूं नये कीं, **क्यापटन**चे कर्तव्याकर्तव्य विचार अगदीं श्रेष्ठपदास पोचलेले होते. छे, मुळींच नाहीं. परंतु सकाळचा हा प्रकार पाहून कोणाही मनुष्याची छाती दंग होण्याचा संभव होता. मग या संबंधानें याच्या मनाला विलक्षण वाटलें असेल यांत नवल नाहीं. तिला रडूं येण्याचें कारण तरी हेंच होतें. जेव्हां तिच्या मनांत हे सर्व विचार आले, तेव्हां तिचा क्रोध अनिवार होऊन ती बोलूं लागली:

" अरे मांगा——जसा कांहीं माझा सूड घ्यायलाच जन्मास आलास. ओळख झाल्यापासून एकसारखा हातधुवून माझ्या पाठीस लागला आहे. अगदीं तरुण असतांना मला नादीं लावलें. आणि शेवटीं, दुर्लौकिकाच्या भितीनें अधमाला लांच देऊन त्याशीं लग्न करणें भाग पडलें. अरेरे ! काय माझी आतां स्थिति झाली ही ? बापानें सोडलें. व ज्याला स्वतांचेंच पोट भरतां येत नाहीं अशाशीं गांठ पडली. नाहीं तर माझ्या सारख्या, सरदाराच्या मुलीला, हे **ग्रीनवुड** आणि हे **क्यापटन** काय करायचे होते? असल्या या भिकारड्या नवऱ्याची बायको होण्यापेक्षां, एखाद्या श्रीमंताची मी रांड होऊन राहिलें असतें तर मला किती सुख झालें असतें ! "

असें ह्मणून ती पलंगावरून उठली, व आरशा जवळ जाऊन तिनें केश सावरले. नंतर आपलें तोंड त्यांत पाहून ह्मणते: " किती तरी मी वेडी आहे? झाल्या गोष्टीबद्दल मी कशाला रडत बसलें आहे ? पुढचा मी विचार करीन तर कांहीं फायदा तरी होईल. मी तरुण असून सुस्वरूप आहे हें हा आरसाच मला सांगत आहे. या दिवशीं आमच्या **रोजिनाल्ड ट्रेसी** महाराजांनीं माझ्या स्वरूपाची फारच स्तुति केली. त्यांच्यासारख्या एकनिष्ठ धर्मोपदेशकाला व ज्यांनीं शेवटपर्यंत कडकडीत ब्रह्मचर्य व्रताचा संकल्प केला आहे, अशा पवित्र मनुष्यालाही जर माझ्या स्वरूपाचा मोह पडला, तर मी काय करणार नाहीं ? "

असें ह्मणून कांहीं वेळ ती आरशांत पहात उभी राहिली.

नंतर, आपल्या नवऱ्याचें घर सोडून, अंशतः जो कांहीं तिच्यावर त्यांचा प्रतिबंध राहिला होता तो दूर करण्याचा तिनें निश्चय केला. **क्यापटन फिझार**वर तिनें आपले प्रीतीपाश टाकले होतेच, त्यांत तो बद्ध झाला तर बरेंच, नाहीं तर त्याच्या पेक्षांही सुंदर, श्रीमान् असे गृहस्थ इच्यावर भुलून पडणारे थोडे आहेत असें नाहीं; असा विचार करून तिनें प्रथमतः त्याला एक पत्र लिहिलें:

" प्रियकरा एकवार मला येऊन भेटून जावें. आज रूपर्टनें तुह्माला जें सांगितलें त्याबद्दल मला पुष्कळ बोलायचें आहे. त्यानें मला कमीपणा आणणारा जो भाग सांगितला तो केवळ आपला भित्रेपणा झाकण्याकरितां आहे. आपण तीन वाजता यावें मी एकटीच आहे."

हें पत्र तिनें आपल्या विश्वासू दासी बरोबर त्याच्याकडे पाठविलें. नंतर कोठें वर्तमानपत्र वाचण्यांत, कोठें पोषाख करण्यांत आपला वेळ तिनें घालविला. तों सरासरी दोहोच्या सुमारास इच्याकडे **अर्ल वरिंगटन** आले.

यांचा येथें येण्याचा उद्देश वाचकांनीं ओळखला असेलच. **डायनानें रूपर्ट**ला पाठविलेलें पत्र **सिसिले**जवळ आहे हें त्यांना कळलें होतें; व तें पत्र कशा प्रकारचें आहे हें समजून घेण्याचा यांचा उद्देश होता. येथें आल्यावर यानीं तिच्या जवळ त्या पत्राबद्दल गोष्ट काढली. तिनेंही तें पत्र यांना दाखवून, आपली इच्छा असल्यास तें आपल्या जवळही असूं द्यावें असें त्यांस सांगितलें. **अर्ल**नीं तें पत्र घेतलें व तिला विचारून ते आपल्या घरीं परतले.

तीन वाजण्याचा सुमार झाला तशी **सिसिला** आपल्या प्रियकराची वाट पाहत बसली. तों बरोबर तीन वाजतां **फिझार**नें इच्या दिवाणखान्यांत पाय ठेवला. या वेळेला याची वृत्ति कशी होती तो पुढील भाषणावरून समजेल.

" प्रिया, तुमच्या तोंडावरून तुमचें मन माझ्याविषयीं कलुषित झाल्याप्रमाणें दिसतें? "

" असेंच केवळ नाहीं. परंतु या पुढें मी आतां तुझ्या मोह जाळ्यामध्यें नाहीं एवढें मात्र खरें. तुझ्या नवऱ्याची आजची वर्तणुक, तूं ह्मणतेस त्या प्रमाणें भित्र्यासारखी नसून त्यानें उघड करून दाखविलेल्या गोष्टीला अनुरूप अशी होती. **सिसिले**, तुझा नवरा कसाही असो, पण त्याच्या अंगीं

पाणी आहे. असो. आतां माझ्या संबंधानें मला बोलावयाचें आहे. जोंपर्यंत माझी अशी समजूत होती कीं, तूं फक्त माझ्या करितांच आपल्या पातिव्रत्यावर पाणी सोडलें आहेस—व माझ्यावरच फक्त तुझें मन जाऊन तुला वचन भंग करावा लागला आहे तोंपर्यंतच, परस्त्रीवर लोभ ठेवणें हें जरी पातक होतें तरी तुझ्यावर माझी प्रीति होती. परंतु जेव्हां मला असें आढळून आलें कीं, माझ्या करितां तुला कोणतीही विशेष गोष्ट करावी लागली नाहीं, तेव्हां माझे एकदम डोळे उघडले व या मोहांत कांहीं जीव नाहीं अशी माझी खात्री झाली."

"मला हें सांगून माझें मन दुखविण्या करितां तुम्ही आला काय?"

"तुझें मन दुखविण्याकरितां मुळींच नव्हे, तर आपला आतां कांहीं संबंध नाहीं, असें उघड सांगण्याकरितां आलों आहें."

सिसिलेला आपला अतिशय अपमान झाला असें वाटून तो जितका तिला प्रिय होता, तितका ती त्याचा द्वेष करूं लागली. शेवटीं तो इचा निरोप घेऊन गेल्यावर ही पलंगावर पडून, "गेली—हातची शिकार गेली." असें ह्मणाली; व लागलीच तिच्या डोळ्यांतून पाणी आलें.

पुन्हां कांहीं वेळानें ती ह्मणाली: "छे असें दुःख करीत बसण्यांत काय अर्थ आहे! आह्मा बायकांच्या स्वरूपाचें दुःख आणि संताप हे दुष्ट शत्रु आहेत. मी आतांच ह्मणालें होतें कीं, या जगांत त्याच्याही पेक्षां सुंदर, श्रीमान असे गृहस्थ पुष्कळ आहेत: मग हें दुःख काय ह्मणून?"

नंतर ती तेथून उठली, पुन्हां आरशा जवळ गेली, व आपले डोळे पुसून आरशांत पाहूं लागली. आरशांत पाहतां पाहतां रोजिन ट्रेसीनें केलेली इच्या सौंदर्याची स्तुति इनें मनांत आणली. इचें सर्व लक्ष त्याच्या शब्दाकडे लागून गेलें. जसजसा ती विचार करूं लागे, तसेंतसें, त्याच्याकडे तिचें मन ओढूं लागलें. शेवटीं ती ह्मणाली: "छत्तीस वर्षांचा, देखणा, श्रीमान, अविवाहित आणि मंडळींत हिंडणारा असा पुरुष बायकांच्या सौंदर्यापुढें हळमळूं नये काय? छे, असें कधीं नाहीं व्हायचें. त्याला माझा प्रभाव दाखवीन तेव्हांच राहीन. ठीक आहे, आतां त्याच कामला लागतें."

---

## भाग १२५.

### समेट.

कार्ले, सिसिलेकडून निघाले ते थेट कायना ज्या भोजनालयांत आजारी

पडली होती तेथें आले. तेथें आल्यावर त्यांनीं **चेटवर्थ**कडून तिची कितपत आशा आहे, व तिला औषधोपचार केले असतां तिचें मुळचें सौंदर्य कायम राहील कां नाहीं याबद्दल खुलासा काढून घेतला. डाक्टरानें, माझ्याकडून तिला पूर्वस्थितीवर आणण्याला होईल तितका प्रयत्न मी करीन असें सांगितलें. व **अर्ल**नींही, जर डायनाचें सौंदर्य कायम राहिलें तर तुमचें जन्माचें दारिद्र्य विच्छिन्न करीन असें त्यास वचन देऊन एकवार तिची भेट घेण्याची आपली इच्छा दर्शविली; परंतु तिचा विरूप झालेला चेहेरा पाहून यांचें मन कदाचित् फिरेल या भीतीनें तिला भेटूं देण्याविषयीं तो अनमान करायला लागला. शेवटीं निदान मला तिच्याशीं दोन शब्द तरी नुसते बोलूं द्या, अशी त्यांनीं आपली इच्छा दर्शविली;तेव्हां त्यांचें ह्मणणें मान्य करून, **डायना** ज्या खोलींत पडली होती तेथें सर्व अंधार केल्यावर डाक्टरनें **अर्ल**ला तेथें नेलें. **अर्ल**ना **सिसिले**कडे जाण्याचा उद्देश कोणता व **डायना**च्या येथून गेल्यावर त्यांच्या मनाची कशी स्थिति झाली हें त्यांच्या पुढील भाषणावरून समजेलच.

तिच्या बिछान्याजवळ एका खुर्चीवर बसल्यावर ते ह्मणूं लागले: " **डायना** माझ्या कालच्या अपराधाबद्दल क्षमा करशील ना ? "

" महाराज मला रागच आला नाहीं तर मी क्षमा तरी कशाची करायची ? "

" **डायना** मी तुझा मोठा अपराध केला, पण आपली चूक कबूल करण्याची मला बिलकूल आढ्यता नाहीं. मी उपहासाला भ्याल्यामुळें माझ्या हातून असा अविचार झाला. शिवाय माझ्या मनांत एक संशय आला, त्यामुळें माझें मन अस्वस्थ झालें. परंतु तो संशय आतां फिटला. मी तुझें तें पत्र वाचलें. त्यावरून तुझी सचोटी व उदारपणा पाहून माझ्या मनाला समाधान झालें. "

" पूर्वीप्रमाणें आपलें मन माझ्याविषयीं निर्मळ राहण्याबद्दल आपण तसदी घेतलीत हे माझ्यावर आपले फार उपकार झाले. "

" न्यायानें वागण्यांत कांहीं उपकार होत नाहीं. आजच्या वर्तमानपत्रांत रात्रींची भयंकर हकीकत वाचून माझा मला अतिशय पस्तावा झाला. व तुझ्या सहवासानें जें जें मला सुख मिळालें त्याची आठवण होऊन मला गहिंवरून आलें. लागलींच मी आपल्या चाकराला येथें धाडून तुझी चवकशी करविली. त्यानें सांगितलें कीं, तुझ्याबद्दल आतां फारशी भीति नाहीं. "

" पण महाराज आतां आजन्म मी विरूप आहें ! "

" देव करो, आणि असें न होवो. डाक्तरला आशा वाटत आहे, असें तो ह्मणतो. "

" महाराज, शरिराची जखम बरी करण्याकरितां मनाचें समाधान करीत असावें असें वैद्यशास्त्रच सांगत आहे, पण अशी निष्फळ आशा मनांत बाळगणारी मी वेडी बायको नाहीं. "

" डायना, असा धीर सोडूं नकोस. तूं बरी होशील. आणि जरी कदाचित् थोडीशी खूण राहिली—"

" नाहीं हो—महाराज. माझें सर्व शरीर होरपळून निघालें आहे. तें आतां कशानेंही बरें होण्याची आशा नाहीं. माझा सर्व जन्म फुकट गेला. अरे देवा! मी हें दुःख सहन तरी कसें करावें !" असें ह्मणून ढसा ढसा ती रडूं लागली. व अर्ल तिचें रडून तरी कांहींसें समाधान होईल या समजुतीनें कांहीं बोलले नाहींत.

नंतर अर्लनीं तिला सिसिलेकडून पत्र कसें आणलें वगैरे मजकूर सांगून शेवटीं ते ह्मणाले:"तुझ्याबद्दल डाक्टराला मी सर्व सांगून तुझी व्यवस्था केली आहे. आतां या गजबजलेल्या वस्तींतून, तुला तो आपल्या घरीं निवांत जागेंत नेणार आहे. तो हुशार व शहाणा दिसतो, त्यामुळें त्याच्यावर माझी पूर्ण श्रद्धा बसली आहे. "

" तो हुशार आहे यांत कांहीं शंका नाहीं. त्याच्याच उपायांनीं माझ्या वेदना पुष्कळ कमी झाल्या. "

" तुला जिकडून सुख होईल, ती गोष्ट करण्याबद्दल व्यवस्था केली आहे. तसेंच जो जिन्नस व जितका पैसा लागेल तो पुरविण्याबद्दलही तजवीज केली आहे समजलीस ? "

" महाराज किती माझ्यावर तुमचे उपकार आहेत हे! "

" परंतु तूं अगदीं—अगदीं बरी होईपर्यंत मी तुला भेटणार नाहीं. मी दुरून तुझी चौकशी करीत जाईन. मी जातों आतां. "

" यांव महाराज, फिरून आपली गांठ केव्हां पडेल ती पडो. तो दिवस कसा येतो कोण जाणें. जर सुदैवानें आपल्या मनाप्रमाणें गोष्ट झाली तर बरेंच आहे. नाहीं तर महाराज मी आपलें हें तोंड कधींही दाखविणार नाहीं. कोठें तरी, जेथें मला कोणी ओळखणार नाहीं अशा ठिकाणीं जाऊन राहीन. "

" असा प्रसंग तुजवर कधीं येणार नाहीं बरं. " असें तिचें समाधान करून ते तेथून निघाले. वाटेंत त्यांनीं पुन्हां डाक्टराला तिच्याबद्दल विशेष श्रम घ्यावयास सांगून ते घराकडे परतले.

## भाग १२६.

### रेजिन ट्रेसी.

हा रविवारचा दिवस होता. त्या दिवशीं सकाळीं सेंट डेव्हिडच्या देवळांत स्त्रीपुरुषांची गर्दी जमू लागली असून त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनीं गाड्यांची एक सारखी रांग लागली होती.

देवळाच्या आंतील प्रांत विस्तीर्ण व उंच असून त्याची आकृति लांबट होती. तिन्ही बाजूंनीं मोठाले सज्जे असून, त्यांत नाटकगृहाप्रमाणें निरनिराळ्या खोल्या काढल्या होत्या. दरवाज्यासमोरच वेदी असून त्याच्या थोडें पाठीमागें व्यासपीठ असे. सज्जावर व सभामंडपांत बसण्याच्या जागीं गादीच्या खुर्च्या ठेवल्या होत्या. व गरिबांकरितां बाजूच्या दोन दालनांत साधीं बाकें टाकलीं असून त्यांना येण्याकरितां एक लहानसें दार ठेवलें होतें. ह्मणजे त्यायोगानें त्यांना, भपकेदार पोषाखांच्या व थोरल्या दरवाज्यांतून येणाऱ्या कुलीन स्त्रीपुरुषांच्या गर्दींत मिसळतां येऊं नये. असो.

गरिब लोकांना सोडण्याकरितां दारावर पोलिस शिपाई ठेवलेला होता, व ज्यांना थोरल्या दरवाज्यानें येण्याचा हक्क आहे अशा श्रीमान, कुलीन व बडेजावी लोकांचें स्वागत करण्याकरितां, देवळांतील दोन हलक्या दरजाचे धर्मोपदेशक दारावर उभे होते. हे दोन धर्मोपदेशक दाराजवळ कोणी आलें ह्मणजे मोठ्या नम्रतेनें ह्मणत होते, " महाराज या रस्त्यानें जायचें, बाईसाहेब हलकेंच पाऊल टाकावें, आपणास बसविण्याकरितां तेथें व्यवस्था केली आहे. " अशा तऱ्हेचा दारावर यांचा आदर सत्कार होत होता. आणि बाजूच्या दारावरचा पोलिस घसा फोडून पुढचे शब्द बोलत होता:—

" ए बाई कोठें चाललीस ? अंगावर तर फाटक्या चिंध्या आहेत, आणि ह्मणते चांगली जागा पाहिजे. ए काऱ्या मागें हो, नाहीं तर गचांड्या देईन पहा. ए थेरडे तूं कशाला आलीस मरायला येथें ! " अशा तऱ्हेच्या शब्दानें त्यानें ते लोक एकदांचे आंत ढकलले. व आपण आंत शिरून तें दार जोरानें लावून घेतलें.

अंत अगदीं गर्दी झाली होती. व जी निरनिराळ्या दर्जाची मंडळी आली होती, ती केवळ भक्तीनेंच नसून, संप्रदाय, व कर्मणुक ह्मणून आली होती ह्मटलें तरी चालेल.

प्रथमतः सुस्वर वाद्यवादनाच्या नादानें तें पवित्र मंदीर घुमूं लागलें. आणि नंतर गायनपटु अशा बारा तरुणांनीं प्रातरुपासनेस सुरुवात केली.

व्यासपीठाच्या एका बाजूला एक वृद्ध प्रेषीत बसला होता, व दुसऱ्या बाजूला, ज्याच्याकडे सर्वांचे डोळे लागले आहेत, असा **रेजिनाल्ड ट्रेसी** बसला होता. त्याच्या ठिकाणीं लोकांचें मन आकर्षण करण्याचे दुसरे कोणते जरी गुण नसते, तरी याचा नीटस व मोहक बांधाच लोकांच्या मनावर ठसा उमटविण्याला कारण झाला असता. त्याच्या चालचलणुकींत, व स्वभावांत अतिशय— परंतु ज्यांत दांभिकपणाचा लेशही नाहीं असें गांभिर्य असे. व या वेळेला तो जरी तोंडानें प्रार्थना ह्मणत नव्हता, तरी त्याच्या अंतःकरणांत ते शब्द उमटत असत. कारण वरचेवर तो आपल्या प्रार्थना पुस्तकाकडे पहात असे. जरी त्याला ठाऊक होतें कीं, माझ्याकडे सर्वांचें लक्ष्य लागलें आहे तरी त्यानें कोणत्याही रीतीनें ही गोष्ट व्यक्त करून दाखविली नाहीं. त्याच्या वृत्तींत वाह्यात ईश्वरचरणीं तल्लीनत्वही नव्हतें, व बाह्यात्कारीं धार्मिकपणाचें ढोंगही नव्हतें. तरी त्याच्याविषयीं लोकांत पूज्यभाव उत्पन्न होईल इतपत त्याची धर्मावर श्रद्धा असे.

शेंकडो स्त्रियांचे नेत्र त्याच्याकडे लागले होते. व अल्प वयाच्या मुली आपल्या पुस्तकाकडे न पाहतां, आपल्या बह्मरत्या दृष्टीनें त्याच्या तोंडाकडे पहात होत्या. असो.

वाद्यांच्या सुराबरोबर चाललेल्या प्रार्थनेच्या घोषाचा गंभीर प्रतिध्वनि त्या पवित्र मंदिरांत घुमत होता. इतक्यांत सर्व सभामंडपांत चळवळ झाली. व सर्वांचें लक्ष्य व्यासपीठावर आलेल्या **रेजिनट्रेसी**कडे लागलें. त्याबरोबर प्रार्थना थांबून उपदेशास सुरुवात झाली. हा उपदेश वाचकांना ऐकत बसविण्याची आमची इच्छा नाहीं; आह्मी इतकें सांगतों ह्मणजे झालें, कीं, त्याची वक्तृत्वशक्ति व या वेळेचा त्याचा प्रतिपाद्यविषय हीं त्याच्या आजपर्यंतच्या उज्वळ कीर्तीला अनुरूप अशीं होतीं.

परंतु एकंदर श्रोतृसमाजामध्यें याच्या उपदेशाचा संस्कार **सिसिले**च्या अंतःकरणावर झाला तसा दृढीव पडला, तसा इतर कोणाच्याही दिसत नव्हता.

ती व्यासपीठाजवळच्या भागांत एकटीच असून तिनें ती जागा मुद्दाम आपल्या उपयोगाकरितां भाड्यानें घेतली होती. उपदेश संपून सर्व मंडळी गेली तरी हिनें आपली जागा सोडली नाहीं. शेवटीं त्या पवित्र मंदिरांत ही व तेथलींच दोन तीन मनुष्यें यांशिवाय कोणी राहिलें नाहीं ! तेव्हां तिनें त्यांपैकीं एकाजवळ, मला घेरी येत आहे ह्मणून सांगून थोडेंसें पाणी मागितलें. त्याबरोबर त्या मनुष्यानें जाऊन पाणी आणलें. इतक्यांत **रेजिन**ही स्वत: हजर झाले; व त्यानें त्या मनुष्याच्या हातांतला पेला आपल्या हातांत घेऊन **सिसिले**पुढें केला व तिला विचारलें: " आपली तब्येत अस्वस्थ झाली काय ?"

" अतिशय गुदमरल्यानें मला निरमिरी आल्यासारखी वाटते. परंतु आपल्याला फार तसदी पडली याबद्दल मी आपली फार आभारी आहे. पाणी प्याल्यानें मला आतां बरें वाटतें."

" मला वाटतें घटकाभर एकीकडे बसून विश्रांति घ्याल तर आपल्याला थोडा आराम वाटेल." तो खऱ्या हेतूनें बोलला.

या गोष्टीला तिनें रुकार दिल्याबरोबर त्यानें तिचा हात धरून तिला दुसऱ्या जागेंत नेलें. तेथें आल्यावर ती ह्मणाली: " आपल्याला इतके श्रम पडले याचें मला वाईट वाटतें. परंतु या उकाड्यामुळें व खरें पुसाल तर आपल्या उपदेशानें अंत:करणांत जे तरंग उत्पन्न झाले त्यामुळें माझें अवसान जाग्यावर राहिलें नाहीं."

"आज देवळांत फारच दाटी झाली होती खरी." तिच्या शब्दावर तो इतकेंच बोलला.

" तथापि हें क्षुल्लक कारण आपल्या उपदेशामृताचें नित्यशः सेवन करण्यास मध्यें आड येईल असें आपण मनांत आणूं नये." असें ह्मणून दोघांनींही किंचित् हास्य केलें. नंतर कांहीं वेळ गेल्यावर ती ह्मणाली: " आतां मला कांहींसें बरें वाटत आहे. तेव्हां मी आपली आज्ञा घेतें. आपल्याला मात्र माझ्याबद्दल तसदी पडली."

" परंतु अशा स्थितींत आपल्याला एकटें जाऊं देणें मला प्रशस्त दिसत नाहीं. करितां मी येतों आपल्याबरोबर. मलाही त्याच रस्त्यानें जायचें आहे."

सभ्यपणाला अनुसरून तिला या गोष्टीला हरकत घेतां येईना, ह्मणून तिनें घरापर्यंत त्याची सोबत पतकरली. वाटेनें चालतां चालतां त्याच्या धंद्याला अनुरूप असा विषय जरी तो बोलत होता, तरी तिनें बोलण्यांत एक दोन

नाजूक मुद्दे काढून त्यांत, आजचें तुमचें भाषण आपण लक्ष्यपूर्वक ऐकत होतों असें दर्शविलें.

असो. शेवटीं ते सिसिलेच्या घराजवळ आले. त्या बरोबर तिनें त्याला चालीप्रमाणें, घर पाहून जा ह्मणून सांगितलें. परंतु त्याला खरोखरीच दुसरीकडे जायचें असल्यामुळें त्याच्यानें इच्या ह्मणण्याला रुकार देववला नाहीं. तिनें तो जातांना त्याच्या पुढें आपला हात केला व त्याचाही हात कांहीं वेळ आपल्या हातांत धरला. वास्तविक हा प्रकार स्वाभाविक होता; परंतु तिच्या नाजूक हाताचा किंचित् स्पर्श झाल्याबरोबर त्याला कधींही माहीत नाहीं, असा विकार त्याच्या हृदयांत उत्पन्न झाला, व त्याचा संचार सर्व शरिरांत होऊन त्या-पासून एक प्रकारचें सुख होत आहे असें त्याला वाटूं लागलें.

शेवटीं तो तिचा विचारून निघाला; वाटेनें जातां जातां त्याचें मन त्याच्या डोक्यांतील गहन विचारापासून फिरून, त्यानें सिसिलेबरोबर जो सुखकर वेळ घालविला त्याकडे वरचेवर परतत असें.

---

# भाग १२७.

## दोन सुखाचे शब्द.

दुसऱ्या दिवशीं मुद्दाम सिसिला प्रार्थनेकरितां देवळांत गेली नाहीं. तिला ठाऊक होतें कीं, दुसरा कोणताही हेतु मनांत नसला तरी, निदान शिष्टाचाराकरितां, रेजिन ट्रेसी माझ्या समाचाराला येतीलच. ह्मणून तिनें या दिवशीं नखरा करण्याच्या कामांत जरा विशेष तसदी घेतली होती. सरकार्ट आपले कंठमणी चोस्टर यांच्याबरोबर नुकतेच प्रवासाला गेले असल्या मुळें, घरांत ती करील ती पूर्व दिशा झाली होती. तिला आतां कोणाचाही प्रतिबंध राहिला नव्हता. तिची एक दासी असे तीही तिच्या अर्ध्या वचनांत असे. यामुळें इतर नोकरांचा पगार कितीही लांबणीवर पडत असला, तरी इचा वेळेच्या वेळेस पोंचत असे. असो.

नुकतेच दोन वाजून गेले होते. सिसिला एक मनोरंजक गोष्टींचें पुस्तक वाचीत बसली होती. इतक्यांत रोजिनाल्ड आल्याची वर्दी तिला कळली, तसें तिनें हातांतलें गोष्टीचें पुस्तक उशी खालीं झाकून, एक वेदांत विषयाचें पुस्तक हातीं घेतलें

" आपल्या प्रकृतीला काल आलेलें अस्वस्थ्य नाहींसें झालें किंवा नाहीं हें पाहण्याकरितां आलों आहे. " तो आल्याबरोबर ह्मणाला.

" अजुन मला बरें वाटत नाहीं. काल घरीं आल्यावर पुन्हां माझी प्रकृति बिघडली. "

" पुन्हां मी आपल्याला देवळांत पाहिलें नाहीं त्यामुळें असा कांहीं प्रकार असेल असें मला वाटलेंच. "

" महाराज, जेथें गहन विचाराच्या गोष्टी ऐकायला सांपडतात तेथें प्रकृतिमुळेंच माझें येणें झालें नाहीं;नाहीं तर महाराज ज्यांच्याकडे आह्मासारख्या गरीब प्राण्याचें दुःख विमोचन करण्याचा, पाप नाहींसें करण्याचा अधिकार दिला, त्यांच्याकडे जाऊन आह्मीं आपलीं दुःखें सांगायचीं नाहीं, तर सांगायचीं तरी कोणाकडे ? आमच्या मनाला समाधान तरी कोठून मिळावयाचें मग ? व आह्मी ईश्वरावर हवाला टाकायला तरी कोठें शिकायचें ? अहाहा ! महाराज, आपल्या सारख्यांचा उपदेश गृहसौख्याच्या कामांत किती ठिकाणीं तरी उपयोगी पडतो ? व प्रापंचिकाच्या आत्म्याची तळमळ शमविण्याला आपलें शब्दामृत किती तरी उत्तम औषध आहे ? महाराज मला असें वाटतें कीं, माझ्या संसारांत मला जीं दुःखें सोसावीं लागत आहेत, तीं सर्व आपल्या उपदेशानें नाहींतशीं होतील. "

" तर मग मला तुह्मी आपला मित्र असें समजा. " आपली खुर्ची जरा आलीकडे घेऊन तो ह्मणतो. " माझ्या उपदेशानें व माझ्या कर्तव्यकर्मानें एका मनुष्याला जरी हा संसारमार्ग सुलभ वाटला तरी मी आपल्याला धन्य समजेन. "

" महाराज, माझ्यावर आपले महन् उपकार होतील. आपल्या मित्रत्वाचा मी आनंदानें स्वीकार करीन. " असें ह्मणून तिनें आपला हात पुढें केला.

त्यानेंही तो आपल्या हातांत घेतला. कारण ही मित्रत्वाची खूण गांठ आहे असें तो समजला. परंतु त्याच्या मनांत कपट नव्हतें. त्या मृदु, कोमल, व नाजूक हाताचा स्पर्श झाल्याबरोबर फिरून त्याला हा वेळ पर्यंत माहीत नाहीं, अशा विकाराचा संचार त्याच्या हृदयांत होऊन,त्याचे गाल टवटवीत दिसू लागले.

सिसिला, आपलें मोहजाल, आपण अनुमान केलें होतें त्यापेक्षांही जलदीनें पसरत चाललें आहे असें पाहून ह्मणाली: " महाराज, यापुढें माझ्यापेक्षां निस्सीम उपासक आपल्याला मिळणार नाहीं. परंतु मला जें समाधान पाहिजे आहे तें देण्याकरितां आपण मात्र थोडीशी वेळ काढली पाहिजे. "

" जे आपण होऊन परमार्थ प्राप्तीच्या इच्छेनें माझ्याकडे येतात, त्यांचें जर मी समाधान न करीन तर ज्या पवित्र मार्गानें मी आचरण करीत आहे त्याला वट्टा लावल्यासारखें होईल."

" महाराज, या प्रापंचिक यातायातीपासून सुटण्याविषयीं मी प्रयत्न करतें कीं नाहीं, हें हें पुस्तक पाहूनच आपण विचार कराल." असें ह्मणून तिनें आपल्या हातांतील वेदांतविषयक पुस्तक त्याला दाखविलें.

या वेळेला ती कोचावर बसली होती ह्मणण्यापेक्षां, कोचाच्या उजव्या बाजूला आपलें अंग टाकून पडली होती असें ह्मटलें तरी चालेल. तेव्हां अर्थातच तिच्या हातांतलें पुस्तक पाहण्याकरितां, त्याला तिच्या अंगावर ओणवें व्हावें लागलें. या वेळेला याच्या केसांचा स्पर्श तिच्या केसाला झाला व याचें तोंड तिच्या अगदीं तोंडाजवळ गेलें तरी, तिनें आपलें मस्तक मागें घेतलें नाहीं. व याच्याही मनांत विपरीत विचार आला नाहीं. तथापि, यापूर्वी जेव्हां जेव्हां तिचा स्पर्श याला होऊन, याच्या शरिरांत एक प्रकारचा संचार झाला, त्याप्रमाणें याही वेळेला त्याच्या शरिरावर रोमांच उभे राहिले. व त्यानें तिच्या हातांतील पुस्तकावरची दृष्टी सोडून त्या कोंचावर मजेनें पडलेल्या तिच्या नाजूक व मनोहर शरिराकृतीकडे नजर फेकली. त्याबरोबर तिनेंही आपली दृष्टी याच्याकडे लावली—ती अशी कीं, तिच्या नेत्र कटाक्षांनीं त्याच्या वृत्तीची गडबड उडून राहिली.

तरी आपली काय स्थिति झाली हें त्याला समजलें नाहीं. तो जाण्याकरितां जेव्हां उठला, तेव्हां, जसा एखादा मनुष्य मद्यपानानें धुंद झाला ह्मणजे मोकळ्या हवेंत जाण्याची इच्छा करतो, तशी त्याची स्थिति झाली होती. असो.

त्यानें तिचा निरोप घेतला. व तिनेंही पुनरपि लवकर दर्शन देण्याविषयीं त्याला स्मरण देऊन ठेवलें. त्यानें आपल्या घड्याळांत पाहिलें, तों बरोबर दोन तास आपला काळ येथें गेला असें त्याला समजलें.

तो बाहेर पडतो तोंच पुढच्या दरवाज्याच्या पायरीवर आमच्या वाचकांच्या ओळखीची थेरडी सर्पाप्रमाणें आपली दृष्टि याच्याकडे लावून उभी होती. तिला पाहतांच एकदम याचा नूर उतरून जाऊन, याच्या मनानें कचर घेतली.

# भाग १२८.

## मोह.

मनुष्याच्या स्वभावधर्माची **सिसिले**ला चांगली ओळख झाली होती. **ट्रेसी**-च्या अंत:करणरूपी इमारतीची दुर्बळ बाजू कोणती आहे ती ओळखून तिच्या वाटें तिनें एकदम त्याच्यावर हल्ला केला, व त्या इमारतीचें दंभरूपी द्वार फोडून त्याच्या अंत:करणांत प्रवेश केला.

आजपर्यंत याचें वर्तन इतकें शुद्ध, पवित्र आणि धार्मिकपणाचें असे कीं, ज्या भयंकर दुर्व्यसनांनीं इतरांना अगदीं जर्जर करून सोडलें, त्या त्याला अगदीं अज्ञात होत्या. तथापि मनुष्यजातीच्या ठिकाणीं जें कांहीं वैगुण्य असतें, त्याप्रमाणें हाही आत्मस्तुतिप्रिय होता, हें एक याच्या ठिकाणीं वैगुण्य असे.

हें वैगुण्य जोंपर्यंत याचा लबाड लोकांनीं फायदा करून घेतला नाहीं तों-पर्यंत क्षम्य व क्षुद्र आहे. परंतु हें एकवार त्यांच्या तावडींत गेलें ह्मणजे तें कितो-ही हलकें, किंवा कितीहि सुखकारक असलें तरी तें आपला नाश केल्याशिवाय कधींही राहत नाहीं.

दांभिकपणाचें बीजारोपण, हें महा हानिकारक आहे. याला एकवार मुख-स्तुतिरूप जीवन मिळालें, ह्मणजे त्याच्या विषारी मुळ्या अंत:करणरूप सुपीक भूमीवर तेव्हांच पसरतात. आणि त्या प्रत्येक मुळीचें झाड होऊन तें इतकें वि-षारी, इतकें उफाड्याचें, व इतकें अनर्थावह बनतें कीं, तें प्रत्यक्ष विषवृक्षालाही मागें टाकील.

आह्मीं आतां सांगितलेंच कीं, **रेजिन ट्रेसी**चें आजपर्यंत वर्तन शुद्ध असे. त्यानें आपली विद्यार्थीदशा निष्कलंकपणानें संपविली होती. व पुढेंही तो मं-डळींत जाई येई तरी त्याचें वर्तन असें चोख असे कीं, त्याचा इतरांनीं कित्ता घ्यावा. अशा तऱ्हेची त्याची स्थिति असतांना, ज्या पुरुषाच्या हातून साऱ्या छत्तीस वर्षांत एकही असें कृत्य घडलें नाहीं कीं, त्याचा त्याला पश्चात्ताप हो-ईल, अशा पवित्र—अशा सद्वर्तनी—व अशा पूज्य मनुष्याला त्या मायावी **सिसिले**-नें आपल्या मोहजालांत आणण्याचें मनांत आणलें. असो.

**रेजिनाल्ड** इचा निरोप घेऊन निघून गेल्यावर दार लागल्यावरोबर **सिसिल** आपल्याशीं ह्मणाली: " ठीक आहे. आतां फिरून तो माझ्याकडे आलाच पा-हिजे." व त्याप्रमाणें तिचें भविष्यही खरें झालें बोवा !

बुधवारीं सकाळपासूनच इतकी थंडी पडली होती कीं, बाहेर निघण्याची एकाची सोय नाहीं. पाऊस नुकताच पडून रस्त्यांतून पाणीच पाणी होऊन गेलें होतें. व जरी तो आतां थांबला होता, तरी आकाशांत ढग अद्याप भरलेले दिसत होते. अशा स्थितींत सरासरी तीन वाजतां **रेजिन ट्रेसी, सिसिले**च्या घराजवळ येऊन तिचें दार ठोठावूं लागला.

**सिसिलेनें** त्याचें प्रेमपूर्वक स्वागत करून भाषण केलें: " महाराज आपण फिरून आलांत हे माझ्यावर फार उपकार झाले. आपलें उपदेशामृत प्राशन केल्यापासून माझें मन शांतिसुखाचा अनुभव घेत आहे. व आतां आपल्याला येथें पाहून मला प्रत्यक्ष ईश्वर भेटला कीं काय असें वाटतें."

" दुःखितांचें दुःख दूर करावयाचें आणि शरणागतांचें रक्षण करायाचें हें आमचें कर्तव्यकर्मच आहे."

" अहाहा ! महाराज, या संसारतापानें त्रस्त झालेल्यास आपल्या सदुपदेशापासून मिळालेली शांति पाहून आपणांस किती तरी आनंद होत असेल ! मी खरें सांगतें कीं, आपल्या पवित्र मंदिरांत शिरतांना लोकांना, त्यांचीं जीं दुखें अगदीं असह्यशीं वाटतात तींच ते तेथून बाहेर पडतात तेव्हां कांहीं हलकीं झालीं असें समजतात. हें मी स्वानुभवानें सांगत आहें. महाराज परवां माझी प्रकृति अस्वस्थ होण्याला कारण देवळांतील ऊष्णता नसून, आपल्या वाक्पटुत्वाचा प्रभाव होय ! हें मी आपल्याला सांगितलें नव्हतें—पण तें आतां लपवून ठेवण्याचें कारण नाहीं." असें ह्मणून तिनें त्याचा हात आपल्या हातांत घेतला, व एकमेकांचा करस्पर्श होतांच उभयतांच्याही शरिरावर रोमांच उभे राहिले.

शेवटीं तो ह्मणाला: " **सिसिले,** ज्यानें तुझें पाणिग्रहण केलें, अशा मनुष्याच्या हातून तुझ्यासारख्या मोहक स्त्रीची हेळसांड होते तरी कशी ?"

" महाराज, त्याला माया ह्मणून कशी ती नाहीं. ह्मणून माझें एक आपल्याला विचारणें आहे कीं, ज्याच्या दुष्ट वर्तणुकीमुळें त्याच्यावरील माझी प्रीति नाहींशी झाली, अशा मनुष्यावर आतां माझी भक्ति नाहीं याबद्दल मी ईश्वराघरीं दोषी आहें काय ?"

**रेजिनाल्डनें** तिचें हें भाषण ऐकून तिला, विवाहित स्त्रीला योग्य असा उपदेश केला. परंतु आपली त्याच्याविषयीं कशी अप्रीति झाली आहे ती तिनें सांगून ती शेवटीं उघडपणानें ह्मणाली: " महाराज, त्याच्याविषयीं फिरून प्रीति हा शब्द निघणें असंभवनीय आहे. माझें मन आतां दुसऱ्यावरच आहे."

" काय ? तुझी प्रीति दुसऱ्यावर आहे?" कांहीं संशय व कांहीं आनंद त्याच्या मनांत उत्पन्न होऊन त्यानें विचारलें.

" होय महाराज! माझ्यावर रागावा, मला शिक्षा द्या, मला ढकलून द्या, लोटून द्या, काय पाहिजे तें करा—पण तुमची मूर्ति जी या हृदयांत वसली आहे ती तेथून कधीं हलायची नाहीं. "

" सिसिले, तूं काय ह्मणतेस याचा विचार केलास काय? " त्यानें जाग्यावरून उठून विचारलें.

" महाराज, जे शब्द माझ्या तोंडांतून निघत आहेत ते अगदीं अंत:करणापासून आहेत. ह्मणून मी काय बोलतें तें एकवार ऐका, आणि मग माझी काय वाट करायची असेल ती करा. "

" मग सांग काय तुझ्या मनांत असेल तें. " पुन्हां जाग्यावर बसून तो ह्मणाला.

" आपल्याला माझ्याविषयीं कांहीं वाटलें तरी मी सांगतेंच. महाराज, आज कित्येक दिवस आपली मूर्ति माझ्या अंत:करणांत वास करीत आहे. प्रथमत: आपल्या गुणांवर मी लुब्ध झालें. परंतु पुढें आपल्याविषयीं निराळेच तरंग माझ्या अंत:करणांत उत्पन्न होऊं लागले. ज्या ज्या मार्गानें आपण जावें, त्या त्या ठिकाणच्या आपल्या चरणरजाचें मीं वंदन करावें. जे जे शब्द आपल्या मुखांतून पडावे ते मी आपल्या अंत:करणांत सांठवून ठेवावे. सबंध रात्रींच्या रात्री आपली मूर्ति माझ्या दृष्टीसमोरून हालूं नये. असा मला आपला ध्यास लागला. शेवटीं एके दिवशीं आपण सहज माझ्या सौंदर्याची स्तुति केली, ती ऐकून तर माझ्या अंत:करणांत संचार करीत राहिलेल्या विकारानें चेत घेतला. आपलें प्रेम संपादन केल्याशिवाय जगांत सुख नाहीं असें मला वाटायला लागलें. शेवटीं नित्य आपल्या दर्शनास येण्याचा मीं निश्चय केला. जों जों आपलें भाषण माझ्या कानावर पडे, तों तों माझ्या मनाची स्थिति चमत्कारिक होऊन जाई नंतर माझी काय स्थिति झाली ती आपल्याला ठाऊकच आहे. महाराज, परवांपासून अनेक वेळां माझ्या मनांत आलें कीं, आपल्यापुढें पदर पसरून आपल्याविषयीं जी प्रीति माझ्या अंत:करणांत वसत आहे ती बोलून दाखवावी. ती मीं आतां दाखविली. "

या तरुण आणि मोहक स्त्रीनें आपली प्रीति त्याच्याविषयीं प्रग-

करून दाखविली. तेव्हां ती त्याच्या अगदीं जवळ होती. तिचा कोमल करतल त्याच्या करतलाला अद्याप स्फुरण आणीत होता. तिचें मस्तक अद्याप त्याच्या खांद्यावर असून, तिच्या गौरवर्ण कपाळाचा त्याच्या गालाला स्पर्श झालेला होता. व ज्या ठिकाणीं ते बसले होते, तेथें शांतता असून एकांत होता.

त्याच्या दांभिकपणाची स्तुति करून, व जे विकार त्याच्या अंतःकरणांत खुशाल निद्रा घेत पडले होते—परंतु आतां जे ज्वालामुखी पर्वतांतील आगीच्या सोसाट्याप्रमाणें बाहेर पडण्यास तयार होते—त्यांना प्रदीप्त करून तिनें त्याच्यावर आपलें मोहास्त्र टाकलें. तिचें हें भाषण ऐकून त्याची अशी स्थिति झाली कीं, त्याच्या सर्वांगाला कंप सुटला. क्षणांत त्याला तेथून जावेंसें वाटे, व पुन्हां बसावेंसेंही मनांत येई. ही त्याच्या मनाची स्थिति **सिसिलेनें** ओळखून, ती ह्मणालीः—

" महाराज, आपल्याला माझा तिरस्कार वाटूं लागला, काय? आपली वक्रदृष्टी माझ्यावर होऊं देऊं नका. आपल्यापुढें पदर पसरून मी आपली क्षमा मागतें. माझ्यावर दया करा!"

असें ह्मणून तिनें त्याच्यापुढें गुडघे टेकले, व त्याचा हात आपल्या हातांत घेऊन त्याचें तिनें चुंबन घेतलें.

त्यानें आपला हात काढून घेण्याविषयीं थोडासा प्रयत्न केला; परंतु पुन्हां ती ह्मणाली: " नाहीं—नाहीं महाराज—तुला मीं क्षमा केली, असें मला सांगितल्याशिवाय मी तुह्माला जाऊं द्यावयाची नाहीं."

" **सिसिले,** ऊठ—ऊठ. कोणी तरी आपणाला पाहील. मीं तुला क्षमा केली ऊठ. तुझ्या ह्मणण्याप्रमाणें मी करीन—तुझें मन शांत झाल्याशिवाय मी जाणार नाहीं."

" पण फिरून माझ्याकडे याल ना? माझ्याशीं मित्रत्व सोडणार नाहींना?"

" छे—कधीं नाहीं." आवेशानें तो ह्मणाला. जणू अंतःकरणांत संचार करीत असलेल्या विकाराच्या तो पूर्ण आधीन झाला आहे.

" अहाहा! महाराज, किती आपले माझ्यावर उपकार झाले हे." असें ह्मणून तिनें एकदम त्याच्या गळ्यांत मिठी मारली. " महाराज, हें आपलें सख्य, ही आपली प्रीति आजन्म राहील?" नंतर तिनें त्याचें चुंबन घेतलें.

आपल्या बाहूंचें तिनें त्याला वेष्टन घातलें होतेंच. व तोही कांहीं वेळ या देहभान घालविणाऱ्या नव्या आनंदांत निमग्न झाला.

परंतु त्याच्या अपराधाची पूर्णता होण्यापूर्वींच तो थोडासा शुद्धीवर येऊन त्यानें तिची मिठी सोडविली. व तिचें एकवार प्रेमपूर्वक चुंबन घेऊन "सिसिले, उद्यां-उद्यां तुला मी भेटेन." असें ह्मणत ह्मणत तो बाहेर पडला.

तो गेल्यावर ती ह्मणाली: " झाला-आतां माझ्या पूर्ण अधीन झाला ! "

# भाग १२९.

## पात.

**रेजिनट्रेसी** आपल्या घरीं आला. या वेळेला त्याच्या अंतःकरणांत निरनिराळ्या विचारांचा संक्षोभ झाला होता. त्याला कोणी मनुष्य पुढें आलेलें खपेना. खोलींत गेल्यावर तो गुडघे टेकून, दुर्विकारापासून आपलें मन दूर राहण्याविषयीं प्रार्थना करूं लागला. परंतु **सिसिले**च्या कामोत्पादक चुंबनानें अद्याप आर्द्र असलेल्या त्याच्या मुखांतून एकही शब्द निघेना. तेव्हां तो तेथून उठून त्या खोलींत इकडे तिकडे फिरूं लागला. क्षणांत तिचें पुनरपि मुखावलोकन करणार नाहीं अशी शपथ घेई,-व लागलींच तिला जाऊन आलिंगन द्यावें असें त्याच्या मनांत येई. त्याचे हे विकार स्वभावतः राक्षसी असून, ते जर निष्प्रतिबंध असते, तर त्यांची कधींही तृप्तता होण्यासारखी नव्हती. परंतु ते त्याच्या जन्मापासून सदसद् विचार व परमार्थसाधनदृष्टिरूप छायेखालीं घोरत पडले होते. शिवाय या वेळपर्यंत त्याच्या मनाला मोह पडण्याचा प्रसंगच आला नव्हता. परंतु आतां त्याच्या वृत्तींचें स्थैर्य बिघडविण्याला असा कांहीं अकस्मात्, नाजूक व अनिवार्य योगायोग जमून आला कीं, त्याचा वेग त्याच्यानें आवरेना.

जे दुर्विकार यानें आपले केवळ बंदे गुलाम करून सोडले होते, व जे याच्यापासून दास्यमुक्त होऊन यालाच उलट हस्तगत करून घेण्याविषयीं झगडत होते, त्यांच्याशीं, ज्यानें आजपर्यंत आपलें आयुष्य निर्मळपणानें घालविलें, त्याचें या वेळेला चाललेलें मानसयुद्ध पाहण्याला गोड-पण भयप्रद होतें.

या राक्षसी विकारांनीं दीर्घ कालपर्यंत विश्रांति घेऊन आपलें सामर्थ्य वाढविलें. व जसा बंडाचा दिवस नजीक आला, तशी आजपर्यंत यांना ज्यानें

बंदांत ठेवले त्याच्याशीं त्यांनीं निकराची झुंज चालविली. जुलमी राजाच्या त्रासाला भिऊन लोक जसे बेकाम होतात, त्याप्रमाणें ते अनावर झाले होते. या युद्धांत या पक्षाचा नाहीं तर त्या पक्षाचा पाडाव व्हावयाचा एवढीच गोष्ट ठरली होती. असो.

तासामागून तास चालले, परंतु त्या दुर्विकारांचा असा कांहीं जोर चालला कीं, त्यापुढें सगळे सुविचार मागें पडले. शेवटीं अगदीं त्रासून तो बिछान्यावर गेला. परंतु तेथेंही त्याच्या संतप्त झालेल्या मनाला थंड करणारी निद्रा त्याला आली नाहीं. सकाळीं तो उठला, तों कोणत्याही तऱ्हेनें त्याच्या मनाला स्थिरता आली नाहीं. उपाहाराला तो बसला, परंतु त्यानें कशालाही स्पर्श केला नाहीं. आपल्या खोलींत जाऊन वाचूं लागला. पण कोणत्याच पुस्तकांत त्याला गोडी लागली नाहीं. शेवटीं बाहेर पडून तरी चित्ताला स्वस्थता मिळेल या हेतूनें बाहेर पडला—परंतु व्यर्थ ! जिकडे त्याचे पाय नेतील तिकडे तो जात होता.

हवा अतिशय थंड पडली होती. परंतु याच्या सर्वांगांत तगमग होत होती. हाईड पार्कच्या उद्यानांत शिरल्यावर मला बरें वाटेल ह्मणून तेथें तो गेला. परंतु कांहीं नाहीं. शेवटीं तो ह्मणाला: “ देवा ! मला झालें तरी काय ? माझ्या हातून ईश्वराची एकचित्तानें प्रार्थना होईना, असा माझ्या सगळ्या जन्मांत कालचाच प्रथम प्रसंग! माझ्या हातून ईश्वराची प्रार्थना न होतां मी बिछान्यावर पाय ठेवला असा कालच. मला कशाची बाधा झाली आहे कांहीं समजत नाहीं. सिसिले, माझी अशी स्थिति होण्याला तूंच कारण आहेस यांत कांहीं शंका नाहीं. ” असें ह्मणून तो पश्चिम मार्गाकडे निघाला।

पुन्हां तो बोलूं लागला: “ आतां मी पुन्हां तिचें मुखावलोकन करणार नाहीं. मी आपलें मन आवरून धरीन; पण तो इतकी सुस्वरूप तरी काय ह्मणून झाली ! माझ्यावर प्रीति आहे असें तरी तिनें मला काय ह्मणून सांगावें ? माझी शांति नाहींशी करण्याकरितां काय ? ईश्वरापासून माझें मन काढण्याकरितां ? नाहीं—नाहीं, तो अगदीं व्यसनाधीन झाली; अहाहा! तिची माझ्यावर प्रीति आहे—तिचें माझ्यावर मन आहे—तिचें माझ्यावर प्रेम आहे! ” याप्रमाणें तो आपल्याशीं बोलत असतां, त्याच्या बुद्धीला भ्रंश झाल्यासारखा दिसूं लागला:

पुन्हां तो बोलूं लागला. “ जरी तिची माझ्यावर प्रीति आहे—तरी तिच्या-

पासून दूर राहिलें पाहिजे. विषारी सर्पाप्रमाणें तिची भीति वाळगली पाहिजे. आणि कांहीं झालें तरी तिच्याशीं एकांत ह्मणून करावयाचा नाहीं हे, तिची मूर्ति या अंतःकरणांतून ओढून, पायांखालींच तुडविली पाहिजे! " अशा तऱ्हेच्या विचाराच्या भरांत तो येत येत दुसऱ्या रस्त्यावर आला,—आणि तेथून शेवटीं **सिसिले**च्या दारापुढें येऊन ठेपला.

फिरून त्याच्या अंतःकरणांत विकार आणि विचार यांचें भयंकर द्वंद्व सुरू झालें. विकाररूपी राक्षसाशीं झगडण्याकरितां त्यानें आपलें होतें तेवढें धैर्य जमा केलें; परंतु तें ढिलें पडून शेवटीं त्या विकारांचेंच प्राबल्य जास्त झालें. व शेवटीं त्यानें पायऱ्या चढून तिच्या दारावर थाप मारली.

" अजूनही मला येथून परत जातां येईल. अद्याप वेळ आहे—अद्याप मला पाय मागें घेतां येईल. " असें ह्मणून तो कांहीं पायऱ्या खालीं उतरला. इतक्यांत द्वार उघडलें. त्याबरोबर त्याचा निश्चय ढळून तो घरांत शिरला.

एका टुमदार खोलीच्या मध्यभागीं एक मजेदार कोच ठेवलें होतें. खिडक्यांवरून पडदे सोडून उजेड थोडासा कमी केला होता. व आपल्या गौरवर्णाला शोभेल असा काळा रेशमी पोषाख करून त्या कोचावर एक्या बाजूला गिरद्यावर गिरद्या ठेवून त्यांवर आपलें अंग टाकून **सिसिला** पडली होती.

**रेजिनाल्ड** आला, तेव्हां **सिसिलेनें** जाग्यावरून न उठतां, त्यालाच आपल्या शेजारीं बसण्यास सांगितलें. बसल्यावर इतका वेळपर्यंत निश्चय केल्याप्रमाणें त्यानें तिला, तुझ्या येथें येण्यानें माझ्या मनाचे विपरीत तरंग होतात, एवढ्याकरितां मी आजपासून येथें येणार नाहीं असें तर सांगितलें; परंतु जिनें आपल्या अधरामृताची त्याला नुकतीच चटक लावून ठेविली होती—जिनें विलासी स्त्रीच्या आलिंगनसुखाचा मासला कसा असतो तो त्याला दाखवून ठेवला होता—व जिनें आपल्या मायावीपणानें त्याला आपलें बहुतेक वेड लावून ठेवलें होतें, ती **सिसिला** त्याच्या या शब्दानें ह्मणजे त्याला हातचा सोडते असा मुळींच अर्थ नाहीं. तिनें आपल्या रोषयुक्त मोहक शब्दबाणांनीं त्याला इतका विद्ध करून टाकला कीं, त्याच्या हातचें विवेकशस्त्र गळून पडून तो तिच्या पूर्ण आधीन झाला, व तिला दृढालिंगन देऊन तिचें यथेच्छ अधरपान करूं लागला.

**रेजिनाल्ड** ! शेवटीं तुझा नीतिपात झाला ना! आज वर्षानवर्षें सांठवून ठेवलेल्या तुझ्या पावित्र्याचा नाश करण्याला इतका अल्प काळ पुरे झाला काय ?

या वेळेला तुझी विचारशक्ति कोठें गेली होती ? ज्या योगानें तूं आज एवढ्या योग्यतेला चढलास तो तुझा सदगुण कोठें नाहींसा झाला होता ? आतां, आजपर्यंतच्या तुझ्या सन्मार्गाची आठवण करून रडत बैस, व ज्या दुर्वासनेनें तुझ्या कीर्तिरूप शुभ्र वस्त्रपटावर काजळ सारवलें तिला शिव्याशाप देत रहा. कारण तुझें सद्गुणाशिरोभूषण तूंच आपल्या हातानें मस्तकावरून उचलून पायाखालीं तुडवलें आहेस. यापुढें तुझें तुलाच, मी दांभिक व लबाड आहें असें वाटेल ! अरेरे !

× × × × × × × × ×

रात्रींच्या अकरा वाजून गेल्यावर तो सिसिलेच्या घरांतून बाहेर पडला. ही काळोखी रात्र होती, परंतु मधून मधून, ढग बाजूला झाले ह्मणजे कांहीं वेळ चंद्रप्रकाश पडत असे. तो कांहीं वेळ पायरीवर उभा राहून आकाशाकडे पाहूं लागला. तों तें ढगांनीं आच्छादिलें आहे असें पाहून त्याच्या मनांत भीति उत्पन्न झाली. त्याला वाटलें कीं, आपण मोक्षप्राप्तीच्या सुखास अपात्र झालों असें दाखविण्याकरितांच हें नभोमंडल अशुभदर्शक कृष्णवर्ण वस्त्रानें आच्छादलें आहे कीं काय कोण जाणें ! धर्मपुस्तकांतील श्रेष्ठ तत्वें त्याच्या अंतःकरणांत पुरीं बिंबलीं असल्या कारणानें, ही कल्पना त्याच्या मनांत शिरल्याबरोबर त्याला इतकें भय वाटूं लागलें कीं, जणूं त्याच्या पायाखालची जमीन फाटून याचा स्वाहाच करीत आहे!

चालायला लागलों ह्मणजे तरी ही कल्पना माझ्या मनांतून जाईल अशा आशेनें तो चालूं लागला. तरी ती कल्पना त्याच्या मनांतून निघेना. पुन्हां त्यानें वर पाहिलें तों आकाशांत ढग एकमेकांवर आपटून त्यांची गर्जना चालली होती. त्या ढगांकडे पाहून त्याच्या मनांत त्यांच्या निरनिराळ्या आकृति उभ्या राहूं लागल्या. त्याला वाटलें कीं, या ढगांतून एक प्रचंड काळा हात माझ्या मस्तकावर पडत आहे कीं काय कोण जाणें! जों जों तो वर पाही तों तों भयंकर आकृति त्याच्या दृष्टीस पडत. अशा तऱ्हेनें तो भीतीनें गर्भगलित होऊन आपल्या भ्रष्ट झालेल्या अंतःकरणाविषयीं पश्चात्ताप करीत मार्ग चालूं लागला. आपण कोणत्या दिशेनें जात आहों याचेंही त्याला भान राहिलें नाहीं.

इतक्यांत कर्णाला बधिर करील अशी मेघगर्जना होऊं लागली. ह्मणून त्यानें वर पाहिलें, तों जी ढगाची आकृति त्याला हाताप्रमाणें दिसत होती. ती हालत आहे असें त्यानें पाहिलें. पुन्हां जों पाहतो तों त्या ढगाच्या हजारो

प्रकारच्या आकृति दिसूं लागल्या. नंतर वादळास सुरुवात झाली. आणि शेवटीं त्या वादळांतच तो इतस्ततः वेड्यासारखा फिरत फिरत सरासरी पहाटेच्या सुमारास घरीं पोंचला.

सूर्योदयानंतर तो जागा झाला, परंतु त्या मेघांच्या भयंकर आकृतींचा ठसा जो त्याच्यावर मनावर बसला होता तो कांहीं केल्यानें गेला नाहीं. माझ्यावर ईश्वरी कोप झाला आहे असें त्याला वाटूं लागलें.

---

# भाग १३०.

## मानसिक युद्ध.

**रेजिनाल्ड ट्रेसीनें** मनांत विचार केला कीं, अद्याप पुन्हां मी मार्गावर येण्यासारखा आहें. जरी माझ्या हातून पाप झालें आहे, तरी पश्चात्तापानें मनुष्याची शुद्धता होत असते. आजपर्यंतच्या माझ्या निष्कलंक वर्तनावर एक डाग पडला आहे, परंतु तो अगदीं नाहींसा होईपर्यंत त्यावर पश्चात्तापाश्रूंची मी धार धरीन. असें म्हणून तो आपल्या खोलींतच प्रार्थना करूं लागला.

शेवटीं, त्याचें अंतःकरण जेव्हां स्थितीवर आलें, तेव्हां त्यानें **सिसिलेला** एक पत्र लिहून कळविलें कीं, आपणामध्यें जो प्रकार घडून आला असेल तो सर्व विसरून जाऊन, माझ्या अक्षय्य कल्याणाची जर कांहीं इच्छा असेल तर पुनरपि माझी भेट घेण्याचा प्रयत्न करूं नये. नंतर तो, आपल्या निश्चयाचें दृढीकरण करण्यास योग्य अशा कांहीं ग्रंथांचें अवलोकन करूं लागला. इतक्यांत त्याला **सिसिलेकडून** उलट उत्तर आलें. त्यांत एकवार तरी शेवटचें दर्शन देऊन जावें अशी विनंति केली होती. परंतु या वेळेला याचें मन अगदी दृढ झालें होतें. तेव्हां त्यानें तिला सौम्यतेनें–पण निग्रहाचें उत्तर पाठविलें कीं, "फिरून मला या मोहांत घालूं नकोस."

याचा सद्गुणपात झाल्यापासून चार दिवसांनीं हा आपल्या ग्रंथावलोकनांत मग्न असतां याच्याकडे **रिचर्ड मार्खम** आला; व लागलीच त्यानें आपण येण्याचा पुढील उद्देश यास कळविला.

**मनरो** आलीकडे फारच आजारी असून त्याच्याविषयीं बहुतेक निराशाच झाली होती. तेव्हां त्यानें विचार केला कीं, ऐहिक गोष्टींतून आपलें मन काढून परमार्थाकडे लावावें, व त्याप्रमाणें त्यानें **रिचर्डला**, ज्याच्या उपदेशानें

परलोकमार्ग सुलभ होईल असा एखादा धर्मोपदेशक घेऊन येण्यास सांगितलें.

परंतु **रेजिनाल्ड ट्रेसी**ला आतां, मी दुसऱ्याला पापमार्गांतून काढण्याला अपात्र आहें असें वाटूं लागून, तो जाण्याविषयीं अनमान करूं लागला; परंतु शेवटीं न जाण्याचें कारण आपल्याला सांगतां येणार नाहीं, असें पाहून तो त्याच्या बरोबर गेला. व **मनरो**ला उपदेश करून घरीं परत आला.

पुनरपि त्याच्या मनाला दुसराच मोह पडला. **मार्खम**च्या घरीं असतांना **एलन** त्याच्या दृष्टीस पडली होती; व ती त्या वेळेला जरी आपल्या बापाच्या दुखण्याच्या काळजींत होती तरी तिचें सौंदर्य पाहून त्याचें अंतःकरण तिच्याकडे वळलें. त्यानें तिच्या व **सिसिले**च्या सौंदर्याची तुलना केली. परंतु फिरून त्याच्या मनाची त्यालाच लाज वाटूं लागली. असो.

घरीं आल्यावर त्याचें चित्त उद्विग्न झालें व त्याला कशानेंही चैन पडेना. झोंपेंत सुद्धां त्याला **सिसिला** व **एलन** दिसूं लागल्या.

दुसरे दिवशीं पुन्हां तो **मनरो**च्या समाचारास गेला. तेव्हां त्याला **एलन**-कडून त्याच्या प्रकृतीला पालट पडत चालला आहे असें कळलें. तिला पाहतांच फिरून त्याचें चित्त बावरलें; व इच्याकारितां आपले प्राण खर्ची पडले तरी चिंता नाहीं असें त्याला वाटूं लागलें.

त्या सर्व दिवसभर **एलन** त्याच्या मनांत घोळत होती. तिच्याविषयीं त्याच्या मनांत कामवासना उत्पन्न होऊं लागली; व ती इतकी प्रबल झाली कीं, **सिसिले**विषयीं उत्पन्न झालेल्या कामवासनेसही ती मागें टाकील. मग तो या वेळेला नुसता तिच्या व्यसनीं लागणार आहे किंवा कामवासनेला बळी पडणार आहे हें कांहीं समजत नाहीं.

तो स्वस्थ बसून विचार करूं लागला. त्याच्या अंतःकरणांत पुन्हां उत्पन्न झालेल्या विषयांकुराचा बीमोड करण्याचा त्यानें पुष्कळ प्रयत्न केला. परंतु हा प्रयत्न ह्मणजे पर्वतावरील अग्नीच्या ज्वाला एका उदकबिंदूनें शांत करण्याच्या प्रयत्नाप्रमाणें झाला. असो.

याप्रमाणें त्याच्या मनाची स्थिति झाली असतां, एकदम ती थेरडी त्याच्यापुढें येऊन उभी राहिली.

तिनें येतांक्षणींच कांहीं प्रस्तावना न करितां बोलण्यास सुरवात केली. कोणीं एका कारागिरानें एक मूर्ति तयार केली होती; व ती इतकी अप्रतिम साधली होती कीं, तिच्या खरेपणाबद्दल कोणाला शंकाच येईना. तो कारा-

गार अगदीं दरिद्री असून, त्या मूर्तीवर त्याला पैसे मिळवायचे होते; तेव्हां त्या म्हातारीनें रेजिनपुढें मूर्तीचें इतकें कांहीं वर्णन केलें कीं, तिला पाऊन पाहण्याची त्याला उत्कंठा होऊन, तो तिच्या घरीं तिच्याबरोबर जाण्यास निघाला.

---

# भाग १३१

## मूर्ति.

तिनें सांगितलेल्या गोष्टींत अस्वाभाविक, व अयोग्य असा प्रकार कांहीं जरी नव्हता, तरी माझें पाऊल वाईट मार्गांत पडत आहे असें त्याला वाटूं लागलें. आपण याच पावलीं परत जावें असें त्याचें मन त्याला सांगूं लागलें; परंतु फिरून त्याचें पाऊल पुढेंच जाई. व अशा मनाच्या अस्थिर स्थितींतच तो शेवटीं **गोल्डन** गल्लींत तिच्या घरांत गेला.

प्रथमतः त्याला तिनें एका प्रशस्त खोलींत नेलें. तेथें दिवा वगैरे कांहीं नव्हते. परंतु तेथें विस्तव चांगला रखरखीत पेटवून ठेवल्या कारणानें त्या खोलींतला सर्व भाग व्यक्त दिसत होता.

याच खोलीच्या एका बाजूला एक दार असून तें बंद केलें होतें. तें दुसऱ्या एखाद्या खोलीचें असावें असें दिसत होतें.

खोलींत आल्यावर म्हातारी त्याला म्हणाली: " महाराज, याच खोलींत मीं त्या कारागिराला जागा दिली होती. शेजारच्या खोलींत ती मूर्ति आहे. ती आतांच तुमच्या दृष्टीस पडेल." असें म्हणून तिनें ती खोली सोडली. ती गेल्यावर कांहीं वेळ हा बुचकळ्यांत पडल्यासारखा झाला. पुढें काय करावें हें त्याला सुचेना. परंतु पुन्हां त्याच्या मनाची त्याला लाज वाटून त्यानें एकदम तें दुसरें दार उघडलें. तों आंत एक लहानशीच, पण नीट नेटकी खोली असून, तिच्या एका कोपऱ्यांत वर्तुलाकृति चौकीवर एका स्त्रीची मूर्ति—जिचा मध्यभाग नग्न असून जिनें आपल्या गोंडस हातानें आपल्या अंगावरील वस्त्र पडतांना तसेंच सांवरून धरलें आहे अशी—त्यानें पाहिली. कारागिराची कुशलता पाहून **रेजिनाल्ड** इतका कांहीं मोहित होऊन गेला कीं, त्याला त्या मूर्तीजवळ जावेंसें वाटलें. या वेळेला विस्तवाचा प्रकाश मूर्तीच्या तोंडावर पडल्या कारणानें, जणूं ही मूर्ति माझ्याकडे पाहून हास्य क-

रीत आहे असें त्याला वाटूं लागलें. पुढें जों जों त्या मूर्तीकडे तो निरखून पाहूं लागला, तों तों, हें तोंड माझ्या ओळखीचें आहे अशी त्याला खात्री वाटूं लागून तो मोठ्यानें ह्मणाला:

" अहाहा! सिसिले, तूं मूर्तिमंत बाजूला राहून या निर्जीव पाषाणापुढें मीं आपलें मस्तक कसें नम्र करतों हें पाहण्याकरितां ही मूर्ति तूं येथें पाठविली-स काय? सिसिले, मला पुनरपि आपल्या अंकित करण्याचा तुझा निश्चयच झाला होता, व त्यावांचून तुझ्या चित्ताला स्वस्थताच नव्हती तर, प्रत्यक्ष भेट-ण्याकरितां मला बोलवायाचें, तें सोडून, फक्त तुझ्या बाह्यसौंदर्याची—निर्जीव, निर्विकार—प्रतिमा काय ह्मणून येथें धाडलीस? अरे—पुन्हां ही हासल्यासारखी वाटते! निःसंशय हे तिचे डोळे हालले—हें तिचें वक्षस्थळ उडूं लागलें. सिसिले, तूंच ही आहेस यांत कांहीं शंका नाहीं! "

असें ह्मणून तो एकदम पुढें झाला. त्याबरोबर सिसिलेनें त्या चौकीवरून खालीं उतरून त्याला घट्ट आलिंगन दिलें; व पुन्हां त्याला आपल्या प्रेमरज्जूंनीं बांधून बंदिवान् करून सोडलें!

" महाराज, पुनरपि आपल्याला माझ्या बाहुपाशांत आणण्याकरितां मी जो हा अल्प विघ्न रचला त्याबद्दल क्षमा करावी? "

इच्या दृढालिंगनानें या वेळेला हा इतका कामांध झाला कीं, इला सोडून जाण्यापेक्षां प्रत्यक्ष कोणीं येऊन पाहिलें, किंवा आपली बेअब्रू केली तरी चिंता नाहीं असें त्याला वाटूं लागलें. तिचें हें भाषण ऐकून तो ह्मणाला: " प्रिये, याशिवाय मी दुसरें काय करणार? सिसिले, तुला काय सांगूं? तुझ्या येथून गेल्यापासून माझ्या मनाला फारच त्रास झाला. परंतु फिरून आतां मी तसा त्रास करून घेणार नाहीं. यापुढें मला सद्गति मिळण्याची मीं आशा सोडली. तुझ्या सुखाशिवाय मला आतां दुसरा विषय नाहीं. अहाहा! प्रिये, या मृत्युलोकांत मानवी प्राण्याकरितां कसें अतुल सौख्य ईश्वरानें ठेवलें आहे हें तूं मला शिकविलेंस. भावी व अचिंत्य अशा मोक्ष प्राप्तीपेक्षां, प्रत्यक्ष आतां मी जें सुख अनुभवीत आहें तेंच मला बरें वाटतें! "

" प्रिया, तुह्माला मी इतक्या सहजासहजीं हातचें जाऊं देईन, असें तुह्माला वाटलें काय? महाराज, बायकांचें अंतःकरण तुह्मी ओळखीत नाहीं. मी दोन विचार केले होते: एक तुह्माला अंकित तरी करायचें; किंवा तुमचा सूड तरी घ्यायचा. बायकांच्या मनांत एकदां जी गोष्ट भरली ती त्या पुरी

केल्याशिवाय कधीं सोडायच्या नाहींत. तुह्मांला असें वाटतें काय कीं, मी प्रथम दिवशीं तुमच्याशीं जो संबंध केला तो दुसऱ्या दिवशीं लागलींच तुमच्याकडून तोडण्याकरितां ? नाहीं महाराज! मी आपली अशी प्रतारणा कधीं करून घ्यायची नाहीं. तुमचें पत्र पाहून मला अनिवार संताप उत्पन्न झाला. शेवटीं, विरागयाला त्याच्या गुहेंतून ओढून काढण्याचा शेवटचा प्रयत्न करून पहावा, ह्मणून मी तुमच्या घरीं येण्याकरितां निघालें. तों मला वाटेंत ती थेरडी भेटली. पुढें काय झालें तें तुह्मांला ठाऊक आहेच."

"पण सिसिले, केवळ परक्या मनुष्याच्या हातीं आपल्या अब्रूच्या कपाटाची तूं किल्ली देऊन ठेवलीस हा तूं विचार केलास काय?"

"महाराज, कामातुर मनुष्याला कसला विचार आला आहे? पण भि-ण्याचें कांहीं कारण नाहीं. पैशानें तिचें तोंड बंद होईल."

"पण माझ्या अब्रूवर केवढा भयंकर धोका आला आहे हा?"

"महाराज, तुह्मी स्वतःपुरताच विचार करतांना? जर तुह्मांला कोणीं येथें पाहिलें तर तुमच्या धंद्याच्याच संबंधानें तुह्मांला काय तो कमीपणा येईल. कारण, पुरुषाच्या ठिकाणीं व्यभिचाराचें लांछन समजत नाहींत. परंतु आह्मा-सारख्या नवऱ्याच्या बायकांना तें किती वाईट आहे बरें? सर्व लोकांत माझी छीः तूं होईल."

तिला जवळ घेऊन तो ह्मणतो: "प्रिये, तूं माझ्याकरतां मोठें साहस करण्याला प्रवर्तलीस ही गोष्ट मीं मनांतही न आणतां, माझ्या पुरताच मीं विचार केला. या माझ्या अन्यायाबद्दल तूं क्षमा कर. तसेंच, माझ्या मनाचा क-मीपणा तूं मनांत आणूं नकोस. माझे अहंपणाचे विचार आपल्या सौख्याची माती मात्र करतील. सिसिले, तुझ्यावर माझें किती प्रेम आहे हें एक ईश्वरालाच ठाऊक असेल. आणि तें आतां अक्षय्य असेंच राहणार."

जो आपल्या तारुण्याच्या ऐन बहरांत आलेला, निश्चयाचा केवळ समुद्र, तो रेजिनाल्ड ट्रेसी निःशंकपणें, जे विकार आजपर्यंत त्याच्या प्रतिबंधांत होते, त्यांच्या पूर्ण आधीन झाला.

प्रतिदिवशीं तो आपल्या प्रेमपात्राला भेटूं लागला, व प्रत्येक प्रसंगीं त्याची धूर्तता हळूहळू क्षीण होऊं लागली. तासावर तास त्यानें तिच्या येथें घालविले. व शेवटीं तो तिला आपल्या येथेंही आणूं लागला.

परंतु तो आपल्या कर्तव्यकर्माला चुकत नसे—कारण आतां तो पूर्ण दां-

सिक बनला होता. तो व्यासपीठावर चढला ह्मणजे पूर्वीप्रमाणेंच याच्या भाषणावर श्रोते लुटपुटून पडत. याप्रमाणें जों जों याचें पाऊल दुर्मार्गांत जास्ती जास्ती पडत चाललें होतें, तों तों दुसरीकडे याच्या पवित्रपणाची कीर्ति वृद्धिंगत होत होती.

उपदेश करून सुटला ह्मणजे यानें तिच्या येथें जाऊन पडावें. शेवटीं तो० तिच्यावर इतका लुब्ध झाला कीं, आपल्या द्रव्यभांडाराची किल्ली देखील त्यानें तिच्या हवालीं केली.

याप्रमाणें, जो एक वेळ पवित्र होता, परंतु आतां शुद्ध विषयविलासी बनला त्या रेजिनाल्ड ट्रेसीवर सिसिलेनें आपलें पूर्ण स्वामित्व बसविलें.

## भाग १३२.

### जुना मित्र.

आतां आपण सैतान्याच्या पाठलागाच्या भीतीनें पळत सुटणाऱ्या त्या मार्गारेटकडे वळूं.

व्हायोलेचा निरोप घेऊन ती जी निघाली, ती ज्या रस्त्यानें गेलें असतां सैतान्याची भीति नाहीं असें तिला वाटलें, त्या रस्त्यानें चालूं लागली. न थांबतां बरोबर दोन तास ती चालली; व शेवटीं चालून चालून दमून गेल्यामुळें तिच्यानें एक पाऊलही पुढें टाकवेना, अशी जेव्हां तिची स्थिति झाली तेव्हां तिनें एका झाडाखालीं आपलें अंग टाकलें.

रात्रीची वेळ, भयंकर थंडी, बसावयाच्या जागीं ओलें गवत, भणभण करणारा वारा, भुकेनें व तान्हेनें व्याकुळ झालेली, पण करते काय ? जवळ सैतान्याचें चोरलेलें ढबोलें होतें; परंतु त्याचा या वेळेस उपयोग तिच्या असपास पडलेल्या दगडापेक्षां काय जास्ती होता? शेवटीं श्रमानें व भुकेनें तिला तेथल्या तेथेंच ग्लानी आली.

सूर्योदयानंतर ती जागी झाली. तों येथें जवळच शेकोटी पेटवलेली असून, तिचा धूर सर्व वातावरणांत पसरला होता. तेथेंच दोन मेखा उभ्या करून त्यावर एक लोखंडाचा दांडा आडवा टाकला होता, व त्या दांड्याला एक मोठा हंडा अडकविला होता. त्यांत कांहीं पदार्थ शिजत होते.

विस्तवाच्या भोंवतालीं, घोळका घालून भोजनसिद्धतेची वाट पहात दोन

बायका, चार पुरुष, व एक मुलगा इतके आसामी बसले होते. पैकीं दो पुरुषांचा वर्ण इतर आसामींहून कांहीं निराळा होता.

या दोघांपैकीं पहिल्याचें वय अदमासें चाळीस वर्षांचें असून, त्याच्या शरिराची काठी दणगट असे. त्याच्या तोंडावरून त्यानें पुष्कळ संकटें काढलीं असावींत असें दिसत असे. तो नेहमी आपल्या मनांत कुढत असे. त्याचें नांव काय, हें सध्यां तो ज्या मंडळींत बसला होता, तेथें मुळींच माहीत नव्हतें. त्याला मुशाफर ह्मणूनच हाका मारीत.

दुसऱ्या मनुष्याचें वय सुमारें तीस वर्षांचें होतें. आणि हा शरिरानें जरी किरकोळ असे, तरी त्याचा बांधा सुरेख असून अंगानें तो सडसडीत होता. त्याचें नांव आतां कळेलच.

आतां राहिलेल्या दोन मनुष्यांपैकीं एकाचें जवळजवळ ऐशीं वर्षांचें वय होतें. त्याचे केस फार पांढरे झाले असून, त्याच्या डोक्याला टक्कल पडलें होतें. त्याची दाढीही पांढरी असून छातीवर पडली होती. हा मनुष्य लोकांचें दैव सांगत फिरणाऱ्या कळपाचा * राजा होय. या कळपानें आपल्याला **झिंगारी** असें नांव घेतलें होतें.

या कळपांतील दुसरा मनुष्य राजाचा मुलगा असून, त्याचें वय सुमारें पसतीस वर्षांचें होतें. त्याचें नांव **मोर्कर.**

दोन बायकांपैकीं एकीचें वय साठ वर्षांचें होतें. ही त्या राजाची राणी, इचें नांव **एशा.** दुसरी तरुण स्त्री **मोर्कर**ची बायको असून, वर जो एक मुलगा सांगितला होता, त्याची ती आई होती. तिचें नांव **इव्हा.** वाचतांना घोटाळा होऊं नये ह्मणून आह्मी ही तादृश माहिती सांगितली आहे. असो.

**मार्गारेटनें** जागें होऊन या मंडळीकडे पाहिलें तसी तिला एकदम आपल्या हवेल्याची आठवण झाली. व तें नाहींसें झालें असें समजतांच तिनें एकदम किंकाळी फोडली. त्याबरोबर या मंडळींत एकच हशा पिकून तेथून

---

* या कळपाला "Gipsyrace" म्हणतात. याचा मुख्य धंदा लोकांच्या नशिबांत काय आहे तें सांगून फसविण्याचा आहे. हा कळप म्हणे, १४१५ व्या शतकांत हिंदुस्थानांतूनच युरोपांत जाऊन, हल्लीं तुर्कस्थान, रशिया, हंगेरी, स्पेन, इंग्लंड, वगैरे देशांत पसरला आहे. आपल्या इकडे शूद्रजातींत, दाणे मागून 'दादा तुमचें लई दोदं वाढेल' म्हणून दारोदार फिरणारे जे जोशी लोक त्यांच्याप्रमाणें कांहीं अंशीं तो कळप आहे म्हटलें तरी चालेल.

एक मनुष्य इच्याकडे आला; व तिला ह्मणाला: " बाई, भिऊं नकोस. तुझें गाठोडें आह्मी, कोणीं नेऊं नये ह्मणून, जपून ठेवलें आहे. तुला जायचें असेल तेव्हां तूं आपलें घेऊन जा. परंतु आमच्या महाराजांच्या राज्याच्या हद्दींत तूं पाय टाकलास एवढ्याबद्दल तुला करभार मात्र द्यावा लागेल. "

त्याचें भाषण इनें लक्ष्यपूर्वक ऐकिलें. नंतर त्याच्याजवळ गेल्यावर त्याला निरखून पाहून तिनें त्याला विचारलें " तुमची माझी पूर्वी कधीं गांठ पडली होती काय ? "

" मला कांहीं स्मरत नाहीं. पण तुरुंगांत, किंवा कोळशाच्या खाणींत वगैरे पडली असल्यास न कळे. "

" हो हो, तेथेंच–तेथेंच. आतां तरी मला ओळखलें ? "

त्यानें कांहीं वेळ तिच्या तोंडाकडे पाहिलें. मग कांहीं आठवण झाल्यासारखें करून, " मार्गारेट, तूंच ती आहेस ? " असें ह्मणून त्यानें तिला एकदम मिठी मारली.

हा सिलींग होता, हें आमच्या वाचकांनीं ओळखलें असेलच. मिठी मारणें झाल्यावर तो ह्मणाला: " महाराज, ही माझी बायको मी आपल्या पुढें सादर करित आहें ? "

" मुली, तुझें स्वागत असो. तूं आपल्या सोबत्याची बायको आहेस कां नाहींस हें विचारण्याची आह्मांला जरूर नाहीं. ज्या अर्थी तूं आली आहेस, त्या अर्थी तूं स्वस्थ ऐस " राजा ह्मणाला.

नंतर त्याच्या बायकोनें व मुनेनें तिचें स्वागत करून आपल्या चालीप्रमाणें त्यांनीं तिच्या मस्तकाचें चुंबन घेतलें. इकडे सिलिंगनें एक मद्यपात्र आणलें. व त्यांतील भाग सर्वांपुढें पाळीपाळीनें केला. राजा, इव्हा आणि मोर्कर यांचें मद्यपान झाल्यावर सिलींग, त्या मुशाफरापुढें मद्यपात्र करून त्यास ह्मणाला: " दोस्ता. आतां तुझी पाळी आली. "

" आज माझी पाळी आली, आतां आणखी एकाची कधीं तरी येणार आहे. "

" जेव्हां तेव्हां तेंच, जेव्हां तेव्हां तेंच. याशिवाय कांहीं नाहीं. " सिलींग ह्मणाला.

" अरे बाबा ! माझी जशी एका मांगाशीं गांठ पडली होती, तशी जर तुझी पडली असती, तर तूंही असाच चरफडत राहिला असतास. परंतु आतां

काय थोड्यावर गोष्ट आली आहे. उद्यां **लंडन**मध्यें जायचें आहेच. मग-मग पाहतों-मग पाहतों कसा-"

बाकीचे शब्द तो तोंडांतल्या तोंडांतच बडबडला. परंतु **मार्गारेट**नें जे थोडेसे शब्द ऐकले त्यामुळें तिच्या मात्र अंतःकरणांत धडकी भरली. तिनें **सिलिंग**ला, तुह्मी **लंडन**ला जाणार आहांत काय ह्मणून विचारलें. तिच्या मनांत **सैतान्या**ची इतकी दहशत बसली होती कीं, फिरून त्याचें सांनिध्य करणें ह्मणजे जिवावरची पाळी, असें तिला वाटूं लागलें. परंतु आम्ही तुझ्या संरक्षणाला असतांना आतां तुला कोणाचीही भीति बाळगण्याचें कारण नाहीं, असा जेव्हां **सिलींग**नें तिला धीर दिला, तेव्हां तिच्या चित्ताला कांहीं स्वस्थता वाटली. नंतर त्या सर्वांचें तेथें भोजन झालें. भोजन झाल्यावर **सिलींग** आणि **मार्गारेट** बाजूला जाऊन बोलत बसले. त्यानें तिला मग त्या मुशाफराची हकीकत सांगितली. तो उपाशी मरत असतांना या मंडळीला भेटला. तिनें त्याला आश्रय देऊन आपल्याजवळ ठेवून घेतलें; तो पुष्कळ देश हिंडला आहे वगैरे हकीकत त्यानें तिला सांगितली. **झिंगारी** लोकांच्या चालीरीति संबंधानेंही त्यानें सांगितलें कीं, ते लोक आपण होऊन कोणाची चौकशी करीत नाहींत. त्यांच्या राज्याच्या हद्दींत कोणी आलें कीं, ठरावाप्रमाणें त्याच्यापासून कांहीं कर घेऊन सोडून देतात. एखादा चोर चोरी करून त्यांच्या जवळ येऊन राहिला तरी त्याला तूं कोठून आलास, किंवा हे पैसे कोठले, असें ते कधीं विचारायचे नाहींत. या सगळ्या हकीकती सांगणें झाल्यावर त्यानें इची याची नाटनूट झाली तेव्हांपासूनची आपली हकीकत सांगण्यास प्रारंभ केला. तिचा सारांश असा:-

---

# भाग १३३.

## सिलींगची हकीकत.*

पूर्वी रस्त्यांत **मार्गारेट**ची व **सिलींग**ची गांठ पडून त्यानें तिला आपल्या

---

* आजपर्यंत या कादंबरींत येऊन गेलेलीं, बदमाष लोकांचीं जीं चरित्रें त्यांहून याची हकीकत कांहीं भिन्न आहे असा मुळींच प्रकार नाहीं. यांचें चारित्र देणें म्हणजे पुनःपुनः त्यांच्या चौर्यकर्मनिपुणत्वाचें वर्णन करणें होय. करितां आम्ही आतां सिलींगची साद्यंत हकीकत न देतां आमच्या कथाभागाला अवश्य तितका देतो म्हणजे झालें.

जवळ राहण्यास बोलावलें हें आमच्या वाचकांस आठवत असेलच. असो. तीं त्याच्याजवळ सुमारें सहा महिने राहिल्यावर, आपल्या संबंधानें आपल्या बरोबर राहिल्यामुळें तिच्यावरही एखाद वेळ धोका यावयाचा, या भीतीनें त्यानें तिला कांहीं पैसे देऊन **लंडन**मध्यें पोट भरण्याकारितां धाडलें. व इकडे तोही जिकडे पोट भरेल तिकडे जाण्याकारितां निघाला. प्रथमतः त्यानें एका खाणावळींत चोरी केली. तेथून पळ काढून कांहीं हिकमतीनें त्यानें दुसऱ्या एकाच्या घरांत प्रवेश केला, तों कर्मधर्मसंयोगानें ज्याची त्यानें चोरी केली, तोच मनुष्य तेथें आला. त्याबरोबर त्यानें तेथूनही पाय काढून आणखी एका खाणावळींत प्रवेश केला. त्याचेच्या जवळ एक पै देखील नव्हती परंतु तेथील भोजन तर त्यानें यथास्थित चापलें. मग जेव्हां पैसे द्यायची पाळी आली तेव्हां तो आपले पैसे जणूं खिशांत आहेत अशा तऱ्हेनें खिसा चाचपूं लागला. ही त्याची स्थिति एका मनुष्यानें पाहून त्यानें त्याला सांगितलें कीं, " हे पहा तुझे पैसे बाकाखालीं पडले आहेत. " तो बाकाखालीं पाहतो तों पैसे खरेच तेथें होते. मग ते कोणी विसरले होतें, का याच मनुष्यानें याच्यावर दया करून तेथें टाकले तें त्याला समजलें नाहीं. असो. ती त्याची वेळ पार पडली खरी. नंतर तेथून तो निघाला, तों दोनचार दिवस भटकत होता. शेवटीं एक पुरुष व बायको त्याला भेटलीं, व त्यांनीं त्याला एकाच्या घरांत जाऊन तेथील माहिती आणण्यास सांगितलें. त्याप्रमाणें तो तेथें गेला व येतांना जी माहिती मिळविली त्याबरोबर एक पैशाची थैलीही त्यानें बरोबर आणली. तेवढी थैली आपल्याजवळ ठेवून, माहिती मात्र त्यांना सांगितली व त्याबद्दल त्याला पांच शिलींग मिळाले. परंतु पुढें हे तिघेही पकडले जाऊन सरकारांत गुदरले गेले. तेथें त्यानें सर्व अपराध माझा आहे या दोघांकडे कांहीं नाहीं असें सांगितल्यामुळें त्या दोघांची सुटका झाली. व याला कैदेंत जावें लागलें. हीं दोन मनुष्यें सांगितलीं तीं, पूर्व भागांत येऊन गेलेल्या **झिंगारी** टोळींतलीं **मोर्कर** व **इव्हा** होत. **सिलीग**नें यांच्यावर केलेला उपकार स्मरून त्यांनींही त्याची तुरुंगांतून मोठ्या हिकमतीनें सुटका केली. व त्या दिवसापासून तो या लोकांच्याच आश्रयानें राहिला.

# भाग १३४.

## क्षेत्रांतील राजवाडा.

जेथें दारिद्र्यानें आपलें तोंड लपविलें आहे—जेथें घोर अपराधांनीं भीतीनें आपली वस्ती केली आहे—जेथें ओंगळ, भयंकर, वाईट, नीतिभ्रष्ट अशा प्रत्येक वस्तूनें आपलें ठाणें बसविलें आहे—जेथें स्त्री ह्मणजे केवळ कैदासीण व पुरुष ह्मणजे केवळ रानटी—जेथें दिवसाचा विनियोग स्वस्थ बसण्यांत व रात्रीचा विनियोग दुष्कर्मांत—जेथें बोलण्या चालण्यांत रानटीपणा व स्त्रीपुरुषाचें स्वेच्छ व अमंगळ वर्तन—जेथें प्रचलित शिष्टाचाराचा अभाव व सामाजिक निष्प्रीतिबंध——आणि जेथें दुराचाराची लाज नाहीं, अपराधाचें भय नाहीं, व दुर्व्यसनाचें लांच्छन नाहीं, अशा **लंदन** शहरांतल्या **सेंट गाईल्स** नांवाच्या एका भागाला **झिंगारी** टोळीचें **क्षेत्र** अशी संज्ञा आहे.

याच भागांत एका अंधाऱ्या व ओसाड गल्लींत एक चार मजली वाडा होता. त्याच्या खिडक्या इतक्या लहान होत्या कीं, जणूं दिवसाचा उजेड हप्त्याहप्त्यांनीं घेण्याकरितांच हीं द्वारें ठेवलीं आहेत. पुढच्या दाराला उभ्या चढाच्या व सरासरी सहा इंच रुंद अशा चार पायऱ्या होत्या, हें पुढचें दार दिवसाचें उघडेंच असे. व त्याच्या आंत एक चौरस खोली असून कोणी आलें ह्मणजे मात्र, तो कोण मनुष्य आहे हें पाहून त्याला दार उघडलें जात असे. पुढच्या दारांतली जी चौरस खोली सांगितली, तिच्या कडीपाटाला एक चोरदार असून, त्यांतून, वरच्या मजल्यावर जो पहारेकरी असे त्याला, दारावर जो ठोठावील त्याला ओळखतां येत असे. घराच्या आंतल्या भागाची रचना बराखीसारखी होती ह्मटली तरी चालेल. तळमजल्यावरील खोल्यांचा जेवणाच्या कामीं उपयोग होत असे. तेथील जमीनीवर सर्व वाळू पसरली होती व खिडक्याच्या भिंगाला खोलींत चाललेलें कांहीं दिसूं नये ह्मणून चुना सारखला होता.

वरचा मजला निजण्याच्या उपयोगी असे. त्याचा कांहीं भाग पुरुषाकडे, व कांहीं भाग बायकांकडे सोपविला होता. वरच्या भागांत व खालच्या भागांत स्वच्छता मात्र चांगली राखली होती.

दुसऱ्या मजल्याच्या पटईला एक मोठी घंटा टांगली होती. व तिच्या चाकाला अनेक दोऱ्या लावून त्या, भिंतीला भोकें पाडून प्रत्येक खोलींत नेल्या होत्या.

ह्मणजे केव्हांही संकट प्राप्त झालें तरी सर्वांस सावध करतां यावें. याप्रमाणें **झिंगारी**च्या राजवाड्याचें वर्णन आह्माला जितकें देतां आलें तितकें आम्ही दिलें. असो.

सरासरीं रात्रींच्या दहा वाजण्याचा सुमार होता. अशा वेळेला या राजवाड्यांत **झिंगारी** लोकांचा भोजनसमारंभ चाललेला होता.

या प्रसंगीं अध्यक्ष स्थान स्वतः **झिंगारीं**च्या राजानें स्वीकारलें असून, सरासरीं स्त्रिया व पुरुष मिळून निरनिराळ्या कळपाचे साठापेक्षांही जास्ती प्रतिनिधी आले असावेत. या समारंभास, **सिल्लाग, मार्गारेट** व तो **मुशाफर** असे तिघेही राजाचे पाहुणें ह्मणून हजर होतेच

प्रथमतः भोजन झालें. नंतर मेजावर निरनिराळ्या प्रकारच्या पेयांच्या बाटल्या, व धूम्रपाननलिका येऊन पडल्या. त्या बरोबर राजेसाहेबांनीं सर्वांस ग्लास भरण्यास मोठ्या गंभीरपणानें हुकूम फर्माविला.

सर्व स्त्रीपुरुषांनीं हा हुकूम आमलांत आणतांच महाराजांच्या भाषणास सुरुवात झाली:—

" महाराजनिष्ठ आणि आज्ञाधारक मित्र हो, आजचा हा आपला समाज स्थापन झाल्याचा एकशे एकविसावा वार्षिकसमारंभ आहे. एकशे एकवीस वर्षांपूर्वी हा वाडा माझ्या आजानें विकत घेऊन आपल्या वंशजास आपल्या राज्य कारभाराची गादी चालविण्यास दिला आहे. आपल्या समाजांत असा एकही मनुष्य सांपडणार नाहीं कीं, ज्यानें येथील आदरसत्काराचा उपभोग घेतला नसेल. या राजवाड्यांत आपल्या कळपांतील प्रत्येक योग्य मनुष्याला अन्न आच्छादन मिळण्याचा हक्क आहे. व राजवाड्याची देखरेख, आपल्या पश्चात्, आपणास बंधुसमान पूज्य जे माझ्या उजव्या हातास बसलेले गृहस्थ हे करित आहेत. आपला खजिना त्यांच्याजवळ सुरक्षित आहे. व उदईक सर्व जमाखर्चाचा खर्डा ते आपल्या पुढें मांडणार आहेत. करितां आजच्या समारंभाचा आपण महोत्सव करूं या. "

इतकें भाषण झाल्यावर सर्वांनीं ग्लास तोंडाला लावले. नंतर राजानें आपल्या सुनेस थोडेंसें गाणें ह्मणण्यास सांगितलें, तें **इव्हानें** आपल्या मंजूळ स्वरानें ह्मटलें:—

## प्रहर्षिणी.

झिंगारी परी न दुजा सुखी जनांत । जो स्वेच्छें भ्रमण करी सदा जगांत ॥<br>येतोही स्थल रमणीय दृक्पथांत । आनंदें वसति करी तिथें क्षणांत ॥ १ ॥

**मंदाक्रांता.**

येतां भानू गगानें अवनी हांसते स्नेहयोगें ।
श्रांतां पांथां फिरविति अती आदरें कुंज मार्गे ॥
पक्षी वृक्षीं बसुनि विपिना नादवी गायनानें ।
जेथें हौसी प्रणयि जनहीं क्रीडती कौतुकानें ॥ २ ॥
जेथें होतें सकळ डुलती धान्य संपन्मदानें ।
येते शोभा अतुल तटिनी तीरभागा तृणानें ॥
पाहे वारी विमळ विपुल स्थानिं ज्या निर्झराचें ।
झिंगारी त्या स्थलिं बसु निया हर्ष पावोनि नाचे ॥ ३ ॥

**वसंततिलका.**

गर्विष्ठ दुष्ट, शठ, नीच, परापकारी । स्वार्थी, वसे, जनसमूह पुरोत भारी ।
जेथें बली धनिक दीनजनांस दापी । राही अशा न नगरींत कृती कदापी ॥ ४ ॥

**माल्यभारा.**

सुमनें डुलतात सौरभानें । लवती वृक्ष अती फलागमानें ॥
रमणिय अतीव सृष्टि पाहे । गृह तेथें करुनी रसज्ञ राहे ॥ ५ ॥

**इव्हानें** दुसऱ्या स्त्रियांच्या संगतीनें हें गाणें ह्मटल्यावर **झिंगारी** ह्मणाला: " शाबास **इव्हा** शाबास. खरोखर आपण सुखी आहोत. सर्व देशभर हिंडण्यांत आपल्याला जें स्वातंत्र्यसुख मिळत असतें तें या जगांतील एकाही प्राण्याला सांपडत नसेल. आपल्याला कोणालाही खंडणी भरावी लागत नाहीं किंवा कर द्यावा लागत नाहीं. आपल्या इच्छेनें जें आपण उदकपान करतों, त्यावर कोणाचा वारसा येईल अशी आपल्यास भीति नाहीं किंवा, चाहील त्या मार्गानें जाण्यास आपणांस प्रतिबंध नाहीं. आपणाकरितां दिवसांचा सूर्य प्रकाशतो व रात्रीचे नक्षत्रगण आपणास प्रकाश देतात. सारांश आरण्यांतील रहिवाशाप्रमाणें आपण स्वतंत्र आहोंत. व आपणास कोणाचाही प्रतिबंध नाहीं. करितां आपले जे जे कळप असतील त्यांच्या त्यांच्या नांवाचें आपण अभिष्ट चिंतन* करूं या. "

* एखाद्या थोर मनुष्याच्या नांवानें किंवा एखाद्या दिवसाच्या नांवानें महोत्सवें करतांना मद्यपान करावयाचें व त्या वेळेस त्या मनुष्याच्या किंवा त्या दिवसाच्या नामाचा उच्चार करावयाचा याला अभिष्टचिंतन विधि " Toast " म्हणतात. या प्रसंगीं मोठमोठालीं राजकारण विषयक भाषणें होत असतात.

पुन्हां मद्यपान झाल्यावर, दुसऱ्या एका तरुण स्त्रीला राजानें गाण्याची आज्ञा केली. ती आज्ञा मान्य करून तिनें खालील पद्य गायलें:—

**वसंततिलका.**

राहा उभी, तरुणी सुंदरी तूं क्षणैक । होवोनि शांत वचनास मदीय ऐक ॥
येईल हासतच सत्वर विद्रुमोष्ठी । गोष्टी अपूर्व तुझिया पडतील दृष्टि ॥ १ ॥
भिकारी हा जरि दारिद्रि दिसेल तूं ते । प्रीती खरी तुजासि अर्पुनिया धनाते ॥
देईल, आणिक भविष्य कथीलसारें । अज्ञानजाल पटला उडवील सारे ॥ २ ॥
पापीग्रह त्वरित आणील नेत्रि पाणी । शंका अशीन मनीं कामिनि । अल्पआणी ॥
आहेत दृष्ट पडले ग्रह जन्मकाळीं । होतील ते तुजासि मंगल सर्व वेळीं ॥ ३ ॥
भाविष्यती मजसवें तुजला कळेल । अत्यल्प हीन तुज भीति कदा शिवेल ॥
जीं सांचवी चतुर आस तुझ्याच साठीं । तीं मौक्तिकें निरखिशील सुखें स्वदृष्टीं ॥
गुंफोनिया स्वकरीं नंतर मुक्तहार । आनदयुक्त चिरकाळ करी विहार ॥
राहा उभी, तरुण सुंदरि ! तूं क्षणैक । चित्तास शुद्ध करुनी ममशब्द ऐक ॥५॥

याप्रमाणें अकरा वाजेपर्यंत त्यांनीं आनंदानें रात्र घालविली, नंतर ते आपआपल्या शयनगृहांत गेले.

सरासरीं पंधरा दिवस ते या ठिकाणीं आल्याला झाले. **मार्गारेट** वाड्याच्या बाहेर मुळींच पडत नव्हती. **सिलीग** तिच्या जवळ नेहेमीं बसून असे. परंतु तो मुशाफर मात्र दिवसाचा पोषाख बदलून बाहेर निघत असे. व सकाळपासून संध्याकाळपर्यंत ज्याच्याशीं त्याचें हाडवैर असे त्याच्या शोधार्थ फिरे. प्रत्येक दिवशीं तो निराश होऊन परत येई. आणि जर त्याला कोणी त्याच्या रागाचें कारण विचारलें, तर तो दांत खाऊन सांगे: "काय करूं? एकेक दिवस चालला, तरी तो आजून जिवंत आहे. पण त्याचा शोध केल्याशिवाय कधीं—कधीं मी रहायचा नाहीं."

## भाग १३५.

### विनंति—अकस्मात गांठी.

एकवार आपण **मार्खम**च्या घराकडे वळूं.

**एलन**ची गुप्त गोष्ट कळल्यामुळें **मनरो**च्या मनाला दचका बसून जें दुखणें लागलें होतें, त्यांतून तो नुकतांच उठून आपल्या खोलींत आतांशा हिंडूं फिरूं लागला होता.

एलनही त्याच्या सुश्रुषेंत दक्ष असून, आपल्या मुलाला बरोबर घेऊन त्याला सोबत करीत होती, व आपल्या प्रियकरणेची ज्याच्यामुळें अब्रू मलीन झाली, त्या अर्भकाचा मनरोनें तिरस्कार करावयाचा, तो न करतां उलट त्यालाही तें बालक अतिशय प्रिय वाटूं लागलें होतें.

मार्खम आपल्या ग्रंथावलोकनांत काळ घालवीत होता. कौन्ट आल्दरोनी-कडून याचे पैसे आल्यापासून त्याला आतां पोटाची जरी पंचाईत नव्हती, तरी करमणुकीकरितां त्यानें हा उद्योग स्वीकारला होता. पूर्वीपेक्षां आलीकडे त्याच्या मनाला बरीच स्वस्थता असे. कारण तो आतां समजून होता कीं, इझाबेलेची माझ्यावर पूर्ण प्रीति आहे. व जरी ती एका राजाची कन्या आहे, तरी त्याची खात्री होती कीं, माझ्यावरची प्रीति आतां कशानेंही कमी व्हायची नाहीं. असो.

१८४० चें साल संपून नुकतेंच तीन आठवडे झाले होते. संध्याकाळचा समय होता, त्या वेळेस एके दिवशीं ग्रेगरी मार्खमकडे आले.

यांची मुद्रा अगदीं व्यग्र दिसत होती, पाऊल हलकें पडत होतें, व शब्दही थोडासा खोल गेला होता. यांची ही अशी स्थिति पाहून मार्खम चकित झाला.

ग्रेगरीचा मार्खमकडे येण्याचा उद्देश कदाचित् आमच्या रसिक वाचकांनीं ओळखला असेलच. मार्खमला जरी त्यानें आपल्या घरीं येण्याचें कांहीं विशेष कारणानें बंद केलें होतें, तरी मार्खमच्या सभ्यपणाविषयीं त्याची खात्री होती. व ही त्याची खात्री मार्खमनें एक दिवसही पुढें ग्रेगरीची किंवा त्याच्या मुलांची गांठ घेण्याचा प्रयत्न केला नाहीं यावरून सुदृढ झाली. नाटकगृहांत त्याचा झालेला उत्कर्ष पाहून त्याला अतिशय आनंद झाला, व तेथेंच त्याच्या अब्रूची हानि पाहून त्याला वाईटही वाटलें. तरी तेथें जी गोष्ट त्यानें ऐकली, तिच्या योगानें त्याच्या विषयींची ग्रेगरीची पूज्यबुद्धि कमी झाली नाहीं. व ह्मणूनच तो कांहीं हेतु मनांत धरून मार्खमशीं बोलण्याकरितां आला होता. परंतु हा माझ्याशीं कांहीं तरी महत्वाची गोष्ट बोलण्याकरितां आला असावा असें मार्खमला वाटल्याबरोबर त्यानें प्रथमत: आपली पूर्वीपासूनची सर्व हकीकत त्याला सांगून मी निरपराधी कसा आहे याविषयीं त्याची त्यानें खात्री करून दिली. अशा प्रकारची खात्री झाल्यावर ग्रेगरी ज्या हेतूनें याच्याकडे आला होता, त्याविषयीं त्याला दुजोर झाल्यासारखा होऊन तो बोलूं लागला:—

" आतां मी मोठ्या आनंदानें आपल्याला विनंति करीन. मार्खम,

तुमच्यावर माझ्या मुलीचें किती प्रेम होतें, तें तुह्माला सांगायला नकोच. परंतु पुढें तुह्माला कळून आलें कीं, तिचें तुमच्यावर मनही गेलें आहे. कारण तें मन तिला लपवितां येईना—"

"परंतु मी सत्य स्मरून सांगतों कीं, शब्दानें किंवा कृतीनें, कोणत्याच तऱ्हेनें या गोष्टीला मी तिला उत्तेजन दिलें नाहीं."

"तें मला माहीत आहे. तिच्याशीं तुमची मुग्धवृत्ति असे ती मी पाहिली आहे. व त्याच कारणाकरितां माझ्या मुलाचें शिक्षण मी बंद ठेवलें. मला वाटलें होतें कीं, ती तुमच्यावर इतकी अनुरक्त नसेल, ह्मणून तिच्या करितां मी स्थलांतर केलें. तेथें अकस्मात् एका चांगल्या कुटुंबाची व तिची गांठ पडून तेथें तिनें कांहीं दिवस घालविले! पुन्हां मी तिला घरीं आणलें परंतु मला ती दिवसेंदिवस जास्त चिंताग्रस्त दिसूं लागली. तिची पहिली उल्हासवृत्ति जाऊन तिच्या जागीं व्यग्रता आली. तथापि तुझें दुःखाचें कारण मी समजलों, असें तिला मी सांगितलें नाहीं. तुमचें नांव तिच्या कानीं पडूं नये याबद्दल मी फार काळजी घेत असे. व तिनेंही कधीं शब्दानें तुमचें नांव घेतलें नाहीं. परंतु सदोदित तुमचा तिला ध्यास लागलेला असतो. तिची रक्षा करणारा चिताग्नि तिनें धुमसत ठेवला आहे. अशी तिची स्थिति पाहून **मार्खम** मी तुमच्याकडे एक विनंति करायला आलों आहे. ती विनंति मी मोठ्या आदरानें व मोकळ्या मनानें करीत आहे. मला ठाऊक आहे यांत थोडासा मी चालीविरुद्ध जात आहे, परंतु माझ्या मुलीच्या सौख्या करितां, स्वास्थ्या करितां व जीवितरक्षणाकरितां समाजाच्या चालीरीती मला झुगारून देणें भाग आहे. करितां माझी अशी विनंति आहे कीं, तुमचें अंतःकरण दुसरीकडे कोठें गुतलें नसेल, व माझी मुलगी **मेरि—अॅन**—ही अंतर्बाह्य गुणांनीं तुमची अर्धांगी होण्यास योग्य आहे असें तुह्माला वाटत असेल तर माझें ह्मणणें असें आहे कीं,——"

"महाराज या विनंतीनें आपण मला मोठा मान दिल्यासारखा झाला, व आपल्या या विनंतीला आनंदानें मीही मान दिला असतां—पण काय करावें तसें होणें असंभवनीय आहे."

"काय? असंभवनीय आहे!" **ग्रेगरी**च्या तोंडावर एकदम ढग येऊन त्यानें विचारलें.

"महाराज आपल्या मुलीचे सर्व गुण असे आहेत कीं, तिच्यावर मी

अंतःकरणपूर्वक प्रीति करावी, पण तसें करण्याला हें अंतःकरण आतां माझें नाहीं. ''

'' तर मग तुमची प्रीति दुसरीवर आहे ? ''

'' आज बरेच दिवस मी एका तरुण स्त्रीला आपलें मन अर्पण केलें असून तिनेंही आपल्याबद्दल वचन देऊन ठेवलें आहे. ''

'' झालें तर ! माझ्या मुलीबद्दल आतां मुळींच आशा नाहीं. **मार्खम,** आतां माझी एवढीच विनंति आहे कीं, अशा प्रकारची गोष्ट मी तुमच्यापाशीं काढली होती हें तुम्ही अगदीं विसरावें ! ''

'' त्याबद्दल तुम्ही निःशंक असावें. माझ्या तोंडून शब्दसुद्धां निघणार नाहीं. '' इतका प्रकार झाल्यावर **ग्रेगरी** त्याचा निरोप घेऊन निघून गेला.

वाचकांना हें सांगण्याची फारशी जरूर नाहीं कीं, कांहीं दिवसांपूर्वी **इझाबेले**चें व **मेरी-ॲन**चें झालेलें भाषण **मेरी**नें आपल्या बापाजवळ सांगितलें नव्हतें. तसेंच **रिचर्ड**लाही **ग्रेगरी**ची व **कौन्ट आलटरोनी**च्या कुटुंबाची गाठ पडली होती हें कळलें नव्हतें. असो.

**ग्रेगरी**च्या भेटीपासून **मार्खम**ला इतकें वाईट वाटलें कीं, आपलें मन स्थीर करण्याकरितां व ज्या बिचारीनें निर्मळ अंतःकरणानें याच्यावर प्रीति केली तिच्या दुर्दैवी स्थिती संबंधाचे विचार आपल्या मनांतून घालविण्याकरितां तो मोकळ्या हवेंत बाहेर पडला. या वेळेला हवा स्वच्छ पडली असून, चंद्रप्रकाशही पडला होता. त्यामुळें त्याला जरा लांबवर फिरावेंसें वाटलें. फिरून फिरून दमल्यावर जेथें गाड्या मिळतात त्या ठिकाणीं तो जातो तों समोरून एका मनुष्यानें येऊन जरा जोरानें याला धक्का दिला.

'' कारे, तुझ्या डोळ्यांनीं दिसत नाहीं होय ! '' त्या मनुष्यानें उद्धटपणानें विचारलें.

हे शब्द ऐकतांच **रिचर्ड** थबकून जागच्या जागींच उभा राहिला—हे शब्द त्याच्या पुरे ओळखीचे होते, त्यानें लागलीच त्या मनुष्याच्या आंगावर धावून ''बेरडा, शेवटीं सांपडलास. आतां मात्र माझ्या हातून सुटायचा नाहींस. '' असें ह्मणून त्यानें त्याला जोरानें धरलें.

'' अरे जारे ! '' असें ह्मणून **सैतान्या**नें—हा मनुष्य तो होता—जो त्यांच्या हाताला हिसडा दिला, त्यासरशीं **मार्खम**च्या हातांतून सुटून जाऊन, त्यानें त्याच पायानें **सेंट गाईल्स**कडे पळ काढला.

**सैतान्या** पळून गेला नाहीं तोंच, **मार्खम**नें ओरडा करून एका क्षणांत पोलीस व इतर लोक त्या जागीं जमविलें.व ते सर्व मिळून **सैतान्या**च्या शोधास निघाले.

इकडे **सैतान्या** वाऱ्यासारखा निघाला तो या गल्लींतून त्या गल्लींत, त्या गल्लींतून दुसऱ्या गल्लींत असें करीत करीत एका घरांत शिरून, त्याचें आंतलें दार ठोठाऊ लागला.

त्याबरोबर एका मनुष्यानें वरच्या मजल्याच्या पटईचें चोरदार उघडून विचारलें: " कोण आहे ? काय पाहिजे?"

"मेहेरबानी करून दार उघडून मला आंत घ्या. मी तुम्हाला पुष्कळ बक्षीस देईन." **सैतान्या**नें सांगितलें.

हे शब्द ऐकून त्या मनुष्यानें चोरदार बंद केलें. व खालीं येऊन **सैतान्या**ला आंत घेतलें. नंतर दरवाजा लावल्यावर **सैतान्या** ह्मणाला, " ठीक आहे! आतां तर पार पडलों. "

" तुम्ही कोण आहात? " ज्या मनुष्यानें दार उघडलें त्यानें विचारलें—हा मनुष्य **झिंगाऱ्या**च्या कळपांतला होता.

" तुम्हाला सांगायला कांहीं हरकत नाहीं. माझ्या मागें कांहीं लोक लागले आहेत. ह्मणून मी येथें आलों. "

" कांहीं चिंता नाहीं. तुम्हाला येथें कांहीं भीति नाहीं. माझ्या मागून या." असें ह्मणून त्या मनुष्यानें **सैतान्या**ला तळमजल्याच्या एका खोलींत नेलें. या ठिकाणीं, **झिंगारी**, **मोर्कर** व आणखी त्यांचे पांचसहा सरदार यांचें दारूपाणी चाललें होतें. या वेळेला **मार्गारेट** इतर बायका बरोबर दुसऱ्या मजल्यावर होती. **मुशाफर** दिवसाचा आपल्या वैऱ्याच्या शोधाला गेला होता तो अद्याप परत आला नव्हता, व या कळपांतील बाकीचे लोक **लंडन** सोडून आपापल्या ठिकाणीं निघून गेले होते.

**सैतान्या, झिंगारी**जवळ आल्यावर त्यास ह्मणाला; " महाराज, **झिंगारी** लोकांच्या वसतीचें हें जर ठिकाण असेल, तर कांहीं वेळ मला येथें आश्रय मिळावा. "

"जो वेळ पर्यंत तुझी येथें राहण्याची खुषी असेल तो पर्यंत तुला परवानगी आहे. " राजा ह्मणाला.

हा हुकूम झाल्याबरोबर **सैतान्या** स्वस्थ चित्तानें त्या मंडळींत बसला. इतक्यांत

**सिलिग**नें येऊन पुढील निरोप सांगितलाः—" महाराज वरची सर्व व्यवस्था करून आलों. बायका आपापल्या जागीं निजण्याकरितां गेल्या. उद्यां **लंडन** सोडायचें ही बातमी ऐकून त्यांना फार आनंद झाला आहे."

" पण तुझ्या **मार्गारेट** सारखा कोणाला आनंद झाला नसेल? तिला त्या मनुष्याचें फारच भय वाटत आहे." राजा हसून म्हणाला.

हें भाषण ऐकून **सैतान्या** फार चकित झाला, पण त्यानें कांहीं भाषण केलें नाहीं. तो लक्षपूर्वक ऐकूं लागला मात्र.

" महाराज आपण सर्व हकीकत ऐकाल तर तिला दोष देणार नाहींत. ज्याला ती भिते तो शुद्ध राक्षस आहे. त्याचा धंदा प्रेतें उकरण्याचा आहे. तेव्हां तो चांगला मनुष्य नसावा हें उघड आहे."

**सिलिग**चें हें भाषण ऐकून **सैतान्या** मनांत म्हणाला: " ही **मेग** असावी यांत शंका नाहीं." परंतु त्यानें आपल्या चेहेऱ्यावर या गोष्टीशीं संबंध असल्याचें कांहीं दाखविलें नाहीं. जणूं आपल्याला कांहीं माहीत अशा रीतीनें तो विमेपणानें तोंडातल्या तंबाकूच्या नळींतून धूर काढीत राहिला. तथापि; आपली शिकार आपल्या आतां अगदीं जवळ आहे, तिला पाहिजे तेव्हां फाडून खातां येईल हें पाहून त्याच्या अंतःकरणांत आनंदाच्या उकळ्या फुटूं लागल्या.

नंतर त्याच्या मनांत आलें कीं, जर या मंडळीच्या देखत तिची माझी दृष्टादृष्ट होईल, तर माझा हेतु शेवटास जाणार नाहीं. कारण हे लोक तिच्या पाठीवर आहेत. परंतु इतक्यांत त्याला आठवण झाली कीं, बायका माडीवर निजल्या आहेत, तेव्हां तिची माझी यांच्या देखत गांठ पडेल याची भीति बाळगण्यास नको. आतां ती कोठें निजली आहे हें समजण्याचीच कायती पंचाईत, तर त्याबद्दल त्यानें वेळेवर हवाला टाकला: आणि त्याच्या सुदैवानें तें त्याला कळलेंही पण. कारण **सिलिग** व राजा यांच्या, **मार्गारेट**बद्दल ज्या गोष्टी चालल्या होत्या त्यांत **सैतान्या**चा संबंध असेल, हें त्यांच्या स्वप्नींही नसल्या कारणानें ते तिच्या बद्दल बोलत राहिले. व त्यांत **सैतान्या**नेंही तोंड घालून ती कोठें निजली आहे हें सहज काढून घेतलें. नंतर इकडच्या तिकडच्या गोष्टी निघाल्या. शेवटीं घड्याळावर अकराचा ठोका पडला तसा राजा आपल्या जाग्यावरून उठला. व त्याबरोबर सर्व जण उठले.

" **सिलिग**, त्या देवडीवाल्याला म्हणावें फक्त मुशाफर बाहेरून यायचा

राहिला आहे. आतां यांना, पाहुण्यांकरितां जी जागा आहे तेथें घेऊन जा. मी आतां सर्वांचा निरोप घेतों. राम राम." असें म्हणून राजा निघून गेला. त्याच्या मागून त्याचे सरदारही आपापल्या जागीं निजण्याकरितां गेले. व सिलिग सैतान्याला घेऊन चालूं लागला.

मार्गारेट तीच मेग याविषयीं सैतान्याच्या मनांत जर कांहीं संशय आला असला, तर तो सिलिगचें नांव ऐकून तेव्हांच नाहींसा झाला. कारण मार्गारेटनें जेव्हां आपली हकीकत याला सांगितली होती, तेव्हां तिनें सिलिगचेंही नांव घेतलें होतें हें वाचकांना आठवत असेलच. असो.

सिलिग दिवा लावून, दुसऱ्या मजल्यावर गेला. तेथें देवडीवाल्याला, मुशाफर यायचा आहे अशी ताकीद देऊन तेथून तिसऱ्या मजल्यावर गेला, व तेथील एक खोली उघडून तिच्यांत सैतान्याला निजण्यास सांगितल्यावर, त्याच्या करितां तेथें दिवा ठेवून त्याचा निरोप घेऊन तो परत आला.

सैतान्या जसा एकटा झाला तसा त्यानें आपल्या तोंडावरची कृत्रिम शांतता बाजूला ठेवून त्यावर इतकी कांहीं उग्रता आणली कीं, जवळ जर कोणी मनुष्य पाहण्यास असतें तर तें निःसंशय गर्भगळित होऊन गेलें असतें. जिनें त्याचें द्रव्य हरण केलें, तिच्याबद्दलचा क्रोध त्याच्या मनांत घुमसत होता. आणि आतां तर तिचा सूड घेण्याची वेळ अगदीं जवळ येऊन ठेपली असें पाहून त्याच्या त्या राक्षशी अंतःकरणांत एक प्रकारचा हर्ष उत्पन्न झाला.

त्याच्या आंगरख्याखालीं दोन भरलेले पिस्तुल झाकलेले असून, खिशांत एक सुरा होता. शिवाय त्याच्या अंगीं किती भयंकर धाडस होतें तें आपण वेळोवेळीं पाहिलें आहेच. खोलींत आल्यावर त्यानें एक तास जाऊं दिला. नंतर वाड्यांत जिकडे तिकडे सामसूम झाल्यावर, डाव्या हातांत दिवा, व उजव्या हातांत शस्त्र घेऊन तो सावधपणानें तेथून निघाला.

जिना उतरून, ज्या खोलींत मार्गारेट निजली होती त्या खोलीजवळ आला—दार उघडलें—व आंत शिरला. ही खोली मोठी असून तेथें बारा आंथरुणें पसरलेल्या होत्या. परंतु त्या खोलींत मार्गारेटच काय ती एकटी बायको असून तिला झोंप लागली होती.

तिच्या बिछान्याजवळ गेल्याबरोबर सैतान्यानें हातचा दिवा खालीं ठेवला. व खालीं वांकून तिच्या नांवानें हलकेंच त्यानें तिला हांक मारली.

तिचे डोळे उघडल्याबरोबर लागलीच त्यानें आपल्या हातानें तिचें तोंड

दाबून धरलें. परंतु वास्तवीक असें करण्याचें कांहीं कारण नव्हतें, कारण जरी यानें तिचें तोंड बंद केलें नसतें, तरी याला पाहतांच भीतीनें तिची वाचा अगोदर बसली असती. असो.

ती जागी होतांच, यानें तिला हळूंच पण दरडावून सांगितलें:

" जर आरडाओरड करशील तर या क्षणींच वशांत सुरी खुपशीन, मी विचारतों तेवढें खरें सांग, ह्मणजे कांहीं करणार नाहीं. "

मार्गारेट आपले दोन्ही हात जोडून पडल्या पडल्या या राक्षसाप्रमाणें भयंकर दिसणाऱ्या सैतान्याकडे दीनमुद्रेनें पाहू लागली. रात्रींच्या शांत वेळेला, अकस्मात छातीजवळ येऊन भिडलेला, व ज्याचें तोंड भयंकर दिसत आहे अशा त्या सैतान्याला पाहून तिला काय वाटलें असेल याची वाचकांनींच कल्पना करावी.

" कोणाला जागें तर कर कीं, मेलीस ह्मणून समज." असें ह्मणून सैतान्यानें तिच्या तोंडावरचा आपला हात काढला. तरी तिचा श्वासोच्छ्वास मोकळा चालेना. या वेळाला प्रत्यक्ष अजगरानें जरी तिला आपल्या वेढ्यांत गुरफटली असती, तरी देखील तिला इतकी भीति वाटली नसती.

" माझ्या तडाक्यांतून कोणी देखील सुटणार नाहीं हें तूं पक्कें लक्ष्यांत ठेव. केव्हां तरी तें माझ्या तावडींत येणारच. जास्ती बोलायला मला वेळ नाहीं. माझ्यापासून चोरलेले पैसे कोठें आहेत बोल ? "

" सर्व पैसे या लोकांजवळ आहेत. परंतु जेव्हां मला वाटेल तेव्हां त्यांतला भाग मला मिळणार आहे. "

" कोणाजवळ आहेत ते ? कोठें ठेवलेत बोल ? "

" त्या राजाजवळ ! "

" तो पांढऱ्या दाढीचा थेरडा, तोच राजा कां ? "

" हो–तोच. "

" तर मग तो कोठें ठेवतो–आपले पैसे ? सांग सांग ! "

" मी असें ऐकतें कीं, झिंगारी लोकांचा सर्व खजिना त्याच्या उशाशींच असतो. "

" तुला पक्कें ठाऊक आहे ? "

"मला पक्कें ठाऊक आहे. या घरांतला कोपरा न कोपरा मला माहीत आहे." तिला कांहीं धीर येऊन ती ह्मणाली.

" पण, तो एकटा निजतो कां आणखी कोणी त्याच्या बरोबर असतें ?"

" फक्त त्याचा मुलगा **मोर्कर** असतो."

" त्यांच्या जवळ एखादें हत्यार आहे ? "

" कांहीं नाहीं. निदान मला माहीत नाहीं. कारण त्यांना भिण्याचें कारणच नाहीं, अता या घरांत बंदोबस्त केला आहे. "

" तर मग ऐक आतां. तो राजा कोठें निजला असेल तेथें मला घेऊन चल. का मरायचें आहे बोल ? " असें ह्मणून त्यानें खिशांतून सुरा काढला.

" नको—नको—तुह्मी सांगाल तें मी करतें. पण ती जिन्नस लपवा. " हात जोडून तिनें त्याची विनंति केली.

" ठीक आहे. असें असेल तर मी तुझ्या वाटेस जाणार नाहीं. पण सांगून ठेवतों कीं, जर कांहीं लबाडी करण्याचें मनांत आणशील तर तेथल्या तेथें गोळी घालून ठार करीन. मग कांहीं झालें तरी चिंता नाहीं." असें ह्मणून जाग्यावरून उठून तिला दिवा घेऊन पुढें चलण्यास त्यानें सांगितलें. व पायांतला जोडा काढून आपणही चलण्यास तयार झाला.

**मार्गारेट** हातांत दिवा घेऊन पुढें चालूं लागली. आणि सावधपणानें जेथें **झिंगारी** व **मोर्कर** निजले होते त्या खोलीजवळ आली. खोलीचें दार उघडेंच होते. प्रथमतः ती आंत शिरली. नंतर **सैतान्या** शिरला. राजा व **मोर्कर** यांना गाढ झोंप लागली होती. राजाच्या उशाशीं गेल्यावर **सैतान्यानें** आपला पिस्तूल बाहेर काढला. **मार्गारेट** दिवा घेऊन उभी होतीच. **सैतान्यानें** त्याच्या उशाशीं हात घातल्याबरोबर त्याच्या हाताला पैशाची पिशवी तर लागलीच. परंतु त्याला जागें न करितां ती काढून घ्यायची हें जरा कठीण काम होतें. तेव्हां एकदम त्या ह्मातान्याचे तुकडे करावे असें त्याच्या प्रथम मनांत आलें, परंतु असें केलें तर दुसरा जागा होईल ही भीति त्याच्या मनांत येऊन त्यानें तो विचार सोडून दिला, व पिशवीच हळूं हळूं काढण्याच्या कामाला लागला.

परंतु ही पिशवी तो काढून घेतो आहे नाहीं तोंच, शेजारच्या अंथरुणावर **मोर्कर** धडफडून जागा झाला, आणि **सैतान्याला** पाहतांच त्यानें मोठ्यानें आरोळी टोकली.

त्याबरोबर **मार्गारेट**च्या हातून दिवा खालीं पडून विझला—व त्याच संधींत **सैतान्यानें** पिशवीवर हात मारून दारापर्यंत पळ काढला. परंतु तो दारांत पाय ठेवतो तोंच, घंटेचा शब्द सर्व घरांत पसरून चोहोंकडून मंडळी धावून येऊं लागली. व येऊन तेथून गोंधळ माजून राहिला.

इकडे **सैतान्या** त्या गडबडींत जिना उतरून खालीं आला. व दरवाज्याचा आडणा अर्धा अधिक बाजूला सारतो आहे तोंच, त्यांच्या भोंवतालीं **झिंगारी** लोकांचा घोळका पडला.

" हरामखोरा !" **मोर्करनें** त्याच्या हातांतली पैशाची पिशवी हिसकावून म्हटलें: " तुला आश्रय दिला त्याचें हें बक्षीस काय रे ?"

" मी सांगतों कीं, ती पिशवी माझी आहे. मी पुरावा करून देईन. तुम्ही मला जाऊं द्या. मी तुमच्या वाटेस जात नाहीं व तुम्हीही माझ्या वाटेस जाऊं नये." **सैतान्या** म्हणाला.

" हं—हाच तो शब्द ! अरे बेरडा !" असें म्हणून मुशाफरानें,—हा नुकताच जिन्याच्या पायरीशीं आला होता—त्याला कोणीं आवरायला जाण्यापूर्वींच मोठ्या त्वेषानें **सैतान्या**च्या आंगावर धावून त्याच्या पोटांत आपली लांब कट्यार खुपसली.

**सैतान्या** तर पडलाच—परंतु इतरही आश्चर्यचकित होऊन गेले. व त्यांनीं लागलीच या मुशाफराला कैद केलें.

" तो अजून कांहीं मेला नाहीं—परंतु त्या पंथाला आहेसा दिसतो." **मोर्कर** **सैतान्या**ला उठून बसवून म्हणाला.

" तर मग—त्याला सांगा कीं, तुझ्या विश्वासघातामुळें, चार वर्षांपूर्वीं ज्याला काळ्या पाण्याची शिक्षा झाली होती त्यानें शेवटीं तुझा सूड घेतला—व त्याच **फ्रथांकीजेम**च्या हातून तू मरत आहेस."

हे शब्द ऐकून **सैतान्या**ला थोडासा त्वेष आला. आणि त्या त्वेषांत कांहीं शब्द बोलण्याचा तो प्रयत्न करूं लागला—परंतु ते शब्द त्याच्याच्यानें बोलवेनात. शेवटीं आपल्या शत्रूकडे एकवार डोळे फाडून पाहून, **मोर्कर**च्या अंगावर तो निचेष्टित पडला.

---

# भाग १३६.

## गुप्त न्यायसभा.

ही गोष्ट झाल्यानंतर सरासरीं अर्ध्या तासानें, **झिंगारी**च्या राजवाड्यांत एक विलक्षण प्रकार घडून आला.

तळमजल्यावरील दिवाणखान्यांत दिवे लावून सर्व उजेड केला होता. मध्यभागीं

एक लांबलचक मेज ठेवून त्याच्या एका टोकाशीं अंगांत काळा झगा व डोक्याला काळी टोपी घालून **राजा झिंगारी** बसला होता. मेजाच्या दोन्ही बाजूंनीं, मधल्या वेळांत, आपापले पोषाख करून **झिंगारी** स्त्रिया व पुरुष बसले होते, आणि दुसऱ्या टोकाशीं आपलें दीन वदन करून सर्वांच्या तोंडाकडे पहात **मार्गारेट** उभी होती. **सिलंग**ही तेथेंच होता–पण तो चिंतातूर होऊन बसला होता. फक्त **एशा** तेथें नव्हती: ती **सैतान्या**च्या सुश्रुषेंत गुंतली होती.

मध्यरात्रींच्या वेळीं, आणि वरील प्रकार घडून आल्यानंतर लागलीच, अशा तऱ्हेची सभा भरलेली पाहून **मार्गारेट**चें धाबें तेव्हांच दणाणून गेलें. तिनें तेव्हांच जाणलें कीं, या सभेचा माझ्याशीं कांहीं संबंध आहे.

"**मार्गारेट,**" **झिंगारी** बोलूं लागला:"या वेळेला तूं आह्मा **झिंगारी** लोकांच्या गुप्त न्यायासनापुढें आहेस. ज्या देशांत आह्मी राहतों त्या देशांतील प्रजा ज्या कायद्यानें बांधली गेली आहे त्यापेक्षां कांहीं अंशीं आह्मी स्वतंत्र असून आह्मांकरितां आह्मी स्वतः कायदेकानू केलेले आहेत. व त्या कायद्याच्या अनुरोधानें ही न्यायसभा तुजवर घोर अपराधाचा आरोप लागू करीत आहे. परोपकार करणें ही आमच्यांतली मुख्य चाल आहे; आणि तुलाही समजून आलेंच आहे कीं, जे आमचा आश्रय मागून आपलें संरक्षण करूं इच्छितात, त्यांची आम्ही फारच थोडी पुसतपास करीत असतों. व अशा तऱ्हेनें येणाऱ्या लोकांना आमच्या रीतीभाती व आमचे व्यवहार कळतच असतात. परंतु या आमच्या परोपकाराला बक्षीस फक्त कृतघ्नपणानें आमचा विश्वासघात करून, आमच्या हिताला बाधक अशा गोष्टी प्रसिद्ध होऊन मिळत असतें. जरी चोराशीं आमचा संबंध नाहीं किंवा त्यांच्या संबंधानें आमचें मन कळवळत नाहीं तरी ते होऊन जर आमच्याकडे आश्रय मागायला आले–तर आह्मी त्यांना कधीं नाहीं ह्मणत नाहीं. परोपकारदृष्टीनें व व्यवहारदृष्टीनें आह्मी हा संप्रदाय चालविला आहे. परोपकारदृष्टि अशी:––आमची अशी समजूत आहे कीं, वाईट मार्गानें जाणारे जे लोक आहेत त्यांपैकीं, बहुतेकांना कायद्यामुळें तसें करणें भाग पडलेलें असतें. स्वभावतःच ते वाईट निपजलेले नसतात. ह्मणून आह्मी त्यांना आश्रय देत असतों. आणि व्यवहारदृष्टी अशी कीं––कायद्याची अवज्ञा करून जे लोक राहत असतात, त्या सर्वांशीं गोडींत राहण्याची आमची इच्छा असते, तथापि विश्वासघात होऊं नये ह्मणून आह्मांला बंदोबस्तानेंही राहवें लागतें. व ज्या ठिकाणीं विश्वासघात झालेला आह्मांला आढळतो, त्या ठिकाणीं अपराधी जर

आमच्या ताब्यांत असेल तर आह्मी त्याला शिक्षाही केल्याशिवाय राहत नाहं आणि एवढ्याकरितांच सुमारें शंभर वर्षांपूर्वी ज्या वेळेला आमचा समाज प्रथ उत्पन्न झाला त्याच वेळेला ही गुप्त न्यायसभाही स्थापन झालेली आहे. तर य वेळेस **मार्गारेट,** तूं या गुप्तन्यायासनापुढें असून, विश्वासघात आणि कृतघ्नत या दोन घोर अपराधांचा तुजवर आरोप शाबीत होत आहे. "

त्याचें हें भाषण ऐकून सर्वांच्या मनावर विलक्षण प्रकारचा ठसा उमटला. त्याच्या पदवीला शोभेल असेंच हें भाषण होतें. कांहीं वेळ थांबून पुन्हा तो बोलला.

" **मार्गारेट,** प्रथमतः तूं रानामध्यें थंडीनें मरत पडलेली आह्माला सांपडलीस. तुझ्याजवळ द्रव्य होतें, तें सर्व आह्माला घेतां आलें असतें; परंतु त्याच्या तिसऱ्या हिश्शावर आह्मी तुझी मालकी ठेवली. तूं आमच्यांत आलीस आणि आह्मी तुला विशेष ममतेनें वागविलें, आह्मी आपल्या नायकांमुलींमध्यें तुला मिसळण्याला परवानगी दिली. असें असून पंधरा दिवस झाले नाहींत तोंच, एका चोराला तूं घरांत घेतलेंस, आणि ज्या ठिकाणीं आह्मां सर्वांचा खजिना असतो त्या ठिकाणीं नेलेंस——"

" महाराज, आपण एकवार माझें बोलणें ऐकावें, ह्मणजे मी सर्व सांगतें."

" सांग तर. " राजा ह्मणाला.

" महाराज, कृतघ्नपणाच्या हेतूनें माझ्या हातून हा अपराध घडला नाहीं. मी रात्रीं जागी झालें आणि पाहतें तों ज्या मनुष्याला मी भीत होतें तोच भयंकर मनुष्य माझ्या छातीवर आहे. मी कबूल करतें कीं, जें द्रव्य तुह्माला माझ्याजवळ सांपडलें तें मीं त्याचें चोरलेलें होतें. परंतु हें सांगण्याचा पूर्वी प्रसंगच आला नव्हता. तो या घरांत कसा आला, मी येथें आहे हें त्याला कसें कळलें, व माझी खोली त्याला कशी सांपडली, हें मला कांहीं माहीत नाहीं. तथापि, तो माझ्या खोलींत आला, व मला मारण्याची भीति घालून, आपलें द्रव्य परत घेण्याकरितां त्यानें मला या खोलींत आणलें, एवढें काय तें खरें आहे. "

" मग माझ्या खोलींत आल्यावर तूं ओरडा कां नाहीं केलास? जरी मी अशक्त आणि ह्मातारा आहें तरी **मोर्कर** जवळ होता. शिवाय घंटेची दोरी हालवून तुला सर्व घर जागें करतां आलें असतें. "

" महाराज, तसें मीं केलें असतें तर त्या राक्षसांनीं तेथल्या तेथें मला ठार केलें असतें. "

" आपल्या सोबत्याचा विश्वासघात करण्यापेक्षां मरणें बरें, हें तुला ठाऊक नाहीं काय? "

" महाराज, कितीं झालें तरी मी बायको आहें. अशा भयंकर मरणाला माझ्याच्यानें कशी छाती करवेल? "

" अशा कामांत आमच्या बायका मरणाला सुद्धां तयार होतील. आणि जे आमचा सहवास करूं इच्छितात त्यांनीं सुद्धां असें शिकलें पाहिजे. "

" महाराज, तो अकस्मात् कसा आला, ऐन मध्य रात्रीच्या वेळीं मला कशी भीति घातली, व माझ्या गळ्याशीं सुरी ठेवल्यावर माझी स्थिति काय झाली, याचा आपण विचार करावा. "

" ज्या मनुष्याला तूं इतकी भीत होतीस, तोच मनुष्य पंधरा दिवसांनीं या घरांत येतो, याचा मला मोठा चमत्कार वाटतो. या संबधानें जर कांहीं संशय माझ्या मनांत आला तर ती माझी चूक झाली काय? तुला ठाऊक आहे कीं, जी पिशवी माझ्या उशाशीं असते तिच्यांत तुझें एकटीचेंच द्रव्य नसून, माझ्या मांडलिक सरदारांकडून आलेली वार्षिक खंडणीही तिच्यांत होती. कदाचित् आमचा तुला कंटाळा येऊन, ज्या मनुष्याचें तुला इतकें भय वाटत होतें, त्याला त्याच्या चोरलेल्या द्रव्यापेक्षां ज्यास्ती देऊन त्याशीं सख्य करण्याच्या इराद्यानें तूं हें केलें नसेल कशावरून? "

" महाराज, तुमच्या उंबऱ्यांत पाऊल ठेवल्यापासून मी एक दिवसही बाहेर पडलें नाहीं, हें आपल्याला ठाऊकच आहे. मग त्या मनुष्याशीं माझें बोलणें तरी कसें होईल? "

" **मार्गारेट**, एखादी गोष्ट करण्याचें मनांत आलें म्हणजे तेथें रस्ताही सुचत असतो. तुझ्या तर्फेनें तुला आणखी कांहीं बोलावयाचें आहे? "

" आतां मी काय बोलणार? मी खरें होतें तें सांगितलें. "

" तर मग तूं आतां जरा बाजूला हो. "

दोन मनुष्यांनीं तिला मग तेथून बाजूला नेलें; व बाकीचे या खटल्यासंबंधानें विचार करूं लागले.

सर्व गोष्टींचा विचार करतांना त्यांचें मन तिच्याविषयीं प्रतिकूळ होऊं लागलें. शेवटीं, **सिग्मिंग** तिच्या पक्षानें भांडूं लागला; तेव्हां त्यांनीं त्याला सांगि-

तलें कीं, तुला फक्त तूं इमानी आहेस ह्मणून आमच्यांत बसूं दिलें. बाकी तूं आमच्या जातीचा नसल्याकारणानें तुला यांत तोंड घालण्याचा अधिकार नाहीं. असो.

त्या न्यायसभेपुढें सर्व मुद्द्यांचा बारीक रीतीनें विचार झाल्यावर राजानें सभेचें, **मार्गारेट** अपराधी आहे किंवा नाहीं याबद्दल मत घेतलें; आणि शेवटीं बहुमतानें ती " अपराधी " ठरली.

नंतर तिला न्यायसनापुढें आणून उभी केल्यावर राजानें पुढील निकाल सांगितला:—

" **मार्गारेट,** या खटल्याचा या न्यायसभेनें बारीक रीतीनें विचार करून असें ठरविलें आहे कीं, विश्वासघाताचा आरोप तुजवर पूर्ण लागू होत आहे; व अशा अपराध्याला या न्यायसभेच्या उत्पादकांनीं मोठ्या दूरदृष्टीनें एकच शिक्षा सांगितली आहे. ती हीच कीं, कैद्याला या ठिकाणीं न्याय मिळाला नाहीं असें वाटून जो सरकारी न्यायसभेपुढें आपली फिर्याद नेईल त्यास फिरून लोकांत जातां येऊं नये. अशी शिक्षा कोणती तर मरण होय! "

ही शिक्षा ऐकून तिनें राजाची पुष्कळ विनवणी केली; परंतु तिचा कांहीं उपयोग न होतां, राजानें शेवटीं, "तिला बाजूला काढा" ह्मणून हुकूम केला—परंतु त्या वेळेला त्याच्या डोळ्यावाटें पाणी आलें.

पूर्वी ज्या दोन मनुष्यांनीं तिला तेथून नेलें होतें त्याच मनुष्यांनीं पुन्हां तेथून तिला जुलमानें ओढीत नेलें. या वेळेला तिचा आक्रोश, ऐकणारांच्या काळजांत भिनत होता.

ती गेल्यावर **सिलींग**नें नम्रपणानें विचारलें: "महाराज, ही शिक्षा केव्हां अमलांत यायची आहे?"

" आणखी एका तासानें, तुला त्या वेळेपर्यंत तिच्याशीं कांहीं बोलायचें असेल तर जा. " असें राजानें सांगितल्याबरोबर **सिलींग** मुजरा करून निघून गेला.

नंतर राजानें त्या मुशाफराला पुढें आणविलें.

**रिचर्ड मार्खम** आणि **एलिझा सिडने** यांची ज्या कोर्टांत चौकशी होऊन, त्यांस शिक्षा झाली त्याच कोर्टांत **क्यांकांजेम**विरुद्ध **सैतान्या**नें माफी मिळवून साक्ष दिल्यामुळें त्यास जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा झाली होती, हे

आमच्या वाचकांना स्मरत असेलच. त्या **क्र्यांकीजेम**ला आतां या न्यायसभेंत आणून उभें केलें.

राजानें नंतर त्याच्याशीं बोलण्यास सुरुवात केली. " आह्मीं सर्वांनीं मोठ्या संकटांत पडावें असें वर्तन आज तुझ्या हातून घडलें आहे. करितां आतांच्या आतांच आमचा सहवास सोडण्याविषयीं आम्ही तुला सांगत आहों. आह्मी तुला चांगल्या रीतीनें वागविलें आहे, त्याबद्दल तूं येथें आल्यापासून जें जें पाहिलें असेल किंवा ऐकलें असेल त्या संबंधानें गुप्तता ठेव, ह्मणजे आह्मांला बक्षीस दिल्याप्रमाणें होईल. जा—आणि प्रसंग पडेल तेव्हां **झिंगारी** लोकांच्या उपयोगीं पडण्यास तयार ऐस ह्मणजे झालें."

" महाराज, रात्रंदिवस मी आपली सेवा करण्यास आनंदानें तयार राहीन. एवढेंच नव्हे तर आपल्यापैकीं, कोणाचेंही रक्षण करण्यास मी आपले प्राणदेखील खर्ची घालीन. आपण मला घालवून दिल्याबद्दल मी बिलकूल आपल्याला दोष देत नाहीं. कारण उद्यां सकाळींच माझा येथून जाण्याचा निश्चय होता. माझ्यासारख्या पळून आलेल्या कैद्याला **लंदन** शहर निर्भय नाहीं. परंतु जाण्यापूर्वी एक शब्द मला विचारायचा आहे. तो मनुष्य मेला किंवा नाहीं ! "

" त्याबद्दल आह्मी तुला कांहीं सांगणार नाहीं. आतां तूं आमच्या दृष्टीसमोर नकोस. तुझ्याजवळ पैसे आहेतच." असें सांगितल्यावर, **क्र्यांकीजेम** राजाला मुजरा करून व त्याचे फार फार आभार मानून निघून गेला.

त्यानंतर सर्व शांत झालें. कोणी एकही शब्द बोललें नाहीं. शेवटीं जिन्यांतील घंटेचे तीन टोले पडल्याबरोबर, राजा व त्याचे लोक उठून सावकाश चालूं लागले. एकमेकांशीं न बोलतां, एकेक पाऊल टाकीत टाकीत ते वाड्याच्या मागच्या बाजूला आल्यावर एक दगडी जिना उतरून तळघरासारख्या एका जागेंत आले. या ठिकाणीं **सिलिंग, मार्गारेट** व तिला घेऊन आलेलीं दोन मनुष्यें हीं यांची वाट पहात उभीं होतीं. तेथें एकच मेणबत्ती जळत असून, तिचा मंद प्रकाश त्या स्थळाची भयानकता जास्ती वाढविण्यास कारण झाला होता.

**मार्गारेट** दुःखातिशयानें आपलें देहभान विसरली होती ह्मटलें तरी चालेल. ती जे हुंदके देत होती त्यावरूनच तिच्या मनाची स्थिति दिसत होती. **सिलिंगचें**

शी तोंड अगदीं उतरून गेलें होतें. पण तिच्या तर्फेनें **झिंगारी** जवळ प्रार्थना करून कांहीं उपयोग नाहीं हें त्याला चांगलें माहीत होतें. असो.

राजानें सर्व तयारी झाली काय म्हणून विचारल्यावर एकानें होय म्हणून सांगून एका कोठडीचें दार उघडलें. नंतर **झिंगारी** तिला म्हणाला. "**मार्गारेट,** तुझी वेळ भरत आली. मित्रहो, कृतघ्नपणा आणि विश्वासघात केल्याचें फळ हें आहे हें लक्षांत ठेवा."

त्या दोन रक्षकांनीं मग तिला दोन्ही हातांनीं धरून त्या कोठडीच्या आंत असलेल्या दुसऱ्या अंधार कोठडींत नेलें.

या वेळेला ती ओरडली नाहीं किंवा तिनें नुसता सुसकाराही टाकला नाहीं. त्या दोन रक्षकांच्या दणगट हाताचा तिला स्पर्श होतांच तिची शुद्ध नाहींशी झाली.

हा प्रकार पाहून **सिलिग** आपले ओंठ आवळूं लागला; परंतु त्यानें मोठ्या कष्टानें आपले मनोविकार आवरून धरले. असो.

**मार्गारेट**ला आंतल्या अंधार कोठडींत एका चटईवर नेऊन टाकलें—तिच्या पोटापाण्याची तजवीज त्या ठिकाणीं पूर्वीच करून ठेवली होती. नंतर दोन्हीं दारें बळकट लावून घेतलीं, व या प्रमाणें तिला जिवंत समाधि दिली.

छंदूमरहस्य—पूर्वार्ध—समाप्त.

# पूर्वार्धाचा उपसंहार.

वाचक हो, येथपर्यंत तर आह्मीं मजल मारली, व अद्याप इतकीच बाकी राहिली आहे.

प्रथमारंभींच आह्मीं आपल्याला सांगितलें होतें कीं, एक अन्योन्यविरोधी असें नगर आपल्या पाहण्यांत येईल, त्याप्रमाणें आह्मी आपलें वचन खरें केलें नाहीं असें कोण ह्मणेल ?

तरी—ज्या भव्य मंदिराचें वैभव व दारिद्र्य प्रदर्शित करण्याचें आह्मी काम पत्करलें आहे, त्यावरील आच्छादन फक्त अंशतःच आह्मीं दूर केलें आहे. अद्यापि **लंडनरहस्या**च्या अतिगहन भागांत आमच्या वाचकांना शिरावयाचें राहिलेंच आहे.

ज्या आमच्या वाचकांनीं या कादंबरीच्या पूर्वार्धाचे भाग वाचले असतील त्यांना आढळून आलेंच असेल कीं, या कथारंगभूमीवर इतका वेळपर्यंत येऊन गेलेल्या पात्रांची भूमिका अद्यापि संपली नाहीं. प्रथमतःच परस्पर भिन्न अशा मार्गानें जे दोन गृहस्थ भूलोकच्या यात्रेस निघाले आहेत, ते गृहस्थ कोण व त्यांच्या प्रवासाचें पर्यवसान कोठें व कसें झालें हें अद्यापि समजावयाचें आहे—त्याप्रमाणेंच ज्या दोन बृक्षांजवळ, केवळ मनगटाच्या जोरावर, व स्वतःच्या अकलेवर जगांत नांव मिळवीन अशी भावाजवळ प्रतिज्ञा करून, तारीख १० जुलै १८३१ रोजीं बारा वर्षांच्या मुदतीनें निघालेला **युजेन** याच्या प्रतिज्ञेस कितपत यश येतें हें पहावयाचें आहे—त्याप्रमाणेंच, आपणाशिवाय इतरांस तृणवत् समजणारा, जेथें तेथें शेखी मिरवणारा, गर्विष्ठ, कपटाचें केवळ आगर व मतलबी असा जो **ग्रीनवूड**—ज्याची दैवदीपिका त्याच्या मार्गानें सर्वकाल प्रकाशलेली, ती या कथेच्या उत्तरार्धापर्यंत अशीच प्रकाशमान राहते किंवा मध्यंतरींच तिचा अस्त होणार आहे हेंही आपणास कळावयाचें आहे—त्याप्रमाणेंच "अनृतं, साहसं, माया," इत्यादि वचनाला खरेपणा आणणारी, कपटी, मायावी, व विषयांध जी **सिसिला,** तिचा अंत कशा प्रकारचा होणार आहे तो पहावयाचा आहे.—त्याप्रमाणेंच, निश्चयाचा जो केवळ पर्वत, शांततेचा जो केवळ समुद्र, सद्गुणाचा जो केवळ पुतळा, असा जो **रिचर्ड मार्खम** त्याच्या अंतःकरणांत नुकतेंच, त्याला प्राणाहूनही प्रिय असा **इझाबेलेनें** भावी वैभव

सुखाच्या आशेचें बीजारोपण केलें आहे त्याचा वृक्ष वाढून त्याचीं फळें किती मधुर येतात, त्यांचा स्वाद आपणाला घ्यावयाचा आहे--त्याप्रमाणेंच, चोऱ्या हाणमार व खून असे भयंकर अपराध करून वाचकांच्या अंगावर वारंवार ज्यानें शहारे आणले; व अंत:करणांत त्वेष उत्पन्न केला, त्या भयंकर सैतानाच्या पापाचा घडा कधीं भरणार आहे किंवा नाहीं, हेंही आपणास पहावयाचें आहे--सारांश, ही जी भव्य इमारत उभारली जात आहे, तिचीं **वैभव** आणि **विपत्ति, संपत्ति** आणि **दारिद्र्य** इत्यादि अंगें पूर्णतेनें दाखवावयाचीं व पहावयाचीं राहिलीं आहेत.

तसेंच, या रंगभूमीवर अद्यापि कांहीं नवीं पात्रें यावयाचीं आहेत. त्यांपैकीं, कांहीं, आपल्या कृतीनें आपली मति कुंठित करतील--कांहीं आपणास आश्चर्यचकित करतील--कांहीं आपल्या मनांत स्नेह उत्पन्न करतील--कांहीं आपणास तिरस्कार व किळस हीं वाढवितील--आणि कांहीं आपणास आनंद-शिखरावर नेऊन बसवितील.

करितां, वाचक हो, जसें आपण या वेळपर्यंत मेहेरबानी करून, या उभारणीस प्रोत्साहन दिलें--या वृक्षांकुरास जीवन घातलें--व या नौकेस वल्हविण्यास साह्य केलें--तसेंच पुढेंही करण्यास उदार व्हाल तर आह्मीही वचन देऊन ठेवतों कीं, ज्या इच्छा मात्रेंकरून आपणांस येथपर्यंत येण्याची शक्ति आली ती मध्यंतरींच आपणास सोडणार नाहीं:--आणि आमची अशी खात्री आहे कीं, शेवटीं ज्या वेळेस, आपण या पुस्तकाकडे सिंहावलोकन कराल त्या वेळेस आपणास कळून येईल कीं, ज्याच्या वाचनानें मनुष्यमात्राच्या अंत:करणातले सद-सद्विचार जागृत होतील असें जर एखादें पुस्तक असेल तर तें--"**लंडनरहस्य.**"